
# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## सर्वंकष आकलन



लेखक / संपादक **डॉ. सुनीलकुमार लवटे**

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी :
## सर्वंकष आकलन

लेखक/संपादक
डॉ. सुनीलकुमार लवटे

अक्षर
दालन

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन**
**(समीक्षात्मक लेखसंग्रह)**
**लेखक/संपादक**
© डॉ. सुनीलकुमार लवटे

**संपर्क :**
'निशांकुर', अयोध्या कॉलनी,
राजीव गांधी रिंग रोड, सुर्वेनगरजवळ,
पोस्ट- कळंबा, कोल्हापूर- ४१६ ००७
मो. नं. ९८ ८१ २५ ०० ९३
drsklawate@gmail.com
www.drsunilkumarlawate.in

**प्रथम आवृत्ती** (सुधारित)
२७ जानेवारी २०२३
(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी १२२ वी जयंती)

**प्रकाशक**
**अक्षर दालन**
२१४१, बी वॉर्ड, मंगळवार पेठ,
कोल्हापूर. फोन : (०२३१-२६४६४२४)
email- akshardalan@gmail.com

**मुखपृष्ठ**
गौरीश सोनार

**अक्षर जुळणी**
सौ. शिल्पा पराग कुलकर्णी

**मुद्रक**
मिरर प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर

**मूल्य ₹ ५००/-**

***ISBN : 978-81-957702-6-7***

प्रतिकूल परिस्थितीत
प्रामाणिक मतप्रदर्शन
आणि प्रबोधन करणाऱ्या
सर्व विचारवंतांच्या धैर्यास...

# प्रस्तावना

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण लोकशाहीच्या वातावरणात झाली होती. त्यांनी लोकशाहीच्या लाटा अनुभवल्या होत्या. तसेच त्यांना लोकशाहीविरोधी घडामोडींचाही अनुभव होता. पहिले महायुद्ध आणि दुसरे महायुद्ध ही लोकशाहीविरोधी लाटांची दोन उदाहरणे होती. तसेच भारत पारतंत्र्यात होता. म्हणजेच लोकशाही विरोधी वातावरण होते. हादेखील त्यांना अनुभव होता. भारत स्वातंत्र्याची चळवळ लोकशाहीला मध्यवर्ती ठेवून लढवत होता. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही राज्यसंस्था घडवण्याचे कार्य भारतात झाले. या गोष्टीचा त्यांना जवळून अनुभव होता. विशेषतः डॉ. आंबेडकरांची चळवळ, गांधीजींची चळवळ, स्वातंत्र्यचळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, धार्मिक सुधारणा चळवळ, अशा चळवळीत त्यांनी जवळून लोकशाही विचार अनुभवला होता. हिंदुत्ववादी चळवळ त्यांनी जवळून पाहिली होती. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी आणीबाणीही पाहिली होती. आणीबाणी म्हणजेच लोकशाही विरोधातील एक मोठी घटना होती. त्यानंतर आर्थिक सुधारणापर्व सुरू झाले होते. हिंदुत्व चळवळ, आणीबाणी आणि आर्थिक सुधारणापर्व या तीन घडामोडींनी भारतीय लोकशाही प्रक्रियेच्या मार्गात मोठे अडथळे निर्माण केले. या काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वैचारिक पातळीवरती कार्य केले. आर्थिक सुधारणापर्व बत्तीस वर्षे पूर्ण करत आहे. त्यानंतर 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन' हे पुस्तक प्रकाशित होत आहे (२०२३). डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. सदानंद मोरे, श्री. किशोर बेडकीहाळ, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. जनार्दन वाघमारे,

डॉ. राजा दीक्षित यांनी लिहिलेल्या लेखकांचा हा लेखसंग्रह आहे. या पुस्तकात बारा लेख डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी लिहिलेले आहेत. डॉ. सदानंद मोरे, श्री. किशोर बेडकीहाळ, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. राजा दीक्षित यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावरील व्याख्यानमालेनंतर सविस्तरपणे लेख लिहिले. डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व्यक्ती व विचार' हा लेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावरील व्याख्यानमालेतील भाषण आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावरील व्याख्यानमाला शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्राने आयोजित केली होती. डॉ. सुनीलकुमार लवटे हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे समग्र साहित्य प्रकाशित करत आहेत. ते स्वतः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र साहित्याचे संपादक आहेत. डॉ. सदानंद मोरे महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आहेत, तर डॉ. राजा दीक्षित हे विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष आहेत. डॉ. अशोक चौसाळकर हे राज्यशास्त्र आणि धर्ममीमांसेचे अभ्यासक आहेत. श्री. किशोर बेडकिहाळ हे नव्वदीच्या नंतरचे प्रबोधनकार आहेत. डॉ. जनार्दन वाघमारे हे कुलगुरू आणि राजकीय अभिजन म्हणून लोकप्रिय आहेत. यामुळे हा लेखसंग्रह जाणकार अभ्यासकांकडून आकारास आलेला आहे.

**व्यक्ती, कार्य आणि विचार**

या पुस्तकाचे स्वरूप चार भागांमध्ये विभागलेले आहे. आरंभीचा विभाग व्यक्ती, कार्य आणि विचार हा आहे. व्यक्ती आणि विचारांची मांडणी आठ लेखांमध्ये केलेली आहे. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्ती आणि विचार' हा सुरुवातीचा लेख लिहिलेला आहे. त्यांनी शास्त्रींच्या व्यक्तिमत्त्वाचा वैचारिक विकास वर्णनात्मक पद्धतीने सविस्तरपणे मांडला आहे. दुसरा लेख 'आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची भूमिका' हा डॉ. सदानंद मोरे यांचा आहे. डॉ. सदानंद मोरे यांनी त्यांच्या अनुभव आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान या दोन मुद्यांची भाषणाच्या स्वरूपात मांडणी केलेली आहे. तिसरा लेख 'प्रज्ञातीर्थ: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' हा डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी लिहिलेला आहे. शास्त्रींची संस्कृत पंडित म्हणून जडणघडण, स्वातंत्र्य चळवळीतील नेतृत्व, महात्मा गांधीजींच्या अस्पृश्यतानिवारण कार्यातील सहभाग, भारतीय राज्यघटनेचे संस्कृत

भाषांतर, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सहभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची कामगिरी या मुद्यांची सविस्तरपणे मांडणी डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी या लेखात केली आहे. शास्त्रींचे अलक्षित पैलू डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी स्पष्ट केले आहेत. धर्म सुधारणेचे कार्य, स्वातंत्र्यचळवळीतील जनजागृती व संघटन, बागलाणचा जंगल सत्याग्रह व तुरुंगवास, गांधीवाद या संदर्भातील राजकीय प्रक्रिया त्यांनी स्पष्ट केली आहे. तसेच त्यांनी 'आनंदमीमांसा', 'शुद्धिसर्वस्वम्', 'भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्', 'जडवाद', इत्यादी पुस्तकांची सविस्तरपणे ओळख करून दिलेली आहे. 'रंग-रेषांच्या पलीकडचे तर्कतीर्थ' हा एक वर्णनात्मक लेख आहे. विशेष म्हणजे 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे वाचन' यावर सविस्तरपणे स्वतंत्र लेख डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी लिहिलेला आहे. हा लेख त्यांनी वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने लिहिलेला आहे. तसेच त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समग्र वाङ्मयाचे सिंहावलोकन केलेले आहे. प्रबोधनाची भाषणसत्रे, प्रस्तावना, समीक्षा, हजरजबाबी मुलाखती यावरती लवटे यांनी भर दिलेला आहे. डॉ. जनार्दन वाघमारे यांनी 'रॉयवाद आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' हा लेख साहित्यिक आणि वैचारिक अंगाने लिहिलेला आहे. या लेखांमध्ये त्यांनी शास्त्रींच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेतलेला आहे. विशेषतः मार्क्सवाद, रॉयवाद, गांधीवाद, समाजवाद या अंगाने त्यांनी शास्त्रींच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाचे विश्लेषण केले आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (२७ जानेवारी १९०१- २७ जानेवारी १९९४) यांच्या विचारांमध्ये न्याय ही संकल्पना मध्यवर्ती होती. शास्त्री यांनी न्याय संकल्पनेचा दोन पद्धतीने विस्तार केला होता. हिंदू संस्कृतीच्या चौकटीत त्यांनी न्यायाचे विवेचन केले. तसेच त्यांनी मार्क्स आणि रॉय विचारांच्या चौकटीत न्यायाचे विवेचन केले. यासाठी त्यांनी ज्ञानाचे संकलन केले. त्यांनी ज्ञान सर्वांना उपलब्ध करून दिले. यामुळे ज्ञानाचे क्षेत्र सर्वांसाठी खुले झाले. हे त्यांचे ज्ञानाच्या क्षेत्रातील न्यायाचे एक महत्त्वाचे कार्य होते. लक्ष्मणशास्त्री जोशी महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत, संस्कृत पंडित व मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक होते. या क्षेत्रातील त्यांचे कार्य सर्वांना ज्ञान उपलब्ध करून देणारे होते. विशेष म्हणजे लक्ष्मणशास्त्री जोशी वयाच्या चौदाव्या वर्षी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत दाखल झाले. तेथे केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी न्याय-वेदान्तादी प्राचीन शास्त्रांचे अध्ययन केले. १९२३ साली कलकत्याच्या शासकीय संस्कृत

महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी त्यांनी संपादन केली. इंग्लिश भाषा व आधुनिक पश्चिमी ज्ञानविज्ञानाचा त्यांनी सखोल व्यासंग केला. वाई येथेच राहून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्राज्ञपाठशाळेचे व मराठी विश्वकोशाचे कार्य केले. या त्यांच्या कार्यामुळे ज्ञानाचे संकलन, ज्ञानाची पुनर्रचना आणि ज्ञानाचा विस्तार या स्वरूपात न्याय संकल्पना व्यक्त झाली आहे.

**वैचारिक साहित्य आणि न्याय**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी महाराष्ट्राच्या वैचारिक साहित्यात मोठी भर घातली. त्यांनी साहित्य आणि न्याय यांचा संबंध सातत्याने जोडलेला दिसतो. चौथ्या दशकापासून त्यांनी वैचारिक क्षेत्रातील साहित्य कृतींमध्ये मोलाची भर घातली. तिसऱ्या दशकात शास्त्रीजींनी सुधारणा या गोष्टीवर भर दिला होता. सुधारणा विचार हा त्या काळातील न्यायाचा एक टप्पा होता. हा त्यांच्या जीवनातील वैचारिक परिवर्तनाचा पहिला टप्पा होता. चौथ्या दशकात शास्त्री यांनी भौतिकवादी विचार सुरू केला. भौतिक घटकांमुळे व्यक्तीला व समाजाला न्याय मिळतो. यामुळे त्यांनी जडवादाचा मांडलेला विचार न्यायाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. हा त्यांच्या जीवनातील दुसरा टप्पा होता. तेव्हापासूनच त्यांनी गंभीरपणे वैचारिक लेखन केले. हा त्यांच्या जीवनातील वैचारिक परिवर्तनाचा दुसरा टप्पा पंधरा-सोळा वर्षांचा होता (१९३२-१९४७). १) शुद्धिसर्वस्वम् (१९३४) व आनंदमीमांसा (१९३८) हे दोन ग्रंथ त्यांनी विसाव्या शतकातील चौथ्या दशकात लिहिले. कारण सामाजिक सुधारणा नंतर चिद्वाद या तत्त्वज्ञानावर त्यांनी लेखन केले. 'आनंदमीमांसा' हा त्यांचा सुरुवातीचा निबंध होता. तत्त्वज्ञान व सामाजिक जीवन यांचा निकटचा व जिव्हाळ्याचा संबंध असतो. या दृष्टिकोनातून उपनिषदातील आनंदतत्त्वाचे त्यांनी विवेचन केले होते (जोशी लक्ष्मणशास्त्री, १९९४: प्रस्तावना). २) चौथ्या दशकात शास्त्री यांनी जडवादी पद्धतीने विचार सुरू केला होता. पाचव्या दशकात त्यांनी 'हिंदुधर्माची समीक्षा' हा ग्रंथ वैज्ञानिक पद्धतीने (जडवादी, ऐतिहासिक भौतिकवाद) लिहिला. विशेषतः नागपूर विद्यापीठात रा. ब. परांजपे व्याख्यानमालेत त्यांनी तीन व्याख्याने १९४१ मध्ये दिली होती. जडवाद (१९४१), ज्योतिनिबंध (म. फुल्यांचे चरित्र आणि कार्य- १९४७), हे महत्त्वाचे दोन ग्रंथ लिहिले. विशेषतः भौतिकवाद हा विचार त्यांनी पाचव्या दशकात महाराष्ट्रात मांडला. ३) सहाव्या दशकात त्यांनी वैदिक संस्कृतीचा

विकास (१९५१) हा ग्रंथ लिहिला. ४) सातव्या दशकात त्यांनी राजवाडे लेखसंग्रह (१९६४) आणि लो. टिळक लेखसंग्रह (१९६९) या ग्रंथांचे त्यांनी संपादन केले. ५) विसाव्या शतकातील आठव्या दशकात त्यांनी 'आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत' (१९७३) हा ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यांनी हे वैचारिक लेखन लोकशाही चौकटीत आणि वातावरणात झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात तर्कतीर्थ यांनी लोकशाहीचा आग्रह धरला होता. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही प्रक्रिया घडत होती. त्या काळात तर्कतीर्थ स्वतंत्रपणे लेखन करत होते.

**प्राच्यविद्येचे अभ्यासक**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे एक महाराष्ट्रातील महत्त्वाचे विचारवंत होते. तसेच ते प्राच्यविद्येचे अभ्यासक आणि पंडित होते. प्राच्यविद्या म्हणजे भारत आणि पौर्वात्य संस्कृती व समाज यातील गणित, व्याकरण, काव्य, चिकित्सा यांचा अभ्यास होय. या संदर्भात त्यांनी महत्त्वाचे कार्य केले. पॅरिसच्या आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदेत १९७३ साली त्यांनी 'द कॉस्मिक स्टेट अँड कलेक्टिव्ह किंगशिप ऑफ वेदिक गॉड्स' हा शोधनिबंध सादर केला होता. संस्कृत पंडित म्हणून १९७३ मध्ये व 'पद्मभूषण' म्हणून १९७६ मध्ये भारत सरकारने त्यांना गौरविले होते. महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाचे सुरुवातीपासून (१९६०) व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे १९८० पासून १९९४ पर्यंत ते अध्यक्ष होते. प्राचीन-अर्वाचीन सर्व ज्ञानविज्ञाने मराठीतून प्रकाशन करण्याचे मौलिक कार्य त्यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

**रॉयवाद आणि तर्कतीर्थ**

रॉय यांचा विचार सामाजिक न्यायाचा होता. कार्ल मार्क्सची न्यायाची संकल्पना आणि एम. एन. रॉय यांची न्यायाची संकल्पना जवळपास मिळतीजुळती होती. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी रॉय यांच्याबरोबर सामाजिक न्यायाचे कार्य केले. या संदर्भातील राजकीय प्रक्रिया पुढील पद्धतीने घडून आली : १) विसाव्या शतकाच्या चौथ्या दशकात लक्ष्मणशास्त्री जोशी हे एम. एन. रॉय यांच्या सान्निध्यात आले (१९३७). ते रॉयवादी विचारांनी भारावले होते. रॉय यांच्या सामाजिक न्याय सिद्धांताचा लक्ष्मणशास्त्री जोशींवर प्रभाव पडला होता. २) रॅडिकल ह्युमॅनिझम आणि न्यू ह्युमॅनिझम या दोन्हीही विचारांमध्ये सामाजिक न्यायाचा विचार होता. रॅडिकल ह्युमॅनिझम पासून ते न्यू ह्युमॅनिझमपर्यंतचा त्यांचा वैचारिक प्रवास न्यायाच्या

संदर्भात झाला होता. एम. एन. रॉय यांचे ते सहकारी होते. ३) १९३६ नंतर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीचे ते क्रियाशील सदस्य झाले. १९४८ मध्ये हा पक्ष विसर्जित होईपर्यंत ते त्या पक्षाचे सदस्य होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सामाजिक न्यायाच्या प्रेरणेने रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीचे कार्य केले. ४) सामाजिक न्याय आणि चळवळ यांची सांधेजोड रॉय आणि तर्कतीर्थ यांनी केली होती. विशेषतः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि एम. एन. रॉय यांच्या राजकीय विचारांचा संवाद १९३० पासून हळूहळू होत गेला. कारण रॉय परदेशातून भारतात १९३० मध्ये परत आले. काँग्रेसची असहकाराची चळवळ त्या वेळी मंदावली होती (१९३०). विशेषकरून तरुण वर्गात उदासीनता होती. म. गांधींजवळ खादी आणि ग्रामोद्योग या स्वरूपाचा कार्यक्रम होता. याखेरीज दुसरा कार्यक्रम नव्हता. रॉय यांनी त्या वेळी काँग्रेसचे पुनरुज्जीवन करण्याचा विचार मांडला. स्वातंत्र्याचा लढा वाढविण्याचा कार्यक्रम जनतेसमोर ठेवला. या काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी काँग्रेस पक्षाबरोबर राहून कार्य करत होते. रॉय यांनी या सुमारास आपली काँग्रेस अंतर्गत 'लीग ऑफ रॅडिकल काँग्रेसमेन' या नावाची संस्था १९३१ मध्ये स्थापन केली होती. तिचे काम हळूहळू देशभर वाढत होते. म्हणजेच सामाजिक न्यायाची चळवळ 'लीग ऑफ रॅडिकल काँग्रेसमन' या नावाने रॉय आणि तर्कतीर्थ यांनी राबवली होती. ५) रॉय यांच्या या उद्योगांची पोलिसांनी शहानिशा सुरू केली होती. २१ जुलै १९३१ रोजी रॉय यांना मुंबई येथे भायखळा भागात अटक करण्यात आली. नंतर त्यांना कानपूर येथे नेण्यात आले. तेथे तो खटला चालला गेला. त्यामध्ये रॉय यांना सक्तमजुरीची शिक्षा झाली. त्यांची नोव्हेंबर १९३६ मध्ये तुरुंगातून सुटका झाली. त्यांचे सहकारी व काँग्रेस पक्षाचे पुढारी यांनी रॉय याचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. या वेळी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी त्यांचे सहकारी झाले. रॉय यांनी ताबडतोब काँग्रेसमध्ये प्रवेश केला. हा प्रवेश त्यांनी पं. नेहरूंच्या सल्ल्याप्रमाणे संयुक्त प्रांतात केला. पं. नेहरूंच्या मदतीमुळे रॉय यांची फैजपूर काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून व प्रांतिक काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून निवड झाली. रॉय यांचे राजकीय सहकारी याच सुमारास काँग्रेसचे सभासद बनून आपले कार्य करत होते. त्या सर्वांचा मिळून एक 'रॉय गट' स्थापना झाला. या गटामध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा समावेश होता. काँग्रेस कार्यप्रवण व सामर्थ्यशाली बनवावी तसेच काँग्रेसने शेतकरी-

कामकऱ्यांशी व सामान्य जनतेशी एकरूपता साधावी, असा रॉय व त्यांचे सहकारी यांचा प्रयत्न होता. हा विचारदेखील सामान्य जनता, शेतकरी आणि कामगार या अर्थाने वर्गीय स्वरूपाचा होता. तसेच हा विचार शोषित वर्गासाठी सामाजिक न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न होता. ६) दुसरे जागतिक महायुद्ध १९३९ साली सुरू झाले. हे युद्ध फॅसिझमविरोधी आहे, म्हणून त्याला भारतीय जनतेने मदत करावी व त्या बाबतीत सरकारशी सहकार्य करावे, अशी रॉय यांची भूमिका होती. १ सप्टेंबर १९४० रोजी रॉय यांनी युद्धसहकार्याबद्दलचे मोठे निदर्शन केले. त्यामुळे त्यांना काँग्रेसमधून बाहेर काढले गेले. त्यानंतर रॉय यांनी आपला स्वतःचा 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी' हा पक्ष १९४० मध्ये स्थापन केला. या पक्षाचे लक्ष्मणशास्त्री जोशी सदस्य होते. १९४८ साली रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीचे शेवटचे अधिवेशन कलकत्ता येथे झाले. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष लक्ष्मणशास्त्री जोशी होते. या अधिवेशनात त्यांनी मार्क्सवाद आणि समाजवादाच्या पलीकडे जाण्याचा विचार मांडला होता. दुसऱ्या शब्दात मार्क्सवादातील न्याय आणि समाजवादातील न्याय या संकल्पना त्यांना अपुऱ्या वाटू लागल्या. यामुळे शास्त्री यांनी मार्क्सवादातील न्याय, समाजवादातील न्याय आणि लोकशाही प्रक्रियेतील न्याय या संकल्पनांची सांधेजोड केली.

**धर्ममीमांसा**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दुसरा महत्त्वाचा पैलू धर्ममीमांसा हा होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या धर्मविषयक विचारांची स्वतंत्रपणे मीमांसा डॉ. अशोक चौसाळकर आणि डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केली आहे. 'धर्ममीमांसा' हा दुसरा विभाग या पुस्तकातील अत्यंत महत्त्वाचा आहे. डॉ. अशोक चौसाळकर यांनी 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची धर्ममीमांसा' हा लेख लिहिलेला आहे. या लेखात त्यांनी विसाव्या शतकातील धर्ममीमांसेची चर्चा केलेली आहे. या पुस्तकातील तीन लेख 'धर्मफया विषयाबद्दल विवेचन करणारे डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी लिहिलेले आहेत. 'तर्कतीर्थांचा हिंदू धर्म', 'तर्कतीर्थकृत धर्मस्वरूपविषयक उकल', 'सर्वधर्मचिकित्सा : वैचारिक परिवर्तनाचे प्रतिबिंब' या तीन लेखांचा त्यामध्ये समावेश होतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या धर्मविषयक विचारांचे बदलत गेलेले चर्चाविश्व या विभागात सखोलपणे नोंदविले गेले आहे. परंपरागत हिंदू धर्माकडून सुधारणावादी हिंदू धर्माकडे,

सुधारणावादी हिंदू धर्माकडून मार्क्सवादी चौकटीतील धर्ममीमांसेकडे, मार्क्सवादी चौकटीतील धर्ममीमांसेकडून समन्वयवादी (भौतिक आणि आध्यात्मिक) धर्ममीमांसेकडे शास्त्री यांचा प्रवास झाला. हे चर्चाविश्व डॉ अशोक चौसाळकर आणि सुनीलकुमार लवटे यांनी या पुस्तकात मांडले आहे. या धर्ममीमांसेची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. प्राज्ञपाठशाळा परंपरागत हिंदू धर्माचा विचार मांडत होती. परंतु प्राज्ञपाठशाळेचे कार्य हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणण्याचे नव्याने सुरू झाले. परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय प्राज्ञपाठशाळा नव्याने घालू लागली. या गोष्टी लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्वीकारल्या होत्या. त्यांचा धर्मविषयक विचार भारतीय स्वातंत्र्य चळवळीतून विकसित होत गेला. महात्मा गांधी, पंडित नेहरू यांचे धर्मविषयक विचार जोशी यांना भावले होते. विशेष म्हणजे विवेकवाद व धर्मश्रद्धा यांचा समन्वय त्यांनी केला.

२. धर्मकोशाचे काम त्यांनी विशेष लक्ष घालून केले होते. धर्मविषयक विचार काळानुसार प्रवाही असणारा त्यांनी स्पष्ट केला आहे.

३. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे धर्मविषयक विचार विसाव्या शतकातील पाचव्या दशकात बदललेले दिसतात (१९४०). त्यांनी धर्माची चर्चा करताना विवेकवाद आणि विज्ञानवादाचा पुरस्कार केला होता. हा मुद्दा 'हिंदुधर्माची समीक्षा' या पुस्तकांमध्ये सुस्पष्टपणे दिसतो. कारण 'हिंदुधर्माची समीक्षा' आणि 'सर्वधर्मसमीक्षा' ही त्यांची पुढे आली. तर्कतीर्थांनी हिंदू धर्मातील जातिव्यवस्था, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, अनेकदेवतावाद व स्त्रीदास्य यावर टीका केली.

४. तर्कतीर्थांची धर्मविषयक भूमिका सहाव्या दशकामध्ये पुन्हा बदलली (१९५०). विवेकवाद आणि विज्ञानवाद या कसोटीवर त्यांनी पाचव्या दशकात चर्चा केली. परंतु सहाव्या दशकात त्यांनी धर्मश्रद्धेचा प्रभाव मान्य केला होता. विवेकवादाचा प्रभाव असूनही धर्माचे महत्त्व कमी झालेले नाही अशी त्यांनी भूमिका घेतली होती. ही त्यांची भूमिका १९४९ पासून व्यक्त होत गेली. विशेष म्हणजे वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१) या पुस्तकात त्यांनी भौतिक आणि आध्यात्मिक अशी समन्वयवादी भूमिका मांडली. हा त्यांचा धर्मविषयक विचाराचा बदललेला टप्पा होता. शास्त्रींमधील झालेला हा बदल मूलग्राही मानवतावादामुळे झाला असा कार्यकारणसंबंध स्पष्ट केला गेला आहे. हा अत्यंत महत्त्वाचा बदलता

प्रवाह डॉ. अशोक चौसाळकर आणि डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी नोंदविला आहे.

**मराठी विश्वकोश**

मराठी विश्वकोशाला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मोठे योगदान आहे. हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक मोठा पैलू आहे. या विषयासंदर्भात प्रा. डॉ. राजा दीक्षित आणि डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी लेखन केले आहे. डॉ. राजा दीक्षित यांनी 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मराठी विश्वकोशाला योगदान' हा लेख विश्लेषणात्मक पद्धतीने लिहिला आहे. त्यांच्या कार्याचे योगदान स्पष्ट करणारा हा लेख आहे. लेखकांनी शास्त्रींचे आधुनिक महाराष्ट्रातील एक विचारवंत म्हणून वर्णन केले आहे. ज्ञानकोशकर्ता किंवा विश्वकोशकर्ता हा विचारवंत असतो हा मुद्दा मांडला आहे. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी दोन लेख विश्वकोशातील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या योगदानाबद्दल लिहिलेले आहेत. 'मराठी विश्वकोश : तर्कतीर्थकृत रचनाकल्प आणि विकास', 'मराठी विश्वकोशातील तर्कतीर्थलिखित नोंदींची मीमांसा' हे दोन लेख विश्वकोशाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण आहेत. डॉ. राजा दीक्षित आणि डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी मराठी विश्वकोशाच्या संदर्भातील एक चर्चाविश्व विकसित केले. त्या चर्चाविश्वाची डॉ. राजा दीक्षितप्रणित वैशिष्ट्ये त्यांच्या लेखाच्या आधारे पुढीलप्रमाणे सांगता येतील. (१) ज्ञानकोश आणि विश्वकोश यामध्ये फरक शास्त्रीजींनी केला. तर्कतीर्थांनी विश्वकोश या संकल्पनेत ज्ञान आणि विज्ञान या दोन्ही गोष्टींचा समावेश केला. त्यांनी विश्वकोश ही संकल्पना सर्वविषयसंग्रह या अर्थाने विकसित केली. (२) कोश निर्मितीची परंपरा व्यक्तिकेंद्रित होती. विश्वकोश निर्मितीची परंपरा सामूहिक, सहकारी आणि संस्थात्मक स्वरूपाची तर्कतीर्थांनी विकसित केली. हा महत्त्वाचा फेरबदल शास्त्रींनी घडवून आणला. (३) विश्वकोशाची इमारत तत्त्वज्ञानात्मक (Philosophical Foundation) आणि पद्धती शास्त्रीय (methodological foundation) अशा दोन पायावर तर्कतीर्थ यांनी उभी केली होती. (४) विश्वकोशाने परिभाषा निर्मिती आणि प्रमाण भाषा निर्मिती असे दुहेरी काम केले. तसेच विश्वकोशाने लोकशिक्षणाचे काम केले. (५) विश्वकोशाबाबत दोन तत्त्वांची भर डॉ. राजा दीक्षित यांनी घातली. अ) विश्वकोश ज्ञानाच्या लोकशाहीकरणाचे माध्यम म्हणून त्यांनी विकसित केले. ब) तसेच त्यांनी विश्वकोश सामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्याचे ध्येय निश्चित केले. या

पाच तत्त्वांच्या चौकटीत मराठी विश्वकोशाची चर्चा डॉ. राजा दीक्षित यांनी केली आहे.

डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी मराठी विश्वकोश या संदर्भात सविस्तरपणे दोन लेख लिहिले आहेत. त्यांनी मराठी विश्वकोशाचे महत्त्व सांगताना तुलनात्मक पद्धत वापरली. डॉ. लवटे यांच्या विवेचनाची पुढील चार वैशिष्ट्ये दिसतात. (१) कोशाची उत्पत्ती, प्रकार, संकल्पना आणि स्वरूप असे त्यांनी विवेचन जागतिक संदर्भात केले. त्यांनी विश्वकोशाची तुलना जागतिक संदर्भात केली. (२) भारतातील कोशनिर्मितीच्या प्रक्रियेचा आढावा त्यांनी घेतला आहे. तेलुगू, पंजाबी, हिंदी, मलयाळम, बंगाली, कन्नड, कोकणी, गुजराती, मराठी भाषांमध्ये कोश निर्मितीची प्रक्रिया भारतात राबवली गेली. या संदर्भातील तुलनात्मक इतिहास डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी मांडला. कन्नड भाषेत अकराव्या शतकापासून कोश निर्मितीची प्रक्रिया दिसते. ओडिया भाषेत विविध सारसंग्रहाच्या रूपाने कोश निर्मितीचे प्रयत्न झाले. मायाधार मानसिंह यांनी ओडिया विश्वकोश निर्मितीचा प्रयत्न केला. उत्कल विद्यापीठाने ज्ञानमंडळ स्थापन केले होते. त्यांनी ७५ खंडांची योजना तयार केली होती. परंतु प्रत्यक्षात ३५ खंड ज्ञानमंडळाला प्रकाशित करता आले. भारतात भाषिक विविधता आहे. भारतातील ज्ञान प्रादेशिक भाषेत आहे. प्रादेशिक भाषेत विश्वकोशाची निर्मिती करून ज्ञानाचे संकलन आणि संवर्धन करण्यात आले. तसेच प्रादेशिक भाषेत ज्ञानाचा विस्तार करण्यात आला. ही दृष्टी पंडित नेहरू आणि यशवंतराव चव्हाण यांची होती. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेवेळी यशवंतराव चव्हाण यांनी अवतीभवतीच्या ज्ञानाचे संकलन करावे. त्या ज्ञानाची पुनर्रचना करावी. असा विचार मांडला होता. (३) म्हैसूर विद्यापीठाने विश्वकोश निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला होता. त्यांनी चौदा-पंधरा खंड प्रकाशित केले. विद्यापीठाप्रमाणे गोवा कोकण अकादमीने शब्दसागर निर्मितीचे काम केले. शासन, विद्यापीठ, स्वायत्त संस्था यांनी सामूहिक पातळीवर विश्वकोश निर्मितीचे प्रयत्न केले. (४) महाराष्ट्रातील कोशनिर्मितीचे प्रक्रिया डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी मांडलेली आहे. तसेच त्यांनी विश्वकोशाची निर्मिती प्रक्रिया सविस्तरपणे नोंदवली. विशेष म्हणजे, त्यांनी मराठी विश्वकोश निर्मितीतील तर्कतीर्थांच्या योगदानाची सविस्तरपणे चर्चा केली आहे. विश्वकोशामध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेल्या १५७ नोंदींचे डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी वर्गीकरण केले

आहे. प्राचीन नोंदी, विविध प्रणालीविषयक नोंदी, व्यक्तीविषयक नोंदी, साहित्यकृती विषयक नोंदी, संस्कृतीविषयक नोंदी, ईश्वरविषयक नोंदी, श्रद्धा-अंधश्रद्धाविषयक नोंदी, विविध समाजविषयक नोंदी, तत्त्वज्ञान विषयक नोंदी, इतिहास व राज्यशास्त्र विषयक नोंदी असे नोंदणीचे वर्गीकरण डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केलेले आहे. डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या या लिखाणातून सुस्पष्टपणे दिसते की, प्रादेशिक भाषांमध्ये (Vernacular Language) ज्ञान संकलनाचे विविध प्रवाह उदयास आले. भारतात ज्ञान प्रादेशिक भाषांमध्ये आहे. हे चर्चाविश्व डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या विवेचनात दिसते. समाजवादी विचारवंत राम मनोहर लोहिया यांनी देखील प्रादेशिक भाषांमध्ये ज्ञानविषयक चर्चाविश्वाचे समर्थन केले होते. तसेच महात्मा गांधींनी हिंदुस्थानी भाषा आणि ज्ञान यांची सांगड घातली होती. हा प्रवाह  प्राचीन काळातील बौद्ध साहित्य, जैन साहित्य, मध्ययुगातील भक्ती चळवळीतील साहित्य, मराठा राज्यसंस्थेच्या काळातील साहित्य, मराठा संघ (Maratha Confedrafion) राज्यातील साहित्य आणि आधुनिक काळातील साहित्य यामध्ये दिसतो.

**वैचारिक प्रवास आणि फलश्रुती**

या पुस्तकातील पाचवा विभाग महत्त्वपूर्ण आहे. कारण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचारांची फलश्रुती या विभागात किशोर बेडकीहाळ यांनी मांडलेली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे पुरोगामी व्यक्तिमत्त्व त्यांनी अचूकपणे नोंदविले आहे. त्यांनी प्रबोधन आणि फलश्रुती या चौकटीत मांडणी केलेली आहे. त्यांनी प्रबोधन या चौकटीमध्ये शास्त्रींच्या वैचारिक टप्प्यांचा सविस्तरपणे आढावा घेतला आहे. श्री. किशोर बेडकीहाळ यांनी प्रबोधन (भारतीय स्वातंत्र्य चळवळ), मार्क्सवाद (उत्पादन शक्ती, उत्पादन संबंध आणि भांडवलशाही, नवमानवतावाद), लोकशाही (गांधी- नेहरूंचा विचार, आधुनिक राष्ट्र निर्मितीची प्रक्रिया) ही चौकट सविस्तरपणे स्पष्ट केली आहे.

**मार्क्सवाद**

विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात महाराष्ट्रात मार्क्सवादी विचारांचा पुरस्कार केला गेला. तेव्हा महाराष्ट्रात मार्क्सवादाचे चार प्रवाह निर्माण झाले होते. पहिला प्रवाह हा अधिकृत मार्क्सवाद्यांच्या होता. विशेषतः श्रीपाद अमृत डांगे आणि बी.टी. रणदिवे यांचा यामध्ये समावेश करता

येईल. दुसरा प्रवाह हा ब्राह्मणेतर विचार परंपरेतून उदयास आला होता. उदाहरणार्थ दिनकर जवळकर, इत्यादी. शेतकरी कामगार पक्ष आणि लाल निशाण पक्ष यांचा समावेश दुसऱ्या प्रकारात करता येईल. तिसरा प्रवाह एम. एन. रॉय यांनी घडवलेला होता. या तिसऱ्या प्रवाहात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची भूमिका महत्त्वाची होती. या प्रवाहाने मार्क्सवादी विचारांच्या ऐवजी पुढे मूलग्राही लोकशाहीची संकल्पना मांडली. या तीन प्रवाहांच्या खेरीज आचार्य शं. द. जावडेकर, दि. के. बेडेकर, प्रा. गं. बा. सरदार, प्रा. दामोदर कोसंबी यांचा एक प्रवाह होता. या चार प्रवाहांपैकी रॉय प्रवाहात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी काम केले. त्यांच्या मार्क्सवादी विचारांची वैशिष्ट्ये पाच होती.

१. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा त्यांनी संशोधनासाठी वापर केला. 'हिंदू धर्मसमीक्षा' हा ग्रंथ त्यांनी लिहिताना ऐतिहासिक व समाजशास्त्रीय पद्धत वापरली. 'धर्मसमीक्षा हीच सर्व प्रकारच्या समीक्षेची जननी आहे' या कार्ल मार्क्सच्या तत्त्वाचा पुरस्कार त्यांनी या ग्रंथात केला. आधुनिक काळात सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने पारंपरिक धर्ममूल्ये कितपत उपयुक्त आहेत, याची मूलगामी चिकित्सा या ग्रंथात केलेली आढळते. या प्रबंधाचे इंग्रजी भाषांतर गोवर्धन पारीख यांनी 'ए क्रिटिक ऑफ हिंदुइझम' या नावाने प्रसिद्ध केले आहे (१९४८). २) पाचव्या दशकात त्यांनी मार्क्सवादाचा परामर्श घेणारे लेख 'नवभारत' या नियतकालिकामध्ये मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद, मार्क्सचे अर्थशास्त्र, मार्क्सचा विरोधविकासाचा सिद्धांत आणि मार्क्स व मानवी संस्कृतीची चिरंतन मूल्य असे लेख लिहिले (१९४९-१९५०). या लेखांमध्ये त्यांनी मार्क्सवादाची चिकित्सा केली. त्यांच्या मार्क्सवादी चिकित्सेवर एम. एन. रॉय यांचा प्रभाव पडला होता. ३) लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मार्क्सवादाचे महत्त्व अधोरेखित केले. या संदर्भातील महत्त्वाचे ४ मुद्दे सुस्पष्टपणे दिसतात. (अ) मार्क्सची संशोधन पद्धती वैज्ञानिक होती. (ब) ऐतिहासिक भौतिकवादांमुळे घटनांचे आकलन करण्यास चांगलीच मदत झाली होती. (क) मार्क्सने वर्गविग्रह व सामाजिक क्रांती या प्रक्रियांना महत्त्वाचे स्थान दिले होते असे तर्कतीर्थांचे विवेचन आहे. ५) मार्क्सच्या विचारातील महत्त्व मान्य केले असले तरी मार्क्सवादामधील उणिवा त्यांनी नोंदविलेल्या आहेत. या उणिवा त्यांनी प्रथमच मांडल्या होत्या.

## गांधी - नेहरूंचा विचार

लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा थेटपणे संबंध महात्मा गांधी आणि गांधीवादी विचारवंतांशी आला होता. तसेच त्यांचा संबंध पंडित नेहरू आणि यशवंतराव चव्हाण यांच्याशी देखील आलेला होता. महात्मा गांधी यांना समाज सुधारणा कार्यात त्यांनी मदत केली. या संदर्भातील त्यांचा विचार सामाजिक सुधारणावादी होता. गांधीवाद हा सुधारणावादी विचार होता. तसेच गांधीवाद हा परिवर्तनवादी विचार होता. या गोष्टीशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जुळवून घेतले होते. याबद्दलची काही निवडक उदाहरणे पुढील आहेत. एक, लक्ष्मणशास्त्री जोशी हे पुरोगामी विचारांचे पुरस्कर्ते होते. त्यांनी राष्ट्रीय व सामाजिक आंदोलनांत भाग घेतला होता. त्यांनी १९३० व १९३२ साली कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. या कारणामुळे त्यांना प्रत्येक वेळी ६-६ महिन्यांचा कारावास भोगावा लागला. दोन, म. गांधींच्या अस्पृश्यता निवारणकार्यास शास्त्रीजींनी मदत केली होती. त्यांनी हिंदू धर्मशास्त्राचे सुधारणा विषयक भाष्य तयार करून महात्मा गांधी यांना दिले. तीन, तर्कतीर्थ स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस पक्षाबरोबर राहिले. ते एक विचारवंत व भाष्यकार म्हणून काँग्रेस पक्षाशी निगडित होते. गांधीयुगातील विचारवंत ते होते. चार, सहाव्या दशकात गांधी-नेहरूंच्या परंपरेशी त्यांनी जवळीक साधली. परंपरा व आधुनिकता यांचा त्यांनी समन्वय केला. पाच, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी महात्मा गांधींवर लेख लिहिले होते. गांधीहत्येनंतर नागपूर येथे त्यांनी महात्मा गांधींवर भाषण केले होते. त्यांनी ते भाषण सारांश स्वरूपात लिहून काढले. तो लेख छोटा आहे, परंतु छोट्या लेखात तर्कतीर्थांनी महात्मा गांधींचे वेगळे दर्शन घडवले. शास्त्रीजींनी हे भाषण केले, तेव्हा ते महात्मागांधीजींच्या बौद्धिक प्रभावाखाली नव्हते. परंतु नैतिक प्रभावाखाली मात्र ते होते. कारण तर्कतीर्थ १९३७ पासून शेवटपर्यंत मानवेंद्रनाथ रॉय यांच्या बौद्धिक प्रभावाखाली होते. परंतु तरीही बौद्धिकदृष्ट्या स्वतंत्र होते.

## लोकशाही

लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लोकशाही विचारांचा पुरस्कार केला होता. रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी हा पक्ष मानवेंद्रनाथ रॉय यांनी स्थापन केला होता. या पक्षाचे महाराष्ट्र शाखेचे सरचिटणीस तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. त्यांनी रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीच्या संदर्भात पुढील तत्त्वांच्या संदर्भात महत्त्वाचे योगदान केले होते. एक, नवमानवतावाद हा रॅडिकल

डेमोक्रॅटिक पार्टीचा जाहीरनामा होता. नवमानवतावादाची बावीस तत्त्वे निश्चित करण्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा मोलाचा वाटा होता. लोकशाही आणि नवमानवतावाद अशी सांधेजोड त्यांनी केली होती. दोन, शास्त्री रॅडिकल डेमोक्रॅटिक या पक्षाच्या महाराष्ट्र शाखेचे सरचिटणीस होते. पक्षाचा जाहीरनामा, पक्षाचा कार्यक्रम, पक्ष बांधणी, पक्षाचा प्रसार आणि प्रचार त्यांनी केला होता. तीन, रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षात एक विचारवंतांचा गट होता. विशेषतः गोवर्धन पारेख, इंदुमती पारेख, अ. भि. शहा, व्ही. एम. कर्णिक, इत्यादी बुद्धिवंतांचा त्यामध्ये समावेश होता. या गटांमध्ये तर्कतीर्थ सक्रिय होते. मूलग्राही लोकशाहीचा व थिंक टँकचा त्यांनी संबंध जोडलेला होता. चार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी धर्मनिरपेक्षता हा लोकशाहीचा आधार मानला होता. धर्मनिरपेक्षता हे त्यांच्या लोकशाहीचे एक वैशिष्ट्य होते. पाच, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लोकशाही आणि भौतिक तत्त्वज्ञान यांचीही सांधेजोड केले होती. मानवाचे प्रश्न भौतिक स्वरूपाचे आहेत. त्या प्रश्नांची सोडवणूक लोकशाही पद्धतीने करावी असा त्यांचा विचार लोकशाहीबद्दलचा होता. सहा, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लोकशाही समाजवादाचा पुरस्कार केला होता. लोकशाहीतील स्वातंत्र्य आणि समाजवादातील समता या दोन्ही गोष्टींची सांधेजोड त्यांनी केली होती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा पुरस्कार केला होता. पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत १९५३ साली भारतीय राष्ट्रीयत्वावर त्यांनी भाषण केले होते.

**वैदिक संस्कृती आणि जडवाद**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जडवादाच्या चौकटीत वैदिक संस्कृतीचे विश्लेषण केले. त्यामध्ये त्यांनी सामाजिक न्यायाची भूमिका घेतली असे दिसते. या संदर्भातील महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. एक, त्यांनी 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी आधुनिक भारतातील प्रबोधनकालीन चळवळींचा आढावा घेतला. प्रबोधन चळवळ ही एका अर्थाने उदारमतवादी सामाजिक न्याय ही संकल्पना स्वीकारणारी होती. यामुळे तर्कतीर्थ प्रबोधन आणि विवेकवाद या अर्थाने न्याय संकल्पनेचा पुरस्कार करणारे ठरले. दोन, वैदिक संस्कृतीचा विकास हे एक प्रचंड मोठे काम आहे. मुळात पुणे विद्यापीठात श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी-व्याख्यानमालेत दिलेली ही सहा व्याख्याने होती (१९४९). त्यात वेदकालीन संस्कृती, इतिहास, पुराणे व रामायणाची

संस्कृती, बौद्ध आणि जैन धर्मांचे कार्य आणि आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलन या विषयांचा सखोल आणि ऐतिहासिक दृष्टीने परामर्श घेतला आहे. भारतातील वैदिक संस्कृती ही परिवर्तनक्षम आहे. आधुनिक विज्ञानदृष्टी व मानवतावाद यांच्या निकोप संवर्धनाचे तिच्यात आंतरिक सामर्थ्य आहे. म्हणून आधुनिक क्रांतियुग आणि वैदिक संस्कृतीतील मूलभूत अध्यात्मयोग यांची सांगड घातली पाहिजे, हा या ग्रंथाचा निष्कर्ष आहे. यामुळे ही विश्लेषणाची चौकट सामाजिक न्यायाची दिशा स्वीकारणारीच आहे. सामाजिक न्यायाच्या चौकटीमुळे या पुस्तकाला पुरस्कारही मिळाला. सर्वोत्कृष्ट भारतीय ग्रंथांना साहित्य अकादमी १९५५ पासून पुरस्कार देते. असा पुरस्कार लाभलेला हा मराठीतील पहिला ग्रंथ आहे. तीन, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जातिव्यवस्थेचे विवेचन वैदिक संस्कृतीचा विकास या पुस्तकात केले आहे. त्यांनी जातीबद्दलची माहिती दिली आहे. एका अर्थाने त्यांचे जाती बद्दलचे विवेचन सामाजिक न्यायाला पूरक असे आहे. याबद्दलची तीन कारणे पुढीलप्रमाणे आहेत. (अ) वैदिक आर्यांच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेत व्यवस्थित रितीने समाविष्ट न झालेल्या भारतीय जमातींचा संकरज जाती म्हणून जातिसंस्थेत स्मृतिकारांनी समावेश केलेला आहे. त्या अशा मल्ल, दाश (कोळी), खश, भिल्ल, मेद, कोल, चंडाल, उग्र, आयोणव इत्यादी. ज्या जमातींची नावे त्यांच्या धंद्यावरून पडलेली आहेत, त्यातील काही महत्त्वाची नावे अशी- नट, स्वर्णकार, रथकार, सूत्रकार (सुतार), चर्मकार (चांभार), लोहकार (लोहार), कुम्भकार (कुंभार), मालाकार (माळी), तैलकार (तेली), नापित (न्हावी), कंसकार (कासार), रजक (धोबी). काही जातींचा देशी भाषेतील नावांनी संकरज जाती म्हणून निर्देश केला आहे. ढोर, कोल्हाटी, बुरुड, भोई. धातुकाम, बांधकाम, वैद्यकी, शिकार इत्यादी कामे ऋग्वेदात सांगितली आहेत. ही कामे जातिभेदाप्रमाणे वाटलेली नव्हती. भारतकाळापर्यंत वर्णव्यवस्थेत व त्रैवर्णिकांत बाह्यांचा समावेश करून वैदिक धर्माची दीक्षा देण्याचे काम सुरू होते. परंतु त्या वेळीच वर्णभेदाला जातिभेदाचे स्वरूप येत चालल्यामुळे हे कार्य मंदावत गेले व शेवटी बंद पडले. (ब) जातिभेदाच्या रूपाने चातुर्वर्ण्याची यजुर्वेदाच्या व ब्राह्मणग्रंथाच्या काळातच सुरू झाली. (१) ब्राह्मण व क्षत्रिय वर्णांचा झगडा अनेक वेळा झाल्यामुळे वंशभेदाचे स्वरूप चातुर्वर्ण्यास प्राप्त होऊ लागले. (२) शूद्र वर्ण व आर्य त्रैवर्णिक यांच्यामध्ये बराच काळ टिकलेल्या सांस्कृतिक अंतरा यामुळेही जातिभेदाला तीव्रता प्राप्त होऊ लागली. (३) वर्णपरिवर्तन बंद पडल्यामुळे जातिभेदाचा

पाया रचला गेला. परिवर्तनाची क्रिया बंद पडण्याचे एक महत्त्वाचे कारण आर्थिक आहे. ग्रामसंस्थेत पोषक ग्रामोद्योगांची वंशपरंपरागत स्थिरता जातिभेदाला मुख्य कारण झाली. भारतवर्षात सिंधुसंस्कृतीच्या नाशानंतर नागर संस्कृतीला मुख्यत्व कधीच आले नाही. ग्रामीण अर्थशास्त्राच्या चिरंतनतेमुळे जातिभेद उत्पन्न झाला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जातिव्यवस्थेच्या निर्मितीची ही केलेली मीमांसा वैदिक संस्कृतीच्या विकासाच्या चौकटीत केली आहे. वैदिक संस्कृती उत्तरोत्तर कशी विकसित होत गेली हा त्यांचा प्रतिपाद्य विषय असून जातिव्यवस्था हा विषय त्या अनुषंगाने त्यांनी मांडला आहे. जाति व्यवस्थेच्या निर्मितीचे एक ढोबळ चित्र त्यांनी मांडले आहे. (क) १९६० नंतरच्या राजकीय सामाजिक प्रक्रियेबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ठाम भूमिका घेतात. उदाहरणार्थ, त्यांनी आणीबाणीला विरोध केला होता. ही त्यांची भूमिका पक्षांतर्गत लोकशाही म्हणून महत्त्वाची होती. तर शेतकरी चळवळ, नवहिंदुत्वाची चळवळ या संदर्भात त्यांची भूमिका सायलेंट राहिलेली दिसते.

प्रस्तुत पुस्तक मिश्र स्वरूपाचे आहे. कारण भाषण आणि भाषणानंतर स्वतंत्रपणे लिहिलेले लेख या पुस्तकात सामील केले आहेत. त्यामुळे त्यांचे भाषणसंग्रह आणि लेखसंग्रह असे संयुक्त वर्णन होऊ शकते. शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्राने आयोजित केलेल्या व्याख्यानमालेचा हा विस्तारित भाग आहे. माननीय कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यानमाला आयोजित केली होती. मा.डॉ.डी.टी.शिर्के यांनी व्याख्यानमालेचे उद्घाटन आणि प्रास्ताविक केले होते. यामुळे या लेखसंग्रहाच्या चारही भागातील वैचारिक योगदानात शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे एक योगदान आहे. मा.डॉ.डी.टी.शिर्के यांचे मुख्य संशोधकीय कार्य संख्याशास्त्रज्ञ म्हणून आहे. परंतु तरीही त्यांचे सामाजिक शास्त्रांबद्दलचे भान उत्तम दर्जाचे आहे. यामुळेच ही गोष्ट घडून आली. त्याबद्दल संपादकांसह मी त्यांचा मनापासून आभारी आहे. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी संकलित केलेले समग्र तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे साहित्य वेळोवेळी उपलब्ध करून दिले. त्याबद्दल त्यांचे आभार.

**- प्रा. डॉ. प्रकाश पवार**
प्रमुख, राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# लेखकीय/संपादकीय

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन खरे तर अनेकविध प्रयत्नांची फलनिष्पत्ती होय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (१९०१ ते १९९४) जीवनकाळ म्हणून विसाव्या शतकाकडे पाहावे लागते. तर्कतीर्थांचे शिक्षण स्थूल रूपाने सन १९२३ ला पूर्ण झाले. या वर्षी त्यांनी कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी प्राप्त केली व ते काशी, कलकत्ता येथील उच्चशिक्षण पूर्ण करून पुन्हा प्राज्ञपाठशाळा, वाई येथे परतले. जाताना ते येथील न्याय, वेदान्ताचं ज्ञान घेऊन गेले होते. येताना न्याय, वेदान्ताशिवाय तर्क, अलंकाशास्त्र, व्याकरण यांचं ज्ञान ग्रहण करून ते शिक्षक झाले व प्राज्ञपाठशाळेत ते विषय शिकवू लागले. सन १९२३ ते १९२९ हा पाच-सहा वर्षांचा काळ नारायणशास्त्री मराठे उर्फ स्वामी केवलानंद सरस्वतींबरोबर आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली धर्म सभा, पंडित परिषदा, धर्म परिषदांमधील वादविवाद, खंडन-मंडनाचा होता. वेद, उपनिषद, ब्राह्मण ग्रंथ, पुराण, अरण्यकं मुखोद्‌गत होते, पण तो काळ भारतातील राष्ट्रीय चळवळीचा जसा होता, तसाच तो धर्म आणि समाज सुधारणांचाही होता. तर्कतीर्थ या काळात संस्कृत साहित्य वाचून थांबले नाहीत, तर त्यांनी बकल, गिबन, मिल, स्पेन्सर, लोट्झे, सिग्व्हार्ट वाचायला प्रारंभ केल्याने ते पश्चिमी संस्कृती आणि जगाशी परिचित होत त्यांना प्रबोधन काळातील पुनरुज्जीवन चळवळ लक्षात आली होती. त्यातून धर्म नि समाजसुधारणांविषयी त्यांचे आकलन विस्तारले. तर्कतीर्थांच्या हेही लक्षात आले की कितीही समजावून, सप्रमाण मीमांसा करून पटवून दिले तरी पारंपरिक धर्म पंडित आपले शब्दप्रामाण्य सोडण्यास तयार होत नाहीत. या शब्द प्रामाण्यात नि कर्मकांडात त्यांचे हितसंबंध गुंतल्याचे त्यांच्या

लक्षात आले. त्यांनी 'शुद्धिसर्वस्वम्' (१९२८), 'भारतेतिहासतत्त्वम्' (१९३३), 'अस्पृश्यत्वमीमांसा' (१९३०) सारखे प्रबंध लिहून आपला पक्ष समाजापुढे ठेवला तरी धर्मरक्षक म्हणवून घेणारा पुरोहित, पंडित वर्ग झोपेतून (सोंग घेतले असल्याने) जागा होत नाही, हे लक्षात येऊन तर्कतीर्थांनी दगडावर डोके आपटून घेऊन कपाळमोक्ष करून घेण्यापेक्षा स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय होऊन देश धर्माच्या नसला तरी राजकीय गुलामीतून मुक्त करण्याच्या आशेने आपला मोर्चा राष्ट्रीय चळवळीकडे वळवला.

एका संस्कृत पंडिताचे रूपांतर स्वातंत्र्यसैनिक, अस्पृश्यता निर्मूलक, आंतरजातीय-धर्मीय विवाह समर्थक, रॉयवादी, हरिजन मंदिर प्रवेश समर्थक, काँग्रेसी, प्रबोधक, ज्ञानसाधक, नियतकालिक संपादक, प्राच्यविद्या संशोधक, भाषांतरकार, कोश निर्माता अशा कालौघातील भूमिकांत होणे ही सहज घडलेली गोष्ट नाही. माणूस स्वतः संवेदी, गुणग्राहक, विधिनिषेध विवेकी होणं यात संस्कारांपेक्षा स्वयंविकासाच्या प्रेरणा अधिक प्रभावी ठरतात हे लक्षात येतं. तुम्ही ठरवावं लागतं की आपल्या जीवन प्रेरणा काय? श्रद्धा स्थाने काय? जीवनमूल्ये कोणती? जीवन ध्येय काय? तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी एक व्यक्ती नि विचार म्हणून अभ्यासताना मला ते सतत प्रवाही दिसत आले आहेत. एकाच आयुष्यात ते सनातनी-पुरोगामी, क्रांतिकारी-काँग्रेसी (हिंसक-अहिंसक), गांधीवादी-गांधीवाद विरोधी, भौतिकवादी-अधिभौतिकवादी दिसतात. खरे पण आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर. हा विकासप्रवास उन्नतकडून उन्नततमकडे जाणारा आहे. मतांतरी, वेषांतरे झाली खरी पण दिशांतरे नाही. म्हणजे असे की प्रवास पूर्वेपासून सुरू होतो, पण पश्चिमेला येऊन थांबला, थबकला असे घडले नाही. उलटपक्षी आज जे उमगले ते जीवनाचे अंतिम सत्य नव्हे ही तर्कतीर्थांच्या सर्व लेखन, भाषण, मुलाखती, पत्रे, प्रबंध इत्यादीतून होत राहिलेली जाणीव त्यांच्यातील साधक, संशोधक, सर्जक, अन्वेषक, आविष्कारकाचा मला स्थायीभाव वाटत आला आहे. म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अमुक विचारवादी असे विधान लोक अज्ञानापोटी करतात वा एकांगी अभ्यासाने करत असावे असे वाटते. 'तमसो मा ज्योतिर्गमय' असा हा वैचारिक विकास होय. त्या अर्थांनी ते मला अज्ञेयवादी वाटत आले आहेत. अधिक उन्नत ज्ञान, अवस्था, तत्त्व, स्थिती, स्थान इ. चा शोध त्याचे लक्ष वाटत आले आहे. 'थांबला तो संपला, कायदा पाळा गतीचा' म्हणणारा हा प्राज्ञपुरुष प्रतिभेच्या बळावर नित्य नवज्ञान, नवविद्या, नवप्रज्ञेच्या शोधात दिसतो. आपल्या

पूर्वमतांची मांडणी नवतर्काने करताना तो स्वतःचा समीक्षक होतो नि सर्जकही म्हणून तर्कतीर्थ अमुक होते अशा निष्कर्षाप्रत येणे पण त्यांच्या अभ्यास समाप्तीची घोषणा करण्यासारखे असते.

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन' या लिखित नि संपादित ग्रंथाचे चार भाग आहेत - (१) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्ती, विचार व कार्य. (२) तर्कतीर्थांची धर्ममीमांसा (३) तर्कतीर्थांचे मराठी विश्वकोश कार्य (४) तर्कतीर्थांचे वैचारिक प्रवाह आणि फलश्रुती. वरील विभागातील विविध लेख व भाषणांमधून तर्कतीर्थांचे सर्वंकष आकलन करून घेऊन ते जिज्ञासू वाचकांसमोर नि अभ्यासकांपुढे मांडण्याचा हा प्रयत्न आहे. पहिल्या भागात माझ्या काही लेखांसह डॉ. सदानंद मोरे नि डॉ. जनार्दन वाघमारे यांचे लेख आहेत. या विविध लेखांमधून तर्कतीर्थांचे जीवन, कार्य, विचार जसे समजतात तसेच त्यांचे योगदानही लक्षात येते. व्यक्ती म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे अनेक पैलू या लेखांतून उमजतात. अध्यवसायी विद्यार्थी, उच्च शिक्षणाकांक्षी संशोधक, वेद साहित्याचे अध्ययन, अध्यापन करणारा संस्कृत पंडित, धर्मसुधारणांचा आग्रह धरणारा सुधारक, स्वातंत्र्यसैनिक, अस्पृश्यता निर्मूलक, रॉयवादी, काँग्रेसी, कोशकार, भाषांतरकार, संपादक, वक्ता अशी या व्यक्तिमत्त्वाची बहुविध रूपे आपणासमोर येतात. खंडन-मंडणात पारंगत, कोळी, आदिवासी, शेतकरी, पोलीस पाटील संघटक, क्रांतिकारी, राजकारणी, ज्ञानसाधक, संपादक, कार्यकर्ते असलेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुस्तकी पंडित नव्हते तर कृतिशील विचारक होते, हे या लेखांमधून आपणास लक्षात येईल. देशाचे स्वातंत्र्य आणि महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतरची तर्कतीर्थांची वाटचाल ही ज्ञानसाधक व प्रबोधकाची राहिली आहे. 'मीमांसाकोश' (सात खंड), 'धर्मकोश' (एकोणीस खंड) यांची निर्मिती तर्कतीर्थांनी आपले गुरू स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाने केली. मराठी विश्वकोश (पंधरा खंड) त्यांनी स्वप्रज्ञेने व सहयोगींच्या सहकार्यातून निर्मिले. शिवाय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईच्या माध्यमातून शेकडो ग्रंथ निर्माण करण्याची यंत्रणा निर्माण केली. त्यांचे हे कार्य मराठी, संस्कृत भाषांना ज्ञानभाषा बनवणारे आहे, तसेच ते महाराष्ट्रास ज्ञानसमाज बनवणारेही.

या ग्रंथाचा दुसरा भाग तर्कतीर्थकृत 'धर्ममीमांसा' विषयास समर्पित आहे. यातील आरंभिक लेख डॉ. अशोक चौसाळकर यांनी लिहिला असून

उर्वरित माझे आहेत. या चारही लेखांमधून तर्कतीर्थकृत 'धर्ममीमांसा'वर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. तर्कतीर्थांची अशी धारणाच आहे की, ज्ञानविज्ञानादी क्षेत्रातील समीक्षा, मीमांसा, चिकित्सा इत्यादीस प्रारंभ झाला, तोच मुळी धर्मचिकित्सेने. धर्मचिकित्सा ही मानवी जिज्ञासेचे मूळ आहे. सनातनी धर्मपंडित वेदादी साहित्यास ईश्वरनिर्मित मानून त्यात परिवर्तन अमान्य करतात. शिवाय त्याची चिकित्सा ते धर्म, वेद इ. अपौरुषेय मानून प्राचीन वाङ्मय नि देव, धर्मादी कल्पना चिकित्सामुक्त राखू इच्छितात. कारण या सुरक्षा कवचामागे लपून वा त्याची ढाल करून ते कर्मकांड, पूजाविधी, देव-दैव, वर्णाश्रम, स्पृश्यास्पृश्यता, जोश, पंचांग, मुहूर्तादि धर्मविधी सुरक्षित राखून पौरोहित्यापोटीचे आपले उदरभरण नि अज्ञानी, धर्मभोळ्या नि अंधश्रद्धा समाजावर आपली उच्चता लादून आपले वर्चस्व अनभिषिक्त राखू पाहातात. उलटपक्षी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची स्पष्ट मान्यता आहे, की वेद, धर्म इ. मानवनिर्मित आहे. जे मानवनिर्मित आहे, ते चिकित्साप्रदत्त आहे. या जगात कोणताही विचार वा धारणा वा संकल्पना अपरिवर्तनशील नाही. अगदी वैज्ञानिक सिद्धांतही यास अपवाद नाहीत. वैज्ञानिक सत्य त्या क्षणाचे सत्य होय. विश्व नि ज्ञानाच्या कक्षा अज्ञेय, अज्ञात, अनंत असल्याने नव्या शोध नि सिद्धांताने पूर्व शोध नि सिद्धांत आपोआप कालबाह्य होत अमान्य केले जातात. हिंदू धर्मही याला अपवाद नाही. हिंदू धर्मात कालौघात जे त्याज्य ठरते ते नाकारून, मानवी हित अंतिम मानूनच धर्मतत्त्वांचा, रूढी-परंपरांचा विचार झाला पाहिजे नि त्यात परिवर्तन घडून आले पाहिजे. त्यातच मानवाचे हित, कल्याण नि विकास सामावलेला आहे. त्या अर्थाने तर्कतीर्थ धर्मासंबंधी जडवादी, भौतिकवादी, मार्क्सवादी, रॉयवादी विचारांचे अनुसरण करत अंतिमतः नवमानवतावादी होताना दिसतात. 'सर्वधर्मसमीक्षा', 'हिंदू धर्माची समीक्षा', 'शुद्धिसर्वस्वम्', 'भारतीयधर्मेतिहास तत्तवम्', 'अस्पृश्यत्त्वमीमांसा', 'वैदिक संस्कृतीचा विकास' सारखे प्रबंध नि ग्रंथ याचीच साक्ष देतात. 'शिवाय जडवाद', 'आनंदमीमांसा' हे ग्रंथही हेच सांगतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा मूळ पिंड हा ज्ञानसाधकाचा राहिला आहे. नित्य वाचन, चिंतन, मनन त्यांची जीवनवृत्ती आहे. काही नवं वाचलं, नवा विचार उमगला की त्यांच्यात प्रक्षोभ (प्रतिक्रिया, प्रतिसाद या अर्थाने!) निर्माण होतो व ते त्याचे अवगाहन (नि अनुसरण) करू

लागतात. त्यांचे विचार, जीवन व कार्य हे चिरप्रवाहशील राहिले आहेत. एकाच एक पायाभूत विचारावर ते उभे आहेत, असे त्यांच्या अभ्यासांतीही लक्षात येत नाही. उलटपक्षी अशी पाय ठेवण्याची (स्थिर) जमीन त्यांना मिळालीच नाही. वेषांतर, मतांतर, स्थित्यंतर, स्थलांतर हा त्यांचा स्थायीभाव म्हणून सांगता येतो. त्यांच्या ज्ञानसाधक व्यक्तिमत्त्वाचा परिचय प्रामुख्याने त्यांच्या कोशनिर्मिती कार्य व योगदानातून स्पष्ट होतो.

या ग्रंथाच्या तिसऱ्या भागात तर्कतीर्थांच्या कोशकार्यावर विचार करण्यात आला आहे. यातील तीन लेखांपैकी एक लेख डॉ. राजा दीक्षित यांचा असून उर्वरित दोन माझे आहेत. तर्कतीर्थांनी आपल्या जीवनात अनेक कोशांची निर्मिती केली. कोश हे कोणत्याही ज्ञानशाखेचे पायाभूत संज्ञा, संकल्पना, अर्थ, व्युत्पत्ती, विकासाचे साधन असते. कोणताही ज्ञानसाधक, अभ्यासक, संशोधक, समीक्षक आपल्या विचारधारणेचा इमला उभा करत असतो, ते विविध कोशांमधून त्याच्या हाती आलेल्या संज्ञा, व्याख्या, सिद्धांतांतून. त्याचा मूळ स्रोत असतो ते कोशवाङ्मय. कोश वाङ्मय निर्मिती ही ज्ञानाची मूळ साधना होय. तर्कतीर्थांनी स्वतः तर कोशवाङ्मय निर्मिती केलीच, पण इतरांनाही कोशवाङ्मय निर्मितीस प्रेरणा देत प्रोत्साहन दिले. अनेक कोशांना त्यांनी प्रस्तावनाही लिहिल्या. मोल्सवर्थ कृत इंग्रजी-मराठी शब्दकोशाच्या सन १९७५ च्या आवृत्तीस लिहिलेली तर्कतीर्थांची प्रस्तावना या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहे. 'मराठी विश्वकोश', 'धर्मकोश', 'पदनाम कोश' हे मराठी, संस्कृत भाषेचा ज्ञानव्यवहार समृद्ध करणारे पायाभूत कोश होत. ज्ञानव्यवहाराच्या रचनासंबंधाची निर्मिती हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे कोशवाङ्मय इतिहासातील महत्त्वाचे योगदान असून हे 'आर्षकार्य' म्हणूनच (ऋषीकार्य) त्याची नोंद घ्यावी लागेल. कोशवाङ्मयाचे महत्त्व अधोरेखित करण्याचे कार्य करून तर्कतीर्थांनी मराठीस ज्ञानभाषा अनेकांगी कार्य करत बनवली.

प्रस्तुत ग्रंथाचा चौथा नि अंतिम भाग हा वैचारिक प्रवाह व फलश्रुतीचा राहिला आहे. यात किशोर बेडकीहाळ आणि डॉ. जनार्दन वाघमारे यांचे दोन लेख असून तर्कतीर्थांची वर्तमानातील प्रस्तुतता शोधणारे माझे एक पत्र आहे. किशोर बेडकीहाळ यांनी तर्कतीर्थांच्या पुरोगामी प्रबोधक पैलूचे विवेचन आपल्या लेखात केले आहे, तर डॉ. जनार्दन वाघमारे यांनी रॉयवाद नि तर्कतीर्थ अनुबंध आपल्या लेखातून रेखांकित केला आहे. 'तर्कतीर्थ

लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन' ग्रंथ आकारला, साकारला तोच मुळी व्याख्यानमालेतील विविध भाषणांच्या लिखित संहितेतून आणि वेळोवेळी, विविध प्रसंगांच्या निमित्ताने लिहिलेल्या अनेकविध लेखांतून. तर्कतीर्थांचे सर्वंकष आकलन ही काळाची गरज वाटल्याने केलेली ही ग्रंथनिर्मिती होय.

प्रस्तुत ग्रंथातील अधिकांश लेख/भाषणे, पत्रे इत्यादी माझे लेखन असून अन्य पाच अभ्यासक व वक्ते यांच्या भाषणांच्या लिखित संहिता लेख रूपात या ग्रंथात विविध भागांत समाविष्ट करण्यात आले असून त्यांचे नामनिर्देश अनुक्रमणिकेत व लेखांखाली योग्य त्या ठिकाणी करण्यात आले आहेत.

या ग्रंथांतील लेखांचा आधार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या यशवंतराव चव्हाण अध्यासनांतर्गत कार्यरत असणाऱ्या 'यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास केंद्राच्या विद्यमाने' २७ जानेवारी, २०२२ ते १ फेब्रुवारी २०२२ या कालावधीत घेण्यात आलेली 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व्याख्यानमाला' आहे. ही व्याख्याने झाल्यानंतर आपण संबंधित वक्त्यांना सदर व्याख्यानांची संहिता लिहून देण्याची विनंती केली होती. ती त्यांनी मान्य करून संहिता दिल्या त्यांचा अंतर्भाव उत्तरार्धात आहे. या सर्वांचे समन्वित रूप म्हणजे 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन होय. या पुस्तकातील हे विविध लेख मराठी विश्वकोशाचा रचना कल्प आणि विकास, मराठी विश्वकोशातील तर्कतीर्थांच्या नोंदी, तर्कतीर्थांचे जीवन, कार्य, विचार, वाचन, हिंदू धर्मविषयक धारणा, त्यांच्या समग्र वाङ्मयाचे सिंहावलोकन करत समग्र तर्कतीर्थ आपणा पुढे उभे करण्याचा प्रयत्न या लेखकाने केला आहे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे विद्यमान कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के म्हणजे सर्व विधायक कार्यांमागील सकारात्मक अधिष्ठान होय. त्यांच्या शुभाशीर्वाद व शुभसंदेशानेच खरे तर या ग्रंथ, व्याख्यानमालादी उपक्रमाचा श्रीगणेशा झाला. याची नोंद घ्यायला हवी. त्याबद्दल त्यांच्याप्रति कृतज्ञता नि ऋण व्यक्त करणे मी माझे आद्य कर्तव्य समजतो.

या ग्रंथात नामवंत अभ्यासकांनी तर्कतीर्थांनी केलेली महाराष्ट्राची जडणघडण, त्यांचं पुरोगामी प्रबोधक रूप, तर्कतीर्थ आणि रॉयवाद, मराठी विश्वकोश कार्य, व्यक्ती आणि विचार यांचा आढावा घेतला आहे. या

लेखकाने ते लेख संपादून इथे प्रस्तुत केले आहेत. या कामी यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास केंद्राचे तत्कालीन प्रभारी समन्वयक प्रा. डॉ. प्रकाश पवार आणि प्रा. डॉ. अमोल मिणचेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. वक्ते सर्वश्री डॉ. सदानंद मोरे, किशोर बेडकीहाळ, डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. राजा दीक्षित यांच्याशिवाय या पुस्तकास समीक्षा रूप आले नसते. या सर्वांच्या सहकार्याबद्दल व प्रकाशक श्री. अमेय जोशी यांच्या उदारतेबद्दल मी कृतज्ञ नि ऋणी आहे.

**- डॉ. सुनीलकुमार लवटे**

# अनुक्रमणिका

● **भाग - १**

**✻ तर्कतीर्थ : व्यक्ती, विचार व कार्य**

१. ○ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्ती व विचार/३१

२. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील तर्कतीर्थांची भूमिका/४३
- प्रा. डॉ. सदानंद मोरे

३. ○ प्रज्ञातीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी/५६

४. ○ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे अज्ञात पैलू/७२

५. ○ रंग-रेषांच्या पलीकडचे तर्कतीर्थ/९७

६. ○ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे वाचन/१०३

७. ○ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय :
एक सिंहावलोकन/१०९

८. रॉयवाद आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी/११७
- डॉ. जनार्दन वाघमारे

● **भाग - २**

**✻ तर्कतीर्थकृत धर्ममीमांसा**

९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची धर्ममीमांसा/१४१
- प्रा. डॉ. अशोक चौसाळकर

१०. ○ तर्कतीर्थांची धर्मविषयक धारणा/१५८

११. ○ तर्कतीर्थकृत धर्मस्वरूपविषयक उकल/१६६

१२. ○ तर्कतीर्थांची सर्वधर्मचिकित्सा :
वैचारिक परिवर्तनाचे प्रतिबिंब/१७३

● **भाग - ३**

✻ **तर्कतीर्थकृत मराठी विश्वकोश**

१३. तर्कतीर्थांचे मराठी विश्वकोशातील योगदान/१८२
-प्रा. डॉ. राजा दीक्षित

१४.○ मराठी विश्वकोश : तर्कतीर्थकृत रचनाकल्प आणि विकास/१९८

१५.○ मराठी विश्वकोशातील तर्कतीर्थलिखित नोंदींची मीमांसा/२४४

● **भाग - ४**

✻ **तर्कतीर्थ : वैचारिक प्रवाह आणि फलश्रुती**

१६. तर्कतीर्थ : पुरोगामी प्रबोधक व वैचारिक प्रवासाची फलश्रुती/२६९
- श्री. किशोर बेडकीहाळ

**परिशिष्टे**

१. पद्मविभूषण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट/३०५

२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्यसंपदा व संदर्भसूची/३१२

***टीप :*** *○ अशी खूण असलेले सर्व लेख डॉ. सुनीलकुमार लवटेलिखित आहेत.*

# भाग - १

# तर्कतीर्थ : व्यक्ती, विचार व कार्य

# १

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्ती आणि विचार

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्ती आणि विचार' या विषयावर विचार करताना आपण लक्षात घेतले पाहिजे की तर्कतीर्थ हे बहुआयामी व्यक्ती होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंचा विचार करताना प्रश्न पडतो की ते काय नव्हते? संस्कृत पंडित, प्रभावी वक्ते, कुशल संघटक, राष्ट्रप्रेमी, क्रांतिकारी, प्रतिबद्ध सत्याग्रही, अस्पृश्यता निर्मूलक, सर्व विचारधारांचे समन्वयी चिंतक, सक्रिय राजकारणी, ज्ञानसाधक कोशकर्ते, पुरोगामी प्रबोधक, साहित्यिक, संपादक, भाषांतरकार, प्राच्यविद्या विशारद असे अनेक पैलू त्यांच्या कार्यातून आपण समोर येतात. वेदान्त, साहित्य, भाषा, वक्तृत्व, कोशरचना असा चौफेर संस्थात्मक परीघ विस्तारत ते आपले समन्व प्रगतीक चरित्र सर्व साधन, माध्यमांतून साध्यलक्षी सिद्ध करतात. त्यांचा मनुष्यसंग्रह सर्व स्तरातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरावर आपल्या विलक्षण प्रतिभेची व विलक्षण प्रज्ञेची मोहर उठवूनही सर्वसाधारण माणूस म्हणून पाय जमिनीवरच ठेवणारा हा ज्ञानयोगी प्रज्ञावंत. तो अंतरराष्ट्रीय परिषदेत जितक्या तन्मयतेने सहभागी होतो, तितक्या पानाच्या टपरीच्या उद्‌घाटनातही. मुलाच्या लग्न मांडवात अक्षता पडत असताना वाचन-लेखनात मग्न असलेले शास्त्री समाजमनानी अनुभवले आहे, 'रंगुनी रंगात साऱ्या, रंग माझा वेगळा, गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा' गुणगुणत स्वतःच्याच निर्माण केलेल्या जगात, निर्मोही,

निःसंग राहू शकणारे तर्कतीर्थ हे अजब रसायन होते, तसेच कोणत्याही रंग रेषा, परिघाबाहेरचं त्यांचं व्यक्तिमत्त्व!

**संस्कृत पंडित**

तर्कतीर्थ यांना त्यांच्या वडिलांनी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत धाडलं ते मुलांनी वेदाध्ययन करून आपला पारंपरिक वडिलोपार्जित जोशपणाचा (पूजा, मुहूर्त काढणे, यज्ञादी कर्म, ज्योतिष) व्यवसाय करावा म्हणून. पण सन १९१४ ते १९१७ या काळात प्राज्ञपाठशाळेत आपले गुरू नारायण शास्त्री मराठे उर्फ ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती यांच्याकडून व्याकरण, न्याय, मीमांसा, वेदान्त शिकले. विवेकवाद आणि बुद्धिवादाचं बाळकडू त्यांना इथेच मिळाले. संस्कृतीच्या उच्च शिक्षणासाठी ते काशीला गेले. तेथील राजेश्वरशास्त्री द्रविड, पर्वतीय शास्त्री, महानैयायिक, वामाचरण भट्टाचार्य यांच्याकडून न्याय, वेदान्त, शब्द बोध (व्युत्पत्ती) शिकले व त्यांनी तर्कतीर्थ पदवी संपादायची म्हणून काशीत काही प्राथमिक कसोट्या पूर्ण करून कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून सन १९२३ मध्ये तर्कतीर्थ पदवी ग्रहण केली.

परत वाईच्या प्राज्ञपाठशाळेत येऊन अध्यापक झाले. त्यांनी प्राज्ञ पाठशाळेत न्याय, वेदान्त आणि अलंकार शास्त्राचे अध्यापन केले. समांतरपणे ते आपले गुरू केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धर्म सभांमध्ये सहभागी होऊन वादविवादात भाग घेऊ लागले. वाई, कुकुरमुंडे, काशी येथील धर्मपरिषदेत वाद-विवाद करून वेदांचे शब्दप्रामाण्य नाकारले. वेध अपौरुषेय नसून मनुष्यनिर्मित आहेत. शंकराचार्य ही मनुष्यच होत. धर्म माणसानेच निर्माण केला असल्याने मनुष्य त्यात सुधारणा करू शकतो, असे आग्रही प्रतिपादन केले. पण सनातनी धर्म पंडित बदलास तयार होत नाही हे पाहून त्यांनी धर्मग्रंथ संपादन धर्ममीमांसेचे कार्य करायचे ठरवून धर्म सुधारणाविषयक लेखन, 'मीमांसा कोष' आणि 'धर्मकोश' संपादनात स्वतःला गुंतवून घेतले. स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली 'धर्मकोश' (खंड १ ते १९) चे संपादन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. त्यात व्यवहारकांड, उपनिषदकांड, संस्कारकांड, राजनीतिकांड, वर्णाश्रमकांड यांचा समावेश असून 'व्यवहारकांड' मधील 'मंत्रोपनिषद' ही संस्कृत, इंग्रजीतील प्रस्तावना म्हणजे त्यांच्या अभिजात पांडित्याचे वैभव होय.

## स्वातंत्र्य चळवळीचे प्रबोधक

राजकीय पारतंत्र्यातून देश मुक्त झाला तर समाजाची सर्वांगीण प्रगती होऊ शकते, अशा प्रकारची विचारसरणी तर्कतीर्थ स्वामी केवलानंद सरस्वती यांच्याकडून शिकले. प्राज्ञपाठशाळेत तळेगावच्या समर्थ विद्यालयाचे जे विद्यार्थी व शिक्षक ती शाळा पुढे ब्रिटिशांनी बंदी आणल्याने दाखल झाले होते ते राष्ट्रवादी विचारसरणीचे क्रांतिकारक होते. त्यांचा सहवास व संपर्कातून स्वातंत्र्य चळवळीविषयी तर्कतीर्थ यांच्या मनात जाणीव जागृती झाली. मिठाचा दांडी सत्याग्रह व महात्मा गांधी अटकेतून जी जनजागृती झाली होती त्या पार्श्वभूमीवर सन १९३२ च्या कायदेभंग चळवळीने जोर पकडला व त्यात हजारो नागरिक सहभागी झाले. या सर्व वातावरणाने प्रभावित होऊन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वाई, सातारा, कराड आदी ठिकाणी व्याख्यानांचा सपाटा लावला. त्यात कराड येथील कृष्णा तीरावर आठवडाभर सलग दिलेल्या व्याख्यानांनी लोकक्षोभ व लोकजागृतीचे कार्य केले. त्यात यशवंतराव चव्हाण यांच्यासारखा तरुण कार्यकर्ता देखील प्रभावित झाला होता. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे की तर्कतीर्थ यांच्या भाषणांचा वैचारिक प्रभाव सामान्य माणसावर आणि विशेषतः तरुणांवर जास्त पडला. तर्कतीर्थ यांच्या भाषणाची शैली वेगळी होती. त्याला देशभक्तीची धार होती, विचारांची एक पकड होती.

यापुढे जाऊन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संगमनेर येथे कार्यकर्ता प्रबोधन शिबिर योजले. ते शिबिर ब्रिटिशांनी बंद पाडल्यावर बाल, नामपुर येथे अशी शिबिरे योजली. साराबंदी चळवळ संघटित केली. बागलाणच्या जंगल सत्याग्रहाचे वर्णन ब्रिटिश व इतिहासकार संशोधकांनी मिनी बार्डोली सत्याग्रह असे केले आहे. हजारोंच्या संख्येने कोळी-आदिवासी सहभागी झालेल्या या सत्याग्रहात १७, १८ व १९ ऑक्टोबर १९३० रोजी वाढत्या क्रमाने सत्याग्रही वाढले. आक्रमक झाल्याने गोळीबारानंतर तर्कतीर्थ दोन दिवस फरार होते, पण फंदफितुरीने त्यांना अटक होऊन पन्नास रुपये दंड व सहा महिन्यांचा कारावास ठोठावून धुळ्याच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली. जानेवारी १९३१ मध्ये सुटका होताच ते पुन्हा सत्याग्रहात सक्रिय झाले. त्यांना परत फेब्रुवारी-मार्च १९३२ मध्ये अटक होऊन धुळे कारागृहात सहा महिने कारावास भोगावा लागला. नोव्हेंबर १९३२ मध्ये सुटका होताच महात्मा गांधींनी त्यांना पाचारण केले.

**अस्पृश्यतानिवारण व हरिजन मंदिर प्रवेश**

राखीव मतदारसंघासंबंधी महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील मतभेदाचे पर्यवसन म्हणून महात्मा गांधींनी सुरू केलेल्या आमरण उपोषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या समंजस भूमिकेमुळे महात्मा गांधींनी 'पुणे करार' नंतर आपले उपोषण संपवले हे खरे. पण त्यामुळे महात्मा गांधींच्या मनात अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न प्रखर बनला. त्यांनी सनातनी व पुरोगामी धर्मपंडितांशी चर्चा करून अस्पृश्यता, धर्म, चातुर्वर्ण्य व्यवस्था, मंदिरप्रवेश इत्यादी संबंधीचे धर्मग्रंथातील वास्तव जाणून घेतले. याकामी त्यांनी स्वामी केवलानंद सरस्वती, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बाबू भगवानदास, आनंद शंकर ध्रुव, इंदिरा रमण शास्त्री, डॉ. केशव लक्ष्मण दप्तरी, पी. एच. पुरंदरे प्रभृतींचे साहाय्य लाभले. महात्मा गांधींनी उपरोक्त धर्मपंडित यांच्या स्वाक्षरीने सहमतीचे एक पत्रक आपल्या 'दि सर्व्हन्टस् ऑफ अनटचेबल सोसायटी' मार्फत प्रकाशित केले. इंग्रजी साप्ताहिक 'हरिजन'च्या पहिल्या अंकात स्पष्ट केले की Thus it is necessary that rights common to the four varnas, e.g. of entry into temples, education institutions, of use of public wells, ghats, tanks, rivers and should equally accrue to the untouchables so called; and it is wrong to deprive them of such common rights. This is provable from texts, the fundamental principles and the spirit of the Dharma Shastra. त्याच अंकात या प्रयत्नातून मंदिर प्रवेश, विहीर मुक्तीची यादी आहे नि महात्मा गांधींच्या विनंतीवरून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी 'हरिजन'साठी पाठवले शुभेच्छा ऐवजीची भूमिका विशद करणारी चिंतनीय आणि त्यावरच महात्मा गांधींचे भाषण वाचकांना अंतर्मुख करते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या जीवनात या जाणिवेनंतर कधी अस्पृश्यता पाळली नाही. त्यांच्या स्वयंपाकघरातही हरिजनांना प्रवेश असायचा. प्राज्ञ शाळेने चालविलेल्या एकता वसतिगृहात हरिजन विद्यार्थ्यांना प्रवेश असे. प्राज्ञ पाठशाळेत हरिजन विद्यार्थी वेदाध्ययन करीत आपलं सणातनपण पूर्ण विसर्जित करायचं ठरवून एक दिवस आपल्या देवघरातील सारे देव टाक इत्यादी कृष्णार्पण केले व ते पूर्ण जडवादी झाले. सोरटी सोमनाथ जीर्णोद्धार नंतरच्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवात तर्कतीर्थ यांनी केलेले पौरोहित्य याच विचारांचा भाग होता.

## आंतरजातीय विवाह समर्थक

या घटने पाठोपाठच महात्मा गांधी पुढे आपल्या शेवटच्या मुलाचा देवदासच्या विवाहाचा यक्षप्रश्न उभा राहिला. त्याचे चक्रवर्ती राजगोपालाचारी यांची कन्या लक्ष्मीशी प्रेम होते व दोघे विवाहास अडून बसले होते. उभयतांच्या घराचा विरोध असूनही इलाज नव्हता. निर्णयाला येण्यापूर्वी महात्मा गांधी असा प्रती लोम विवाह जात वर्णीय आंतरजातीय शास्त्राधार जाणून घेऊ इच्छित होते. शास्त्रीजींनी समजावले की, जातिनिष्ठ वर्णव्यवस्था मानणारा मी नाही. म्हणून हा समान वर्णीय विवाह आहे असे मी मानतो. हा विवाह होऊ शकतो दोन घरात जर समान संस्कृती असेल, समान आचार असतील तर विवाह टिकतात आणि तुमच्या दोन कुटुंबांची परिस्थिती अशी आहे. जातिव्यवस्था काल्पनिक आहे. वर्णव्यवस्था कर्म मूलक आहे असा सिद्धांत महाभारतात दोन-तीन ठिकाणी सांगितला आहे. महात्मा गांधी व चक्रवर्ती राजगोपालाचारी यांना हा विचार पटला व त्यांनी विवाहास संमती देऊन तर्कतीर्थ यांनाच विवाहाचे पौरोहित्य करण्याची विनंती केली व त्यांनी ती सहर्ष स्वीकारली. विवाह सोहळा जून १९३३ ला संपन्न झाला. वधूवरांना गुजराती व हिंदी उपदेश करत केलेल्या भाषणात महात्मा गांधींनी तर्कतीर्थ यांची प्रशंसा "A man of great learning and spotless character' अशा सार्थ शब्दात केली.

## रॉयवादी तर्कतीर्थ

धुळ्याच्या तुरुंगवास काळात द्वा. भा. कर्णिक यांच्यासारखे रॉय वादी, मार्क्सवाद अभ्यासक तर्कतीर्थांसोबत होते. त्यांच्यामुळे तर्कतीर्थ मार्क्सवाद अभ्यासू लागले. तत्पूर्वी ते क्रांतिकारी गटाच्या सशस्त्र क्रांतीत सक्रिय होते. अशांना शस्त्र पुरवण्याचे कार्य शास्त्रीजींनी केले होते, पण याला क्रियाशील गती आली ती मानवेंद्रनाथ रॉय १९३७ मध्ये तुरुंगातून सुटून आल्यावर. ते काँग्रेसमध्ये सक्रिय झाल्यावरच, त्या वर्षी काँग्रेस अधिवेशन फैजपूरला झालं. त्यात मानवेंद्रनाथ रॉय यांनी जे भाषण केलं ते वक्तृत्वाचा आदर्श नमुना होता. त्यात त्यांनी ब्रिटिश राजवटीशी समांतर सत्ताकेंद्र कल्पना मांडली. ती समाजवादी विचारसरणीच्या जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या अनेकांना पटली. तर जवाहरलाल नेहरू, राजेंद्रप्रसाद, वल्लभभाई पटेल, महात्मा गांधी यांच्या गळी उतरली नाही व आपणास बुनियादी फरक असल्याचे सांगत मानवेंद्रनाथ रॉय यांना बाहेरचा रस्ता दाखवला. आपल्या विचारांशी सहमत व्यक्तींना घेऊन मानवेंद्रनाथ रॉय

यांनी सन १९४० मध्ये 'रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टी' या पक्षाची स्थापना केली. त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सक्रिय असल्याने त्यांना महाराष्ट्राचे सरचिटणीस बनवण्यात आले. सन १९४० ते १९४७ असे सलग सहा वर्षे प्रयत्न करूनही भारतभर या पक्षास मूठभर बुद्धिजीवी शिवाय व्यापक जनमत लाभले नाही. परिणामी, हा पक्ष बरखास्त करून आदी मंडळींनी भारतीय जनमानस क्रांतीपूरक नसल्याची जाणीव होऊन नवमानवतावाद नावाचे नवे तत्त्वज्ञान अंगिकारले.

या काळात तर्कतीर्थ यांनी स्वकीयांकडून भरपूर उपेक्षा सहन केली. अनेक वेळी मानहानी आणि मारहाणीचे प्रसंग आले. पण तत्त्वनिष्ठा, विवेक व बुद्धिप्रामाण्यवाद मानत सर्व पचवले. या पक्षाच्या सन १९४८ च्या विसर्जन अधिवेशनाचे तर्कतीर्थ अध्यक्ष होते. त्यांची अध्यक्षही व समारोपीय भाषणे उपलब्ध आहेत. रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टी मार्फत मुंबईतून लढलेल्या निवडणुकींच्या अनुभवावरून तर्कतीर्थ यांनी लेख लिहिलेले आहेत. या साऱ्यांचे वाचन करताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या पक्षाची किती एकरूप झाले होते? त्यामागची राष्ट्रप्रेमाची भावना काय होती? ते कोणत्या प्रकारचा समाज निर्माण करण्याचे स्वप्न बाळगून होते? हे स्पष्ट होते. निवडणूक प्रचारातील तर्कतीर्थ यांची भाषणे स्वातंत्र्य चळवळीतील भाषणांसारखीच प्रभावी होती, त्यांचे उदाहरण अमरावतीच्या प्रचार भाषणाच्या प्रभावातून स्पष्ट होते. तर्कतीर्थ यांचे भाषण एकूण तेथील एका स्थानिक संपादकांनी कबूल करत म्हटलं होतं की If lectures like these were delivered from the radical platform, in a few days congress influence will be severely wreaked in -maravati. रॉय वादाचे विसर्जन झाल्यानंतरच तर्कतीर्थ यांचे राजकीय जीवन हे नव मानवतावादाकडे झुकले. २२ सूत्रांशी सुसंगतच राहिले, कारण ती बावीस सूत्रे म्हणजे विश्वासात्मक पातळीवरचं मूल्याधारित मानवतावाद निर्माण करण्याचं होतं.

**संयुक्त महाराष्ट्र लढा आणि तर्कतीर्थ**

रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीच्या विधिवत विसर्जनानंतर १९१९ ते १९३९ या दोन दशकांतील काँग्रेस पक्ष व त्या पक्षातील आपले जुने सहकारी यांच्या आग्रहावरून तर्कतीर्थ पुनश्च काँग्रेसी झाले. पण यावेळी त्यांनी नेता न राहता समर्थक पाठीराखे अशी भूमिका घेण्याचा दृढ संकल्प केला आणि तो आयुष्याच्या अंतापर्यंत जगला. यशवंतराव चव्हाण,

किसन वीर यांच्या पाठीशी ते ठाम उभे राहिले. रॉयवादी पक्षातील अनुभवाची पुनरावृत्ती होत राहिली, तरी ते उगमले नाही. काँग्रेसने स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांत रचनेचे धोरण अंगीकारले नि त्यानुसार विशाल महाराष्ट्राचे विभाजन करून सन १९५६ मध्ये द्विभाषिक महाराष्ट्राची निर्मिती केली आणि त्याच्या मुख्यमंत्री पदाचा बहुमान यशवंतराव चव्हाण यांना बहाल केला. द्विभाषिक महाराष्ट्र निर्मितीस विरोध करत मराठीचे स्वतंत्र राज्य स्थापन करावे या मागणीसाठी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. त्याचे नेतृत्व सेनापती बापट, आचार्य प्र. के. अत्रे, साथी एस. एम. जोशी, प्रभूती करत राहिले आणि त्याला व्यापक जनाधार लाभला.

१ ऑगस्ट १९५६ रोजी कोल्हापुरात काँग्रेसने सभा योजली होती, वक्ते तर्कतीर्थ होते. कोल्हापूर हा संयुक्त महाराष्ट्र समितीचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जायचा. तत्कालीन लॉ कॉलेजमध्ये सभा भरली. तर्कतीर्थ भाषणास उभे राहताच त्यांना अवमानजनक प्रसंगाला तोंड द्यावे लागले. पोलिसांनी समिती कार्यकर्त्यांना अटक केली. सभा झाली पण केस सुरू राहिली. प्रजा परिषदेचे नेते भाई माधवरावजी बागल समिती समर्थक होते. तर्कतीर्थ नि भाई माधवराव बागल यांच्यात मैत्रीपूर्ण मतभेद होते. तत्कालीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा तो विधायक संस्कार होता. झाल्या प्रश्नी तर्कतीर्थ यांनी साप्ताहिक मौजे मुंबईच्या अंकात भाई माधवराव बागल यांना अनावृत पत्र लिहिले. भाई माधवराव बागल यांनी मतभेद स्वीकारूनही पत्रास त्याचा समारोप होता. त्यात म्हटले होते की एवढी इच्छा होती की मी आणि तर्कतीर्थ हातात हात घालून संयुक्त महाराष्ट्राचा प्रचार करावा. सारे रान उठवावे आणि सत्तेच्या जबड्यातून महाराष्ट्राला बाहेर काढावे, पण तो सहकार्याचा हात तुटला. आता थोड्या हातानेच मी लढणार पण सत्तेच्या, संपत्तीच्या किंवा मोहाच्या आहारी नाही जाणार. मित्राच्या भिडेस नाही बळी पडणार. या घटनेचा उत्तरार्ध म्हणजे या मैत्रीची परिसीमाच म्हणायला हवी. तर्कतीर्थ त्यांचा अवमान करणाऱ्यांना शिक्षा व्हावी अशी मोरारजी देसाई यांची इच्छा, पण पुंडलीकजी कातगडे तर्कतीर्थांना भेटतात आणि अवमान करणाऱ्या कार्यकर्त्यांना शिक्षा होऊ नये अशी विनंती करतात. विशेष म्हणजे तर्कतीर्थ ती विनंती मानतात, खटल्यातील आरोपींना ओळखत नाही म्हणून जबाब देतात आणि आरोपी निर्दोष मुक्त होतात.

## साहित्य आणि संस्कृती मंडळाचे संस्थापक

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची १ मे १९६० रोजी झालेली स्थापना म्हणजे मराठीचा गौरव आणि विजयच. स्वतंत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून नामदार यशवंतराव चव्हाण सूत्रे हाती घेतात. मराठी भाषा संचालनालय निर्मिती पाठोपाठ १९ नोव्हेंबर १९६० रोजी मराठी ज्ञानभाषा बनवण्यासाठी म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची निर्मिती करतात. त्याच्या अध्यक्षपदी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नियुक्ती करतात. तर्कतीर्थ शेकडो पुस्तकांची मराठी भाषांतरे, अभिजात साहित्याचे प्रकाशन, मराठी विश्वकोश निर्मिती अंक इत्यादी द्वारे आपली निवड सार्थ ठरवितात. राज्याच्या सिंहासनावर मराठी विराजमान करण्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे स्वप्न साकार करतात. मंडळामार्फत प्रकाशित ग्रंथांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी कधी त्रोटक तर कधी विस्तृतपणे बऱ्याचदा साचेबद्ध प्रस्तावना, निवेदन, शीर्षकांतर्गत लिहिल्या आहेत. त्या प्रस्तावना म्हणजे तर्कतीर्थ यांचा साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्य, उद्देश, स्वरूप आणि वैविध्य इत्यादी विषयांचे विस्तृत व सूचक विवेचन असायचे.

अशीच एक मार्मिक प्रस्तावना श्री. चं. न डफळे लिखित 'देशनांक-निर्देशांक' शीर्षक ग्रंथात दिली आहे. त्यात ते म्हणतात की, मराठी भाषेला विद्यापीठाच्या भाषेत येण्याकरिता विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रविज्ञान या विषयावरील ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणात होण्याची आवश्यकता आहे. वरील विषयावर केवळ परिभाषा कोष अथवा पाठ्य पुस्तके प्रकाशित करून अशा प्रकारचा दर्जा मराठी भाषेला प्राप्त होणार नाही. सर्वसामान्य सुशिक्षितांपासून तो प्रज्ञावंत पंडितापर्यंत मान्य होतील, अशा ग्रंथांची रचना व्हावयास पाहिजे. मराठी भाषेत किंवा अन्य भारतीय भाषांमध्ये विज्ञान, सामाजिक शास्त्रे व तंत्र विज्ञान या विषयाचे प्रतिपादन करावयास उपयुक्त भाषा, परिभाषा, सूची किंवा परिभाषा कोश तयार होत आहेत. परिभाषा किंवा शब्द यांचा प्रतिपादनाच्या ओघात समर्पकपणे वारंवार प्रतिष्ठित लेखात व ग्रंथात उपयोग केल्यानेच अर्थ व्यक्त करण्याची त्यात शक्ती येते. अशा तऱ्हेने उपयोगात न आलेले शब्द केवळ कोशात पडून राहिल्याने अर्थशून्य राहतात. म्हणून मराठीला आधुनिक ज्ञान-विज्ञानाची भाषा बनविण्याकरिता शासन विद्यापीठ, प्रकाशन संस्था व त्या-त्या विषयाचे कुशल लेखक यांनी ग्रंथरचना करणे आवश्यक आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या मंडळामार्फत मराठी विश्वकोश निर्मितीचा संकल्प सन १९६२ मध्ये केला आणि सन १९६५ मध्ये मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ आणि सन १९७३ मध्ये 'परिभाषा संग्रह' प्रकाशित करून एका अर्थाने मराठी विश्वकोशाचा रचनाकल्पच समोर मूर्त केला. 'मराठा इतिहास साधने', 'आंतरभारती' मालेत भारतीय भाषेचा परिचय आणि इतिहास, 'पदनाम कोश', यांची तर निर्मिती केलीच, पण कला, क्रीडा, संगीत, वैद्यक, स्थापत्य, अभियांत्रिकी, आहार, आरोग्यविज्ञान, जीवन, साहित्य, भाषा असं कोणतंच क्षेत्र उपेक्षित ठेवले नाही. मानवी संस्कृतीच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे सर्वग्राही ग्रंथ निर्माण करून तर्कतीर्थ यांनी मराठी भाषेला ज्ञानभाषा तर बनवले, पण एकंदर ग्रंथव्यवहारातून महाराष्ट्र समाजाचे रूपांतर सुसंस्कृत व प्रगल्भ अशा ज्ञानसमाजात केले. तर्कतीर्थ यांचे हे योगदान महाराष्ट्र राज्याचा सांस्कृतिक पाया मजबूत करणारे असे आहे. तसेच ते या राज्याची सामाजिक, आर्थिक, तांत्रिक भाषिक साहित्यिक अंगाने प्रगतीची दिशा ठरवणारे ही सिद्ध झाले आहे.

**मराठी विश्वकोशाचे निर्माते**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा वाढता व्याप आणि मराठी विश्वकोश निर्मितीस गती देण्याच्या उद्देशाने १ डिसेंबर १९८० ला महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्वतंत्र स्थापना करून त्या मंडळाचे अध्यक्ष व मराठी विश्वकोशाचे संपादक म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नियुक्ती केली. तर्कतीर्थ यांनी या विश्वकोशाचा जो रचनाकल्प तयार केला होता त्यावरून हुकूम आज सदर कोश पूर्ण झाला असून त्याचे २० खंड प्रकाशित झाले आहेत. मराठी विश्वकोश हा सर्वविषयसंग्राहक ज्ञानकोश असून तो भारतीय भाषातील श्रेष्ठ ज्ञानकोश मानला जातो. तर्कतीर्थ यांनी या २० खंडांमध्ये १५७ नोंदी लिहिल्या असून त्या नोंदलेखनाचा आदर्श होत. मराठी विश्वकोश नोंदरचना ही आधुनिक संगणकशास्त्राच्या सोयीची असून त्याचे अंकीय संस्करण (Digitalization) उपलब्ध असून ते विकिपीडियाशी स्पर्धा करणारे ठरले आहे. या मराठी विश्वकोशाचे सर्व भारतीय भाषांमध्ये भाषांतर झाले तर भारतीय भाषा ज्ञानभाषा म्हणून समृद्ध होतील. किमान पक्षी या मराठी विश्वकोशाचे हिंदी व इंग्रजी भाषांतर झाले तरी तर्कतीर्थ यांनी मराठी ज्ञानभाषा म्हणून किती समृद्ध करून ठेवले आहे याची प्रचिती देशात व जगात आल्याशिवाय राहणार नाही. तीच गोष्ट महाराष्ट्र राज्य साहित्य

आणि संस्कृती मंडळाने निर्मिलेल्या सर्व ग्रंथांचे (भाषांतर ग्रंथ वगळून) हिंदी आणि इंग्रजी भाषांतर केल्यास ही मराठीचा डंका देशभर नि जागतिक होण्यास मोलाचे साहाय्य होईल. या दृष्टीने दोन्ही मंडळांनी धोरणात्मक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी युद्धपातळीवर अग्रक्रमाने करावी, असे मी नम्र आवाहन करू इच्छितो. महाराजा सयाजीराव गायकवाड साधन निर्मिती समितीने असे धोरण अंगीकारून अमलात आणले आहे. हे मी या व्यासपीठावरून मुद्दाम लक्षात आणून देऊ इच्छितो. तर्कतीर्थ यांच्या कार्यास वैश्विक व शाश्वत बनवण्याचा तोच एकमेव उपाय आहे. महाराष्ट्र समाज तेव्हाच खऱ्या अर्थाने विश्वसमाज स्पर्धक बनेल असे मला वाटते.

**भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतरकार**

भारतीय घटना परिषदेने तयार केलेल्या घटना मसुदा भारतीय संसदेने मंजूर केल्यानंतर स्वतंत्र भारताचे रूपांतर भारतीय प्रजासत्ताकात झाले. भारतीय राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टान्वये ज्या १४ भाषांना सन १९५० मध्ये राजभाषा म्हणून मान्यता देण्यात आली होती. त्या सर्व भाषांमध्ये भारतीय राज्यघटनेचे भाषांतर करणे घटनात्मक तरतुदीनुसार अनिवार्य होते. अन्य सर्व भाषांसाठी भाषांतरकार उपलब्ध झाले, संस्कृत भाषा मात्र त्याला अपवाद ठरली. डॉक्टर राजेंद्र प्रसाद हे घटना प्रदत्त प्रमुख होते. त्यांना ही अडचण लक्षात येताच त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे नाव सुचविले. तर्कतीर्थ यांनी भाषांतर समितीचे निमंत्रक म्हणून कामगिरी बजावली. अधिकांश तीन चतुर्थांश घटनेची भाषांतर तर्कतीर्थ यांनी केले. काही भाग मंगल देव शास्त्री यांनी भाषांतरीत केला. भाषांतर समितीत भारतरत्न पां. वा काणे डॉक्टर सुनितीकुमार चटर्जी, डॉक्टर बाबूराम सक्सेना, डॉक्टर रघुवीर यांच्यासारखे नवखे होते. समितीने सतत २२ दिवस भाषांतराचे काम चालवून भाषांतरित मसुदा मान्य केला. पुढे मुद्रणाचा प्रश्न उभारला. त्याची जबाबदारीही तर्कतीर्थ यांनी स्वतःच्या खांद्यावर घेतली. खिळे जुळवणी, मुद्रितशोधक इत्यादी कार्य प्राज्ञ प्रेस, वाई या ठिकाणी  झाले.  'हाती घ्याल ते तडीस न्या' दंडक संस्कार म्हणून तर्कतीर्थ यांनी आपले गुरू स्वामी केवलानंद सरस्वतीकडून घेतला होता. 'घेतला वसा, टाकू नये' हे मान्य करत संस्कृत राज्यघटना 'भारतस्य सविधानम' शीर्षक सन १९५२ मध्ये प्रकाशित झाली. सुमारे तीनशे पृष्ठांचा हा दस्तऐवज भारत सरकारने अवघ्या दोन रुपयांत भारतीय जनतेस उपलब्ध करून दिला होता.

संस्कृत हस्तलिखितांची द्विखंडीय सूची संपादून ती प्रकाशित करून तेराशे पृष्ठांचा असाच दुर्मीळ खजिना तर्कतीर्थ यांनी उपलब्ध करून मोठे उपकार केले आहेत. सुमारे १३००० पोथ्यांची ही सूची प्राचीन संस्कृत हस्तलिखितांची सर्वंकष माहिती देते. त्यात पोथी, शीर्षक, लेखक, काळ, स्थिती, माध्यम, ओळी, शब्द संस्था इत्यादी माहिती वाचकास मिळते. त्या माहितीचे अवलोकन करत असताना परत एकदा तर्कतीर्थ यांच्या ज्ञान साधकाचे दर्शन होते आणि आपसूक ओठ पुटपुटू लागतात 'दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती'. अशा अनेक पैलूंमधून तर्कतीर्थ व्यक्ती म्हणून जास्त सामर्थ्याने समोर येतात, तितकाच त्या मागचा विचार ही आपणासाठी प्रेरक, स्फूर्ती म्हणून ऊर्जा आणि ऊर्मी देतो. अन् लक्षात येते, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना देश केवळ स्वतंत्र करायचा नव्हता, तर तो स्वप्रज्ञा, स्वराज्य बनवायचा होता. तर्कतीर्थ यांनी या कार्याशिवाय जो मनुष्यसंग्रह केला होता तो केवळ अचंबित करणारा ठरतो. हीच गोष्ट त्यांच्या संस्थात्मक उभारणीचीही आपणास केवळ प्राज्ञपाठशाळामंडळ माहीत आहे, पण त्याशिवाय धर्मसुधारणा मंडळ, धर्मकोश मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, डॉक्टर भांडारकर प्राच्यविद्या संस्था, प्रार्थना समाज, ब्राह्मो समाज, सत्यशोधक समाज, सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, स्त्री हितकारणी, हिंदी विश्वकोश, भारतीय संस्कृति संसद, इंटरनॅशनल काँग्रेस ऑफ ओरिएन्टॅलिस्ट संस्थांचा उभारणी आणि विकासातील तर्कतीर्थ यांचे योगदान लक्षात घेतले की जाणवते, हा माणूस एका जन्मात सात जन्माचे कार्य करण्यासाठीच जन्मला होता. डॉक्टर मानवेंद्रनाथ रॉय, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉक्टर राजेंद्रप्रसाद, महात्मा गांधी, यशवंतराव चव्हाण यांच्याशी तर्कतीर्थ यांचे असलेले संबंध परस्परांना समृद्ध करणारे होते. साहित्य अकादमी महत्तर सदस्यत्व (फेलोशिप) मुंबई विद्यापीठ, एल. एल. डी, पद्मभूषण, पद्मविभूषण, राष्ट्रीय संस्कृत पंडित, राष्ट्र भूषण, छत्रपती शाहू पुरस्कार, सातारा भूषण सारखा सन्मानांनी गौरवित तर्कतीर्थ यांची प्रज्ञा प्रभा सात समुद्रापलीकडे ब्रह्मदेश, रशिया, अमेरिका, फ्रान्स पर्यंत जाऊन पोहोचली होती. त्यांनी मराठी व संस्कृत भाषेत दोन डझन ग्रंथांची केलेली निर्मिती हिंदी- इंग्रजीत भाषांतरित झाली होती. महाराष्ट्राचं असं अपवाद वृत्तपत्र वा नियतकालिक असे ज्यात तर्कतीर्थ यांनी लेखन केलं नाही. संशोधन, संपादन, समीक्षा, प्रस्तावना, पत्रलेखन, मुलाखती, भाषणे,

नोंदी, प्रवासवर्णन असा सर्व क्षेत्रात त्यांनी आपलं सारस्वत सिद्ध केलं. सर्व विचार, पक्ष अंगीकारूनही तर्कतीर्थ व्यक्ती व विचार म्हणून स्व प्रज्ञा व स्वतंत्र राहिले. आयुष्याच्या अंतिम पर्वात ते गांधीवादी होते, ज्यात वैश्विक करुणा होती आणि श्रेष्ठ मानवी मूल्याबद्दल अढळ निष्ठा होती.

***संदर्भसूची***


१. *माझी तीन प्रेरणास्थान - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, दीपावली अंक, दिवाळी, १९८६, पृष्ठ नं. ११९ व १९६.*

२. *कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण, रोहन प्रकाशन, पुणे. जन आवृत्ती, सण. २०१२ पृष्ठ-६५,*

३. *अध्ययन आणि वैचारिक वाटचाल - मुलाखतः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नवभारत, फेब्रुवारी-मार्च, १९८१ पृष्ठ- १६.*

४. *माधवराव बागल यास अनावृत पत्र - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, साप्ताहिक. मौजे मुंबई, १६ सप्टेंबर १९५६. पृष्ठ. ३*

५. *The Collected works of Mahatma Gandhi - Vol-61, Page 167.*

६. *Towards Freedom - Laxmanshastri Joshi-Independent India, Bombay (Weekly), Vol-XIII, No-2, 16th January, 1949, Page-19, 20 24*

७. *From Party to a Movement - Laxmanshastri Joshi-Vol-XIII, No-I, 9TH January, 1949, Page-7-10.*

८. *Some Experiences of the Bombay Election - Pandit Laxmanshastri Joshi Tarkteerth-Independent India, Delhi (Weekly), Vol-X, No-13, Pages-149,154,*

९. *तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना उत्तर - माधवराव बागल, साप्ताहिक, मौजे मुंबई, २३ सप्टेंबर १९५६, पृष्ठ २.*

१०. *तर्कतीर्थांचा सहवासात - माधव गडकरी, साहित्यातील हिरे आणि मोती, उत्कर्ष प्रकाशन, पुणे प्रकाशन- १ मे, १९८४, पृ. १२.*


■

*(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ऑनलाईन व्याख्यानमालेतील भाषण, मंगळवार दि. १ फेब्रुवारी, २०२२. )*

२

# आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील तर्कतीर्थांची भूमिका

**- प्रा. डॉ.सदानंद मोरे**

तर्कतीर्थांच्या आणि माझ्या वैयक्तिक संबंधाबद्दल सांगायचं झालं, तर त्यांची व्याख्याने मी माझ्या कॉलेजच्या काळामध्ये ऐकली होती. तसेच मी त्यांच्या लेखनाचे वाचन करीत असे; पण नंतर काही योग आले. ते दोन योग मला अत्यंत महत्त्वाचे वाटतात. एक म्हणजे तर्कतीर्थांची मुलाखत घेण्याची संधी मला मिळाली. माझे मित्र प्रा. राजेंद्र व्होरा, डॉ. सुहास पळशीकर आणि मी अशी तीन मंडळी एकत्र आलो. आम्ही एका दिवाळी अंकासाठी तर्कतीर्थांची मुलाखत वाईला जाऊन घेतली. दुसरा योग जुळून आला. मी माझ्या पदव्युत्तर संशोधन प्रकल्पासाठी (पोस्ट डॉक्टरल रिसर्च प्रोजेक्ट) प्रबंध तयार केला होता त्याचं शीर्षक कृष्णावरती आधारित होते. 'कृष्ण : द मॅन अँड मिशन' हे त्याचे शीर्षक होते. यूजीसीच्या एका फेलोशिपसाठी मी काम करीत होतो. तेव्हा मी कॉलेजमध्ये नोकरीला होतो. त्या वेळी आमचे मित्र यशवंतराव गडाख यांनी तर्कतीर्थांना महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले होते. त्या वेळी त्यांनी तर्कतीर्थांना भेटण्यासाठी येताना मला तो प्रबंध घेऊन यायला सांगितले होते. त्यानुसार मी माझा प्रबंध घेऊन गेलो. मी तो प्रबंध यशवंतराव गडाख आणि तर्कतीर्थांना दाखविला. तर्कतीर्थांनी तो त्यांच्या

पद्धतीने पंधरा-वीस पंचवीस मिनिटे चाळला आणि अर्थातच तो त्यांना आवडला. त्यानंतर त्यांनी 'कृष्ण' या विषयावर खूप चांगली चर्चा आमच्याशी केली. असा एक वैयक्तिक प्रकारचा संबंध तर्कतीर्थांशी आला होता. या योगायोगाचा मला फार आदर वाटतो. कारण, मी आमच्या काळातल्या एका मोठ्या माणसाला प्रत्यक्ष भेटत होतो. त्या वेळी त्यांच्याशी विचारविनिमय केला होता. ही माझ्या आयुष्यातील महत्त्वाची घटना मी मानतो. तर्कतीर्थांच्या संदर्भात आणखी काही गोष्टी मी पुढे सांगणारच आहे.

अलीकडच्या काळात महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वेबसाईटवर मी माझे दोन व्हिडिओ प्रकाशित केले आहेत. दोन्ही व्हिडिओ तर्कतीर्थांबद्दलचे आहेत. साहित्य संस्कृती मंडळाचे ते पहिले अध्यक्ष होते. अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेल्या कार्याच्या संदर्भातील एक व्हिडिओ आहे. दुसरा व्हिडिओ, १९५४ च्या दिल्ली येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनी केलेल्या भाषणात त्यांनी मराठी संस्कृतीची जी मांडणी केली होती, त्यासंबंधित आहे. महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृतीसंबंधातील तर्कतीर्थांचे कार्य असे सूत्र पकडून मी त्यांच्याबद्दल आज तुमच्यासमोर बोलतो आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याबद्दल अनेक पद्धतीने सांगता येईल. म्हणजे विषय प्रवेश करताना असे म्हणता येईल की, कोणत्याही भवनात प्रवेश करताना एका दरवाजातून आपणास जावे लागते. त्याचप्रमाणे कोणत्याही विषयाबाबत असते. कधी कधी एखादा विषय इतका समृद्ध असतो की, त्या विषयाकडे जाण्याचे अनेक मार्ग असतात. एक रूपक घेऊन हे सांगता येईल. एखादी इमारत असते. ती छोटी असेल, तर तिला कमी दरवाजे असतात. इमारत मोठी असेल, तर तिला अनेक दरवाजे असतात. मोठ्या विषयांचेही तसे आहे. अनेक मार्गांनी त्या विषयाकडे जाता येते, तसेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हा विषय व्यापक आहे. विषयाची व्याप्ती मोठी आहे. त्यात प्रवेश करण्याचे अनेक मार्ग असू शकतात. तर्कतीर्थांच्या विषयासंबंधी संवाद साधताना मी कुठल्या दरवाजाने प्रवेश करावा, याबद्दल मला थोडा संभ्रम होता; पण नंतर माझ्या लक्षात आलं की, आपण तर्कतीर्थांच्या विषयाकडे वेगळ्या प्रकारे जाऊ शकतो.

**स्वातंत्र्य चळवळ**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणजे वाईच्या प्राज्ञपाठशाळेमध्ये तयार झालेले स्वामी केवलानंद ऊर्फ नारायणशास्त्री मराठे यांचे शिष्य

म्हणता येईल. मराठे यांचे अनेक शिष्य होते, तसेच मोठे झालेले अनेक लोक तिथे होते. विनोबा भावे आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे तिथे सहाध्यायी होते. पहिल्यांदा विनोबा गांधीजींकडे गेले होते. तिथल्या त्यांच्या आश्रमात त्यांनी स्वराज्याची शपथ घेतली होती. नंतर ते आपले अध्ययन अधिक चांगले व्हावे, यासाठी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत आले. तर्कतीर्थांना तिथे विनोबांसह इतर अनेक मोठ्या लोकांचा सहवास लाभला होता. उदाहरणार्थ महादेवशास्त्री दिवेकर. मी तुम्हाला सांगू इच्छितो की, प्रा. वि. गो. विजापूरकर यांचे समर्थ विद्यालय हे राष्ट्रीय शिक्षण देणारे केंद्र. कोल्हापूरमध्ये होते. तिथे त्यांचे संस्थानाशी व ब्रिटिशांची काही मतभेद झाले. तिथून त्यांचे विद्यालय मिरज येथे स्थलांतरित झाले. तिथेही ब्रिटिशांनी त्यांच्या विद्यालयावर टाच आणली. नंतर त्यांनी आपले समर्थ विद्यालय तळेगाव येथे स्थलांतरित केले. तिथेही ब्रिटिशांची वक्रदृष्टी समर्थ विद्यालयावर पडली आणि ते त्यांना बंद करावे लागले. तेथील विद्यार्थी व शिक्षक क्रांतिकारी कार्य करीत होते. ब्रिटिशविरोधी क्रांतिकार्यास तिथे चालना व बळ मिळते म्हणून ब्रिटिश सरकारने ते विद्यालय मोडले. त्यातील काही मंडळी म्हणजे विद्यार्थी व शिक्षक वाईला प्राज्ञपाठशाळेत येऊन सामिल झाली. म्हणजे वाई हे पहिल्यापासून अशाप्रकारे राष्ट्रवादी स्वातंत्र्य चळवळीतील लोकांचे केंद्र बनले होते. अशा राष्ट्रवादी, स्वातंत्र्यप्रेमी विचारांचा समूह तिथे होता असे म्हणता येईल.

स्वामी केवलानंद सरस्वतींचे प्राज्ञपाठशाळेत जे शिष्य होते, त्यांच्यामध्ये तर्कतीर्थही होते. सुरुवातीच्या काळात महादेवशास्त्री दिवेकर यांना विशेष महत्त्व होते. पुढे महादेवशास्त्री दिवेकर हे 'किर्लोस्कर' मासिकातून बुवाबाजीविरुद्ध लिहायला लागले. म्हणजे ज्याला आपण अलीकडच्या काळात अंधश्रद्धा निर्मूलन मोहीम म्हणतो, त्या चळवळीस तेव्हा आजच्या सारखे संस्थात्मक स्वरूप आले नव्हते. त्या चळवळीचा एक उद्देश म्हणजे बुवाबाजीला विरोध करणं, अंधश्रद्धा लक्षात आणून देणे, त्यांच्यातील फसवाफसवी उघड करणं, अशा प्रकारचे अंधश्रद्धाविरोधी उपक्रम 'किर्लोस्कर' मासिकाने फार पूर्वी चालविले होते. त्या मासिकामध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीही लिहायचे. तर्कतीर्थ विद्वान होते. अर्थात् तर्कतीर्थ आणि दिवेकर शास्त्री हे गुरुबंधू होते. दिवेकर शास्त्री तर्कतीर्थ यांना कौटिल्य बुद्धीचे चाणक्य म्हणायचे. अर्थात् तर्कतीर्थ त्यांचा हा जो शेरा होता, तो ते कॉम्प्लिमेंट म्हणून घेत. दिवेकर यांना असं वाटत होतं की, तर्कतीर्थांनी

लोकांना एकत्र करावे; पण तेव्हाची तर्कतीर्थांची प्रतिक्रिया महत्त्वाची होती. ती काय होती, तिथून आपण सुरुवात करू.

**सत्ता आणि परमार्थ**

तर्कतीर्थ म्हणत की, 'राजकारणात 'सत्ता' आणि परमार्थात 'सत्य' ही मुख्य साधने असतात. साध्यानुसार सर्व कार्यकारणभाव ओळखणे, हेच राजकारणाचे आणि परमार्थाचे यशस्वी साधन होय. तुम्ही परमार्थ करा किंवा राजकारण करा, तुम्हाला बुद्धी लागते. म्हणजे बुद्धी हे जे कार्य आहे, त्या कार्यासाठी कुठली साधने आपल्याला उपयोगी पडतील ते शोधून काढले पाहिजे.' १९५२ च्या दरम्यानची ही गोष्ट आहे. राजकारणात अजून त्यांचा विजय झाला नव्हता. १९५२ चे त्यांचं हे वाक्य फार महत्त्वाचा आहे. 'राजकारणात अजून माझा विजय झाला नाही.' हे ते जेव्हा म्हणतात ना तेव्हा ते राजकारणात कुठेतर दिसत होते, हे स्पष्ट होते. आपणाला कदाचित कल्पना असेल की, ते महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये सक्रिय होते. सत्याग्रह करून तुरुंगात गेले होते. त्याच्यानंतर ते मार्क्सवादी विचारांच्या जवळ गेले होते. तिथे परत त्यांच्यावर एम. एन. रॉय यांचा प्रभाव पडला. ते रॉयवादी विचाराचे बनले. एम. एन. रॉय यांचा 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी' हा पक्ष होता. आता झालं असं की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्राच्या, भारताच्या राजकारणात ज्या काही घडामोडी घडल्या त्या घडामोडींमध्ये काही मंडळी राजकारणात सक्रिय असली तरी काही मंडळी राजकारणापासून बाजूला गेली होती. उदा. अच्युतराव पटवर्धन, शंकरराव देव, जयप्रकाश नारायण यांनी राजकारणाचा त्याग केला. ते वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये गेले. खरंतर शंकरराव देव काय, जयप्रकाश नारायण काय किंवा इतर मंडळी काय, ही मंडळी वेगवेगळ्या क्षेत्रांत गेली. अच्युतराव पटवर्धन जे. कृष्णमूर्तींकडे गेले. जयप्रकाश नारायण विनोबांच्याकडे गेले. तसं एम. एन. रॉय यांनीसुद्धा राजकारण थांबविलं. त्यांनी आपला रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्ष बरखास्त केला. लोकशाहीचे प्रबोधन करावं, एक संघटना म्हणून काम करावं, अशाप्रकारे त्यांचं ध्येयधोरण होतं. हळूहळू तो पक्ष मोडीत निघाला. शेवटी पक्ष म्हटल्यानंतर बहुतेक लोक पक्षाकडे सत्तेसाठी येतात. प्रबोधन वगैरेसाठी पक्ष कशाला लागतो; पण तर्कतीर्थांचा राजकारणाशी संबंध होता. हे मला मुद्दाम आपल्याला याठिकाणी सांगायचे आहे. पक्ष हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. मग अशा परिस्थितीमध्ये त्यांना परमार्थामधून नक्की काय अपेक्षित आहे,

हे मला या ठिकाणी सांगता येत नाही. राजकारणाच्या बाबतीत म्हणायचं झालं, तर मी तुम्हाला सांगेन की, यशवंतराव चव्हाण साहेबांनी तर्कतीर्थांना दोन पर्याय दिले होते. एक पूर्णपणे राजकीय होता आणि दुसरा परमार्थाचा. परमार्थ म्हणजे प्रत्यक्ष देव, आत्मा, भावना नव्हे. ते सर्व विस्ताराने समजून घ्यायला आपल्याकडे तेवढा वेळ नाही. यशवंतराव चव्हाण साहेबांनी संस्था उभी करण्याचा पर्याय दिला होता. १९६० मध्ये महाराष्ट्राची स्थापना झाली. त्यावेळी यशवंतराव चव्हाणांना वेगळ्या प्रकारचा महाराष्ट्र घडवायचा होता. तो घडविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या संस्था त्यांना पाहिजे होत्या. कारण, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती भाषिक आधारावर झाली होती. भाषावार प्रांतरचना हे सूत्र १९२० पासून स्वीकारले गेले होते. भाषावार प्रांतरचना हे सूत्र अगोदर लोकमान्य टिळक व महात्मा गांधींनी स्वीकारलेलं होतं. लोकांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. पुढे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्या तत्त्वांची अंमलबजावणी करावी, असा आग्रह खूप लोकांचा होता. ब्रिटिशांनी प्रांताची रचना केली. त्यांनी त्यांच्या सोयीसाठी प्रांत रचले होते. त्यांच्या प्रशासनासाठी त्यांना कुठल्याही भाषेचा किंवा इथल्या लोकांच्या सोयींशी काही देणं-घेणं नव्हतं. त्यामुळे सहाजिकच लोकांना वाटलं की, आता भाषावार प्रांतरचना होणार आणि मराठी बोलणाऱ्या लोकांचे राज्य म्हणजे महाराष्ट्र हे निर्माण होणार.

त्या वेळेला महाराष्ट्र हे स्वतंत्र राज्य नसून तो मुंबई प्रांत होता. तो प्रांत मोठा होता. अनेक राज्यांची भाषावार प्रांतरचनेची मागणी यायला लागली होती. काँग्रेसचाही अर्थातच त्याला पाठिंबा होता. संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भात मोठी चळवळ निर्माण झाली. इथे त्याचा तपशील द्यायचं काही कारण नाही; पण सांगायचा मुद्दा या ठिकाणी असा आहे की त्या चळवळीमुळे यशवंतराव चव्हाणांकडे द्विभाषिक मुंबई राज्याचे सन १९५६ मध्ये मुख्यमंत्रिपद आलं. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र चळवळ सुरू झाली. ती चळवळ हाताळणं सोपं नव्हतं. यशवंतराव चव्हाणांनी आपल्या बुद्धीकौशल्याने व चातुर्याने ती चळवळ हाताळली. या सगळ्या गोष्टी आपल्याला माहीत आहेत; पण आता १९६० मध्ये खरोखर महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, जे राज्य मराठी भाषिक म्हणून स्थापन झाले, ते म्हणजे आजचा महाराष्ट्र होय. भाषेच्या प्रश्नामुळे हे राज्य निर्माण झाले आहे. साहजिकच, ते त्या भाषेचं राज्य झालं पाहिजे, असं यशवंतराव चव्हाणांना वाटणं स्वाभाविक होतं. एके ठिकाणी त्यांनी असं म्हटलेलं

आहे की, 'ज्यावेळी राष्ट्र, राज्याची मी कल्पना करतो, त्यावेळी माझ्या डोळ्यांसमोर कोणती कल्पना येते? ती म्हणजे मराठी माणूस सिंहासनावर बसलेला नसून, मराठी भाषा सिंहासनावर बसलेली आहे.' महाराष्ट्र हे मराठी भाषेचे राज्य झाले पाहिजे, अशी यशवंतराव चव्हाण यांची भूमिका होती. पण मराठी भाषेचे राज्य म्हणजे मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे राज्य होय. त्यासाठी मराठी भाषा बोलणाऱ्यांचा विचार आपण करायला हवा, तसेच त्यांना आधुनिक केले पाहिजे, समृद्ध केले पाहिजे, अधिक सुसंस्कृत केले पाहिजे, आधुनिक काळातल्या जगाला तोंड देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सक्षम झाले पाहिजे, त्यांची भाषा सक्षम झाली पाहिजे, अशा प्रकारची कल्पना यशवंतराव चव्हाण साहेबांची होती. मग त्यासाठी संस्था निर्माण केल्या पाहिजेत.

तर्कतीर्थांनीपण त्यांच्या भाषणात, लेखनात, मुलाखतीत सांगितले आहे की, हा जो मराठी समाज आहे, त्याला ज्ञान मिळाले पाहिजे. त्यांना विज्ञानाचा परिचय झाला पाहिजे. तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचले पाहिजे. औद्योगिक समाज निर्माण झाला पाहिजे, म्हणजे संस्कृती आणि समृद्धी या दोन्ही गोष्टी महाराष्ट्रात नांदल्या पाहिजे. अशा प्रकारचा महाराष्ट्र निर्माण झाला पाहिजे. त्यासाठी संस्था निर्माण करायच्या होत्या. त्यातील दोन संस्था महत्त्वाच्या होत्या. एक म्हणजे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि दुसरी विश्वकोश मंडळ. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ अस्तित्वात आले. आणि त्या मंडळाच्या विभाजनानंतर १९८० मध्ये महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना झाली. या संस्थांची जबाबदारी कोण पेलणार, हा महत्त्वाचा मुद्दा होता. निश्चितपणे संस्थांच्या स्थापनेच्या आधीपासून तर्कतीर्थ आणि यशवंतराव चव्हाणांचे संबंध चांगले होते. एक काळ असा होता की, ज्या काळामध्ये यशवंतराव चव्हाण एम. एन. रॉय यांच्या विचारधारेने प्रेरित झाले होते, महाराष्ट्राच्या या गटातील एक तरुण नेते म्हणून यशवंतराव ओळखले जात होते. याच प्रवाहात तर्कतीर्थसुद्धा होते. यामध्ये इतरही मंडळी होती. त्यात कर्णिक बंधू (द्वा. भ. कर्णिक आणि व. भ. कर्णिक) असतील, ह. रा. महाजनी असतील, इत्यादी. अशा खूप विद्वान मंडळींचा महाराष्ट्रातील एक समूह त्यावेळी होता.

ही सर्व बुद्धिवादी आणि मानवतावादी मंडळी होती. नंतर एम. एन. रॉय यांनी मार्क्सवादाचा त्याग करून नवमानवतावादाचा वेगळा विचार

मांडला. वरील मंडळीही या विचारांची होती. त्यांचा आणि यशवंतराव चव्हाणांचा अतिशय जवळचा संबंध होता. ते एकमेकांची पात्रता ओळखून होते. मुख्य म्हणजे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये महाराष्ट्रातील जो बुद्धिवादी वर्ग यशवंतराव चव्हाणांच्या विरोधात होता, त्यांनी महाराष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर काँग्रेससह यशवंतराव चव्हाणांचं समर्थन करायचं काम औपचारिक व अनौपचारिक पद्धतीने केले. अशा लोकांमध्ये तर्कतीर्थ यांचा समावेश होता. हे सगळ्यांना माहीत आहे. तर अशा परिस्थितीमध्ये हे काम कोण करू शकेल? एवढी विद्वत्ता कोणामध्ये आहे? तर ती अर्थात् तर्कतीर्थांमध्ये होती. हे यशवंतरावांना माहीत होतं. तर्कतीर्थ यशवंतरावांबरोबर अनेक दिवस राजकारणामध्ये सक्रिय होते. त्यामुळे त्यांची राजकीय महत्त्वाकांक्षा असेल, तर तिच्या आड आपण येता कामा नये, एवढे ओळखण्याची प्रगल्भता यशवंतरावांकडे होती. म्हणून यशवंतरावांनी त्यांना विचारणा केली की, 'तुम्हाला राज्यसभेवर पाठवू की नवीन तयार करीत असलेल्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे तुम्हाला अध्यक्षपद देऊ? यापैकी तुमची निवड सांगा.' त्यांच्याकडे दोन पर्याय होते. त्यातील एक होता सत्तेचा म्हणजेच राजकारणाचा. सत्ता ही कुठल्या ना कुठल्या प्रकारची असते. तो माणूस पुढे मंत्री होऊ शकतो. दुसरा पर्याय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा होता. हा परमार्थाचा म्हणजेच सत्याचा पर्याय होता. हा मुद्दा समजून घ्या. १९५२ मध्ये तर्कतीर्थ म्हणाले होते की, 'राजकारणात मला अजून यश मिळालेले नाही आणि परमार्थाचे क्षितीज मला अंधुकसं दिसतंय.' तर तेव्हा 'परमार्थ' शब्दाचा अर्थ काय अभिप्रेत होता, मला माहीत नाही. १९६० मध्ये राजकारणात त्यांना यश मिळत असताना त्यांनी ती संधी नाकारली. त्यांनी परमार्थाच्या क्षितिजाकडे झेप घेतली. हा मला महत्त्वाचा मुद्दा म्हणून तुमच्या लक्षात आणून द्यायचा आहे. म्हणजे मी या अर्थाने विषय प्रवेश केला आहे.

नंतर जेव्हा ते अध्यक्ष होते, तेव्हा त्यांनी महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि बौद्धिक नेतृत्व केले. मला असं वाटतं की, तो परमार्थ होता; पण त्यामध्ये तर्कतीर्थांना सत्याची सत्ता दिसते, हे लक्षात घ्या. तर्कतीर्थांचा त्या काळातला स्वतःचा एक रुबाब असायचा. सामान्यपणे लोकांची ओढ सत्ता केंद्राकडे असते. पहिल्यांदा लोक सत्तेला मानतात. सत्ता तुम्हाला क वंचित करू शकते. मात्र, सत्याला निश्चितपणे समाजामध्ये कायमस्वरूपी किंमत असते. प्रत्यक्षात जी कामं करावी लागतात, ज्यांच्यामार्फत करावी लागतात,

ते लोक अशाप्रकारे परमार्थाची निवड करतात. हा मार्ग तर्कतीर्थांनी निवडला. या ठिकाणी मला हे सांगायचे आहे. हा मार्ग निवडल्यानंतर त्यांनी ते काम इमानेइतबारे केले. म्हणजेच आता खरं तर मंडळाच्या कामाबद्दल मी तुम्हाला काही वेगळे सांगायला पाहिजे अशातला भाग नाही. सगळ्या महाराष्ट्राला हे माहीत आहे की, साहित्य संस्कृती मंडळाने चांगले प्रकल्प हाती घेतले आहेत. प्रकल्पांचा आणि प्रकाशनाचा विचार केला, तर त्याच्यामध्ये खूप चांगले चांगले ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. वेगवेगळ्या विषयांवरती अत्याधुनिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. पुस्तकांचे अनुवाद झाले आहेत. महाराष्ट्र संस्कृती मंडळाने कितीतरी काम केले आहे. मी असं म्हणणार नाही की, ज्या उद्देशाने यशवंतराव चव्हाणांनी हे मंडळ स्थापन केले, त्यातली सगळी उद्दिष्टे त्यांना अपेक्षित होती ती साध्य झाली. हे काम इतकं सोपं नसतं. ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. त्यापाठीमागची अनेक कारणे असू शकतात. त्याची चर्चा करायचं हे व्यासपीठ नाही; पण सांगायचा मुद्दा असा की, यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्यावर जो विश्वास टाकला होता, तो तर्कतीर्थांनी सार्थ ठरविला, असं आपण निश्चितपणे म्हणू शकतो.

**सामाजिक सुधारणांचे प्रवाह**

आता पुढच्या मुद्द्याकडे येतो. तर्कतीर्थांची स्वतःची म्हणून एक जडणघडण झाली होती. ती या मंडळाच्या अध्यक्षपदापर्यंत येते. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये त्यांचे योगदान मोलाचे आहे. ही गोष्ट आपल्याला इथे पहावयाची आहे. त्याआधी मला त्यांच्या स्वतःच्या जडणघडणीबाबत चार गोष्टी सांगायच्या आहेत. मी असं तुम्हाला म्हणालो की, वाईमध्ये प्राज्ञपाठशाळा होती. नारायणशास्त्री मराठे हे स्वामी प्रज्ञानंद सरस्वती यांचे शिष्य होते. त्यांना परंपरा नावाच्या गोष्टींमध्ये स्वारस्य होते. आपणाला एका गोष्टीची कल्पना आहे की, कर्म याचा अर्थ वैदिक परंपरेमध्ये जो समाजाची धारणा करतो, तो धारक नाही. म्हणजेच धर्म हे एक साधन आहे. एकप्रकारे समाजाची धारणा धर्माच्या माध्यमातून होत नसेल, तर आपणाला त्या धर्मात परिवर्तन केले पाहिजे, इतका हा सरळ मुद्दा आहे. जो समाजाची धारणा करतो तो धर्म होय. एका विशिष्ट काळामध्ये त्या समाजाकडून धर्माची धारणा होत नसेल, तर त्या धर्माच्या स्वरूपात आपल्याला काहीतरी फेरफार करावे लागतात. काळानुरूप अशी फेरफार करण्याची प्रक्रिया भारतामध्ये झाली होती. कारणे काही का असेनात.

परकीय आक्रमणांना दोष देत ती पुढे आली. आपण हा विषय इथेच सोडून देऊ; पण हे नक्की आहे की, आपणाला सरळसरळ म्हणता येईल की, त्यावेळी काहीतरी गडबड झाली होती, हे खरे. त्या काळामध्ये आपल्याकडे ब्रिटिशांचे राज्य आले, पाश्चात्यांचे राज्य आले. पाश्चात्यांचे राज्य आल्यानंतर त्यांनी या देशामध्ये वेगळी संस्कृती आणली. वेगळ्या प्रकारचे ज्ञान, राज्यपद्धती, संस्था आणल्या. आता यापुढे आपण कसा टिकाव धरायचा? आपला टिकाव धरण्याचे साधन म्हणजे धर्म आहे. आपल्याला धर्माच्या पातळीवर काहीतरी करायला पाहिजे, असं काही लोकांना वाटायला लागलं. आपणाला कल्पना आहे की, १९ व्या शतकामध्ये धर्मसुधारणेच्या चळवळी झाल्या. त्या सगळ्या धार्मिक चळवळी होत्या. परमहंस सभा, प्रार्थना समाज, ज्योतिराव फुले यांचा सत्यशोधक समाज, ह्या सर्व सामाजिक आणि धार्मिक सुधारणेच्या चळवळी  होत्या. त्यांना हे जाणवलं होतं की, आपल्या धर्मात काहीतरी बदल केला पाहिजे. धर्मावर ज्यांचं वर्चस्व आहे, ते यासाठी तयार नसतील, तर आपण वेगळा मार्ग स्वीकारला पाहिजे, या विचाराने त्यांनी वेगळा मार्ग निवडला. तोच हा धर्मसुधारणेचा मार्ग आणि मुद्दा होता.

स्वामी केवलानंद सरस्वती हे परंपरेने धर्माचे आणि वेदशास्त्राचे अभ्यासक होते, तसेच ते संस्कृतचे गाढे पंडित होते. आपण धर्मात काहीतरी बदल करायला पाहिजे, परिवर्तन करायला पाहिजे, ही त्यांची मुख्य प्रेरणा होती. म्हणून त्या धर्माच्या अंतर्गत पुरोगामी अशा तरुण मंडळींचा एक गट उदयास आला. राष्ट्रवादी स्वातंत्र्य चळवळीशी संबंध असलेल्या मंडळींची प्राज्ञपाठशाळा ही एक प्रेरणा होती. प्राज्ञपाठशाळेमध्ये सकाळी सावरकरांचं गीत म्हटलं जायचं. तो हिंदू धर्माच्या अंतर्गत सुधारणा करण्याचा मार्ग होता. परंतु, तो सुधारणेचा मार्ग त्या काळातल्या सनातनी मंडळींना मान्य नव्हता. हा एक मुद्दा आपण समजून घेतला पाहिजे. म्हणजे त्या मंडळींचे प्रतिनिधित्व करणारे अनेक लोक होते. खरंतर तर तर्कतीर्थांनी या गोष्टीकडे वारंवार लक्ष वेधले आहे. उदा. वामन आबाजी मोडक हे प्रार्थना समाजाचे होते. त्यांच्या धर्मपर व्याख्यानांचे पुस्तक प्रकाशित झाले. त्याला तर्कतीर्थांची प्रस्तावना आहे. त्या प्रस्तावनेत त्यांनी स्वच्छपणे सांगितले आहे की, 'चिपळूणकरांनी या मंडळीचे समर्थन केले. त्यांची पाठराखण केली, त्यामुळे या मंडळींचं बळ वाढलं.'  असे काही परंपरेतले लोक होते. काही आधुनिक अभ्यासक असूनसुद्धा ते परंपरेची पाठराखण

करायचे आणि परंपरेतील एकाही गोष्टीमध्ये बदल होता कामा नये असे म्हणायचे. यात ऐहिताग्नी शंकरराव राजवाडे आणि गो. म. जोशी होते. अशा लोकांचा एक वर्ग होताच, जो परंपरेने अभ्यासक होता. शिवाय ज्यांना आधुनिकतेचा स्पर्श झालेला नव्हता. तरीही ते आधुनिक ज्ञान-विज्ञानाचा पुरस्कार करायचा नाही. आपलं सनातन आहे ते सांगायचं, असं ते म्हणत होते.

दुसरा एक वर्ग स्वामी केवलानंद सरस्वती यांनी काढलेल्या प्राज्ञपाठशाळेच्या पंडितांचा होता. त्यांना अशा प्रकारचे परिवर्तन मान्य होते. म्हणूनच पुढच्या काळामध्ये या संस्थेमधून 'तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषद' नावाची गोष्ट निष्पन्न झाली. धर्मामध्ये कशाप्रकारे धर्मपरिवर्तन करू शकतो, याचाही संस्था विचार करीत असे. संस्थात्मक पातळीवर खरंतर हे काम शंकराचार्यांचं होतं. लक्षात घ्या, वाईला जो प्रयत्न प्राज्ञपाठशाळेच्या धर्मनिर्णय मंडळाने घेतला, तो वैयक्तिक पातळीवर करण्यासाठी एक गादी होती, पीठ होतं. ती शंकराचार्यांची गादी अथवा पीठ होतं; पण शंकराचार्य या भानगडीत कधी पडत नव्हते. अशा परिस्थितीमध्ये संस्थात्मक स्वरूप देऊन काही करता येईल का, म्हणून त्या मंडळींनी प्रयत्न केले. तुम्हाला सांगतो, या मंडळींचा सगळ्यात परमोच्च आविष्कार जर कुठला असेल, तर तो म्हणजे नागपूरचे डॉ. के. ल. तथा भाऊजी दप्तरी. त्यांनी जे वेगळ्या पद्धतीने काम केले, ते मोलाचे आहे. असेच डॉ. पां. वा. काणे होते. त्यांनी 'धर्मशास्त्राचा इतिहास' पाच खंडांमध्ये लिहिला. तो त्यांनी धर्मपरिवर्तनशील हे तत्त्व गृहीत धरून लिहिला होता. डॉ. दप्तरी यांचे समग्र वाङ्मय संपादित करून प्रकाशित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने त्या वेळी हाती घेऊन तडीस नेला होता. तर सनातन आणि परिवर्तनवादी यांच्यामध्ये त्या काळी धर्मविषयक दृष्टिकोनाचा संघर्ष होता. या संघर्षाचे केंद्र त्या काळी वाई हे होते. सनातन दृष्टीने धर्माचे समर्थन करणारे भाऊशास्त्री लेले वाईत होते आणि परिवर्तनवादी दृष्टीने धर्मसुधारणांचे समर्थन करणारे स्वामी केवलानंद सरस्वतीही वाईतच होते. काशिनाथ वामन ऊर्फ भाऊशास्त्री लेले हे स्वतःस लोकमान्य टिळकांचे अनुयायी म्हणवून घेत असत. त्यांनी 'मोदवृत्त' हे संस्कृत साप्ताहिक चालविले होते. ते सनातन धर्मसमर्थक होते. त्यांनी शाहू महाराजांच्या वेदोक्त प्रकरणास सनातनी भूमिकेतून विरोध केला होता. हा झाला जुना इतिहास.

मी त्या तपशिलात जात नाही. सनातन्यांच्या विरोधात उभे राहणे ही त्या काळी सोपी गोष्ट नव्हती. आज आपण वाईस दक्षिण काशीचा मान देतो. पूर्वी तो पैठणला होता. पुढे पैठणला निजामशाही आली, त्यामुळे पैठणचे काशीपण संपुष्टात आले. त्यामुळे वाईचे महत्त्व वाढले आणि ती दक्षिण काशी गणली गेली. त्याचा दुसरा अर्थ असा की, तिथे सनातनी पंडित होते आणि सुधारक पंडितही होते. सुधारक धर्मपंडित म्हणून स्वामी केवलानंद सरस्वती यांनी सनातन धर्मास विरोध केला.

ज्या माध्यमातून त्यांनी विरोध केला आणि पुढे त्याच धर्माच्या अंतर्गत म्हणजे परंपरेच्या चौकटीत न राहता पाश्चात्त्य विद्याग्रहण करून तो अधिक कसा चांगला करता येईल, हे पुढच्या लोकांनी पाहिलं. मग त्यांच्यामध्ये डॉ. भाऊजी ऊर्फ के. ल. दप्तरी असतील, तर्कतीर्थ असतील. तेथे सत्यशोधक चळवळ उभी राहिली; पण हे इतिहाससंबंधित आहे. तर अशाप्रकारे तर्कतीर्थ घडले आहेत. इथेच परत महत्त्वाचा मुद्दा आहे की, येथे तयार झालेला हा एक विद्यार्थी पुढे महात्मा गांधींचा उत्तराधिकारी म्हणून कार्य करीत राहतो. आपण ही गोष्ट कमी महत्त्वाची मानू नये. इथे विनोबांचं फार मोठं कार्य आहे. ते काही शास्त्राचे पंडित नव्हते. तर्कतीर्थांना विनोबांचा सहवास लाभला. तर्कतीर्थांसंबंधीची मी एक आठवण तुम्हाला सांगतो. 'आम्ही एकदा राज्यशास्त्रावरील परिषदेत बोलत होतो. त्यात राज्यशास्त्रातील संस्थांवर चर्चा सुरू होती. तीत राज्यासाठी दंडाची किती आवश्यकता आहे, हिंसेची किती आवश्यकता आहे, या विषयांचा समावेश होता. त्या वेळी तर्कतीर्थांनी महाभारतातील दाखला देऊन स्पष्ट केले होते की, हे 'विष्णूपर्वा'सह 'शांतीपर्वा'मध्येही सांगितले गेले आहे. विनोबांच्या ग्रामस्वराज्य कल्पनेतील अहिंसेच्या आधारावर कशाप्रकारे राज्य चालवावं, कुठल्या संस्था निर्माण कराव्या लागतील, अशाप्रकारचं प्रतिपादन तर्कतीर्थांनी चर्चेत केलं आणि सगळ्यांना त्या वेळी ते पटलं होतं. असे ते विनोबा या प्राज्ञपाठशाळेतूनच पुढे आले होते. त्यातून तुम्हाला प्राज्ञपाठशाळेचे महत्त्व लक्षात येईल. पुढे याच वाईमधून पुढचं कार्य वेगळ्या पद्धतीनं तर्कतीर्थांनी चालू ठेवलं. हा तो सगळा इतिहास आहे; पण महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, याच्यातून तर्कतीर्थ तयार झाले आणि मग ते गांधीजींच्या मार्गाकडे ओढले गेले. नंतर ते मार्क्सवादकडे वळले. त्या काळात त्यांचे लिखाण चालू होतं. खूप मोठ्या प्रमाणावर त्यांनी लिखाण केलं, म्हणजे

विश्वकोशातील संपादन वगैरे या गोष्टी वेगळ्या आहेत. परंतु, वैदिक संस्कृतीचा विकास त्यांनी लिहिला आहे, हे महत्त्वाचे आहे.

**महाराष्ट्राची सेवा**

तर्कतीर्थांनी 'हिंदुधर्माची समीक्षा' हा ग्रंथ लिहिला होता. त्यावर मार्क्सवादाचा म्हणजे भौतिकवादाचा जास्त प्रभाव होता. पुढे 'वैदिक संस्कृतीचा विकास' लिहिताना हा प्रभाव कमी झाला. भौतिक किंवा परिस्थितीचा प्रभाव असतो, तसा तो त्यावर वैचारिक घटकांचाही प्रभाव असतो. त्याला तुम्ही दुर्लक्ष करू शकत नाही. अशाप्रकारे तर्कतीर्थांची भूमिका या ठिकाणी आली. सांगायचा मुद्दा असा की, पाश्चात्य परंपरा आणि भारतीय परंपरा ह्या सगळ्यांचे समतोल ज्ञान त्यांच्याकडे होते. १९५४ मध्ये दिल्लीमध्ये त्यांनी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण केले. त्यांनी जे भाषण केले, त्याच्यात त्यांचे पूर्णपणे म्हणणे दिसून येते. संस्कृतीचे महत्त्व काय आहे, हा त्यांच्या विचारांचा मुख्य मुद्दा आहे. आपण आता कुठल्या टप्प्यावर आहोत, आपली विशेषतः महाराष्ट्राची संस्कृती कशी पुढे गेली, म्हणजे या संस्कृतीमध्ये दक्षिण व उत्तर यांचा समन्वय कसा आहे, हे त्यांनी सांगितलं. त्यांचा संत साहित्याचा उत्तम अभ्यास होता, तसाच तो संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज यांचाही होता. आधुनिक काळामध्ये विशेष करून महाराष्ट्रामध्ये झालेल्या परिवर्तनाचा त्यांनी जो इतिहास सांगितला आहे, त्यात महाराष्ट्रामध्ये विकासाची काही वैचारिक सूत्रे दिसून येतात.

तिर्कतीर्थांना महात्मा फुले यांच्या कार्याची महती पटली होती. महात्मा फुले यांनी वैचारिक बेड्या तोडल्या होत्या. त्याचा प्रभाव प्राज्ञ पाठशाळेतील विचार व कार्यपद्धतीवर होता. प्राज्ञपाठशाळेत पारंपरिक शास्त्रांचे जे अध्ययन चाले, त्यातून बाहेर पडून फुले विचार, प्रार्थना समाज विचार अशा अंगाने चिंतन करू लागले. यासंदर्भातील 'ज्योती निबंध' हे त्यांचे फार महत्त्वाचे योगदान आहे. या निबंधामध्ये त्यांनी महात्मा फुले यांच्या कार्याकडे महाराष्ट्राचे लक्ष वेधले; पण त्याच्यापेक्षा त्यांनी त्या काळी 'बहुजन समाजाचा इतिहास' लिहिण्याचा संकल्प सोडला होता. तो मागे पडला, ही गोष्ट वेगळी. हा प्रकल्प का मागे पडला, तो अजून चर्चेचा वेगळा विषय आहे. त्याकडे जायचं आपल्याला काही कारण नाही. प्रतिगामी पंडित म्हटल्यानंतर एक प्रमाण काय असतं की, साधारणपणे तो त्याची परंपरा सोडायला तयार नसतो. परंतु, इथे मात्र आपल्याला तर्कतीर्थांमध्ये

पुरोगामी पंडित मिळतो. यासंदर्भातील काही उदाहरणे दिसतात. एक, ते महात्मा गांधींच्या मुलांचे आंतरजातीय लग्न करायला पुढे येतात. तिथे एकत्रित पौरोहित्य करतात. दोन, गांधीजी येरवडा तुरुंगात असताना अस्पृश्यता निर्मूलनासंदर्भातील धर्मसमर्थनाचे मुद्दे शोधून काढायचे काम करीत असताना ते गांधीजींना मदत करतात. तीन, सोमनाथाच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची कल्पना पुढे येते. तिथेही परंपरेची बेडी तोडून परिवर्तन आत्मसात करायचं म्हणून तिथे तर्कतीर्थ मंदिराच्या कलशारोहण व प्राणप्रतिष्ठेचे पौरोहित्य करतात. साहजिकच अशा चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाच्या हातून महाराष्ट्राचे वैचारिक विश्व उभारण्याचे काम व्हावे, असे यशवंतराव चव्हाणांना वाटत असावे. मला असे वाटते की, यशवंतराव चव्हाण तेवढे संवेदनशील नक्कीच होते. यासंदर्भात कोणाचे दुमत व्हायचे काहीच कारण नाही. अशाप्रकारे तर्कतीर्थांवर जी जबाबदारी सोपविण्यात आली, ती त्यांनी पार पाडली. मी असं म्हणेन की, त्यांनी राजकारणाचा त्याग केला आणि परमार्थाचा अंगीकार केला. त्याच पद्धतीने त्यांनी महाराष्ट्राची सेवा केली. याबद्दल महाराष्ट्र तर्कतीर्थांचा सदैव ऋणी राहील.

■

*(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ऑनलाईन व्याख्यानमालेतील भाषण, मंगळवार दि. २७ जानेवारी, २०२२.)*

३

# प्रज्ञातीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

भारताचे माजी उपपंतप्रधान आणि पुरोगामी महाराष्ट्राचे एक शिल्पकार यशवंतराव चव्हाण ज्यांना आपले राजकीय गुरू मानत, अशा प्रकांड विद्वान असलेल्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या चौफेर कर्तृत्वाचे विस्मरण विद्यमान महाराष्ट्राला झालेले दिसते. त्यांच्या बहुविध कार्याचा हा विविधांगी परिचय -

**बहुआयामी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

संस्कृत पंडित, वेदांग अभ्यासक, धर्मसुधारक, स्वातंत्र्य सैनिक, मार्क्सवादी, अस्पृश्यता निवारण कार्यातील महात्मा गांधींचे सल्लागार, हरिजनांच्या मंदिर प्रवेशाचे सक्रिय समर्थक, काँग्रेस कार्यकर्ते, गांधीवादी, रॉयवादी, भारतीय घटनेचे संस्कृत भाषांतरकार, स्वतंत्र महाराष्ट्राच्या ज्ञानव्यवस्थेचे जनक, साहित्य आणि संस्कृतीचे आधुनिकीकरण करणारे कृतीशील उपासक, मराठी विश्वकोश, धर्मकोश, मीमांसाकोश, संस्कृत हस्तलिखितांच्या सूचींचे संपादक, विविध नियतकालिके नि दैनिकांचे संपादक, वक्ते, साहित्यकार, समीक्षक, प्रस्तावनाकार असं बहुआयामी, बहुपेडी व्यक्तिमत्त्व! या प्रज्ञेने छाती दडपून जाते.

मी त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा लक्षात येतं, तर्कतीर्थांचा प्रवास हा सतत शब्दप्रामाण्याकडून बुद्धिप्रामाण्याकडे, सनातनी पांडित्याकडून धर्मसुधारकाकडे, गांधीवादाकडून रॉयवाद, काँग्रेसी समाजवादाकडे, ज्ञान तपस्वीकडून ज्ञान व्यवस्थापकाकडे, वक्त्याकडून प्रबोधकाकडे, कार्यकर्त्यांकडून संघटक, नेत्याकडे, भाषांतरकाराकडून भाष्यकाराकडे,

साहित्यकाराकडून संपादक कोशकाराकडे असा सतत कायाकल्पाचा, मतांतराचा, कल्पांतराचा होत राहिला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं हे वाहतंपण त्यांच्या निरंतर वैचारिक विकासाचं लक्षण म्हणून पाहता येतं. ते शब्दाप्रमाणं वेद, उपनिषद, पुराणाचे अभ्यासक. त्यांना मार्क्स, महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय यांचं आकर्षण का वाटावं? वैदिक संस्कृती, हिंदू धर्म, शीख पंथ, सर्वधर्मसमीक्षा करणारा हा पंडित नवमानवतावादी का व्हावा? राजकारण, समाज, संस्कृती साहित्य व्यवहारात सक्रिय असणाऱ्या या कार्यकर्त्याने प्रबोधक, चिंतक, मीमांसक, समीक्षकाच्या भूमिका का वठवाव्यात? तर तर्कतीर्थांच्याच शब्दात सांगायचं तर, 'मी सतत वाहात आलो. पाय टेकायला कुठे जागाच सापडली नाही.' याचा दुसरा अर्थ असा, स्थैर्य वर्ज्य असणारे असे ते स्थितप्रज्ञ होते की त्यांना नित्य वर्तमानापेक्षा उत्कट भविष्य जगण्याचा ध्यास होता. 'उत्कट भव्य तेंचि घ्यावे। मळमळीत अवघेचिं टाकावे।' अशा ध्यासपर्वाच्या मागे धावणारा हा योगी 'कायदा पाळा गतीचा। थांबला तो संपला' असं गुणगुणत नित्य नव्याचा शोध घेत राहिला.

**संस्कृत पंडित म्हणून घडण**

धुळे शहराच्या पश्चिमेस ४६ मैल अंतरावर एक छोटं गाव आहे पिंपळनेर. तिथे बाळाजी कृष्ण जोशी जोशीपणाच्या व्यवसायावर म्हणजे पौरोहित्य, भविष्य, कुंडली इ. द्वारे आपली जीविका चालवत. पत्नीचे नाव चंद्रभागा. या दाम्पत्यास दहा अपत्ये झाली. पैकी तीन जगली. मोठा वेणी माधव. तो पुढे आयुर्वेदाचार्य झाला. त्याच्यापूर्वी झालेले त्रिवेणी व श्रीराम. श्रीराम ११ व्या वर्षी निवर्तला. त्रिवेणी विधवा होऊन माहेरी परतलेली. तिला कावेरी नावाची कन्या होती. ती आजोळीच वाढली. बाळाजीपंतांना झालेलं शेंडेफळ लक्ष्मण. तो दीड वर्षांचा असतानाच आई निवर्तल्याने कावेरीनेच त्याचा सांभाळ केला. तो आपल्या या नात्याने भाची असलेल्या कावेरीला आईच म्हणायचा. लक्ष्मणाला ती आबा म्हणायची. तेच त्यांचं घरातलं नाव होऊन गेलं. ते इतकं की लक्ष्मणाची मुलं, मुली, सगेसोयरे, पत्नी सती पण आबाच संबोधी.

पिंपळनेरला तशी सातवीपर्यंतची शाळा होती. पण बाळाजीपंतांनी शेंडेफळ लक्ष्मणाला संस्कृत पंडित बनवायचं ठरवून दुसरीपर्यंतचं शिक्षण झाल्यावर वयाच्या चौदाव्या वर्षी वाईच्या प्राज्ञपाठशाळेची कीर्ती ऐकून तिथे वेदाभ्यासासाठी पाठवायचं ठरवलं. दरम्यान वडिलांनी लक्ष्मणास याज्ञिकी शिक्षण दिलं होतं. २ फेब्रुवारी १९१४ ला लक्ष्मण वडिलांसह बैलगाडीने प्रवास करत वाईला दाखल झाला. नारायणशास्त्री मराठे जे पुढे

स्वामी केवलानंद सरस्वती झाले, ते लक्ष्मणाचे गुरू झाले. इथे एक वर्ष माधुकरी मागून लक्ष्मण शिकला. पुढे त्याला १४ रुपये शिष्यवृत्ती मिळाली. वाई येथील चार वर्षांच्या अभ्यासात रूपावली, समासचक्र, हितोपदेश, रघुवंश, किरातार्जुनीय, शिशुपालवध वाचन आणि अभ्यासाने लक्ष्मणाला संस्कृत साहित्याची गोडी लागली. ऋचा, मंत्र, व्युत्पत्ती शिकला. तर्कसंग्रह दीपिका, सिद्धान्त मुक्तावली, अष्टाध्यायी शिकला. तर्कशास्त्र, न्याय वेदान्तात त्याची गती होती. पुढे ते नवन्यायाकडे वळले. सन १९१७ ला विनोबा भावे प्राज्ञपाठशाळेत शांकरभाष्य, अभ्यासासाठी आले. त्यांच्याबरोबर ब्रह्मसूत्र, शांकरभाष्य उपनिषदे, गीताभाष्य शिकत ते लक्ष्मणशास्त्री जोशी झाले नि प्राज्ञपाठशाळेत शिकवू लागले. सन १९१८ ला ते न्यायशास्त्र शिकण्यासाठी काशीला गेले. सन १९२२-२३ ला कलकत्ता येथील शासकीय संस्कृत महाविद्यालयाची 'तर्कतीर्थ' पदवी धारण करून वाईला परतले आणि प्राज्ञपाठशाळेत पूर्ववत अध्यापन करू लागले.

**स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व**

कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयातील संस्कृत आणि इंग्रजीचे प्राध्यापक विष्णू गोविंद विजापुरे यांनी नोकरीचा राजीनामा (१९०५) देऊन सन १९०६ मध्ये 'राष्ट्रहिताच्या सर्व उद्योगाचा पाया राष्ट्रीय शिक्षणावर आहे,' या धोरणाने समर्थ विद्यालय सुरू केलं होतं. पण सरकारी जाचामुळे त्यांना ते मिरज, तळेगाव येथे स्थलांतरित करावं लागलं होतं. त्यावरही सन १९१० ला ब्रिटिश सरकारने बंदी आणल्यामुळे तेथील विद्यार्थी आणि शिक्षक वाईच्या प्राज्ञपाठशाळेत सामील झाले होते. ते सर्व राष्ट्रीय चळवळीने भारलेले क्रांतिकारी होते. त्यांच्या विचार, आचाराचा प्रभाव आणि नारायणशास्त्री मराठे यांचा स्वातंत्र्य पुरस्कार यामुळे इथे लोकमान्य टिळक, महात्मा गांधी येऊन गेलेले. लोकमान्य टिळकांचा तर्कतीर्थावरील प्रभाव बालपणापासूनचाच.

तर्कतीर्थ झाल्यानंतर प्राज्ञपाठशाळेच्या धर्मसुधारणा मोहिमेंतर्गत नारायणशास्त्री मराठे यांच्याबरोबर ते अनेक धर्मसभा, परिषदा, संमेलनांमधून धर्मसुधारणा, शुद्धी, धर्मांतर इ. वर आपले विचार व्यक्त करत सनातनींविरुद्ध खंडन-मंडन, वादविवाद करत राहात. पण इथल्या शब्दप्रामाण्याचा 'बाबा वाक्यं प्रमाणं'चा वीट येऊन तर्कतीर्थांनी धर्मकार्यापेक्षा राष्ट्रकार्य श्रेष्ठ समजून स्वातंत्र्य चळवळीत स्वतःला गुंतवून घेतलं.

सन १९३० च्या कायदेभंग चळवळीत आपल्या अमोघ वक्तृत्वाची मोहिनी तर्कतीर्थांनी सातारा जिल्ह्यावर घातली. शास्त्राचे रूपांतर शस्त्रात

केल्याशिवाय तरणोपाय नाही, म्हणत ते महाराष्ट्रभर व्याख्यान देत, संघटन कार्य करू लागले. नामांतर, वेषांतर, मतांतर करत ते ब्रिटिश पोलिसांना चकवा देत राहिले. ते कायदेभंगाच्या वॉर कौन्सिलचे सदस्य झाले. ब्रिटिश इंटेलिजन्सच्या रिपोर्टात त्यांच्या चळवळीच्या, व्याख्यानांच्या, खटल्या, शिक्षांच्या नोंदी आढळतात. अहमदनगर जिल्हा शिबिर, बागलाण जंगल सत्याग्रह, कराड व्याख्यानांद्वारे असंतोष पसरविण्याचा वहीम, गाव कामगार पाटलांचे शेकडो राजीनामे, हजारो आदिवासींचे संघटन, निदर्शकांवर पोलीस गोळीबार ही तर्कतीर्थांच्या संगठण कार्याची सूची सांगता येते. त्या काळात ब्रिटिशांच्या नोंदीत तर्कतीर्थ हे 'अनंतस्वामी' नाव धारण करून भूमिगत कार्य करत असल्याची नोंद आढळते. त्यांना सन १९२०, १९३० व १९३२ ला अनुक्रमे सहा सहा आणि दहा महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा व ५० रु. दंड करून त्यांची रवानगी येरवडा व धुळे तुरुंगात करण्यात आली होती असे विविध संदर्भांवरून लक्षात येते.

**अस्पृश्यतानिवारण कार्यातील योगदान**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९३२ ला दुसऱ्यांदा धुळ्याच्या तुरुंगात होते, तेव्हा त्यांच्यासोबत होते जमनालाल बजाज, गुलजारीलाल नंदा, आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी, पुरुषोत्तमदास त्रिकम, माधवजी सेठ इ. याच काळात आचार्य विनोबांनी तुरुंगात दिलेली गीतेवरील प्रवचने साने गुरुजींनी लिहून काढली होती. गीता प्रवचने हे विनोबांचं पुस्तक त्यातून जन्मलं. या काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी कलकत्त्याच्या माधव सेठ यांना उपनिषद शिकवीत असत. माधवजी सेठ ते हिंदीत लिहून काढत. त्यात तर्कतीर्थ प्राचीन ग्रंथातील धर्म आधुनिक दृष्टीने कसा वाचला पाहिजे ते समजावत. त्यातील अस्पृश्यतानिवारणासंबंधी झालेली चर्चा जमनालाल बजाज यांच्या वाचनात आली. ते त्या विवेचनांनी प्रभावित झाले. तुरुंगातून निरोप घेताना मी हे महात्मा गांधींच्या लक्षात आणून देतो, असं आश्वासन त्यांनी दिलं होतं. त्यानुसार त्यांनी हा नवा विचार आणि दृष्टिकोन महात्मा गांधींच्या लक्षात आणून दिला.

महात्मा गांधी तेव्हा येरवडा (पुणे) तुरुंगात होते. त्यांनी लक्ष्मणशास्त्री जोशी यांना निरोप पाठवून बोलावून घेतलं. १३ डिसेंबर १९३२ ते ३१ डिसेंबर १९३२ या काळात महात्मा गांधींशी झालेल्या त्यांच्या भेटी, चर्चांची नोंद 'दि कलेक्टिव्ह वर्क्स ऑफ महात्मा गांधी' (खंड २८, पृ. ३२६ ते ३३०) मध्ये आढळते. या काळात महात्मा गांधींनी भारतभरच्या

सनातनी आणि पुरोगामी धर्मपंडित, अभ्यासकांशी चर्चा करून हरिजन पत्राच्या पहिल्याच अंकात (११ फेब्रुवारी १९३३, पृ. ६) सात शास्त्री, पंडितांच्या स्वाक्षरीचं पत्रक प्रसिद्ध केलेलं आढळतं. ते तर्कतीर्थांनी तयार केलेलं होतं. त्यावर त्यांची स्वाक्षरीही आहे. यातून महात्मा गांधींचं लेखन सिद्ध झालं. अनेक निवेदनं (स्टेटमेंटस्) तयार झालेली दिसतात. पुढे महात्मा गांधींचे चिरंजीव देवदास नि राजाजींची कन्या लक्ष्मी यांचा आंतरजातीय विवाह झाला. त्याचं पौरोहित्य तर्कतीर्थांनीच केलं होतं. त्यावेळी महात्मा गांधींनी केलेल्या भाषणात तर्कतीर्थांचा गौरव "a man of great learning and spotless character' अशा शब्दात केला होता. त्यानंतर महात्मा गांधींनी केवळ आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांना उपस्थित राहण्याचं व्रत घेतलं आणि आयुष्यभर पाळलं.

महात्मा गांधींच्या अस्पृश्यतानिवारण कार्याचा एक भाग म्हणून हरिजनांच्या मंदिर प्रवेश चळवळीकडे पाहिलं जातं. साने गुरुजींनी प्रचार, प्रसार, प्रबोधनाने महाराष्ट्रातील अनेक मंदिरं त्या वेळी हरिजनांना खुली केली. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून साने गुरुजींनी केलेल्या आमरण उपोषणामुळे ते १० ऑक्टोबर १९४७ रोजी हरिजनांना खुलं झालं. तसेच गुजरातमध्येही नंतर ते घडलं. जुनागढ संस्थान विलीनीकरणाच्या वेळी सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानातील प्राचीन सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराची घोषणा केली. या मंदिराच्या पुनर्निर्माणाची योजना घेऊन सरदार पटेल महात्मा गांधींकडे गेले, तेव्हा गांधींनी त्यांना हे कार्य लोकसहभाग आणि लोकवर्गणीतून करून मंदिर सर्वांसाठी खुलं (हरिजनांसह) करण्याविषयी सुचवलं. योजनेप्रमाणे सदर मंदिर सन १९५१ मध्ये बांधून तयार झालं. मंदिराचा प्राणप्रतिष्ठा समारंभ ठरत असल्याच्या काळात हे मंदिर हरिजनांना खुलं होणार म्हणून ब्रह्मवृंदांनी त्यावर बहिष्कार टाकला. तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना ही समस्या कळली तेव्हा त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींशी संपर्क साधून प्राणप्रतिष्ठा उत्सवाचं पौरोहित्य करण्याची विनंती केली. ती मान्य करून तर्कतीर्थ नि स्वामी केवलानंद सरस्वती यांनी त्याचं पौरोहित्य स्वीकारलं, ते केवळ सदरचे मंदिर हरिजनांना खुलं होणार म्हणून. इकडे वाईतल्या ब्रह्मवृंदांनी तर्कतीर्थांना बहिष्कृत घोषित केलं. आपल्या पुरोगामी विचार, व्यवहार आणि कृतीपोटी तर्कतीर्थांवर अनेकदा बहिष्कार, अवमान सहन करण्याचे प्रसंग उद्भवले. पण तर्कतीर्थ आपल्या प्रागतिक विचारापासून तसूभरही

ढळले नाहीत. तर्कतीर्थांचं हे मोठेपण ऐतिहासिक खरं, पण इतिहास, साहित्य, समीक्षा, मीमांसा इ. क्षेत्रातील विद्वानांनी तर्कतीर्थांच्या या कार्य आणि कृतीकडे कानाडोळा केल्याचं लक्षात येतं. आज सात दशकांनंतर या देशात परत जात, धर्माची कट्टरता दृढमूल होत असतानाच्या काळात तर्कतीर्थांची कृती ही काळापुढे असणारी होती, हे लक्षात येतं. हा माणूस सनातनी धर्मपंडित राहिला नाही, कारण त्याने इतिहास, पुराण, धर्म, जातिभेद इ. ना. नव्या काळात, संदर्भात वाचून, नवा अर्थ प्रदान केला म्हणून.

**रॉयवादी तर्कतीर्थ**

मानवेंद्र रॉय यांनी १९३९ मध्ये काँग्रेस पक्षाशी मतभेद होऊन रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीची स्थापना केली. तत्पूर्वी त्यांचे कम्युनिस्ट आंतरराष्ट्रीय पक्षाशी मतभेद होऊन ते १९३० ला भारतात परतले होते. चीन, जपान, रशिया, अमेरिका, जर्मनी, इंडोनेशिया, फिलिपाईन्स इ. देशातील क्रांतिकार्याचा त्यांना अनुभव होता. मुळात ते विदेशात गेले होते ते भारतात क्रांती करण्यासाठी जनमत आणि रसद मिळवण्यासाठी. फैजपूर येथे भरलेल्या काँग्रेसच्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनातील मानवेंद्र रॉय यांच्या भाषणाने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना आकर्षित केलं. सन १९३०-३२ च्या तुरुंगवास काळात त्यांनी केलेला मार्क्सवादाचा अभ्यास त्याची खरी पार्श्वभूमी होती.

गांधीवाद, काँग्रेस सोडून रॉय यांच्या पक्षात येणं ही काही एका रात्रीत घडलेली घटना नव्हती. स्वातंत्र्य चळवळ, क्रांतिकाऱ्यांचा सहवास आणि मुळात पुरोगामी विचाराकडे असलेली ओढ नि आकर्षण यामुळे ते रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते झाले. पुढे या पक्षाचे महाराष्ट्राचे सरचिटणीस झाले. हा पक्ष रुजावा म्हणून त्यांनी महाराष्ट्रभर व्याख्यान दौरे, जनता समित्यांची स्थापना, मोर्चे, परिषदा, शिबिरे इ. सर्व प्रकारचं संघटनकार्य करून मोठा विरोध, उपेक्षा, अपमान सहन करत केलेलं कार्य तर्कशुद्ध व्यवहार आणि कृती होती. राजकीय क्षेत्रातील रॉय यांची तर्कशुद्ध विधायकता तर्कतीर्थांच्या हृदयाला भिडलेली होती. त्यांचा सामाजिक दृष्टिकोन तर्कतीर्थांना विचारप्रवर्तक वाटला. अंधश्रद्धेविरुद्धचा मानवेंद्र रॉय यांचा विवेकवादी दृष्टिकोण त्यांना मानवी जीवनाला कलाटणी देणारा वाटला. मानवी एकतेच्या सत्याने तर्कतीर्थ आकर्षित होऊन समर्पित झाले होते. पण भारतीय जनमानस अशा प्रकारच्या मूलभूत परिवर्तनास तयार नसल्याची जाणीव होऊन सन १९४८ ला रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्ष विसर्जित करण्यासाठी कलकत्त्याला

बोलावलेल्या राष्ट्रीय अधिवेशनाचं अध्यक्षपद तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींना बहाल करून त्यांच्या पक्षनिष्ठ कार्याचा एका अर्थी सन्मानच होता. त्यातील अध्यक्षीय भाषणात तर्कतीर्थांनी मांडलेला नवमानवतावाद त्यांचं नवं तत्त्वज्ञानच होतं.

**भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतर**

भारतीय संविधान परिषदेने भारतीय संघराज्याच्या घटनेचा मसुदा सलग दोन वर्षे मोठ्या मेहनतीने कलमवार चर्चा करून बहुमताने तयार केला. त्या वेळी घटनेच्या ८ व्या परिशिष्टानुसार १४ भाषांना राज्यभाषा म्हणून मान्यता देण्यात आली होती. मान्य घटनेतील तरतुदीनुसार या चौदा भाषांत घटनेचे प्रारूप भाषांतरित करणं अनिवार्य होतं. घटनेच्या इंग्रजी आणि हिंदी प्रती प्रथमतः तयार करण्यात आल्या. कारण त्या भारतीय संघराज्याच्या अधिकृत राज्यभाषा म्हणून स्वीकारण्यात आल्या होत्या. भारतीय राज्यघटनेच्या ८ व्या परिशिष्टात अंतर्भूत १४ मान्य राज्यभाषांपैकी घटनेचे भाषांतर संस्कृतमध्ये करणं अनिवार्य होतं. कारण ती आठव्या परिशिष्टांतील मान्य १४ भाषांपैकी एक होती (आज ही भाषा संख्या २२ झाली आहे.).

संविधान समितीने घटनेच्या मसुद्यांचं राज्यभाषांमध्ये भाषांतर करण्याचा निर्णय घेतल्यानंतर लोकसभा सभापतींनी त्यांच्या मान्यतेने घटनेच्या संस्कृत भाषांतरासाठी समिती नियुक्त केली. त्या समितीचे अध्यक्ष भारतरत्न पां. वा. काणे होते तर प्रमुख भाषांतरकार व समिती निमंत्रक म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नियुक्ती करण्यात आली होती. सहभाषांतरकार होते डॉ. मंगलदेव शास्त्री. अन्य सदस्यांत सर्वश्री डॉ. सुनीतीकुमार चटर्जी, कै. बालसुब्रह्मण्यम् अय्यर, महामहोपाध्याय गिरिधर शर्मा चतुर्वेदी, डॉ. बाबूराम सक्सेना, पंडित राहुल सांकृत्यायन, डॉ. रघुवीर, श्री. मुनिजिनविजय, डॉ. कुन्हनराजा यांचा समावेश होता. ही सर्व मंडळी भाषाविज्ञान, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, साहित्य, संस्कृत, विधी (कायदा). इ. विद्याशाखातील आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय मान्यताप्राप्त विद्वान होते.

घटनेच्या योजनेनुसार संस्कृत भाषांतर करताना मूळ अडसर होता तो संस्कृत कालखंडानंतर तयार झालेल्या शब्दांना प्रतिशब्द देण्याचा व प्रतिशब्द वैधानिक असण्याचा. त्यामुळे घटनेचं हिंदी भाषांतर आधारभूत ठरवून भाषांतर करण्याचं धोरण अंगीकारण्यात आलं. तरी काही शब्द विशेषतः (इंग्रजी, उर्दू) त्यांना संस्कृत, हिंदीतील प्रचलित पर्यायी शब्द स्वीकारण्यात

आले. उदाहरणार्थ शर्त, हक, फायदा, दावा, नौकरी. भाषांतर लोकाभिमुख व्हावं म्हणून व्याकरणास मुरड घालून वयस्क, वृत्तिक, आंतरराष्ट्रीय सारख्या शब्दांना मान्यता देण्यात आली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी घटनेच्या कलम १ ते २६२ चे आणि संविधान दुरुस्ती कलमांचं भाषांतर केलं तर डॉ. मंगलदेव शास्त्री यांनी कलम २६४ ते ३९५ चे भाषांतर केले. घटना दुरुस्ती भाषांतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. भाषांतरानंतर सुमारे २२ दिवस बसून भाषांतराचे कलमवार वाचन करून दुरुस्तीसह अंतिम मसुदा लोकसभा सभापतींना सादर करण्यात आला. लोकसभेने तो मंजूर केल्यावर संस्कृत घटना अस्तित्वात आली (अधिकृत झाली). संस्कृत घटनेच्या भाषांतराची पहिली आवृत्ती प्राज्ञपाठशाळा मुद्रणालय, वाई येथे सन १९५२ ला मुद्रित करण्यात आली. तेव्हा तिची किंमत २ रुपये (३ शिलिंग) होती. हे मुद्रण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या देखरेखीखाली तयार झालं. त्याचे मुद्रितशोधन कार्य स्वतः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलं होतं. ही मुद्रितशोधित प्रत आजही प्राज्ञपाठशाळा, वाई यांच्याकडे सुरक्षित आहे. त्यानंतर झालेल्या वेळोवेळीच्या घटना दुरुस्तीचे संस्कृत भाषांतर करत संस्कृत घटना अद्ययावत करून प्रकाशित करण्याचा प्रघात लोकसभा सचिवालयाने ठेवला असून लोकसभा ग्रंथालयात तो जिज्ञासू वाचकांना वाचण्यास उपलब्ध असतो. शिवाय ही प्रत नागरिक विकतही घेऊ शकतात. सुधारित प्रतीत घटनेतील महत्त्वाच्या संस्कृत शब्दांच्या इंग्रजी प्रतिशब्दांची सूची व घटना दुरुस्ती भाषांतरे अंतर्भूत आहेत.

**तर्कतीर्थ : संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील काँग्रेसी**

भारतीय राज्यघटनेच्या संस्कृत भाषांतराचे कार्य सुरू होण्यापूर्वीच रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी विसर्जनानंतर तर्कतीर्थ लक्ष्णशास्त्री जोशी यांच्यापुढे राजकीय दिशा आणि मार्ग ठरविण्याच्या प्रश्नाने काहूर माजवलं होतं. ते ज्या सातारा जिल्ह्यातील वाईत प्राज्ञपाठशाळा, धर्मकोश, मीमांसाकोश, लेखन इ. कार्य करीत, त्या जिल्ह्यात काँग्रेस सक्रिय होती व तेथील अनेक कार्यकर्ते, नेते त्यांचे अनेक वर्षांचे राजकीय सहयात्री होते. विशेषतः यशवंतराव चव्हाण आणि किसन वीर यांच्याशी त्यांचे सख्य होते. राजकीय मार्ग भिन्न असले, तरी समाजवादी समाजरचना विचार स्नेह नि सहकार्याचा समान धागा होता. महात्मा गांधींचे अनेक वर्षांचे साहचर्य आपण बुद्धिवादाच्या जोरावर नाकारल्याचं शल्यही तर्कतीर्थांच्या मनात होतं.

विचार आणि भावना यांच्या द्वंद्वात विचाराची सरशी झाली होती, पण मनुष्य संबंधात अंतर नव्हतं. बुद्धिवाद आणि आध्यात्मिक अनुभवांचं अंतर्द्वंद्व हा तर्कतीर्थांचा स्थायीभाव दिसून येतो. या सर्व परिस्थितीत स्वगृही परतणं योग्य वाटून त्यांनी सन १९५० मध्ये पुनश्च काँग्रेसमध्ये प्रवेश केला. १९५२ साली तर्कतीर्थांना सातारा जिल्हा काँग्रेस सहकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रांतिकचा सदस्य म्हणून निवडून दिलं.

यशवंतराव चव्हाण सन १९५५-५६ च्या राज्य पुनर्रचना आंदोलनात काँग्रेसचे नेते म्हणून उदयाला आले नि महाराष्ट्रात चव्हाण पर्व सुरू झालं. त्याची परिणती म्हणून १ नोव्हेंबर १९५६ ला यशवंतराव चव्हाण द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले, पण त्यांना सतत संयुक्त महाराष्ट्र चळवळीला तोंड द्यावं लागलं. त्यांच्याबरोबर तर्कतीर्थांनाही समर्थक म्हणून फार मोठ्या टीकेला आणि मानहानीला सामोरं जावं लागलं, पण त्यांनी आपली काँग्रेस निष्ठा अविचल ठेवली. मराठीसाठी स्वतंत्र राज्य करणं आवश्यक असल्याचं यशवंतराव चव्हाण यांनी पंडित नेहरूंना पटवून दिलं. त्यामुळे स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे १ मे १९६० पहिले मुख्यमंत्री होण्याचा बहुमान त्यांना मिळणं ही क्रमप्राप्त गोष्ट होती. प्रतिकूल काळात किसन वीर आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी चव्हाण यांच्या नेतृत्वावर जो खंबीर विश्वास दाखवला त्यामुळे ते द्विभाषिक मुख्यमंत्री म्हणून जसे यशस्वी ठरले तसेच स्वतंत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून पण. तर्कतीर्थांच्या बुद्धिवादी प्रबोधन, व्याख्यान, लेखनाचा लाभ यशवंतराव चव्हाण यांना मार्गदर्शनांच्या रूपात सतत मिळत गेल्याने त्यांनी कधी कच खाल्ली नाही.

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची अध्यक्षीय कारकिर्द**

१ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. ते भाषावार प्रांत रचनेच्या धोरणाचा भाग म्हणून मराठी भाषेसाठी हे राज्य स्थापन झालेलं असल्याने त्याची स्थापना होताच पहिले मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांनी दोन निर्णय जाहीर केले - १. मराठी भाषा संचालनालयाची निर्मिती २. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना. पैकी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नियुक्ती करण्यात आली. सदस्य व सल्लागार ठरवण्यात आले आणि १९ नोव्हेंबर १९६० ला स्थापन करण्यात आलेल्या या मंडळाचं विधिवत उद्घाटन २२ डिसेंबर १९६० रोजी नागपूर येथे संपन्न झालं.

तर्कतीर्थांनी या मंडळाच्या कामाचं नियोजन करून प्रत्यक्ष कार्य सुरू केलं. त्यात दोन महत्त्वाच्या गोष्टींचा अंतर्भाव होता. १. जगातील अभिजात

ग्रंथांची भाषांतरं करून घेऊन ते ग्रंथ मराठीत प्रकाशित करणं २. मराठी विश्वकोशाची निर्मिती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९ नोव्हेंबर, १९६० ते ३० नोव्हेंबर १९८० या दोन दशकांच्या काळासाठी या मंडळाचे अध्यक्ष राहिले. या काळात त्यांनी इतिहास, विज्ञान, तत्त्वज्ञान, संगीत, क्रीडा, सौंदर्यशास्त्र, कला, निसर्ग, उद्योग, अर्थशास्त्र, साहित्य, पुराण, धर्म, भाषा, लिपी, यंत्रे, स्त्रीजीवन, दलित-अदिवासी, समग्र वाङ्मय विषयक जे शेकडो ग्रंथ लिहून घेऊन प्रकाशित केले, ते काम केवळ अतुलनीय. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती प्रकल्पाचे ते सन १९६० ते १९९४ (मृत्यूपर्यंत) अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात मराठी विश्वकोशाचे १४ खंड प्रकाशित झालेले असले तरी आजवर प्रकाशित मूळ २० खंड व परिभाषा नि सूची खंड धरून तो प्रकल्प पूर्णत्वास गेला, त्यात सिंहाचा वाटा तर्कतीर्थांचाच हे कोण नाकारेल? महाराष्ट्र राज्याच्या ज्ञान आणि संस्कृतीचे सर्जक व संवर्धक म्हणून तर्कतीर्थांनी केलेलं हे कार्य केवळ वादातीत! प्रकाशित २१ खंडांची पृष्ठसंख्या २२,३८५ पृष्ठे असून त्यात सुमारे ३ लाख निर्देशित नोंदी आहेत. हा केवळ मराठीचा ज्ञानविस्तार नसून ज्ञानविश्वातील मराठीची प्रगल्भता सिद्ध करणारी गोष्ट होय. भारतीय भाषांत असं कार्य अपवाद स्वरूपातच झाले असावं.

**टीका, अवमानातून उजळलेलं व्यक्तिमत्त्व**

जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण हे सर्वश्रुत आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वात नित्यनूतनतेचा अंगीकार दिसून येतो. त्यांनी आपल्या जीवन प्रवासात परस्पर भिन्न मतप्रवाहांचा स्वीकार केला. त्याची कसोटी होती, अर्थातच स्वतःचा विवेक. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही। नाही मानियले बहुमता।।' ही प्रत्येक बुद्धिवाद्याची जीवन नि निर्णय प्रक्रिया असते. हे प्रवाहाविरुद्ध पोहणं असतं. परिणामी, अशी माणसं टीकेचे धनी होणं स्वाभाविक असतं. तर्कतीर्थांच्या जीवनात वाद, टीका, बहिष्कार, अगदी चपलांची माळ गळ्यात घालण्याचेही प्रसंग आले. मारझोड, दगडफेकीचे प्रसंग काही सभा, परिषदात झाले, तरी तर्कतीर्थ अशा प्रसंगी विचलित न होता स्वतःची मतं मांडत राहिले. हे धाडस Courage of Conviction असल्याशिवाय शक्य होत नाही. दक्षिण आफ्रिका, इंग्लंडमध्ये महात्मा गांधींची कमी का उपेक्षा, अवमान झाले?

१९४६ साली झालेल्या निवडणुकांच्या काळात तर्कतीर्थ रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीत होते. या पक्षाने काँग्रेस विरुद्ध उमेदवार उभे केले होते.

साताऱ्यात म्हणजे स्वगृही दगडफेक, शेणाचा मारा त्यांनी सहन केला. ऋजुतेबद्दल सर्वत्र प्रसिद्ध असलेल्या साने गुरुजींनी या वेळच्या वाईतील एका सभेत, ''हा कसला आलाय नवमानवतावाद? आणि त्याचे प्रणेते कोण? तर तर्कतीर्थ. हे तर तर्कटतीर्थ नव्हे मर्कटतीर्थ'' म्हणून त्यांचा उपहास केला. या अनपेक्षित टीकेचा प्रतिवाद तर्कतीर्थांनी केला. पण काँग्रेसच्या लोकप्रियतेपुढे तो टिकू शकला नाही हे ही तितकंच खरं!

त्यापूर्वीही वाईत असे प्रसंग आलेच. सन १९३३ मध्ये तर्कतीर्थांनी महात्मा गांधीजींचे सर्वांत लहान चिरंजीव देवदास नि राजाजींची कन्या लक्ष्मी यांच्या विवाहाचं पौरोहित्य केल्याचं आपण यापूर्वी वाचलं आहे. हा विवाह ब्राह्मण-वैश्य असा आंतरजातीय विवाह होता. त्या काळात प्रायश्चित्त करवून घेऊन तत्कालीन संमत शास्त्रानुसार केलेल्या विवाहाचा निषेध वाईत तत्कालीन ब्रह्मवृंदांनी केला. संकेश्वरच्या शंकराचार्यांचा त्या काळात वाईत संचार होता. ढोल्या गणपती घाटावर निषेध सभा झाली. वाईत सनातनी वृत्तीच्या लोकांचं त्या काळात बहुमत असल्याने तीन-चार हजार श्रोते उपस्थित होते. शंकराचार्य म्हणाले, ''लक्ष्मणशास्त्री जे करीत आहेत त्या पापाची शुद्धीही धर्मशास्त्राप्रमाणे होत नाही. त्यांना फळं भोगावीच लागतील. लक्ष्मणशास्त्रांना नरकवास भोगावा लागणार आहे.'' प्रत्युत्तर म्हणून तर्कतीर्थांनी 'ज्ञानप्रकाश' मध्ये लिहिलं होतं, ''शंकराचार्यांच्या म्हणण्याप्रमाणे मी नरकात जाणार आहे. स्वर्गात काहीच काम करायला असत नाही, तिथं नुसतं सुखच उपभोगायचं असतं. म्हणून नरकात सेवा करणं मी पत्करेन. हे शाली पांघरून संन्यासी झालेले, पालखीत बसणारे, रेशमी वस्त्रं परिधान करणारे संस्थानिक आहेत. उपभोगाची सर्व साधने त्यांना मिळतात. भगवी वस्त्रं ते खऱ्या अर्थाने नेसत नाहीत. भगवी वस्त्रे चढवितात इतकेच. पालखी, चवऱ्या, मुजरे, मोठमोठी उत्पन्ने भोगतात. त्यांना आम्हाला जेथे पाठवणार आहात तेथेच पाठवतात असे शास्त्रात म्हटलेलं आहे.'' विशेष म्हणजे हे महात्मा गांधींच्या वाचनात आलं होतं. त्यात गांधींनी आपली असहमती दर्शविली होती. तरी तर्कतीर्थ धर्मपंडिताने त्यागाने विरक्ती व संन्यस्तपद आचरायचं असतं या आपल्या विचारावर ठाम राहिले. ही असते वैचारिक प्रतिबद्धता, ती तर्कतीर्थांनी जपली, जोपासली.

तर्कतीर्थांनी आपलं पुरोगामीपण जपण्यासाठी कमी सोसलं नाही. वाईतच तर्कतीर्थांच्या या पुरोगामी आचार-विचारांच्या विरोधात खंडनार्थ एका वसंत व्याख्यानमालेत कुशाभाऊ अभ्यंकर यांनी पुण्याच्या गो. म.

जोशींची सलग तीन व्याख्याने योजली होती. चौथ्या दिवशी तर्कतीर्थांचे उत्तरमीमांसा करणारे भाषण खरं म्हणजे खंडन व्याख्यान ठरलं. तर्कतीर्थांनी काही केलं नाही. गो. म. जोशी यांनी आपल्या व्याख्यानात आपणाला हवं तेवढं जे अर्थ सांगितलं होतं त्याचा उरलेला भाग सांगितला आणि त्यांचं व्याख्यान खोडून काढून सभा जिंकली.

असंच आचार्य अत्रेंच्या संदर्भातही एकदा तर्कतीर्थांनी केलं. ही गोष्ट बहुधा सन १९६५ च्या हैदराबाद इथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनातली. एका परिसंवादात आचार्य अत्रे यांनी महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या व तर्कतीर्थांनी संपादिलेल्या 'पदनाम कोश' वर टीका केली. काय तर बदनाम कोश म्हणून. यातले शब्द कोणाला काय घंटा कळतात काय? म्हणून अंगविक्षेपासह टीका केली. तर्कतीर्थ प्रतिवादासाठी सामोरे गेले. म्हणाले, ''माझ्याकडे शब्दांची शस्त्रे नाहीत. आहेत शास्त्रे. मानसशास्त्रातला एक प्रयोग आहे. त्यात घंटा आहे. ती फक्त कुत्र्यास कळते. माणसास नाही. माणसास भाषा आई शिकवते. ती त्याची मातृभाषा. इतर भाषा माणसाचा वकूब, वृत्ती सिद्ध करणारी'' सभा तर्कतीर्थांनी जिंकली. परिसंवादानंतर आचार्य अत्रे तर्कतीथांच्या जवळ आले. जेवणाची वेळ झालेली. जेवायला कुठं जाणार म्हणून विचारलं. तर्कतीर्थांनी यजमानांचं नाव सांगितलं. म्हणाले, ''त्यांच्याकडे काय पाला खायला जाणार? चला माझ्याबरोबर. राजकारण नि वृत्तपत्रे, साहित्यादी क्षेत्रात मतभेद असतात, मनभेद नाही.'' संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात हे दोन्ही मित्र वेगवेगळ्या व्यासपीठावर असत. पण वाईतलं आचार्य अत्रेंचं जेवण हे तर्कतीर्थांकडेच असायचं. या ओळी मी लिहितोय खरा, पण सांस्कृतिक क्षेत्रात आपण किती लांब गेलो आहोत, याचा विषाद वाटल्यावाचून राहात नाही.

**कोशकर्ते तर्कतीर्थ**

पदनाम कोशावरून नि मराठी विश्वकोशावरून आठवलं, तर्कतीर्थांचे गुरू स्वामी केवलानंद सरस्वतींच्या काळात त्यांनी 'मीमांसा कोश' निर्मिण्यास आरंभ केला होता. हे कोशकार्य तर्कतीर्थांनी पूर्णत्वास नेलं. त्यानंतर त्यांनी धर्मकोश निर्मितीचं कार्य हाती घेतलं. सुमारे २५ खंडांच्या योजनेपैकी तर्कतीर्थांच्या जीवनकाळात १९ खंड (भाग) प्रकाशित झाले, ज्यांचे संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. सन १९५० ते १९८४ काळात हे ग्रंथ प्रकाशित झालेत. उर्वरित सुमारे ६ खंड गोविंद शास्त्री केळकर यांच्या संपादकत्वाखाली पूर्ण झाले आहेत. कुमार कोशाची योजनाही त्यांच्या काळात

आखली गेली होती. त्यांचेही नंतरच्या काळात तीन खंड (भाग) प्रकाशित झाले आहेत. डॉ. विजया वाड यांनी त्यासाठी भरपूर मेहनत घेतली होती. तर्कतीर्थ त्यांना कळायला लागल्यापासून ते मृत्यूपर्यंतच्या (सुमारे सात दशक) काळात येणकेन प्रकारेण कोश निर्मितीशी संलग्न राहिले. कोशवाङ्मय ही त्यांच्या जीवन कार्य, विचारांची ओळख होऊन बसली होती.

मराठी विश्वकोश प्रकल्प हा पूर्णतः शासकीय अर्थसाहाय्यावर साकारलेली योजना असली, तरी त्याच्या संकल्प ते सिद्धीचे श्रेय तर्कतीर्थांनाच द्यावे लागेल. संस्कृतचे ज्ञान, नवशास्त्रांचे भान नि कोशनिर्मितीची जाण अशा कौशल्य त्रयींचे अपत्य म्हणून विश्वकोशाकडे पहावं लागेल. या त्रिगुणांचा संगम तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वात होता. तर्कतीर्थांना खरं तर महाराष्ट्रात युरोपसारखी ज्ञानकोश चळवळ उभारायची होती. पण महाराष्ट्र संस्कृतीत अशी परंपरा नसल्याने वा ज्ञानाच्या प्रगल्भ नि प्रगत शिस्ती अभावी ही चळवळ उभी राहू शकली नाही. आपला स्थायीभाव जितका रंजकतेत रमतो तितका वैचारिकतेत नाही. मुद्रण पद्धती, कोशाचा आकार, टंक (फाँट), निवड, लेखन पद्धती, वस्तुनिष्ठता, नोंदीचे रचनाबंध, संदर्भ, चित्रे, नकाशे आरेखन, आलेख इ. बारीक सारीक तपशील ठरवणं म्हणजे विश्वकोशाची रचना व लेखन शैली ठरवणं होतं. तर्कतीर्थांनी शेकडो विश्वकोशांचा अभ्यास करून मराठी विश्वकोशाचा रचनाबंध ठरवला होता. स्वतः सुमारे दीडशे नोंदी त्यांनी लिहिल्या असल्या, तरी आरंभिक पंधरा खंडांच्या प्रत्येक नोंदीवर त्यांचा हात फिरला होता. तत्कालीन विद्वान, लेखक, तज्ज्ञ, संपादक, भाषांतरकार इ. ची फौज उभी करणं नि त्यांची मोट बांधणं असे तर्कतीर्थांनी केलेलं कार्य त्यांच्या ज्ञाननिष्ठेमुळेच शक्य झालं. बाह्य हस्तक्षेपमुक्त असे विश्वकोश प्रशासन शासकीय असून स्वायत्त राहिले. ही किमया तर्कतीर्थच करू जाणे! अन्यांना विश्वकोशाच्या दिवाणखान्यात प्रवेश असे पण माजघरात जाणं शक्य नसे, या प्रा. रा. ग. जाधवांच्या सूचक वाक्यात विश्वकोशाच्या सिद्धीचं गमक आहे.

**गृहस्थसंन्यासी तर्कतीर्थ**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे सार्वजनिक व्यक्ती होते. माणूस सार्वजनिक झाला की त्याचं वैयक्तिक जीवन गौण होऊन जातं. खरं तर या गौण होण्यातून समाजात गैरसमजही परभारे पसरत राहतात. तर्कतीर्थांचं पंडित असण्यातून एक पसरलेला गैरसमज म्हणजे ते संन्यासी होते. हा गैरसमज त्यांच्या सतत समाजात असण्या, राहण्यातून तयार झालेला. वस्तुस्थिती

अशी की ते विवाहित होते. त्यांच्या तरुणपणाच्या काळात संस्कृत पंडित ब्रह्मचारी राहण्याचा प्रघात होता हे खरे आहे. परंतु तर्कतीर्थ विद्याध्ययन करण्याच्या काळात गृहस्थ व्हावे की ब्रह्मचारी रहावे असे द्वंद्व निर्माण झाले असता त्यांचे गुरु नारायणशास्त्री मराठे यांनी तर्कतीर्थांची प्रवृत्ती लक्षात घेऊन विवाह करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार तर्कतीर्थांचा विवाह सन १९२६ मध्ये मुल्हेरनिवासी वासुदेवबुवा पंडित यांची कन्या कावेरी हिच्याबरोबर झाला. लग्नानंतरचं त्यांचं नाव 'सत्यवती' झालं. वाई येथील घरीदारी त्या सतीकाकू म्हणून ओळखल्या जात.

या दाम्पत्यास चार अपत्ये झाली. मधुकर, मालती, सुमन आणि वासुदेव. पैकी मधुकर हा इलेक्ट्रिक इंजिनिअरिंग आणि मेटॅलर्जिकल सायन्स. अशा दोन क्षेत्रातील पदवीधर होऊन त्यांनी अमेरिकेतल्या येल विद्यापीठातून मेटॅलर्जिकल सायन्समधील पीएच. डी. संपादली आणि तो इंदुमती दातार यांच्याशी विवाहित होऊन अमेरिकेत स्थायिक झाला होता. त्यांना चार अपत्यं रमा, विजय, लक्ष्मी नि शीला. हे चौघेही सध्या अमेरिकेत आहेत. मधुकर जोशी यांचं सन २०१८ मध्ये निधन झालं. मालती जोशी या श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठातून बी. ए. झाल्या. पुढे त्यांचा विवाह अमेरिका स्थित मधुकर कुलकर्णी यांच्याशी झाला. तेही मेटॅलर्जिकल सायन्समधील पीएच. डी. होते. येल विद्यापीठ, अमेरिकेतूनच त्यांनी ही पदवी संपादली. डॉ. मधुकर जोशींबरोबरच ते आय. बी. एम. या विश्वविख्यात संगणक कंपनीत उच्च पदावर कार्यरत होते. सन २०१६ ला त्यांचं निधन झाले. श्रीमती मालती कुलकर्णी अमेरिकेत स्थायिक आहेत. तिसरी कन्या सुमन ती एम. ए., पीएच. डी. होऊन प्राध्यापक झाली. त्या सायन (मुंबई) येथील एस. आय. ई. एस. महाविद्यालयात तत्त्वज्ञान शिकवत. त्यांनी तर्कतीर्थांची तीन चरित्रं लिहिली आहेत. एक भाषण संग्रह संपादित केला आहे. एक चरित्र आणि लेख संग्रह इंग्रजीत ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने आणि लोकवाङ्मय गृहाने गतवर्षीच प्रकाशित केलं आहे. त्या सध्या सिंगापूर येथे स्थायिक आहेत. चौथे चिरंजीव वासुदेव जोशी मराठी विद्वत्कोशात सेवा करीत होते. ते निवृत्त असून वाई मुक्कामी निवासी आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लौकिकार्थाने घर, संसार, कुटुंब जबाबदाऱ्या शेवटपर्यंत सांभाळल्या. नातवांना मराठी यावं म्हणून त्यांची धडपड असायची. पण मूळ वृत्ती संन्याशाची. म्हणजे असे की लेखन, वाचन म्हटलं की भरल्या घरात ते एकटे होऊन समाधिस्थ होत. एका मुला

की मुलीच्या लग्नात लेख पाठवायची घाई होती म्हणून तिकडे लोक अक्षता उधळत होते नि इकडे हा संन्यस्त गृहस्थ तन्मयतेने लिहीत असल्याचंही लोकांनी पाहून लिहून ठेवलं आहे. सतीकाकू सन १९७८ ला निर्वतल्या तर शास्त्रीजींनी सन १९७८ ते १९९४ असं तपभर मुला, नातवांसंदर्भात आईचीपण भूमिका पार पाडल्याचं त्यांच्या आप्तस्वकीयांनी लिहून ठेवलं आहे.

ते नित्य संचारी गृहस्थ. पण घरी येताना ते रिकाम्या हातांनी परतलेत असं कधी झालं नाही. वाईच्या मंडईत तर्कतीर्थांना भाजी-फळं घेताना पाहिलं की सुशिक्षितांना या बुद्धिवादी माणसाच्या गृहस्थपणाचं अप्रूप वाटल्याशिवाय रहात नसे. त्यांनी आयुष्यात कधीच कुठल्या गोष्टींचं ढोंग केलं नाही. शंकराचार्यांशी अंनिस आणि पुरोगामी मंडळींसह जाहीर वादविवाद करायला गेलेले तर्कतीर्थ लोटांगण घालून अभिवादन करतात नि नंतर प्रश्न विचारून शंकराचार्यांना निरुत्तर करतात, हे सातारकरांनी अनुभवलेलं आहे. मुलं शिकतानाच्या काळात पत्र लिहून समुपदेशन, मार्गदर्शन करणारे आबा (तर्कतीर्थांचं घरातलं नाव) मुलं विसरलेली नाहीत. जेवणानंतर वामकुक्षी असला प्रकार नाही. पण रात्रीच्या जेवणानंतर शतपावली झाल्याशिवाय पाठ टेकत नसत. त्याला तर्कतीर्थांनी चरणयोग नाव रूढ केलं होतं. खाण्यापिण्यात ते मोकळे होते. सामिषनिरामिष दोन्ही प्रकारची भोजनं चालत. पण वासनेनं नाही. ते म्हणत की, मी इंद्रिय नियंत्रण केलं, जिभेचं नाही करू शकलो. याचा संदर्भ नित्य भाषणबाजीशीही होता. ते ब्राह्मण असले तरी त्यांच्यात ब्राह्मण्य, कर्मकांड नव्हतं. त्यांची ऊठबस बहुजन, दलितांत अधिक असे. विद्यार्थी दलित होते. विशेष म्हणजे घरी स्वयंपाक करणाऱ्या बाई दलित होत्या. हे वाईतल्या सनातनी ब्राह्मणांना अनेक वर्षे उलटली तरी माहिती नव्हतं. आपल्या पुरोगामीपणाचा डिंडिमही त्यांनी कधी मिरवला नाही, वाजवला नाही.

**तपस्वी व्यक्तिमत्त्व**

सन १९२३ ला तर्कतीर्थ पदवी संपादन केल्यापासून लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं सार्वजनिक जीवन सुरू होतं. प्रारंभी धर्मसभांमधून शुद्धी, धर्मांतर, वेद पुराणांचे प्रागतिक अर्थ अशा अंगांनी त्यांनी धर्मसुधारणा कार्याने आपल्या जीवित कार्याचा आरंभ केला. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी आपलं पुरोगामी जीवन विचार आणि व्यवहारांनी जपलं. उक्ती नि कृतीचं अद्वैत त्यांचं बलस्थान होतं. सन १९२८ पासून ते लिहायला लागले. अंतापर्यंत लिहीत राहिले. भाषण, लेखन, समीक्षा, अभ्यास, संशोधन यांना सीमा नव्हत्या. वेद, पुराण, उपनिषद, इतिहास, तत्त्वज्ञान,

विज्ञान, भाषा, साहित्य, संगीत, कला, क्रीडा जीवनाचं असं एकही क्षेत्र नसेल की ज्यात त्यांना गती नव्हती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी चालता बोलता ज्ञानकोश होते. कोणतंही औपचारिक शिक्षण न घेतलेले हे गृहस्थ संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजीत अस्खलित लिहीत, बोलत. हे पाहिलं की विश्वास उडून जावा स्वतःवरचा असा हा अक्षरशः प्रकांड पंडित म्हणून प्रसिद्ध ज्ञानयोगी, तपस्वी. कोणताही विषय द्या. बोलण्यास, लिहिण्यास, वाद करण्यास (घालण्यास नाही) सदैव तत्पर. माणूस म्हणून चैतन्यशील. नवं शिकण्याचा, वाचण्याचा अतृप्त ध्यास. वैश्विक भान, परंपरेला आधुनिकतेचा साज चढवण्याचा छंद. कुणी याला वाया गेलेला विद्वान म्हटलं, कुणी त्यांची वेषांतरं, मतांतरं, दिशांतर मोजली. हा मात्र युगांतर, मन्वंतरामागे धावणारा 'प्राज्ञपुरुष' ठरला अंतिमतः. तसा मूलतः बुद्धिवादी वेदान्ती. पण शब्दप्रमाण न राहता बुद्धिप्रामाण्य तर्कावर पेलत राहिला. भल्याभल्यांना बुद्धिबळाच्या पटावर चितपट करणारा हा खेळाडू स्वतः शेवटपर्यंत अजेय योद्ध्यासारखा तळपत राहिला. अस्तांचलाला न गेलेला जणू ज्ञानभास्कर हा! आधुनिक महाराष्ट्राची ज्ञानसंस्कृती यानं रुजवली असं म्हटलं तर ते अतिशयोक्त ठरू नये. शास्त्रांना शस्त्र बनवून अहिंसक द्वंद्व निर्माण करणारा नि उठलेलं एखादं वादळ आपल्या चाणक्यीय कौशल्याने शमवणारा, शांत करणारा समाज हितचिंतक. ही त्यांची शहाणीव त्यांची स्वतःची मिळकत. संघर्ष, संघटन, मीमांसा, समीक्षा, चिकित्सा, वाचन, विचार, चिंतनातून पाझरलेली. एकाच वेळी समाजकारण, राजकारण, संस्कृतीकारण, अर्थकारण, शिक्षणकारण समानशीलपणे समजणारा नि प्रत्येक प्रश्न, संकट समस्यात मार्ग काढणारा संकटमोचक. घटनेचं भाषांतर नि धर्ममीमांसा एकाच वेळी स्वतंत्रपणे करणारा. मुलाच्या लग्नात स्वतः लिहीत बसणारा हा गृहस्थ. त्याला गृहस्थ समजावं की संन्यासी कळत नाही असं अजातशत्रू व्यक्तिमत्त्व. ऋषितुल्य साधना. भाषा, साहित्य, तत्त्वज्ञान या त्रयीत सदैव रममाण तपस्वी. स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, विज्ञाननिष्ठा, तर्कतीर्थांच्या लेखी बोलघेवडी मूल्ये न राहता तो आचारधर्म होता. त्यांची ओढ सामान्य-असामान्य सर्वांना समान असायची. असा हा अक्षरशः प्रकांड पंडित असलेला गृहस्थ, पण ते एक अनाकलनीय कोडं होतं खरं.

■

*(जडणघडण मासिक, पुणे; दिवाळी अंक, २०२०)*

# ४

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे अज्ञात पैलू

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासंदर्भात 'माहीत नसलेले तर्कतीर्थ'सारख्या विषयावर वाईत येऊन बोलणे हे धाष्ट्याचं कार्य आहे, शिवाय तो उद्धटपणाही ठरेल. तरी या विषयावर भाषण करायचे मी ठरवले, ते केवळ त्यांच्या साहित्याचा आस्वादक वाचक, त्यांच्या कार्याचा पाईक आणि पुरोगामी विचारांच्या पालखीचा भोई म्हणूनच. तर्कतीर्थांच्या समग्र वाङ्मयाचं संपादन करताना जे तर्कतीर्थ मला समजले, ते तुम्हांस सांगणे इतकाच हेतू हा विषय घेण्यामागे आहे. मागे केव्हातरी तर्कतीर्थांबद्दल वाचत असताना लक्षात आलं की, तर्कतीर्थ समग्र वाचायचे तर सोय नाही. त्यांचे अधिकांश साहित्य विखुरलेले आहे. तीच गोष्ट त्यांच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्याबद्दलही. त्यांच्यावर चरित्रात्मक अनेक ग्रंथ उपलब्ध असले तरी त्यांच्या कार्यांचे सर्वंकष मूल्यमापन अद्याप झालेले नाही, अशी माझी विनम्र धारणा आहे.

तर्कतीर्थांनी आपलं लेखन, वाचन, अध्ययन प्रारंभी संस्कृतमधूनच केलं, कारण त्यांना संस्कृत पंडित व्हायचं होतं. त्याचं मराठीत विपुल साहित्य उपलब्ध आहे. काही हिंदी, इंग्रजीत पण आहे. मात्र त्याचं स्वरूप भाषांतरित आहे. प्रकाशित अधिकांश साहित्य भाषण, लेखरूपात आहे. विश्वकोशांतील नोंदीचा संग्रह नाही. शिवाय त्याची मीमांसाही झालेली नाही. त्यांनी आपल्या हयातीत ज्या मुलाखती दिल्या, त्यांचे समग्रतः संकलन न झाल्याने अभ्यास होऊ शकलेला नाही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री

जोशी यांनी अनेक ग्रंथांना प्रस्तावना लिहिलेल्या आहेत. त्यांनी अनेक ग्रंथांच्या समीक्षा, परीक्षणं केली आहेत.

त्यांनी विपुल व्यक्तिलेख लिहिलेले आहेत. तर्कतीर्थ यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात 'प्रमोद', 'संग्राम', 'चित्रा', 'लोकमान्य' यांसारख्या दैनिक साप्ताहिकांमधून भरपूर लिहिलं आहे. त्यात स्तंभ, सदरे, लेखमालांचा समावेश आहे. तर्कतीर्थांचा मनुष्यसंग्रह मोठा होता, तसा संपर्क, संवादही सर्वदूर होता. त्या काळात याचे साधन पत्रव्यवहार होते. त्यांची पत्रे हा तत्कालीन इतिहासावर प्रकाशझोत ठरण्याची शक्यता आहे. तर्कतीर्थांनी केलेली संस्कृत हस्तलिखितांची सूची, धर्मकोशांचे संपादन, कुमारकोशाची योजना, मीमांसाकोशकार्य या सर्वांतून 'कोशकर्ते तर्कतीर्थ' हा त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा नवा अध्याय ठरेल. हे सर्व माहीत नसलेलेच तर्कतीर्थ नाहीत का?

**लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ होण्याचा प्रवास**

आधुनिक महाराष्ट्रातील थोर विचारवंत, राष्ट्रीय संस्कृत पंडित, मराठी विश्वकोशाचे संस्थापक, भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतरकार, शास्त्र-पुराणांतील कथनांना आधुनिक पुरोगामित्वाची जोड व दृष्टी देणारे धर्मसुधारक म्हणून लक्ष्मणशास्त्री जोशी यांना ओळखले जाते. संस्कृत साहित्याचा अभ्यास करण्यासाठी ते पिंपळनेर (जि. धुळे) येथून वाई (जि. सातारा) येथील नारायणशास्त्री मराठे यांच्या प्राज्ञपाठशाळेत वयाच्या चौदाव्या वर्षी सन १९१४ मध्ये दाखल झाले. धर्मसुधारणा व राष्ट्रीय भावना निर्माण करणारे विद्याकेंद्र म्हणून प्राज्ञपाठशाळा त्या वेळी ओळखली जायची. प्राथमिक शिक्षण पिंपळनेरच्या प्राथमिक शाळेत झालं, तिथं ते लिहायला, वाचायला शिकले. पिंपळनेरच्या त्यांच्या घरासमोर बाबासाहेब देशमुखांचा वाडा होता. ते धर्मानुरागी गृहस्थ होते. 'एकनाथी भागवत', 'तुकारामांचे अभंग', 'कबीर भजने' यांचे वाचन, गायन, पारायण चालायचे. वाड्यात दर मंगळवारी प्रसिद्ध होणारे साप्ताहिक केसरी गुरुवारी यायचे. त्याचे नियमित, सार्वजनिक वाचन होत राहायचे. या सर्वांतून बाल लक्ष्मणावर धर्म नि राष्ट्रीय भावनेचे संस्कार होत गेले. १९०८ला राजद्रोहाच्या खटल्यात लोकमान्य टिळकांची रवानगी मंडालेच्या तुरुंगात झाली. याचा विलक्षण प्रभाव अन्य जनांबरोबर बाल लक्ष्मणावर पडल्याचे त्यांनी आपल्या आठवणीत नमूद केले आहे.[१]

प्राज्ञपाठशाळेत येऊन प्रथम ते व्युत्पत्ती शिकले. 'शास्त्रसेवामधारय' म्हणत व्याकरण, न्याय, वेदान्त शिकले. न्याय मुक्तावलीच्या अभ्यासातून तर्कशास्त्र, न्याय वैशेषिक शिकले. पुढे वेदान्तसार, पंचदशी, लघुसिद्धांतकौमुदी, तर्कदीपिकाचे अध्ययन झाले. त्याबरोबरीने इंग्रजी, इतिहास, भूगोल, भौतिकशास्त्र, व्याकरण, गणितही त्यांना शिकवले गेले. प्राज्ञपाठशाळा केवळ संस्कृत पाठशाळा नव्हती, तर राष्ट्रीय शिक्षण देणारी माध्यमिक शाळापण होती. तिच्यात आधुनिक शिक्षणही देण्यात येत असे.[२] ही शाळा पूर्वी जरी मठ असली, तरी तिला आता आश्रमाचं रूप आलेलं होतं.

आश्रमाचा दिनक्रम म्हणजे परिपाठ असायचा. प्रातःकाळी ५ वाजता उठणे, नंतर सामूहिक प्रार्थना, स्नान, संध्या, सूर्यनमस्कार, योगासने होत. अध्यापनात चमत्कार, अवतार, कर्मकांडापेक्षा विवेकवाद, बुद्धिवाद, राष्ट्रवादावर भर असायचा. ब्रह्मचर्य ही विद्याध्ययनाची अट होती. पूर्वावलोकन, पाठ, चिंतनिका असा घडणीचा क्रम असे. परीक्षा व्हायच्या. ''प्रत्येक सोमवारी सुट्टी असे. सुट्टीत सकाळपासून दुपारपर्यंत अंगमेहनतीची कामे विद्यार्थी व शिक्षक करीत. त्यात सारवणे, शौचकूप साफ करणे, इत्यादी कामे व्हायची. सायंकाळी ४ ते ६ पर्यंत व्याकरण व पुराण प्रवचने चालत. संध्याकाळचे सुमारास दोन तास मंत्रपुष्प व शास्त्रचर्चा चाले. ही शास्त्रचर्चा संस्कृतमध्ये होई. मी न्याय वैशेषिक दर्शनाचे अध्ययन करू शकलो. तेव्हा म्हणजे १९२३ साली या शास्त्रचर्चेत भाग घेऊ शकलो. व्याख्यानांमध्ये मला क्रमांक गुरुवर्यांनी बराच काळ शेवटून पहिला दिला. परंतु शास्त्रचर्चेत वरून पहिला दिला.''[३] अशांतून एक बटू विद्याभ्यासी पंडित बनला.

अशा शास्त्रचर्चांतील प्राविण्यापूर्वी लक्ष्मण जोशी यांचा परिचय सन १९१६ ला विनोबा भावे यांच्याशी झाला. ते प्राज्ञपाठशाळेत शांकरभाष्य शिकण्यासाठी बडोद्याहून आले होते. सुमारे दहा एक महिने ते वाईच्या प्राज्ञपाठशाळेत होते. विनोबांचा वाचन, अध्ययनाचा व्यासंग मोठा होता. गीर्वाणवाणी (संस्कृत) वर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांचे संस्कृत पठण-पाठन ऐकून साक्षात् स्वामी केवलानंद सरस्वती (नारायणशास्त्री मराठे) जे लक्ष्मण जोशींचे गुरू होते, एकदा म्हणाले, 'गीर्वाणवाणीचे इतके सुंदर उच्चारण ऐकले म्हणजे ही देववाणी आहे, असे प्रत्ययास येते; आद्य शंकराचार्यांची ही वाणी आहे, अशी ओळख पटते.'[४] विनोबा भावे यांचे वक्तृत्व लक्ष्मण जोशी यांच्यापेक्षा तेव्हा सरस होते. त्यासंबंधीचा प्रसंग मुळातूनच वाचला पाहिले.[५] शास्त्रार्थ स्पर्धा आणि अशा वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, खंडनमंडन

इत्यादीतून लक्ष्मण जोशी या तरुण विद्यार्थ्याचे वक्तृत्व संस्कारित होत फुलत गेले. पुढे इंग्रजी शिकायचे म्हणून लक्ष्मण जोशी यांनी आपले सहाध्यायी दामोदरशास्त्री कोनकर व धुंडिराज देव यांचेसह वाईहून गुरुजींना न सांगता पलायन केले. यामागे अमेरिकेत जाऊन आधुनिक शिक्षण घेण्याचे स्वप्न होते. पण ते अपूर्णच राहिले.[६]

नंतर लक्ष्मण जोशी यांनी पदवी शिक्षण घ्यायचे म्हणून सन १९१८ ला वाराणसी (काशी) ला प्रस्थान ठेवले. स्वामी केवलानंद सरस्वती यांचे शिष्य योगानंद यांचे मठात राहून ते तिथे नसल्याने लक्ष्मण जोशी यांनी मठाजवळील लक्ष्मणशास्त्री द्रविड यांच्या पाठशाळेत लक्ष्मणशास्त्री द्रविड, त्यांचे चिरंजीव राजेश्वरशास्त्री, नित्यानंद पर्वतीयशास्त्री प्रभृतींकडून शिक्षण पूर्ण केले. नित्यानंद पर्वतीयशास्त्री 'चतुःशास्त्री' म्हणून विख्यात होते. ते व्याकरण, न्याय, मीमांसा आणि अलंकारशास्त्र या चार विषयांचे अधिकारी होते. प्राज्ञपाठशाळा, वाई येथील गत चार-पाच वर्षांचे (१९१४-१९) अध्ययन-अध्यापन उत्तम झाल्याने वाराणसीत फारशी अडचण आली नाही. इथेच राजेश्वरशास्त्रींचे गुरू महानैयायिक वामाचरण भट्टाचार्य यांचे सान्निध्य व मार्गदर्शन लाभले. त्या काळी काशीत (वाराणसी) संस्कृत महाविद्यालय होते. पण लक्ष्मण जोशी यांनी त्याऐवजी गुरुकुल शिक्षण पसंत केले. हा प्राज्ञपाठशाळेच्या अनौपचारिक शिक्षणाचा प्रभाव व परिणाम होता.

१९१९ ते १९२१ अशी तीन वर्षे काशीत राहून पदवी परीक्षा देण्यासाठी म्हणून रेल्वेने ते सर्व १९२३ ला कलकत्त्याला निघाले होते. वाटेत गाडी बारडोली स्टेशनवर थांबली होती. स्टेशनवर प्रचंड गर्दी पाहून ते गर्दी कशासाठी झाली, हे पाहण्यासाठी उतरले. तेव्हा कळले की, स्टेशनच्याजवळच असलेल्या बारडोलीच्या स्वराज्य आश्रमात महात्मा गांधी असून चौरीचौरा (जि.गोरखपूर, उत्तर प्रदेश) येथील आंदोलनाला हिंसाचाराचे गालबोट लागले म्हणून महात्मा गांधींनी उपोषण सुरू केले होते. २ फेब्रुवारी १९२२ ला चौरीचौरा येथे झालेल्या निदर्शनात पोलिसांनी क्रूर लाठीमार केला. त्याचा निषेध म्हणून ५ फेब्रुवारीला सुमारे अडीच हजार निदर्शक जमले होते. पालिसांनी निदर्शक सत्याग्रहींवर गोळीबार केला होता. ३ सत्याग्रही हुतात्मा झाले होते. उग्र झालेल्या निदर्शकांनी पोलीस ठाण्यालाच आग लावली. त्यात २२ पोलीस मृत झाले. संचारबंदी लागू करण्यात आली. गांधीजींनी हिंसेचा विरोध म्हणून ५ दिवस उपोषण सुरू करून नंतर आंदोलन मागे घेतले होते.

तरुण लक्ष्मण जोशी यांची घडण ज्या राष्ट्रीय वृत्तीच्या वातावरणात झाली होती, तिचा प्रभाव इतका प्रखर होता की त्यांनी परीक्षा, प्रवास सोडून महात्मा गांधींच्या आश्रमाचा रस्ता धरला. ते दोन महिने आश्रमात राहिले. १९२० ला महात्मा गांधींनी प्राज्ञपाठशाळेस भेट दिलेली होती. तोही प्रभाव होता. पुढे वर्षानंतर १९२३ मध्ये त्यांनी कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ'ही पदवी संपादन केली. त्यानंतर ते प्राज्ञपाठशाळेत विधिवत अध्यापक म्हणून कार्य करू लागले. न्याय, वेदान्त हे त्यांचे अध्यापनाचे विषय होते. तेव्हापासून ते 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' म्हणून ओळखले जाऊ लागले.

**वक्तृत्त्वाद्वारे धर्मसुधारणेचे कार्य -**

प्राज्ञपाठशाळा, वाई; योगानंद मठ, काशी येथील अध्ययन, अध्यापन, शास्त्रार्थ संगती, व्याख्याने, चर्चा, वादविवाद, चिंतनिका, व्युत्पत्ती, मीमांसा, पंक्ती लावणे, अर्थसंग्रह, तर्कसंग्रह इ. ज्ञानसाधना व उपक्रमांमधून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे वक्तृत्वकौशल्य दिवसांगणिक विकसित होत गेले. वाचन, चिंतन, मनन इ. प्रक्रियेतून तर्कतीर्थ स्वमत तयार करीत. 'बाबा वाक्यं प्रमाणम्'च्या विरुद्ध 'विद्यावतां भागवते परीक्षा' अंगीकारून त्यांनी स्वतःची अशी प्रतिपादन, चिकित्सा, मीमांसा शैली विकसित केली. त्यामुळे सनातन वा पारंपरिक पंडितांशी वादविवाद ही नित्याचीच गोष्ट होऊन बसली होती.

सन १९२३ ला वाईमध्ये ब्राह्मण परिषदेचे आयोजन करण्यात आलेले होते. परिषदेत ब्राह्मण पोटजातींच्या एकीकरणाचा मुद्दा उपस्थित झाला. मुळात या पोटजाती आख्यायिकांच्या आधारित आहेत. तर्कतीर्थांनी परिषदेत आख्यायिकांच्या आधारे पोटजाती करणे वा मानणे आणि त्याआधारे आचारप्रामाण्य सिद्ध करणे चुकीचे असल्याचे प्रतिपादन केले. त्यावर परिषदेत प्रक्षोभ तयार झाला. परिषद उधळायची वेळ आली. स्वामी केवलानंद सरस्वतींनी तर्कतीर्थांचा प्रतिवाद हा धर्मशास्त्रानुसार अर्थवाद असल्याचे स्पष्ट केले. अर्थवाद मानू नये असे धर्मशास्त्रात म्हटलेले आहे. त्यावर एवढा गहजब करण्याचे कारण नाही. या पहिल्या जाहीर वादविवादामुळे तर्कतीर्थ हे स्वतंत्र विचाराचे शास्त्री असल्याचे सर्वांच्या लक्षात आले. तद्वतच जरी त्यांचे मत स्वीकारार्ह ठरले नाही, तरी आपली मते धीटपणे व्यक्त करण्याच्या त्यांच्या बाण्याचा परिषदेवर प्रभाव पडणे स्वाभाविक होते.

सोनगिर हे धुळे जिल्ह्यातील एक ऐतिहासिक गाव. तेथे सन १९२६ (माघ, शके १८४७) मध्ये केशवदत्त महाराज यांच्या पुढाकाराने धर्मपरिषद योजण्यात आली होती. या परिषदेस सर्व धर्मपीठांच्या शंकराचार्यांना व धर्मनिर्णय, शास्त्रार्थ करणाऱ्या पंडित, पुरोहितांना आमंत्रित करण्यात आले होते. सदर परिषद कुकरमुंडा (जि. सुरत, गुजरात) येथील वैष्णव संस्थानचे अधिपती यांनी योजली होती. गुजरातेतील वल्लभ संप्रदायाचे पुष्टिमार्गी आचार्य, शारदापीठाचे शंकराचार्य, पुरीचे शंकराचार्य, करवीर पीठाचे शंकराचार्य कूर्तकोटी इ. आमंत्रित करण्यात आले होते. काशी, कलकत्ता, मद्रास येथील मोठे पंडित बोलवण्यात आले होते. काशीचे लक्ष्मणशास्त्री द्रविड, राजेश्वरशास्त्री द्रविड, कलकत्त्याचे महावेदान्ती अनंत कृष्णशास्त्री इ. उपस्थित होते. स्वामी केवलानंद सरस्वती, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीही परिषदेस उपस्थित होते. परिषद ही धर्मसुधारणेबाबतची विविध आचार्य पंडित इं. ची मते जाणून घेण्यासाठी योजण्यात आली होती. या परिषदेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रतिवाद केला.[७] चर्चा मीमांसा पद्धती विरुद्ध ऐतिहासिक पद्धतीच्या दृष्टिकोनावर आधारित अशी झाली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'मानवी बुद्धीला धर्म-परिवर्तन करता येते' हे ऐतिहासिक पद्धतीने सांगितले. वेद, स्मृती, पुराणादींमध्ये ऋषी-मुनींना परस्परविरोधी जे आचार सांगितले आहेत, ते सप्रमाण सादर केले. शिवाय वेद हे 'अपौरुषेय' नाहीत, पौरुषेयच आहेत, असे ठाम प्रतिपादन केले. अनंतकृष्ण शास्त्री यांनी तर्कतीर्थांच्या मताचा प्रतिवाद करत 'वेद हे स्वयंसिद्ध प्रमाण आहेत' असे स्पष्ट केले. मग तर्कतीर्थांनी 'शंकराचार्य ईश्वर नसून माणूसच आहेत' असे आपले मत मांडले. ऋषी-मुनी, आचार्य त्रिकालदर्शी नसून माणसंच आहेत. सबब वेद पौरुषेयच आहेत, असे त्यांनी म्हटले म्हणून परिषदेत क्षोभ निर्माण झाला. त्यावर स्वामी केवलानंद सरस्वस्तींनी 'आपली वादपद्धती दार्शनिक आहे. चार्वाक, शंकराचार्य, बुद्ध सर्वांचे विचार पूर्वपक्ष होते. वैदिक, अवैदिक चर्चा हा नित्यक्रम आहे. त्यामुळे मत स्वातंत्र्य पूर्वापार आहे,' हे सिद्ध केले. त्यामुळे परिषद चर्चा सुरू राहिली. पण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी इतक्या मोठ्या संख्येने उपस्थित आचार्य, पंडितांच्या परिषदेपुढे प्रगत, पुरोगामी दृष्टिकोण मांडून आपण पढीक पंडित नसून नवविचारक धर्मसुधारणावादी आहोत हे आपल्या वक्तृत्व, विवेचनातून स्पष्ट केले. त्याची ऐतिहासिक नोंद महत्त्वाची आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे सहाध्यायी श्री. शं. नवरे यांनी

म्हटलेले खरे आहे की, ''जुन्या पंडितांचे वादविवादाचे विशिष्ट आडाखे ठरलेले असतात. त्या परंपरेतच शास्त्रीबुवा वाढलेले असल्यामुळे केवळ या आडाख्यांच्या चापांत पकडून त्यांना कोणीही अडवू शकत नाही.''[८]

यानंतर सन १९२७ ला हैदराबाद येथे हिंदूधर्म परिषदेचे अधिवेशन झाले. त्यात वरील विचारांचाच आढावा घेण्यात आला. वामनराव नाईक यांनी ही परिषद आयोजित केली होती. पुढे याच वर्षी डिसेंबरमध्ये अकोला येथे ब्राह्मण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. स्वामी केवलानंद सरस्वतींना या परिषदेचे अध्यक्ष मुक्रर करण्यात आले होते. महादेवशास्त्री दिवेकर (प्राज्ञपाठशाळा शिक्षक) यांनी परिषदेत गोळा करून पुस्तिका प्रकाशित केली. पोटजाती एकीकरणाच्या कार्यास यामुळे गती आली व बळ मिळाले. परिषदेस 'ब्राह्मणपत्रिका' इस्लामपूरचे वासुदेवराव मुंडले, बापूजी अणे, डॉ. मुंजे, हैदराबादचे वामनराव नाईक, पां. वा. काणे, श्रीधरशास्त्री पाठक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कानडेशास्त्री प्रभृती उपस्थित असल्याची नोंद स्वामी केवलानंद सरस्वतींच्या आत्मचरित्र हस्तलिखितात आढळते.[९] प्राज्ञपाठशाळेच्या पुढाकारातून स्वामी केवलानंद सरस्वती आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी १९२० पासून जे प्रयत्न सुरू केले होते, त्यास १९२५ च्या धर्मकोश, १७ खंड व १९५२ नंतरच्या मीमांसाकोशाच्या ७ खंडांमुळे गती येत गेली, हे जरी खरे असले तरी अशा परिषदांमधून तर्कतीर्थांनी भीडभाड न बाळगता जे बिनतोड युक्तिवाद केले, ते त्यांचा संस्कृत भाषेवरील अधिकार, सभाधीटपणा आणि प्रभावी वाक्चातुर्य यांमुळे समाजमान्य व स्वीकृत होत गेले. १९२८ च्या २९ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर असे सलग दहा दिवस काशी येथे जे 'अखिल भारतवर्षीय ब्राह्मण महासंमेलन' संपन्न झाले, ते तर्कतीर्थांच्या आक्रमक भूमिकेमुळे बहुचर्चित झाले. या महासंमेलनासाठी केवळ संस्कृत पंडितांनाच आमंत्रित करण्यात आले होते. चर्चेसाठी समयबंध निश्चित करण्यात आला होता. तो पक्षपाती असल्याने के. ल. दफ्तरी, मुरुडकर शास्त्री, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव प्रभृतींनी महासंमेलनातून सभा त्याग करत बहिष्काराचे अस्त्र अवलंबिले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वादविवाद करून चर्चा घडवून आणण्याचे धोरण अवलंबिले. या संमेलनात धर्मशास्त्राचे जाणकार व विशेषाधिकारी गणले गेलेले सर्वश्री महामहोपाध्याय पंचानन शास्त्री, तर्करत्न भट्टाचार्य, महामहोपाध्याय वामाचरण भट्टाचार्य, महामहोपाध्याय लक्ष्मणशास्त्री द्रविड, महामहोपाध्याय अनंत कृष्णशास्त्री, न्यायाचार्य

राजेश्वरशास्त्री, ताराचरण भट्टाचार्य, शिरोळकर शंकराचार्य यांच्यासारखे अनेक मान्यवर, पीठासीन पंडित, शास्त्री असे ७०० विद्वान जमले होते. एकट्या बंगालमधूनच १५० पंडित आलेले होते. तर्कतीर्थांनी संमेलनाच्या प्रारंभीच नियमांतील पक्षपातीपणा लक्षात आणून देऊन खुलासा मागितल्याने एकच गोंधळ उडाला. पहिल्या दिवशी संमेलन संपल्यावर काशीच्या टाऊन हॉलमध्ये सनातनी वर्चस्वास आव्हान देऊ पहाणाऱ्या पुरोगामी पंडितांची स्वतंत्र बैठक बोलवण्यात आली होती. त्यास सुमारे ३५ पंडित उपस्थित होते. या दबावगटाने पुरोगामी धोरणावर दृढ राहण्याचे ठरवल्याने संमेलनात खडाजंगी चर्चा होत राहिल्या. संमती वय, विवाह वय, पोटजाती, जातीद्वेषमूलक ग्रंथांचे अप्रामाण्य, पोटजाती विवाह अशा अनेक विषयांवर तर्कतीर्थांच्या नेतृत्वाखाली वादळी चर्चा झडत राहिल्या. त्यामुळे यापूर्वी संमेलनावर असलेल्या सनातनी ब्रह्मवृंदाच्या एकांगी वर्चस्वास आव्हान दिले गेले. एक विरुद्ध ७०० असेच ते स्वरूप होते. शंकराचार्यांनी अधिकाराचा वापर करत सनातनी ठराव केले तरी वृत्तपत्र इ. तून चर्चेस मोठी प्रसिद्धी मिळाल्याने धर्मसुधारणा विचारांचा व्यापक प्रचार, प्रसार देशभर होण्यास साहाय्य झाले. धार्मिक क्षेत्रात धर्मसुधारणेसंबंधी लोकजागृती करण्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य स्वामींच्या नेतृत्वाखाली तर्कतीर्थांनी केले.

पुढील वर्षी लगेचच १९२९ मध्ये पं. मदन मोहन मालवीय यांनी प्रयागला सनातन धर्म परिषदेचे आयोजन केले होते. त्यात अस्पृश्यांच्या मंत्राधिकारावर चर्चा झाली. 'नमः शिवाय' की 'शिवाय नमः' म्हणायचे यावर वादंग झाले. तर्कतीर्थ या संमेलनास गेले नव्हते. पंडित मालवीय यांनी पुण्यास चित्रशाळेच्या पत्त्यावर तार करून मत मागवले. ही होती तर्कतीर्थांच्या व्यासंगी धर्मसुधारणा प्रयत्नांना मान्यता व पावती.

या सर्व धर्मसुधारणांच्या पार्श्वभूमीवर पुढे १९३२-३३ मध्ये महात्मा गांधींनी सुरू केलेल्या अस्पृश्यता निवारण, मंदिरप्रवेश अशा उपक्रमांना समाजाचा पाठिंबा चढत्या भाजणीने मिळत राहिला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी न थांबता पुढे वृत्तपत्रांतून लेख लिहिले. निबंध प्रकाशित केले. शुद्धिसर्वस्वम् (१९२८), भारतेतिहासतत्त्वम् (१९३३), अस्पृश्यत्वमीमांसा (१९३४) सारखे साहित्य म्हणजे धर्मसुधारणा चळवळीसंदर्भातील सप्रमाण संशोधनपर लेखनच होय. ते आज सुमारे शतकानंतर वाचत असताना ती तर्कतीर्थांची भविष्यवेध घेत केलेली पुरोगामी भरारीच वाटते. सन १९३०

मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'नवा मनू'[१०] मासिकातून 'धर्मशास्त्र विरुद्ध समाजसुधारणा' शीर्षकांतर्गत लेखमालिका लिहून एक प्रकारे धर्मसुधारणांसंबंधी आपली प्रतिबद्धता आणि प्रतिज्ञाबद्धताच जाहीर केलेली दिसून येते.

**स्वातंत्र्य चळवळीतील जनजागृती व जनसंघटन -**

वेदविद्या शिकण्याच्या हेतूने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत १९१४ ला दाखल झाले होते; तेव्हाची प्राज्ञपाठशाळा केवळ वेदाध्ययनाचे धडे देणारी वेदशाळा राहिली नव्हती. स्वतः नारायणशास्त्री मराठे हे राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. प्रा. वि. गो. विजापुरे यांनी पुण्याजवळील तळेगाव दाभाडे येथे १९०६ ला राष्ट्रीय शिक्षण देण्याचे हेतूने सुरू केलेले समर्थ विद्यालय ब्रिटिश सरकारने नाशिक येथील ब्रिटिश कलेक्टर जॅक्सन यांची हत्या होताच १९१२ ला तडकाफडकी बंद केले. ब्रिटिशांचा संशय होता की, तेथे सशस्त्र क्रांतीचे धडे दिले जातात. अचानक समर्थ विद्यालय बंद झाल्याने तेथील शिक्षक व विद्यार्थ्यांपुढे पर्याय शोधणे अनिवार्य झाले. समविचारी शाळा म्हणून त्यांनी प्राज्ञपाठशाळेची निवड केली. नारायणशास्त्री मराठे यांनी त्यास संमती दिली. १९१२ लाच दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर हे शिक्षक आपल्या विर्थ्यांसह प्राज्ञपाठशाळेत आले. 'त्यांना असे वाटत असे की, क्रांतीच्या मागे वेदान्ताची प्रेरणा पाहिजे.'[११] खुदिराम बोस हा क्रांतिकारी फाशीला जाताना 'भगवद्‌गीता' घेऊन गेला होता, ही घटना त्यामागची प्रेरणा होती.

''प्राचीन गुरुकुल पद्धतीचा पुनरुद्धार व्हावा व तिच्या द्वारे मातृभाषेचे माध्यम धरून नव्या व जुन्या विद्यांच्या शिक्षणाचा प्रसार व्हावा, भारतीय अध्यात्मविद्येची महती वाटावी, स्वदेशाच्या स्वाभिमान पोषक इतिहासाची मंडणी व्हावी व उत्तम धर्मनिष्ठ सेवकांची निर्मिती व्हावी असा विचार प्रभाव गाजवू लागला. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'ने स्वभाषेचा अभिमान उत्पन्न केला होता. लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीयत्वाची प्रेरणा उत्पन्न केलेली होती आणि बाबू अरविंद घोष, विवेकानंद व रामतीर्थ यांनी भारतीय अध्यात्मविद्येचा महिमा वाढविला होता. या सर्व गोष्टींचा संकलित प्रभाव आमच्या आश्रमावर पडला होता. स्वधर्म आणि देश यांची सेवेची दीक्षा घेतलेले लोक पाहिजेत, अशी अपेक्षा त्या वेळच्या राजकीय चळवळीत निर्माण झाली होती.''[१२] या वर्णनातून तर्कतीर्थ स्वातंत्र्य चळवळीत कसे ओढले गेले, हे स्पष्ट होते.

धर्मसभा नि धर्मपरिषदांतील एकांगीपणा व हेकेखोरपणा यांचा वीट येऊन तर्कतीर्थांनी स्वतःला स्वातंत्र्य चळवळीशी बांधून घेण्याचे ठरवले अन् १९३० च्या महात्मा गांधींच्या कायदेभंग आंदोलनात ते सक्रिय झाले. वाईतील त्यांची व्याख्याने प्रभावित करणारी ठरत होती. ते लक्षात घेऊन कराड येथे प्राज्ञपाठशाळेच्यावतीने तेथील विद्यार्थी 'आम्ही पांडवांसारखी शिस्त पाळू', असं आश्वासन देत प्रभात फेऱ्या काढत. याच सुमारास कृष्णेच्या घाटावर कराड येथे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची सलग आठ-दहा भाषणे झाली. ४-५ मे १९३० ला मिठाच्या सत्याग्रहात महात्मा गांधींना अटक झाली. जनतेतील क्षोभ टोकाला गेलेला होता. त्या पार्श्वभूमीवर झालेल्या भाषणांच्या अनेक आठवणी यशवंतराव चव्हाण यांनी लिहून ठेवल्या आहेत. अनेक लेख व 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्रात यांच्या नोंदी आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ''शेतकऱ्यांत जाऊन एकंदर पंचेचाळीस भाषणे दिली. कऱ्हाडच्या घाटावर सतत सात दिवस कायदेभंगावर व्याख्याने दिली. दहा-दहा हजार लोक व्याख्यानासाठी जमत. 'काय नाटकावानी बोलतुया' असे काही शेतकऱ्यांनी उद्गार काढले. तेव्हा तेथील प्रसिद्ध वकील आळतेकर, पांडूअण्णा शिराळकर, राघूअण्णा धोपाटे वगैरे मंडळींनी शास्त्रीबुवांना सांगितले, ''हे उद्गार म्हणजे तुम्हाला कॉंप्लिमेंट्स आहेत, गैरसमज करून घेऊ नका.''[१३] यातून तर्कतीर्थांच्या वक्तृत्वाचे प्रभावीपण स्पष्ट होते.

कराडच्या कृष्णा नदीच्या घाटावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिलेल्या भाषणांमुळे कराड परिसरातील जनतेत कायदेभंग चळवळीच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसंदर्भाने मोठी जागृती घडून आली. त्यातून जनता ब्रिटिशांविरुद्ध संघर्ष करण्यासाठी संघटित आणि कटिबद्ध झाली. या त्यांच्या भाषणांना परिसरातील शेतकऱ्यांसह सर्व सुशिक्षित, व्यापारी आणि इतर मंडळी तोबा गर्दी करीत. तीस वर्षांचा तरुण, चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचे प्रखर तेज, अंगावर बंगाली पद्धतीने घेतलेली शाल या तर्कतीर्थांच्या यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या व्यक्तिमत्त्व वर्णनास[१४] भाई माधवराव बागलांनीही आपल्या एका लेखात दुजोरा दिलेला आहे.[१५] ही भाषणे जनतेच्या दृष्टीने अविस्मरणीय ठरली. आपल्या भाषणांमधून तर्कतीर्थांनी पारतंत्र्याची खूप नवी मीमांसा केली. ते आपल्या भाषणांतून देशातील क्रांतीची उदाहरणे देऊन लोकमत चेतवत असत. या भाषणांचा वैचारिक प्रभाव सामान्य माणसावर आणि विशेषतः तरुण वर्गावर जास्त पडला.

तर्कतीर्थांच्या भाषणाची शैलीच आगळीवेगळी होती. त्याला देशभक्तीची धार होती. विचारांची पकड होती.

१९३० च्या मे महिन्याची संध्याकाळ असेल. सभा कृष्णाघाटावर होती. हजारो माणसे उन्हात तापलेल्या घाटावर बसली होती. उन्हाने तापलेला कातळ त्यावर बसणाऱ्या माणसाला भाजेल इतका गरम होता. शास्त्रीबुवा बोलण्यासाठी उभे राहिले आणि त्यांनी पहिले वाक्य उच्चारले ते असे - ''तुम्ही बसला आहात, तो घाट जसा गरम झाला आहे, तशी तुमची बुद्धी व मनं गरम झाली पाहिजेत. देशाची तुमच्याकडे आज ही मागणी आहे.''[१६] तरुण शास्त्र्यांचे हे एकच वाक्य सभा जिंकून गेल्याची नोंद यशवंतराव चव्हाण यांनी 'कृष्णाकाठ'मध्ये जशी करून ठेवली, तसेच एक वाक्य आपल्या मनात कायम घर करून राहिले असल्याचे सांगत त्यांनी ते नोंदवले आहे.-

''मी माझ्या गुरुंच्या पायाशी बसून सहा शास्त्रात[१७] पारंगत झालो आहे आणि आता मला या शास्त्रांचे रूपांतर शस्त्रांत करायचे आहे. ही मोठी शास्त्रे आता शस्त्रे बनली नाहीत, तर हिंदुस्थानात कायमची गुलामगिरी राहील.''[१८]

वरील भाषणानंतर कराड ब्रिटिश पोलिसांनी तर्कतीर्थांवर खटले भरले. या खटल्यांमुळेही लोकजागृती होण्यामध्ये भर पडली. याची चक्षुर्वैसत्यम् नोंद करत यशवंतराव चव्हाण यांनी लिहिले आहे की, ''या दोन्ही खटल्यांच्या वेळी मी मॅजिस्ट्रेट कचेरीमध्ये हजर राहून या खटल्यांची संपूर्ण हकिकत व कामकाज ऐकले व पाहिले आहे. सरकारी रिपोर्टरने त्यांच्या भाषणातील त्यांना वाटणाऱ्या आक्षेपार्ह मजकुरांची साक्ष द्यायची आणि ह्या वक्त्यांनी आपण हे बोललो आहोत आणि बचावाच्या कामात आपल्याला भाग घ्यावयाचा नाही, असे ठामपणे निवेदन करायचे, हाच परिपाठ पडला होता. माझ्या आठवणीप्रमाणे दोघांना (तर्कतीर्थ व काकासाहेब गाडगीळ. उभयतांची त्या वेळी भाषणे झाली होती.) सहा-सहा महिन्यांच्या सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या. तरीसुद्धा दोघेही हसतमुख होते. ते लोकांना नमस्कार करत आपल्या कोठडीत शिरल्याचे मी पाहिले आहे.''[१९]

या खटल्याची व अन्य शिक्षा भोगून परत आल्यावर ब्रिटिश पोलिसांनी तर्कतीर्थांवर पुन्हा खटला भरला. त्याची नोंद तत्कालीन साप्ताहिक केसरीमध्ये आढळते. 'वाईचे बातमीपत्र' (दि.१३-१-१९३१) मध्ये खालील मजकूर प्रसिद्ध झाला होता. त्याने याची पुष्टी होते. ''येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री

यांची नाशिक जिल्ह्यातील शिक्षा भोगून सुटका झाली असून सातारा जिल्ह्यातील पर्वाच्या गुन्ह्याबद्दल येथे त्याजवर खटला भरण्यात आला आहे. त्याची तारखी २३-१-१९३१ ही नेमली असून ते जामिनावर खुले झाल्यामुळे आजच ते वाईस आले. मोटार स्टँडवर डिक्टेटर[२०] श्री. वेलणकर यांनी त्यांस पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले व गांधी -चौकात झेंडावंदन होऊन आपल्या बिऱ्हाडी गेले.''[२१]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत वक्ते, प्रबोधक, संघटक, मार्गदर्शक अशा विविध भूमिकांतून कार्य केले. या कार्यामुळे ते भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी नेते म्हणून पुढे आले. केवळ सातारा जिल्ह्यातच नाही तर नाशिक, धुळे, नंदुरबार, बागलाण, कळवण, संगमनेर, अकोला, अहमदनगर इ. परिसरात त्यांनी अनेक भाषणे देऊन विविध सत्याग्रहांचे नेतृत्व केले.

**बागलाणचा जंगल सत्याग्रह व तुरुंगवास**

कायदेभंगाच्या चळवळीचा प्रारंभ मिठाच्या सत्याग्रहाने झाला. दांडीयात्रेद्वारे मीठ लुटल्यानंतर महात्मा गांधींना अटक झाली. महाराष्ट्रात सविनय कायदेभंग चळवळ चालू ठेवण्यासाठी राज्यस्तरीय समितीच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली महात्मा गांधींच्या संमती व मार्गदर्शनाने समित्यांचे गठन करण्यात आले. समित्या 'वॉर कौन्सिल्स' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या तर समितीचे प्रमुख संघटक 'डिक्टेटर' म्हणून ओळखले जाऊ लागले. डिक्टेटर जिल्हा, तालुका पातळीवर नेमून आंदोलन भारतभर पसरेल, परंतु नियंत्रक व मार्गदर्शक तत्त्वांनुसार चालेल याची खबरदारी घेण्यात आली. आंदोलन सर्वत्र व्हावे म्हणून केवळ मिठाचा सत्याग्रह होऊन चालणार नाही. कारण समुद्र सर्व ठिकाणी नाही. अशा समुद्र नसलेल्या ठिकाणी लुटलेले मीठ विकून स्वराज्य फंडासाठी निधी संकलित करण्याची मोहीम कार्यकर्त्यांनी राबवली. महाराष्ट्र राज्यासाठी ज्या प्रमुख समर्पित कार्यकर्त्यांची राज्यस्तरीय समिती नेमण्यात आली, तिचे प्रमुख शंकरराव देव व आचार्य शं. द. जावडेकर होते. समितीत ज्या समर्पित व प्रमुख नेत्यांचा अंतर्भाव करण्यात आला होता, त्यात सर्वश्री गंगाधरराव देशपांडे, प्रा. धर्मानंद कोसंबी, अच्युतराव पटवर्धन, लालजी पेंडसे, श्री. शं. नवरे, कमलादेवी चटोपाध्याय, द्वा. भ. कर्णिक, धनाजी नाना चौधरी प्रभृती मान्यवरांच्या बरोबरीने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीही होते. तशी नोंद मुंबई इलाखा गुप्तचर पोलीस नोंदीत आढळते.[२२]

ही चळवळ पुढे जंगल सत्याग्रह, अटकसत्र, विदेशी कापडावर बहिष्कार, दारुबंदी आंदोलन, मेळावे, मोर्चे, मिरवणुका, सभा, प्रभात फेऱ्या इ.च्या रूपाने शहरे, गावे, वाडी, वस्ती, पाडे इ. पर्यंत पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले होते. या आंदोलनात सर्व थरातील जनता- मध्यमवर्गीय, शिक्षित-अशिक्षित, कामगार, शेतकरी, विद्यार्थी, आदिवासी, महिला सर्वांचा सहभाग राहील, आंदोलन सर्वव्यापी व सर्वसमावेशक होऊन ते राष्ट्रीय आंदोलन बनेल असे नियोजन करण्यात आल्याची नोंदही पोलीस अहवालात दिसून येते.

नाशिक जिल्ह्यातील जंगल सत्याग्रहाची जबाबदारी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावर सोपवण्यात आली होती. तर्कतीर्थांनी बागलाण, कळवण, चांदवड, मालेराव, नांदगाव, साक्री, चाळीसगाव इ. अनेक ठिकाणी सभा घेऊन प्रभावी जनजागृती व लोकसंग्रह घडवून आणला. त्याचं शस्त्र होते भाषण. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, शेठ गोविंद, देवचंद भिका पाटील प्रभृती कार्यकर्ते टांग्याने खेड्यापाड्यात फिरून सभा घेत. हा सत्याग्रह ६ ऑगस्ट, १९३० रोजी मुक्रर करण्यात आला होता. त्याची पत्रके छापून गावोगावी वाटण्यात आली होती. जंगल सत्याग्रहासाठी 'भिलवाड' गावाची निवड करण्यात आली होती. कारण तेथील जंगल ब्रिटिशांनी पूर्णपणे राखीव घोषित केले होते. ब्रिटिश सरकारने स्वातंत्र्यपूर्व काळात वनराईचा कायदा केला होता. प्रत्येक शेतकऱ्याला जुलै, ऑगस्ट महिन्यांत नोटिसा निघत. १५ ऑगस्टपर्यंत वनचराई कर भरणे अनिवार्य असे. एवढे करूनही जनावरे जंगलात गेली की, ब्रिटिश वनरक्षक जनावरे पकडून कोंडवाड्यात ठेवून त्यांचा लिलाव करीत. या आंदोलनात तर्कतीर्थांनी भाषणे देऊन कोंडवाडे फोडण्याची, सारा न भरण्याची मोहीम राबवली. सरकारला विरोध दर्शविण्यासाठी २७५ गावकामगार पाटलांचे राजीनामे[२३] गोळा करण्यात आले. ते नाशिकचे तत्कालीन कलेक्टर आरू गार्डन यांच्याकडे पाठवण्यात आले. नाशिक जिल्ह्याचे काँग्रेस नेते दादासाहेब गद्रे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, सीताराम शास्त्री प्रभृतींनी बागलाण जंगल सत्याग्रहाचे नेतृत्व केले. जून महिन्यापासून जनजागर करण्यात आला होता. प्रत्यक्ष सत्याग्रह ५ ऑगस्ट १९३० रोजी मांगी-तुंगी डोंगर येथे पार पडला. तिथल्या जैन मंदिर परिसरात शेतकरी, कातकरी, आदिवासी असे लाखभर सत्याग्रही जमले होते. त्यात २००० आदिवासी स्त्रियाही होत्या. प्रत्येक सत्याग्रहींच्या हाती विळा, कोयता इ. हत्यारे होती. गवत नि झाडे तोडण्यासाठी प्रत्येकाने मूठभर पेंडी कापून कायदेभंग करण्याचे ठरविण्यात

आले होते. प्रारंभी गो पूजा करून चांदीच्या कुऱ्हाडीने घाव घालण्यात आला. चांदीच्या विळ्याने गवत कापण्यात आले. 'भारत माता की जय','महात्मा गांधी की जय','चले जाव' या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. नाशिक जिल्ह्याचे उपपोलीस अधिक्षक मोठी कुमक, बंदुका घेऊन तैनात होते. पण सत्याग्रहींच्या संख्येपुढे पोलीस कुमक मूठभरही नव्हती. तर्कतीर्थांच्या वक्तृत्व आणि संघटनकौशल्याने यशस्वी झालेल्या या सत्याग्रहाची नोंद घेत संशोधक इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे की, "Forest satyagrah in Baglan taluka received considerable importance. Baglan had earned reputation of being a 'Mini Bardoli' in those days"[24] १७,१८ आणि १९ ऑक्टोबर १९३० या तीन दिवशी कळवणजवळ सत्याग्रह करण्यात आला. या सत्याग्रहात पोलिसांनी धरपकड सुरू केल्यानंतर गोळीबार झाला. तर्कतीर्थ जंगलात फरार झाले. जंगलात त्यांची शाल सापडली पण ते सापडले नाहीत. ते पोलीस गोळीबारात ठार झाल्याची अफवा पसरली. दुसऱ्या दिवशी वाईत केवलानंद सरस्वतींच्या अध्यक्षतेखाली शोकसभा झाली. स्वामी केवलानंद सरस्वती शोक व्यक्त करून उद्गारले होते, 'एकेकाच्या नशिबी काय लिहिलेले असते.' नंतर फंदफितुरी होऊन तर्कतीर्थांना अटक झाली. त्यांच्या अटकेचे वृत्त, साप्ताहिक केसरीमध्ये सचित्र प्रसिद्ध झाले होते.[२५]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे जंगल सत्याग्रहातील कार्य, भाषणे, फरार होणे, फंदफितुरीने अटक, त्यानंतर तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा व ५० रुपये दंड,[२६] सुटकेनंतर नवनव्या खटल्यांचा ससेमिरा, या सर्व गोष्टी त्यांना स्वातंत्र्य सेनानी ठरविण्यास खरे तर पुरेशा आहेत. या सर्व घडोमोडीतून तर्कतीर्थ तावूनसुलाखून निघाले. त्यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान अधोरेखित करत द्वा. भ. कर्णिकांनी लिहिले आहे की, ''१९३० सालच्या सत्याग्रहाचे एक पुढारी म्हणून ते महाराष्ट्रात अग्रगण्य झाले. त्या सत्याग्रहात ते सामील झाले, त्याव वेळी त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. कारण त्या सत्याग्रहामुळे ते प्राज्ञपाठशाळेच्या वैराग्यशील वातावरणातून बाहेर पडले आणि बऱ्या-वाईट, त्यागी आणि सुखलोलुप, श्रद्धावान आणि निःश्रद्ध, भावनोत्कट आणि विचारशील अशा सर्व प्रकारच्या मंडळींच्या जीवनाशी ते समरस झाले.''[२७]

**गांधीवाद ते रॉयवाद प्रवास -**

''गांधीजींनी १९३० साली कायदेभंगाची मोहीम सुरू केली तेव्हा शास्त्रीबुवांनी आपल्या परंपरेचा, तसेच संस्थेच्या (प्राज्ञपाठशाळा)

भवितव्याचाही विचार न करता या संग्रामात उडी घेतली. शास्त्रीबुवांचे वैशिष्ट्य असे की कोणतेही कार्य वा चळवळ हाती घेतल्यानंतर हातचे राखून काम करावयाचे नाही असा त्यांचा मनःपिंड होता. कायदेभंगाच्या या चळवळीत त्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने उभा ग्रामीण महाराष्ट्र चेतविला, पेटविला. ब्रिटिश साम्राज्यविरुद्ध ते नुसती आग ओकीत गेले आणि सत्याग्रहासाठी त्यांनी प्रक्षुब्ध वातावरण तयार केले.''[२८]

- हे निरीक्षण नोंदवले आहे त्यांचे कायदेभंग चळवळीतील व नंतर रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीतील सहकारी द्वा. भ. कर्णिक यांनी. या कर्णिक बंधूंमुळेच (द्वा. भ. आणि वसंतराव कर्णिक) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा मार्क्सवाद, मार्क्सवादी साहित्य, मानवेंद्र रॉय, रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी इत्यादींशी क्रांतिकारी वाचन, विचार नि व्यवहाराच्या अंकाने परिचय झाला व ते डाव्या विचारांकडे ओढले गेले.

१९३० ची कायदेभंगाची चळवळ १९३४ पर्यंत सक्रिय राहिली. तर्कतीर्थ १९३२ मध्ये पुन्हा पकडले जाऊन त्यांच्यावर खटला दाखल झाला. परत दहा महिन्यांसाठी धुळ्याच्या तुरुंगात त्यांची रवानगी करण्यात आली.[२९] 'धुळे कारागृहात त्यांना भेटलेल्या महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजे विनोबा भावे, जमनालाल बजाज, साने गुरुजी, गुलजारीलाल नंदा, पुरुषोत्तमदास त्रिकम या होत.'[३०] १९३२ च्या फेब्रुवारी-मार्चमध्ये अटक झाल्यावर १९३२ च्या नोव्हेंबरमध्ये ते तुरुंगातून बाहेर आले. या काळात ते पुण्यात अधिक असत.

धुळ्यातील तुरुंगात असताना तर्कतीर्थ कलकत्त्याच्या माधवजी सेठ यांना 'उपनिषद' असत. माधवजी सेठ त्याची टिपणे काढत. त्यात अस्पृश्यतेसंदर्भात झालेल्या चर्चेची टिपणे होती. ती जमनालाल बजाज यांच्या पाहण्यात आली होती. ती टिपणे पुरोगामी होती. तुरुंगातून सुटका होताना निरोप देत जमनालाल म्हणाले होते की, 'तुमची अस्पृश्यतेवरील मते महात्माजींच्यापर्यंत कशी पोहोचवावी याबद्दल विचार करतो.'[३१] त्यानुसार त्यांनी पुढे ती महात्मा गांधींपर्यंत पत्राद्वारे पोहोचवली. तर्कतीर्थ तुरुंगातून येऊन वाईस प्राज्ञपाठशाळेत येऊन जाऊन अध्यापन कार्य करीत असत. तर्कतीर्थांचे एक मित्र धुंडिराजशास्त्री देव महात्मा गांधींचा निरोप घेऊन वाईस आले. त्यानुसार तर्कतीर्थ महात्मा गांधींना भेटण्यासाठी म्हणून येरवडा (पुणे) कारागृहात गेले. १३ डिसेंबर, १९३२ ते ३१ डिसेंबर, १९३२ या पंधरवड्यात सात वेळा महात्मा गांधींशी भेट होऊन चर्चा झाल्याच्या नोंदी

आहेत.[३२] त्यांच्यासोबत के. ल. दफ्तरी, श्रीधरशास्त्री पाठक, कोकजे शास्त्री, आनंद शंकर वैद्य, भगवानदास, हरिभाऊ फाटक प्रभृती मान्यवर वेळोवेळी उपस्थित असत. महात्मा गांधींनी मंदिरात प्रवेश व अस्पृश्यता निवारणाचा जो कार्यक्रम पुढे हाती घेतला त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, स्वामी केवलानंद सरस्वती यांची भूमिका मोठी होती. पुढे महात्मा गांधींनी आपल्या 'हरिजन' पत्रात अस्पृश्यता निवारण कार्यक्रमासंबंधी शास्त्रीपंडितांचा अभिप्राय स्पष्ट करणारे पत्रक[३३] प्रसिद्ध केले होते. तो हरिजन पत्राचा पहिलाच अंक होता. त्यावर ज्या सात पंडितांच्या स्वाक्षऱ्या होत्या त्यापैकी एक लक्ष्मणशास्त्री होते. ते पत्रक तर्कतीर्थांनीच तयार केले होते. यातून तर्कतीर्थांची वाक्पटूता, तर्कबुद्धी व मीमांसाकौशल्य स्पष्ट होते.

त्यानंतर भारतात हरिजनांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून आंदोलन सुरू झाले. नाशिक, त्रावणकोर, वायकोम इ. ठिकाणी सत्याग्रह झाले. मंदिर प्रवेश कायदा करण्याचं आश्वासन देण्यात आलं. या नियोजित कायद्याविरोधात सनातनी मंडळींची मोठी सभा शिवाजी मंदिर, पुणे येथे झाली. सनातन्यांच्या विरोधार्थ भाषण करण्यासाठी तर्कतीर्थ उभे राहिले. तेव्हा चाळीसएक लाठीबंद तरुण गरजले, 'तुम्ही खाली बसा, नाही तर तुम्हांस आम्ही मारू.' शास्त्रीबुवा त्यांस भ्याले नाहीत, पण मारणाऱ्यांना एक प्रकारचे आव्हान देऊन ते तेथेच अखेरपर्यंत बोलत उभे राहिले. ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते हरिभाऊ फाटक यांनी ही गोष्ट नंतर महात्मा गांधींजींच्या कानावर घातली. तेव्हा गांधीजी उद्गारले, 'He is the greatest satyagrahi.'[34] वक्ता म्हणून आपल्या मताशी प्रतिबद्ध राहून अत्यंत निडरपणे आपली मते मांडण्याच्या त्यांच्या या स्वभावामुळेच ते पुढे गांधीवादाकडून सशस्त्र क्रांतीच्या विचारांकडे आकर्षित झाले.

सन १९३४-३५ च्या दरम्यान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मार्क्सवादाचे विधिवत वाचन, चिंतन, मनन सुरू केले. याला तुरुंगातील दिवसांची पार्श्वभूमी होती. सन १९३० च्या तुरुंगवासात त्यांची द्वा. भ. कर्णिकांशी गाठ पडली. सन १९३२ च्या तुरुंगवासात तुरुंगात मानवेंद्र रॉय यांची सशस्त्र क्रांतीसंबंधीची पत्रे येत. त्यामुळे तर्कतीर्थांच्या मनात मार्क्सवादाबद्दलचे कुतूहल जागे झाले. त्यांनी एंजल्स वाचला. 'अँटी-ड्युरिंग', 'डायलेक्टिस ऑफ नेचर' वाचले. रायझानोव्हच्या भाष्यासह कार्ल मार्क्सचा 'मॅनिफेस्टो ऑफ दि कम्युनिस्ट पार्टी' वाचला. नंतर सबंध

प्लेखानोव्ह वाचला. प्लेखानोव्ह हा लेनिनचा गुरू, रशियन मार्क्सवादाचा संस्थापक. स्टेसचे 'हेगेल' वरचे पुस्तक वाचले. यातून त्यांचे मार्क्सवाद, क्रांती, समाजवाद इ. बद्दलचे आकर्षण वाढले. त्याची परिणती मानवेंद्र रॉय यांच्या 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी'मध्ये सक्रिय होण्यात झाली. फैजपूर कॉंग्रेस अधिवेशन (१९३६) झाले. त्यात मानवेंद्र रॉय यांचे भाषण सर्वांपेक्षा वेगळे वाटले. विशेषतः त्या भाषणातील समांतर सत्ताकेंद्रे निर्माण करण्याचा विचार अभिनव होता. पुढे १९४० ला मानवेंद्र रॉय यांनी स्वतंत्र पक्ष स्थापन केल्यावर तर्कतीर्थ गांधीवादाला रामराम ठोकून नव्या पक्षात सक्रिय झाले.

'मी रॉयवादी का झालो?'[३५] हा शीर्षक लेख लिहूनच तर्कतीर्थांनी पक्षांतरविषयक आपली भूमिका विशद केली आहे. हे दिशांतर सहज घडले नाही. त्यामागे त्यांना मोठ्या वैचारिक झगड्यातून जावे लागले, ते या लेखातून स्पष्ट होते. 'मूलतःच विरोधी असलेली विचारसरणी माझ्या विचारपंथात आल्याबरोबर क्षोभ उत्पन्न करून मला विचारास प्रवृत्त करते'[३६] याची कबुली तर्कतीर्थ प्रस्तुत लेखात देतात. 'मौलिक विलक्षणता' हे पक्षांतराचे कारण असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. पक्ष कार्यरत झाल्यावर देशभर शाखा उघडण्यात आल्या. शिबिरे, व्याख्याने मेळावे, निवडणुका, संघटन सर्व आघाड्यांवर तर्कतीर्थ सक्रिय सहभागी असत. अभ्यास, शिबिरे, (स्टडी कॅम्पस्) होत. जत, वज्रेश्वरी, आकलोळी, कुंड, कुलाबा, कराड, पोयनाड, अलिबाग, कणकवली इ. शिबिरांत वक्ते म्हणून तर्कतीर्थांनी केलेल्या कार्यामुळे पक्षास शेतकरी, तरुण विद्यार्थी यांचे मोठे पाठबळ लाभले.

**लेखन प्रारंभ -**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या लेखन, संपादन, समीक्षा कार्याचा प्रारंभ प्राज्ञपाठशाळेतच झाला. स्वामी केवलानंद सरस्वती हे लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे गुरू. त्यांनी २२ ऑक्टोबर, १९३१ला संन्यासदीक्षा घेतली. पण त्यापूर्वी त्यांनी १९२५ पासून प्राज्ञपाठशाळेतून अंग काढून आपले सारे लक्ष धर्मसुधारणांकडे केंद्रित केले. जानेवारी, १९२६ मध्ये सोनगिर (खानदेश) येथील वै. केशवदत्त महाराज यांनी ह. भ. प. संतोजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली गोविंद महाराज यांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने जो अर्चामहोत्सव आयोजित केला होता, त्यानिमित्ताने जी पंडित परिषद बोलविली होती, त्यास ते लक्ष्मणशास्त्रींसह उपस्थित होते. नंतर सन १९२७ला

हैद्राबाद येथे हिंदू धर्मपरिषद झाली, त्यालाही ते उपस्थित होते. १९२८ ला अखिल भारतीय ब्राह्मण परिषदेतही ते सहभागी होते. सनातनी पंडित 'बाबा वाक्यं प्रमाणम्'चा ठेका सोडायला तयार नव्हते. स्वामी केवलानंद सरस्वती कालानुसारी धर्मसुधारणेचे पक्षधर होते. धर्मसुधारणा व धर्मजागृतीच्या उद्देशाने स्वामींनी तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषद १९३४ मध्ये गठीत केली. नंतर त्याचे रूपांतर धर्मनिर्णय मंडळात १९३७ मध्ये केले. १९२५ पासून एकीकडे धर्मकोश निर्मितीचे कार्य, तर दुसरीकडे मीमांसाकोश रचना असे करत स्वामींनी कायावाचामने धर्मसुधारणेचे कार्य हाती घेतले. त्यात तर्कतीर्थांचा सक्रिय सहयोग असे. यातून तर्कतीर्थांच्या लेखन, वाचन, अध्यापन, संशोधन, समीक्षा कार्यास सन १९२३ नंतर खरी उभारी आली.

**आनंदमीमांसा (१९२८) -**

तर्कतीर्थांनी 'लेखसंग्रह'च्या प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे की 'आनंदमीमांसा' हा निबंध म्हणजे माझे अगदी पहिले लेखन होय.[३७] हे ग्रंथ संदर्भातील विधान म्हणून पहावे लागते. कारण याच दरम्यान साप्ताहिक केसरीत 'निर्णयाची शास्त्रशुद्धता' शीर्षकाने सलग ५ लेख काशी येथे संपन्न ब्राह्मण महासंमेलनाच्या अनुषंगाने प्रसिद्ध झालेले दिसतात.[३८] आनंदमीमांसा या ६८ पृष्ठांच्या निबंधामध्ये प्रपंचविषयक दुःखवाद व आनंदवाद यांचे ऐतिहासिक व तात्त्विक संक्षिप्त समालोचन करण्यात आलेले आहे. आनंदसिद्धांताचे मूळ उगमस्थान उपनिषदात सापडते. हे लिहिणाऱ्या ऋषींनी आनंदसिद्धांताच्या नावाखाली दुःखवादच सांगितला असल्याचे तर्कतीर्थांनी या ग्रंथात स्पष्ट केले आहे. दुःखवाद हा धर्म, नीती आणि मानवी प्रगतीस मारक असल्याने त्याज्य समजला पाहिजे. आनंदसिद्धांतच प्रगती पोषक आहे. आधिभौतिक व आध्यात्मिक सुखवादच (सात्त्विक सुखवाद) भारतीय समाजहिताचा आहे. सदर ग्रंथ मराठीत लिहिला आहे.

**शुद्धिसर्वस्वम् (१९२८) -**

आनंदमीमांसानंतरचा हा तसाच छोटा, अवघा ३७ पृष्ठांचा निबंध होय. संस्कृतमध्ये लिहिलेल्या या निबंधात सनातन धर्मानुसार हिंदू धर्मेतरांच्या हिंदूधर्म प्रवेशासंदर्भातील प्रायश्चित्तांची चर्चा आहे. म्लेच्छपदार्थ, म्लेंच्छ संसर्ग झाल्यास प्रायश्चित्त, पतन पदार्थ, संसर्ग स्वरूप, संसर्गपातित्ये, कालसंसर्गविशेष नियम, कामाकामकृत्त प्रायश्चित, पतित संतती, शिष्टाचार प्रामाण्य, व्रात्यशुद्धी, म्लेंच्छ इत्यादींचे सनातन धर्माधिकार, अत्यंजविषयक अस्पृश्यता इत्यादी विषयांची सदर निबंधात चर्चा करण्यात आली आहे.[३९]

थोडक्यात, हा ग्रंथ म्हणजे धर्मशुद्धी सातत्य राखण्यासाठीच्या विविध मार्गांची चर्चा करणारा एका अर्थाने 'प्रायश्चित्तविधान ग्रंथ' होय. १९२८ च्या काशी येथील ब्राह्मण महासंमेलनात झालेल्या निर्णयांच्या पार्श्वभूमीवर लिहिण्यात आलेला हा ग्रंथ होय.[४०] तो त्या वादांचा सारसंग्रह होय.[४१] यात तर्कतीर्थांनी लोकसंग्रह हेतूने धर्मशुद्धीचे समर्थन व पुरस्कार केला आहे. यात 'चांडाल' शब्दाची मीमांसा करण्यात आली आहे. हिंदूधर्मीय सार्वजनिक ठिकाणी अन्य धर्मीयांना अस्पृश्य मानत नाहीत. तर मग स्वधर्मीयांना अस्पृश्य मानण्यात काय अर्थ आहे? अशी पृच्छा करणारा ग्रंथ तर्कतीर्थांना पुरोगामी पंडित सिद्ध करतो. या ग्रंथाच्या मराठी भाषांतराची योजना होती, पण ती फलद्रूप झालेली दिसत नाही.

**भारतीयधर्मेतिहासतत्त्वम् (१९३३) -**

प्राच्यविद्या परिषद, बडोदा (गुजरात) येथे सादर करण्यासाठी म्हणून तयार करण्यात आलेला हा शोधनिबंध. अवघ्या १६ पृष्ठांच्या या संस्कृत निबंधात ऐतिहासिक पद्धती व मीमांसा पद्धतीचा समन्वय करून तिचे फलित शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सदर निबंधात बदलता काळ व परिस्थिती संदर्भात धर्माचा विचार करण्याची आवश्यकता तर्कतीर्थांनी स्पष्ट केली आहे. धर्मस्वातंत्र्य ही गोष्ट सनातन (शाश्वत) मूल्य आहे. राज्याचा कोणताही धर्म असो, प्रजेच्या विविध धर्मांचे स्वातंत्र्य अबाधित राखणे हे राजसत्तेचे कर्तव्य असते. संयुक्त राष्ट्रसंघ (युनो) सारखी संस्था अस्तित्वात येऊनही तिला हे करणे शक्य झाले नाही. हे लक्षात घेता व धर्माचा समाजजीवनावर असलेला पगडा लक्षात घेऊन यापुढे संकुचित अशी कोणतीही धार्मिक व सामाजिक परंपरा आत्मोद्धारास व विश्वोद्धारास समर्थ ठरेल असे वाटत नाही. म्हणून धर्मातील शाश्वत मूल्ये अंगीकारून कालोचित धर्मसुधारणा करणे यातच मानवाचे कल्याण सामावलेले आहे. ते भारतीय धर्माचे खरे मर्म आहे.

**जडवाद अर्थात् अनीश्वरवाद (१९४१) -**

जडवाद हे एक तत्त्वज्ञान आहे. तत्त्वज्ञान हे जीव आणि जगत किंवा आत्मा आणि सृष्टी यांच्या संबंधांचा अभ्यास करते. जडवाद हे तत्त्वज्ञान विज्ञानपूरक आहे, पण विज्ञान ही स्वतंत्र व तत्त्वज्ञानापेक्षा श्रेष्ठ गोष्ट होय. जडवादानुसार द्रव्याच्या तीन श्रेणी होत - जड, जीव आणि चेतन. शरीर, आत्मा आणि बुद्धी यांचा विचार करता विज्ञान व ईश्वर यातील सत्य काय हे तर्क, अनुभव आणि नियम या आधारे स्पष्ट होते. जीवनात असलेली

ईश्वरीय संकल्पना ही आइन्स्टाइनने म्हटल्याप्रमाणे केवळ वाङ्मयीन कल्पना-विलास आहे. नियमबद्ध पद्धतीने जे सत्य सिद्ध होत नाही, ते व्यक्त करणे म्हणजे मानवी दौर्बल्याचेच प्रकटीकरण असते. आत्मा, ईश्वर या केवळ कल्पना, तर्क होत. ते गूढ या पलीकडे त्याचे अस्तित्व नाही. विज्ञान गूढ उकलून सत्यरूप नियम, सूत्र पद्धतीने अनुभवजन्य बनवते. ते सार्वत्रिक सत्य असते. कणाद, कपिल, बुद्ध, चार्वाक हे श्रेष्ठ तत्त्वज्ञ अशासाठी की त्यांनी ईश्वरीय सत्ता नाकारून माणूस व त्याचा लौकिक आचारविचार प्रमाण मानला. विज्ञानात अलौकिक, चमत्कार, अवतारास वाव असत नाही. 'चक्षुर्वैसत्यं प्रमाणं'च्या कसोटीवर उभा असलेला जडवाद हा अनिश्वरवाद अशासाठी की तो ईश्वरीय सत्ता नाकारून भौतिक विश्व प्रमाण मानतो. मानवी जीवन, चरित्र व वर्तन व्यवहारासाठी ईश्वराची गरज नाही. ईश्वरी संकल्पनेच्या आधारे मानवी जीवन वेठीस धरणे म्हणजे पारलौकिक, गूढ, अलौकिक सृष्टीचे समर्थनच असते. जडवाद त्यास छेद देणारे व बरोबर त्याच्याविरुद्ध सत्य सांगणारे वैज्ञानिक तत्त्वज्ञान होय.

**प्रकाशित भाषणसंग्रह -**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अनंत विष्णू पाटणकरांना दिलेल्या मुलाखतीत सन १९५३ साली हे विचारल्यानंतर की, 'आजपर्यंत आपली सामान्यपणे जाहीर व्याख्यानांची संख्या कुठपर्यंत पोहोचली आहे?' उत्तर दिले होते की, 'एक सहस्त्रापेक्षा अधिक भाषणे आजपर्यंत दिली असतील.'[४२] या उत्तरानंतर तर्कतीर्थ चार दशके भाषणे देत राहिले. सन १९२३ मध्ये तर्कतीर्थ जाहीर भाषणे देऊ लागले. ३० वर्षांत हजार भाषणे, नंतरचा काळ तर त्यांच्या सामाजिक मान्यता नि वक्ते म्हणून लोकमान्य होण्याचा. 'साहित्य संमेलनाला अध्यक्ष म्हणून ते दिल्लीला जेवढ्या सहजपणे गेले, तेवढ्याच सहजपणे एखाद्या छोट्या दुकानाच्या उद्घाटनालाही जात राहिले.'[४३] 'तर्कतीर्थ : एक व्याख्याते' म्हणून प्रा. रा. ग. जाधव यांच्यासारखा त्यांच्या सहकारी, चरित्रकार, संपादक, समीक्षक म्हणून अनेक वर्षे सहवासात राहिलेल्या सव्यसाची साहित्यिकांनी नोंदवलेली पुढील निरीक्षण खरोखरीच लक्षवेधी होत - ''शास्त्रीजींना लिहिण्यापेक्षा बोलणे अधिक प्रिय होते... ते जसे लिहीत तसेच बोलत... त्यांची बोलण्याची शैली पुस्तकी नसे... लिहिण्याची शैली बोलकी असे... शास्त्रीजींच्या बाबतीत मौखिक आणि ग्रांथिक असा भेद संभवत नसे... वाणी आणि लेखणी यांच्यातील आशय-अभिव्यक्तीचे अद्वैत हे शास्त्रीजींचे वैशिष्ट्य होते. बहुधा महिन्याच्या तीस

दिवसांपैकी जवळ-जवळ वीस-बावीस दिवस शास्त्रीजी व्याख्यानांच्या निमित्ताने महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेरही संचार करीत असत... सुमारे अर्धशतकभर व त्यातील दोन तृतीयांश काळ समाजाचे नाना प्रकारे वैचारिक उद्‌बोधन करण्यासाठी व्याख्यानव्रत चालवणे, ही सोपी गोष्ट नाही. शास्त्रीजींच्या व्याख्यानकलेत पारंपरिक आचार्यवंशाच्या खुणा अधिक दिसून येतात.''[४४] ''तर्कतीर्थांनी वर्षानुवर्षे प्रसन्न अशा व्याख्यानांच्या धारा नित्य बरसत ठेवल्या...

**वाग्वै तत्सर्व विज्ञापयति वाचमुपास्स्वेति स**
**यो वाचं ब्रह्मोत्युपास्ते ।**
**यावद्वाचो गतं तत्रास्य यथा कामचारो भवति**
**यो वाचं ब्रह्मोत्यपास्ते ।।** (उपनिषद)

वाणीमुळे सर्वज्ञान प्राप्त होते, म्हणून वाणीची ब्रह्म समजून उपासना करावी. तर्कतीर्थांनी ती केली.''[४५]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या जीवनकाळात वरील सर्व पार्श्वभूमीवर अक्षरशः हजारो व्याख्याने दिली असतील. त्यांच्या नोंदींची जंत्री उपलब्ध नाही. हे जरी खरे असले तरी उपलब्ध व्याख्यान संहिता, वृत्ते, पुस्तिका, भाषण संग्रह यांच्या आधारे त्यांच्या भाषणांचा स्थूल असा आढावा घेणे शक्य आहे. एकतर त्यांनी विविध विद्यापीठे, संस्था, स्मृती व्याख्यानमाला, साहित्य संमेलने यांमधून जी विद्वत्तापूर्ण भाषणे दिली, त्यांचे संग्रह उपलब्ध आहेत. तर्कतीर्थ साहित्य म्हणून जे ग्रंथ समोर येतात, त्यातील अधिक भाषण संग्रहच आहेत - हिंदूधर्माची समीक्षा (१९४१), ज्योति-निबंध (१९४७), आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत (१९७३), सर्वधर्मसमीक्षा (१९७६), शिखांचा पंथ व इतिहास (१९८४), आद्यशंकराचार्य : जीवन आणि विचार (संपा. अरुंधती खंडकर) (१९९७), साहित्याचे तर्कशास्त्र (संपा. सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे) (२०१२) या संग्रहांमधून दीर्घ अशा ३२ भाषणांच्या संहिता आपणापुढे येतात. यांशिवाय सुमारे शंभर एक व्याख्यानांच्या पुस्तिका, संहिता, वृत्तांत, हस्तलिखित इ. संशोधन संग्रहाच्या निमित्ताने हाती आल्या आहेत. भारतात स्वातंत्र्यलढ्यापासून वक्तृत्व कलेस विशेष स्फुरण चढल्याचे दिसते. महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा, प्रबोधन, स्वातंत्र्य चळवळ, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, आणीबाणी, मंडल आयोग, दलित चळवळ, राजकारण, इत्यादींमुळे वक्तृत्व कला उजळत गेल्याचे दिसते. गेल्या शतकात शि. म.

परांजपे, नाथ पै, स्वातंत्र्यवीर सावरकर, साहित्यिक आचार्य प्र. के. अत्रे. प्रा. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, समाजसेवक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्यासारख्या वक्त्यांची भाषणे गाजली. त्यांच्या गाजलेल्या भाषणांचे संग्रहही मराठी साहित्यात उपलब्ध आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याच पठडीतील वक्ते होत. स्वप्नसृष्टी, अत्रे उवाच, हशा आणि टाळ्या, चिंतन, जागर, तीन भाषणे, शतकातील दलित विचार, शतकाची विचार शैली (चार खंड), संमेलनाध्यक्षांची भाषणे असे अनेक भाषण संग्रह मराठी साहित्यात उपलब्ध आहेत. त्या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचेवरील भाषण संग्रह आणि आगामी भाषण खंडांत संग्रहित तर्कतीर्थांची अन्य अनेक भाषणे त्यांचे वक्तृत्व समजून घ्यायला म्हणून आपल्या हाती आहेत. ती तर्कतीर्थांच्या विचारधारेची निदर्शक होत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या कार्याचा विचार केवळ प्राज्ञपाठशाळा मंडळ, मराठी विश्वकोश निर्मिती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्याद्वारे केलेला मराठीचा ज्ञानभाषा म्हणून केलेला विकास या मर्यादेत आजवर झाला आहे. महाराष्ट्रभर समग्र साहित्य संपादनाच्या निमित्ताने फिरताना व साधन संग्रहातून लक्षात आलेली गोष्ट अशी की त्यांनी मुंबईसारख्या महानगरात 'सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज' नावाची संस्था सन १९७२ मध्ये आपल्या रॉयिस्ट सहकारी प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. अ. भि. शहा, प्रा. एन्. व्ही. सोहनी, गोविंदराव तळवलकर, नीलकंठ कल्याणी प्रभृती मान्यवरांसह सुरू केली होती. ती आज ग्रंथालय, संशोधन, समाज परिवर्तन, महिला सबलीकरण, मनुष्यबळ विकास क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर आघाडीवर आहे. तर्कतीर्थ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अनेक वर्षे अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात ती संस्था कर्जमुक्त होण्यास सहाय्य होऊन तिला स्थैर्य प्राप्त झाले. वाईतील सध्याचे किसनवीर महाविद्यालय तर्कतीर्थ यांनी जनता शिक्षण संस्था स्थापून सुरू केले होते, ते वाईसारख्या तत्कालीन छोट्या गावात उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून. तर्कतीर्थांनी प्राच्यविद्या विकासाच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेली भाषणे, सादर केलेले शोधनिबंध कुणास माहीत आहेत? मुंबईच्या एशियाटिक सोसायटी, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थांतील त्यांची भाषणे कोण जाणतो? भांडारकर प्राच्यविद्या संस्थेतील त्यांचे कार्य आणि झालेला गौरव अद्याप अंधारात आहे. साहित्य अकादमी पुरस्कार

मराठीस प्रथम मिळवून देणारे तर्कतीर्थ सर्वांना माहीत आहेत. पण साहित्य अकादमीने त्यांना आपले 'महदत्तर सदस्यत्व' (फेलोशिप) बहाल केले होते व त्या वेळी त्यांनी केलेले भाषण व त्यांना मिळालेले सन्मानपत्र अद्याप गुलदस्त्यात आहे. 'तर्कतीर्थ' पदवी कुणी पाहिली आहे? या नि अशा कितीतरी पैलूंवर अद्याप प्रकाश पडलेला नाही. 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' संपादन व प्रकाशन प्रकल्प हे या संदर्भात उचललेले छोटेसे पाऊल होय. त्याद्वारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवन, कार्य, विचारांचा समग्र आढावा घेणे शक्य होईल. त्यातून त्यांच्या संशोधन आणि पुनर्मूल्यांकन कार्यास गती येईल, असे वाटते. माहीत नसलेले तर्कतीर्थ समजून घेणे म्हणजे तर्कतीर्थांच्या जीवन, कार्य, विचारांचा समग्र धांडोळा ठरेल.

***संदर्भ आणि टीपा :***


१. *माझ्या शब्दात मी - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पाक्षिक रुद्रवाणी, १५ जानेवारी १९७२, पृ. ७*

२. *अध्ययन आणि वैचारिक वाटचाल - मे. पुं. रेगे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (मुलाखत), नवभारत, फेब्रु-मार्च १९८१, पृ.७.*

३. *माझ्या शब्दांत मी - पूर्वोक्त, पृ. ८.*

४. *गुरुवर्य श्री. विनोबा यांच्या संबंधी काही स्मृतिशेष - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक, २00१ पृ. ५४.*

५. *कित्ता - पृ. ५५.*

६. *अध्ययन आणि वैचारिक वाटचाल - पूर्वोक्त, पृ. ११.*

७. *अ) स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणा चळवळ - लक्ष्मणशास्त्री जोशी, (मुलाखत), नवभारत, डिसेंबर - १९७८, जाने १९७९, पृ. १.*
*आ) मी व माझे वक्तृत्व - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, संपा. अनंत विष्णु पाटणकर (१९५३), पृ १२ ते १४.*

८. *तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - श्री. शं. नवरे साप्ता. मौज, १३ डिसेंबर १९४४, पृ. ५.*

९. *'श्री. गुरुवर्य स्वामी केवलानंद सरस्वती - लक्ष्मणशास्त्री जोशी,' प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा, संपा. तर्कतीर्थ आणि अन्य मान्यवर, पृ. ५२.*

१०. तर्कतीर्थ, एक प्रज्ञाप्रवाह - अरुंधती खंडकर, पृ. ८०.
११. स्वामी केवलानंद आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणेची सरस्ती चळवळ - पूर्वोक्त, पृ. ३.
१२. कृष्णातीरावरील प्राज्ञमठात - लक्ष्मणशास्त्री जोशी सत्यकथा, सप्टेंबर १९६६ पृ. ३३
१३. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - दि. वि. देव, नवयुग, दि. २६ नोव्हे. १९४४ पृ. २
१४. कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण, पृ. ६५.
१५. माझ्या सहवासात आलेल्या तीन व्यक्ती - भाई माधवराव बागल, नवभारत, जुलै १९६६, पृ. ४७
१६. कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण, पृ. ६६.
१७. सहा शास्त्रे (षडंगवेद) - शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतिष.
१८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : शास्त्र आणि शस्त्र - यशवंतराव चव्हाण, नवभारत, फेब्रु.-मार्च १९८१, पृ. ४५
१९. कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण, पृ. ६६
२०. त्या काळात राष्ट्रीय चळवळीमार्फत गाववार संघटक नेमले जात. त्यांना 'डिक्टेटर' संबोधले जायचे.
२१. साप्ताहिक केसरी - पुणे, मंगळवार, २० जानेवारी १९३०, पृ. ७
२२. Bombay Presidency Police Abstracts of Intelligence, Part II - P. 574, - Cultural. Mahatashtra.gov. in.
२३. दि. वि. देव, पूर्वोक्त, पृ. २
२४. अ) Forest Satyagrah, Chapter III, shodhganga.inflibnet.ac.in, p. 110 (आ) वाईचा राजकीय इतिहास, प्रकरण 2, shodhganga.inflibnet.ac.in,p. 110.
इ) स्वातंत्र्य चळवळ व राष्ट्रसेवा दलातील कार्य, प्रकरण 2, pp. 64,65, Lib.unipune.ac.in8080,pp.35-37
ई) सत्याग्रहींचे नामपूर - रमेश पडवळ, महाराष्ट्र टाइम्स, 12 नोव्हें. 2017
२५. साप्ताहिक केसरी, पुणे, मंगळवार, २८ ऑक्टोबर १९३०, पृ. १०.
२६. कित्ता.

२७. आधुनिक महाराष्ट्राचे बुद्धिवादी वेदांती : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - द्वा. भ. कर्णिक, मनोहर, मे १९५१, पृ. १४९, १५०.
२८. शास्त्रीबुवा आणि रॉयवादी चळवळ - द्वा. भ. कर्णिक नवभारत, फेब्रु. १९७५, पृ. ११.
२९. दि. वि. देव, पूर्वोक्त, पृ. २.
३०. अरुंधती खंडकर, पूर्वोक्त पृ. १०५.
३१. कित्ता.
३२. *The collected works of Mahatma Gandhi, Vol. 58,p. 320 to 330.*
३३. हरिजन, संपा. महात्मा गांधी, ११ फेब्रुवारी १९३३, पृ. ६.
३४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नवयुग, 26 नोव्हेंबर 1944, पृ.15.
३५. धनुर्धारी (दिवाळी), ऑक्टोबर १९४६.
३६. कित्ता, पृ. १३२.
३७. लेखसंग्रह, खंड १, 'प्रस्तावना,' श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८२.
३८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, 'निर्णयशास्त्रशुद्धता,' साप्ता. केसरी, २५ डिसें. १९२८ ते २९ जाने. १९२९.
३९. आनंदमीमांसा, मलपृष्ठ मजकुराच्या आधारे.
४०. श्री. शं. नवरे, 'शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे,' लोकमान्य, १५ डिसें. १९४४ पृ. ६.
४१. दि. वि. देव, पूर्वोक्त, पृ. १५.
४२. मी आणि माझे वक्तृत्व, पृ. २०८
४३. अरुण गोडबोले, अक्षरधन, पृ. १४८
४४. शास्त्रीजी, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ. ४२ ते ५२,२१३,२१४.
४५. अरुंधती खंडकर, पूर्वोक्त.

■

*(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जयंती व्याख्यान*
*प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, जि. सातारा*
*बुधवार दि. २७ जानेवारी २०२१, सायं. ५.३० वा.*
*पूर्वप्रसिद्धी - नवभारत मासिक, वाई, मार्च, २०२१, पृ. २३ ते ३८)*

## ५

# रंग-रेषांच्या पलीकडचे तर्कतीर्थ

वाईचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी खासगी बैठकीत गोष्टीवेल्हाळ, तर समाजजीवनात मनुष्यसंग्रही. या संग्रहात राजकारणी, बुद्धिजीवी, कार्यकर्ते, संपादक, पत्रकार तसेच नि तितकेच सर्वसामान्यही, पण रोजची ऊठबस ज्ञानवंत, प्रज्ञावंतांतच. सतत ग्रंथ, कोश, वृत्तपत्रे, नियतकालिकांत गढून जाणारे शास्त्रीजी सभा, समारंभ, परिषदा, बैठका आदींमध्ये तितकेच समरस. लिहिण्याची समाधी शिस्तीची. पूर्ववाचन, संदर्भ संग्रह, चिंतन-मननानंतर त्यांचं लेखन साकारायचं. स्मरणशक्ती तल्लख, तितकाच तर्कही! लेखनात मुद्देसूदपणा ठरलेला. पण पांडित्यास मात्र त्यांना फाटा नाही देता आला.

गेल्या शतकाच्या आठव्या दशकात (१९७०-८०) मी शिक्षक होतो, तेव्हा शालान्त परीक्षेसाठी हिंदीला असलेल्या निम्नस्तरीय पाठ्यपुस्तकात असलेला 'कृष्ण- भक्ती' निबंध शिकवत असे. तो निबंध आचार्य विनोबा भावे यांचा होता. त्यात सृष्टी निर्मिती, मनुष्य आणि त्याच्या घडण्या-बिघडण्याची चर्चा आहे. आत्मपरीक्षण, मौन आणि कर्मयोगाने माणसाचं जीवन मधुर होतं, असं विनोबा त्यात समजावतात. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं जीवन, कार्य, विचार समजून घेत असताना, मला तो निबंध वारंवार आठवत राहतो नि त्यामुळेच कदाचित वाईच्या या शास्त्रींचं 'फेअर स्केच' माझ्यापुढे उभं राहतं.

हा माणूस बहुप्रज्ञ खरा. अखंड जीवन ज्ञानसाधना. वाईस ते शास्त्री, पंडित होण्यासाठी आले. इथे ते संस्कृत शिकले. गुरुकुल पद्धतीच्या शिक्षणातून व्युत्पत्ती, व्याकरण, न्याय, वेदान्त, तर्कशास्त्र शिकत ते समांतर इंग्रजी, इतिहास, भूगोल, भौतिकशास्त्र, गणित शिकले. मूळ भारतीय शिक्षण पद्धती ही आंतरविद्याशाखीयच होती. आज 'नवे शिक्षण धोरण- २०२०'मध्ये ज्या 'लिबरल आर्ट्स'चं समर्थन आहे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी त्याचं रोल मॉडेल व प्राज्ञपाठशाला तत्कालीन नालंदा, तक्षशीलाची प्रतिकृती आहेत. वाईच्या या शास्त्रींचं जीवन म्हणजे निरंतर मतांतर, वेषांतर नि परिवर्तनाचा ध्यास. त्यांच्या बालपणीपासून ते मृत्यूपर्यंतच्या नुसत्या छायाचित्रांवरून नजर फिरवली तरी या माणसाचा कायाकल्प लक्षात यायला वेळ लागत नाही. तेरा वर्षं पूर्ण झाल्यानंतर वाईस ज्ञानलालसेनं आलेला बटू लक्ष्मण, वाठार रेल्वे स्टेशनपासून वाईस बैलगाडीतून आला तेव्हा जटाधारी, कटीस लंगोटी, अंगावर तिरके जानवे, गळ्यात ताईत, हातात काठी असलेला साक्षात ज्ञानसाधक होता (१९१४). पुढे धोतर, अंगरखा नि खांद्यावर शाल आली (१९२६). पुढे जटा, अंगरखा गेला नि चक्क गोटा, शेंडी नि अंगावर उपरणे, धोतर आले. हा काळ १९३०च्या कायदेभंग चळवळीचा. पुढे डोक्यावर गांधी टोपी, अंगावर नेहरू शर्ट नि कमरेला धोतर आले. डोळ्यांवर चश्मा आला. हा काळ 'चले जाव' चळवळीचा; पण तर्कतीर्थांसाठी रॉयवादी होण्याचा. सन १९६० नंतर म्हणजे महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे ते अध्यक्ष झाले. लाल दिव्याची गाडी आली, तसे अंगावर जॅकेट आले. त्या वेळच्या बहुधा सर्व मंत्र्यांचा तो अघोषित पोशाख होता, तो पुढे कायम राहिला. माणसात आधी मतांतर घडतं. वेषांतर ही मतांतराची परिणती असते.

लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९२३ ला 'तर्कतीर्थ' पदवी प्राप्त करून वाईच्या प्राज्ञपाठशाळेत शिक्षक झाले. शिक्षक झाल्यावर आपले गुरू नारायणशास्त्री मराठे यांच्याबरोबर धर्मसभा, पंडित परिषदा इत्यादींमध्ये भाग घेत वादविवाद करू लागले. वादविवादात प्रारंभीपासून त्यांनी जात, धर्म, परंपरा, रूढी आदींच्या सुधारणांचा आग्रह धरला. सन १९२५ च्या दरम्यान नारायणशास्त्री मराठे यांच्या पुढाकार नि मार्गदर्शनाखाली जे धर्मसुधारक मंडळ अस्तित्वात आले, त्यात तर्कतीर्थ शास्त्रीजी सक्रियतेने आघाडीवर होते. शुद्धी आणि प्रायश्चित्तासंबंधी त्यांची मते पुरोगामी

असल्याने सनातन्यांचा त्यांना विरोध राहिला. अल्पमतात असूनही ते स्वमतावर दृढ राहत आले. पण पुढे त्यांच्या लक्षात आले की हिंदू धर्मातील पंडित, पुरोहित, वेदविद्यासंपन्न, महामहोपाध्याय म्हणवून घेणारे आचार्य, शंकराचार्य, प्रभृती- शब्दप्रामाण्य, वेद अपौरुषेय आहेत, या मतापलीकडे जाण्यास तयार नाहीत. त्यांच्याशी वादविवाद करणे म्हणजे कपाळमोक्ष करून घेणे होय, हे लक्षात घेऊन त्यांनी धर्मक्षेत्र सोडून स्वातंत्र्यलढ्यात स्वत:ला गुंतवून घेतले.

१९३० ते १९४० हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या जीवनातील स्वातंत्र्यलढ्याचा काळ. प्राज्ञपाठशाळेत तळेगावच्या समर्थ विद्यालयातील जे शिक्षक, विद्यार्थी आले होते, ते राष्ट्रीय बाण्याचे होते. ते क्रांतिकारी विचारांचे समर्थक होते. सन १९२१ पासूनच खरे तर तर्कतीर्थ महात्मा गांधींच्या विचारांकडे आकृष्ट झाले. त्या वेळी बारडोली लढ्याच्या दरम्यानचा महात्मा गांधी आश्रमातील निवासकाळ व सहवास हेही या परिवर्तनाचे एक कारण होते. त्या आधी ते लोकमान्य टिळकांच्या विचारांनी प्रभावित होत असत. सन १९३० च्या कायदेभंग चळवळीत प्राज्ञपाठशाळेचे विद्यार्थी वाई, कराड येथे प्रभातफेऱ्या काढत. भूपाळ्या म्हणत. 'आम्ही पांडवांसारखी शिस्त पाळू', अशी प्रतिज्ञा घेत. शिक्षक स्वातंत्र्य-जागृतीची व्याख्याने देत. त्या तर्कतीर्थांची व्याख्याने श्रोत्यांत क्षोभ निर्माण करीत. ती प्रभावी असायची. त्यातून लोकजागृती व लोकसंघटन घडून यायचे. मिठाच्या सत्याग्रहानंतर स्वातंत्र्य आंदोलन खेड्यापाड्यांत पोहोचवण्याचा निर्णय 'वॉर कौन्सिल'नी घेतल्यावर तर्कतीर्थ आपले सहकारी मित्र श्री.शं.नवरे, द्वा.भ.कर्णिक, वसंतराव कर्णिक प्रभृतींसह नगर, नाशिक, धुळे परिसरात जनसंघटन कार्यात सक्रिय झाले. त्यातून कळवण, बागलाण, नामपूरचे जंगल सत्याग्रह यशस्वी झाले. या लढ्यातच तर्कतीर्थांना दोनदा अटक झाली व तुरुंगवास भोगावा लागला.

तुरुंगातून सुटून आल्यानंतर त्यांनी १९३२ च्या दरम्यान धर्मसुधारणा प्रयत्नांना सामाजिक उपक्रमाची जोड देऊ केली. २४ सप्टेंबर १९३२ या दिवशी डॉ. आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यामध्ये दलितांना स्वतंत्र मतदारसंघाऐवजी लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याबाबत एकमत झाले. या पुणे करारानंतर महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता निवारणाकडे लक्ष केंद्रित केले. हिंदू धर्म व प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करून महात्मा गांधी सनातनी आणि पुरोगामी विचारांच्या धर्मपंडितांशी येरवडा कारागृहात चर्चा

करीत. त्या वेळी नारायणशास्त्री मराठे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रकृतिधर्माचा व ग्रंथांचा आधुनिक अन्वय म. गांधींना समजावून सांगत. त्यातून गांधींचा अस्पृश्यता निवारणासंबंधी दृष्टिकोन तयार झाला. या विचारांचा प्रभाव गांधींवर इतका पडला की त्यांनी आपले लक्ष राजकीय आंदोलनाकडून सामाजिक कार्याकडे केंद्रित केले. सेवाग्राम येथे सन १९३६ मध्ये आश्रम स्थापन करण्यापूर्वी सन १९३३ मध्ये येरवडा तुरुंगातून बाहेर आल्यावर 'हरिजन यात्रा' करून या प्रश्नाचे राष्ट्रीय स्वरूप समजून घेतले. सेवाग्रामला आल्यावर तपभर महात्मा गांधींनी खादी, ग्रामोद्योग, सफाई आदी सामाजिक उपक्रमांद्वारे भारतघडणीचा कार्यक्रम हाती घेतला. या दरम्यानच सन १९३३ मध्ये आपला सर्वांत धाकटा मुलगा देवदास याचा राजाजी यांची कन्या लक्ष्मीशी आंतरजातीय विवाह करून महात्मा गांधी यांनी एक पाऊल पुढे उचलले व पुढे आयुष्यभर जपले. त्याची प्रेरणा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीच होते. त्यांनी या विवाहाचे पौरोहित्य केले, म्हणून सनातनी ब्रह्मवृंदांनी तर्कतीर्थांवर बहिष्कार टाकला होता. असेच पौरोहित्य त्यांनी सन १९५५ मध्ये सोमनाथ मंदिर पुनर्निर्माण कार्यक्रमप्रसंगी केले होते, ते एकाच कारणासाठी की- ते मंदिर हरिजनांना खुले करण्यात येणार होते. त्या वेळीही ब्रह्मवृंदाने तर्कतीर्थांवर बहिष्कार टाकला होता. इतकेच नव्हे, तर या विरुद्ध वाईच्या वसंत व्याख्यानमालेत पुण्याच्या अभ्यंकर शास्त्री यांची व्याख्याने योजली होती; तेव्हाही तर्कतीर्थांनी एक व्याख्यान देऊन सनातनी धर्मग्रंथांतील संदर्भ सोयीस्कर व अनुकूल तेवढेच सांगून समाजाला कसे फसवतात, ते सप्रमाण मांडून आपले मत धाडसाने व्यक्त करण्याची परंपरा कायम राखली होती. धर्म म्हणजे 'बाबा वाक्यं प्रमाणम्' नव्हे; तर परिस्थितीप्रमाणे धर्म परिवर्तनाचा अधिकार समाजास असतो, हे कृतिशील पद्धतीने समाजात रुजविण्याचे कार्य करणारे ते 'कर्ते धर्मसुधारक' होते.

तर्कतीर्थांचे चित्र, चरित्र नि चारित्र्य ते कसे दिसत, काय पोशाख करीत, काय खात-पीत यांवर रेखाटणं हे त्यांचं 'रफ स्केच'च. 'फेअर स्केच' म्हणाल तर त्यांचं लेखन, वाचन, भाषण, संपादन, परीक्षण, प्रस्तावना, मुलाखती, भाषांतरे, पत्रव्यवहार हेच. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९२७ ते १९९४ अशा सुमारे सात दशकांत दोनशेहून अधिक लेख लिहिले. ते धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, राजकारण, समाजकारण, संस्कृती, इतिहास, मानसशास्त्र, नीतिशास्त्र, कला, भाषा, साहित्य,

विज्ञान, विविध वाद, व्यक्ती, विचार, काव्यशास्त्र, तंत्र, मंत्र, तंत्रज्ञान अशा परस्पर पूरक व परस्पर विरोधी विषयांवर. कोणताही विषय मुळात समजून घ्यायचा व मग लिहायचा हा त्यांचा वस्तुपाठ. त्यांना मानसशास्त्रातील पंथ, संप्रदाय, शाखा माहीत होत्या. 'मानसशास्त्रातील दोन आधुनिक संप्रदाय' यावर त्यांचं भाषण मिळू शकतं आणि 'मानस-लिंगपूजा' विषयावर लेखही. विश्वकोशांतील नोंदींवर नजर फिरवली तरी लक्षात येतं, ते त्यांचं बहुश्रुतपण व बहुआयामी वाचन आणि चिंतन. लेखनात आणि व्याख्यानात कशाचंच वावडं नसतं. वेद, वाद, व्यक्ती, संस्कार, श्रद्धा, अंधश्रद्धा, ईश्वर, भूत-प्रेत, संत यांवर ते समरसून लिहिताना दिसतात. 'प्राचीन भारतीय संस्कृतीतील मद्यविषयक आचार संहिता' विषयावर तर्कतीर्थ लिहून आपण सोवळे शास्त्रीजी नाही हे सिद्ध करतात, तर दुसरीकडे 'गांधीवादाच्या थडग्यावर उभारलेला नेभळा सुधारणावाद' लिहून आपण कोणा व्यक्ती वा विचाराचे अंध भक्त नाही, हे स्पष्ट करतात. सोमनाथ मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवात विचारापेक्षा व्यवहार, कृती, श्रेष्ठ असल्याचे बजावत मानवेंद्रनाथ रॉय यांना काय वाटेल याचा ते विचार करत बसत नाहीत. ते धर्मांध नव्हते. म्हणून 'हिंदू धर्म समीक्षा'सारखा ग्रंथ लिहू शकले. मौलिक विलक्षणतेचं त्यांना अमर्याद आकर्षण होतं. 'मूलत: विरोध उत्पन्न करून ती मला विचारास प्रवृत्त करते', असं त्यांनी एके ठिकाणी लिहिलं आहे. श्रद्धा आणि विचारांचं द्वंद्व घेऊन ते जगले. पण त्यांच्याशी कठोर फारकत मात्र त्यांना घेता आली नाही. शंकराचार्य भेट, मंडल आयोग आदी प्रसंगांतून ते स्पष्ट होतं. ते पुरोगामी होते, असं म्हणण्यापेक्षा ते स्वतंत्र मताचे बुद्धिवादी होते, असं म्हणणं अधिक सयुक्तिक होईल. त्यामुळे समकालाशी विरोध करण्याचं धारिष्ट्य ते दाखवू शकले; ही त्यांची स्वतंत्र प्रज्ञा होती.

जडवादातील मराठी शब्द समजण्यासाठी इंग्रजी डिक्शनरी उघडावी लागली, हे माधवराव बागलांचे विधान ऐकून तर्कतीर्थ म्हणाले, ''हे काहीच नाही. मी हे पुस्तक एका मित्रास पाठवले, तर तो चक्क म्हणाला की, पुस्तक वाचनीय, मननीय व अभ्यासनीय आहे, पण आपण ते मराठीत लिहिले असते, तर बरे झाले असते.'' माधवराव बागल यांची टीका त्या मित्रापेक्षा किती तरी सौम्य असल्याचे मान्य करून तर्कतीर्थ म्हणाले होते की, प्रयत्न करूनही सोपे लिहायला येतच नाही मला!- हा प्रांजळपणा तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग होता.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे स्नेही, सहकारी, उत्तराधिकारीही म्हणता येईल असे प्रा.मे.पु.रेगे या उभयतांना मी अनेकदा ऐकले, पाहिले आहे. वाचलेही आहे. प्रश्न पडतो की, हे दोघे एकत्र असतील, तेव्हा कोण कोणाशी काय बोलत असेल? कोण कोणाचं काय ऐकत असेल? उभयता एकमेकांच्या तर्कास महातर्क कसा देत असतील? विशेषत: प्रा.मे.पु.रेगे यांनी तर्कतीर्थांवर लिहिलेले लेख वाचत असताना पडलेले हे कोडे अद्याप न सुटलेले. 'सुटलेली कोडी' या शीर्षकाची मुलाखत वाचताना तर हे कोडं अधिक गूढ, न सुटणारं, न उकलणारं होत राहतं अन् वाटत राहतं, अशा माणसांची तुम्ही कितीही रफ, फेअर अँड लव्हली अशी रेखाचित्रं रेखाटत राहा, त्यांचं खरं व्यक्तिमत्त्व, व्यक्तिचित्र रेषांच्या बाहेर राहतं, हेच खरं! ■

*(पूर्वप्रसिद्धी - साप्ताहिक साधना, पुणे, २९ मे २०२१, पृ. १७ ते २०)*

## ६

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे वाचन

वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाने मला 'तर्कतीर्थांचे वाचन' विषयावर विचार व्यक्त करण्यासाठी आमंत्रित केले, त्याबद्दल मी आभार व्यक्त करतो. आज डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाच्या पूर्वसंध्येस त्यांच्या स्मृतीस भाषणाने अभिवादन करताना आनंद होत आहे. त्यांच्या राष्ट्रपती पदाच्या कारकिर्दीत त्यांनी सर्वाधिक संवाद साधला, तो विद्यार्थ्यांशीच. आज आपण जो संवाद साधत आहोत तो महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सहयोगाने. त्या मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीच होते. त्यांनी या मंडळातर्फेच प्रथम मराठी विश्वकोश प्रकल्पाचा संकल्प सोडला होता, नंतर तो उत्तरकाळात सिद्धीस नेला तो महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने. या प्रकल्प व मंडळाचेही संस्थापक अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीच होते. या दोन्ही मंडळाच्या पुढाकार व कार्यातून महाराष्ट्र राज्याची ज्ञान-व्यवस्था निर्माण झाली, ती मराठीतील मूलभूत भाषांतरे, प्रकाशने, कोश इत्यादींच्या निर्मितीतून. हे जरी खरे असले, तरी त्यामागे तर्कतीर्थांच्या वाचन, लेखन व व्याख्यानाचे सातत्य होते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण स्वातंत्र्य चळवळीत आले, ते तर्कतीर्थांची स्वातंत्र्य व क्रांतीवरील रोमांचक भाषणे ऐकून. सर्वश्री यशवंतराव चव्हाण, वि.स.खांडेकर आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी तिघांनी आयुष्यभर वाचन, व्याख्यान व लेखनद्वारे महाराष्ट्राची सांस्कृतिक जडणघडण केली.

यशवंतराव चव्हाण इतके वाचन व्यासंगी होते की विदेश दौऱ्यातील काही वेळ ते पुस्तक खरेदीसाठी राखून ठेवत. वि.स.खांडेकरांनी तर लिहूनच ठेवले आहे की, 'पुस्तकाच्या दुकानातून मी सहसा रिकाम्या हाताने परतत नाही.' तर्कतीर्थांचा सारा ग्रंथसंग्रह म्हणजे मूलभूत संदर्भ ग्रंथांचा खजिनाच होता, असे म्हटले तर ते अतिशयोक्त होणार नाही.

तर्कतीर्थांचे वाचन समजून घेत असताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की त्यांची शैक्षणिक जडणघडण आपल्यासारखी शाळा, महाविद्यालय वा विद्यापीठीय औपचारिक शिक्षणातून झाली नाही. ते लिहायला-वाचायला धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर या जन्मगावी असलेल्या शाळेतील बिगरी, पहिली, दुसरी व तिसरी इयत्ता शिकले. तेच काय ते त्यांचे औपचारिक शिक्षण. वयाच्या चौदाव्या वर्षी सन १९१४ मध्ये ते नारायणशास्त्री मराठे तथा केवलानंद सरस्वती संचालित प्राज्ञपाठशाळेत दाखल झाले. इथे गुरुकुल पद्धतीच्या शिक्षणातून त्यांचे वाचन आकारले नि विस्तारलेही. इथे ते संस्कृत पंडित होण्यासाठी म्हणून आले. इथे येण्यापूर्वी त्यांचे वडील बाळाजी जोशी यांनी त्यांना 'अमरकोश' पढविला. वाईत येऊन तर्कतीर्थ 'षडंग वेद' शिकले. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष ही सहा वेदांगे ते शिकले. यातून वैदिक साहित्याचा पाया मजबूत झाला. 'ऋग्वेद', 'यजुर्वेद', 'अथर्ववेद' आणि 'सामवेद' वाचन, अध्ययन, पठन, मीमांसेतून तर्कतीर्थ न्यायवेदान्ताकडे आकर्षित झाले. पुढे मुक्त संस्कृत वाचनात कविकुलगुरू कालिदासाच्या 'रघुवंश', 'अभिज्ञान शाकुंतल' ने संस्कृत वाचन शास्त्राकडून साहित्याकडे नेले. बाणभट्टाच्या 'कादंबरी'ने काव्यात्मक नाटकाइतकेच कथात्मक संस्कृत साहित्य रोचक नि मनोहारी असते, याची प्रचिती दिली.

गुरुकुलातील प्राथमिक अभ्यासाच्या अवघ्या नऊ महिन्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपली व्युत्पत्ती तयार केली. म्हणजे गुरुजींच्या मदतीशिवाय टीकाग्रंथांचे वाचन आणि मीमांसा स्वाध्यायाच्या आधारे सुरू ठेवली. 'न्यायमुक्तावली' च्या वाचनातून तर्कशास्त्र व न्यायवैशेषिक पूर्ण केले. त्याच्यावरची टीका शिकायची म्हणून 'दिनकरी', 'जागदिशी', 'गदाधारी', 'पंचलक्षणी', 'चतुर्दशलक्षणी' वाचत, पठण-पाठन करत 'सिद्धांतलक्षण' ग्रंथ पूर्ण केला. मग गुरूंना 'शास्त्रसेवामवधारम' संबोधन करीत व्याकरण, न्याय, वेदान्त यांचे पूर्वपक्ष केले. अलंकारशास्त्र,

वाक्यमीमांसा करत शास्त्रानंतर संचार केला. म्हणजे विविध शास्त्रांच्या अंतरसंबंधाचे वाचन, पठन-पाठन, मीमांसा करत आकलन करून घेतले. पंक्ती लावणे शिकले. कीर्तनकार, प्रवचनकार, पुराणिक होता यावे म्हणून तर्कतीर्थांनी 'तर्कदीपिका' अभ्यासली. अर्थसंग्रह करून घेतला. 'वेदान्तसार' आणि त्यांची नैयायिक, वैय्याकरणी म्हणून घडण झाली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत शिक्षण घेत असताना आचार्य विनोबा भावे तर्कतीर्थांचे सहपाठी होते. ते 'शांकरभाष्य' शिकण्यासाठी प्राज्ञपाठशाळेत आले होते. सुमारे वर्षभर ते वाईत होते. त्या काळात विनोबा तर्कतीर्थांना म्हणत असत की ''हे जे प्राचीन अध्ययन आहे, घटपटाची खटपट आहे, त्याने देशाचा काही उद्धार व्हायचा नाही. तर आधुनिक शिक्षण घेतले पाहिजे आणि देशामध्ये यंत्रोद्योग आले पाहिजेत. त्यासाठी तुला अमेरिकेत जावे लागले तरी जा.'' पुढे विनोबा वाई सोडून सन १९१७ ला बडोद्याला गेले. पाठोपाठ तर्कतीर्थ आणि त्यांचे दोन मित्र दामोदरशास्त्री कोनकर आणि धुंडिराज देव यांनी वाईतून पलायन केले. वेषांतर केले. जटाधारी लक्ष्मणशास्त्री बडोद्यात चक्क चमन गोटा करून भूमिगत विद्यार्थी म्हणून विनोबांकडे इंग्रजी शिकू लागले. विनोबांनी त्यांना तर्खडकर भाषांतर पाठमाला (भाग १ ते ३) शिकविली आणि तर्कतीर्थ इंग्रजी वाचू, बोलू, लिहू लागले. स्पेलिंग कच्चे होते, पण भाषांतराच्या साहाय्याने त्यांनी टॉलस्टॉय वाचला. पुढे 'टेल्स फ्रॉम शेक्सपीअर' वाचले. चार्ल्स लँब शिकले. इतके सारे तर्कतीर्थांनी तीन महिन्यात कमावले, हे सांगून कुणाला खरे वाटणार नाही. पण तर्कतीर्थांमध्ये उपजतच एक अशांत, अतृप्त ज्ञानलालसा होती, ती त्यांना नित्यनव्या वाचनाकडे आकर्षित करीत राहिली. इंग्रजी शिक्षण पूर्ण झाल्यावर विनोबा तर्कतीर्थांना महात्मा गांधीच्या साबरमती आश्रमात नेण्याच्या तयारीत होते. त्याची कुणकुण लागताच तर्कतीर्थांनी अर्ध्या रात्रीत बडोदा सोडून वाई गाठली. गुरुजी नारायणशास्त्री मराठेंची क्षमा मागून ते शिक्षक म्हणून रुजू झाले. पण पदवी मिळविण्याच्या इराद्याने नंतर त्यांनी काशी गाठली. सन १९१८ ते २१ या तीन वर्षांत त्यांनी 'तर्कतीर्थ' पदवी पाठ्यक्रम (Essence of Logic) पूर्ण केला. सन १९२२ ला परीक्षेसाठी कलकत्त्याला जाताना बारडोली स्टेशनवर दंगा झाल्याचे निमित्त होऊन ते तिथे आश्रमात महात्मा गांधी आहेत, हे लक्षात आल्यावर परीक्षा नि गाडी सोडून महात्मा गांधींच्या आश्रमात दाखल झाले. ती त्यांची नि महात्मा गांधींची पहिली भेट. पुढे वर्षानंतर ते

तर्कतीर्थ पदवीस बसले व उत्तीर्ण झाले. काशी मुक्कामी त्यांनी राजेश्वर शास्त्री द्रविड, पर्वतीय शास्त्री, वामाचरण भट्टाचार्य इत्यादींकडून न्याय, राज्यशास्त्र इ. संस्कृतमधून ग्रहण केले.

सन १९२१ ते १९३० या काळात ते प्राज्ञपाठशाळेत शिकवीत. त्या काळात संस्कृत, इंग्रजीनंतर त्यांनी आपल्या वाचनाची दिशा बदलून ते मराठी वाचू लागले. गोविंद सखाराम सरदेसाई यांचे 'मराठी रियासत' (आठ खंड) वाचले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाला'ने मराठी साहित्य समीक्षेची दृष्टी दिली. गोपाळ गणेश आगरकरांच्या निवडक 'लेखसंग्रह' वाचनाने तर्कतीर्थ अंधश्रद्धा आणि कर्मकांडातून मुक्त होत धर्मनिरपेक्ष व पुरोगामी बनले. शि. म. परांजपे यांच्या 'काळातील निबंध'ने आणि 'तर्कसंग्रह दिपीका'ने तत्त्वज्ञानाची गोडी निर्माण केली. काव्यात केशवसुत चंद्रशेखर, गोविंदाग्रज, अनिल, बा. भ. बोरकर वाचत मराठी काव्यातील तरल परतत्त्वाने ते प्रभावित झाले. साप्ताहिकांचा तो काळ होता. केसरी, अग्रणी, चित्रा, प्रमोद, स्वराज्य वाचत ते सन १९२३ पासून लिहिते झाले. 'संग्राम' दैनिकात आणि 'प्रमोद' मध्ये त्यांनी 'कला', 'ठिणगी' सारखी सदरे (स्तंभ) सन १९३९ ले १९४५ च्या दरम्यान लिहिली. गांधीवादी असलेले तर्कतीर्थ रॉयवादी बनून गांधीवादावर टीका करू लागले. मानवेंद्रनाथ रॉय प्रभावामुळे ते क्रांतिकारक बनले. स्वातंत्र्यपूर्व काळात ते वक्ते, लेखक, टीकाकार, संपादक, भाषांतरकार बनत पंडित, शास्त्रीचे साहित्यकार केव्हा बनले, हे त्यांचे त्यांना कळले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात सन १९५४ ला दिल्ली येथे संपन्न अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी विराजमान झालेल्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी साहित्य अकादमी पुरस्काराच्या पहिल्याच वर्षी (१९५५) आपल्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या भाषण संग्रहासाठी तो मिळवून ते मराठी साहित्याच्या सर्वोच्च पदी विराजमान झाले.

सन १९३०-३२ च्या दरम्यानच्या कायदेभंगाच्या चळवळीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना दोनदा तुरुंगवास भोगावा लागला. या काळात त्यांचा परिचय द्वा.भ.कर्णिक यांच्याशी झाला. या काळात मानवेंद्रनाथ रॉय यांची सशस्त्र क्रांती संदर्भातील पत्रके तुरुंगात येत असत. या नव्या विचारांनी तर्कतीर्थ प्रभावित झाले. ''मूलतःच विरोधी असलेली विचारसरणी माझ्या विचारपंथात आल्याबरोबर क्षोभ उत्पन्न करून मला विचारास

प्रवृत्त करते असा माझा फार जुना अनुभव आहे.'' असा कबुलीजबाब तर्कतीर्थांनी स्वतःच 'मी रॉयवादी का झालो' (धनुर्धारी, दिवाळी, ऑक्टोबर, १९४६, पृ. १३२) शीर्षक लेखात देऊन ठेवला आहे. तुरुंगातून बाहेर आल्यावर तर्कतीर्थांनी 'मॅनिफेस्टो ऑफ दि कम्युनिस्ट पार्टी'चे वाचन 'न्यायमुक्तावली' आणि 'तर्कसंग्रहदीपिका' प्रमाणे उपपत्ती समजून घेऊन केले. त्यांनी एंजल्स, प्लेकानोद वाचला. 'अँटी ड्युअरिंग', 'डायलेक्टिक्स ऑफ नेचर' वाचले. मार्क्सवादाच्या त्यांच्यावरील प्रभावाची साक्ष देणारे तर्कतीर्थांचे दोन ग्रंथ सांगता येतात- १) हिंदुधर्माची समीक्षा (१९४१) व जडवाद अर्थात् अनीश्वरवाद (१९४१). 'धर्माची समीक्षा ही सर्व समीक्षेची सुरुवात असते' या मार्क्सच्या विचारांनी तर्कतीर्थांना समीक्षक बनवले. याच काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'इंडिया इन ट्रांसिशन', 'दि व्हॉइस ऑफ इंडिया', 'इंडिया : इट्स पास्ट, इट्स प्रेझेंट अँड इट्स फ्युचर' साररचे ग्रंथ वाचले आणि ते पूर्णतः रॉयवादी झाले. (१९४०)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वाचनाची कक्षा रुंदावली ती त्यांच्या कोश, संपादन कार्याने. प्रारंभीच्या काळात नारायणशास्त्री मराठे, 'धर्मकोश' आणि 'मीमांसा कोश' तयार करत असल्याच्या काळात (१९२५ ते १९६६) त्यांना कोश संपादनाचे अनौपचारिक प्रशिक्षण लाभले. यातून उपरोक्त कोशांशिवाय 'डिस्क्रिप्टिव्ह कॅटलॉग ऑफ संस्कृत मॅन्युस्क्रिप्टस' (भाग १ व २) ची निर्मिती तर्कतीर्थांनी केली. 'मीमांसा कोश' (७ खंड) आणि 'धर्मकोश' (१५ खंड) यांच्या संपादन अनुभवावर 'मराठी विश्वकोश' (१५ खंड) त्यांनी निर्मिले पण समग्र मराठी विश्वकोश (२० खंड) मध्ये त्यांचे लेखन दिसते' कोश संपादन कार्यातील त्यांच्या प्रस्तावना त्यांच्या वाचन व्यासंगाची प्रचिती देणाऱ्या आहेत. या कार्यात त्यांनी २० हजार संस्कृत पोथ्या हाताळल्या. त्यांचा स्वतःचा ग्रंथसंग्रह ६० हजाराच्या घरात होता. मराठी विश्वकोशाचे ग्रंथालय त्यांच्या वाचन व्यासंगातून साकारले. इतके करूनही 'Encyclopaedia of Ignorance (1977)' चं वाचन त्यांना अस्वस्थ करतं आणि त्यांना आपले वाचन तोडके असल्याची जाणीव मन कुरतडत राहते. याच वर्षी (१९७७) च्या निमित्ताने २० बृहत खंडांबरोबर १० लघु खंड प्रकाशित करते. आणि 'एनसायक्लोपीडिया ऑफ इग्नोरन्स' शीर्षक एक खंड तर्कतीर्थांना अस्वस्थ करतो.

हे खंड अनेक प्रकारे तर्कतीर्थांच्या पूर्ववाचनास आव्हान देतात. म्हणजे असे की 'एकूण (Total) आणि संपूर्ण (Whole) शब्द एक नाहीत. पहिला संख्यावाचक आहे तर दुसरा स्थितीदर्शक! 'एन्सायक्लोपीडिया ऑफ इग्नोरन्स' वाचून सांच्या लक्षात येतं की 'का' (Why) हा प्रश्न जोवर माणसाच्या मनात राहील तोवर ज्ञात प्रदेशापेक्षा अज्ञाताचा समुद्र कायमच विस्तीर्ण राहणार. स्वप्न, झोप, भूगर्भ, अवकाश, सापेक्षता या संकल्पना मानवाने अद्याप पूर्ण आकळलेल्या नाहीत. यांना पूर्णत्व येईपर्यंतचं अपूर्णच म्हणावे मानणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आयुष्याच्या अंताच्या प्रवासापर्यंत अतृप्त, अस्वस्थ वाचक म्हणूनच जगले. मृत्यूच्या अंतिम क्षणी त्यांच्या छातीवर उपडं पडलेलं उघड पुस्तक रेच सांगत होतं. माणसाला अंत आहे, वाचनाला नाही!

■

*(मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आयोजित वाचन प्रेरणा दिन व्याख्यान, १५ ऑक्टोबर २०२१ दुपारी १२.३० वा.)*

# ७

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय : एक सिंहावलोकन

'मला आवडलेलं पुस्तक' किंवा 'मला आवडलेली पुस्तके' हे संपादकांनी सुचवलेलं शीर्षक माझ्या मनात नि लेखनास मर्यादित करणारं वाटलं. लेखक स्वतंत्र असतो, असावा असं म्हटलं जातं. त्याआधारे मी आशयाच्या अंगांनी तोच पण एकवचनी, बहुवचनीच्या पलीकडे तो समग्र करून लिहायचं ठरवलं. 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' मला आवडलं नि त्यावर लिहायला मला आवडेल असं वाटल्यावरून त्या विषयावर लिहायचं ठरवलं. नाही म्हटलं तरी मला अलीकडे समग्रतेचा छंद लागलेलाच आहे. मी गेली तीन वर्षे एक लेखक वाचतो आहे-तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळासाठी मी त्यांच्या समग्र साहित्याचं संपादन करून सुमारे १०,००० पृष्ठे भरतील इतकी सामग्री गोळा केली आहे. ती वाचली आहे. त्यांचे विषय, आशय, प्रकार इ. आधारे वर्गवारी करून संपादन केले आहे. त्यातून १५ खंड सिद्ध झाले आहेत. ते लवकरच मराठी वाचकांना वाचावयास मिळतील अशी आशा आहे.

पूर्वी मी नाटकांचा अभ्यास करत असे. नाटकं वाचायतो, पहायचो, शिकवायचो. नाटक, नाटककारांवर लेख, समीक्षा, पुस्तकं लिहीत असे. तेव्हा लक्षात आलेली गोष्ट अशी की, नाटकं सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत चालायची. नाटकं दीर्घ असत. अनेकांकी तशी एकांकीही असत. तुम्ही

तमाशा पाहिला असेल तर त्यात वग असायचा. तो उत्तरार्धात सुरू व्हायचा. वग म्हणजे मुख्य नाटक. त्या आधी गण गवळण, संवाद, विनोद, सवाल जबाब असं काहीबाही सुरू रहायचं. ही पद्धत पाश्चात्त्य नाटकांमध्येही होती. मुख्य नाटकापूर्वीच लघु नाटक असायचं. त्याला 'Curtain Raiser' म्हणायचे. मोझार्टच्या 'बी फ्लॅट' मध्ये 'बॅशेस् सिम्फोलिया' होतं. तसं हा लेख त्या समग्र साहित्याचा लघुलेख (Curtain Raiser) म्हणता येईल.

**बहुआयामी व्यक्तिमत्त्व**

कोणी साधु, स्वामी, गुरू, बाबा का? तर नाही. त्यांचं मूळ नाव लक्ष्मण बाळाजी जोशी. जन्म २७ जानेवारी १९०१ चा. पिंपळनेर (धुळे) येथे झालेला. संस्कृत अभ्यास करून मुलानं संस्कृत पंडित व्हावं म्हणून वडिलांनी त्यांना प्राज्ञपाठशाळा, वाई येथे शिक्षणासाठी ठेवलं. तिथे ते चार-पाच वर्ष नारायणशास्त्री मराठे यांच्याकडे न्याय, वेदांत, अलंकारशास्त्र इ. शिकले. पुढील अधिकच्या (उच्च) शिक्षणासाठी काशीला गेले. तिथलं न्याय, वेदांताचं अधिकचं प्रगत शिक्षण घेऊन कलकत्त्याच्या तत्कालीन शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' (Essence of Logic) ही पदवी त्यांनी संपादली. नंतर परत येऊन ते प्राज्ञपाठशाळेत शिक्षक झाले. धर्मसभा, पंडित परिषदांमध्ये आपले गुरू नारायणशास्त्री मराठे यांच्यासह व त्यांच्या मार्गदर्शनाखाली सोनगिर, काशी इ. परिषदांमध्ये धर्मग्रंथाचे शब्दप्रामाण्य झुगारून देऊन शास्त्रार्थ लावत धर्मसुधारणा, शुद्धी, पोटजाती विवाह, प्रतिलोम विवाह, मंदिरात जातीधर्माचा विचार न करता सर्वांना मुक्त प्रवेशाचे समर्थन करत प्रसंगी शंकराचार्यांशीही वादविवाद, खंडनमंडन इत्यादी द्वारे व नंतरच्या काळात धर्मग्रंथ, वेदादी प्राच्यविद्याक्षेत्रात 'धर्मकोश', 'मीमांसाकोश', 'मराठी विश्वकोश' संपादनातून ६० हून अधिक खंडाची निर्मिती, संपादन, प्रकाशन कार्य केलेले क्रियाशील धर्म, समाजसुधारक, साहित्य, भाषा, संस्कृती, राजकारण, विज्ञान, व्यक्ती, वाद, विचार, तत्त्वज्ञान इत्यादींवर शेकडो भाषणे, मुलाखती, लेख, भाषांतरे, संपादन, सूचीकरण, कोशनिर्मिती कार्य, साहित्य अकादमी, राष्ट्रीय संस्कृत पंडित, पद्मविभूषण, पद्मभूषण, साहित्य अकादमी महदत्तर सदस्यत्व (फेलोशिप), डी.लिट्. (मुंबई विद्यापीठ) इत्यादीने सन्मानित.

त्यांनी भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतर केले. शंभराहून अधिक ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या. अनेक ग्रंथांच्या समीक्षा लिहिल्या. अनेक

विषयांवर प्रबंध रचले. चरित्रे लिहिली. मराठी ज्ञानभाषा व्हावी म्हणून अनेकांकडून मराठीत ज्ञान-विज्ञान शाखेतील मराठी भाषांतरे व मूलभूत ग्रंथ लिहून घेतले. मराठी भाषा सल्लागार म्हणून दीर्घकाळ कार्य केले. त्यांच्या ग्रंथाचे हिंदी, इंग्रजी भाषेत भाषातरे झाली. त्यांच्यावर अनेकांनी समीक्षा ग्रंथ, चरित्र ग्रंथ, संशोधन प्रबन्ध (अपवाद) लिहिले, प्रकाशित केले. त्यांनी शेकडो मुलाखती दिल्या. अनेक परिषद, परिसंवाद, चर्चासत्रे इत्यादींमधील भाषणे गाजली. त्यांनी अनेक विद्यापीठे, व्याख्यानमाला इ. मधून एकाच विषयाच्या अनेक अंगावर प्रकाश टाकणारे व्याख्यान शृंखला सादर केल्या. त्यांचे ग्रंथ झाले. अनेक साहित्य संमेलन इ. चे अध्यक्षपद, उद्घाटक, संयोजक, स्वागताध्यक्ष म्हणून कार्य केले.

**मराठी विश्वकोशातील नोंदी**

कोशकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अनेक कोशांच्या निर्मिती, संपादन, प्रकाशनास हातभार लावला आहे. त्यात 'मराठी विश्वकोश' (२०+२ खंड), 'धर्मकोश' (२० खंड), 'मीमांसाकोश' (७ खंड), 'पदनाम कोश', 'भारतीय भाषा-साहित्य परिचय शब्दकोश' (मराठी-गुजराती, उर्दू, कानडी, बंगाली, इंग्रजी), 'वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा', 'आयुर्वेदीय शब्दकोश' इत्यादी कोशांचा अंतर्भाव आहे. या कोशांना त्यांच्या प्रस्तावना आहेत.

मराठी विश्वकोशात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिलेले योगदान अमर आहे. मराठी ज्ञानभाषा व्हावी म्हणून केलेल्या अनेक प्रयत्नांपैकी हा एक स्वप्नप्रकल्प. तो आजमितीस अनेक संपादक, नोंद लेखक, कर्मचारी यांच्या सामूहिक व सातत्यपूर्ण धडपडी नि सहभागातून सिद्ध झालेला असला तरी त्यात सिंहाचा वाटा तर्कतीर्थ यांचाच. कोश निर्मितीसाठी यंत्रणा लागते. ती त्यांनी शासनाच्या आर्थिक सहकार्याने उभारली. मोठे संदर्भ ग्रंथालय विकसित केले. प्रा. रा. ग. जाधव यांच्या शब्दात सांगायचे तर, 'एकूणच मराठी व्यासंगाचा व विद्वत्तेचा कस व शिस्त समाधानकारक नाही' असे तर्कतीर्थांचे मत होते. ती शिस्त लागावी व कस सुधारावा म्हणून लेखक व संपादकांसाठी आणि वाचकांना कोश कसा वाचावा याचे मार्गदर्शन व्हावे म्हणून मराठी विश्वकोश निर्मितीपूर्वी सन १९६५ मध्ये 'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ' संपादिला. त्यावर आलेल्या आक्षेप व टीकांना उत्तर देण्यासाठी पुस्तिका प्रकाशित केली. यातून या विषयासंबंधीची

तर्कतीर्थांची आस्था व तळमळ स्पष्ट होते. या नोंदीचे शास्त्र व शैली त्यांनी मराठीत वस्तुपाठ म्हणून सादर केली.

मराठी विश्वकोशात तर्कतीर्थांनी १५७ नोंद लिहिल्या आहेत. त्यात विषय वैविध्य आहे. प्राचीन वाङ्मय, विविध व्यक्तिचरित्रे, साहित्यकृती, संस्कार, संस्कृती, ईश्वर, श्रद्धा, अंधश्रद्धा, प्राचीन शास्त्रे, विविध समाज, तत्त्वज्ञान, इतिहास, राज्यशास्त्र विषयांवरील तर्कतीर्थांच्या एकेक नोंदी प्रबंध मूल्य असलेल्याच दिसून येतात. ते असे प्रज्ञावंत की ते 'अब्रा का डब्रा' वर लिहितात आणि 'आदिभौतिक शक्तिवाद' वर पण. 'वेद' ते 'वेब' असा त्यांच्या प्रज्ञेचा पट विस्तृत आहे नि सखोलपण. या मराठी विश्वकोश रचनेचा त्यांनी तयार केलेला रचनाकल्प (Blue Print) संशोधनाचा विषय आहे, पण आपले विद्यापीठातील अधिविभाग अजून कथा-कादंबऱ्यांच्या मनोरंजनातच मश्गुल आहेत त्याला काय म्हणावे?

**प्रबोधनाची भाषणसत्रे**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी चांद्यापासून बांद्यापर्यंत भाषणे देत महाराष्ट्र पिंजून काढला. प्रारंभीच्या काळात दिलेल्या भाषणामधून, वादविवादातून धर्म आणि समाजसुधारणा घडवून आणल्या (१९२३ ते १९३०). नंतर त्यांनी संगमनेर, अहमदनगर, कळवण, बागलाण, धुळे, नाशिक परिसरात महात्मा गांधींच्या कायदेभंग चळवळीतील आदिवासी, कोळींचे संघटन करून जंगल सत्याग्रह घडवून आणला. तो इतक्या मोठ्या संख्येने होता नि शिवाय प्रक्षोभक की ब्रिटिश कलेक्टर नाइट यांस गोळीबाराचे फर्मान बजावणे भाग पाडले. ब्रिटिशांविरुद्ध असंतोष संघटित करत तर्कतीर्थांनी शेकडो पोलीस पाटलांचे राजीनामे सादर केले. स्वातंत्र्य चळवळीत कार्यकर्ते तयार करणारी शिबिरे योजली. त्यातून शेकडो कार्यकर्ते तयार होतात पाहून ब्रिटिशांनी शिबिरे मोडून काढली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना दोनदा सहा-सहा महिन्यांची सक्तमजुरी व ५१ रुपये दंडाची शिक्षा झाली. धुळे तुरुंगात जमनालाल बजाज, आचार्य विनोबा भावे, गुलजारीलाल नंदा, साने गुरुजी प्रभृती मान्यवर त्याचे सहबंदी होते.

महात्मा गांधीनी पुणे करारानंतर सुरू केलेल्या अस्पृश्यता निवारण कार्याचे ते सल्लागार व सक्रिय कार्यकर्ते होते. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात अनेक देशा-परदेशांतील आंतरराष्ट्रीय परिषदांत त्यांनी इंग्रजीतून भाषणे सादर केली. तीच गोष्ट राष्ट्रीय परिषद, समारंभ, व्याख्यानमालांची. तिथे संस्कृत, हिंदी, इंग्रजीतून दिलेली भाषणे प्रसिद्ध आहेत. अक्षरशः

हजार-दोन हजार भाषणे त्यांनी दिली असावीत. पण दोनशे-अडीचशे भाषणांच्याच लिखित संहिता हाती येतात. त्यांची भाषणे झाली नाहीत अशी विद्यापीठे, व्याख्यानमाला, वाचनालये महाराष्ट्रात शोधून सापडावयाची नाहीत. भाषणे, व्यक्ती, विचार, धर्म, संस्कृती, राजकारण, समाजसुधारणा, तत्त्वज्ञान, विज्ञान, वेद-वेदान्तावर आहेत नि मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, भौतिकशास्त्र, ज्योतिषशास्त्र इ. वर पण. भाषा, साहित्य, संगीत, चित्रकला, विज्ञान सर्वांत समरस होणारे तर्कतीर्थ महाराष्ट्राचे आधुनिक प्रबोधक होते. आकाशवाणी केंद्रातील भाषणे, मुलाखती ऐकणे म्हणजे पूर्वकाळाची पुन्हा जिवंत अनुभूती! तर्कतीर्थांची भाषणे ऐकून आपण स्वातंत्र्यलढ्यात अधिक सक्रिय झाल्याचे आपले पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी 'कृष्णाकाठ' मध्ये नमूद केले आहे.

**बहुआयामी प्रस्तावना आणि समीक्षा**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे महाराष्ट्र शासन नियुक्त संस्थापक अध्यक्ष. त्यांचा कार्यकाळ सन १९६० ते १९८० असा दोन दशकांचा. या कार्यकाळात त्यांनी आपल्या या मंडळामार्फत साहित्य, कला, विज्ञान, संगीत, खेळ, प्राच्य वाङ्मय, भारतीय भाषा, लिपी, पर्यावरण, इतिहास, धर्म, राज्यशास्त्र, बोली, अणुविज्ञान, तत्त्वज्ञान, विविध वाद, अभिजात साहित्य भाषांतरे, चरित्रे, कथा, कादंबऱ्या, लेखसंग्रह, पत्रसंग्रह निर्मिले. यांची संख्या १७० आहे. या सर्वांना तर्कतीर्थांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. पैकी काही साचेबंद तर काही मुक्त.

याशिवाय त्यांनी स्वत:च्या ग्रंथ नि कोशांना मराठी, संस्कृत, इंग्रजी प्रस्तावना लिहिल्या आहेत. अन्य लेखकांच्या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावनांची अधिकृत सूची उपलब्ध नाही. (खरं तर तर्कतीर्थांच्या समग्र साहित्याची सूची द्यायला हवी होती!) तरी आपण पन्नास एक अशा संक्षिप्त नि विस्तृत प्रस्तावना मिळवू शकतो. ज्या २००-२५० प्रस्तावना हाती आल्या त्यांपैकी निम्म्या आपण समग्र वाङ्मयात व्यवच्छेदक म्हणून संग्रहित केल्या आहेत. यातील सर्व प्रस्तावना अभ्यासपूर्ण, संदर्भसंपन्न असल्या तरी काही प्रस्तावना लेखनाचे प्रतिदर्श (Model) ठरतील अशा आहेत. काही ललित बंध शोभाव्यात अशाही आहेत. मानवेंद्रनाथ रॉय, प्रा. गोवर्धन पारीख, प्रा.सदाशिव आठवले, डॉ. के.ल. दफ्तरी, भारतरत्न डॉ. पां.वा. काणे, डॉ. रा.चिं. ढेरे, समग्र फुले वाङ्मय, प्रा.ग.ह. खरे, कॉ. शरद

पाटील, मधु लिमये यांच्या ग्रंथ, भाषांतरांना लिहिलेल्या प्रस्तावना वाचनीय व संग्राह्य आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विविध दैनिके, साप्ताहिके, मासिके, वार्षिके इ. तून अनेक ग्रंथ, पुस्तके, कोश, काव्यसंग्रह, कादंबऱ्या, लेखसंग्रह, गौरवग्रंथ इ. ची परीक्षणे व समीक्षा लिहिल्या आहेत. ही संख्या पुढे ५० या घरात असावी. उपलब्ध ३० ग्रंथांची परीक्षणे आपण या समग्र वाङ्मय प्रकल्पात समाविष्ट करू शकलो आहोत. ह.रा. महाजनी, डॉ. वा.वि. मिराशी, ह. कृ. मोहनी, डॉ. प्र.न. देशपांडे, यशवंतराव चव्हाण, प्रा. तारा भवाळकर, डॉ. म.श्री. खैर, भा. पं. बहिरट, ह.भ.प. सोनोपंत दांडेकर प्रभृती मान्यवरांच्या ग्रंथाचा अंतर्भाव आहे. यातून तर्कतीर्थ सव्यसाची, उभय विचारांचे मर्मज्ञ होते हे लक्षात येते.

**हजरजबाबी मुलाखतींचा खजिना**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी शेकडो मुलाखती दिल्या असतील पण घेतल्या अपवाद. त्यांच्या विद्वत्ता नि प्रतिभेचा दरारा सर्वत्र पसरलेला असायचा. अनेक पत्रकार तर त्यांची मुलाखत घ्यायला टपलेलेच असायचे. प्रा. मे.पुं. रेगे, प्रा. रा.ग. जाधव, पु. ल. देशपांडे, डी. मुजुमदार (कलकत्ता), श्रीराम पुजारी, प्रा. म. द हातकणंगलेकर, सुधीर गाडगीळ, प्रा.सुधीर रसाळ, डॉ.सदानंद मोरे, डॉ.प्रदीप भोसले, डॉ.राजेंद्र व्होरा, अनंत दीक्षित, माधव गडकरी, सुभाष भेंडे, उमाकांत ठोंबरे, अनिल जोशी (यांच्या सर्वाधिक मुलाखती उपलब्ध!) ही त्यांची मुलाखत घेणाऱ्यांची नुसती नावे वाचली तरी तुम्हास मुलाखतींचा दर्जा समजून येईल.

तर्कतीर्थांनी रूढ अर्थाने समग्र असं आत्मचरित्र लिहिलं नाही. लिहिलं असतं तर 'माझी वेषांतरे व मतांतरे' असं नाव त्याला शोभून दिसलं असतं असं त्यांचं चित्र, चरित्र नि चारित्र्य होतं. तरी परंतु त्यांनी आत्मपर लेख, भाषणे, मुलाखती, पत्रे, प्रस्तावना, परीक्षणे मागे ठेवली आहेत. जागोजागी आत्मचरित्राचे तुकडे माझ्या हाती लागले आहेत. त्यातून नक्कीच एक अंत:साक्ष्य (स्वत: कथन केलेले!) आत्मकथन संपादित करता येऊ शकेल.

ज्या मुलाखती उपलब्ध झाल्या आहेत त्या आत्मपर, विचारप्रवण, परात्मर, व्यक्ती व विचार वेधक, विविधांगी, विविध विषयांची चिकित्सा करणाऱ्या, राजकारण, समाजकारण, शिक्षण, साहित्य, संस्कृती, भाषा, ग्रंथ इ. वर भाष्य करणाऱ्या आहेत. त्या हजरजबाबीपणाचा उत्तम नमुना

होत. महात्मा गांधी अस्पृश्यता निवारण कार्यार्थ सनातनी नि पुरोगामी पंडितांशी चर्चा संवाद करीत होते. संवादक होते तर्कतीर्थ. सनातनी मंडळींना केवळ 'आज' शब्द वापरून निरुत्तर करणारे तर्कतीर्थ महात्मा गांधींनी पाहिले व ते कायमचे तर्कतीर्थांच्या प्रेमात पडले. महात्मा गांधींनी त्यांना आपला मुलगा देवदासच्या आंतरजातीय विवाहाचे पौरोहित्य सोपवले व पुढे फक्त आंतरजातीय-धर्मीय विवाहांना उपस्थित राहिले. डॉ. राजेंद्र प्रसाद आणि वल्लभभाई पटेल यांनी जीर्णोद्धार केलेल्या मंदिराची प्रतिष्ठापना शंकराचार्यांचा बहिष्कार असताना तर्कतीर्थांनी केली ती केवळ मंदिर सर्व जातीधर्मास खुले होणार म्हणून! हे त्यांचं पुरोगामीपण सर्व मुलाखतींमध्ये खोलवर मुरलेले दिसते.

**अजेय संस्कृत पांडित्य**

मूलतः संस्कृत पंडित असलेल्या लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अनेक संस्कृत पंडित सभा, परिषदा, प्राच्यविद्या आंतरराष्ट्रीय संवाद मंचावर आपल्या संस्कृत उच्चारण सामर्थ्याबरोबर प्रागतिक विचार नि तर्कांने पंडित समाजात अचंबित करून सोडले होतेच. पण त्या प्रज्ञा नि प्रतिभेचे लिखित संहितांमध्ये प्रतिबिंब दाखवत त्यांनी आपल्या अजेय पांडित्याचा डंका नि डिंडीम विश्वात सर्वदूर पोहोचवला होता यात अतिशयोक्ती तसूभरही नाही.

शिवाय त्यांनी संस्कृतात केलेली प्रबंध रचना संशोधनाचाच भाग म्हणायला हवा. 'शुद्धिसर्वस्वम्', 'भारतीय धर्मेतिहासतत्त्वम्' याचा पुरावा त्यांनी संपादिलेल्या 'धर्मकोश' या संस्कृत कोशाच्या एका खंडऽस 'मंत्रब्राह्मणोपनिषत्' शीर्षक दीर्घ प्रस्तावना वेद, उपनिषदादि साहित्यावरील त्यांच्या प्रभुत्वाची निदर्शक होय. त्यांचे गुरू नारायणशास्त्री मराठे ऊर्फ स्वामी केवलानंद सरस्वतींचे संस्कृत चरित्र 'श्री केवलानंदयतेचरित्रसार:' प्रासादिक संस्कृत शैलींचा दृष्टान्त (उदाहरण) आहे. भारतीय राज्यघटनेच्या पहिल्या मंजूर मसुद्याचे तर्कतीर्थ आणि मंगलदेव शास्त्रींनी मिळून केलेले भाषांतर तर्कतीर्थांच्या संस्कृत भाषेवरील हुकमतीचा हिकमती पुरावा! तो त्यांच्या पुरोगामी विचार दृष्टीचे अपत्य होय.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याच्या प्राज्ञपाठशाळा ग्रंथालयात २०,००० संस्कृत पोथ्यांचा संग्रह होता नि आहेही! यातील सुमारे १०,७५२ पोथ्यांची त्यांनी दोन खंडात केलेली विवरण सूची 'Discriptive Catalogue of Sanskrit Manuscripts' (Vol. I and II) मध्ये आपणास सुमारे ११,००० पोथ्यांची माहिती (क्रमांक, ग्रंथशीर्षक, लेखक, काळ, ओळी,

ओळीतील शब्द संख्या) पोथीचे माध्यम (भूर्जपत्र, कापड, कषाद, चामडे, ताम्र इ.) चे विवरण वाचत असताना तत्कालीन पंडितांची ग्रंथनिष्ठा, कष्ट, समर्पण, समाधिस्थता लक्षात आल्यावाचून रहात नाही. संस्कृत भाषा, शब्द, संज्ञांना इंग्रजी साज चढवायचा नि ते संस्कृत समकालिक बनवायचे हा चमत्कार करावा केवळ नि केवळ तर्कतीर्थांनीच. 'भाषासु मुख्या अधुरा' च्या अर्थाची ज्यांना प्रचिती घ्यायची आहे त्यांनी एकदा तर्कतीर्थांचं संस्कृत मुळात ऐकावं, वाचावं!

■

*(पूर्वप्रसिद्धी - अक्षरमुद्रा, दिवाळी अंक, उद्गीर; २०२२, पृ. १४ ते १८)*

# ८

# रॉयवाद आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## - प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा वैचारिक प्रवास निरनिराळ्या टप्प्यांतून झालेला आहे. लॉर्ड फ्रान्सिस बेकनने स्वतःविषयी म्हटले होते, "I have taken all knowledge to my province." तेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनाही लागू होते. "He had taken all knowledge to be his province". सगळ्याच ज्ञान प्रांतांमध्ये शास्त्रीजींचा संचार होता. त्यांचा वैचारिक प्रवास हा ज्ञानाच्या विविध प्रांतातून झाला. वयाच्या तेराव्या वर्षांपासून तो सुरू होतो आणि जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यंत तो चालू राहतो. वयाच्या तेराव्या वर्षी वाईच्या प्राज्ञपाठशाळेतून तो सुरू झाला आणि पुन्हा तो तिथेच येऊन थांबला. प्राज्ञपाठशाळा हे धर्मपीठ होते. हिंदू धर्मशास्त्रांचा तेथे पारंपरिक पद्धतीने अभ्यास केला जात होता. वेद-वेदांगत पारंगत होऊनच तेथील विद्यार्थी बाहेर पडत असत. सगळ्या प्रश्नांची उत्तरे धर्मशास्त्रात व धर्मपरंपरेत शोधण्याचा प्रयत्न तेथे होत असे. वाई ही दक्षिणेतील काशी. तेथे धर्मचिकित्सेला देखील भरपूर वाव होता. समाजसुधारणेच्या वाटा फुटतात त्या धर्मचिकित्सेतूनच. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा पिंडच स्वत्रंत बुद्धीने विचार करणाऱ्या अभ्यासकाचा होता. निरनिराळ्या विचारसरणींचे वारे प्राज्ञपाठशाळेच्या प्रांगणात येत होते आणि ते येऊ दिले जात होते. बाहेरच्या विचारांना प्राज्ञपाठशाळेने दारे खिडक्या बंद केल्या नव्हत्या. परंपरा व नवतेचा संगम

प्राज्ञपाठशाळेत झाला होता. परंपरेला तिलांजली न देता नवतेचा स्वीकार तेथे होत होता. केवलानंद हे असे ज्ञानसाधक होते. प्राज्ञपाठशाळा त्यांनीच सुरु केली होती. ते प्रधानाचार्य होते. प्राज्ञपाठशाळेचा भर होता भारतीय विद्येचे संवर्धन करण्यावर. भारतीय राष्ट्राचे पुनरुत्थान करायचे असेल तर भारतीय विद्या जतन करायलाच हवी, या ध्येयवादाने प्राज्ञपाठशाळा चालवली जात होती.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे प्राज्ञपाठशाळेत शिकत असताना विनोबा भावे यांनीही या पाठशाळेत प्रवेश घेतला. विनोबाजींचे शिक्षणही पारंपरिक पद्धतीनेच झाले. त्यांना इंग्रजी भाषा चांगल्या प्रकारे येत होती. विनोबाजी हे खऱ्या अर्थाने भाषाविद होते. अनेक भाषा त्यांना येत होत्या. त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींना प्राज्ञपाठशाळेत इंग्रजी भाषा शिकवली. या भाषेचा त्यांना खूप फायदा झाला. पारंपरिक पद्धतीबरोबर त्यांचे अनौपचारिक पद्धतीने आधुनिक शिक्षणही सुरू झाले. प्राज्ञपाठशाळेत त्यांना अनेक विषयांवरची पुस्तके वाचावयास मिळाली. प्राज्ञपाठशाळेत संस्कृत भाषेत पौर्वात्य धर्म व तत्त्वज्ञानावरची जशी पुस्तके होती तशी इंग्रजी भाषेत पाश्चिमात्य तत्त्वज्ञानावरचीही अनेक पुस्तके होती. प्राज्ञपाठशाळेच्या समृद्ध अशा ग्रंथालयाचा तर्कतीर्थांना खूपच फायदा झाला. केवळ धर्मशास्त्रांचाच त्यांनी अभ्यास केला असता तर ते "one-dimensional scholar' ठरले असते. एक-आयामी पंडित ते नव्हते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे बहुआयामी पंडित होते. चिकित्सक वृत्ती ही त्यांना लाभलेली देणगी होती.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याप्रमाणे विनोबाजींचे शिक्षणही पारंपरिक पद्धतीनेच झाले. त्यांनीही आधुनिक विद्या अनौपचारिक पद्धतीने प्राप्त केली. परकीय भाषा देखील त्यांना चांगल्या अवगत होत्या. धर्मशास्त्रांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. ते गांधीजींच्या सहवासात आले आणि गांधीजींच्या मार्गदर्शनाखालीच त्यांनी आयुष्यभर काम केले. गांधीजींचा आध्यात्मिक चेहरा हीच त्यांची ओळख होती. त्यांनी आपला मार्ग बदलला नाही. गांधीवादाचे ते भाष्यकार होते. विनोबाजी हे एकाच दिशेत आणि एकाच मार्गावर शेवटपर्यंत चालत राहिले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा प्रवास मात्र वेगवेगळ्या दिशेत व वेगवेगळ्या मार्गांवरून झाला.

तर्कतीर्थांनी भारतीय विद्या व पाश्चिमात्य विद्या या दोन्ही विद्या प्राप्त केल्या. त्यात त्यांना कसलेही 'द्वैत' किंवा 'द्वंद्व' आढळले नाही. त्यांनी

पौर्वात्य तत्त्वज्ञानाचा जसा खोलात जाऊन अभ्यास केला तसा पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा देखील केला. खऱ्या चिकित्सक अभ्यासकाला कुठलाही विषय वर्ज्य नसतो. जगातील चिद्‌वादी तसेच जडवादी तत्त्वज्ञानाचा त्यांनी चिकित्सक बुद्धीने अभ्यास केला. इतकेच नव्हे, तर सगळ्या आधुनिक विचारसरणींचा (Ideologies) त्यांनी खोलात जाऊन अभ्यास केला. मग त्या डाव्या विचारसरणी असतील वा उजव्या. पौर्वात्य ज्ञानपरंपरा आणि पाश्चिमात्य ज्ञानपरंपरा या दोन्ही परंपरांमध्ये त्यांनी भेद केला नाही हे विशेष. अशा चिकित्सक अभ्यासामुळेच त्या त्या विचारसरणींमधले गुणदोष आपल्याला कळत असतात. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला गतिशीलता प्राप्त होते ती चिकित्सक अशा सर्वांगीण अभ्यासामुळे. तर्कतीर्थांचे व्यक्तित्त्व बहुआयामी तर होतेच, पण ते गतिशील (Dynamic) देखील होते. वैचारिक निष्ठा हा तर्कतीर्थांचा गुणविशेष होता. डोळसपणानेच त्यांनी अनेक विषयांचा अभ्यास केला. म्हणूनच मी Knowledge was his province असे त्यांच्या बाबतीत म्हटले आहे. विविध क्षेत्रात त्यांनी जो रस घेतला त्याचे कारण हेच आहे. धर्मकारण, समाजकारण, राजकारण, साहित्यकारण अशा निरनिराळ्या उपक्रमांमध्ये ते सहभागी झाले. भौतिक शास्त्रांच्या अभ्यासामुळे त्यांचे विचार आधुनिक व अद्ययावत होते. त्यांची दृष्टी वैज्ञानिक होती. सगळा महाराष्ट्र त्यांच्याकडे एक थिंक टँक म्हणून पाहात होता. प्रासंगिक काय किंवा अप्रासंगिक काय, कालबाह्य काय किंवा कालसुसंगत काय याचे त्यांना भान होते. आणि म्हणून अंधश्रद्धेला त्यांनी आपल्या जवळ फटकू दिले नाही. कर्मकांडापासून ते दूर राहिले.

तर्कतीर्थांच्या वैचारिक प्रवासाला प्राज्ञपाठशाळेतूनच सुरुवात झाली. त्यांच्या वैचारिक प्रवासातला पहिला टप्पा इथून सुरू होतो. येथे त्यांनी धर्मशास्त्राचा (Theology) आणि धर्मग्रंथांचा (Religious Scriptures) सखोल अभ्यास केला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे धर्म व धर्मशास्त्रांचे भाष्यकार (Interpreter) म्हणून पुढे आले. धर्मसुधारकाची आणि पर्यायाने समाजसुधारकाची भूमिका त्यांनी घेतली. जातिभेद आणि अस्पृश्यता अशा कुप्रथांना धर्मशास्त्राचा व हिंदू धर्मशास्त्रांचा आधार आहे का याचा त्यांनी शोध घेतला. हिंदू धर्माची ग्लानी कशी दूर करता येईल या संबंधी ते आपले विचार मांडू लागले. सामाजिक अभिसरण किती आवश्यक आहे याचे प्रतिपादन ते करू लागले. देशात घडणारी स्थित्यंतरे, निरनिराळ्या सामाजिक चळवळी आणि मुख्यत: स्वातंत्र्य आंदोलन यांच्या संदर्भात वैचारिक

भूमिका घेणे आवश्यक होते. खुद्द महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळीला झंझावाताचे स्वरूप प्राप्त झाले होते. ब्राह्मण- ब्राह्मणेतर संघर्ष शिगेला पोचला होता. मनात कसलेही पूर्वग्रह येऊ न देता अगदी वस्तुनिष्ठपणे ते या घटनांकडे पाहात होते. सत्यशोधक चळवळीकडे त्यांनी वस्तुनिष्ठपणे पहिले. १९४७ साली त्यांचे 'जोति-निबंध' हे पुस्तक प्रकाशित झाले. नॅशनल बुक ट्रस्ट इंडियासाठी त्यांनी १९९२ साली 'जोतिचरित्र' हे पुस्तक लिहिले. 'महात्मा फुले समग्र वांङ्मय' च्या प्रथम आवृत्तीची प्रस्तावना त्यांनी लिहिली होती. म. फुल्यांना त्यांनी 'नरव्याघ्र' म्हटले आहे. म. फुल्यांचा त्यांनी फार मोठा गौरव केला आहे. महात्मा फुल्यांचा लढा हा मानवमुक्तीचा लढा होता. फुल्यांच्या लिखाणातही तर्कतीर्थांना मानवतावाद आढळला. सत्यशोधकांच्या लढ्याकडे अशा व्यापक दृष्टीनेच त्यांनी पाहिले हे विशेष.

स्वातंत्र्य आंदोलन निरनिराळी वळणे घेत पुढे सरकत होते. टिळकांच्या निधनानंतर देशाचे नेतृत्व गांधीजींकडे आले होते. अत्यंत अभिनव पद्धतीने स्वातंत्र्य आंदोलनाला गांधीजींनी नवी दिशा व गती दिली. सत्य आणि अहिंसेच्या शस्त्राने ते लढत होते. राजकारणाला त्यांनी आध्यात्मिक मूल्यांचे अधिष्ठान दिले होते. बहिष्कार, असहकार, स्वदेशी आणि राष्ट्रीय शिक्षण यांनी स्वातंत्र्य आंदोलनाला व्यापक असा पाया दिला होता. त्यांच्या सत्याग्रह शास्त्राची चर्चा सगळ्या देशात सुरू झाली होती. स्वातंत्र्य लढ्याला क्लासेसचे नव्हे तर मासेसचेही समर्थन मिळाले होते. महिलाही या लढ्यात उतरल्या होत्या. देशात एक अभूतपूर्व असे वातावरण निर्माण झाले होते. स्वातंत्र्य युद्धाची परिभाषाच महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाने बदलली होती. त्यांनी जगाला नवीन राजकीय तत्त्वज्ञान दिले. पूर्वी राजकारणामध्ये साधन साध्याचा फारसा विचार केला जात नव्हता. महात्मा गांधीजींनी तो प्रकर्षाने केला. End justifies the means या तत्त्वाचे पालन राजकारणामध्ये देखील केले पाहिजे असा महात्मा गांधीजींचा आग्रह होता. साधन शुचिता सर्वच क्षेत्रात आवश्यक आणि अनिवार्य आहे. तत्त्वहीन राजकारणाला गांधीजी सामाजिक पाप समजत होते. महात्मा गांधीजींचा भर सत्य आणि अहिंसेवर होता. सत्याग्रह हे त्यांचे शास्त्र होते. असहकार आणि कायदेभंग या मार्गांचा अवलंब त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात केला. त्याकडे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आकर्षिले गेले होते. त्यात त्यांनीही भाग घेतला. सातारा जिल्ह्यात त्यांनी जनजागृतीचे

काम हिरिरीने केले. इतकेच नव्हे, तर प्राज्ञपाठशाळेतील मुलेही स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाली होती. तर्कतीर्थांनी या चळवळीत स्वत:ला झोकून दिले होते. आपली विद्वत्ता व वक्तृत्व त्यांनी पणाला लावले होते. सत्याग्रह हा महात्मा गांधी विचाराचा गाभा होता. सत्याग्रह म्हणजे कृतीत उरलेले सत्य.

दक्षिण आफ्रिकेतून महात्मा गांधीजी १९१५ साली भारतात परतले. तेथील वंशवादी सत्तेच्या विरुद्ध ते सत्याग्रहाच्या शस्त्रानेच लढले होते. गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या सूचनेनुसार आधी त्यांनी संपूर्ण भारत पाहून घेतला. ग्रामीण भारतातल्या समस्यांचा त्यांनी प्रथम अभ्यास केला. दारिद्र्य आणि अज्ञान यांच्या दलदलीत देश अडकला होता. खरा भारत हा खेड्यापाड्यांतच आहे ही वस्तुस्थिती त्यांच्या लक्षात आली. ग्रामीण जनतेच्या हातात त्यांनी चरखा दिला, कारण चरखा हे रोजगाराचे साधन होते. चरखा हा स्वातंत्र्याचे प्रतीक बनला. खरा भारत हा खेड्यापाड्यांतच असल्यामुळे त्यांच्या सुधारणेवर त्यांनी भर दिला. शिक्षणामध्ये श्रमप्रतिष्ठेला त्यांनी महत्त्वाचे स्थान दिले. अस्पृश्यता हा हिंदू समाजावरचा कलंक आहे. म्हणून त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनाचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर आणला. अस्पृश्यतेला धर्माचा आधार आहे अशी धारणा असणारे बहुसंख्य लोक देशात होते. अस्पृश्यतेला शास्त्राचा आधार नाही असे म्हणणारे काही संस्कृत पंडितही देशात होते. अशा पंडितांमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची गणना होत होती. त्यामुळे महात्मा गांधीजींशी त्यांची जवळीक निर्माण झाली. महात्मा गांधीजींनी त्यांचा यासंदर्भात सल्ला घेतला.

१९३३ साली तर्कतीर्थांनी महात्मा गांधीजींची भेट घेतली. त्यांचे नाव महात्मा गांधीजींच्या कानावर आधीच गेले होते. तर्कतीर्थांना महात्मा गांधीजींनी सांगितले की धर्मशास्त्राची अस्पृश्यतेला मान्यता नाही, समर्थन नाही. महात्मा गांधीजी म्हणत असत, 'माझी श्रद्धा आहे की, ईश्वराला देखील अस्पृश्यता पटणार नाही.' महात्मा गांधीजींनी अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्याला निर्धाराने हात घातला होता. १९३३ या वर्षीच महात्मा गांधीजींचे पुत्र देवदास व चक्रवर्ती राजगोपालचारी यांची कन्या लक्ष्मी यांचा आंतरजातीय विवाह झाला. या विवाहाचे पौरोहित्य तर्कतीर्थांनी केले होते. नंतर सोमनाथ मंदिराचेही त्यांनी पौरोहित्य केले. चातुर्वर्ण्य आता कालबाह्य झालेले आहे. ते प्रासंगिक नाही आणि म्हणून हा विवाह

होण्यास काहीच आडकाठी नाही, हे तर्कतीर्थांनी महात्मा गांधीजींना सांगितले. तर्कतीर्थ महात्मा गांधीजींच्या आदरास पात्र ठरले होते. त्यांच्या बाबतीत गांधीजी म्हणाले, "He is a man of great learning and spotless character."

महात्मा गांधी विचारांचा प्रभाव केवळ स्वातंत्र्य चळवळीवरच पडला नव्हता, तर इतर सर्व क्षेत्रांवर देखील पडला होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीही महात्मा गांधीजींच्या प्रभावाखाली आले होते. अर्थात, गांधीवाद त्यांनी स्वीकारला होता. महात्मा गांधीजींनी भारतीय राजकारणाला अध्यात्मिक मूल्यांचे अधिष्ठान दिले होते. त्यातून सत्याग्रह क्रांतिशास्त्राचा विकास झाला. जगाच्या इतिहासात पहिल्यांदाच अशी गोष्ट घडली. तर्कतीर्थांना गांधीवादाने आकर्षित केले होते. पण त्यांनी तो भाबडेपणाने स्वीकारला नव्हता. बुद्धीला न पटणाऱ्या गोष्टी महात्मा गांधीजी कधी कधी बोलत असत. १५ जानेवारी १९३४ रोजी बिहारमध्ये मोठा भूकंप झाला. उच्चवर्णीय हिंदूंच्या पापामुळे हा भूकंप झाला असे महात्मा गांधीजींना वाटले. हिंदूंनी अस्पृश्यता पाळल्यामुळेच हे घडले असे ते म्हणाले. तर्कतीर्थांबरोबर अनेकांना हे उद्गार धक्का देणारे होते. महात्मा गांधीजींची ही अंधश्रद्धा होती. महात्मा गांधीजींच्या विषयीचे आकर्षण त्यामुळे कमी झाले. त्यानंतरही तर्कतीर्थ महात्मा गांधीजींकडे अधून मधून जात असत.

याच काळात देशात गांधीवादाबरोबर मार्क्सवाद, समाजवाद, रॉयवाद आदी वाद लोकांच्या चर्चेचे व अभ्यासाचे विषय झालेले होते. कम्युनिझम हा सगळ्या जगात घोंगावत होता. नव्हे, तो लोकांच्या मानगुटीवर बसला होता. राष्ट्रराष्ट्राच्या सीमा ओलांडून तो कामगार विश्वात जाऊन पोचला होता. जगातील कामगारांना त्याने एक फार मोठे स्वप्न दिले होते. कामगार सत्तेवर येणार, भांडवलशाही कोसळणार, त्याची जागा समाजवाद घेणार आणि शेवटी राज्य संस्थाच नष्ट होणार असे संशोधनाच्या माध्यमातून कार्ल मार्क्सने भाकीत केले होते. त्याने 'Communist Manifesto' घोषित केला होता. इतकेच नव्हे, तर रशियामध्ये कम्युनिस्ट क्रांती होऊन कामगारांच्या हातात राज्य सत्ता आली होती तेथे कामगारांची एकाधिकारशाही (Dictatorship of Proletariat) प्रस्थापित झाली होती. खाजगी मालकी ही संकल्पनाच पुसून टाकण्यात आली होती. आर्थिक विकासासाठी घोडदौड सुरू झाली होती. मार्क्सने चितारलेले स्वप्न वास्तवात आले

होते. आणि असा बदल सगळ्या जगातच होणार होता. Workers of the world, unite ही हाक कम्युनिस्ट जाहीरनाम्याने दिली होती.

खरेतर मार्क्सवाद हा जगातील विचारवंतांच्या आकर्षणाचा, कुतुहलाचा, अभ्यासाचा व चिंतनाचा विषय झाला होता. प्रत्यक्ष रशियात जाऊन पंडित जवाहरलाल नेहरूंनी 'याचि देही याचि डोळा' हे स्वप्न वास्तवात उतरलेले पाहिले होते. बर्ट्रांड रसेल सारखा जागतिक कीर्तीचा तत्त्वज्ञ देखील मार्क्सवादी विचारांच्या प्रभावाखाली आला होता. मार्क्सवादी विचार भारतात १९३० नंतर लोकांच्या चर्चेचा व आकर्षणाचा विषय ठरला. अनेकांना त्याने झपाटले होते. १९२५ साली कम्युनिस्ट पक्षाची स्थापना भारतात झाली. पुरोगामी विचारवंतांनी त्याचे सहर्ष स्वागत केले. एम. एन. रॉय यांच्यासारख्या राष्ट्रवादी तरुणांनी आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीमध्ये उडी घेतली. त्यामध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीही होते. मार्क्सचे तत्त्वज्ञान हे जग बदलणारे तत्त्वज्ञान होते. अनेक वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर इंग्लंडमधल्या कामगारांच्या चळवळीमध्ये सहभागी झाल्यानंतर हे तत्त्वज्ञान मार्क्सने जगाला दिले. त्याने भौतिकवादाचे शिखर गाठले होते. जगातील विषमता संपून समता निर्माण करणारे कंकण हाती बांधणारे ते जडवादी तत्त्वज्ञ होते. मार्क्सने इतिहासावर जे भाष्य केले आहे ते भौतिकवादी तत्वज्ञानाचे समर्थन करणारे आहे. आजपर्यंतच्या तत्त्वज्ञानांच्या संदर्भात ते म्हणतात, The philosophers have only interpreted the world in various ways; the point, however, is to change it. जगाला जग बदलणारे तत्त्वज्ञान देण्याचा दावा त्यांनी केला आहे. मार्क्सने सांगितलेले तत्त्वज्ञान जगभरातील कम्युनिस्टांनी शस्त्र म्हणून वापरावयाचे ठरविले.

कार्ल मार्क्सने जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून टाकला. माणसामाणसांमध्ये, समाजासमाजांमध्ये भेद केले जातात ते मालमत्तेच्या (Property) आधारावर. मालमत्तेची विभागणीच विषम आहे. ह्या विषम विभागणीमुळेच समाजात वर्ग निर्माण होतात आणि त्यातून वर्गसंघर्ष पेटतो. आणि म्हणून मालमत्तेची 'मालकी'च नाहीशी केली पाहिजे. मालमत्तेचे वर्णन कोणी चोरी असे केले तर कोणी पवित्र वस्तू असे केले आहे. खरे तर मालमत्ता निर्माण होते ती श्रमिकांच्या अतिरिक्त श्रमातून. पण ज्याच्या श्रमावर संपत्ती निर्माण केली जाते त्याच्या घरातच खाण्याची तदात असते. आणि जो श्रम करीत नाही तो मालक बनतो. श्रमिकांच्या शोषणावर भांडवलशाही वाढते. मार्क्सने अतिरिक्त श्रमातून भांडवलशाही कशी वाढत

जाते याचा सिद्धांतच मांडला आहे. समाजात विषमता निर्माण होते ती मालमत्तेच्या विषम वाटणीमुळे. आणि म्हणून मालमत्तेवरची मालकी संपवली पाहिजे, असा क्रांतिकारी विचार त्याने मांडला. या विचारावर त्याने कम्युनिझमची व्यूहरचना केली. कार्ल मार्क्सने म्हटले आहे, The theory of the Communists may be summed up in the single sentence: abolition of private property.

या विचाराने श्रमिकांच्या मनात हर्ष उत्पन्न केला आणि भांडवलदारांच्या मनात भयकंप. त्यातून एक प्रकारचे पिशाच निर्माण झाले. साम्यवादाच्या पिशाचाने जग झपाटून टाकले. कार्ल मार्क्सच्या शब्दात सांगायचे झाले तर- - spectre is haunting Europe- the spectre of Communism. केवळ युरोपलाच नव्हे तर संबंध जगालाच साम्यवादाने झपाटून टाकले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या वैचारिक जीवनातला मार्क्सवाद हा तिसरा टप्पा आहे. साम्यवादी विचारसरणीने त्यांचेही लक्ष वेधून घेतले. मूलभूत परिवर्तनाचा 'रोडमॅप' या विचारसरणीने दिला. हे भौतिकवादी तत्त्वज्ञानही त्यांना 'अपील' करणारे ठरले. चिद्वादी तत्त्वज्ञान हा त्यांच्या वैचारिक प्रवासाचा आरंभबिंदू होता. ते जडवादी तत्त्वज्ञानापर्यंत आले. या तत्वज्ञानाने त्यांचे विचारविश्व बदलले. गांधींचा विचार त्यांनी पूर्णपणे सोडला असे नाही. पण ते मार्क्सवादाकडे झुकले. कारण मार्क्सवाद हा समतेवर आधारलेला होता. माणसाचे भौतिक जीवन हेच खरे जीवन आहे. त्याच्याच सुखाचा व समृद्धीचा विचार करणे आवश्यक आहे. लोकांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न अतिशय महत्त्वाचे असतात. ते प्राधान्याने सोडवणे आवश्यक आहे. स्वातंत्र्याला केवळ राजकीय अर्थच नसतो तर त्याला आर्थिक व सामाजिक अर्थही असतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी मार्क्सवादाकडे झुकले ते या कारणाने. खरेतर अनेक जण त्याकडे झुकले होते. तो विश्वव्यापी विचार ठरला होता. पंडित जवाहरलाल नेहरू, जयप्रकाश नारायण, एम. एन. रॉय ही मंडळी मार्क्सवादी अर्थात समाजवादी विचारांच्या प्रभावाखाली आली होती. मार्क्सवाद हा झपाटणारा व पछाडणारा विचार होता. तर्कतीर्थांनी 'दास कॅपिटल', आणि 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' बारकाईने वाचले.

काँग्रेस पक्षामध्ये विविध विचारसरणींचे लोक होते. त्यात डाव्या विचारसरणीचे लोक होते तसेच उजव्या विचारसरणीचे लोकही होते. निरनिराळ्या धर्मश्रद्धा बाळगणारे लोकही तीत होते. स्वातंत्र्य चळवळीने

त्यांना एकत्रित बांधले होते. निरनिराळे विचारगटही काँग्रेसमध्ये होते. जयप्रकाशांचा समाजवादी गट होता. एम.एन.रॉय यांच्यासारखे मार्क्सवादी लोकही तीत होते. एम. एन. रॉय यांचा मार्क्सवादी विचार उत्क्रांत होत चालला होता. मार्क्सवादातले गुणदोष त्यांच्या लक्षात आले होते. अतिशय मूलगामी विचार करणारा हा राजकीय विचारवंत होता. त्यामुळे एम. एन. रॉयचे सहप्रवासी होण्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना बौद्धिक आनंद प्राप्त झाला होता. त्यांच्याकडे ते आकर्षिले गेले होते. मार्क्सवादी विचार त्यांनी स्वीकारला होता. मात्र कम्युनिस्ट पक्षात त्यांनी प्रवेश केला नव्हता. मार्क्सप्रणीत ऐतिहासिक भौतिकवादाचे आकर्षण मात्र त्यांच्या मनात निर्माण झाले होते. जगाला जग बदलणारे तत्त्वज्ञान दिले होते. त्याने जगातील विचारवंतांमध्ये एक प्रकारचे कुतूहल निर्माण केले होते. त्याने त्यांच्या बुद्धी आणि भावनेला आवाहन दिले होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्याच्या खोलात जाऊन अभ्यास केला. मार्क्सचे हे तत्त्वज्ञान त्यांना स्वीकारार्ह वाटले होते. मानवी समस्येवर ते आधारलेले होते आणि त्यात मानवतेची हाकही होती. साम्यवादाला जगात आमूलाग्र बदल घडवून आणावयाचा होता. त्याच्या आधारावरच रशियन क्रांती झाली होती. ती क्रांती डोळे दीपवणारी होती. मार्क्सने मानवमुक्तीचा लढा पुकारला होता.

साम्यवादाचे एक महत्त्वाचे सूत्र म्हणजे, 'प्रत्येकाकडून त्याच्या क्षमतेप्रमाणे आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे' या सूत्रात लेनिनला बदल करावा लागला. तो एका शब्दाचा बदल होता. 'प्रत्येकाकडून त्याच्या क्षमतेप्रमाणे आणि प्रत्येकाला त्याच्या कामाप्रमाणे.' मार्क्सचे सूत्र आदर्शवादावर आधारलेले आहे. लेनिनचे सूत्र यथार्थवादावर आधारलेले आहे. हा बदल आवश्यक होता. कट्टर साम्यवादी हे मार्क्सवादाकडे पोथीवादी दृष्टिकोनातून पाहतात. तर्कतीर्थांना हा पोथीवाद मान्य नव्हता. निखळ बुद्धिवादाच्या दृष्टिकोनातून त्यांनी त्याकडे पाहिले मार्क्सवादाला त्यांनी रामबाण औषध (Panacea) कधी मानले नाही. मार्क्सचे बौद्धिक सामर्थ्य त्यांना मोहविणारे होते.

तीसच्या दशकामध्ये भारतात निरनिराळी राजकीय तत्त्वज्ञाने उदयाला आली होती. त्या सर्वांचा तर्कतीर्थांनी चिकित्सक बुद्धीने अभ्यास केला. मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा सखोल प्रभाव त्यांच्या मनावर पडला होता. 'हिंदू धर्माची समीक्षा' हा त्यांचा ग्रंथ वाचताना देखील तो जाणवतो.

भारतातील मार्क्सवादी पुढाऱ्यांमध्ये एम. एन. रॉय यांचे व्यक्तिमत्त्व अगदी पृथगात्म होते. ते एक अभिजात राजकीय तत्त्वज्ञ होते. ते केवळ विचारवंत नव्हते. ते कृतिशील कार्यकर्ते देखील होते. He was a man of thought and action. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती एक तेजोवलय निर्माण झाले होते. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा त्यांचा अभ्यास असाधारण स्वरूपाचा होता. ते मार्क्सवादी म्हणून ओळखले जात होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे त्यांच्या विचारांचे अनुयायी बनले. रॉयवाद हा तर्कतीर्थांच्या वैचारिक प्रवासातला शेवटचा टप्पा मानला जातो. एम. एन. रॉय यांचे ते केवळ सहप्रवासीच नव्हते तर त्यांचे निकटवर्तीय सहकारी व मित्र होते.

एम. एन. रॉय यांचा वैचारिक प्रवास आधी समजून घेतला पाहिजे. त्यांनी नवमानवतावादी तत्त्वज्ञान निर्माण करण्यापूर्वी केलेला त्यांचा वैचारिक प्रवास आधी समजून घेण्याची आवश्यकता आहे. तो प्रवास मुख्यतः तीन टप्प्यातून झालेला आहे. एक प्रखर राष्ट्रवादी म्हणून त्यांचा प्रवास सुरू झाला. सुरुवातीपासून शेवटपर्यंत तो अतिशय धाडसी प्रवास होता. ते जितके प्रखर राष्ट्रवादी होते तितकेच प्रखर साम्यवादीही होते. त्यांचा वैचारिक प्रवास संपला तो एक मूलगामी मानवतावादी (Radical Humanist) म्हणून. मूलगामी मानवतावादाचे (Radical Humanism) तत्त्वज्ञान त्यांनी निर्माण केले. रॉयवाद म्हणजे मूलगामी मानवतावाद.

पश्चिम बंगालमधील एका खेड्यात एका ब्राह्मण कुटुंबात २१ मार्च १८८७ रोजी एम. एन. रॉय यांचा जन्म झाला होता. त्यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ भट्टाचार्य होते. वयाच्या चौदाव्या वर्षांपासून एक क्रांतिकारी म्हणून भूमिगत चळवळीमध्ये भाग घ्यायला त्यांनी सुरुवात केली होती. निरनिराळी नावे त्यांना धारण करावी लागली. मानवेंद्र नाथ हे धारण केलेले एक नाव. या नावानेच नंतर ते ओळखले गेले. जतीन मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी व त्यांच्या समविचारी सहकाऱ्यांनी ब्रिटिश सत्ता उलथून टाकण्याची सशस्त्र योजना बनवली होती. त्यासाठी शस्त्रे जमविण्याचे काम त्यांनी हाती घेतले. त्यासाठी रॉय हे जावा व जपानला गेले. जपानहून चीन आणि पुन्हा चीनहून जपानला गेले. १९१६ मध्ये ते सॅनफ्रान्सिस्कोला गेले. अमेरिकेतही त्यांनी आपले क्रांतिकारी कार्य चालूच ठेवले. पहिल्या महायुद्धाचा तो काळ होता. अमेरिकेतून ते मेक्सिकोला गेले. त्यांच्या अशा अवस्थेतही राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास चालूच होता. समाजवादावरची बरीच पुस्तके त्यांनी वाचली होती. मेक्सिकन

समाजवादी पार्टीचे ते सदस्य बनले. थोड्याच काळात ते या संघटनेचे सचिव बनले. त्या संघटनेचा विकास त्यांनी केला. ते मेक्सिकन समाजवादी पार्टीचे सरचिटणीस बनले. मेक्सिकन समाजवादी पार्टीचे रूपांतर त्यांनी मेक्सिकन कम्युनिस्ट पार्टीत केले. त्यामुळे ते जागतिक साम्यवादी चळवळीच्या संपर्कात आले. १९२० मध्ये मॉस्को येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट परिषदेत भाग घेण्याची संधी त्यांना मिळाली. परिषद भरण्यापूर्वीच ते मॉस्कोला पोचले. त्यांनी भारत, चीन आणि इतर वसाहतवादाखालील देशांमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे कार्य कसे वाढवता येईल या विषयावर लेनिनशी चर्चा केली. दोघांमध्ये काही मतभेदाचे मुद्दे आढळून आले. त्या संबंधी दोघांनीही आपले प्रबंध परिषदेत मांडले. परिषदेमध्ये दोघांचेही विचार मान्य करण्यात आले.

एम. एन. रॉय 'कम्युनिस्ट इंटरनॅशनल'च्या शीर्षस्थानी पोहोचले होते. भारतात साम्यवादी चळवळ विकसित करण्याचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापकांपैकी ते एक प्रमुख नेते होते.

लेनिननंतर कम्युनिस्ट इंटरनॅशनलची सूत्रे स्टॅलिनच्या हातात गेली. पक्षात स्वतंत्रपणे विचार करणारी माणसे स्टॅलिनला आवडत नव्हती. अशा लोकांना त्याने कम्युनिस्ट इंटरनॅशनलपासून दूर ठेवले. एम. एन. रॉय यांच्यासारखा स्वतंत्र बुद्धीने काम करणारा माणूस स्टॅलिनला आवडणे शक्यच नव्हते. १९२९ मध्ये त्याने एम. एन. रॉयला अलगद बाजूला सारले.

एम. एन. रॉय भारतात परतले. १९२४ मध्ये घडलेल्या कानपूर कटातले ते एक संशयित गुन्हेगार होते. भारतात परतल्यानंतर त्यांना पकडण्यात आले. १२ वर्षे कारावासाची शिक्षा त्यांना ठोठावण्यात आली. त्यातील ६ वर्षे कमी करण्यात आली. १९३६ मध्ये त्यांची सुटका झाली. कारागृहाबाहेर आल्यानंतर लोकांना त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा सल्ला दिला. काँग्रेस संघटनेची बांधणी ग्रामीण भागापासून सुरू केली पाहिजे असे त्यांचे मत होते. त्या दिशेने त्यांनी कार्य सुरू केले. काँग्रेसमध्ये त्यांचा अनुयायांचा गटच तयार झाला. दुसरे महायुद्ध संपण्यापूर्वीच ते काँग्रेसमधून बाहेर पडले.

दुसरे महायुद्ध हे फॅसिझमच्या विरुद्ध आहे आणि म्हणून इंग्रजांना भारतीयांनी मदत केली पाहिजे अशी भूमिका त्यांनी घेतली. गांधीजींची

भूमिका असहकाराची होती. पहिल्या महायुद्धामध्ये भारतीयांनी इंग्रजांना साथ दिली होती. पण त्यांनी दिलेली अभिवचने पाळली नव्हती. आणि म्हणून महात्मा गांधीजींनी त्यांना साथ द्यावयाची नाही असा निर्णय घेतला. या युद्धात जर्मनीविरुद्ध लढणारी राष्ट्रे हरली तर सगळ्या जगावरच फॅसिझमचे संकट कोसळेल असे एम. एन. रॉयला वाटत होते. फॅसिझमला पराजित केले तरच जग सुरक्षित राहील असे त्यांना वाटत होते.

पण भारतीय नेत्यांचा विचार आणि एम. एन. रॉय यांचा विचार जुळला नाही म्हणून त्यांनी आपल्या अनुयायांसमवेत काँग्रेस पक्ष सोडला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे यांचे अगदी जवळचे सहकारी होते. म्हणून तेही काँग्रेसमधून बाहेर पडले. एम. एन. रॉय यांनी काँग्रेस सोडल्यानंतर त्यांनी आपला स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन केला. डिसेंबर १९४० मध्ये त्यांची Radical Democratic Party अस्तित्वात आली. त्यांची Radical Democratic Party ही Radical Humanism (नवमानवतावाद) या विचारधारेवर उभी होती. त्यांचे 'नवमानवतावाद' हे तत्त्वज्ञान समाज आणि संस्कृतीच्या स्पंदनांना स्पर्श करणारे होते. केवळ राज्याचीच रचना त्यांना नवमानवतावादावर निर्माण करावयाची नव्हती, तर सगळा समाज आणि संस्कृतीच या तत्त्वज्ञानावर उभी करावयाची होती. साम्यवादातून त्यांना साम्यवादाच्या पलीकडे जावयाचे होते. 'नवमानवतावाद' हेच त्यांचे गंतव्य (Destination) होते. "Communism and Beyond' या पुस्तकात त्यांनी याविषयी चर्चा केली आहे.

एम. एन. रॉय यांनी नवमानवतावादाचे जे तत्त्वज्ञान विकसित केले आहे ते समजून घेण्यासाठी New Humanism-- Manifesto, New Orientation आणि Communism and Beyond ही तीन पुस्तके वाचली पाहिजेत. नवमानवतावाद हा भौतिकवादाचा पुरस्कार करतो यात शंका नाही. मार्क्सवादाप्रमाणे रॉयवाद देखील भौतिकवादावर आधारलेला आहे. भौतिकवादावरचे त्यांचे विचार समजून घेण्यासाठी त्यांचे Materialism हे पुस्तक वाचले पाहिजे. त्याच्या विकास प्रक्रियेमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचाही सहभाग होता. एम. एन. रॉयच्या Radical Democratic Party च्या स्थापनेतही ते सहभागी होते. या पार्टीचा कार्यक्रम निश्चित करण्यामध्येही त्यांनी मोलाचा वाटा उचलला होता.

दुसऱ्या महायुद्धात फॅसिस्ट शक्तींचा पराभव झाला. युद्धोत्तर भारताच्या पुनर्निर्माणाच्या कामाला ते लागले. त्यांनी दोन महत्त्वाचे दस्तऐवज तयार

केले: "Draft Constitution of Free India' आणि "People Plan for Economic Development' भारताचे संविधान कसे असावे याविषयीचा हा दस्तऐवज आहे. भारताच्या आर्थिक आणि राजकीय प्रश्नांचा खोलात जाऊन त्यांनी अभ्यास केला होता. त्यांचा विशेष भर शेती विकासावर आणि लघुउद्योगांवर होता. त्यांचा दुसरा दस्तऐवज "People's Plan for Economic Development' हा आहे. त्यांनी लोकांच्या प्राथमिक गरजांवर भर दिला आहे. भारताच्या विकासाचे मॉडेल काय असावे हे त्यामध्ये आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या पाच गोष्टींना त्यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले होते.

रॉय यांना अभिप्रेत असलेला भारत हा लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर आधारलेला होता. 'ग्रासरुट्स डेमॉक्रसी' हा स्वतंत्र भारताचा पाया असेल. त्यांनी स्वतंत्र भारताचे प्रारूप त्यांच्या "Draft Constitution of Free India' मध्ये स्पष्ट केले आहे. लोकसमित्यांचे देशात जाळे निर्माण करण्याची योजना त्यांनी मांडली होती. सत्ता ही लोकांपर्यंत गेली पाहिजे. लोक सहभागाशिवाय लोकशाही मजबूत होणार नाही. 'आधी कळस मग पाया' अशी त्यांची लोकशाहीची रचना नव्हती. 'आधी पाया मग कळस' या तत्त्वानुसार लोकशाहीचा विकास झाला पाहिजे.

दुसऱ्या महायुद्धानंतर मार्क्सवादापासून ते दूर गेले. व्यक्तिस्वातंत्र्याला फारसा वाव देत नाही, हे त्यांच्या लक्षात आले. खरेतर व्यक्ती व्यक्तींनी मिळून समाज बनतो. व्यक्तीचे सामर्थ्य व्यक्तिस्वातंत्र्याशिवाय कसे वाढेल? कम्युनिस्ट पक्षाने याकडे दुर्लक्ष केलेले होते. जर्मनीमध्ये नाझीवादाने क्रौर्याची सीमा गाठली होती तशी साम्यवादाने रशियामध्ये गाठली होती. मार्क्सने इतिहासाचा अर्थ केवळ जडवादी तत्त्वावरच लावला. इतिहासामागे केवळ आर्थिक घटकच असतो असे कार्ल मार्क्सचे म्हणणे होते. मानवी घटकाकडे त्याने पूर्ण दुर्लक्ष केले. मानवी घटकाकडे दुर्लक्ष म्हणजे मानवतेकडे दुर्लक्ष. जे काही बदल होतात ते आर्थिक शक्तींमुळे. माणसाला त्यात कसलेही स्थान नाही असा त्याचा अर्थ होतो. मानवाला वगळून मानवी समाज कसा अस्तित्वात येईल? तत्त्वज्ञानातून मानवतावाद पुढे आला पाहिजे, या गोष्टीकडे मार्क्सवाद्यांनी दुर्लक्ष केल्याचे आढळते.

रॉयवादाचा केंद्रबिंदू मानवतावाद हाच आहे. त्यांचा 'रॅडिकल ह्युमॅनिझम' हा मानवी स्वातंत्र्याला सर्वाधिक महत्त्व देतो. त्यांनी 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक

पार्टी' ही मूलभूत मानवतावादावर उभी केली. त्यांचा नवमानवतावादाचा जाहीरनामा हा बावीस तत्त्वांवर आधारलेला आहे. ती तत्त्वे निर्धारित करण्यामध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचाही महत्त्वाचा वाटा होता.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीच्या महाराष्ट्र शाखेचे सरचिटणीस होते. या पक्षाचा जाहीरनामा तयार करण्यापासून ते त्याचा कार्यक्रम निश्चित करण्यापर्यंत, त्याची बांधणी करण्यापासून ते त्याच्या प्रचार-प्रसारापर्यंत त्यांचा सक्रिय सहभाग होता. नवमानवतावादाचे तत्त्वज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी प्रबोधन चळवळही एम. एन. रॉय यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात चालवली. नवमानवतावादाचे ते थिंक टँक होते. महाराष्ट्रातला बुद्धिवादी वर्ग त्याकडे आकर्षित झाला होता. यशवंतराव चव्हाण देखील एम. एन. रॉयच्या प्रभावाखाली आले होते. पण त्यांनी काँग्रेस पक्ष सोडला नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या संदर्भात मतभेद झाल्यामुळे एम. एन. रॉय यांनी काँग्रेस पक्ष सोडला आणि स्वतःचा पक्ष स्थापन केला. पक्ष स्थापन करण्यापूर्वी त्यांनी नवमानवतावादाची चळवळ देशात आरंभली होती. कम्युनिस्ट चळवळीपासून ते दूर गेले होते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी मात्र एम. एन. रॉय यांच्यासोबत शेवटपर्यंत होते. एम. एन. रॉय यांच्या निर्णय प्रक्रियेत ते शेवटपर्यंत सहभागी होते. गोवर्धन पारीख, इंदुमती पारीख, अ.भि. शाह, व्ही. बी. कर्णिक, द. भि. कर्णिक, व्ही. एम. तारकुंडे या बुद्धिवाद्यांनी एम. एन. रॉय यांच्या नवमानवतावादाचा प्रचार-प्रसार महाराष्ट्रात अगदी हिरिरीने केला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे आघाडीवर होते. रॉय यांनी काँग्रेस पक्ष सोडला तेव्हा त्यांच्याबरोबर तर्कतीर्थांनी देखील तो सोडला.

'रॅडिकल ह्युमॅनिझम' हा एम. एन. रॉय यांच्या २२ प्रबंधांवर अर्थात तत्त्वांवर आधारलेला आहे. त्या तत्त्वांमध्ये नवमानवतावादाचा सार आहे. हे प्रबंध अर्थात तत्त्वे म्हणजेच रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाचा जाहीरनामा. प्रश्नांच्या मुळापर्यंत जाण्याची दृष्टी एम. एन. रॉय यांना लाभली होती. ते खऱ्या अर्थाने प्रबोधन पुरुष होते. युरोपियन प्रबोधनाचा त्यांच्यावर सखोल प्रभाव पडलेला होता. युरोपियन प्रबोधनाने माणूस हा केंद्रस्थानी ठेवला होता. त्या प्रबोधनातूनच 'सेक्युलॅरिझम' ची संकल्पना पुढे आली होती. त्याने भौतिकवादी तत्त्वज्ञान निर्माण केले. भौतिकवादी तत्त्वज्ञानच हे जग बदलू शकते, ही रॉय यांची धारणा होती.

युरोपियन प्रबोधन हे ईश्वराविरुद्ध माणसाचे बंड होते. It was man's

revolt against God. त्यानेच आधुनिक युग निर्माण केले. हे प्रबोधन जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे होते. नवसंस्कृतीला त्याने जन्म दिला. मानवजातीचे व मानवतेचे मूळ म्हणजे माणूस. Man is the measure of all things, असे लिओनार्दो दा विन्सी म्हणतो. माणूस हेच विश्वाचे मोजमाप हा महत्त्वाचा विचार प्रबोधन चळवळीतून पुढे आला. तो धागा पकडूनच नवमानवतावादाचे वस्त्र एम. एन. रॉय यांनी विणले आहे. 'रॅडिकल ह्युमॅनिझम' या सामाजिक तत्त्वज्ञानाच्या प्रचार-प्रसारासाठी त्यांनी भारतात प्रबोधन चळवळ सुरू केली. महाराष्ट्रात या प्रबोधन चळवळीचे नेतृत्व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. आणि म्हणूनच एम. एन. रॉय यांनी तर्कतीर्थांना - Man of India's Renaissance असे म्हटले आहे.

माणसाला निसर्गाने बुद्धी दिलेली आहे. म्हणूनच तो बुद्धिवादी (Rational) प्राणी आहे. बुद्धीच्या आधारावरच त्याला सद्सद्विवेकबुद्धी (Conscience) प्राप्त झाली आहे. बुद्धी ही ज्ञानप्राप्तीचे साधन आहे. आणि ज्ञान ही शक्ती आहे, सत्ता आहे. इतिहासाच्या विकासात बुद्धीला मोठे व महत्त्वाचे स्थान आहे. मार्क्सने Man च्या ऐवजी Matter ला स्थान दिले. Knowledge is Power असे लॉर्ड फ्रान्सिस बेकन म्हणतो. बेकन हा प्रबोधन युगातला फार मोठा विचारवंत होता. मार्क्सने Matter is the measure of all things 'mZbo. Man is the root of mankind and humanity.

एम. एन. रॉय यांनी निर्माण केलेले २२ प्रबंध अतिशय महत्त्वाचे आहेत. त्यात रॉयवाद अर्थात 'मूलगामी मानवतावाद' सामावलेला आहे. एम. एन. रॉय यांच्या नवमानवतावादात माणूस हाच केंद्रस्थानी आहे. आणि म्हणूनच समाजाचा विकास हा व्यक्तीच्या विकासापासून सुरू होतो. माणसा-माणसांच्या सहकारातूनच समाज बनतो. माणसा-माणसांतील परस्पर संबंध समाजरचनेसाठी आवश्यक असतात. त्यांच्यातील सहकार्यामुळेच समाज एकजिनसी बनतो. म्हणून माणूस हाच मानवतावादाचा पाया आहे. पहिल्याच सिद्धांतात म्हटले आहे. Man is the -rchetype of society, co-operative social relationships contribute to develop individual potentialities. प्रत्येक व्यक्तीमधील क्षमतांचा विकास म्हणजे समाजाचा विकास. प्रत्येक व्यक्तीचे कल्याण म्हणजेच समाजाचे कल्याण.

माणसातील क्षमतांचा विकास करण्यासाठी त्याला स्वातंत्र्य हवे. स्वातंत्र्य ही माणसाची मूलभूत गरज आहे. स्वातंत्र्य आणि सत्याचा शोधातूनच मानवी प्रगती संभवते. एम. एन. रॉय यांनी आयुष्यभर स्वातंत्र्य आणि सत्याचा शोध घेतला. ज्ञानसाधनेत त्यांनी सगळे आयुष्य घालवले. खरे ज्ञान हेच सत्य असते सत्य हाच ज्ञानाचा आशय असतो अशी त्यांची धारणा होती. Truth is the content of knowledge. रॉयवाद हा ज्ञान, सत्य आणि स्वातंत्र्य ह्या मूल्यांवर आधारलेला आहे. रॉय यांनी ही तत्त्वे नवमानवतावादातील ध्रुवतत्त्वे मानली होती. स्वातंत्र्य म्हणजे माणसावर लादलेली सर्व प्रकारची बंधने नाहीशी होणे. माणूस अद्याप बंधमुक्त झाला नाही. पॉमिथिअसप्रमाणे तो आयुष्यभर शिक्षा भोगीत आला आहे.

बुद्धी हे माणसाला प्राप्त झालेले साधन आहे. त्याचे ते शस्त्रच आहे. इच्छाशक्ती ही त्याला प्राप्त झालेली देण आहे. बुद्धी आणि इच्छाशक्तीच्या जोरावरच तो प्रतिकूल परिस्थितीवर मात करतो. इतिहासामागे केवळ आर्थिक घटक नसतात. इतिहासाच्या प्रक्रियेमध्ये इतर घटक देखील आहेत हे मार्क्सने लक्षात घेतले नव्हते. त्यात मानवी घटकांना महत्त्वाचे स्थान असते.

राज्य हे समाजाचे राजकीय संघटन आहे. ते इतिहासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर आपोआप संपेल असा 'युटोपिया' मार्क्सने मांडला होता. त्याचे हे भाकीत खोटे ठरले आहे.

एम. एन. रॉय यांचा भर मूलभूत लोकशाहीवर (Radical Democracy) होता. मार्क्सचा भर श्रमजीवी हुकूमशाहीवर (Proletariat Dictatorship) होता. रॉय यांना Proletariat Democracy अभिप्रेत होती. या दोन्ही संकल्पना परस्परविरोधी आहेत. दोन्हीमध्ये दोन ध्रुवांचे अंतर आहे. Communist Manifesto १८४८ साली प्रसिद्ध झाला होता. त्याने एक सुरेख चित्र रंगविले होते. दास कॅपिटलमध्ये केलेली मार्क्सची मांडणी अप्रतिम होती. मार्क्सने मानवमुक्तीचा लढा उभा केला होता. Man is the root of mankind हे सूत्र समोर ठेवून त्याने मानवमुक्तीचा लढा घोषित केला होता. खरे तर ती कामगार क्रांतीची घोषणा होती.

एम. एन. रॉय यांनाही क्रांतीच अभिप्रेत होती. पण त्यांच्यासमोर केवळ 'आर्थिक माणूस' आणि 'आर्थिक समाज' यांचीच प्रतिमा नव्हती. "Beyond Communism' ह्या पुस्तकात त्यांनी 'नवमानव' आणि 'नवसमाज' यांची प्रतिमा उभी केली आहे. 'नवमानवतावाद' या पुस्तकात त्यांच्या तत्त्वज्ञानाचे सारतत्त्व (Essence) आहे.

मूलभूत लोकशाहीत माणसाचे शोषण होणार नाही. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुभावावर राज्याची पुनर्रचना केली जाईल. मूलभूत लोकशाही राज्याची निर्मिती केली जाईल. एम. एन. रॉय यांचा भर सरकारी अर्थव्यवस्थेवर होता. त्यांनी Co-operative Commonwealth ची संकल्पना मांडली आहे. असे लोकशाही राज्य निर्माण करण्याच्या कामात गावोगावच्या लोकसमित्या (People's Committees) सक्रियपणे सहभागी होतील यावर त्यांचा भर होता. सहकार हा भांडवलशाही व समाजवाद यावरचा उतारा आहे असे त्यांना वाटत होते. सहकारी अर्थव्यवस्था ही भांडवलशाही अर्थव्यवस्था व समाजवादी अर्थव्यवस्था यांना पर्याय देणारी अर्थव्यवस्था आहे त्यांनी सूचित केले. लोकांच्या सहभागाशिवाय लोकशाहीला आशय व अर्थ प्राप्त होऊ शकत नाही. लोकशाही म्हणजे खऱ्या अर्थाने लोकांचे शासन. लोकांच्या हातात सत्ता हवी. त्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक ठरते.

नवमानवतावादाच्या मूलभूततेवर एम. एन. रॉय यांचा सर्वाधिक भर होता. रॅडिकल ह्युमॅनिझमचा २२ वा अर्थात शेवटचा प्रबंध असा :

Radicalism starts from The Dictum That Man is the measure of everything (Protagoras) or Man is the root of mankind (Marx), and advocates reconstruction of the world as a commonwealth and fraternity of free men, by the collective endeavour of spiritually emanacipated moral men. (New Humanism- - Manifesto, P. 52)

मानवी समाजाची पुनर्रचना आध्यात्मिकदृष्ट्या बंधमुक्त नीतिमान माणसेच करू शकतात. नवमानवतावादावर आधारलेला समाज निर्माण करण्यासाठी आणि बंधुता नीतिमान माणसे तयार करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मूलभूत मानवी मूल्यांचे शिक्षण व प्रशिक्षण हवे.

एम. एन. रॉय हे मार्क्सवादातून मार्क्सवादाच्या पलीकडे गेले होते. त्यांनी मार्क्सवाद पूर्णपणे नाकारला नव्हता. उलट त्याला त्यांनी मानवी चेहरा व मानवी हृदय दिले. कम्युनिझमला त्यांनी नवदिशाभिमुखता (New Orientation) दिली. त्यासाठी निरंतर प्रबोधनाची आवश्यकता आहे असे प्रतिपादन केले. मार्क्सचा समाजवाद हा अंततः 'राज्य भांडवलशाही' निर्माण करतो. त्यामुळे भांडवलशाहीची केवळ जागा बदलते. खाजगी भांडवलदारांच्या हातून भांडवलशाही राज्याच्या अधिपत्याखाली येते एवढेच.

उत्पादन प्रक्रियेतून भांडवलशाही जाऊन त्या ठिकाणी समाजवाद येईल असा तर्क मार्क्सने मांडला होता. पण तसे घडले नाही. जागतिकीकरणाने खासगीकरणाचाच पुरस्कार केला आहे. आजची जागतिक बाजारपेठ ही भांडवलशाहीवरच आधारलेली आहे.

कम्युनिस्ट सोविएत रशिया आणि इतर कम्युनिस्ट राष्ट्रांमध्ये एम. एन. रॉय यांना मानवता वादावर आधारलेली सेक्युलर राष्ट्रे अभिप्रेत होती. सेक्युलॅरिझम हा मानवतावादाचा गाभा असतो. ते म्हणतात, Humanism is cosmopolitan. It does not run after the utopia of internationalism, which presupposed the existence of autonomous National States. The ideal of One World, or a World Government, is not compatible with the continuation of National States. The one makes of the other a pious desire or wishful thinking. - cosmopolitan commonwealth of free men and women is a possibility. It will be a spiritual community, not limited by the boundaries of National States-capitalist, fascist, communist or of any other kind-which will gradually disappear under the impact of cosmopolitan Humanism. That is the Radical Perspective of the future of mankind. (New Humanism- - Manifesto, P. 37)

'मानवतावाद' हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याही चिंतनाचा विषय होता. एम. एन. रॉयचा नवमानवतावाद हा पूर्णपणे भौतिकवादावर उभा आहे. तर्कतीर्थांच्या मानवतावादाला धर्म आणि आध्यात्मवादाची किनार आहे. मानवतावाद हा एम. एन. रॉयच्या जडवादाचा गाभा आहे. तर्कतीर्थांनी तो नाकारला नाही. उलट तो स्वीकारला. त्यांचे जडवाद हे पुस्तक १९४१ साली प्रकाशित झाले. त्यांनी एम. एन. रॉय यांच्या सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञानाच्या विकासात ते सहभागी झाले. मानवतावाद हा विश्वव्यापक (Cosmopolitan) असतो. राष्ट्र- राज्यांच्या त्याला सीमा नसतात. त्याच्या प्रभावाखाली भांडवलशाही, फॅसिस्टवाद, साम्यवाद इत्यादी संपुष्टात येतात.

रॉयवाद आणि गांधीवाद यांच्यामध्ये काही बाबतीत साम्य तर काही बाबतीत विरोध आढळतो. वैयक्तिक स्वातंत्र्य, लोकशाही, सार्वत्रिक मताधिकार आणि सत्तेचे विकेंद्रीकरण याबाबतीत साम्य आढळते. पण गांधीवाद मोठ्या प्रमाणातल्या औद्योगिकीरणाला विरोध करतो. गांधीजी हे पाश्चात्त्य संस्कृती आणि सभ्यतेच्या विरोधी होते. ती भोगवादी आहे

म्हणून तिचा ते धि:कार करतात. महात्मा गांधीजींजवळ वैज्ञानिक दृष्टीचा अभाव होता. त्यांचे काही विचार कालबाह्य होते. त्यांची अहिंसा टोकाची होती. दारिद्र्याचे त्यांनी गौरवीकरण केले असा रॉयवाद्यांचा त्यांच्यावर आरोप होता. चरखा, खादीचा उपयोग, ब्रह्मचर्य आदी गोष्टी सामान्य माणसाच्या कह्यात येणे शक्य नाही असे त्यांचे म्हणणे होते. गांधीजींनी भांडवलशाहीचा फारसा विरोध केला नाही असाही त्यांचा आरोप होता. त्यांची विचारधारा कर्मठ होती (Puritanic Ideology). महात्मा गांधीजींनी ग्रामीण जीवन व्यवस्थेचे समर्थन केले ही गोष्ट बऱ्याच लोकांना आवडली नव्हती. 'खेड्याकडे चला' ही महात्मा गांधीजींची घोषणा होती. त्यात त्यांना 'मध्ययुगीनता' दिसली. बऱ्याच बाबतीत त्यांचे विचार अवैज्ञानिक होते. आणि असे असले तरी महात्मा गांधीजींचा सखोल प्रभाव सामान्य लोकांवर पडला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य आंदोलनाला निर्णायक स्वरूप प्राप्त झाले होते. त्यांची जागा घेऊ शकेल असे नेतृत्व पुढे आलेले नव्हते. त्यांच्या नेतृत्वाचा प्रभाव तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींवर ते काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतरही होता यात शंका नाही. महात्मा गांधीजींनी विकसित केलेले 'सत्याग्रही क्रांतिशास्त्र' नेत्रदीपक होते. गांधीवाद हा आध्यात्मिक मानवतावाद आहे, यात शंका नाही.

रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीचे ध्येयधोरण विचारपूर्वक निर्धारित करण्यात आले होते. नवमानवतावादावर पार्टीची रचना करण्यात आली होती. मूलभूत लोकशाहीच्या तत्त्वांवर पार्टी उभी करण्यात आली होती. एका नवीन तत्त्वज्ञानाची निर्मिती त्यासाठी करण्यात आली. ते तत्त्वज्ञान एम. एन. रॉय यांनी निर्माण केलेल्या २२ प्रबंधांवर आधारलेले आहे. ती बावीस तत्त्वे निर्माण करण्याच्या प्रक्रियेमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रेरकाचे (Catalytic agent) काम केले. रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीची स्थापना १९४० मध्ये करण्यात आली. अनेक बैठका व परिषदांमध्ये पार्टीच्या ध्येयधोरणांवर चर्चा होत होती. या बावीस प्रबंधांमध्ये स्वातंत्र्य, बुद्धिवाद आणि नैतिकता या तत्त्वांची 'मूलभूतता' आढळेल. स्वातंत्र्याचा व सत्याचा शोध हेच मानवी प्रगती मागची प्रेरक शक्ती आहे.

ही बावीस तत्त्वे पार्टीचा जाहीरनामा म्हणून स्वीकारण्यात आली. पण पार्टीचे हे आदर्श ध्येय धोरण अंमलात आणणार कसे? राजकीय पक्षाच्या माध्यमातूनच ते अंमलात आणले जाते. राजकारण हे आंधळेपणाने मुसंडी मारत पुढे जात असते. आदर्श ध्येय धोरण आणि पक्षीय राजकारण यात

विसंगती आहे. ती घालवायची कशी? हा प्रश्न अनुत्तरित राहतो. राजकीय सत्ता लोकसमित्यांच्या माध्यमातून वापरली पाहिजे हा रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाचा कटाक्ष होता. भारतासारख्या देशात बहुसंख्य लोक अशिक्षित आणि अज्ञानी आहेत. अशा अवस्थेत पक्षीय राजकारण हे तत्त्वहीन बनण्याची शक्यता आहे. पक्षीय राजकारण खालच्या पातळीवर जाणार असेल तर हाती काय लागणार? अशा राजकारणाला अर्थच राहणार नाही. म्हणून एम. एन. रॉय, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीचे विसर्जन करण्याचा दुःखदायी निर्णय घेतला. डिसेंबर १९४८ मध्ये कलकत्ता येथे भरविलेल्या परिषदेमध्ये Radical Humanist Movement चालवण्याचा निर्णय घेण्यात आला. नंतर त्यांनी प्रबोधन चळवळ हाती घेतली. पक्ष विसर्जनाचा ठराव स्वत: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीच मांडला. त्याची कारणमीमांसा त्यांनाच विशद करावी लागली. या अखेरच्या अधिवेशनात त्यांनी नवमानवतावादाचे बावीस प्रबंधही सादर केले आणि त्यावर भाष्यही केले.

अशा प्रकारे रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्ष संपुष्टात आला. एम. एन. रॉयचे उजवे हात म्हणूनच नवमानवतावादी चळवळीत तर्कतीर्थ काम करीत होते. १९४८ सालीच ते सक्रिय राजकारणापासून निवृत्त झाले. एम. एन. रॉय यांना तत्त्वज्ञानाची जेवढी आवड होती तेवढीच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनाही होती. Man is the measure of all things हे दोघांच्याही तत्त्वचिंतनाचे सार होते. मानवतावाद हेच त्यांच्या तत्त्वज्ञानाचे गंतव्य होते. दोघेही प्रबोधन पुरुष होते. तर्कतीर्थांना रॉय यांनी भारतीय प्रबोधनाची सर्वोत्कृष्ट निर्मिती मानले होते. 'He was the best product of Indian Renaissance.'

३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधीजींची हत्या झाली. सबंध देश हळहळला. महाराष्ट्रात ब्राह्मणांची घरे जाळण्यात आली. माणुसकीला काळिमा फासणारी ही घटना होती. महाराष्ट्रातील विचारी लोकांना अस्वस्थ करणारी ती घटना होती. शांतता पसरविण्याचे काम तर्कतीर्थांनी आपल्या परीने केले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर रॉयवादी पक्ष केवळ दीड वर्षांमध्ये राजकारणातून बाहेर पडला. पुढे सहा वर्षांनी रॉय यांचे निधन झाले. ते The Radical Humanist हे साप्ताहिक चालवीत होते.

पक्षविसर्जनानंतर सर्व कार्यकर्ते आपापल्या व्यवसायाकडे वळले. तर्कतीर्थांनी प्राज्ञपाठशाळा सोडली नव्हती. त्यांनी 'धर्मकोश' (संस्कृत) संपादनाचे कार्य हाती घेतले. त्यांनी संपादित केलेल्या धर्म कोशाचे २० खंड प्रकाशित झाले आहेत. धर्मशास्त्राचा अभ्यास हा त्यांच्या श्रद्धेचा विषय होता. त्यांचा 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा ग्रंथ १९५१ साली प्रसिद्ध झाला. वाचन- चिंतन- लेखनाला त्यांनी सातत्याने वाहून घेतले. यशवंतराव चव्हाणांच्या आग्रहास्तव पुन्हा त्यांनी १९५० मध्ये काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काँग्रेस पक्षाच्या प्रचार-प्रसारासाठी त्यांनी वेळ दिल्याचे दिसते.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर यशवंतराव चव्हाणांनी तर्कतीर्थांना 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'चे अध्यक्षपद स्वीकारण्याचा आग्रह केला. विश्वकोश निर्मितीचे कामही त्यांच्यावर सोपविले. साहित्य-संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद तर्कतीर्थांनी स्वीकारले. विश्वकोशाचे संपादन म्हणूनही त्यांनी काम केले. 'नवभारत' या मासिकाचे ते संपादकही होते. त्यांच्या समाजप्रबोधन कार्यात खंड पडला नाही.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा वैचारिक प्रवास चक्राकार पद्धतीने (Cyclical) झालेला होता. तो जिथून सुरू झाला तिथेच तो परतला. प्राज्ञपाठशाळेत त्यांनी धर्मशास्त्राचा अभ्यास केला. शास्त्रांचा आधार घेऊनच समाजसुधारणेच्या कामासाठी त्यांनी आपली प्रज्ञा वापरली. वेद- वेदांगांच्या अभ्यासाबरोबर आधुनिक पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा देखील त्यांनी अभ्यास केला. गांधीवाद, मार्क्सवाद आणि रॉयवाद अशा क्रमाने त्यांचा वैचारिक प्रवास झाला. स्वातंत्र्यानंतर पुन्हा त्यांनी प्राज्ञपाठशाळेत धर्मकोशाच्या कामाला वाहून घेतले. एम. एन. रॉय यांचा वैचारिक प्रवास हा एकरेषीय पद्धतीने (Linear) झालेला आहे. राष्ट्रवाद, मार्क्सवाद आणि शेवटी नवमानवतावाद असे टप्पे त्यांच्या प्रवासात एकामागून एक अशा पद्धतीने आले. सक्रिय राजकारणाचा त्याग केल्यानंतर त्यांनी नवमानवतावादाचे प्रबोधन कार्य सुरू केले. तेथून ते परतले नाहीत.

आपल्या वैचारिक प्रवासात तर्कतीर्थांचा गोतावळा वाढत गेला होता. त्या गोतावळ्यात शास्त्री पंडित होते, गांधीवादी होते आणि नवमानवतावादी रॅडिकल्स होते. विज्ञान, मानवी मूल्ये आणि बुद्धिवादी यांचा सुरेख संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झाला होता. परमार्थ त्यांनी सोडला नाही. लोकव्यवहाराला त्यांनी तिलांजली दिली नाही. मानवतावादी तत्त्वांचा शोध ते शेवटपर्यंत घेतच राहिले. त्यांची शोधयात्रा निरंतरपणे

चालूच होती. मे. पुं. रेगे यांनी 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : शतकाचा वाटसरू' या लेखात तर्कतीर्थांविषयी म्हटले आहे, अस्तित्वाच्या आणि ज्ञानाच्या समस्यांत जेव्हा ते शिरत, तेव्हा ते केवलाद्वैताचा स्वीकार करीत, असे मला वाटते. ते परत परंपरेकडे आले होते. व्यवहार बदलला होता. पण पारमार्थिक सत्य अढळ राहिले होते.

एम. एन. रॉय मात्र जडवादी तत्त्वज्ञानाशी शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिले. माणसाचे भौतिक जीवन हेच खरे जीवन असते त्यावर त्यांची सखोल श्रद्धा होती. ते निरिश्वरवादी होते. मानवी जीवन सुखी व समृद्ध करावे यासाठीच त्यांची धडपड होती.

तर्कतीर्थांची बुद्धी चिकित्सक होती. ते विवेकवादी होते. आपल्या बौद्धिक प्रवासात त्यांना जे जे चांगले आढळले त्यांचा त्यांनी स्वीकार केला.

तत्त्वज्ञान मग ते चिद्वादी असो की जडवादी, त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मानवतावाद शोधला. गांधीवादातही मानवतावाद होता, मार्क्सवादातही तो होता आणि रॉयवादातही तो होता. चार्वाकाच्या भौतिकवादी व निरिश्वरवादी दर्शनाची उपयुक्तता त्यांना जाणवली होती. त्याविषयी ते म्हणतात, चार्वाक- दर्शनाचे विचारशुद्धीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व आहे. निर्मूलन कल्पनांचा मिथ्या आग्रह नष्ट करण्यास अशा तऱ्हेची तत्त्वसरणी मदत करीत असते. नव्या उभारणीला व प्रगतीला वैचारिक विध्वंसन किंवा विध्वंसक टीकासुद्धा आवश्यक असते (वैदिक संस्कृतीचा विकास, पृ. १८७).

मानवमुक्तीचा ज्यांनी ज्यांनी विचार मांडला आहे त्याकडे तर्कतीर्थ आकर्षित झाले होते. मानवमुक्तीकडे आणि मानवतावादाकडे घेऊन जाणारी क्रांती त्यांना हवी होती. त्यांनी म्हटले आहे, क्रांतिकार्य ही एक आध्यात्मिक साधना आहे, परंतु या क्रांतियुगातील क्रांतिकारक माणसे सत्ता काबीज केल्यावर ही आध्यात्मिक साधना विसरतात. सत्तेच्या व संपत्तीच्या मोहिनीला वश होतात. कारण अध्यात्मयोग हे क्रांतिवादाचे अधिष्ठान आहे हे त्यांना माहीत नाही. महात्मा गांधींशिवाय, एम. एन. रॉय शिवाय किंवा योगी अरविंद घोषांशिवाय आध्यात्मिक योगाचे तत्त्वज्ञान क्रांतिवाद्यास कळलेले नाही; आकलन झालेले नाही. त्याचे आकलन व त्याचा दूरगामी गंभीर अर्थ महात्मा गांधी, एम. एन. रॉय व अरविंद घोष यांनाच कळला आहे (वैदिक संस्कृतीचा विकास, पृ. ४९८).

तर्कतीर्थांना आकर्षण होते ते आध्यात्मिक क्रांतीचे. म्हणूनच ते गांधीवादाकडे वळले आणि नंतर रॉयवाद स्वीकारला. राजकारण हे सत्ताकारण असते. मानवमुक्ती व सत्ताकारण यांचा 'डायलेमा' कायम आहे. तो अद्याप सुटलेला नाही. तर्कतीर्थांनी यासंदर्भात अवलोकितेश्वर या बोधिसत्वाच्या प्रतिज्ञेचा उल्लेख केला आहे. जोपर्यंत जग दुःखात आहे तोपर्यंत मी मुक्त होऊ इच्छित नाही, असे अवलोकितेश्वर बोधिसत्व म्हणतात. गांधीजींचीही तीच प्रतिज्ञा होती, एम. एन. रॉय यांचीही तीच प्रतिज्ञा होती आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचीही तीच प्रतिज्ञा होती असे मला वाटते.

इतकेच नव्हे, तर या क्रांतिकारक तत्त्वज्ञानाचा सार (Essence) त्यांनी आत्मसात केला होता. आत्मसात केलेली तत्त्वे माणसाच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनत असतात. शास्त्रीजी एक थोर प्रज्ञावंत होते. खऱ्या अर्थाने ते तर्कतीर्थ होते.

■

*(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ऑनलाईन व्याख्यानमालेतील भाषण, रविवार, दि. ३० जानेवारी, २०२२.)*

# भाग - २

# तर्कतीर्थकृत धर्ममीमांसा

## ९

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची धर्ममीमांसा

**- प्रा. डॉ. अशोक चौसाळकर**

तर्कतीर्थ जोशी हे महाराष्ट्रातील असे ज्येष्ठ विचारवंत होते, ज्यांचा भारतीय आणि पाश्चात्त्य ज्ञानपरंपरेशी जवळून परिचय होता. ते आयुष्यभर वाईच्या प्राज्ञपाठशाळेशी संलग्न व तिच्या सर्व उपक्रमांचे संचालक होते. त्यांच्या आयुष्यात अनेक वैचारिक बदल झाले, पण प्राज्ञपाठशाळेचे काम त्यांनी कधीच सोडले नाही. त्यांच्या दृष्टीने पाठशाळेचे धर्मविषयक कार्य, आधुनिक भारतातील प्रबोधनाची चळवळ आणि नवभारताची निर्मिती यांचा जवळचा संबंध होता आणि या तीनही क्षेत्रांतील कार्य परस्परपूरक होते.

तर्कतीर्थ यांच्या कार्यास वयाच्या सतराव्या वर्षी सुरुवात झाली आणि ९३ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. थोडक्यात, सुमारे ७५ वर्षे ते सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक कार्य सातत्याने करीत होते. या काळात ते महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पुनर्रचनेच्या कामात पण आपले योगदान देत होते. तर्कतीर्थ भारतीय ज्ञानपरंपरेत खोलवर रुजलेले होते आणि पारंपरिक पद्धतीने त्यांनी विद्याध्ययन केल्यामुळे याबाबत त्यांची चोख अशी तयारी झाली होती. त्या परंपरेत नसणारी टीकात्मक पद्धती त्यांनी पाश्चात्त्य ज्ञानपरंपरेचे खोल अध्ययन करून आत्मसात केली होती. त्यामुळे भारतीय व पाश्चात्त्य ज्ञानपरंपरेतील मर्मस्थाने त्यांना चांगल्या प्रकारे अवगत

झाली होती. युरोपातील व भारतातील प्रबोधन चळवळीतून त्या विवेकनिष्ठ मानवतावादाचा पुरस्कार करण्यात आला, त्याचा पण खोल असा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. या काळात शास्त्रीजी धर्मचिंतनामध्ये मग्न होते. कारण प्राज्ञपाठशाळेच्या धर्मकोशाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात ते सहभागी होते. हे काम त्यांच्या नेतृत्वाखाली अव्याहत चालू राहिले.

तर्कतीर्थ स्वामी केवलानंद सरस्वतींकडे शिकावयास आल्यानंतर त्यांचा जो प्राज्ञपाठशाळेशी संबंध जोडला गेला तो आजीवन कायम राहिला. शास्त्रीजींच्या वैचारिक वाटचालीचे खालील तीन टप्पे होते-

१. प्राज्ञपाठशाळेचा आधुनिकता व परंपरागत यांचा समन्वयाचा विचार आणि नवभारताच्या निर्मितीसाठी नव्या प्रबोधनाची गरज या काळात भारतविद्या त्यांनी उत्तम प्रकारे आत्मसात केली आणि परंपरेकडे पाहण्याची डोळस व टीकात्मक दृष्टी विकसित केली. त्यामुळे धर्मकोशाच्या कामात त्यांनी लक्ष घातले. धर्म हा अपरिवर्तनीय नाही, तो काळाबरोबर बदलतो हे धर्मकोशाच्याद्वारे स्पष्ट होणार होते.

२. दुसऱ्या टप्प्यात तर्कतीर्थ मार्क्सवादाच्या प्रभावाखाली आले. हा मार्क्सवाद त्यांनी एम. एन. रॉय यांच्या मार्फत स्वीकारला होता. ते सोविएत मार्क्सवादाबाबत साशंक असले तरी मार्क्सचे इहवादी तत्त्वज्ञान त्यांना मान्य होते. या दृष्टिकोनातूनच त्यांनी 'हिंदुधर्माची समीक्षा' हा ग्रंथ लिहिला. त्यात धर्म कल्पनेवर प्रखर अशी टीका करण्यात आली होती. ते रॉय यांचे अनुयायी झाले व त्यांच्या रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षांमध्ये सामील झाले. रॉय यांनी नंतर नवमानवतावादाचा पुरस्कार केला. त्याची तत्त्वे ठरविण्यात तर्कतीर्थ जोशी यांनी मोलाची भूमिका बजावली.

३. नवमानवतावादातून समन्वयाची, सहिष्णुतेची आणि धर्मामागील शाश्वत नीतिमूल्यांची त्यांना जाणीव झाली. लोकशाही, उदारमनस्क राष्ट्रवाद आणि लोकशाही समाजवाद यांचा त्यांनी स्वीकार केला. रॉय यांच्या बरोबरच महात्मा गांधी, पंडित नेहरू व भारतीय राष्ट्रीय चळवळीतून निर्माण झालेले उदार विचार त्यांना भावले. त्यातूनच धर्माची परिपक्व अशी समज त्यांनी विकसित केली. त्याचे प्रतिबिंब 'हिंदुधर्म समीक्षे'च्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत व 'वैदिक संस्कृतीचा विकास' या महाग्रंथात पडलेले आपणास दिसून येते. विवेकवाद व धर्मश्रद्धा यांचा समन्वय त्यांनी केला आहे. या काळात ते सातत्याने धर्मकोशाच्या कामात पण लक्ष घालत होते.

धर्माबद्दलची ही आस्था प्राज्ञपाठशाळेचा विचार व परंपरा यांच्याशी जोडलेली आहे.

प्राज्ञपाठशाळा ही पारंपरिक पद्धतीने केवळ वेद, स्मृती व दर्शने यांचा अभ्यास करणारी पाठशाळा नव्हती. या विद्यांचा अभ्यास तेथे पारंपरिक पद्धतीने होत होताच, पण या पाठशाळेचे मुख्य नारायणशास्त्री मराठे वा स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या हे लक्षात आले होते की आता जुन्या भारताचे पुनरुज्जीवन शक्य नाही. आता आपणास परिवर्तनास सामोरे जाऊन नवभारताची निर्मिती करायची आहे. त्यामुळे परंपरा व आधुनिकता यांच्यात समन्वय साधला पाहिजे. आधुनिकतेचा आपण स्वीकार केला तरी भारतासारख्या प्राचीन देशाचे पूर्ण पाश्चिमात्यीकरण शक्य नाही व इष्टही नाही. या बदलाच्या काळात आपण आपले स्वत्व राखले पाहिजे. कारण एकदा आपला परंपरेचा आधार सुटला की आपण सैरभैर होऊ. त्यामुळे परंपरा आणि आधुनिकता यात योग्य प्रकारचा समन्वय केला पाहिजे आपली परंपरा समृद्ध आहे. त्यात टिकाऊ काय, टाकाऊ काय याबाबत नीरक्षीरविवेक धारण केला पाहिजे. प्राज्ञपाठशाळेतील अनेक विद्यार्थी हे सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणारे होते. त्यांच्या राजकीय जाणिवा विकसित होत्या. नवे भारतीय राष्ट्र कसे उभे करायचे याबाबत चर्चा होत असत व या सर्व चर्चांचा प्रभाव तर्कतीर्थ जोशी यांच्या मनावर होता आणि स्वामी केवलानंदांच्या संकल्पनांना मूर्तरूप देण्याचे काम त्यांना करायचे होते. परंपरेत पाय घट्ट रोवून देशाने व हिंदू समाजाने कशी वाटचाल करावी याचा विचार त्यांना करणे भाग होते.

वेद, धर्मशास्त्रे व मीमांसादी दर्शने हा प्राज्ञपाठशाळेच्या अभ्यासक्रमाचा भाग होता व त्याचे ज्ञान अचूक व पारंपरिक पद्धतीने दिले जाईल. पण त्या बरोबरच इतिहास प्राथमिक गणित, भूगोल आणि सामाजिकशास्त्राचे विशेषतः राजकारणाचे व राज्यव्यवस्थेचे काहीएक ज्ञान त्यांना मिळावे याची पण काही एक तरतूद करण्यात आली होती. अर्थात, यात आधुनिक ज्ञानाची एक प्रकारे ओळख करून देण्याचा प्रकार होता.

धर्मकोशाचा विचार करता त्यामागे खालील सूत्रे होती -

१. देशकालपरिस्थिती प्रमाणे निरनिराळ्या युगात धर्माचे स्वरूप बदलते पण मूलभूत तत्त्वे बदलत नाहीत. त्याचे नवे संशोधन होते, नवा प्रकाश टाकला जातो व त्यानुसार आचाराचे नियमन व विधीनिषेध ठरवले जातात.

२. ऐतिहासिक दृष्टिकोन ठेवून धर्मग्रंथाचा अर्थ लावल्यामुळे ऐतिहासिक काळात त्यात झालेले बदल यांचा मागोवा धर्मग्रंथाच्या तुलनात्मक अभ्यासाने घेता येतो.

३. ऐतिहासिक काळात नवनव्या जाती निर्माण झाल्या असून त्यांचा समावेश श्रुती, स्मृती पुराणोक्त धर्मात करण्यात आला.

४. वर्ण विचार हा जातिविचारांशी संबंधित नसून तो व्यवसायाशी संबंधित आहे. थोडक्यात, कालपरत्वे व देशपरत्वे माणसाच्या आचारात बदल होतो. त्यात बदल झाल्यामुळे तो पतित ठरत नाही. नैतिक आचरणातून घसरला तरच तो पतित झाला हे धर्मग्रंथातून दाखवून द्यायचे होते.

धर्मकोशाचा हा बृहद् प्रकल्प अनेक खंडांचा असून त्यातील काही महत्त्वाचे खंड प्रकाशित झाले आहेत.

प्राज्ञपाठशाळेचे मुख्य काम हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणण्याचे होते. पाठशाळेच्या मते धर्म परिवर्तनीय आहे. वेद हे अपौरुषेय नाहीत आणि त्याचे ज्ञान सर्वांनाच प्राप्त व्हावे. त्याचाच एक भाग म्हणून धर्म कोशाची कल्पना करण्यात आली. वेगवेगळ्या काळात वैदिक साहित्यात व विशेषतः धर्मशास्त्रात धर्माचा विचार व आचार यांच्यामध्ये ज्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यांची विषयवार आणि कालक्रमानुसार मांडणी करण्याचे काम प्राज्ञशाळेत केले जाते. त्यात मूळ वैदिक ग्रंथ, त्यावर झालेले टीकाग्रंथ व श्राद्धासारख्या विशिष्ट आचारावरील निबंध ग्रंथ, या तीन प्रकारच्या ग्रंथांचा आधार घेण्यात आला आहे. धर्मकोशाचा उद्देश धर्मशास्त्रामध्ये विविध काळात व विविध ग्रंथात अशा विषयवार तरतुदी करण्यात आल्या, त्या एका ठिकाणी कालक्रमानुसार संग्रहित करून अभ्यासकांना उपलब्ध करून देणे हा आहे. कारण अजूनही हिंदुंच्या व्यवहारात त्याचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. त्याचप्रमाणे यामधून धर्माचे परिवर्तनीय स्वरूप लक्षात येते. हा प्रकल्प तर्कतीर्थ जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला. त्यामागे स्वामी केवलानंदांची प्रेरणा होतीच. धर्मकोशाच्या उपनिषद कांडाच्या दुसऱ्या खंडाच्या भाग एकसाठी तर्कतीर्थांनी एकशे तीन पानांची दीर्घ प्रस्तावना लिहिली आहे. त्यात त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की उपनिषदांत थोडक्यात आलेले तत्त्वज्ञान हे एकाएकी निर्माण झालेले तत्त्वज्ञान नसून ते वेद आणि ब्राह्मणग्रंथातून विकसित झाले आहे. आत्मा, पुरुष आणि ब्रह्म या कल्पना आधीच्या वाङ्मयातून उत्क्रांत झाल्या आहेत. उपनिषदे सत्य व नैतिकता यांचे

एकत्व कल्पून उच्चतर जीवन आदर्शांचा शोध लावताना आपणास दिसतात. ही प्रस्तावना त्यांनी इंग्रजीत लिहिली आहे.

धर्माकडे पाहण्याचा तर्कतीर्थांचा दृष्टिकोन १९४० च्या दरम्यान बदलला. या काळात शास्त्रीजींनी पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचे अध्ययन केले आणि मार्क्सवादाचा आदर्श तत्त्वज्ञान म्हणून स्वीकार केला. हा स्वीकार त्यांनी एम. एन. रॉय यांच्यामार्फत केला होता हे नंतर स्पष्ट झाले. 'हिंदुधर्माची समीक्षा' हे पुस्तक १९४० साली शास्त्रीजींनी नागपूर विद्यापीठात श्री परांजपे व्याख्यानमालेत दिलेल्या तीन व्याख्यानांवर आधारित आहे. या पुस्तकाचे दोन भाग आहेत. त्यातील पहिला भाग 'हिंदुधर्माची समीक्षा' असून दुसरा भाग सर्वधर्मसमीक्षा आहे. या पुस्तकात शास्त्रीजींच्या तीन व्याख्यानांचा समावेश आहे. पहिल्या व्याख्यानात धर्म समीक्षेचे स्वरूप विशद करण्यात आले आहे, तर दुसऱ्या व्याख्यानात त्यांनी धर्मलक्षण व धर्म प्रभाव यांची चर्चा केलेली आहे. तिसऱ्या प्रकरणात त्यांनी टीकात्मक दृष्टिकोनातून हिंदू धर्माचे स्वरूप स्पष्ट केले आहे. ऐतिहासिक धर्म समीक्षेच्या दृष्टिकोनातून त्यांनी हिंदू धर्माची कठोर अशी समीक्षा केली आहे. पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत ते लिहितात, या व्याख्यानात हिंदू धर्माची समीक्षा ऐतिहासिक पद्धतीने व ऐतिहासिक समाजशास्त्राच्या दृष्टीने केली आहे. धर्म ही मानवजातीची अफू आहे या विचाराने प्रेरित होऊन हे समीक्षण केले नाही, तर धर्माची समीक्षा हा सर्व समीक्षेचा खरा प्रारंभ होय, या विचारांची प्रेरणा समीक्षेच्या मुळाशी आहे. त्यांच्या मते, बुद्धिवादी दृष्टिकोनातून हिंदू धर्माची समीक्षा करून जुने विचार, आचार व संस्था यांच्यावर टीका करणे समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. त्यातूनच सामाजिक नवजीवनास प्रेरणा मिळेल, पण दीर्घकाळ परकीय दास्यात राहिल्यामुळे सुशिक्षित हिंदुंमध्ये आपल्या परंपरा, धर्म याबाबत एक प्रकारचा दुरभिमान निर्माण झाला आहे. पण आपणास आता सर्व समाजघटकांना सारखे स्वातंत्र्य देणारा व सर्वांच्या प्रगतीस समान अवसर देणारा समाज निर्माण करायचा आहे आणि त्या मार्गात येणारे जुने आचार व विचार दूर करायचे आहेत. म्हणून ही समीक्षा आवश्यक आहे.

या पुस्तकातील पहिल्या प्रकरणाला ऐतिहासिक धर्मसमीक्षेची पार्श्वभूमी आहे. त्यांच्या मते, धर्म समीक्षाही इतिहासाच्या दर्शनाची शाखा असून चिकित्सक दृष्टी हा तिचा गाभा आहे. धर्म समीक्षेच्या तीन बाजू आहेत व त्या म्हणजे ऐतिहासिक विकास व धर्म, समाज परिवर्तन व धर्म परिवर्तन

व धर्म आणि संस्कृती व तिचे अधी भौतिक आणि आध्यात्मिक स्वरूप नंतर त्यांनी स्पेंगलरच्या संस्कृती मीमांसेची चर्चा केली आहे. त्या प्रकरणाच्या दुसऱ्या भागात तर्कतीर्थ यांनी धर्मविषयक आधुनिक उत्पत्तीची सविस्तर चर्चा केली आहे. त्यांच्या मते, जीवनाचे लौकिक व अलौकिक असे दोन भाग असून धर्माची उत्पत्ती ऐहिक गरजांतून झाली आहे. त्यांनी टायलरचा मूर्तजीववाद, यातुविद्या व धर्म म्यारेटचा अलौकिक शक्तिवाद, कुललक्षण पूजावाद, समुदाय श्रद्धावाद व स्पेनसरचा पितृपूजावाद यांची पण चर्चा केली आहे. यात समाजरचना संस्कृती व धर्म यांच्यातील संबंधांचा उलगडा करण्यात आला आहे.

दुसऱ्या व्याख्यानात धर्मलक्षण व धर्मप्रमाण यांची शास्त्रीजींनी चर्चा केली आहे. त्यातील पहिला भाग धर्मलक्षणाबाबत आहे व त्यात प्राचीन भारतात धर्म लक्षणाबाबत जी खोल चर्चा करण्यात आली होती, त्याचा गोषवारा शास्त्रीजींनी दिला आहे. त्यांच्या मते, भारतात बौद्ध धर्माच्या उदयानंतर ही धर्म समीक्षा उदयास आली, तिचा हेतू धर्माच्या मूलभूत तत्त्वांची चिकित्सा करणे हा होता. सगळे सुधारलेले धर्म विश्व असे मत त्यांनी व्यक्त केले. हे एक नैतिक राज्य आहे व धर्म हा नैतिक राज्याचा कायदा मानला जातो, त्यानंतर त्यांनी पूर्वमीमांसा तत्वज्ञानाच्या धर्म कल्पनेचे विवेचन केले आहे. जैमिनीच्या मते, अभ्युदय व नि:श्रेयस हे धर्माचरणाचे उद्दिष्ट आहे. श्रेयस म्हणजे इष्ट. या जन्मातील व परलोकातील इष्टांची प्राप्ती व अनिष्टांचा परिहार हेच श्रेयस होय. इहलोकात अभ्युदय व परलोकात नि:श्रेयसची प्राप्ती हे धर्मलक्षण भारतीय तत्त्वज्ञांनी सांगितले. त्यानंतर तर्कतीर्थ यांनी महाभारतातील धर्मकल्पनेची मांडणी केली आहे. त्यांच्या मते, ती उदार आणि बुद्धिवादी असून त्यात नैतिक तत्त्वांची श्रद्धामूलक धार्मिक आचारापेक्षा श्रेष्ठता प्रतिपादिली आहे. सर्व माणसांना परमार्थ साधनांचा सारखाच अधिकार आहे व सर्व भूत हित हेच सर्व धर्माचे सार आहे असे सांगितले आहे. महाभारताच्या धर्म विचारावर बौद्ध धर्म व भागवत धर्माच्या विचारांचा प्रभाव पडला आहे. पण त्यांचे हे विचार पुढे मोठ्या प्रमाणात विकसित झालेले नाहीत. वर्ण धर्म व लौकिक आचारांचा प्रभाव कायम राहिला, असे मत ते त्यात करतात.

या प्रकरणाचा भाग दोन धर्म प्रमाणाचा असून त्यात तर्कतीर्थ पाश्चात्त्य पंडितांनी केलेल्या धर्म विवेचनाची विस्ताराने चर्चा करतात. धर्मप्रमाणाची चर्चा करताना ते लौकिक प्रमाणवाद व अलौकिक प्रमाणवाद अशी

विभागणी करतात व लोकायत व व्यास यांचा समावेश ते लौकिक प्रमाणवादात तर जैमिनी, कुमारील, शबरस्वामी व शंकराचार्य यांचा समावेश अलौकिक प्रमाणवादात करतात. त्याचबरोबर त्यांनी भारतीय अवैदिकांच्या धर्मप्रमाणविषयक विचारांची मांडणी केली आहे. आधुनिक भारतातील लोकमान्य टिळक व डॉक्टर राधाकृष्णन् या दोन वेदान्त तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणाऱ्या तत्त्वज्ञांच्या धर्मविचारांची पण त्यांनी चर्चा केली आहे. भारतीय तत्त्वज्ञानाबाबत मांडणी करताना ते लिहितात की, कुमारिल व शंकराचार्य यांनी जैन व बौद्ध धर्माच्या विचारसरणीवर हल्ला करताना जो बुद्धिवाद वापरला तो वेद प्रामाण्याबद्दल वापरला नाही व जैन बौद्धांनी वेदप्रामाण्याचे खंडन करण्यासाठी जो श्रेष्ठ तर्कवाद वापरला तो स्वमत मंडनासाठी वापरला नाही.

त्यानंतर तर्कतीर्थ यांनी आधुनिक पाश्चात्त्य तत्वज्ञांच्या धर्मप्रमाण विषयक चर्चेचा परामर्श घेतला आहे. त्यात जेम्सचा दिव्यानुभववाद, फायर वाखचा मानव्यवाद यांचा समावेश होतो. त्यांच्यामध्ये फायर वाखच्या धर्ममीमांसेत सर्व आधुनिक धर्मोत्पत्तीची समीक्षा साठवलेली आहे. त्याच्यामते जगातील धर्मकल्पना आपणास कोणतेही अलौकिक दिव्य विभूतीपासून प्राप्त झालेल्या नसून त्या माणसानेच घडवल्या आहेत. वासना व भावना यांनी निर्माण केलेल्या आकांक्षांची पूर्ती करता न आल्याने धर्मकल्पना भ्रांतीमय अनुभव व विपर्यस्त कल्पना निर्माण करते. पण विज्ञान व तत्त्वज्ञान यांच्या साहाय्याने त्यांचे निराकरण करता येते व भौतिक जग समृद्ध करता येते. यालाच तो विशुद्ध मानव्यवाद मानतो.

हिंदू तत्त्वचिंतकानी केलेली धर्मव्याख्या व धर्मप्रमाण चिकित्सा यांचा परामर्श घेणे हीच हिंदू धर्मसमीक्षेची सुरुवात आहे. त्यांच्या मते, ऐहिक मानवी व्यवहाराची व्यवस्था, लोकयात्रा वा समाजधारणा ज्याने सिद्ध होते असा नियम समुच्चय किंवा कायदा हेच हिंदू धर्माचे वास्तव स्वरूप आहे. त्यांच्या मते, ऐहिकवाद, पारमार्थिक व उभयवाद हे हिंदू धर्मातील तीन पक्ष असून या तिन्ही पक्षांच्या विचारांची तर्कतीर्थ यांनी समीक्षा केले आहे. हिंदू धर्माचे स्वरूप व्यामिश्र असून समाजरचनेचे विशिष्ट असे कायदे आणि परस्परविरोधी पारमार्थिक संप्रदाय अशा त्यांच्या दोन बाजू आहेत. हिंदू धर्मात एकसूत्रीपणा नाही, जातिसंस्था हे एक त्यांचे वैशिष्ट्य आहे. त्यात वैविध्य व वैशिष्ट्य मोठ्या प्रमाणात आहे. यातून भूत राक्षस पूजा, मानव सदृश देवता समूह पूजा व शक्ती पूजा आणि एकेश्वरवाद वा ब्रह्मवाद

या धर्माच्या विकासाच्या तीन अवस्था आहेत, या तिन्ही अवस्था समाजात अस्तित्वात आहेत.

त्यानंतर शास्त्रीजींनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्था, अंधश्रद्धा, अस्पृश्यता व अनेक देवतापूजन स्त्रीदास्य यावर प्रखर अशी टीका केली. इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मीयांनी जगातील मागास समाजांना आपल्या धर्माची दीक्षा देऊन मुक्त केले, पण हिंदू धर्माने मागास समाजांना त्यांचे हीन धर्म सहिष्णुतेच्या नावाने पाळू दिले. त्यामुळे श्रुतीस्मृतीच्या व विशिष्ट कुल जाती धर्माच्या संकुचित कायद्यांना महत्त्व देणारी प्रवृत्ती प्रबळ राहिली व व्यापक धर्मतत्त्वे त्यात अधांतरीच राहिली. या धर्मतत्त्वांत हीन विधीनिषेधांना डावलण्याचे सामर्थ्य आले नाही. त्या तत्त्वांच्या आधारावर नवी उन्नत समाजरचना झाली नाही. त्यानंतर त्यांनी हिंदू धर्म विकासाच्या पाच अवस्थांची सविस्तर चर्चा केली आहे. त्यानंतर शास्त्रीजींनी आधुनिक भारतातील धर्मसुधारणेच्या चळवळी आणि त्यांची भूमिका यांची चर्चा केलेली आहे. त्यात गीता धर्माचे पुनरुज्जीवन करण्यात आले परंतु धार्मिक विचारसरणीचा त्याग करून अगदी निराळीच विचारसरणी विज्ञाननिष्ठ मानव निर्माण करीत आहे. आता धर्मापेक्षा सामाजिक संस्था श्रेष्ठ आहेत, कारण त्या मानवी विकासासाठी उच्चतर ध्येये व साधने निर्माण करीत आहेत. विज्ञान व तत्त्वज्ञानाने धर्माचे माहात्म्य कमी केले आहे. नव्या साधनांच्या साह्याने अधिक चांगले जग निर्माण करण्याचा माणसाचा प्रयत्न आहे. त्यात हीन आचारांना व विचारांना कोणतेही स्थान असणार नाही. सरंजामशाही नष्ट करून प्रत्येक घटकांचा योगक्षेत्र नीट चालेल अशी समाजरचना व अर्थव्यवस्था आपणास स्थापन करावयाचे आहे. त्यांच्यामध्ये आपणास आता समाजवादी तत्त्वावर अधिष्ठित व लोकसत्तेच्या राज्यघटनेने युक्त अशी समाजसंस्था स्थापन करावयाचे आहे. परंपरेची बूज राखावी, पण भूतकाळातील ध्येये उच्च मानून त्यात रमणाऱ्या लोकांना भविष्यकाळ नसतो. नव्या काळात नवी ध्येये, नवी साधने निर्माण करणारे लोकच थोर भविष्याचे कर्ते बनतात.

पण शास्त्रीजींची ही कठोर विवेकवादी आणि विज्ञानवादी भूमिका कायम राहिली नाही आणि १९४९ साली त्यांनी पुणे विद्यापीठात जी. घोरपडे व्याख्यानमाला गुंफली, त्यात हा बदल दिसून आला. 'हिंदुधर्म समीक्षे'च्या दुसऱ्या आवृत्तीस १९८४ साली त्यांनी जी प्रस्तावना लिहिली आहे, त्यात त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते, मानवी

मनामध्ये धर्मश्रद्धेचा प्रभाव कायम आहे कारण या स्पर्धात्मक व निर्घृण जगात धर्मश्रद्धा आधार देते. जीवनाला एक प्रकारचे स्थैर्य देते. बुद्धिवादाने व विवेकवादाने धर्मावर कितीही प्रहार केले तरी धर्माचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट अमेरिका व सोवियत रशियात त्याचा प्रभाव कायम आहे. त्यामुळे धर्मा-धर्मातील द्वेष, स्पर्धा, मत्सर व हिंसा दूर करून सर्व धर्मातील उच्चतर तत्त्वांचा समन्वय करणे आवश्यक आहे.

पुणे विद्यापीठात जी सहा व्याख्याने शास्त्रीजींनी दिली ती १९५१ साली वैदिक संस्कृतीचा विकास या नावाने प्रकाशित करण्यात आली. 'गीतारहस्य' व 'आधुनिक भारत' या ग्रंथानंतरचा हा तिसरा महत्त्वाचा ग्रंथ. या ग्रंथात त्यांच्या अथांग विद्वत्तेची व समन्वयवादी भूमिकेची आपणास साक्ष मिळते. सुलभ भाषा आणि सुलभ विवेचन ही या ग्रंथाची वैशिष्ट्ये आहेत.

या पुस्तकाचे प्रास्ताविक महत्त्वाचे आहे. त्यात प्राध्यापक मे. पुं.रेगे यांनी शास्त्रीजींच्या धर्मविषयक दोन पुस्तकांचा उल्लेख करून म्हटले आहे की हिंदू धर्म समीक्षेत मार्क्सवाद प्रणीत भौतिक दृष्टिकोण प्रभावी आहे तर दुसऱ्या पुस्तकात आध्यात्मिक व वैचारिक स्थिर मूल्यांचा विचार प्रभावी आहे व हे विचार भौतिक शक्तींना पण प्रभावित करतात अशी मांडणी केली आहे. रेगे यांच्या मते, हा बदल एम. एन. रॉय यांच्या सहवासामध्ये मार्क्सवादापासून नवमानवतावादाकडे तर्कतीर्थ यांची जी वाटचाल झाली त्यात अनुस्थूत होता. प्राध्यापक रेगे लिहितात की समाजाची संस्कृती म्हणजे उत्पादन शक्ती व उत्पादन संबंध यांची केवळ पडछाया नसते. स्वातंत्र्याची आस व विवेकशीलता या मूलभूत व सार्वत्रिक मानवी प्रेरणा मानवी संस्कृतीच्या निर्मात्या असतात. त्यांच्या विकासाचा व मुक्त संवादी आविष्काराचा इतिहास हा कोणत्याही मानवी समाजाच्या प्रगतीचा इतिहास असतो. त्यांचा जेव्हा संकोच होतो त्या वेळी मानवी प्रगती कुंठित होते. हा मानवतावादी विचार 'वैदिक संस्कृतीचा विकास' या पुस्तकाचा आधार आहे. मानवी समतेचे तत्त्व केवळ आधुनिक व पाश्चात्त्य संस्कृतीतच नाही तर ते अनेक रूपाने भारतीय संस्कृतीत पण प्रकट झाले आहे, अशी याबाबत शास्त्रीजींची भूमिका होती. प्रस्तावनेत त्यांनी ही गोष्ट स्पष्ट केली आहे की वैदिक संस्कृतीचा विकास हा मुख्यतः भारतात झाला आणि वैदिक संस्कृती ही भारतीय संस्कृतीची मुख्य धारा असून वेदपूर्व संस्कृती आज तिचा भाग बनला आहे. या संस्कृतीचा प्रवाह सातत्याने वाहता

राहिला आहे. हिला कमीत कमी चार हजार वर्षांची परंपरा आहे. संस्कृतीच्या आध्यात्मिक व भौतिक अशा दोन बाजू असतात व त्या एकमेकांपासून वेगळ्या नसतात तर त्या परस्परावलंबी असतात. संस्कृतीचा भौतिक व्यवहार हा पाया आहे व मानसिक व्यवहार त्यावर उभारलेला प्रासाद आहे. या ग्रंथात आपण वैदिक संस्कृतीच्या विकासाची प्रेरक असणारी आध्यात्मिक बाजूस प्राधान्याने विचारात घेतली असल्याचे तर्कतीर्थ सांगतात. त्यांच्या मते, कालौघात संस्कृतीच्या भौतिक पायात व उत्पादन पद्धतीत बदल होतात पण समाजावर युगानुयुगे प्रभुत्व गाजवणारी काही मूल्ये असू शकतात. त्यांच्या मते, विज्ञानाच्या विकासामुळे समाजात मोठमोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. यातील काही बदल इष्ट आहेत, काही अनिष्ट आहेत. जगातील संस्कृतीतील सारतत्त्व ग्रहण करून नवी मानवी संस्कृती निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

भारतीय संस्कृतीचा विचार करताना आपल्याला हे लक्षात येते की तिच्या काही अंगभूत गुणांबरोबरच ही त्यांच्या काही अवलक्षणे आहेत. ही अवलक्षणे म्हणजे १. अर्थपर प्रवृत्तीचा अभाव २. परकीय आक्रमकांपुढे सातत्याने एकतेच्या अभावी हार ३. स्वातंत्र्याचा विरोध करणारी समाजरचना ४. दृश्य जगाकडे उपेक्षेच्या दृष्टीने पाहणे ही होत. या अवलक्षणांमुळे हिंदू समाज परलोकवादी व मोक्षार्थी बनला. लोकांत सुधारणा करण्याची त्यांच्या मनात इच्छा राहिली नाही. आधुनिक भारताच्या प्रबोधन काळात विवेकानंद, राम मोहन, अरविंद घोष, लोकमान्य टिळक व महात्मा गांधी हे अध्यात्मवादी होते. पण त्याच्या मते, आध्यात्मिक जीवन हे याच जगातील पराक्रमी व ज्ञानी जीवन होते असे मत शास्त्रीजी नमूद करतात. त्यांनी १९७१ साली दुसऱ्या आवृत्तीसाठी लिहिलेल्या प्रस्तावनेत सर्व संस्कृतीच्या समन्वयातून भारतीय संस्कृती कशी बनली आहे तिचा वेदपूर्व संस्कृतीचा कसा खोल असा पाया लाभलेला आहे, याचे विवेचन केले आहे. त्यांच्या मते, भारतीय संस्कृतीच्या विकासास प्राचीन काळी मुख्य प्रेरणा वैदिक संस्कृतीपासून व तिची भाषा व साहित्य यापासून मिळाली आहे. भाषा ही संस्कृतीचे मुख्य समावेशक असे वाहन आहे. तर साहित्याने प्राप्त होणाऱ्या विचारात भूत, वर्तमान व भविष्य घडवण्याचे सामर्थ्य असते. वैदिक साहित्य व उत्तरकालीन संस्कृत साहित्य यांच्यात अखंड दुवा आहे. उच्चतर तात्त्विक व दार्शनिक विचारांच्या अभिव्यक्तीसाठी इंग्रजपूर्व काळात संस्कृतचा वापर केला गेला. विश्व विषयक संदर्भ दृष्टी,

सात्त्विक विचार करण्याची पद्धती, तार्किक विचारसरणी व मूलभूत भौतिक कल्पना यांचा समृद्ध वारसा वैदिक संस्कृतीने भारतीयांना दिला. त्यांचा नंतर उत्तरोत्तर विकास झालेला दिसून येतो. या ग्रंथात तर्कतीर्थांची दृष्टी ही धर्मेतिहासाचीच आहे.

तर्कतीर्थांनी या ग्रंथाची एकूण सहा प्रकरणात विभागणी केली आहे. ती प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत:

१. वेदकालीन संस्कृती
२. वेदांची तार्किक प्रज्ञेत परिणती
३. वैदिकांची कुटुंब संस्था व समाजव्यवस्था
४. इतिहास पुराणांची आणि रामायणाची संस्कृती
५. बौद्ध आणि जैन यांचा धर्म विजय
६. आधुनिक भारतातील संस्कृती एक आंदोलन

वरील सर्व प्रकरणांच्या शीर्षकांकडे आपण नजर टाकली तर आपल्या हे लक्षात येईल की सहा पैकी तीन प्रकरणे वैदिक संस्कृतीवरच आधारित आहेत. या विषयावरचा त्यांचा अभ्यास मोठा आहे व त्या संस्कृतीच्या सर्व विषयांची त्यांनी मांडणी केली आहे.

त्यांच्या पुस्तकांचे पहिले प्रकरण हे वेदकालीन संस्कृती हे आहे व त्यात त्यांनी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या चार वेदांमध्ये मांडलेल्या विचारांचा परामर्श घेतला आहे. यातील पहिल्या ५० पानात संस्कृती म्हणजे काय, संस्कृतीच्या दोन व्याख्या, भारतातील मानववंश, आर्यपूर्व सिंधू व हडप्पा संस्कृती, भारताची भौगोलिक वैशिष्ट्ये व आर्यांचे भारतात आगमन यांची चर्चा केली आहे. या पुस्तकाची वैचारिक पार्श्वभूमी त्यातून तयार झाली. वैदिक वाङ्मयात चार वेद, वेदांगे, प्राचीन स्मृतीची धर्ममीमांसा, बादरायणी ब्रह्ममीमांसा यांचा त्यांनी समावेश केला आहे. वेद या शब्दाचा अर्थ आहे ज्ञान. हे चार वेद धर्मविद्या म्हणून प्रमाण ठरले आणि सुमारे एक हजार वर्षे त्यांची अनेक पिढ्याकडून रचना होत होती व एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे तोंडी पढविले जात. वेद वाङ्मयात चार वेद, ब्राह्मणे व आरण्यक यांचा समावेश होतो. उपनिषदे अरण्यकाचाच एक भाग आहे. ऋग्वेद व इतर वेद यज्ञकार्याशी संबंधित आहेत. प्रत्येक वेदाच्या अनेक शाखा आहेत व त्यांच्या वेगवेगळ्या संहिता आहेत. प्रत्येक वेदाला काही ब्राह्मणग्रंथ जोडलेले आहेत. या वेदात निसर्गशक्तींना देवता स्वरूप कल्पून त्यांची प्रार्थना करण्यात आली आहे.

यजुर्वेदात यज्ञात म्हणावयाच्या गद्य मंत्राचा समावेश करण्यात आला आहे. अथर्ववेदात शुभ व अशुभ कृतींच्या संदर्भात करावयाच्या विधींच्या मंत्रांचा समावेश करण्यात आला आहे. ब्राह्मणग्रंथाचा मुख्य भाग यज्ञ प्रक्रिया सांगणारा आहे. उपनिषद म्हणजे गुरूजवळ बसून शिकावयाची ब्रह्मविद्या सांगितली आहे. व त्या काळात ही विद्या सर्व वर्णांना ज्ञात होती असे दिसते. ऋग्वेदात विश्वाबद्दलचे विचार प्रतिभारूप आणि तार्किक आहेत. वेदांतील निसर्गविषयक वर्णने अप्रतिम आहेत. नियमबद्ध काम करणाऱ्या विश्वातील निसर्गशक्तींना वेदांनी ऋत असे नाव दिले आहे. ऋत हे विश्वव्यापी तत्त्व वैदिक ऋषींना नीती कल्पनेवरूनच सुचले. योग्य क्रम, सत्याचा मार्ग व प्रशस्त वर्तनक्रम यांनाच ऋत म्हटले आहे. शास्त्रीजींच्या मते सर्व विश्व व निसर्ग दिव्य सौंदर्याने भरलेले आहे. या अनुभवाने ऋग्वेदातील ऋषिगण भारलेला आहे व निसर्गशक्तीतील सौंदर्य व दिव्यत्व यांची त्यास एकरूप प्रचिती आली आहे. वेदकाळातील यज्ञसंस्थेतून भारतीयांची समाजरचना, राज्यव्यवस्था, कायदे पुराणे व कला यांचा उदय झाला, असे मत ते व्यक्त करतात.

दुसऱ्या प्रकरणात वैदिक संस्कृतीमध्ये तार्किक तत्त्वचिंतनाचा उदय कसा झाला याची चर्चा केली आहे. त्यांच्या मते, तार्किक चिंतन संस्कृती विकासासाठी आवश्यक असते. तसे पाहिले तर तत्त्वचिंतनास ऋग्वेदातच सुरुवात झाली होती, पण त्याचा खरा विकास उपनिषदात झाला. वैदिक विचारांचा विकास कथारूपक आणि शुद्ध कल्पना असा झाला. त्यांच्या मते, प्राचीन भारतीय समाजातील स्त्रिया व खालचे मानले जाणारे वर्गसुद्धा मानसिक संस्कृतीचे प्रवर्तक होते. वेद, देव, यज्ञाचे कर्मकांड वगळून एक प्रकारची अंतर्मुखता उपनिषदांत दिसून येते. त्यात आत्मज्ञानाची व ब्रह्मविद्येची माहिती सांगितली आहे. परा व अपरा हे विद्येचे दोन प्रकार असून चार वेद, सहा वेदांगे, अपरा म्हणजे खालची विद्या आहे आणि परा म्हणजे ब्रह्मविद्या ही वरच्या दर्जाची विद्या आहे असे मुंडकोपनिषद सांगते त्यांच्यामते उपनिषदातील वैचारिक क्रांती ही दोन संस्कृतींमधील वैदिक आणि अवैदिक संघर्षाचाच परिणाम होता आणि उपनिषदांनी बौद्धांचे व जैनांचे अवैदिक संप्रदाय व शैव व वैष्णव या अवैदिक भक्तीधर्माचा मार्ग खुला केला. त्यानंतर जोशींनी विश्वाचे सूक्ष्म रूप असणारी पुरुष कल्पना व आत्म तत्त्वाच्या कल्पनेचा इतिहास यांची मीमांसा केली. त्यांनी वैदिकांच्या बौद्धिक ज्ञानाचा उदय व विकास, तर्कशास्त्रांचा व भारतीय दर्शन यांचा

उदय, कल्पसूत्रे व पूर्वमीमांसेचे तत्त्वज्ञान व सांख्ययोग लोकमत तत्त्वज्ञानांचा उदय यांची चर्चा केली आहे. त्यांची मूलतत्त्वे सांगितली आहेत. यातून भारतीय धर्मविचार कसा विकसित होत होता आणि ऋत आणि धर्म यांच्यात परस्परसंबंध कसा निर्माण झाला हेही सांगितले आहे. हे ७५ पानांचे प्रकरण मुळातून वाचले पाहिजे.

'वैदिकांची कुटुंब संस्था व समाज संस्था' या तिसऱ्या प्रकरणात त्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, यज्ञसंस्थेच्या धार्मिक बळावर वैदिकांनी कुटुंबाची आणि समाजाची धारणा केली. यज्ञ हाच पहिला धर्म होता. व्यक्ती, समाज व कुटुंब यांच्या धारणेसाठी तो महत्त्वाचा होता. नीतिशास्त्र दृष्ट्या ही कल्पना व्यापक होती. त्याची जोड सत्य आणि आत्मदर्शन यांच्याशी लावण्यात आली. कठोपनिषदात श्रेय व प्रेय या कल्पना मांडल्या असून प्रेय म्हणजे तात्कालिक शरीर सुख व श्रेय म्हणजे आत्मज्ञान व सदाचरण होय. धर्म, पुरुषार्थ आणि ऋत या तीन महत्त्वाच्या कल्पना आहेत. त्यांचा समाजधारणेशी महत्त्वाचा संबंध आहे. समाजाचे अनुशासन करण्यासाठी धर्मशास्त्रांचा उदय झाला. प्रथम धर्मसूत्रे व गुह्य सूत्रे तयार झाली व नंतर विशाल असे धर्मशास्त्र वाङ्मय तयार झाले. त्यानंतर जोशींनी विवाह, कुटुंब संस्था व वारसा, चातुर्वर्ण्य कल्पनेचा विकास आणि निर्मिती यांचा विस्ताराने विचार केला आहे. त्यांच्या मते, जातिभेदाच्या रूपाने चातुर्वर्ण्याची परिणती यजुर्वेदाच्या व ब्राह्मणग्रंथांच्या काळात सुरू झाली. ब्राह्मण क्षत्रिय संघर्ष व शूद्र व सवर्ण यांतील दीर्घकालीन दुरावा यामुळे जातिभेदास तीव्रता प्राप्त झाली. परस्पर संबंधावर अनेक बंधने घालण्यात आली. पुस्तकातील जातीभेदाची कारणे व जातिभेद जन्य समाजदौर्बल्य हे भाग महत्त्वाचे आहेत. भारतीय राजनीति शास्त्राची पण शास्त्रीजींनी चर्चा केली आहे. थोडक्यात कुटुंब संस्था, समाज संस्था व राज्य संस्था या तीनही संस्थांच्या सर्व प्रकारच्या नियमनात धर्मकल्पना महत्त्वाची भूमिका बजावत होती.

चौथे प्रकरण हे 'इतिहास पुराणांची आणि रामायणाची संस्कृती' यावर असून इसवी सनानंतर भारतात कोणते बदल झाले याची त्यात चर्चा करण्यात आली आहे. हिंदू धर्मातील श्रौत व स्मार्त धर्म हे त्रैवार्णिकासाठी होते. त्यांनी त्या पलीकडे जगणाऱ्या बहुजन समाजाकडे दुर्लक्ष केले होते. पण सर्ववर्णीयांना वैदिक धर्माचा संदेश देण्याचे काम पुराणांनी केले. भागवतभक्त चांडाळ, विप्रापेक्षा श्रेष्ठ आहे असे भागवताने सांगितले.

पुराणांनी सर्व आबालवृद्धांसाठी भक्तीचा पुरस्कार केला. त्यामुळे १८ पुराणांपेक्षा रामायण व महाभारत ही महाकाव्ये लोकांत लोकप्रिय झाली. शास्त्रीजींच्या मते, पुराणांची रचना चार टप्प्यांत झाली व शेवटचा टप्पा हर्षाच्या काळातील आहे. पुराणे व महाकाव्यांनी भक्तीचा पुरस्कार केला. त्याचाच विस्तार विविध भाषांतील कवींनी लोकमानसात केला. तसं पाहिलं तर पुराणे यांचा जवळचा संबंध होता. यज्ञात विश्रांतीच्या काळात मनोरंजनासाठी इतिहास-पुराण कथा सांगितल्या जात. त्यानंतरच्या काळात पांचरात्रांच्या भागवत वा वैष्णव धर्माचा उदय झाला. विष्णू बरोबरच शिवाची पूजा महत्त्वाची ठरली आणि शैव व वैष्णवश्रौत हे हिंदू धर्माचे महत्त्वाचे संप्रदाय ठरले. त्यांनी यज्ञ मार्गादी श्रौतधर्माच्या जागी भक्तीचा, अहिंसेचा आणि चितबुद्धीचा मार्ग सांगितला व हिंदू धर्माच्या स्वरूपात बदल केला. त्यांच्या मते, पुराणात वैदिक आणि अवैदिक परंपरांचा मोठ्या प्रमाणात समन्वय करण्यात आला आहे. रामायण व महाभारत ही दोन महाकाव्ये भारतीय लोक जीवनावर मोठ्या प्रमाणात प्रभाव टाकताना आपणास दिसतात. महाभारत हे प्रचंड महाकाव्य असून त्यात भारतीयांच्या धर्मकल्पनेची मांडणी केली आहे. त्यातच भक्ती, कर्म व ज्ञान यांचा पुरस्कार करणारी भगवद्‌गीता आहे. जिस प्रस्थानत्रयी म्हणून मान्यता आहे, महाकाव्याचा भारतीय लोकजीवनावर, कला, साहित्य आणि नाट्य यांच्यावर मोठा प्रभाव पडला. गीता, भागवत आणि पुराणातून भक्तीचा प्रवाह निर्माण झाला त्यातून महाराष्ट्रातील भागवत धर्माचा, ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम या संतांच्या वाङ्‌मयाचा उदय झाला. अहिंसा चित्तशुद्धी, आत्मौपम्या बुद्धी आणि सर्व भूतांप्रती समत्वभाव ही भागवत धर्माची वैशिष्ट्ये होती.

'बौद्ध व जैन यांचा धर्मविचार' हे या पुस्तकातील पाचवे प्रकरण आहे. जे खरे पाहिले असता चौथे प्रकरण असावयास पाहिजे होते, कारण त्यांच्या विचारांचा प्रभाव पुराणे व महाकाव्यांवर पडला आहे. शास्त्रज्ञांच्या मते, जैन व बौद्ध धर्म वैदिक श्रौत धर्म व तज्जन्य हिंसा यांच्या विरोधात असले, तरी त्यांच्या विचारांची बीजे उपनिषदातून आपणास पहावयास मिळतात. त्या काळात जैन व बौद्ध समाजाबरोबर वेगवेगळ्या विचारांचे प्रवाह निर्माण झाले होते. आत्मा, ईश्वर, परलोक, मानवी जीवनाचे उद्दिष्ट, सत्य व सदाचार यांचे स्वरूप याबाबत त्यांच्यात खल चालू होता. विश्व, चिंतन आत्मचिंतन व साध्य साधनांचे चिंतन हा या विचारसंग्रामाचा भाग

होता. बुद्धाने मनुष्याच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नांना हात घातला. बुद्धीने व अनुभवाने जी सत्ये स्पष्टपणे व निर्विवादपणे सांगता येतील त्याचीच त्याने चर्चा केली. साध्य-साधन विचार व कर्मावर विचार यावर त्याने भर दिला. अंतिम सत्य काय आहे यापेक्षा मनुष्याचे अंतिम ध्येय काय आहे हा प्रश्न त्यास महत्त्वाचा वाटला. अनासक्ती, तृष्णानाश, समाधान, ज्ञान व प्रकाश महत्त्वाचे आहेत. शास्त्रीजी सांगतात की निश्चित, प्रत्यक्षसिद्ध नित्य अनुभवाच्या व निर्विवाद अशा तत्त्वावर विचारसरणी उभारण्याचा तत्त्वज्ञानाच्या इतिहासातील प्रथम प्रयत्न बुद्धाने केला. त्याने वैदिक व नास्तिक पंथ यांच्यावर विजय मिळवला. त्यांच्या मते, बुद्धाचा मार्ग हा मध्यम मार्ग होता. त्यामुळे त्याने कार्यकारण भाव जाणणारी सद्‌बुद्धी हे धर्माचे लक्षण आहे असे सांगितले. त्यामुळे जागृत माणसाला कशाचेही भय नसते. इंद्रियोपभोग व आत्मक्लेश ही दोन्ही टोके आपण टाळली पाहिजेत. त्याने अष्टांग मार्गाचा पुरस्कार केला. धर्म हा शब्द त्याने विश्वविषयक तत्त्वज्ञान व कर्तव्य विचार या दोन्ही अर्थांनी वापरला. तर्कतीर्थ यांनी बुद्धाच्या तत्त्व दर्शनाची विस्ताराने चर्चा केली आहे.

त्यांच्या मते, जैन व बौद्ध धर्मामुळे भारतीयांना नवजीवनाचा लाभ झाला. भारतीय भाषांचा विकास झाला. त्यांनी भारतीय कला, संस्कृती व साहित्य यांस नवी दिशा दिली. त्यांनी बौद्ध धर्माचे सामाजिक आणि राजकीय परिणाम विशद केले. बौद्ध धर्म हा प्रथम विश्व धर्म ठरला.

जैन धर्माची पूर्वपरंपरा बुद्धाच्या आधीची आहे व वर्धमान महावीर हे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर मानले जातात. त्यांचे चरित्र म्हणजे साधू चरित्राचा प्रथम आदर्श होय. अहिंसा, तितिक्षा, क्षमा व समता या तत्त्वांचा त्यांच्या जीवनात समावेश होता. तत्त्वदर्शन, तर्कशास्त्र या क्षेत्रात जैनांचे योगदान बौद्ध व वैदिक यांच्यापेक्षा कमी नाही. त्यांचा अनेकांतवादाचा सिद्धांत महत्त्वाचा आहे. त्यामुळे परमत सहिष्णुता त्यांच्यात चांगली रुजली. जैन आणि बौद्ध धर्मामुळे भारतातील धर्मकल्पना अधिक सहिष्णू, अहिंसक, प्रेम, क्षमा, करुणा आणि निर्भयता यांनी प्रेरित झाली. तिच्यातील पुराणप्रियता आणि ग्रंथप्रामाण्य कमी झाले. त्यात विवेक आणि करुणा यांचा प्रादुर्भाव झाला.

पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात तर्कतीर्थांनी आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलनाचा व तत्त्वचिंतनाचा टीकात्मक परामर्श घेतला आहे. त्यांच्या मते, भारतीय संस्कृतीवर इस्लामचा व त्यानंतर ब्रिटिश

आक्रमणाचा खोल असा प्रभाव पडला. ब्रिटिश राजवटीमुळे मोठे बदल घडवून आले आणि भारतीयांना पश्चिमेकडील नव्या मूल्यांचे ज्ञान झाले. भारतीय विद्येचे पुनरुज्जीवन झाले. त्यातून धर्मसुधारणेची चळवळ सुरू झाली. हिंदूंच्या सामाजिक जीवनाचा प्राण हिंदू धर्म आहे व या धर्माच्या गाभ्यात बुद्धिवादाने प्रकाश टाकून त्यांच्यात परिवर्तन केल्याशिवाय सामाजिक परिवर्तन होणार नाही हे या प्रज्ञावंतांच्या लक्षात आले व त्यातून राममोहन, जोतिबा, विवेकानंद आणि दयानंद यांच्या चळवळी सुरू झाल्या. धर्म दृष्टी बदलल्याशिवाय सामाजिक परिवर्तन करावयास मानसिक धैर्य प्राप्त होत नाही हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांच्या चळवळींचा टीकात्मक असा आढावा शास्त्रीजींनी या प्रकरणात घेतला आहे. राम-मोहन रॉय हा नवयुगाचा निर्माता होता. त्याने ब्राह्मोसमाजाची स्थापना करून एकात्म उदार धर्माची विवेकाच्या आधारावर मांडणी केली आणि सत्य, सर्वजनहित व मानवमात्रांचे परस्परांवर प्रेम यांचा पुरस्कार केला. भारतीय परंपरेचे संस्करण करीत लोकमान्य टिळक यांनी कर्मयोगाचा, योगी अरविंदांनी दिव्य जीवन व मानव जातीचे ऐक्याचा, गांधींनी आत्मशक्तीच्या द्वारा पाशवी व हिंसक शक्तीच्या विरुद्ध संघर्ष करण्याचा व मानवेंद्र रॉय यांनी नवमानवतावाद यांचा पुरस्कार केला. या विचार प्रवाहातून आधुनिक भारताचे धर्मचिंतन अभिव्यक्त केले. भारतीय धर्म कल्पनेत सर्वधर्म समन्वय मान्य होता व आपण अनेक विचारांचे नीरक्षीर विवेक दृष्टीने सेवन करीत पुढे जावे ही त्या मागची दृष्टी होती. विज्ञान, विवेक, मानवाचे आंतरिक उन्नयन व सार्वत्रिक करुणा यांचा त्यात समन्वय केला होता. शास्त्रीजींच्या मते, सत्य संशोधन ही मानवी संस्कृतीची शक्ती आहे व त्यासाठी विचार स्वातंत्र्य व धर्म स्वातंत्र्य गरजेचे असते. कारण धर्मभावना ही मानवीमनातील गंभीर व सर्व मानव जातीला व्यापून राहिलेली भावना आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या धर्म मीमांसेचा आपण येथे परामर्श घेतला. या काळात त्यांच्या विचारांत बदल झाला. मार्क्सवाद, इहवाद आणि रॉय प्रणीत विवेकवादाचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्याचप्रमाणे प्राज्ञपाठशाळेची परंपरा व वारसा, वैदिक पांडित्य व धर्म निर्णय सभेतील सहभाग यामध्ये एक प्रकारचा तणाव होता. हा तणाव पाश्चिमात्यांचे विज्ञान व विवेकवाद व भारतीयांचे अध्यात्म यांची चर्चा करताना स्पष्ट दिसत होता. कारण, विज्ञान व इहवाद यांची कास धरल्याशिवाय नवा

समाज स्थापन करता येत नाही, समाजसुधारणा करता येत नाही हे त्यांच्या लक्षात आले होते. पण सापेक्ष नैतिकता समाजाला स्थैर्य देऊ शकत नाही हे लक्षात आल्यानंतर शाश्वत नीतिमूल्यांवर आधारित धर्मकल्पनेची त्यांनी मांडणी केली. त्यामुळे मानवी जीवन अधिक समृद्ध होईल असे त्यांना वाटले.

'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथाबरोबर धर्म इतिहासाचे व चिकित्सक धर्म मीमांसेचे रहस्य समजावून घेण्यासाठी 'हिंदूधर्म समीक्षा' हा ग्रंथही वाचावा असे त्यांचे सांगणे होते. वैदिक संस्कृतीच्या विकासात ज्ञानेश्वर, नामदेव, कबीर, गोरखनाथ, तुळशीदास, तुकाराम व सुफी संतांची मध्ययुगीन धर्मसाधना महत्त्वाची होती. कारण त्यात धर्माचा मानवतावादी आशय अभिव्यक्त झालेला होता. पण तर्कतीर्थांनी त्याचा विस्ताराने परामर्श घेतला नाही. तरीही तर्कतीर्थांची धर्ममीमांसा अनेक अर्थाने महत्त्वाची व मन समृद्ध करणारे आहे.

***संदर्भ:***


१. *हिंदुधर्माची समीक्षा व सर्वधर्मसमीक्षा - जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (१९६४), (दुसरी आवृत्ती), प्राज्ञपाठशाळा, वाई.*
२. *वैदिक संस्कृतीचा विकास - जोशी तर्कतीर्थ (१९८६), तिसरी आवृत्ती प्राज्ञपाठशाळा, वाई.*
३. *धर्मकोश - संपादक जोशी तर्कतीर्थ (१९५०), (उपनिषद कांड), खंड-दोन भाग एक, प्रस्तावना, प्राज्ञपाठशाळा, वाई.*
४. *प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा - जोशी आणि इतर (१९९६) (सं.) प्राज्ञपाठशाळा, वाई.*
५. *तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक - नवभारत, फेब्रुवारी-मार्च १९८१.*
६. *तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - नवभारत, अंक ४५६, जानेवारी-मार्च १९९६.*


■

*(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ऑनलाईन व्याख्यानमालेतील भाषणाचा अंश, रविवार, दि. २९ जानेवारी, २०२२.)*

# १०

## तर्कतीर्थांची धर्मविषयक धारणा

जगातील सर्व देशांतील मानवी समाज कोणत्या ना कोणत्या धर्माशी जोडला गेलेला असल्याचे दिसते. धर्म नसलेला एकही देश जगात नाही. यातून धर्म संकल्पना ही विश्वव्यापी असल्याचे दिसून येते. निसर्ग आणि मनुष्य यांचं अभिन्न नातं आहे. माणूस टोळ्यांमध्ये राहात असल्यापासून निसर्गाविषयी त्यांच्या मनात विलक्षण ओढ असल्याचे दिसते. निसर्गाशी माणसाचं जगणं निगडित आहे. निसर्गचक्राप्रमाणे त्याचं जीवन बदलतं. निसर्ग त्याच्यासाठी वरदानही आहे नि शापपण. त्याचं राहणं, खाणं, पिणं, संचार, शिकार सारं निसर्ग सन्निद्ध राहिलं आहे. सृष्टीत येणाऱ्या भूकंप, पूर, विजांचा कडकडाट, सूर्य, चंद्र, तारे सारे त्याच्या जिज्ञासेचा विषय राहिले आहेत. निसर्गाचं भय, कोप, अवकृपा यापासून तो भयभीत होतो नि हवालदिलही.

स्वसंरक्षण, इच्छिताची पूर्ती, अनिष्टापासून संरक्षण हवं असलेला मनुष्य करुणा भाकत ईश्वर, दैव, नशीब अशा गोष्टी कल्पू लागतो व आराधना, प्रार्थना करतो. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचतत्त्वं पूर्वी त्याच्या प्रार्थनेची आराध्यं होती. सर्वसामान्यांनी या तत्त्वांना दगड, शिळा, वृक्ष, नदी, पर्वत इ. रूपात भजायला प्रारंभ केला. माणूस जंगलातून भटकायचा, पुढे गुहेत राहू लागला. त्याला स्थिरता आली, तशा वस्त्या तयार झाल्या. वस्त्यांची नगरं झाली. नगरांनी राज्यं बनली. तशी संस्कृती आली. भाषा, कला, पोशाख, दागिने, शेती, सण, उत्सवांच्या एकात्मतेतून

संस्कृती उदयाला आली. संस्कृती मानव अस्थिर असतानादेखील होती पण तिला चेहरा, सातत्य समानता आली, स्थिरतेतून.

स्थैर्याने माणसाचं जीवन सुसह्य व्हावं म्हणून जगण्या, राहण्या, वागण्याचे नीतीनियम अस्तित्वात आले. त्यातून धर्माची निर्मिती झाली. पाप-पुण्य, इहलोक - परलोक, आत्मा-परमात्मा, सृष्टीनिर्मिती व विकास या साऱ्याचा तात्त्विक विकास धर्म बनला. तो निर्माण करणारा संस्थापक संत झाला. त्याचे उत्तराधिकारी प्रेषित बनले. आज्ञा, अलौकिकत्व, अवतार, चमत्कारातून धर्म ईश्वराशी अलौकिकत्व जोडलं गेलं. त्यातून धर्माचरण हे अनिवार्य कर्मकांड बनलं. त्याच्या अतिरेकाची प्रक्रिया म्हणून पंथ जन्मले. मनुष्य समाज, संस्कृती, धर्म सर्व क्रिया-प्रतिक्रिया यांची निर्मिती आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मराठी विश्वकोश, खंड ८ मध्ये पृष्ठ १७ ते २८ वर एक व्याप्तिलेख लिहून 'धर्म' संकल्पना स्पष्ट केली आहे. 'धर्म' संकल्पनेसंबंधी ही नोंद धर्माविषयीचं त्यांचं आकलन म्हणून पाहावे लागेल. त्यांनी 'हिंदू धर्माची समीक्षा' (१९४१), 'वैदिक संस्कृतीचा विकास' (१९४७) 'सर्वधर्मसमीक्षा' (१९८४), 'शिखांचा पंथ व इतिहास' (१९८४), 'आद्यशंकराचार्य - जीवन आणि विचार' (२०१२) या ग्रंथरूपात सादर केलेल्या भाषणांमधून धर्मविषयक त्यांचे मत मांडले आहे. दोन्ही गोष्टी भिन्न होत 'धर्म' हे तत्त्व स्वरूप म्हणून ते कसे समजावतात, हे पाहणे मूलभूत तत्त्वबोध म्हणून महत्त्वाचे ठरते.

**तर्कतीर्थकृत धर्माची व्याख्या**

निसर्गातील, अत्यंत पवित्र, संपूर्ण मानवी भवितव्याशी संबंध, जीवन व विश्व अथवा निसर्ग यांची नियंत्रक अशा अलौकिक शक्तीवर (किंवा अशा शक्तींवर) माणसाची श्रद्धा असते. त्या त्या शक्तीचा (वा शक्तींचा) स्वत:शी अनुकूल, पवित्र व घनिष्ठ संबंध स्थापित करणारी वैयक्तिक अथवा सामाजिक मन:प्रवृत्ती व त्यातून निघणारी आचरणाची पद्धती म्हणजे धर्म (रिलिजन) होय आणि त्या शक्तीशी (वा शक्तींशी) प्रतिकूल मन:प्रवृत्ती व आचरण म्हणजे अधर्म होय. (संदर्भ : मराठी विश्वकोश - खंड ८ - पृ.१७)

तर्कतीर्थांनी केलेली धर्माची व्याख्या व्यवच्छेदक आहे. ती धर्म आणि अधर्म दोन्ही गोष्टी एकाचवेळी सांगते. दोन्हीतील फरक समजावते. धर्म निसर्गातील गोष्ट होय. ती पवित्र असते. तिचा मानवी जीवनाशी संबंध

असतो. मनुष्य आणि निसर्गाला जोडण्याचे काम धर्म करतो. धर्म अलौकिक गोष्टी समजावतो. धर्मानुयायींची त्यावर श्रद्धा असते. धर्माविलंबी अलौकिकावर विश्वास व श्रद्धा ठेवतो. या अलौकिक शक्ती मानव व निसर्गास नियंत्रित करणाऱ्या असतात असे धर्म सांगतो. श्रद्धा, अश्रद्धा, विश्वास ही मन:प्रवृत्ती होय. ती प्रत्येकात भिन्न असते. काही विश्वास ठेवतात. काही नाही. जे धर्मावलंबन (आदर्श आचरण) करत नाही, त्याच्या हातून अधर्म घडतो. धर्म म्हणजे सदाचार.

पुढे त्यांनी 'इष्टप्राप्त्यर्थ व अनिष्टनिवारणार्थ अलौकिक शक्तीची साधना किंवा आराधना म्हणजे धर्म होय, असं म्हणत प्राप्तीसाठी आणि अनिष्ट निवारणार्थ धर्माचा अवलंब करतो म्हणत धर्मातील अलौकिक शक्ती रेखांकित केली आहे. धर्मातील अलौकिकाचे जे समर्थन आहे. त्याचे प्रलोभन, आकर्षण धर्म साधकापुढे असते. हे अलौकिक तत्त्व व त्यावरचा विश्वास हा श्रद्धेचा विषय आहे. तो विज्ञानाच्या कसोटीवर अद्याप उतरलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

जीवन परिपूर्ण व कृतार्थ करणारी, हे अपरिपूर्ण दोषमय, अशांत जीवन बदलून टाकणारी, उच्चतम ध्येयाच्या म्हणजे दिव्यत्वाच्या प्राप्तीची पद्धत म्हणजे, धर्म होय. यात माणसात असणाऱ्या दिव्यत्वाच्या आकर्षणाची चर्चा आहे. ते दिव्यत्व ही अलौकिक सदृश्य असते, हे इथे लक्षात घ्यायला हवे. मुळात माणूस उच्चतम श्रेष्ठ नि:श्रेयस जीवन घडवण्याची धडपड करत असल्यानेच तो धर्माकडे आकर्षित होत असतो, हे इथे विसरून चालणार नाही.

इथे, तर्कतीर्थांनी अलौकिक शक्तीचे स्वरूप, प्रकार विषय इ. बाबींची चर्चा करून तिचे स्वरूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या व्याख्येनंतर तर्कतीर्थांनी विविध पाश्चात्त्य चिंतक मानसशास्त्रज्ञ, समीक्षकांच्या धर्म व्याख्या नोंदवून त्यांची चर्चा केली आहे. धर्म व समाज, धर्म व राज्यसंस्था, धर्म व समाज सुधारणा यांचे संबंध स्पष्ट केले आहेत. त्यानंतर मोक्ष, कर्मकांड, भक्तिमार्ग, ज्ञानमार्ग इ. चे प्रतिपादन करून धर्माच्या सर्व अंगावर प्रकाश टाकला आहे. या संदर्भात सर्व धर्मांचे दाखलेही दिले आहेत.

या सर्व चर्चेचून धर्मस्वरूपाची व्यापकता स्पष्ट होते. धर्माचा संबंध केवळ व्यक्तीच्या श्रद्धा, अश्रद्धा वा अंधश्रद्धेचा विषय न राहता, तो समाज धारणेचाही अभिन्न भाग आहे हे या नोंदीवरून स्पष्ट होते. धर्मात

ईश्वरी तत्त्व अनिवार्यपणे येते. त्याच्या प्राप्तीचे विविध मार्ग विविध धर्मांत सांगितले गेले आहेत. परंपरेने धर्म हा बदलत आल्याने कालौघात त्याचे स्वरूप बदलले तरी मूळ चौकट धर्म हरवत नाही. उलटपक्षी धर्म कर्म इत्यादी सनातनपण टिकवण्याकडेच धर्माचा कल दिसून येतो. त्यातील देव, दैव, दैत्य, ईश्वर, चमत्कार. अलौकिकत्वाचे आकर्षण सर्वसामान्यास असल्यानेच बहुसंख्य धर्मावलंबी असतात.

**हिंदुधर्मांची समीक्षा (१९४१)**

नागपूर विद्यापीठ, नागपूरने (सध्याचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ) सन १९४० मध्ये श्री. श्रीधर गणेश परांजपे व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. त्यासाठी त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना व्याख्यानासाठी आमंत्रित केले होते. 'हिंदू धर्माची समीक्षा' हा व्याख्यानाचा केंद्रभूत विषय निश्चित करण्यात आलेला होता. या व्याख्यानमालेंतर्गत तर्कतीर्थांनी तीन दिवस, तीन व्याख्याने दिली. त्यांचे विषय पुढीलप्रमाणे होते. पहिल्या व्याख्यानाचा विषय होता, 'धर्मसमीक्षेची भूमिका', दुसरे व्याख्यान 'धर्मलक्षण व धर्मप्रमाण' या विषयावर झाले. तर तिसरे व्याख्यान 'हिंदू धर्माचे स्वरूप' या विषयावर होते. तत्कालीन कुलगुरू ॲडव्होकेट नानासाहेब केदार यांनी ही व्याख्याने लगेचच विद्यापीठामार्फत पुस्तक रूपाने प्रकाशित केली होती. विद्वत्‌रत्न डॉ.के.ल. तथा भाऊजी दप्तरी यांनी सदर ग्रंथ वाचून तर्कतीर्थांना पत्र लिहून आपला अभिप्राय कळवला होता. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबईच्या पुरस्काराने प्रकाशित 'विद्वत्‌रत्न डॉ. दप्तरी लेखसंग्रह' मध्ये तो संग्रहित आहे. त्यात सदर ग्रंथावर डॉ. दप्तरी यांनी लिहिलेले या ग्रंथावरील परीक्षणही आढळते.

**डॉ. दप्तरी यांची असहमती**

तर्कतीर्थांनी पत्र लिहून डॉ. दप्तरी यांच्या परीक्षणातील मुद्यांवर आपली आदरपूर्वक असहमती कळवत लिहिले होते की मी आपल्या विचारसरणीची स्तुती करतो, यांचे कारण असे आहे की, ती विचारसरणी मला मान्य होत नसली तरी त्यात सुव्यवस्था, मौलिकता आणि बुद्धिप्रामाण्यवाद आहे. एक संभवनीय महत्त्वाची विरुद्ध बाजू या दृष्टीने मी आपल्या विचारसरणीकडे पाहतो. सदर ग्रंथ प्रकाशित होताच त्याचे सर्वत्र साक्षेपी स्वागत झाले. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', 'समाज जीवन', 'वाङ्मय शोभा' सारख्या नियतकालिकांनी धारावाहिक परीक्षणे प्रकाशित करून सदर ग्रंथातील विचार लक्षवेक्षी असल्याचे अधोरेखित केले होते. प्रा. मे. पुं. रेगे यांनीही

या ग्रंथावर 'नवभारत'मध्ये सविस्तर प्रकाश टाकला होता. हे या ग्रंथाचे वैचारिक वेगळेपण सिद्ध करणारे आहे. सदर ग्रंथ प्रकाशित झाल्यावर संस्कृतीसंरक्षक मंडळाने निषेध नोंदवला होता.

**धर्मसमीक्षा हाच खरा प्रारंभ**

हिंदू धर्मांची समीक्षा ग्रंथ प्रस्तावनेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्पष्ट केले आहे, की या व्याख्यानातून हिंदू धर्माची समीक्षा ऐतिहासिक पद्धतीने व ऐतिहासिक समाजशास्त्राच्या दृष्टीने केली आहे. व्याख्यानाचा काळ हा तर्कतीर्थांच्या विचार संक्रमणाचा होता. ते गांधीवादाकडून मार्क्सवादाकडे मार्गक्रमण करत होते. हिंदू धर्म समीक्षेचा हा प्रयत्न तर्कतीर्थांनी 'धर्म ही अफूची गोळी आहे' या मार्क्सच्या दृष्टिकोनाऐवजी, त्याच्याच 'धर्मसमीक्षा हाच सर्व समीक्षांचा खरा प्रारंभ आहे', या विचारावर आधारित आहे. पहिल्या दोन व्याख्यानात तर्कतीर्थांनी आपल्या मांडणींचे आधार प्रस्तुत केले. अर्थातच, हिंदू धर्म समीक्षेच्या दृष्टीने तिसरे व्याख्यान महत्त्वाचे ठरते.

तर्कतीर्थांनी आपल्या पहिल्या व्याख्यानात धर्मसमीक्षा पद्धती, इतिहास समीक्षेचे पक्षोपपक्ष, विविध मते, समाज परिवर्तन इत्यादी बाबींचा आढावा घेतला आहे. दुसऱ्या व्याख्यानात धर्माची व्याख्या विस्ताराने करून धर्म समीक्षेची साधने स्पष्ट केली आहेत. कोणत्याही काळात धर्म समीक्षा करणे, हे जोखमीचे तद्वतच जबाबदारीचे काम असते. याचे भानही समीक्षा करताना तर्कतीर्थांना असल्याचे व्याख्याने वाचताना पानोपानी लक्षात येते. पाश्चात्त्य देशात हे भान सुटल्याने तिथे धर्मास अंधश्रद्धेचे रूप आले, असे ते नोंदवायला विसरत नाहीत. ज्या समाज वा देशात स्वधर्म चिकित्सा, मीमांसा, टीका स्वातंत्र्य असते. तो समाजच उन्नत अवस्थेकडे मार्गक्रमण करत प्रगल्भ होत असतो, हे आपण धर्मसमीक्षेच्या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे. धर्मप्रधान वा धर्मांध समाजात परतत्त्व प्रभाव वाढीचा धोका असतो. म्हणून कालौघात अशा दोषांचे निराकरण होणे, यात समाजाचे अंतिम हित सामावलेले असते. असे घडले तर मग समाज विज्ञानाधिष्ठित होण्याच्या शक्यता वाढतात. अशी शक्यता वाढणे आवश्यकच नाही, तर अनिवार्यही आहे.

**नवमानवतावादाची दृष्टी**

धर्मश्रद्धांचे प्रश्न सर्वकाळात नाजूक आणि संवेदनशील राहात आलेले आहेत, हे जरी खरे असले तरी काळाप्रमाणे बदल ही आवश्यक बाब

असते, हे आपणास विसरून चालणार नाही. जगातील परिवर्तन आणि बदलांचे निरीक्षण व अभ्यास करताना आपल्याला असे दिसून येते, की ते आध्यात्मिकतेकडून इहवादाकडे अग्रेसर होत आहे. विज्ञाननिष्ठ वा विज्ञानाधारित समाजात धर्माचे वा धर्मश्रद्धांचे महत्त्व काय? तर ते धर्माच्या आदर्श सदाचरण व वैश्विक बंधुतेच्या मूल्यात तुम्हाला सामावलेले दिसेल. धर्म कोणताही असो, तो मानव कल्याणार्थच जन्मतो. त्याचे अंतिम उद्दिष्ट भूतदया, बंधुता हेच राहते. कालौघात अनेक धर्मांमध्ये भ्रांती आढळते. ती अंधश्रद्धा, कर्मकाण्डाच्या रूपात दिसते. अशा वेळी विवेकबुद्धीनेच त्यांच्या इष्ट अनिष्टतेचा निर्णय शहाणपणाचा ठरतो, असे विचारसूत्र मनी बाळगून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिलेली व्याख्याने त्या काळास नवमानवता वादाची दृष्टी देणारी होती, असे लक्षात येते. आज ती तितकीच महत्त्वाची अशासाठी की आपण कालौघात धर्म, जात, निरपेक्ष होऊ शकलो नाही, म्हणूनच आज त्या दृष्टीची पूर्वी इतकीच गरज आहे.

**धर्मसमीक्षेमागील भूमिका**

हाती घेतलेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकाशन व संपादन कार्य केवळ संकलन व पुन:प्रस्तुतीच्या विचाराने नसून तर्कतीर्थांच्या जीवन, कार्य, विचारांचे जे पुरोगामीपण आहे, त्याचे अनुगमन नि अनुकरण करण्यात समाजहित सामावलेले आहे. 'धर्मसमीक्षेची भूमिका' या आपल्या पहिल्या व्याख्यानात तर्कतीर्थ स्पष्ट करतात की, धर्मसमीक्षा हा प्रांत वा शाखा मूलत: मानसशास्त्रीय भाग होय. त्याआधारे धर्मसमीक्षेत धर्मातील सत्यासत्य कल्पना, प्रयोजन, कार्यकारणभाव इत्यादी अंगाची चिकित्सा केली जाते. जगात धर्मसमीक्षेचा विचार अठराव्या शतकापासून सुरू झाला. लेसिंग, हर्डर, प्रभृती याचे जनक होत. पुढे एकोणिसाव्या शतकात हेगेल, सर टायरल, सर फ्रेअर, कांट, दुरखिम, फायरबाख, वेबर, स्पेंसर इत्यादींनी धर्म समीक्षा शाखेचा आपल्या योगदानाने विकास घडवून आणला. अमुक धर्म खरा, अन्य खोटे किंवा माझा धर्म श्रेष्ठ अन्य हीन हा भाव वा अभिनिवेश चुकीचा असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

**समाज परिवर्तनाचे शास्त्र**

कालौघात धर्मांचा अभ्यास करताना असे लक्षात येते, की नवा धर्म निर्माण होण्याचे युग संपले. हे एका अर्थाने मानवी समुदायाचे धर्मप्रभाव मुक्तीकडे जाणेच होय. पूर्वी धर्माचे स्वरूप हे ईश्वरप्रदत्त वा ईश्वरकेंद्री होते, आता ते मानव संचालित बनले आहे. जो समाज प्रगतीपर असतो,तो नव

विचारधारा स्वीकारणारा असतो. प्रगतीच्या मुळाशी बुद्धिवाद असतो. बुद्धिवादातून विज्ञान जन्माला येते. विज्ञानामुळे धर्मक्षय संभव असतो. हीन समाजाचा धर्म हीन वा उच्च समाजाचा धर्म उच्च, या तर्कास 'जसे लोक तसे त्यांचे देव' ही लोकोक्ती तिचा आधार म्हणून सांगता येईल. जगात समाजरचनांमध्ये वा राजसत्तेत वा व्यवस्थेत झालेले बदल हे विकासाच्या अनिवार ओढीतूनच झाले, हे कोण नाकारेल? पूर्वी गणराज्ये होती. विशेषतः ग्रीक संस्कृती काळात त्याचे देश वा राष्ट्रे झाली. त्यातून राष्ट्रवाद भावना उदयाला आली. तिची संकीर्णता लक्षात आल्यावर गेल्या शतकात वसुधैव कुंटुंबकम्, विश्वनिडम, विश्वसाहित्यसारखे विचार अस्तित्वात आले. त्यामागे विश्वबंधुत्व वा विश्वधर्म भावनाच कार्यरत होती. धर्मविकासाच्या प्रवासात आपण पहातो की विकासाचा विचार आध्यात्मिक आणि अधिभौतिक धारेतून करण्यात आला. पैकी आध्यात्मिक विचारधारा ही व्यक्तिविकासाचा विचार करते, तर अधिभौतिक धारा वैश्विक वा विश्वकल्याणाचा विचार करते. म्हणून आपल्या असे लक्षात येईल की संस्कृती विकासातून धर्मोदय झाला आहे. नि म्हणून धर्म हे समाज परिवर्तनाचे शास्त्र मानले गेले आहे.

देशोदेशींच्या इतिहास व समाज रचनेचा अभ्यास करताना आपल्या लक्षात येते की मानवी समाज उत्तरोत्तर उन्नत होत गेला आहे. त्याचे रूप क्रमशः पुढीलप्रमाणे बदलत गेले १) प्राथमिक वा गणरूप (Primitive) २) पितृसत्ताक (Patriarchal) ३) पुरातन (Ancient) ४) सरंजामी (Feudal) ५) भांडवलदारी (Capitalist) ६) समाजवादी (Socialist) आजमितीस याच क्रमाने जोडायचे झाले, तर वैश्विक (Global) असे सांगता येईल.

यात आपणास असे दिसून येते की धर्म नसलेला समाज या जगात अस्तित्वात नाही, या वास्तवाचाही विचार व्हायला हवा. आता लक्षात असे येते की धार्मिक जीवन हा व्यवहाराचा अभिन्न भाग आहे. मग लक्षात येते की धर्म विकास ही धर्मसमीक्षेची परिणती होय.

### *संदर्भ*

१. *तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी डॉ. के. ल. दप्तरी यांना लिहिलेले पत्र (दि.१५ मार्च १९४१)*

२. *महाराष्ट्र साहित्य पत्रिका परीक्षणे - ना.गो.चाफेकर पृ. २७३ ते २८०*

*३. समाज जीवन (सप्टेंबर, ऑक्टोबर - १९४२)*
*४. वाङ्मय शोभा - वि. वि. दीक्षित (मार्च - एप्रिल १९४३)*
*५. नवभारत - फेब्रुवारी १९९६ पृ. १२६ ते १३६*
*६. तर्कतीर्थ : एक प्रज्ञाप्रवाह - डॉ. अरुंधती खंडकर, पृ. ८४*

■

*(पूर्वप्रसिद्धी - पाक्षिक मुक्तसंवाद, मुंबई, सोमवार दि. १५ मार्च, २०२१, पृ. २९ ते ३३.)*

# ११

# तर्कतीर्थकृत धर्मस्वरूपविषयक उकल

नवमानवता किंवा विश्वधर्माचा विचार अस्तित्वात येणे, ही एका अर्थाने समाज विकासाची प्रक्रिया आहे. तर दुसऱ्या बाजूने धर्मपरिवर्तन व धर्म सुधारणेचीही प्रक्रिया आहे, असे म्हणता येऊ शकेल. पारलौकिकाकडून लौकिकाकडे, मूर्तीकडून माणसाकडे, देव-दैवाकडून कर्तृत्वाकडे, (दैवायत्तं कुलेजन्म मदायत्तं तु पौरुषम्), चमत्कारातून वास्तवाकडे, आध्यात्माकडून विज्ञानाकडे, व्यक्तिकडून समुदायाकडे होणारा प्रवास अंतिमत: मानवहिताचा प्रवास असतो, हे लक्षात घेता वर्ग, वर्ण, वंश इ. विग्रहातून समाजात अंतर्कलह निर्माण होत असतात. ते टाळायचे तर धर्मनिरपेक्ष समाजास पर्याय नाही, या निष्कर्षापर्यंत आपण पोहोचतो. हे सर्व समीक्षेमुळे घडते, हे आपणास विसरून चालणार नाही.

**धर्मलक्षण व धर्मप्रमाण**

जगात हिंदू, जैन, बौद्ध, यहुदी, ख्रिश्चन, पारशी, मुसलमान, शीख इ. धर्म आहेत. या सर्व धर्मांच्या निर्मिती काळात धर्माची व्याख्या प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे करण्यात आलेली आहे. धर्मविकासाचा इतिहास पाहता, असे लक्षात येते की जगातील विविध संस्कृतींपूर्वी भारतात धर्मविकास घडून आला. जगात विश्वधर्म म्हणून ज्याची गणना केली जाते, तो बौद्ध धर्मही भारतातच उदयास आला, हे आपणास विसरून चालणार नाही. अशा सर्व धर्मांचे लक्षण म्हणजे तिची व्याख्या होय. धर्मांची सामान्य लक्षणे सर्व परिचित आहेत. अलौकिक शक्तीच्या कल्पनेवर आधारलेले व श्रेयस्कर

मानलेले मानवी आचरण म्हणजे धर्म होय (संदर्भ : हिंदू धर्माची समीक्षा - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पृ.५८ -चौथी आवृत्ती)

ही अलौकिक शक्ती ईश्वर रूपात सर्वत्र मानली आहे. तोच धर्माचा मूलाधार होय. त्यामुळे ईश्वरी, प्रेम, भय, आनंद, उपासना, शरणागती, विरह भाव वेदना, साक्षात्काराची उत्कंठा वा कामना इ. मानसिक क्रियांतून ईश्वर वा धर्मभक्त मार्गक्रमण करत असतात. जगातील अधिकांश धर्म सत्य, परोपकार, अहिंसा इ. नैतिक मूल्ये वा आचरण यांचे समर्थन करताना दिसतात.

भारतीय संदर्भात श्रृती, स्मृती, पुराण, वेद हे धर्माचे आधारग्रंथ होत. यज्ञ संस्था इथे पूर्वापार अस्तित्वात होती. यज्ञसंस्थेतून श्रुती, स्मृती जन्माला आल्या. स्मृतीतून चातुर्वर्ण्य व्यवस्था अस्तित्वात आली. धर्मात कर्मकांडांचे प्राबल्य निर्माण झाले. त्यातून शोषण, अन्याय, अंधश्रद्धा जन्माला आल्या हे आपण यापूर्वी पाहिले आहे. धर्म भ्रष्ट होण्याची जी अनेक कारणे आहेत, त्यातील हे प्रमुख आधार कारण होय. धर्म व ईश्वरसंबंधी अधिकारांचे कारण जन्म होणे यातून (जात, वर्ग, वर्ण, वंश इ.) कर्मविपाक सिद्धांत रूढ झाला. लौकिक, अलौकिक भेदातूनही ते समाजमनात दृढ होत गेले. प्रत्यक्ष वा अनुमाने सिद्ध होते, ते लौकिक. उलटपक्षी बुद्धी अनुभव प्रयोगादी निकषांच्या आधारे जे सिद्ध होत नाही, असे काल्पनिक, ते अलौकिक. हे एकदा लक्षात घेतले की, मग धर्मलक्षण समजणे सोपे होऊन जाते.

चोदना लक्षणोऽर्थोधर्म: अशी जैमिनी सूत्रमधील व्याख्या लक्षात घेता असे दिसते की उपदेश करणारा तो धर्म चोदना म्हणजे उपदेश होय. श्रेय, अश्रेय ठरते ते अलौकिक तत्त्वावर. जगातील सर्व धर्मांचा मूलाधार मानवाचे नैतिक आचरणच राहिले आहे.

व्यासरचित महाभारत मधील शांतिपर्व दुसरे- तिसरे काही नसून ती एक धर्ममीमांसा मात्र आहे. पण ती परलोक, पुनर्जन्म कर्मविपाक, देवता, ईश्वर, त्रिकाल योगी, दिव्यदर्शी ऋषी, ईश्वर अवतार कल्पना, पापपुण्य, स्वर्ग-नरक अशा अलौकिक तत्त्वावर आधारित आहे, हे विसरून चालणार नाही.

लोकमान्य टिळक, विद्वद्रत्न डॉ.के.ल. तथा भाऊजी दप्तरी, श्री. ह. कृ. मोहनी, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, कणाद प्रभृतींनी धर्मलक्षणांची चर्चा केली आहे. पैकी डॉ. के. ल. दप्तरी यांची धर्ममीमांसा बुद्धिवादावर

आधारित आहे. लोकमान्य टिळक कर्मयोगावर भर देताना दिसतात. ह. कृ. मोहनी यांचा पक्ष काय किंवा डॉ. राधाकृष्णांचा विचार काय, ते बहुतांशी सनातनी (पारंपरिक) मताचे दिसून येतात. कणाद विचार 'यतोऽयभ्युद्यनिःश्रेयससिद्धि स धर्मः' (वैशेषिक दर्शन १/१/२) अर्थात, ज्याच्या योगे अभ्युद्य व निःश्रेयस यांची प्राप्ती होते, तो धर्म होय. सदाचरण काय, दुराचरणाची कसोटी काय हा कळीचा मुद्दा आहे.

धर्मलक्षण आणि धर्मप्रमाण ही दोन्ही तत्त्वे एकमेकांवर आधारित आहेत. दोन्हींचा एकत्रित विचार केल्याशिवाय आपण धर्मासंबंधीचे अंतिम मत ठरवू शकत नाही. धर्माची व्याख्या लक्षात घेता, तिच्या प्राप्तीचे साधन काय? तर वेद, अवेस्ता, बायबल, कुराण इ धर्मग्रंथ हे त्या त्या धर्मांचे प्रमाण होत. ते पौरुषेय की अपौरुषेय ही चर्चा जुनी झाली. धर्मग्रंथ मग तो कोणताही असो तो मनुष्यनिर्मितच होय. शेती, व्यापार, कला, वैद्यक विद्या घ्या किंवा जादूटोणा, मंत्र-तंत्र घ्या, सर्व मनुष्यनिर्मितच. त्याचप्रमाणे धर्मही!

माणसाचे बौद्धिक व्यवहार अलौकिक, आध्यात्मिक इ. मानसिक व्यवहार होत. हे सर्व निश्चित करणाऱ्या दोन विचारपद्धती आहेत - १) लौकिक प्रमाणवादी २) अलौकिक प्रमाणवादी. लौकिक प्रमाणवादाचेही दोन प्रकार आहेत. १. ऐतिहासिक २. अनैतिहासिक

प्राचीन भारतीयांच्या लौकिक प्रमाणवादानुसार बुद्धीने खोटे ठरणारे शास्त्रवचन निरर्थक होय (शांतिपर्व १४२-१७-१८). महाभारतामध्ये परस्परविरोधी सिद्धांतांची रेलचेल आहे. ती लक्षात घेता असे दिसून येते की, महाभारत ही एककालीन व एक व्यक्तिनिर्मित कृती नाही. (संदर्भः हिंदू धर्माची समीक्षा - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - पृ.८१) तसेच वेदांचे ईश्वरप्रणीतत्त्व व अपौरुषेयत्व हे नंतरच्या काळात आलेले विचार होत. वैदिक धर्मीय लोकांत रूढ असलेले विधिनिषेध, यज्ञविधी व इतर कर्मकांड म्हणजे वेदांचा अर्थ होय, अशी वैदिक परंपरा कथन करणारे जे वैदिक शब्द ते निरनिराळ्या वेळी, निरनिराळ्या स्वरूपाने अस्तित्वात येत असत. परंपरेने चालत आलेले वैदिक मंत्र व विधिनिषेधाची माहिती सांगणारी वाक्ये म्हणजे ब्राह्मण ग्रंथ हा वेद होय. पण एकदा का आपण वेदांना मानव निर्मित मानले की मग सारी तत्त्वे (प्रमाण) एका अर्थाने निराधारच बनून राहतात.

**बुद्धिवादाचे निष्कर्ष**

तत्कालीन हिंदुस्थानात (म्हणजेच आजच्या भारतात) पाहू लागू तर असे दिसते, की वैदिक परंपरेइतकेच अवैदिक धर्मसंप्रदायही अस्तित्वात आहेत. याचा दुसरा अर्थ असा की, पूर्वीच्या सर्व काळात वैदिक, अवैदिक विचारधारा अस्तित्वात राहात आल्या आहेत. गेल्या हजार बाराशे वर्षांत कुमारिल भट्ट व शंकराचार्यांचे विचार हाच खरा आधार राहात आला आहे. जैन, बौद्ध धर्मांची समीक्षा करताना, वरील आचार्यांनी बुद्धिवादाचे निकर्ष वापरले आहेत. वरील दोन्ही पक्षांतील बुद्धिवाद एकत्र केला, तर धर्मसंस्थेचे अधिष्ठान असलेले अलौकिक प्रमाणच नष्ट होते.

भारतात इतिहासकाळात ज्याप्रमाणे आध्यात्मिक आणि आधिभौतिक विचारक आढळतात. तसेच आधुनिक काळातही पाश्चात्त्य जगात ते आढळतात. विल्यम जेम्स दिव्य अनुभूतीचे समर्थन करतात तर लुडविक फायरबाख आधिभौतिक विचारसरणीची तळी उचलताना दिसतात. त्यामुळे खऱ्या धर्मस्वरूपाची चर्चा करायची झाली तर अलौकिक तत्त्व वजा करून मानव्यपूजक धर्माची प्रस्थापना श्रेयस्कर ठरते.

**हिंदू धर्माचे स्वरूप**

हिंदू धर्माची समीक्षा करणारे तिचे स्वरूपच वर्णन करीत असतात. आजवर हिंदू धर्माची समीक्षा करणाऱ्यांनी हा धर्म तीन स्वरूपात विशद केला आहे : १) ऐहिकवादी २) पारमार्थिक ३) उभयवादी. ऐहिकवाद्यांच्या म्हणण्यानुसार चातुर्वर्ण्य, देशजातिकुलधर्म, आश्रम-व्यवस्था, सत्य, अहिंसा मूल्ये, नीतिधर्म, व्यवहार यांचे हिंदू धर्मात प्राबल्य असून वरील गोष्टीच या धर्माचे साध्य आहेत. पारमार्थिक हिंदू धर्माचे समर्थन करणाऱ्या पक्षाचे म्हणणे आहे की प्रपंच व परमार्थ साधणे हेच हिंदू धर्माचे साध्य व ध्येय होय. उभयवादी असे मानतात की हिंदू धर्म पूर्ण आध्यात्मिक धर्म आहे. आत्मप्राप्ती, निर्वाण, मोक्षादी उद्देशांकडे नेणारा धर्म हेच हिंदू धर्माचे खरे रूप होय.

वरीलपैकी पहिला पक्ष असमर्थनीय आहे. उर्वरित दोन पक्षच कमी जास्त प्रमाणात हिंदू धर्माचे स्वरूप ठरवत आले आहेत. पहिला पक्ष या धर्माचे समाजधारणात्मक रूप स्पष्ट करतो. वैदिक धर्म म्हणून प्रचलित असलेला हिंदू धर्म ऐहिक होय. त्या अर्थाने तो भौतिकवादी ठरतो. पण यात असलेले जादूटोणा, नवस-सायास, मंत्र-तंत्र, फलज्योतिष आदी

तत्त्वे विज्ञानशुद्ध नाहीत. वैदिक काळात जन्मलेल्या उपनिषदांनी या कल्पनात क्रांती घडवून आणली. आणि आगामी बौद्धिक प्रगतीचा मार्ग प्रशस्त केला. हिंदू धर्मात ध्येय उच्च असले तरी कर्मकांडमार्गे प्राप्तीचा आग्रह समर्थनीय ठरत नाही. पारलौकिक भ्रांती ही भोळ्या लोकांचे अपत्य होय. त्यामुळे असे दिसून येते की त्रैवार्णिक आर्यांच्या गुलामगिरीत शूद्रांना ठेवू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी हे धर्माचार (कर्मकांड) निर्माण केले.

अध्यात्मपरायणता हे जे हिंदू धर्माचे तिसरे रूप आहे. ती या धर्माची आणखी एक बाजू होय. आध्यात्मिक, पारलौकिक परिस्थितीच्या आभासाखाली वास्तविक जीवनाची दुर्गती लपलेली असते. हे आपणास दुर्लक्षून चालणार नाही. ते मृगजळ आहे, माया आहे, दास्यरहित निरामय, कलामय, ज्ञानयुक्त, वैश्विक सत्याकडे नेणारा धर्मच मानव कल्याणाचा खरा धर्म होय. दास्य, मोक्ष, स्वर्ग, नरक, पाप-पुण्य इ. भ्रांतभय हे धर्माचे स्वीकारार्ह मार्ग नसून सदाचारच खरा धर्मसंस्कार होय.

हिंदू धर्माचे सामान्य लक्षण ठरवणे कठीण आहे. कारण वैचित्र्य व विरोधाच्या गुंतागुंतीच्या अनेक गोष्टी यात आहेत. हा धर्म विविधस्तरीयतेने युक्त आहे. या धर्माच्या विकासाचा प्रवास दीर्घ आहे. या प्रवासात त्याचे स्वरूपही बदलत गेले आहे. धर्म विकासाच्या तीन अवस्था दिसून येतातः १) जादू, निसर्ग, आराधना, पितृपूजा २) मानवसदृश देवपूजा ३) एकेश्वरवाद, ब्रह्मवाद, तत्त्ववाद. पैकी पहिली स्थिती हा प्रारंभिक काळ होय. मध्य काळात दुसरे रूप दिसते. अंतिम रूपात तिसरी स्थिती लक्षात येते. निसर्ग, कर्मकांड आणि अंतिम उन्नत रूप पाहिले की, एकेश्वरवादच या धर्माचे उच्चतम लक्षण म्हणून पुढे येते. या उच्चतम रूप अवस्थेत कर्मकांड (साधन) गौण होते व साध्यास (चित्तशुद्धी) महत्त्व येते. हिंदू धर्मात हीनोच्च धर्माचा (आचरण) संग्रह आहे. हे जरी खरे असले, तरी यात शब्दप्रामाण्य नाही, असे मात्र म्हणता येणार नाही. हिंदू धर्माला आलेले संकीर्ण रूप हे पुरोहित वर्गाच्या दीर्घकालीन प्रभावाचे अपत्य होय. आपण हे लक्षात घ्यायला हवे की निरनिराळ्या उद्योगवर्गांना प्राधान्य देण्यानेच धर्म प्रगमनशील बनतो.

हिंदू धर्माच्या इतिहास उपपत्तीचा विचार करता, असे दिसून येते की, दैवी व मानवी अशा स्वरूपातून हा धर्म निर्माण झाल्याचे सांगितले गेले आहे. महाभारतात याची चर्चा आहे. ज्यू, पारशी, ख्रिश्चन, मुसलमान इ.

धर्मात दैवी उपपत्तीवर भर आहे. धर्म विकास काळात हिंदू धर्म विविध अवस्थांमधून गेलेला दिसतो. १) पृथक संघात्मकता किंवा टोळ्यांच्या स्वतंत्र रूपात (Tribal Religion) २) वेदपूर्व बहुदेववादी धर्म ३) वेदकालीन श्रौतस्मार्त धर्म ४) शैव, वैष्णव, बौद्ध, जैन इ. विश्वधर्म ५) पुराणोक्त हिंदू धर्म, वर्तमान हिंदू धर्म पुराणोक्त सदृश होय. यात अल्पांशाने वेदान्त आहे. उपनिषदातील ब्रह्मज्ञान, सांख्यदर्शनात सत्त्व, रज, तम, कल्पना, योग दृष्टी आहे. वेद, उपनिषद, स्मृती, भारत, ब्रह्मसूत्रे, पूर्वमीमांसा, सांख्यशास्त्र, योगशास्त्र, पुराण हे प्रचलित हिंदू धर्माचे प्रमाणग्रंथ होत.

श्रुती, स्मृती, पुराण इ.मध्ये विशद हिंदू धर्मात कुमारिल भट्ट आणि शंकराचार्य यांच्या विचारांच्या स्थितीचे विहंगावलोकन करता असे दिसते, की कुमारिल पूर्वमीमांसेतील सूक्ष्म चिकित्सा पद्धतीचा अवलंब करून धर्मप्रामाण्याची समीक्षा केली आहे. तर शंकराचार्यांनी त्यांच्या काळापर्यंत उपलब्ध सर्व तत्त्वज्ञाने व विचारधारांचा अभ्यास केलेला दिसतो. त्यांच्या मतानुसार ब्रह्मवाद, मायावाद चिकित्सक प्रमाणपद्धतीने सिद्ध करणे कठीण आहे. त्यांच्या गीताभाष्यनुसार संसारविरक्ती, ईश्वरशरणता, अनन्यशक्ती याच गोष्टी धर्मरहस्य (स्वरूप) म्हणून पुढे येतात. बाराव्या शतकापासून मायावाद, भक्तिवाद, जातिभेदात्मक आचरण हेच हिंदू धर्माचे स्वरूप राहिले. हा धर्म मुघल, ब्रिटिश इ. परकीय आक्रमणानंतरही सुरक्षित राहिला आहे. आधुनिक काळात ब्राह्मोसमाज, आर्यसमाज इ. चळवळीतून या धर्माच्या उन्नयनाचे प्रयत्न झाले. नंतरच्या काळात विद्वद्दरत्न के. ल. दप्तरी प्रो. पां. वा. काणे, तर्कसांख्यतीर्थ कोकजेशास्त्री, महादेवशास्त्री दिवेकर प्रभृतींनी धर्मनिर्णय मंडळाच्याद्वारे बुद्धिमूलक, तत्त्वनिष्ठ नवा हिंदू धर्म बनवण्याचा प्रयत्न केला. बुद्धिप्रामाण्याच्या कसोटीवर हिंदू धर्माची समीक्षा अलीकडच्या काळात झाली. अध्यात्मवाद आणि भौतिकवाद या दोन्हीच्या आधारे हिंदू धर्म समीक्षा व स्वरूपाचा विचार आवश्यक आहे. पण इथे त्यास पुरेसा अवसर नाही.

वर्तमानात धर्मसंस्थेपेक्षा उच्चतर अशा सामाजिक संस्था निर्माण झाल्या आहेत. पूर्वी जे कार्य धर्मसंस्था करायची ते आता राज्यसंस्था करत आहे. वर्तमानात भूतकाळापेक्षा भविष्यवेध प्रभावी ठरतो आहे. नवी ध्येये उदयास येत आहेत. मानवी मूल्ये शाश्वत खरी. पण विश्वमानव व विश्वधर्म संकल्पनेचा उदय हा एका अर्थाने धर्मनिरपेक्ष विज्ञाननिष्ठ (भौतिकवादी) समाजधारणेचा

आग्रह धरताना दिसत असल्याने पूर्वापार धर्मस्वरूप मानवी दैनंदिन जीवनात प्रभावी राहिले नाही. तरी भूतकालीन विचारांची पायरी पायाखाली घातल्याशिवाय नवविचारांचे उच्चतर स्थान गाठता येणार नाही. याचा अर्थ असा की, केवळ भौतिक संपन्नता येऊन चालणार नाही. जीवनात मानवी शाश्वत मूल्ये म्हणजेच, खरा धर्म होय.

■

*(पूर्वप्रसिद्धी- पाक्षिक मुक्तसंवाद, मुंबई, गुरुवार, दि. १ एप्रिल, २०२१, पृ. २९ ते ३३.)*

# १२

# तर्कतीर्थांची सर्वधर्मचिकित्सा : वैचारिक परिवर्तनाचे प्रतिबिंब

'हिंदू धर्मातील समीक्षा' ग्रंथातील तीन व्याख्याने सन १९४० ची. तो काळ तर्कतीर्थांच्या जीवनातील मार्क्सवादी विचार प्रभावाचा होता. त्यामुळे ती व्याख्याने धर्माची समीक्षा ही सर्व समीक्षेची सुरुवात असते, म्हणून केलेली होती. 'सर्वधर्मसमीक्षा' मधील व्याख्याने सन १९७६ ते ७९ या काळातली. दोन व्याख्यानमालांत सुमारे ४० वर्षांचे अंतर आहे. मधल्या काळात तर्कतीर्थ रॉयिस्ट झाले आणि नंतर १९५० च्या दरम्यान परत काँग्रेसवासी झाले. गांधीवादी, काँग्रेसी, मार्क्सवादी, रॉयवादी आणि पुनश्चः काँग्रेसी या स्थित्यंतराचे व वैचारिक परिवर्तनाचे प्रतिबिंब आपणास सर्वधर्मसमीक्षा मधील व्याख्यानांमध्ये पडलेले आढळते.

**समीक्षेमागील भूमिका**

हिंदू धर्माची समीक्षा ग्रंथातील व्याख्याने देण्यामागची आपली भूमिका तर्कतीर्थांनी प्रास्ताविकात स्पष्ट केली आहे. हिंदू धर्मावर टीका करणे जबाबदारीचे व जोखमीचे काम आहे, याची जाणीव व्याख्याने देताना त्यांना होती. पण, स्वतःच्या परंपरेच्या विरुद्ध बंड करणारा बुद्धिवादच स्वतःच्या राष्ट्रात व समाजात उच्चतर स्थित्यंतर घडवून आणू शकतो, (संदर्भः हिंदू धर्माची समीक्षा-तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी-प्रास्ताविक, पहिली आवृत्ती, पृ. ३) असा त्यांचा ठाम विश्वास होता. परंपरेचे लंगडे समर्थन करणाऱ्या विचारसरणीलाच भारतीय समाजात अग्रपूजेचा मान

मिळत असल्याचे शल्यही त्यांच्या मनात होते. जे जुने जग, गळ्यातील लोढणे बनून मनुष्याच्या प्रगतीस अडथळा करीत आहे, त्याचा विनाश करणारी शास्त्ररूपी शस्त्रे निर्माण करण्याचा प्रयत्न अनेक पुरोगामी तत्त्वचिंतक व कर्तृत्वशाली लोक करीत आहेत. या शास्त्ररूपी शस्त्रांनी जुन्या जगाशी लढता-लढता, जुन्या वर्तमान समाजातील मानसिक व भौतिक दास्याचा ज्यात मागमूस नाही असे, सगळ्या समाजघटकांना सारखेच स्वातंत्र्य प्राप्त करून देणारे, सर्व समाजघटकांच्या कर्तृत्वाच्या पूर्ण विकासास अवसर देणारे नवे जग घडवायचे आहे. या कर्त्या लोकांच्या सेनेत दाखल झालेला एक पायिक एवढाच प्रस्तुत वक्त्याचा दर्जा आहे. हा वक्ता ती विचारशस्त्रे घडवणारा साक्षेपी कामगार आहे (संदर्भ : हिंदू धर्माची समीक्षा-तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी-प्रास्ताविक, पहिली आवृत्ती, पृ. ३) असे म्हणत असताना तीन महात्मे त्यांच्यापुढे होते- कार्ल मार्क्स, महात्मा गांधी आणि मानवेंद्र रॉय. या कर्त्या लोकांच्या सेनेतला हा सत्याग्रही होता, हे आपणास विसरता येणार नाही.

सर्वधर्मसमीक्षातील व्याख्याने धर्मावरील टीका नसून धर्माच्या नव्या स्वरूपाची चर्चा आहे. त्यांना साहित्य, संस्कृती व विज्ञानाची जोड देण्याचा प्रयत्न आहे. ज्ञानोदय युगातील धर्म स्पष्ट करण्याची तर्कतीर्थांची भूमिका धर्माविषयक त्यांच्या पुरोगामी दृष्टिकोनाचा पुरावा म्हणून पाहता येतात. अन्यथा, त्यांनी धर्म संकल्पनेची चर्चा समाजशास्त्र आणि मानसशास्त्राच्या परिप्रेक्ष्यात केली नसती. मानसशास्त्रातील आधुनिक संप्रदायांची (विचारप्रवाह) त्यांना चांगली जाण होती, हे सप्टेंबर १९४२ च्या भिषग्विलासमध्ये प्रकाशित भाषणातूनही स्पष्ट होते. समाजशास्त्रीय साहित्यावरील त्यांच्या व्याख्यानातून (संदर्भः सामाजिक शास्त्रीय वाङ्मय-तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रदक्षिणा संपा. कॉंटिनेंटल प्रकाशन पुणे, १९४१ पृ. ६३) त्या शास्त्राचाही तर्कतीर्थांचा व्यासंग स्पष्ट होतो. माणसाच्या सहजप्रवृत्तीचे पूर्णत्वाकडे असलेले आकर्षण म्हणजे धार्मिक प्रेरणा होय. धर्म म्हणजे पूर्ण समाधानाचा मार्ग (धर्माचे मानसशास्त्र व समाजशास्त्र, नवभारत, जून १९७९ पृ. ३५) हे तर्कतीर्थांचे विवेचन सनातन (प्राचीन) धर्मस्वरूपापेक्षा वेगळे आणि कालसंगत असे पुरोगामी विचार होत.

**धर्माच्या विविध व्याख्या, उपपत्ती व विविध आविष्कार**

या मालिकेतील पहिल्या व्याख्यानात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी धर्माच्या उगम, व्याख्या, उपपत्ती, त्याची विविध रूपे (विभिन्न धर्म)

इत्यादीबद्दल समग्र परंतु साक्षेपी विवेचन केले आहे. मनुष्य जेव्हा आपल्या प्रारंभिक अवस्थेत (आदिमानव स्थितीत) होता, तेव्हा त्याच्या जीवनात येणाऱ्या विविध संकटांनी तो अचंबित व भयग्रस्त होत असायचा. अशावेळी संकटमोचनार्थ तो संकटनिर्माता अलौकिक शक्तींची करुणा भाकायचा. संकटे ही अलौकिक शक्ती निर्माण करते अशी त्याची धारणा होती. या असहाय्य भावस्थितीतून देव, धर्म यांसारख्या कल्पनांचा उगम झाला. चिनी, हिंदू, बौद्ध, जैन, यहुदी, ख्रिस्ती, मुस्लीम यांसारख्या सर्वधर्म निर्मितीची पार्श्वभूमी समान आहे. आज जगातील प्राचीन धर्म स्थापन झाल्यापासूनच्या चार-साडेचार हजार वर्षांच्या इतिहासात विज्ञान समृद्ध होऊनही मानवी मन आणि समाजावर धर्म, धर्मग्रंथ, रूढी, परंपरा, मठ, धर्मपीठे, धार्मिक तत्त्वज्ञान यांचा प्रभाव टिकून असल्याने धर्माचा विचार आवश्यक ठरतो.

धर्मसंकल्पनेचा संबंध पारलौकिक तत्त्वांशी आहे. त्यात अनिश्चितता असते. भवति न भवति, आहे की नाही, याबाबत उलटसुलट चर्चा होत आल्या आहेत. ईश्वर, स्वर्ग-नरक, प्रार्थना, स्त्रोत, मंत्र, इ. स्वरूपांची तत्त्वे बुद्धिवादाचा प्रसार होऊनही ठाण मांडून आहेत. आत्म्याचे अलौकिकत्व, देव-देवादिकांचे अमरत्व, परलोक, पुनर्जन्म इ. संकल्पनांचा जनमानसावर असलेला प्रभाव अंधश्रद्धेतून निर्माण झालेला आहे, हे आज आपण विज्ञान व बुद्धिप्रामाण्याच्या आधारे म्हणतो, तेव्हा त्याच्या (धर्म) अभ्यासाच्या पद्धती समजून घेणे आवश्यक होते. धर्माभ्यासाच्या प्रचलित अशा पद्धती आहेत : १) धर्मस्वरूप समजून घेणे. २) धर्म तत्त्वज्ञान जाणून घेणे. ३) विविध ज्ञान-विज्ञानांच्या संदर्भात धर्माची चिकित्सा करणे. ४) धर्म आणि विज्ञानाची तुलना करून निष्कर्षापर्यंत पोहोचणे.

धर्ममीमांसा सुरू झाल्यापासून वेळोवेळी अनेकांनी धर्माची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. जैमिनी ऋषींनी पूर्वमीमांसेत केलेली व्याख्या सर्वधर्मांना लागू पडणारी आहे-

**चोदनालक्षणार्थोधर्मः**

चोदना म्हणजे आज्ञा. आज्ञेने सांगितलेले इष्ट साधक कर्तव्य म्हणजे धर्म होय.

महर्षी कणाद यांनी आपल्या वैशेषिक दर्शनात धर्माची व्याख्या करताना म्हटले आहे की-

**यतोऽभ्युदयनिश्रेयससिद्धीःसधर्मः'**

ज्याच्यापासून अभ्युदय (उत्कर्ष) आणि निश्रेयस (मोक्ष) यांची प्राप्ती होते, तो धर्म.

हे जरी खरे असले तरीही, सर्व धर्मांना लागू पडेल, अशी एकच व्याख्या करणे कठीण आहे. कारण प्रत्येक धर्माचे स्वरूप भिन्न आहे. ऋषिमुनी, सिद्धयोगी, बुद्ध, मोझेस, ख्रिस्त, लाओ त्से, मुहंमद, जरथुस्त्र इ. सर्वांनी सांगितलेले धर्म वैयक्तिक असल्याने त्यांचे स्वरूप वेगवेगळे आहे. या सर्व संस्थापकांनी स्थापलेल्या हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, इस्लाम, यहुदी, पारशी इ. विविध धर्मांनी जेम्स मार्टिनी, हर्बर्ट स्पेन्सर, फ्रेझर ब्रॅडली, मॅथ्यू ऑर्नाल्ड, मक्टेगार्ड, सी.पी. टील, एडवर्ड केनर्ड, व्हर्गिलूअस फर प्रभृती मान्यवरांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केल्याचे धर्म इतिहासात आढळते. त्या सर्व व्याख्यांमधून जी धर्मलक्षणे दिसून येतात, ती पुढीलप्रमाणे होत; १) देवावर विश्वास २) लौकिक-अलौकिक भेद ३) पाप-पुण्य कल्पना ४) धर्मनियमांचे विवरण ५) कर्मकांड विवेचन (पूजा-अर्चा, प्रार्थना, भक्तिमार्ग, प्रायश्चित्त इ.) ६) ईश्वराचे श्रेष्ठत्व ७) आत्मा-परमात्मा अथवा जीवसृष्टी संबंध ८) संघभावना, पंथ, संप्रदाय इ...

धर्मस्वरूप आणि धर्मलक्षणे विचारात घेता, त्या अनुषंगिक क्रिया-कर्माचा मानवी जीवनाच्या अनेक घटना प्रसंगांशी कार्यकारण संबंध लक्षात येतो. उदा. अमुक एक गोष्ट केल्यास अमूक फलप्राप्ती वा परिणाम होईल. म्हणून धर्मानुनयी जीवनरक्षण, आयुष्यवृद्धी, रोगनिवारण, मृत्युनिवारण, समृद्धी, संततीप्राप्ती, रक्षण, पापविमोचन इत्यादींसाठी विविध कर्मकांडे करतात. ते मंडप, मंदिर, मशीद, चर्च, सिनेगॉग, कबरी, समाधी इ. ठिकाणी पुरोहित, पाद्री, मौलवी इत्यादींमार्फत वरील कर्मकांडे करतात. हे सर्व विधी उपासना, प्रायश्चित्ते इ. संस्कार रूपातही केली जातात. गर्भाधान, जन्म, यौवनारंभ, विवाह, मृत्यू, सण-समारंभ, ऋतुसंधी इ. सारखे संस्कार सर्व धर्मांत कमी-अधिक प्रमाणात आणि भिन्न स्वरूपात आढळतात. या अशा धर्मस्वरूपाधारे धर्मांचे वर्गीकरण तीन प्रकारांत करण्यात येते. १) विधिप्रधान (सॅक्रॅमेंटल) २) प्रकटनप्रधान (प्रॉफेटिक) ३) साक्षात्कारप्रधान (मिस्टिकल). या सर्व बाबींचा साकल्याने विचार करता लक्षात येते की, सदाचार हाच खरा धर्म होय.

## धार्मिक तत्त्वज्ञाने व मोक्षमार्ग

विश्वरचनाशास्त्र, देवविज्ञान, परलोकगती-विज्ञान यांचा विचार करणे म्हणजे धार्मिक तत्त्वज्ञान होय. विश्वाची उत्पत्ती, स्थिती व लय, देवासुरादी अलौकिक किंवा दिव्यशक्ती व त्यांचे स्वरूप, त्यांचा विश्वाशी असलेला संबंध, विश्वात मनुष्याचे किंवा जिवात्म्याचे स्थान आणि त्यांचे भवितव्य, आणि त्यानुसार विहित व निषिद्ध आचरणाचे स्वरूप (कर्तव्याकर्तव्य) यांची प्रामुख्याने मीमांसा धर्मतत्त्वज्ञानात केली जाते. चिनी, हिंदू, पारशी, बौद्ध, जैन, यहुदी, ख्रिश्चन, इस्लाम इ. धर्मांपैकी यहुदी, ख्रिश्चन व इस्लाम धर्माचे विश्वरचनाशास्त्र वा संकल्पना बहुतांशी समान आहेत. ही निरीक्षणे नोंदवून या दुसऱ्या व्याख्यानात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी धर्मातील मोक्ष संकल्पना व त्याच्या प्राप्तीचे उपाय इत्यादींबद्दल ऊहापोह केला आहे. हिंदू, बौद्ध व जैन धर्मांचे विश्वरचनाशास्त्र वेगवेगळे आहे. इतकेच नव्हे, तर हिंदू धर्मतत्त्वज्ञानात विश्वरचनेसंबंधी अनेक उपपत्ती आढळतात. हे तिन्ही धर्म जीवात्मे अमर असतात या विचारावर एकमत व्यक्त करताना दिसतात.

प्रथम धर्म अस्तित्वात येतात. मागाहून त्यांची चिकित्सा, समीक्षा, मीमांसा सुरू होते. धर्माचार्यांद्वारा धर्मग्रंथांच्या तात्पर्य निर्णयांची पद्धती ठरवली जाते. या पद्धतीस मीमांसा म्हणतात. तत्त्वज्ञानात संपूर्ण विश्वाच्या ज्ञानाबद्दल विचार केला जातो. तद्वतच विशिष्ट वास्तव ज्ञानाबाबत भारतीयांचा तीन धर्म तत्त्वज्ञाने (दर्शने) आहेत. १) वेदान्त २) शैव ३) वैष्णव. बौद्ध आणि जैन धर्म ग्रंथांपेक्षा गौतम बुद्ध आणि भगवान महावीर यांच्या वचनांवर आधारित आहे. यहुदी, ख्रिश्चन व इस्लाम धर्मांचे तत्त्वज्ञान त्यांचे धर्मग्रंथ (अनुक्रमे-तनाख, बायबल, कुराण) यांवर आधारलेली आहेत. धार्मिक तत्त्वज्ञाने मानवाचे अंतिम हित व मोक्षसिद्धी सांगतात.

धर्ममीमांसेत हित-अहित, पाप-पुण्य, विधिनिषेध यावर जसा विचार होतो, तसाच तो आत्मा-परमात्मा, जीवसृष्टी संबंधांवरही मोक्ष कल्पना धर्मानुयायांसाठीचे परमलक्ष्य समजले जाते. हिंदू धर्मात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष याद्वारे जीवन विकासक्रमच ठरवून दिल्यासारखा असतो. या सर्व प्राप्तीचा मार्ग म्हणजे भक्ती व विविध कर्मकांडे. धर्ममीमांसेत धर्माच्या साध्य, साधनांची चर्चा-चिकित्सा होते. जीवनमूल्ये धर्मांत सांगितलेली असतात, ती प्रामुख्याने सदाचार प्रतिपादन करणारी असतात. व्यक्ती व समाज संबंध चर्चा हा धर्ममीमांसेचा अविभाज्य भाग असतो.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या या व्याख्यानात धर्म संबंधी काही अनुत्तरित प्रश्नांची चर्चा केली आहे. त्यांच्या मतानुसार, पौर्वात्य आणि पाश्चिमात्य धर्मात फरक आहे. तो प्रामुख्याने एकेश्वरवाद, अवतारवाद आणि बहुदेववाद या धर्मतत्त्वज्ञानावर आधारित आहे. धर्मज्ञान प्राप्तीचे अनेक मार्ग सांगितले गेले आहेत. जसे की, कर्म, योग, नैतिक आचरण, भक्ती, ज्ञान हे ईश्वर प्राप्तीचे उपायही आहेत नि मोक्षाचेही उपाय आहेत. हिंदू धर्मांत द्वैताद्वैतवाद, अद्वैतवाद, चिद्विलासवाद, विशिष्टद्वैतवाद, द्वैतवाद इ. सारखी तत्त्वज्ञाने वा विचारधारा या मोक्षमार्ग, आत्मा-परमात्मा संबंध यांच्या वैविध्यांवर आधारित आहेत. परधर्मसहिष्णुता ही भारतीय धर्माची व्यवच्छेदक ओळख होय. अन्य धर्मांप्रमाणे ते विधर्मांबद्दल नरक, निषेधाच्या गोष्टी करीत नाहीत, हेही तर्कतीर्थांनी धर्मतुलनेत स्पष्ट केले आहे. या व्याख्यानांतून सर्व धर्मांच्या स्वरूपाचा व भक्तिमार्गाचा, मोक्षउपायांचा बोध होतो.

**धर्माचे मानसशास्त्र व समाजशास्त्र**

प्रचलित धर्माविरुद्ध बंडाचा झेंडा उभारण्याचे कार्य अठराव्या शतकात जीन जॅक्स रुसोने केले. रुसोपासून प्रेरणा घेऊन फ्रेंच राज्यक्रांती काळात डेव्हिड ह्यूम व इम्यॅन्युएल कांट यांनी केले. प्रबोधन युगामुळे (renaissance) हे शक्य झाले. पुढे या बदलाची परिणती ज्ञानयुगात झाली. या प्रबोधन युगाच्या विचारानुसार सर्वधर्म प्रकटित म्हणजेच, नैसर्गिक होत. परंतु स्पिनोझाने प्रकटित धर्म वा नैसर्गिक धर्म असे काही नसून चमत्कार मानणे म्हणजे, ईश्वरीय संकल्पनेचा विपर्यास करणे होय, असा विचार व्यक्त केला. मानवी मनातील भीती वा भयभाव हेच धर्माचे मूळ उगमस्थान असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

माणसाच्या मनात भविष्याची ओढ असते, तद्वतच प्रगतीची आकांक्षापण असते. अपेक्षाभंगाच्या मनःस्थितीत माणूस धर्म, ईश्वर, दैव इ. गोष्टींकडे आकर्षित होतो. मग मनःशांती प्राप्तीसाठी तो यातुधर्म विद्या, कर्मकांड, नवस, जपजाप्य, उपासतापास, बळी, भानामती इ. अघोरी मार्गांचा अवलंब करू लागतो. यातून धर्मात कर्मकांडाचे प्राबल्य वाढून शोषणाचा अतिरेक होतो.

धर्मातीत अतिरेकाची प्रतिक्रिया उमटणे समाजशास्त्राच्या दृष्टीने पाहता स्वाभाविक असते. फ्रेंच तत्त्वज्ञ बेर्गसाँने जीवविज्ञानाच्या आधारे धर्ममीमांसा केली आहे. त्याच्या मतानुसार, जीवनार्थ संघर्ष हा मनुष्याचा स्वभावधर्म होय. स्वसंरक्षणार्थ प्रयत्न याच वृत्तीतून होतात. माणसामध्ये स्व-पररक्षण वृत्ती असते. ती अर्धजाणीव वृत्ती (Subconscious) सुप्त मनात घर करून

असते. ती त्यास आत्मोत्सर्जक वा आत्मयज्ञास भाग पाडते. यातून मानवी समाजात वर्तन-परिवर्तन घडून आले. त्यातून बंद (पारंपरिक) आणि खुल्या (उदारमतवादी) समाजाची निर्मिती झाली. निसर्गापलीकडे उडी मारणे, प्रगती साधणे, या मानवाच्या सहजप्रेरणा होत. त्यासाठी मनुष्य माना, ताबू यासारख्या मार्गांचा अवलंब करतो. इष्टसिद्धिकरता आणि अनुष्ट, दुष्ट निवारणार्थ मनुष्य जे जे करतो त्याचे अनुकरण पुढची पिढी करत राहते. तेच कर्मकांड होय. रीती, रूढी समानतेतून जमात, जमात नीती, जमात धर्म तयार होतो. यातून बंद समाज, बंद निती, बंद धर्म अस्तित्वात येतो व तो अनुल्लंघनीय ठरतो.

पुढे जमात, धर्म इ. मध्ये अस्मिता, अस्तित्व विचार बळावतो. त्याला प्रतिवाद करण्यासाठी विवेकबुद्धी प्रेरणा देते. ती इष्ट, अनिष्टाचा निर्णय करू लागते. त्यातून विवेकबुद्धीचा उदारमतवादी समाज उदयास येतो. प्रख्यात मानसशास्त्र कार्ल युंग यांनी विश्वमनाची (universal Consciousness) जी कल्पना केली आहे. त्याची बीजे उपनिषदात असल्याचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या व्याख्यानात सप्रमाण मांडतात. हा विचार मूलतः मानसिक व भौतिक (mind and matter) असा असून त्याची विविध अंगाने चर्चा भौतिकशास्त्र, मानसशास्त्र व त्यांच्या संलग्न विज्ञानांमध्ये झालेली दिसून येते. मानवी मन वैश्विक अंगाने सामुदायिक मनच होय. असंज्ञ मन (Unconscious Mind) विश्वोत्पत्तीनंतरच्या सर्व घटकांच्या वारशाच्या रूपात माणसास मिळालेली देणगी वा वरदान होय. मानवी मनाचा गाभारा अज्ञात आहे. अवकाशाप्रमाणेच मनाचाही पूर्ण शोध मानवास अद्याप घेता आलेला नाही. मन ही जिवंत व्यक्तीची अंतःप्रवाही बाजू आहे. माणसाच्या या मनावर व्यक्तिजीवन, समाजजीवन तसेच विश्वव्यापार (घडामोडी) यांचे संस्कार अटळपणे होत राहतात. युंग आणि सिग्मंड फ्रॉईड या उभय मानसशास्त्रज्ञांनी मनाचा शोध आपापल्या परीने घेतला आहे. युंग आस्तिक तर फ्रॉइड नास्तिक होय. दोघांनी धर्मोत्पत्तीसंदर्भातील आपली मते मांडली आहेत. फ्रॉईडने भ्रमाचे भवितव्य (The Future of an Illusion) या सन १९२७ च्या निबंधात विकसित संस्कृतीसंदर्भाने (civilization) विचार व्यक्त केले आहेत. त्यानुसार जोपर्यंत सामाजिक निर्बंध माणसाने स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला धरून पाळण्याची गरज आहे, तोपर्यंत त्या सदसद्विवेकबुद्धीला म्हणजे, पराहंकाराला धर्माची

गरज आहेच. (संदर्भः धर्माचे मानसशास्त्र व समाजशास्त्र-तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नवभारत, जून १९७९, पृ. ३४)

मात्र या मताशी फ्रॉईडचा सहकारी युंग आपली असहमती दर्शवतो. त्याच्या मतानुसार, स्वस्थ निरोगी मन हे ज्याप्रमाणे काव्य व कलांची कल्पनाशक्तीने निर्मिती करते, त्याप्रमाणे धर्माचीही निर्मिती करते.

मानवी मनास बहिःप्रक्षेपणाची (व्यक्त होणे, कृती करणे) गरज असते. यातून विकृती जन्मते. कर्मकांड त्याचे रूप होय. जगातील सर्व धर्म प्राथमिक व उच्च हे सर्व सार्वत्रिक पीडित मनाच्या विकृतीवर आधारलेले आहेत. युंगच्या मतानुसार दडपलेल्या वासनांचे कर्मकांडात प्रतिक्षेपण होऊन त्यांना समाधान मिळते. असा अनुभव येणाऱ्या व्यक्ती धर्मानुरागी राहतात. उलटपक्षी आदिमानवापासून आजच्या मानवापर्यंत पोहोचलेल्या व्यापक, अबोध आत्म्याची स्वच्छ आणि उत्कट प्रेरणा असलेल्या व्यक्ती धर्मसंस्थांच्या बाहेर पडतात. ही प्रक्रिया म्हणजे, व्यक्तिभवन (Individuation) होय, असे युंगचे प्रतिपादन आहे. यातून व्यक्ती स्वायत्त, बुद्धिप्रमाण स्वतंत्र विचारांची बनते.

मानव म्हणजे प्रेरणा व भावनांचा समुच्चय होय. भयभाव, मातृप्रेरणा, आदरभावना, नम्रताभाव इ. भव्य भाव होत. त्याचा विषय म्हणजे व्यापक, खोल, अजिंक्य, अबोध आत्मा होय. हा भाव व्यक्तिनिहाय भिन्न असतो. उच्चभावधारक व्यक्ती उच्चतम धार्मिक भावनेने भारलेली असते. तिला पूर्णतेचे आकर्षण असते. माणसाच्या सहजप्रवृत्तींचे पूर्णतेकडे असलेले आकर्षण म्हणजे धार्मिक प्रेरणा होय. धर्म म्हणजे, पूर्ण समाधान देणारा मार्ग होय, असे उच्च धर्माची शास्त्रे सांगतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या व्याख्यानत्रयीतून धर्माची मानसशास्त्र, समाजशास्त्र, जीवशास्त्र इ. संदर्भात मीमांसा करत धर्माचे बदलते स्वरूप व संकल्पनांचा पट मांडला आहे. त्यास तर्कशास्त्र, तत्त्वज्ञानाची जोड दिली असल्याने धर्मविषयक हे आकलन पारंपरिक न राहता, धर्माचे आधुनिक स्वरूप विशद करते नि म्हणून ते मौलिक चिंतन बनून विचारास भाग पाडते.

■

*(पूर्वप्रसिद्धी- पाक्षिक मुक्तसंवाद, मुबंई, गुरुवार, दि. १५ एप्रिल, २०२१, पृ. १५ ते २०.)*

# भाग - ३

# तर्कतीर्थकृत मराठी विश्वकोश

## १३

# तर्कतीर्थांचे मराठी विश्वकोशातील योगदान

### - प्रा. डॉ. राजा दीक्षित

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट आणि यशवंतराव चव्हाण अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमालेत 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मराठी विश्वकोशाला योगदान' या विषयावर आपण माझं व्याख्यान आयोजित केलंत (आणि त्याचे लेखात रूपांतर करायला सांगितलंत), याचा मला फार आनंद वाटतो. किंबहुना, या व्याख्यानमालेत ज्या उत्तमोत्तम अभ्यासकांची व्याख्याने आपण आयोजित केली आहेत, त्यांच्यामध्ये मलाही स्थान देणे हा एक प्रकारे माझा गौरव आहे असे मी मानतो आणि त्याचा विनम्रपणे स्वीकार करतो.

खरं सांगायचं तर मला दिलेल्या विषयावर मला दुहेरी नात्याने बोलायचं आहे. त्यातील एक म्हणजे अर्थातच आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाचा एक छोटा अभ्यासक या माझ्या नेहमीच्या नात्याने मला बोलायचे आहे. परंतु दुसरी जरा जास्त जबाबदारीची गोष्ट अशी की, मराठी विश्वकोशाचे संस्थापक अध्यक्ष आणि प्रमुख संपादक यांच्याविषयी मराठी विश्वकोशाचा विद्यमान अध्यक्ष आणि प्रमुख संपादक या नात्यानेही मला बोलावे लागणार आहे. तेव्हा या दुहेरी नात्याने बोलण्याचा मी प्रयत्न करतो. एक गोष्ट सुरुवातीलाच स्पष्ट केली पाहिजे की, विश्वकोशाच्या कामाच्या अवघ्या

काही महिन्यांच्या अनुभवामुळे, आज ज्या विषयावर बोलायचं आहे त्या विषयामध्ये मी आत्ताशी कुठे शिरलोय, असं मला वाटतंय. अजूनही अधिक खोलात जाण्याची आवश्यकता आहे, याची मला जाणीव आहे. पण घ्या. या मर्यादितच मांडणी करणे भाग आहे. कृपया ती आपण गोड मानून घ्या डॉ. सुनीलकुमार लवटे आणि प्रा. प्रकाश पवार या सन्मित्रांच्या आग्रहापोटी या विषयाला हात घालण्याचे धाडस करतोय. कवी विंदा करंदीकर असं म्हणत असत की, कविसंमेलन ही कवींची प्रयोगशाळा असते. त्याच धर्तीवर असंही म्हणता येऊ शकतं की, कोणतीही व्याख्यानमाला ही वक्त्यांची एक प्रयोगशाळा असते. एकदा या प्रयोगशाळेत हा विषय तावूनसुलाखून निघाला की, त्याची मांडणी पुढे अधिक चांगल्या रीतीने करू शकेन.

तर्कतीर्थ विश्वकोशाचे संपादक होते आणि आम्हीही संपादक आहोत, याचा अर्थ असा होत नाही की, आम्ही त्या कोटीतले आहोत! तर्कतीर्थ हे इतके थोर असे प्रकांड पंडित होते की, त्या खुर्चीवर नुसतं बसायचं म्हटलं तरी त्यातून एक मोठी जबाबदारीची भावना आमच्या मनात निर्माण होते. तर्कतीर्थ काय किंवा दुसरे संपादक प्रा. मे. पुं. रेगे काय किंवा तिसरे संपादक प्रा. रा. ग. जाधव काय, या पहिल्या तीन आदरणीय विद्वान संपादकांची नावं लक्षात घेता अत्यंत संकोचाने आणि विनम्रपणे ते पद मी स्वीकारलेले आहे. ती परंपरा मनात ठेवूनच मी माझे विश्वकोशविषयक काम करणार आहे आणि येथे तर्कतीर्थांच्या योगदानाची चर्चा करणार आहे.

ज्ञानकोशकर्त्यांचं समाजात एक महत्त्वाचं स्थान असतं. त्यांचं एक ऐतिहासिक आणि सामाजिक महत्त्व असतं. त्याबाबतची ही परंपरा मुख्यतः अठराव्या शतकापर्यंत जाऊन पोहोचते. फ्रेंच एन्सायक्लोपीडिया किंवा एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका हे साधारणतः अठराव्या शतकाच्या मध्याला तयार होत होते. देनिस डिडेरॉं, डी अलेंबर्ट असे फ्रेंच 'एन्सायक्लोपीडिस्ट' म्हणून जे ओळखले जातात, त्यांचा फ्रेंच राज्यक्रांतीची पार्श्वभूमी तयार करण्यात महत्त्वाचा वाटा होता, इतकं त्यांचं महत्त्व मोठं होतं. जो ज्ञानकोशकर्ता आहे, विश्वकोशकर्ता आहे, त्याचा संपादक आहे, तो मूलतः एक विचारवंत असतो आणि समाजावर प्रभाव पाडणारा असा विचारवंत असतो. हे मुळात आपण लक्षात घेतलं तर तर्कतीर्थांचं स्थान हे आधुनिक महाराष्ट्राच्या संदर्भात किती महत्त्वाचं आहे, ते आपल्याला समजू शकेल. मानवेंद्रनाथ रॉय यांनी 'भारतीय प्रबोधनाचे सर्वोत्कृष्ट प्रतिनिधी' असं जे

तर्कतीर्थांचं वर्णन केलेलं होतं, तेवढा उल्लेख केला तरी तो पुरेसा आहे. त्यामुळे त्यांचं विश्वकोशकर्ते म्हणून असणारं स्थान अनन्यसाधारण आहे, हे आपल्या लक्षात येऊ शकतं.

शास्त्रीजींच्या विश्वकोशविषयक योगदानामध्ये शिरण्यापूर्वी त्यांच्या जडणघडणीचा थोडा विचार केला पाहिजे. अर्थात, माझे काम एका दृष्टीने सोपे झालेले आहे. या व्याख्यानमालेमध्ये जी विविध व्याख्याने होत आहेत (म्हणजेच या पुस्तकात त्यांवर आधारित जे लेख प्रकाशित होत आहेत.) त्यामुळे तर्कतीर्थांविषयीचे चरित्रात्मक तपशील, त्यांची एकंदर महती यांविषयाचे तपशील खूप खोलात जाऊन सांगण्याची आवश्यकता मला नाही.[३] परंतु माझ्या विषयापुरतं जोडून घेण्यासाठी तर्कतीर्थांच्या वैचारिक आणि ज्ञानात्मक जडणघडणीच्या अनुषंगाने काही छोटे उल्लेख मी आधी करू इच्छितो.

धुळे जिल्ह्यातल्या पिंपळनेरमध्ये तर्कतीर्थ जन्मले (२७ जानेवारी १९०१). मराठी तिसरीपर्यंतचे त्यांचे शिक्षण गावच्या शाळेत, तर याज्ञिकीचे शिक्षण वडिलांकडेच झाले. ते १४ व्या वर्षी वाईला आले आणि प्राज्ञपाठशाळेच्या शैक्षणिक आणि वैचारिक परंपरेचा भाग बनले. तेथून पुढच्या काळात त्यांच्यावर जे वेगवेगळे प्रभाव पडले, त्याचे प्रामुख्याने आपल्याला पाच टप्पे सांगता येतील.[४] त्यातला पहिला प्रभाव हा मुख्यतः 'केसरी'चा प्रभाव होता. त्यांच्या घरात आणि गावात आवर्जून केसरी वाचला जात असे. तो स्वातंत्र्य चळवळीचा काळ होता आणि चिपळूणकर, टिळक, केसरी यांच्या प्रभावाचा असा तो पहिला टप्पा आहे, जो टप्पा ते जेव्हा वाईला प्राज्ञपाठशाळेमध्ये आले तेथेसुद्धा दिसून येतो. परंतु प्राज्ञपाठशाळेमध्ये त्या जोडीला त्यांचा जो ज्ञानात्मक विकास होत गेला, त्यामुळे पाश्चात्त्य भौतिकशास्त्रांची ओळख त्यांना झाली. त्याचबरोबर आगरकरांसारख्या सुधारकाचा प्रभाव त्यांच्यावर पडला. आगरकर, त्याचप्रमाणे मिल, स्पेन्सर यांचा एकंदरच पाश्चात्त्य तत्त्वज्ञान यांच्या प्रभावाचा आणि प्राज्ञपाठशाळेच्या संस्काराचा असा तो दुसरा टप्पा होता. या टप्प्यामध्ये स्वामी केवलानंद सरस्वती[५] यांचा व त्यांनी १९१६ मध्ये स्थापन केलेल्या प्राज्ञपाठशाळेचा विशेष प्रभाव त्यांच्यावर पडला. प्राज्ञपाठशाळा हे केवळ पारंपरिक विद्येच्या जतनाचे नव्हे, तर भारतीय-हिंदू समाजाच्या पुनरुत्थानाचे साधन होते. स्वाभाविकपणे पारंपरिक धर्मग्रंथांचा अभ्यास केला. तरीसुद्धा तो एका ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातून करण्याची दृष्टीही तर्कतीर्थांच्यात तेव्हा

विकसित झाली. पारंपरिक धर्मग्रंथांचा अभ्यास करताकरता आधुनिक, पुरोगामी, सुधारणावादी अशा विचाराला पूरक मांडणी त्यातूनच ते करू लागले. हा निश्चितच एक अर्थपूर्ण टप्पा होता. त्याच्यानंतर शास्त्रीजींवर गांधीजींचा मोठा प्रभाव पडला. वैचारिक संदर्भात तो त्यांच्या आयुष्यातला आणखी एक महत्त्वाचा टप्पा होता. या प्रभावामुळे त्यांनी स्वातंत्र्य चळवळीतसुद्धा सहभाग घेतला आणि दोनदा (१९३० आणि १९३२ साली) सहा-सहा महिन्यांचा कारावासही भोगला. गांधीजींनी नैतिक निकषांवर हिंदू परंपरेची चिकित्सा केली. तिचा ठसा तर्कतीर्थांच्या मनावर उमटला. प्रा. मे. पुं. रेगे यांनी म्हटल्याप्रमाणे, शास्त्रीजी गांधीजींच्या प्रभावाखाली आले आणि त्यांची परंपरेच्या आंतरिक जोखडापासून मुक्तता झाली.[६] त्यानंतरचा टप्पा मार्क्सवादी प्रभावाचा आहे. कुंठित समाजापुढचे अंतिम विमोचक तत्त्वज्ञान या स्वरूपात ते मार्क्सवादाकडे पाहत होते. त्यातील समतावादी, मुक्तिदायी आणि विवेकवादी आशय त्यांना प्रभावित करत होता. त्यामुळे हिंदू परंपरेच्या बाहेर पडून तिचे तटस्थ मूल्यमापन ते करू लागले. यानंतरचा टप्पा हा एम. एन. रॉय यांच्या रॅडिकल ह्युमॅनिझमच्या तथा नवमानवतावादाच्या प्रभावाचा टप्पा आहे. मार्क्सवादाच्या मर्यादांवर बोट ठेवून त्याला अधिक उदार, लोकशाहीवादी, मानवतावादी आशय देण्याचा प्रयत्न या तत्त्वज्ञानाद्वारे केला गेला. तर्कतीर्थांच्या या वैचारिक उत्क्रांतीमधून त्यांचं जे प्रगल्भ व्यक्तिमत्त्व साकारलं, ते पुढे त्यांच्या एन्सायक्लोपीडिस्ट बनण्याला पूरक ठरलं. कारण असं बुद्धिप्रामाण्यवादी आणि चौफेर विद्वत्ता असलेले व्यक्तिमत्त्व हे कुठल्याही कोशाच्या संपादनासाठी आणि नेतृत्वासाठी अतिशय आदर्श नेतृत्व होतं. म्हणूनच ही सर्व पार्श्वभूमी आधी नमूद केली. 'आधुनिक महाराष्ट्राचे बुद्धिवादी वेदान्ती अशा समर्पक शब्दांत द्वा. भ. कर्णिक यांनी त्यांचे वर्णन केलेले आहे.[७] एकीकडे भारतीय वैचारिक परंपरेचे खोल संस्कार त्यांच्या मनात रुजलेले होते आणि दुसरीकडे पाश्चात्त्य परंपरेचे आधुनिकतेचे संस्कारही त्यांच्यावर झाले होते. या दोन्हींच्या अपूर्व संगमातून एक वैश्विक दृष्टी तर्कतीर्थांमध्ये तयार झालेली होती.

येथे प्रा. रा. ग. जाधव यांच्या 'शास्त्रीजी' या ग्रंथातील दोन उद्धृते देणे समर्पक ठरेल. कारण त्याचा संबंध त्यांच्या विश्वकोशकार्याशी आणि तद्संबंधीच्या योगदानाशी आहे. 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथात शास्त्रीजींनी असं म्हटलेलं होतं की, कोणत्याही राष्ट्रीय संस्कृतीचे अधिष्ठान असलेली शक्ती एकच असते. वस्तुतः विश्वसंस्कृतीच राष्ट्रीय संस्कृतीच्या

रूपाने प्रकट होत असते. होमरचे काव्य, एस्किलसची नाटके, सॉक्रेटिसाचे संवाद, व्हीनस आणि अपोलो यांच्या ग्रीक कलाकारांनी तयार केलेल्या रम्य मूर्ती आणि युक्लिडची भूमिती यांचे जगातील भिन्न युगातील माणसांना महत्त्व वाटते. याचे कारण ग्रीक राष्ट्रीय संस्कृती विश्वसंस्कृतीचाच एक विशिष्ट आविष्कार होय. नलदमयंतीचे अत्यंत प्राचीन आख्यान जगातील वाङ्मयात प्रतिष्ठा पावले आहे. बुद्धचरित्रापुढे आजचा एखादा पाश्चात्त्य शिक्षित श्रद्धेने मान नमवितो. याचे कारण भारतीय संस्कृतीसुद्धा विश्वसंस्कृतीचेच एक रूप होय.[८] भारतीय संस्कृती आणि विश्वसंस्कृती यांचं हे जे एक विलक्षण नातं तर्कतीर्थांच्या मनात होतं, त्यामुळे त्यांची एक व्यापक अशी बौद्धिक बैठक तयार झालेली होती. आणखी एक उद्‌धृत मी आपल्यासमोर ठेवू इच्छितो. प्रा. रा. ग. जाधव यांनी असं म्हटलेलं आहे की, शास्त्रीजी हे मूलतः मीमांसक होते आणि मीमांसेच्या पूर्व-पश्चिमी पद्धतींवर त्यांची पूर्णपणे पकड होती. निर्विकल्प सत्यांचा आणि मूल्यांचा अखंडपणे शोध घेणे हेच मीमांसेचे उच्चतम ध्येय असते. या ध्येयाची शास्त्रीजींना कल्पना होती. म्हणूनच आधुनिक भारतीय तत्त्ववेत्त्यांत अनेकदा कमी-अधिक अंशांनी दिसून येणारे वैचारिक दुभंगलेपण त्यांच्या मीमांसेत क्वचितच आढळून येते. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य, पारंपरिक आणि आधुनिक, जुने व नवे, प्रतिगामी व पुरोगामी अशा प्रकारच्या द्वंद्वात अडकून त्यांची विवेकशक्ती द्विधा झाल्याचे क्वचितच आढळून येते. जगातील सर्व प्राचीन-अर्वाचीन तत्त्वज्ञांना, म्हणूनच त्यांना आपले तत्त्वज्ञ म्हणून मानता आले. गौतम, कपिल, व्यास, नागार्जुन हे जसे त्यांचे होते; तसेच सॉक्रेटिस, प्लेटो, कान्ट, हेगेल, रसेल हेही त्यांचेच होते. भारतीय ते आपले व बाकीचे परके अशी भावना त्यांच्या मीमांसादृष्टीत नव्हती. तत्त्वज्ञान व तत्त्वज्ञानी हे देश, धर्म, संस्कृती, समाज यांच्या पलीकडे असतात व म्हणून त्यांच्या बाबतीत आपपरभाव संभवत नाही, अशी शास्त्रीजींची भूमिका होती. ही भूमिका, ही वैश्विक एकतेची भूमिका, ही भारतीय संस्कृतीच्या चैतन्यतत्त्वाचा आविष्कार होय. शास्त्रीजी अशा प्रकारच्या आविष्काराचेही एक उत्कृष्ट प्रतिनिधी होते.[९] तेव्हा शास्त्रीजींची ही व्यापक बैठक जर आपण लक्षात घेतली तर मग आपल्याला जाणवते की विश्वकोशासारखा महाकाय प्रकल्प पेलण्याची ताकद त्यांच्यामध्ये का येऊ शकली! इथे आणखी एका उदाहरणाचा उल्लेख मला करायचा आहे. १३ मार्च १९५० या दिवशी तर्कतीर्थांनी प्रार्थना समाजाच्या ८३ व्या

वार्षिक उत्सवात संत तुकाराम यांच्याविषयी एक व्याख्यान दिलेलं होतं. त्या व्याख्यानामध्ये मध्ययुगीन भागवतधर्माचा कळसबिंदू या स्वरूपात त्यांनी संत तुकारामांविषयी अतिशय व्यापक मांडणी केली होती. त्यानंतरचा जो ऱ्हास झाला, त्यावरही त्यांनी भाष्य केले. नंतर पुन्हा एकदा जागृतीची ज्योत एकोणिसाव्या शतकात कशी प्रज्वलित झाली आणि ती राजा राममोहन रॉय यांनी कशी प्रज्वलित केली, याविषयीची मांडणीही त्यांनी केली. म्हणजे बघा, तुकारामांवरचं व्याख्यान, पण तुकाराम ते राजा राममोहन रॉय अशी मांडणी करून समारोपामध्ये ते वर्तमानाला भिडतात आणि संकटग्रस्त वर्तमानात संत तुकाराम, राजा राममोहन रॉय व महात्मा गांधी हे भारतीयांचे मोठे स्फूर्तिदाते आहेत, अशा पद्धतीची मांडणी ते करतात.[१०] तेव्हा मध्ययुगीन संतांपासून आधुनिक राष्ट्रपुरुषांपर्यंत ही जी जोड आहे, प्राचीन वैदिक संस्कृतीपासून आधुनिक पाश्चात्त्य संस्कृतीपर्यंत ही जी एक विशाल दृष्टी आहे, त्यांच्या विशाल कार्याचा हा जो एक फार मोठा कॅनव्हास किंवा रंगपट होता, तो या संदर्भात खूप महत्त्वाचा आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर अत्यंत दूरदृष्टीचे असे आपले पहिले मुख्यमंत्री आदरणीय यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाची स्थापना १९ नोव्हेंबर १९६० या दिवशी केली. या साहित्य-संस्कृती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष म्हणून तर्कतीर्थांची नियुक्ती त्यांनी केली, हे किती स्वाभाविक होते! साहित्य संस्कृती मंडळाच्याच कार्याचा एक भाग म्हणजे विश्वकोशाचं कार्य होते. त्यामुळे पहिल्यापासून ते अगदी अखेरपर्यंत म्हणजे १ डिसेंबर १९८० या दिवशी विश्वकोश हा साहित्य-संस्कृती मंडळापासून वेगळा झाल्यानंतरसुद्धा विश्वकोशाचं अध्यक्षपद हे शास्त्रीजीकडे राहीलं. १९६० पासून त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १९९४ पर्यंत अशी एकूण ३४ वर्षे तर्कतीर्थ हे विश्वकोशाचे अध्यक्ष आणि प्रमुख संपादक होते. या ३४ वर्षांच्या काळामध्ये तर्कतीर्थांनी जे प्रचंड काम उभे केले, त्या त्यांच्या योगदानाचा विचार करताना पहिल्यांदा मी काही तथ्यांचा अगदी थोडक्यात उल्लेख करतो आणि मग त्यांच्या योगदानाच्या अनुषंगाने काही मुद्दे आपल्यासमोर मांडतो.

आपल्याला याची कल्पना आहे की, पहिली जी मूळ योजना होती त्या योजनेनुसार छापील स्वरूपात विश्वकोश पूर्ण झाला आणि आता तो संकेतस्थळावर जाऊन विकासाचे नवे टप्पे गाठतोय. परंतु शास्त्रीजींच्या काळात मुळात ही जी सबंध योजना होती, ती आखणं, दूरदृष्टीने तिचे

तपशील ठरवणं, इथपासूनच सुरुवात होती आणि ती सुरुवात करून त्यांनी आपल्या हयातीमध्ये विश्वकोशाचे एकूण १४ खंड प्रकाशित केले, ही साधीसुधी गोष्ट नव्हती. शास्त्रीजींच्या हयातीत पहिला जो खंड प्रकाशित झाला, त्याला १९७६ साल उजाडलं आणि १९७६ ते १९८९ या काळात त्यांनी विश्वकोशाचे चौदा खंड प्रकाशित केले. त्या जोडीला त्यांच्या काळात १९६५ मध्ये विश्वकोशाचा परिचय ग्रंथसुद्धा प्रकाशित झाला. १९७३ मध्ये विश्वकोशाचा परिभाषासंग्रह प्रकाशित झाला. एवढी प्रचंड कामगिरी ही आकडेवारीच्या किंवा तथ्याच्या पातळीवर झालेली आपल्याला दिसून येते. हे करत असताना एकीकडे ते जसे संपादन करत होते, तसे दुसरीकडे ते नोंदी लिहीत होते. या नोंदींची संख्यासुद्धा १०० हून अधिक आहे. केवळ त्यांनी स्वतः लिहिलेल्या नोंदींची माझ्या हाताशी असलेली संख्या १४२ अशी आहे. त्यांनी अध्यक्ष या नात्याने जी प्रशासकीय घडी बसवायची ती बसवली आणि संपादक या नात्याने जी बौद्धिक घडी बसवायची तीही सुव्यस्थितपणे बसवली. विश्वकोशाचं काम त्यांनी प्रचंड प्रमाणात पुढे नेलं. मराठीमध्ये कोशांची एक खूप मोठी परंपरा तोपर्यंत निर्माण झालेली होती. एकोणिसाव्या शतकापासूनच मराठीमध्ये कोशवाङ्मय यायला लागलं. विसाव्या शतकात ते आणखी विकसित झालं. आपल्याला 'ज्ञानकोश'कार केतकरांचं उदाहरण माहीत आहे. पंडित महादेवशास्त्री जोशींचं उदाहरण माहीत आहे, सिद्धेश्वरशास्त्री चित्रावांचं उदाहरण माहीत आहे. अनेक उदाहरणे आहेत. त्यामध्ये मी अधिक जात नाही.

ज्ञानकोश हा शब्द रूढ असताना विश्वकोश हा शब्द का, असा प्रश्न काही लोकांना पडू शकतो. पण या संदर्भात प्रा. रा. ग. जाधव यांनी केलेले मार्मिक विवेचन पाहिले की शास्त्रीजींच्या सूक्ष्म दृष्टीची कल्पना येते. प्रा. जाधव म्हणतात, ''ज्ञान आणि विज्ञान या दोन संज्ञांतील फरक विश्वकोशरचनेसाठी स्वीकारणे भाग होते. 'विज्ञान' ही संज्ञा आधुनिक संदर्भात शास्त्र (सायन्स) या अर्थाने निश्चित करण्यात आली. या संज्ञेने सर्व आधुनिक जीवशास्त्रे व (निसर्गशास्त्रे, लाईफ सायन्सेस व नॅचरल सायन्सेस) यांचा बोध होतो व या अर्थाने एक विशिष्ट परिभाषा म्हणून ती स्वीकारण्यात आली. या शास्त्रांच्या कक्षेबाहेरचे उर्वरित सर्व ज्ञानक्षेत्र 'ज्ञान' या संज्ञेने निर्दिष्ट केले जाते. तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे, ललितकला, कारागिरी यांसारख्या ज्ञानशास्त्रांचा अंतर्भाव 'ज्ञान' संज्ञेच्या अंतर्गत करण्यात आला असे पारिभाषिक विभेदन (डिफरन्शिएशन) करणे विश्वकोशासारख्या

सर्वसंग्राहक ज्ञानसंकलनात आवश्यक असते. त्यामुळे ज्ञानविषयांच्या मांडणीत व विवेचनात काटेकोरपणा येतो व असा काटेकोरपणा कोशरचनेची प्राथमिक अटच असते. म्हणूनच सर्वविषयसंग्राहक अशा या कोशरचनेला ज्ञानकोशाऐवजी विश्वकोश असे नाव देण्यात आले. हे नाव तसे चटकन रुजलेही व रूढही झाले, असे दिसून येईल. ग. ज. आगाशे यांनी इंदूर येथील १९१७ च्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात विश्वकोश' हा शब्द वापरला आहे.[११] ग. ज. आगाशे म्हणजे मराठी वाङ्मयाचा इतिहास ज्यांनी सुरुवातीला लिहिला, त्या चार-पाच जणांतले एक बरं का! तर हाच विश्वकोश शब्द अत्यंत जाणीवपूर्वक वापरण्याची दृष्टी आपल्याला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यामध्येही दिसते.

कोशाची परंपरा मराठीत निर्माण झालेली होती, ही गोष्ट खरी आहे. परंतु कोशनिर्मितीची ही जी व्यक्तिकेंद्रित परंपरा मराठीमध्ये रूढ झालेली होती, त्या परंपरेला एक सामूहिक, सहकारी, संस्थात्मक स्वरूपाची अशी बैठक देऊन आधुनिक वळणाने ही परंपरा पुढे नेण्याचे काम तर्कतीर्थांनी केलं, असं आपण निश्चितपणे म्हणू शकतो. ते शासकीय पातळीवर केलं गेलं, हे त्याचं आणखी एक वैशिष्ट्य आहे.

विश्वकोशाची घडी जी त्यांनी घालून दिली, त्या संदर्भात आपल्याला एक गोष्ट प्राधान्याने लक्षात ठेवावी लागते. ती गोष्ट अशी की, मुळात त्याचे कोशासंबंधी काही मोलाचे विचार होते आणि त्यांना विश्वकोशाच्या आधी धर्मकोशाच्या कामाचा खूप मोठा अनुभव होता. प्राज्ञपाठशाळेने धर्मकोशाचे काम हाती घेतलेले होते आणि साधारणतः १९३२ पासूनच कोशाच्या कामात शास्त्रीजींनी लक्ष घातलेले होते. १९३४ मध्ये धर्मकोश मंडळ स्थापन झाले. शास्त्रीजी त्याचे कार्यवाह होते. धर्मकोशाचे जे खंड पुढे तयार केले गेले, त्या खंडांचे प्रमुख संपादक म्हणूनही शास्त्रीजींनी काम केलेले होते. म्हणून शास्त्रीजींच्या लेखनामध्ये कोशाविषयी जे उल्लेख येतात, त्यात धर्मकोश आणि विश्वकोश या दोन्हींचा अनेक वेळा त्यांनी एकत्रितरित्या उल्लेख केलेला आपल्याला दिसून येतो. त्यामुळे त्यांची कोशदृष्टी खूप आधी विकसित झालेली होती आणि त्या विकसित झालेल्या कोशदृष्टीचा लाभ मराठी विश्वकोशाच्या योजनेला मिळू शकला. त्यामुळे मराठी विश्वकोश जेव्हा आकाराला यायला लागला तेव्हा त्याला एक तत्त्वज्ञानात्मक बैठक एका बाजूनी शास्त्रीजींनी घालून दिली आणि दुसऱ्या बाजूने एक पद्धतीशास्त्रीय बैठकही त्यांनी घालून दिली म्हणजे फिलॉसॉफिकल

फाऊंडेशन आहे आणि मेथडॉलॉजिकल फाऊंडेशनपण आहे. या पद्धतीचा पाया हा मुळातच शास्त्रीजींमुळे रचला गेला. त्या पायावरच विश्वकोशाची आजची सगळी वैचारिक इमारत उभी आहे.

मी जेव्हा विश्वकोशाचं संपादकपद स्वीकारलं, त्यानंतर मला असं जाणवतंय की, हा जो तत्त्वज्ञानात्मक आणि पद्धतीशास्त्रीय पाया आहे, तो काळाच्या ओघात जरा डळमळीत झालेला आहे. म्हणून मी पहिलं काम जर काही हाती घेतलं असेल तर शास्त्रीजींनी घालून दिलेला हा जो पाया आहे. त्याची आठवण ठेवून विश्वकोशाचे कामकाज चालवणे. शास्त्रीजींनी जी बैठक घालून दिलेली आहे आणि त्याबाबतची जी दृष्टी दिलेली आहे, त्या दृष्टीच्या प्रकाशात विश्वकोशाला पुढे नेण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. जागोजागी शास्त्रीजीची आठवण आजही येते, इतकं मूलभूत स्वरूपाचं काम त्यांनी केलेलं आहे.

तुम्ही जर मराठी विश्वकोशाचा पहिला खंड पाहिलात आणि त्या खंडाला शास्त्रीजींची जी प्रस्तावना[१२] आहे ती वाचलीत तर लक्षात येईल की मुळात हा कोश निर्माण करताना अनेक समस्या होत्या, अनेक प्रश्न होते. एक कोशशास्त्रीय मनोवृत्ती लोकांमध्ये, लेखकांमध्ये, संपादकांमध्ये निर्माण करणं हेसुद्धा खूप गरजेचं होतं. दुसराही एक महत्त्वाचा प्रश्न होता. यशवंतरावजींची दृष्टी अशी होती की सर्वसामान्य माणसापर्यंत जगातलं ज्ञान आम्हाला पोहोचवायचं आहे. मग हे ज्ञान आता पोहोचवायचं कसं? काय स्वरूपाचा कोश असला पाहिजे? कारण कोशाचे तर अनेक प्रकार असतात. विशिष्ट प्रकारचे विशिष्ट विषयांना वाहिलेले असे अनेक कोश असतात; परंतु कोशाचा एक मुख्य प्रकार सर्वविषयसंग्राहक कोशरचनेचा आहे. शास्त्रीजींनी पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत त्याची चर्चा केलेली आपल्याला आढळेल. पहिला निर्णय त्यांनी असा घेतला की, आरंभीच्या टप्प्यामध्ये सर्वविषयसंग्राहक अशी आकारविल्हे कोशरचना अ ते ज्ञ पर्यंतची करायची आणि त्या दृष्टीने सबंध विश्वकोशाची योजना पहिल्यांदा त्यांनी आखली. त्यांनी तेव्हा आखलेले जेवढे खंड होते त्यापेक्षा नंतर खंडांची संख्या वाढली. परंतु अगदी सूचिखंडापर्यंतची योजना त्यांनी आखली आणि त्यानुसार विश्वकोशाचं काम आजतागायत सुरू आहे.

शास्त्रीजींनी पहिल्या खंडामध्ये सुरुवातीला लिहिलेले मराठी विश्वकोशाच्या संपादनपद्धतीविषयीचं टिपणही[१३] महत्त्वाचं आहे. संक्षेपांची

यादीही[१४] आपल्याला आढळेल. मी हे आवर्जून सांगतोय, कारण बरेचदा विश्वकोशाचा खंड वाचावा कसा, हेसुद्धा सांगण्याची गरज असते! म्हणून ज्याला खऱ्या अर्थाने विश्वकोशामध्ये शिरायचं आहे, त्याने सर्वप्रथम शास्त्रीजींची पहिल्या खंडातील प्रस्तावना वाचावी, त्यानंतर संपादनपद्धतीविषयी जे एक विस्तृत टिपण आहे ते वाचावं, संक्षेपाची यादी पाहावी आणि मगच पुढे जावं. इतका भरभक्कम पाया त्याच्यात घातलेला आहे की तो आजही आपल्याला उपयोगी पडतो. पुढे त्यांनी एक माहितीपुस्तकच तयार केलं. या सर्वांमागे लोकशिक्षणाची दृष्टी दिसून येते. सुरुवातीला प्रश्न असा होता की, विश्वकोशात विषय कोणते असावे? ज्ञान व विज्ञान हे दोन शब्द वापरायला सोपे आहेत, पण ज्ञानामध्ये काय आहे, विज्ञानामध्ये काय आहे, त्याची खूप मोठी यादी करणं, त्यानुसार खंडांची रचना करणं, त्यानुसार लेखक-संपादक निवडणं हे सर्व करायचं होतं. त्याचे शास्त्र बसवताना नोंदींची शब्दसंख्या किती असावी, नोंदीचे प्रकार काय असावेत, नोंदीत कशा प्रकारे संदर्भ द्यावेत, वगैरे अनेक गोष्टी ठरवायच्या होत्या. या सर्वांचा किती पद्धतशीर विचार तर्कतीर्थांनी केलेला होता, हे पहिल्या खंडातील त्यांच्या प्रास्ताविक लेखनावरून लक्षात येते. विश्वकोशाची कोणतीही नोंद वाचताना आपल्याला काही ठिकाणी पोकळ बाण दिसतो, काही ठिकाणी नुसता बाण दिसतो. आता मी लोकांना काही वेळा म्हणतो हे काय नुसतं निवळ नक्षीकाम आहे का? तर नक्कीच नाही! उदाहरणार्थ, पोकळ बाणाला अर्थ जो आहे तो असा आहे की, विश्वकोशात पुढे कुठे ना कुठे बाणापुढच्या शब्दावरची नोंद आहे. आता कल्पना करा की सगळे खंड कल्पून या सगळ्याचा विचार करणे आणि त्यानुसार हे बाण दर्शविणे, नियोजित प्रत्येक नोंदीसाठी आवश्यक तर हा विचार करून ठेवणे, ही सगळी योजना किती बारकाईने करावी लागली असेल! पण ती योजना त्यांनी केली हा त्यातला महत्त्वाचा भाग आपल्याला सांगता येईल. त्यांचं एक फार मोठं योगदान असं आहे की, कितीही झालं तरी विश्वकोशाचं काम हे ज्ञानात्मक काम आहे, हे विचारशीलतेचं काम आहे आणि अशा कामामध्ये जर स्वायत्तता नसेल तर या कामाला बाधा येऊ शकते. विशेषतः शासकीय पातळीवर हस्तक्षेप व्हायला लागले, काही गोष्टी लादल्या गेल्या तर या ज्ञानात्मक कामाला बाधा येऊ शकते, याची पुरेपूर जाणीव तर्कतीर्थांना होती म्हणून जी चौतीस वर्षे त्यांनी विश्वकोशाचे नेतृत्व केले त्याच्यामध्ये त्यांनी विश्वकोशाची स्वायत्तता अबाधित राखली. हे

त्यांचे योगदान माझ्या दृष्टीने फार मोठे असे योगदान आहे. येथे प्रत्येक मुद्याच्या खोलात आपण जाणार नाही आहोत. पण एकेका मुद्याचा निदान ओझरता उल्लेख करत मी पुढे जातो. विश्वकोशाची भाषिक जडण-घडण फार महत्त्वाची होती. विश्वकोश हे मराठी सारस्वताचे एक फार मोठे लेणे आहे. भाषाशुद्धी आणि भाषासमृद्धीच्या कामीसुद्धा विश्वकोश काही योगदान देऊ शकतो, असे आपल्याला दिसून येईल. म्हणून विश्वकोश तयार करत असताना परिभाषेचा वापर आणि प्रमाणभाषेचा वापर आणि नुसता वापरच नाही, तर या वापराच्या द्वारे परिभाषा-निर्मिती आणि प्रमाणभाषा-निर्मितीला हातभार लावणे, असे दुहेरी काम शास्त्रीजींनी केले, हे त्यांचे खूप मोठे योगदान म्हणून सांगता येईल.

विश्वकोशामध्ये जगातले नवनवीन विषय समाविष्ट होत असतात. दुसऱ्या भाषांमधले ज्ञान आपल्या भाषेमध्ये येत असते. अशा वेळेला त्याला प्रतिशब्दसुद्धा नसतात. काही गोष्टींचा मागमूसही आपल्याला नसतो. त्यामुळे ते ज्ञान मराठी भाषेमध्ये आणत असताना समर्पक असे शब्द वापरात आणणे, त्या त्या विषयाची म्हणून जी परिभाषा असते त्या परिभाषेच्या अनुषंगाने ते समर्पक शब्द आणणे आणि ते शब्द पुन्हा सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यात जाऊ शकतील अशा पद्धतीने त्यांची मांडणी करणे, हे खूप मोठ्या कौशल्याचे काम आहे. परंतु या परिभाषेचा अत्यंत जाणीवपूर्वक वापर आणि त्यातून प्रमाणभाषेची निर्मिती हे जाणीवपूर्वक केलेले काम हेसुद्धा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विश्वकोशाच्या कार्यातले एक फार मोठे योगदान म्हणून आपल्याला सांगता येईल. या सगळ्याची मुळं आपल्याला पहिल्या खंडाच्या त्यांच्या प्रस्तावनेतच दिसतात, हे जर आपण ती प्रस्तावना काळजीपूर्वक वाचली तर आपल्या लक्षात येऊ शकेल. मी नेहमी म्हणतो की विश्वकोशाचे जे काम आहे ना, ते जगन्नाथाच्या रथासारखे आहे! म्हणून एकटा प्रमुख संपादक काही करू शकत नाही. त्या संपादकाच्या मदतीला संपादकांची एक टीम असते, एक चमू असतो. एक संघ असतो. आज मीसुद्धा माझ्या वाईच्या विश्वकोश कार्यालयात आणि मुंबईच्या कार्यालयात जे माझे संपादकीय सहकारी आहेत त्यांच्या साहाय्याने हे सगळं पुढे नेतोय. माझ्या एकट्याच्याने हे सगळं होऊ शकत नाही म्हणून या सहकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यावर आणि त्यांची मदत घेण्यावर माझा भर असतो. मुळात संपादकांना प्रशिक्षित करण्यापासूनच शास्त्रीजींनी सुरुवात केलेली होती. या संपादकांच्या जोडीला महाराष्ट्रातले, महाराष्ट्राच्या बाहेरचे

देशातले असे मराठी भाषा जाणणारे अनेक अभ्यासक विश्वकोश कार्याशी जोडून त्यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याकडून नोंदी लिहून घेणे, आणखी काही ज्येष्ठ अभ्यासकांकडून त्या तपासून घेणे किंवा संपादित करून घेणे आणि त्यांच्यावर आणखी काही संस्कार हे विश्वकोश कार्यालयामध्ये करणे, आणि मग ते खंडांमध्ये आणणे आणि आता तर ते संकेतस्थळावरही[१५] टाकणे म्हणजे एक प्रचंड व्याप आहे. प्रथमपासूनच या कामाचं एक मोठं जाळं उभं करणं अगदी आवश्यक होतं आणि त्याच्यासाठी प्रशिक्षित असं मनुष्यबळ विश्वकोशाच्या कामांमध्ये वापरणं आवश्यक होते. प्रा. रा. ग. जाधव यांनी म्हटल्याप्रमाणे एक 'ब्रेन ट्रस्ट' किंवा 'बौद्धिक निधी' शास्त्रीजींनी एका अर्थाने उभारला.[१६] एक फार मोठी विद्वानांची फौजच्या फौज विश्वकोशाच्या कामी शास्त्रीजींनी उभी केली आणि त्यांच्या मदतीने त्यांनी हे प्रचंड कार्य साकार केलं. थोडी नाटकाची भाषा मी येथे वापरतो. हे सगळं करत असताना ते दिग्दर्शन करत होते का? मोलाचं दिग्दर्शन तर ते करत होतेच; पण ते भूमिकाही करत होते. त्यांनी ज्या नोदी लिहिलेल्या आहेत. त्या जवळपास १४२ नोंदी आहेत. त्यांनी जवळपास ६०३ पानांचा मजकूर व्यापलेला आहे. या कामाचं महत्त्व नुसतं संख्यात्मक नाही, तर त्याला गुणात्मक महत्त्व आहे. कारण या नोंदीचा जो आवाका आहे, त्यांचा जो रंगपट आहे. तो खूप मोठा आहे. एका बाजूने पाहायला गेलं तर प्राचीन भारतीय वाङ्मय म्हणजे ऋग्वेद असो, अथर्ववेद असो, सामवेद असो... वेद आहेत. उपनिषदं आहेत, आरण्यकं आहेत, कल्पसूत्र आहेत, रामायण आहे, महाभारत आहे, भगवद्‌गीता आहे, मनुस्मृती आहे... काय नाही! या प्रकारच्या त्यांच्या नोंदी आहेत. तसंच कणाद, कपिल, कात्यायन, मनू, परीक्षित या सगळ्या नोंदीही आहेत. म्हणजे त्यांनी प्राचीन भारतीय परंपरेविषयीच्या अनेक नोंदी लिहिलेल्या आहेत असं आपल्याला दिसेल. त्यातून मग संस्थात्मक अशा गोष्टींविषयीसुद्धा त्यांनी लिहिलेलं आहे. धर्म या विषयावर त्यांची अप्रतिम अशी नोंद आहे.

त्यांच्या एकूणच नोंदींबद्दल 'नवभारत'मध्ये १९९६ साली श्रीनिवास दीक्षित यांनी 'विश्वकोशातील तर्कतीर्थांचे लेखन' असा एक फार सुंदर लेख लिहिलेला होता.[१७] त्याच्यामध्येसुद्धा त्यांनी म्हटले आहे की, ज्यांना कोणाला धर्माचा अभ्यास करायचा आहे त्यांनी आधी विश्वकोशातील शास्त्रीजींची धर्म या विषयावरची नोंद वाचावी आणि सुरुवात करावी. इतकी ती मोलाची नोंद आहे. जाती संस्थेवरही नोंद आहे आणि त्यातसुद्धा

जातीसंस्थेविषयीची काय मांडणी झाली आहे, याचा उत्तम असा आढावा शास्त्रीजींनी घेतलेला होता. भारतीय तत्त्वज्ञानावर नोंद आहे. योग, प्राणायाम, योगदर्शन अशा कितीतरी नोंदी आहेत. ज्ञानेश्वर तुकाराम, रामदास यांच्यासारखे संत आहेत. आधुनिक प्रबोधनकर्ते आहेत. म्हणजे राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, महात्मा गांधी, सेनापती बापट, विनोबा भावे या सगळ्या थोर व्यक्तींवर शास्त्रीजींनी नोंदी लिहिलेल्या आहेत. आर्यसमाज, ब्राह्मोसमाज यांसारख्या सुधारणावादी संस्थांवर नोंदी आहेत बरं, एवढ्यावरच ते थांबत नाहीत. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानावरही त्यांचा गाढा अभ्यास होता, त्यावरही तेवढीच मोठी पकड़ होती आणि ती असल्यामुळे अगदी आधुनिकतावाद उदारमतवादापर्यंतच्या त्यांच्या नोंदी आढळतात. कार्ल मार्क्स, हेन्री थॉमस कोलबुक, निकोलो मॅकियाव्हेली... ही अशी यादी नुसती सांगायला लागलो ना, तरीसुद्धा आपण थक्क होऊ. अशा पद्धतीने एका व्यापक रंगपटावर या विविध विषयांच्या नोंदी त्यांनी सारख्याच ताकदीने लिहिलेल्या आहेत, हे आपल्याला लक्षात येऊ शकेल. आता एक आहे की ज्या वेळेला माणूस एवढ्या नोंदी लिहितो तेव्हा अभ्यासकांना त्या नोंदींमध्ये काही त्रुटी आढळू शकतात. उदाहरणार्थ, श्रीनिवास दीक्षित यांनी जो लेख लिहिला आहे, त्यामध्ये त्यांनी कुठे कुठे अशा त्रुटींचा उल्लेख केलेला आहे किंवा कुठे कुठे त्यांचे मतभेद व्यक्त केलेले आहेत. उदाहरणार्थ, भारतीय तत्त्वज्ञानातील गुण संकल्पना या नोंदीचे विश्लेषण करताना त्यांनी असे कुठेतरी म्हटले आहे की, या संबंध नोंदीविषयी मी असमाधानी आहे. अर्थात हेसुद्धा ठेवले पाहिजे की विश्वकोशाची नोंद त्या विषयासंबंधी थोडक्यात नेमकेपणाने सर्वसामान्य लोकांना समजेल एवढीच माहिती देते आणि त्याला पूरक संदर्भ देते. त्यामुळे एखाद्या शोधनिबंधामध्ये, एखाद्या मोठ्या लेखामध्ये जेवढे बारीक-सारीक विवेचन केलेले असते, तसे ते नोंदीत करता येत नाही. स्वतंत्र लेखाच्या पद्धतीने टीकाटिप्पणीसुद्धा करता येत नाही. या मर्यादामधून जर आपण या नोंदीकडे पाहिले तर मग नोंदीविषयीचे टीकेचे काही मुद्दे गळून पडतात, असे आपल्या लक्षात येईल. परंतु जसे काही टीकेचे मुद्दे असतात, तसे कौतुकपण होताना दिसते. श्रीनिवास दीक्षितांच्या लेखात या दोहोंचा प्रत्यय येतो. जिज्ञासूंनी तो मूळ लेख अवश्य पाहावा. त्यातील एक परिच्छेद मी आवर्जून आपल्यापुढे ठेवू इच्छितो. श्रीनिवास दीक्षित यांनी असं म्हटलंय की, ''युरोपीय संस्कृतीचा आणि तत्त्वज्ञानाचा तर्कतीर्थांचा जो अभ्यास होता त्यावर प्रा. अ. भि. शहा व

प्रा. मे. पुं. रेगे यांच्या सहवासाचा परिणाम मला जाणवतो. यांतील 'प्रबोधनकाल आणि मानवतावाद या नोंदी विशेष उल्लेखनीय आहेत. चौदाव्या, पंधराव्या आणि सोळाव्या शतकात युरोपमध्ये जे वैचारिक आंदोलन झाले त्याचे सुरेख तात्त्विक आणि घटनात्मक विश्लेषण प्रबोधनकाल या नोंदीत वाचावयास मिळते. मॅकियाव्हेली या राज्यशास्त्रज्ञास कुटिल, दुष्ट अशी विशेषणे लावली जातात. पण शास्त्रीजींनी दाखवून दिले आहे की, सामाजिक वास्तवाचा विचार केल्यास त्याचे विचार मार्गदर्शकच आहेत. त्याची हिटलरशी तुलना करणे बरोबर नाही. प्रबोधनकालासंबंधी त्यांनी जो विचार केला आहे त्याचा अधिक विस्तारच मानवतावाद या त्यांच्या नोंदीत पाहावयास मिळतो. भारतीय प्रबोधनकाल या त्यांच्या नोंदीतही विचाराचा जिवंतपणा आहे. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांशी जवळीक साधण्याचा प्रयत्न कोठेही दिसत नाही.[१८] विश्वकोशाच्या निर्मितीपाठीमागे शास्त्रीजींची जी प्रबोधनदृष्टी आहे, ती प्रबोधनदृष्टी तिची व्यापकता, तिची खोली, तिची गुणात्मकता या सर्वांचे प्रत्यंतर शास्त्रीजींनी विश्वकोशासाठी ज्या नोंदी लिहिल्या आहेत. त्या नोंदीमधूनसुद्धा आपल्याला आल्यावाचून राहत नाही. विश्वकोशाचे मूळ रचनाकर्ते, विश्वकोशाचे निर्माते, विश्वकोशाचे अध्यक्ष, विश्वकोशाचे संपादक, विश्वकोशाचे लेखक या सर्व अंगांनी त्यांनी जे योगदान दिलं, ते अत्यंत मोलाचं असं योगदान होते. किंबहुना, त्या योगदानामुळेच मराठी विश्वकोश हा आज मराठी विचारविश्वाचं एक सौंदर्यचिन्ह बनलेला आहे, सामर्थ्यचिन्ह बनलेला आहे. अभिमानस्थळ बनलेला आहे, असे आपल्याला निःसंशय म्हणता येईल. हे सगळं असलं, तरी काही ठिकाणी बारीक-सारीक उणिवा असू शकतात. एकच व्यक्ती सगळं साधू शकत नाही. प्रा. रा. ग. जाधव यांनी विश्वकोशाबाबतची प्रसिद्धीविन्मुखता या शास्त्रीजींच्या दोषाकडे अंगुलीनिर्देश केलेला आहे.[१९]

मी जेव्हा विश्वकोशाचा अध्यक्ष झालो तेव्हा मी दोन गोष्टी जाहीर केल्या. एक म्हणजे विश्वकोश हे ज्ञानाच्या लोकशाहीकरणाचं माध्यम आहे आणि दुसरे मी असं मानतो की, विश्वकोश हा नुसता कपाटात राहता कामा नये, तो सामान्य माणसापर्यंत पोहोचला पाहिजे. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात, आदिवासी भागापर्यंत आणि लहान मुलांपर्यंत मला विश्वकोश पोहोचवायचा आहे. त्यामुळे हे जे प्रचार-प्रसारचं काम अधिक मोठ्या प्रमाणात होणं आवश्यक होते, ती आवश्यकता लक्षात घेऊन मी पावलं टाकतोय. विश्वकोशाच्या कामाला कधीच पूर्णविराम नसतो हे लक्षात ठेवून आणि

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जो पाया घातलेला आहे त्याच्या प्रकाशात तो प्रयत्न मी माझ्या परीने करतो आहे. त्यामुळे तर्कतीर्थांचं योगदान मला नेहमीच प्रेरणादायक वाटत आलेलं आहे. २७ मे २०२१ या दिवशी म्हणजे तर्कतीर्थांच्या स्मृतिदिनी विश्वकोश अध्यक्षपदाची माळ माझ्या गळ्यात पडावी, हा माझ्यासाठी जितका सुखद, तितकाच जबाबदारीची जाणीव देणारा योगायोग आहे!

### *संदर्भ*


१. *शिवाजी विद्यापीठाच्या 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व्याख्यानमाले'त ३१ जानेवारी २०२२ या दिवशी दिलेल्या दूरस्थ (online) व्याख्यानाची संहिता प्रा. प्रकाश पवार यांनी उपलब्ध करून दिली. त्या शब्दांकनावर काही संस्करणे करून हा लेख तयार केलेला आहे. त्यात भाषणशैली शक्यतो तशीच ठेवली आहे. त्यामुळे या लेखात बोली भाषेचा वापरही आढळेल. भाषणावर आधारलेला हा छोटेखानी लेख आहे. एरवी या विषयावर स्वतंत्र पुस्तिका/पुस्तक लिहिता येऊ शकते. त्यामुळे या संक्षिप्त लेखनाला जोडलेले संदर्भ जिज्ञासूंनी अवश्य घ्यावे.*

२. *शास्त्रीजी - रा. ग. जाधव (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी) प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९४, पृ. १९ वर उद्धृत (विश्वकोश कार्यालयातील विद्याव्यासंगी सहायक रवीन्द्र घोडराज यांनी मला हे पुस्तक उपलब्ध करून दिले. शास्त्रीजींचे व त्यांच्याविषयीचे बरेच साहित्य त्यांनी संग्रहित केलेले आहे.)*

३. *तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे चरित्र, विचार आणि कार्य याविषयी बरेच साहित्य उपलब्ध आहे. रा. ना. चव्हाण, रा. ग. जाधव, अशोक भट, अनिल जोशी यांचे ग्रंथ, नवभारतचा जानेवारी-फेब्रुवारी-मार्च १९९६ चा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्ती कार्य आणि विचार' या शीर्षकाने त्या विशेषांकाला देण्यात आलेले ग्रंथरूप (संपा. वसंत पळशीकर, प्रस्ता, मे. पुं. रेगे प्रका. प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, फेब्रुवारी, १९९६) हे माझ्या वाचनात आलेले साहित्य उदाहरणादाखल नमूद करतो. तर्कतीर्थांच्या कन्या अरुंधती खंडकर यांनीही त्यांच्यावर मराठी व इंग्रजीत चरित्र-लेखन केलेले आहे. अनेक लेखही उपलब्ध*

*आहेत. तर्कतीर्थांचे वाङ्मयसुद्धा उपलब्ध आहे. त्यांचे डॉ. सुनीलकुमार लवटे संपादित समग्र वाङ्मय प्रकाशनाच्या मार्गावर आहे. जिज्ञासूंना या सर्व साधनांच्या साहाय्याने अधिक तपशील मिळू शकतील.*

४. *या संदर्भात (मुळात महाराष्ट्र टाइम्समधला) प्रा. मे. पुं. रेगे यांचा हा लेख महत्त्वपूर्ण आहे-*
*तर्कतीर्थांची वैचारिक वाटचाल- मे. पुं. रेगे, नवभारत, वाई, फेब्रुवारी १९८३, २७-३४*

५. *स्वामी केवलानंद सरस्वती- वि. प्र. दिवाण, , श्री कोटेश्वरदेव (ट्रस्ट) वाई, २०१८.*

६. *रेगे, पूर्वोक्त, पृ. २८.*

७. *आधुनिक महाराष्ट्राचे बुद्धिवादी वेदान्ती तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी- द्वा. भ. कर्णिक, मनोहर मासिक, पुणे, में १९५१ पृ. १४२-१५६*

८. *वैदिक संस्कृतीचा विकास- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, १९७२, पृ. १९, रा. ग. जाधव, पूर्वोक्त. पृ. १६ वर उद्धृत.*

९. *कित्ता, पृ. १८.*

१०. *प्रार्थना समाजाचा इतिहास- द्वा. गो. वैद्य (मूळ लेखक व संपा.), राजा दीक्षित (द्वितीयावृत्ती संपा) एशियाटिक सोसायटी, मुंबई, द्वितीयावृत्ती २०१९, पृ. ५८८.*

११. *जाधव, पूर्वोक्त, पृ. ८७-८८*

१२. *पृ. तेरा ते अठरा.*

१३. *पृ. एकोणीस ते बावीस*

१४. *पृ. चव्वेचाळीस.*

१५. *http://marathivishwakosh.org*

१६. *जाधव, पूर्वोक्त, पृ. ८६.*

१७. *विश्वकोशातील तर्कतीर्थांचे लेखन - श्रीनिवास दीक्षित, नवभारत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक, वाई, जानेवारी-फेब्रुवारी-मार्च १९९६. पृ. १३८-१४५*

१८. *कित्ता. पृ. १४३.*

१९. *जाधव, पूर्वोक्त, पृ. ७७.*

■

*(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ऑनलाईन व्याख्यानमालेतील भाषण, सोमवार, दि. ३१ जानेवारी, २०२२.)*

# १४

# मराठी विश्वकोश : तर्कतीर्थकृत रचनाकल्प आणि विकास

## १. विश्व, ज्ञान आणि कोश :

ज्ञान समाजात 'विश्व'(युनिव्हर्स) आणि ज्ञानकोश अथवा 'विश्वकोश' (एन्सायक्लोपीडिया) हे पर्यायवाची शब्द मानले जातात. अनुक्रमे लॅटिन आणि ग्रीक भाषेतील हे शब्द एकूण, संपूर्ण, सर्वसमावेशी, सर्वंकष अशा अर्थाने प्रयोगित आहेत. यात ज्ञानकोशापेक्षा अर्थ, स्वरूप नि व्यापकता वा सर्वग्राहितेच्या निकषावर 'विश्वकोश' अधिक समर्पक शब्द होय. 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'या जगप्रसिद्ध इंग्रजी विश्वकोशाची १९७७ मध्ये पंधरावी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली, तेव्हा त्या विश्वकोशाची पुनर्रचना करून लघुकोश (मायक्रोपीडिया)- १० खंड, बृहत्कोश (मॅक्रोपीडिया)- २० खंड आणि पथदर्शीकोश (प्रोपीडिया)- १ खंड असे एकूण ३१ खंड प्रकाशित करण्यात आले. पथदर्शी कोशाच्या १०व्या भागात या विश्वकोशाचे संपादक मोर्टिनर जे. एडलर यांचे 'नॉलेज बिकम्स सेल्फकॉन्शस'[१] शीर्षकाचे प्रास्ताविक असून, ते ज्ञानाचे स्वरूप स्पष्ट करणारे आहे तसेच विश्वकोशाचेही.

एडरल यांनी म्हटले आहे की, ''ज्ञान हे विश्वाप्रमाणे स्थापित वा संघटित असेल तरी ते सर्वांना आपल्या कवेत घेते, त्यामुळे विश्वकोशाचे स्वरूप सर्वज्ञानसमावेशी होते. जगात जे घडलं, जे निर्माण होतं त्याचं प्रतिबिंब म्हणजे ज्ञान. त्याचं मूर्त रूप म्हणजे विश्वकोश. विश्व नि विश्वकोश हे परस्परपूरक आणि परस्परावलंबी म्हटले पाहिजे. कारण, त्या दोघांच्या

बाहेर मग कशाचंच अस्तित्व राहत नाही. ज्ञानमय म्हणून जे असतं, ते सर्व विश्वात असतं, तसं ते विश्वकोशातही! विश्वाचं इतिवृत्त ज्ञानकोश वा विश्वकोश होय. ज्ञान स्थूल, बृहत् असतं, तसंच सूक्ष्मही. या विश्वात भौतिक जगाबरोबर मानवी जीवन वा जीवसृष्टी अंतर्भूत असते. मनुष्य सजीव प्राणी होय. तो समाजशील असतो. तो केवळ विश्वकर्मा नाही, तर विश्वजिज्ञासूही असतो. मानवाला जग जाणून घ्यायचं असतं, तसंच त्याला स्वतःच्या क्षमता, प्रयत्न, प्रयोग, उपलब्धी जाणून घ्यायच्या असतात. तो विश्वाची सर्व क्षेत्रे पादाक्रांत करू इच्छित असतो.[२]

जगातील तत्त्वज्ञानी मंडळींनी वेळोवेळी ज्ञानस्वरूपाचे प्रतिपादन केले आहे. ग्रीक आणि रोमन संस्कृती यांवर मोठे मंथन झाल्याचे दिसून येते. ग्रीक तत्त्वज्ञ सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल आणि रोमन तत्त्वज्ञ ल्युक्रेटिस, प्लीनी, प्रॉफिरी, सेंट ऑगस्टिन, सिसेरो प्रभृतींनी वेळोवेळी ज्ञानस्वरूप स्पष्ट केले आहे; पैकी ॲरिस्टॉटलनं म्हटलं आहे की, "The highest form of intellectual activity is thinking about thinking itself."[३] विचारांबद्दल मंथन करण्यासारखा दुसरा बौद्धिक उपक्रम नाही. नव्या काळात म्हणून ज्ञान ही आत्मजागृती ठरते. (Knowledge become Self - Conscious.)

ग्रीक, रोमन, वैदिक इ. सर्व प्राचीन संस्कृती अशी ज्ञान संपादन आणि संग्रहण परंपरा दिसून येते. भारतात संस्कृत ही प्राचीन भाषा आहे. तिच्यात 'कोश' आणि 'कोष' शब्दांचे प्रचलन आढळून येते. पूर्वी दोन्ही शब्द एका अर्थानेच वापरले जायचे. कालौघात त्यांचे विभाजन झाले. कोष शब्द पात्र, चषक, खजिना, रेशीम गुंडा अर्थाने प्रचलित झाला, तर कोश शब्दसंग्रह, निघंटु, नाममाला, विविध ज्ञान-विज्ञान संज्ञा, परिभाषा, धातू, व्युत्पत्ती, वाक्प्रचार, म्हणी, समानार्थी, विरुद्धार्थी, पर्यायवाची शब्द, शब्दांश, वाक्यांशापासून ते विविध प्रकारच्या नोंदी, संदर्भ, तक्ते, नकाशे, आलेख, सांख्यिकी माहिती व विश्वज्ञान संग्राहक बनले. कोश वाङ्मयाची परिसीमा आपणास ज्या विश्वकोशात आढळते, त्याच्या निर्मितीचा प्रयत्न लक्षात घेता त्याची बीजे प्लेटोच्या "In order to think better, you must know all" या उक्तीत दिसून येतात. चांगल्या दृष्टींनी विचार करायचा, तर तुमचे ज्ञान सर्वंकषच असायला हवे. माहिती आणि ज्ञान यात अंतर येते, ते विश्वकोशसदृश संदर्भग्रंथांच्या आकलन आणि परिशीलनामुळे. मानवी इतिहासातील प्रारंभिक ज्ञानसंकलक कोश हे सुलभ माहिती देणारे, व्यवहाराची

गरज भागविणारे होते. विसाव्या शतकातील आधुनिक तंत्रज्ञानामुळे आणि संपर्क साधन विकासात झालेल्या उत्क्रांतीमुळे माहितीचा विस्फोट होत ज्ञान पसरट होत गेले. त्यातूनही सूक्ष्म ज्ञान देणाऱ्या संदर्भसाधनांची गरज ज्ञानाच्या वस्तुनिष्ठ व पारदर्शी मागणीतून प्रकर्षाने अधोरेखित होत गेली.

**१.१ कोश**

कोश शब्द 'कुश्'धातूपासून बनला असून, त्याचा शब्दार्थ संग्रह करणे असा होतो. वाङ्मयाच्या संदर्भात, कोश म्हणजे विविध शब्द, माहिती, ज्ञान इत्यादींचा संग्रह होय. कोणत्याही भाषेचा विकास होऊ लागला की, अभ्यास, संशोधन, भाषांतर, अर्थ, संदर्भ इ. अंगांनी जिज्ञासूंना कोश वाङ्मयाची गरज भासू लागते. विविध गरजांतून विविध प्रकारचे कोश प्राचीन काळापासून अनेक भाषांमध्ये निर्माण झाले, तसे ते मराठीतही. भाषेचा वापर, व्यवहार, विस्तार, प्रसाराबरोबर भाषिकांच्या भाषाविषयक आवश्यकता वाढत जातात नि मग विविध प्रकारचे कोश तयार होऊ लागतात. एकभाषी, द्वैभाषी तसेच बहुभाषी कोश मराठीत आहेत, ज्यास स्थूलमानाने शब्दकोश संबोधिले जाते. त्यात शब्द, व्युत्पत्ती, मूळ भाषा, अर्थ, विवरण, पर्यायवाची शब्द, विरुद्धार्थी शब्द, व्याकरण (लिंग, वचन, पुरुष, काळ इ.), वाक्प्रचार, म्हणी अशी विविधांगी माहिती व ज्ञान देणारे विविध कोश मराठीत आहेत.

कोश हा वाङ्मयाचाच एक प्रकार होय. कोशकार आपल्या कोशाद्वारे त्याच्या स्वरूपानुसार सामान्य जिज्ञासू व विशेष जिज्ञासूंना त्यांच्या गरजेनुसार ज्ञान पुरवत असतात. शब्दकोश सामान्यांसाठी उपयुक्त, तर व्युत्पत्ती कोश विशेष जिज्ञासू वा अभ्यासकांसाठी तयार केले जातात. कोशाच्या निर्मिती उद्देशानुसार कोशांची समजपातळी सुलभ, विशिष्ट होत राहते. कोश हे सर्वसाधारणतः भाषा, देश, संस्कृती, साहित्य, परंपरा लक्षात घेऊन तयार केले जातात. त्या त्या भाषिक उपयोजकाची (वापरकर्ता) गरज आणि पूर्वज्ञान लक्षात घेऊन तयार केले जातात. त्याला क्षेत्रीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय रूप येते ते त्यातील आशय व उपयोगितेच्या आधारे. कोश निर्मितीत कोशकार भाषिक क्रम, अचूकता, वस्तुनिष्ठता, अद्ययावतता, संक्षिप्तता इ.ची काळजी घेत असतो. शिवाय ते उपयोगकर्त्याच्या वापरास सुलभ नि सुकर होतील, असेही तो पाहत असतो. मुद्रण, बांधणी, आकार, टंक (टाईप) प्रयोग (लहान, मोठा, ठळक, तिरका इ.), वर्णानुक्रम, व्याकरण इ. सर्वांचा विचार करून कोशकार कोशरचना करतो.

**१.२ कोशरचना पद्धती**

कोशाचे शब्दकोश, विषयकोश, विश्वकोश असे जे विविध प्रकार आहेत, त्यांचा रचनाबंध वैश्विक पातळीवर परंपरेने ठरलेला आहे. कोशरचनेच्या सुगम नि सहजतेवर त्याची उपयुक्तता अवलंबून असल्याने कोशवाचक वा प्रयोगक वा उपयोगकर्त्यांच्या गरजा लक्षात घेऊनपण कोशवाङ्मयशास्त्र परंपरेनुसारच करण्याचा प्रघात वैश्विक आहे. त्या भाषेची वर्णमाला, लिपी, व्याकरण, वापर प्रघात, लेखनपद्धती (उजवीकडून/डावीकडून), उच्चार परंपरा सर्वांचा साधकबाधक विचार कोशकर्ता रचनापद्धतीत लक्षात घेत असतो. कोशामध्ये अकारविल्हे वा वर्णानुक्रमाचे पालन करून माहिती प्रस्तुत केली जाते. सादरीकरणात संपादक तारतम्याने लवचिकपणा ठेवतात. यात उपयोगकाची सोय महत्त्वाची मानली जाते. कोशाचा भाषिक स्तर उपयोगकर्तावर्ग, त्याची भाषिक क्षमता नि ज्ञान, ग्रहणशक्ती, आकलन कौशल्य या सर्वांचा विचार करून ठरविला जातो.

उपयोगकर्तावर्ग बाल, कुमार, युवक, प्रौढ, अभ्यासक, संशोधक असेल त्या स्वरूपावर कोशाची सूक्ष्मता, स्थूलता, बृहत्‌ता, संक्षिप्तता ठरत असते. उपयोगकर्त्याचे पूर्वज्ञान रचनेचा पाया असतो. आवश्यकतेनुसार कोशरचना आवृत्तीनिहाय सुधारण्याचा प्रघात आहे. मग कोशरचनेत भाषाशास्त्र, व्याकरणशास्त्र, साहित्यशास्त्र, लिपीशास्त्र, ग्रंथालयशास्त्र, मुद्रणशास्त्र व तंत्र इत्यादींचा विचार केला जातो. आवश्यकतेनुसार कोशात वापरविषयक मार्गदर्शक सूचना, संक्षिप्त रूपाचे स्पष्टीकरण (विस्तार), क्रम, परिशिष्ट, संदर्भ इ.ची माहिती सुयोग्य क्रमाने अंतर्भूत केली जात असते. आवश्यक तिथे आकृती, कोष्टक, चित्रे, नकाशे, तक्ते, सुनिदर्शने (इलस्ट्रेशन), सूची इ.चा उपयोग करून कोश उपयुक्त बनविण्यावर कोशकर्त्यांचा वा संपादकांचा भर असतो. कोशनिर्मिती ही व्यक्ती एकहाती करते, तशीच अनेकजण मिळूनही करतात. हे सर्व कोशाच्या स्वरूप व व्याप्तीवर अवलंबून असते. कोशनिर्मितीचा वाढता विस्तार आणि माहिती क्रांती नि तंत्र लक्षात घेता हा प्रवास व्यक्तीकडून समिती, समुदाय, मंडळ, संस्थेकडे समाजाकडे अग्रेसर होत आहे.

**१.३ कोश प्रकार**

कोशांचे विविध प्रकार असून, ते उद्देश, भाषा, स्वरूप, रचना इत्यादींवर अवलंबून असतात.

**(अ) उद्देशाधारित कोश**

शब्दार्थ कोश, समानार्थी कोश, विरुद्धार्थी कोश, पर्यायवाची शब्दकोश, व्युत्पत्ती कोश, उच्चारण कोश, इ.

**(ब) भाषाधारित कोश**

एकभाषी कोश, द्वैभाषिक कोश, त्रैभाषिक कोश, बहुभाषी कोश, उपसर्ग कोश, प्रत्यय कोश, वाक्प्रचार कोश, म्हणी कोश, मुद्रितशोधक कोश, शब्दलेखन कोश (Spelling dictionary).

**(क) विषयाधारित कोश**

विश्वकोश, संस्कृतीकोश, विज्ञानकोश, इतिहासकोश, मिथककोश, चरित्रकोश, सुविचार कोश, सुभाषितकोश, परिभाषा कोश, व्याख्याकोश, संज्ञाकोश, संकल्पनाकोश, पदनामकोश, साहित्यकोश (साहित्यकार, साहित्यकृती, साहित्य प्रकार (काव्य, नाटक इ.), साहित्य विचारधारा, इ.) विविध व्यावसायिक कोश, विविध शास्त्रांचे कोश.

**(ड) तंत्राधारित कोश**

महाजालीय कोश, आंतरजाल संलग्न (Online), आंतरजाल विलग (Offline), विविध संसाधने (Apps), कोश, ई कोश.

**(इ) विविध**

संगणक कोश, सूची कोश, नामावली कोश, भाषांतर कोश, तांत्रिक कोश, इलेक्ट्रॉनिक कोश, व्याख्या कोश, संक्षेपरूप कोश, इत्यादींचे कोश.

वरील कोशनामे ही उदाहरणस्वरूप होत. भाषा, ज्ञान-विज्ञान विस्ताराबरोबर कोश प्रकार वाढत आहेत. मराठी भाषेची इतर भाषांतील कोशवाङ्मयाशी तुलना करून विचार करता विकासास भरपूर वाव आहे, हे जरी खरे असले तरी ते नगण्य नाहीत. याशिवाय वार्षिक (Year Book), सांवत्सरिक स्वरूपाचे जे वाङ्मय प्रकाशित होते, त्याचा समावेश कोशवाङ्मयातच केला जातो. विषय, स्वरूप, क्षेत्रनिहाय त्यांची संख्या या मुद्रणक्रांती, माहितीक्रांती, तंत्रज्ञान क्रांतीच्या युगात विपुल आहे. कोशवाङ्मयाच्या दृष्टीने हा समृद्धीचा काळ आहे, असे म्हटले तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही.

**२. विश्वकोश : संकल्पना आणि स्वरूप**

मराठीत ज्ञानकोश, महाकोश, विश्वज्ञानकोश, विश्वकोशासारखे शब्द इंग्रजी 'Encyclopedia' शब्दापासून वा संकल्पनेतून साकारलेले शब्द

होत. हा शब्द मूळ लॅटिन, ग्रीक भाषेतून इंग्रजीत आला. यात दोन शब्द आहेत - Enkyklios + Pedia. अनुक्रमे त्यांचे अर्थ आहेत सर्वसाधारण + शिक्षण = सर्वसाधारण शिक्षण. सामान्यज्ञानाचे रूपांतर विशेष ज्ञानात, वैश्विक ज्ञानात रूपांतरित करण्याचे साहाय्यभूत साधन म्हणजे विश्वकोश. सर्व ज्ञान, विज्ञान आणि कला यांचे उदारमतवादी शिक्षण (Liberal Arts and Education) देण्याचे कार्य या कोशाकडून होते, म्हणून त्यास विश्वकोश संबोधिले जाते. तो 'सर्वविषयसंग्राहक कोश'असतो. पूर्वी तो मुद्रित, ग्रंथरूप, खंडनिहाय प्रकाशित व्हायचा. महाजालीय जगात आता तो आंतरजाल संलग्न (ऑनलाईन) वा आंतरजाल विभक्त (ऑफलाईन) अशा दोन्ही रूपात सजग, संग्राह्य झालेला आहे.

यात वर्णानुक्रमे 'अ' ते 'ज्ञ' संग्राह्य माहिती रचनाबंधात पुरविली जाते. विस्तृत वस्तुनिष्ठ ज्ञान देणारा कोश वा विश्वकोश गद्य शैलीत लिहिला जातो. अपवाद पद्यकोश उपलब्ध आहेत. वाचकास अद्ययावत माहिती देण्याचा अट्टाहास, प्रयत्न कोशकारांचा असतो. जिज्ञासूंच्या प्रत्येक शंकेचे समाधान कोशकर्त्यांचे लक्ष्य असले, तरी अखंड नि अज्ञात ज्ञानाचा विस्तार कोशाच्या संक्षिप्त आकारात कवेत घेणे कुणालाच शक्य झालेले नाही. म्हणून विश्वकोश कधीच पूर्ण होत नसतो. त्याच्या सुधारित आवृत्त्या प्रकाशित करून वा नवनवे कोश साकारून कोशकर्ते पूर्वप्रयत्नांना अधिक पूर्णत्वाकडे नेण्याचा निरंतर प्रयत्न करीत राहतात. म्हणून समुद्रसार, 'गागर में सागर' असंच त्याचं रुपडं राहतं. विश्वकोशातील माहिती वा ज्ञान कधी सूचक, कधी संक्षिप्त, तर कधी विस्तृत रूपात आढळते, ती कोशकर्त्याच्या नियोजन दृष्टीनुसार. संकलनाचा सारांश देणे इतक्या मर्यादितच कोशकार जिज्ञासुंचे समाधान करीत राहतो. 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'च्या संपादकांनी आपले लक्ष्य ठरवित प्रारंभिकच स्पष्ट केलं होतं की, Let knowledge grow from more to more and thus be human life enriched.''[४]

हे खरं तर सर्वच विश्वकोशांचं ब्रीद बनून गेलं आहे. विश्वकोश एकखंडी असतात, तसेच बहुखंडीही. ते एकविषयी असतात, तसेच अनेकविषयी. विश्वकोशातील नोंदी संक्षिप्त, मध्यम आणि व्याप्तिलेखांच्या रूपात कोशकर्ते सादर करतात. ती माहिती अथवा ज्ञान सर्वांगीण व सर्वग्राही होण्याच्या उद्देशाने ते चित्र, आलेख, आकृती, नकाशा, तक्ते,

सांख्यिकी, सुनिदर्शने (इलस्ट्रेशन), व्यंगचित्रे इ. कृष्णधवल वा रंगीत देऊन आपली माहिती परिपूर्ण होईल, असा प्रयत्न करीत असतात.

काही कोश हे कोश आणि विश्वकोश यांचे संयुक्त रूप धारण करणारे 'विश्वकोशीय शब्दकोश' (Encyclopedi Dictionary) असतात. अशा शब्दकोशांत शब्दार्थांच्या पलीकडे जाऊन त्यांची विस्तृत माहिती दिली जाते. 'अधिकस्य अधिकं फलम्'या न्यायाने कोशवाङ्मय आणि त्यातही विश्वकोश समृद्ध, संपन्न असा महत्त्वपूर्ण संदर्भस्रोत म्हणून जिज्ञासू, अभ्यासक आणि संशोधक त्याकडे पाहत असतात. विश्वकोशाच्या या स्वरूप वैशिष्ट्यातच त्याचे व्यवच्छेदकपण सामावलेले असते. विश्वकोश सामान्य वाचकांची जिज्ञासा आणि शंका दूर करतात, तद्वतच अभ्यासक, संशोधकांमध्ये नव्या जिज्ञासा आणि शंका निर्माण करण्याचे कार्य समांतरपणे करीत असतात. या प्रक्रियेतून विश्वकोश ज्ञानविस्तार व विकासाचे कार्य आपसूक करीत राहतात. ज्ञानविकास परंपरा निरंतर नि नित्यनूतन राहते ती विश्वकोशातील या बलस्थानामुळेच. विश्वकोश आंतरविद्याशाखीय दृष्टिकोण विकासाचे कार्य परोक्षपणे करतो कारण, त्याला एकाच कोशात परस्परपूरक, प्रतिसादात्मक आणि प्रतिक्रियात्मक माहिती देत राहिल्याने सतत माहितीचे उत्परिवर्तन (Mutation) होत राहते. शिक्षितवर्ग विश्वकोशाने खऱ्या अर्थाने सुजाण, प्रगल्भ, सुशिक्षित होतो. समाजातील भावसाक्षरता, डोळसपणा, सुसंस्कृतता यांचं लोकशिक्षण विश्वकोश अप्रत्यक्षपणे करीत असतात. समाज बहुश्रुत होतो तो असाच. कोश मीमांसकांनी विश्वकोशाचं स्वरूप व रचना लक्षात घेऊन दिलेल्या कांद्याची उपमा योग्यच म्हणायला हवी. 'कांद्याचा गाभा हा अनेक पापुद्र्यांनी वेढलेला असतो. ज्ञानाची एकता या गाभ्यासारखी, तर विविधता कांद्याच्या पापुद्र्यासारखी असते.''[५]

## ३. विश्वकोश : उगम आणि विकास

### ३.१ वैश्विक परंपरा

जगातील विश्वकोश वाङ्मयाचा इतिहास सुमारे २००० वर्षांचा दिसून येतो. ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो आणि त्याचा भाचा स्प्यूसिपस जो पुढे प्लेटो (इ.स.पू.सु. ४२८ ते सु. ३४८) स्थापित अकादमीचा प्रमुख झाला. त्याने प्रकृतीविज्ञान, तत्त्वज्ञान इत्यादी विषयांवरील प्लेटोचं विचारधन संग्रहित केलं आहे. आज त्या साहित्याचे जे अंश वा अवशेष आपल्या हाती आहेत, ते जागतिक विश्वकोशाचं आदिरूप होय. असं असलं, तरी प्लेटोचा

शिष्य असलेल्या अलेक्झांडर ॲरिस्टॉटल (इ.स.पू.सु. ३८४ ते ३२२) यास विश्वकोशाचा जनक मानण्यात येतं, ते केवळ त्यानं केलेल्या विविध ज्ञान-विज्ञान शाखांतील ग्रंथनिर्मितीमुळे. ॲरिस्टॉटल ओळखला जातो तो 'Encyclopedic Author' म्हणून. ग्रीक, रोमन साहित्यातून जगात वैश्विक भान आणि भाव असलेलं साहित्य रचण्याची परंपरा सुरू झाली.

रोमन कॉन्सल केटो द सेन्सर यांनी आपल्या मुलाला लिहिलेली पत्रे 'ॲडव्हाइस टू हिज सन' (इ. स. पू. सु. १८३) जशी विश्वकोशीय तशीच अलीकडची रिल्केची पत्रे. 'लेटर्स टू ए यंग पोएट' (१९०३ ते ८), 'लेटर्स टू यंग सायंटिस्ट' - डॉ. एडवर्ड विल्सन यांनी लिहिलेलीही. मार्क्स व्हॅरो (इ. स. पू. ११६ ते १७) यांच्या 'नाइन बुक्स ऑफ डिसिप्लिन्स'नी विश्वज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या. त्यामुळे 'नॅचरल हिस्टरी'हे प्लीनीचे (इ.स. २३ ते ७९) इतिहासाचे ३७ खंड साकारले. उदारमतवादी कला (लिबरल आर्टस्) विचार जगभर रुजविणारा रोमन लेखक फ्लेविअस मॅग्नस ऑरिलिअस कॅसिओडोरस (सु. ४९०-सु-५८५) याने रचलेला 'इन्स्टिट्यूटस् ऑफ डिव्हाइन अँड सेक्युलर लिटरेचर'मुळे व्याकरण, तर्कशास्त्र, वक्तृत्वशास्त्र, भूमिती, अंकगणित, खगोलशास्त्र, संगीत अशा विविध विद्याशाखांना गती मिळाली. विश्वकोशात चित्रे, सुनिदर्शने देण्याची प्रथा सेव्हिलचे आर्च बिशप सेंट इझाडोर (सु. ५६० ते ६३६) यांनी आपल्या सचित्र 'ट्वेंटी व्हॉल्यूम्स ऑफ एटिमॉलॉजीज'मधून रुजविली.

इतिहासकाळात राजाश्रयामुळे अनेक विश्वकोशसदृश ग्रंथ प्रकाशनास चालना मिळाली. यात बायझंटिनचा सम्राट कॉन्स्टंटीन पॉर्फिरोजेनिटस (इ. ९०५ ते ९५९) याचा सिंहाचा वाटा होता. पूर्वी विश्वकोशसदृश जे ग्रंथ होते, त्यांचे स्वरूप विविध ज्ञान-विज्ञान विषय लेखांचा संग्रह असे असायचे. आधुनिक काळापूर्वी सुमारे १५०० वर्षे अशी स्थिती दिसून येते. या पार्श्वभूमीवर 'स्यूडास' (Suda or Suidas) या ग्रीक ग्रंथाने (दहावे शतक) विश्वकोश रचनेत क्रांती घडवून आणली. यात प्रथमच अकारविल्हे वा वर्णानुक्रमे माहिती सादर करून विश्वकोशास वैज्ञानिक स्वरूपात प्रस्तुत करण्यात आले. जगातील पहिली विश्वकोशकर्ती महिला म्हणून अबेस हेर्डर (मृत्यू - ११९५) यांना ओळखलं जातं. व्हिन्सेंट ऑफ बोव्हे (सु. ११९० -१२६४) यांचा तेराव्या शतकात प्रसिद्ध झालेला फ्रेंच विश्वकोश 'स्पेक्युलम मॅजस' (Speculum Majus) अर्थात 'बिगर मिरर' हा ८० खंडांमध्ये

प्रकाशित झाला होता. तो १८व्या शतकापर्यंत म्हणजे 'एन्सायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका'(इ.स. १७६८) प्रसिद्ध होईपर्यंत जगातला महाकोश मानला जायचा. स्पॅनिश, जर्मन, डचसारख्या तत्कालीन बहुप्रचारित भाषांमध्ये भाषांतरित झालेला महाकोश म्हणूनही या विश्वकोशाचे ऐतिहासिक महत्त्व आहे.

मुद्रणकला बहुप्रसारित होण्यापूर्वीच्या काळात युरोपमधील अधिकांश विश्वकोश लॅटिन भाषेत लिहिले जात. कारण, ती तत्कालीन सर्वदूर परिचित भाषा होती, तसेच तिला बुद्धिजीवीवर्गाची म्हणूनही ओळखली जात असे. लॅटिन साहित्याचे विविध युरोपीय भाषांमध्ये भाषांतर होणे त्या काळी प्रतिष्ठेचे मानले जायचे. लॅटिन, स्पॅनिश, फ्रेंच आणि ग्रीक या तत्कालीन अभिजात भाषा मानल्या जायच्या. इंग्रजी भाषा ज्ञानभाषा म्हणून प्रचलित झाली ती 'कॉम्पेंडियम फिलॉसॉफिया' (इ.स.सु. १३००)च्या प्रकाशनाने. याचा कोशकर्ता अज्ञात आहे. मात्र, इंग्रजीतला पहिला सुनिदर्शित कोश म्हणून 'मिरर ऑफ द वर्ल्ड' (इ.स. १४८१) विश्वकोशाचं असाधारण महत्त्व आहे. इतिहासक्रमात शब्दकोश नि विश्वकोश तयार होत राहिले; पण दहाव्या व अकराव्या शतकात विश्वकोशात्मक शब्दकोश (Encyclopedie Dictionary) असा नवा प्रकार उदयास येऊन शब्दकोश बृहत् बनले.

फ्रान्सिस बेकनच्या (१५६१ ते १६२६) 'द ग्रेट इन्स्टॉरेशन' (इ.स. १६२०) ग्रंथाने तो अपूर्ण राहूनही एक गोष्ट केली की, विषयनिहाय वर्गीकरणाची पद्धत विश्वकोश रचनाकल्पात रूढ झाली. वैद्यक इत्यादी शास्त्रांचे नवे कोश सतराव्या शतकात रचले गेले. मोरेरीने याच काळात चरित्रात्मक विश्वकोशांचा श्रीगणेशा केला. अठराव्या शतकात फ्रेड्रिक अनाल्ट ब्रोखहाउसने 'कॉन्व्हर्सेशन लॅक्सिकॉन' (१७९६ ते १८११) तयार केला. त्यामुळे वस्तुनिष्ठता, अचूकता, अद्ययावतता ही विश्वकोश परिमाणे सार्वत्रिक बनली. अठरावे शतक हे विश्वकोश इतिहासातील क्रांतिकारी शतक ठरले, ते "Encyclopedia Britanica' (१७६८ ते १७७१) च्या त्रिखंडीय कोशाच्या पहिल्या आवृत्ती प्रकाशनामुळे. सर्वश्री अँड्र्यू बेल (१७२६-१८०९), कॉलीन मॅकफार्कर (सु. १७४५-१७९३) आणि विल्यम स्मेली (१७40-१७९५) या तीन विद्वानांनी 'सोसायटी फॉर जंटलमेन इन स्कॉटलंड'संस्थेमार्फत प्रकाशित केलेला कोश. यात ४५ विषयांवरील नोंदींशिवाय ३० व्याप्तिलेख (दीर्घ) होते. १९७७ च्या

१५व्या आवृत्तीबद्दल प्रारंभी लिहिले आहेच. मार्च २०१२ मध्ये या कोशाचे अध्यक्ष जॉर्ज काऊज यांनी जाहीर करून टाकले आहे की, २०१० मध्ये प्रकाशित झालेली कोशाची १५वी सुधारित आवृत्ती, ज्यामध्ये ३२ खंड प्रकाशित करण्यात आले होते, ती या कोशाची अंतिम मुद्रित आवृत्ती ठरली. त्यांनी हेही जाहीर केले की, येथून पुढे कोशाच्या मृदुप्रती प्रकाशित असतील आणि त्या आंतरजालावर उपलब्ध राहतील.[६]

एकोणिसाव्या शतकात मुद्रण प्रसारामुळे अनेक विश्वकोश प्रसिद्ध झाले. अनेक देशांतून ते प्रकाशित झाल्याने या शतकात विश्वकोश साक्षरता सुदूर पोहोचली. पोलंडमध्ये 'Encyclopedia Powszechna' (१८५८-१८६८), हंगेरीत 'Egyetemes magyar encyclopedia' (१८६१-१८७६) (युनिव्हर्सल हंगेरियन एन्सायक्लोपीडिया) रशियातून ‘एन्सायक्लोपीडिक रेफरन्स डिक्शनरी’, डेन्मार्कहून "Allers' (१८९२-९९), असे अनेक विश्वकोश प्रकाशित होऊन आपापल्या देश, संस्कृती, भाषा आणि साहित्यगरजा पूर्ण करणारे विश्वकोश प्रचलित झाले.

जगाच्या दृष्टीने विसावे शतक हे विश्वकोशांचे शतक ठरले. आजवर राष्ट्रीय भाषांतून कोश निर्मिले गेले. या शतकात छोट्या-छोट्या भाषा सूर्य नि काजव्यांच्या स्पर्धेत सामील होत ज्ञानसमृद्ध झाल्या. मराठीसारखी प्रादेशिक भाषाही याला अपवाद उरली नाही. विसाव्या शतकाच्या प्रारंभीच अमेरिकेत ‘न्यू इंटरनॅशनल एन्सायक्लोपीडिया’चे १७ खंड प्रकाशित झाले. (१९०२-०४) पुढे तितक्याच तोडीचा ‘कोलिअर्स एन्सायक्लोपीडिया’ २० खंडांमध्ये १९५०-५१ मध्ये प्रसिद्ध झाला. पाठोपाठ अमेरिकेत ‘ॲकॅडेमिक अमेरिकन एन्सायक्लोपीडिया’चे २१ खंड १९८० मध्ये बाजारात आले. ब्रोखहाऊसची रशियन आवृत्ती प्रकाशित झाली. ६५ खंड असलेला नावाप्रमाणेच बृहत् ‘ग्रेट सोव्हिएत एन्सायक्लोपीडिया’१९२६-४७ या कालखंडात प्रकाशित होऊन रशियन भाषा ज्ञानभाषा गणली गेली. या कोशावर मार्क्स-लेनिनचा प्रभाव स्पष्ट होता. ८,००० तज्ज्ञांच्या योगदानाने साकारलेल्या या महाकोशाचा एक खंड एकट्या सोव्हिएत रशियाला समर्पित करून रशियाची सर्वांगीण माहिती, प्रगती या ज्ञानकोशाने जगापुढे ठेवून ज्ञानाच्या क्षेत्रातही रशिया महासत्ता असल्याचेच एकापरीने सिद्ध केले. या सोव्हिएत ज्ञानकोशाची इंग्रजी भाषांतरित आवृत्ती १९७०-७८ मध्ये बाजारात आणून हा कोश जगप्रसिद्ध करण्यात आला. केवळ स्पेनला

समर्पित ७० खंडीय व १० पुरवणी खंड असलेला 'एन्सायक्लोपीडिया युनिव्हर्सल इलस्ट्रडा युरोपीओ अमेरिकना'(१९०५-१९७०) कोश राष्ट्रीय ज्ञानकोश म्हणून श्रेष्ठ ठरला. 'एन्सायक्लोपीडिया इटालियाना'(१९२९-३६) विश्वकोश ३६ खंडांमध्ये प्रकाशित झाला. 'Encyclopedia Francaise' (१९३५-१९६६) असाच बृहत् फ्रेंच ज्ञानकोश होय. या शतकात वरील देश व त्यांच्या भाषांप्रमाणे चेकोस्लोव्हाकिया, बल्गेरिया, डेन्मार्क, फिनलंड, ग्रीस, हंगेरी, नेदरलँड इ. देशांमध्ये विश्वकोशांचा महापूर आला. तो इतका की विश्वकोशांचं अजीर्ण होऊन कोश चळवळ नियंत्रित करण्याचा विचार विद्वान मंडळी व्यक्त करू लागली. फ्रेंच राज्यक्रांती ते जागतिकीकरण (१९९०) असा कालखंड लक्षात घेतला तरी कोशक्रांतीचे महत्त्व समजून येते. विश्वकोशांमुळे ज्ञानाचा आविष्कार संरक्षण आणि संवर्धन कार्यसंस्कृतीचा भाग बनले.

विसाव्या शतकात विविध विषयांच्या विश्वकोश प्रकाशनाने विविध ज्ञान-विज्ञानांचा सूक्ष्म विचार नि विस्तार सुरू झाला. रसायनशास्त्र, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, कला, वास्तुविज्ञान, संगीतशास्त्र, वैद्यकशास्त्र यांचे विश्वकोश प्रकाशित झाले. शिवाय बालकोश, चरित्रकोश आकारास आले. त्यामुळे विश्वकोश आणि समग्रत: कोश वाङ्मय विकासात गती आली. युरोपबरोबर पौर्वात्य राष्ट्रांमध्येही विश्वकोशांचे महत्त्व लक्षात घेऊन प्रयत्न झाले. चीन, अरब देश, आदी ठिकाणी विश्वकोश व कोशनिर्मिती कार्य झाले.

### ३.२ भारतीय परंपरा

भारत हा विभिन्न भाषांनी समृद्ध देश आहे. या देशातील विविध प्रांत-प्रदेशांमध्ये विविध बोली, भाषा आणि लिपींचे प्रचलन आढळते. ओडिया भाषेत 'विविध सारसंग्रह'च्या रूपाने विश्वकोश निर्मितीचे प्रयत्न सुरू झाले. मायाधर मानसिंह यांनी 'ओडिया विश्वकोश' निर्मितीचा प्रयत्न केला; पण त्यास यश आले नाही. उत्कल विद्यापीठाने ज्ञानमंडळ स्थापून ७५ खंडांच्या विश्वकोशाची महत्त्वाकांक्षी योजना आकारली खरी; पण १९६० ते पुढील कालखंडात ३५ खंड प्रकाशित करण्यात ज्ञानमंडळाला यश लाभलं.

कन्नड भाषेत अकराव्या शतकापासून विश्वकोशीय ग्रंथनिर्मिती परंपरा दिसते. इ.स. १०२५ मध्ये दुसरा चामुंडराय राजाने 'लोकोपकार' हा विश्वकोशीय ग्रंथ निर्माण केला. मराठीचे पहिले लिखित याच राजाच्या

कारकिर्दीत अवतरले. 'शिरीभूवलय'असाच ग्रंथ (१९५३-५५); पण कन्नड विश्वकोश निर्मितीस गती आली ती कोट शिवराम कारंत (१९०२-१९५८) यांच्या प्रयत्नाने. 'कुमार विश्वकोशां'चे सात खंड (१९७०-७३) प्रकाशित झाले. याच दरम्यान म्हैसूर विद्यापीठाच्या पुढाकाराने द म्हैसूर युनिव्हर्सिटी कन्नड एन्सायक्लोपीडियाचे १४ खंड प्रकाशित करण्यासाठीचा संकल्प १९७० मध्ये सोडण्यात आला. कोकणी भाषेत विश्वकोशात्मक 'शब्दसागर' निर्मितीचे प्रयत्न गोवा-कोकण अकादमीने केले. गुजरातमध्ये 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशसदृश विश्वकोश निर्मिती'चे डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांचे स्वप्न होते. 'ज्ञानगंगोत्री'च्या संकल्पित ३० कोशांपैकी १९७७ मध्ये 'आयुर्विज्ञान'चा पहिला खंड प्रकाशात आला होता.

तमिळ भाषा संस्कृतप्रमाणे प्राचीन समृद्ध. पद्यमय विश्वकोशाच्या पाऊलखुणा या भाषेत आढळतात. निघंटु परंपरेचे कोश तमिळमध्ये आहेत. सातव्या शतकात 'आदि दिवाकरम्'चे ९५०० नोंदी असलेले १२ खंड त्याचेच उदाहरण. आधुनिक रचनेचे या भाषेतील प्रयत्न एकोणिसाव्या शतकात सुरू झाल्याचे लक्षात येते. इ.स. १९१०मध्ये आकारलेला 'विज्ञान कलैस्कलं जियम' छोटासा विश्वकोशच म्हणायला हवा. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'धरतीचा विश्वकोश एम. पी. पेरियार थूरन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाला. १९६८ मध्ये दहावा पुरवणी खंड प्रकाशित होऊन या संकल्पाची सांगता झाली. तमिळ अकादमीने हे कार्य केले. नंतर मुलांसाठीही दहा खंड प्रकाशित करण्यात आले. 'कुलंदैकल-कलैक्कलंजियम'(१९६८-७६) हा तो बालविश्वकोश होय.

तेलुगू, पंजाबी, हिंदी, मल्याळम्, बंगाली इ. अन्य भारतीय भाषांमध्ये विश्वकोश निर्मितीचे प्रयत्न झालेले दिसतात. बंगाली आणि हिंदी भाषेत यासंदर्भात मोठे कार्य झाले. बंगालीत फेलिक्स कॅरी (१७८६-१८२२)पासून विश्वकोश निर्मितीचे प्रयत्न झाले. 'शिक्षा कोश'(१९०७), 'शिशु भारती' (१९३३) पासून ते बंगीय साहित्य परिषदेच्या 'भारत कोश'(१९५९)पर्यंत ही परंपरा दिसते. मल्याळम् भाषेत 'द स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ एन्सायक्लोपीडिया पब्लिकेशन' या केरळ सरकार साहाय्यित 'सर्वज्ञानकोम्'चे संकल्पित २० खंडांपैकी ६ खंड १९७२ नंतर प्रकाशित झालेले दिसतात. हिंदी भाषेतला पहिला विश्वकोश १९११मध्येच २२ खंडीय विश्वकोश पूर्ण करणाऱ्या नागेंद्रनाथ बसू यांनी हिंदीतील पहिला विश्वकोश अनेकांच्या सहकार्यातून

पूर्ण केला. धीरेंद्र वर्मा संपादित 'साहित्य कोश'(दोन खंड - १९६४), 'हिंदी विश्वभारती'(१० खंड, १९७७), 'हिंदी साहित्य ज्ञानकोश'(७ खंड, २०१९) असे अनेक उल्लेखनीय विश्वकोश, विषयकोश हिंदीत उपलब्ध आहेत. भारतीय संविधानाच्या सहाव्या परिशिष्टातील २२ राज्यभाषा या वर्तमान भारतीय भाषा असून, त्या सर्वांतून कोशवाङ्मय निर्मितीचे छोटे-मोठे प्रकल्प वेळोवेळी हाती घेऊन ते तडीस नेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसते.

**३.३ महाराष्ट्रीय परंपरा**

मराठी भाषा आणि साहित्यात विश्वकोशाचा विचार सर्वप्रथम पेरला तो गोविंद नारायण माडगावकर (१८१५-६५) यांनी. १८५६च्या 'मराठी ज्ञानप्रसारक सभा', मुंबईच्या बैठकीत त्यांनी 'इंग्रजीतील एन्सायक्लोपीडियासारखा ग्रंथ मराठीत झाल्याखेरीज तिला पूर्णता येणार नाही', असे उद्गार काढले होते. यादृष्टीने पाहू लागू तर कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८२४-७८) यांनी रचलेला 'अनेकविद्या-मूलतत्त्व संग्रह' (१८६१) या दृष्टीने केलेला प्राथमिक प्रयत्न होय. पुढे १९०६ व १९०८ च्या पुण्यातील साहित्य संमेलनात या विषयाचा ऊहापोह झाला. त्या चर्चेत सर्वप्रथम 'एन्सायक्लोपीडिया'ला 'विश्वकोश' हा मराठी शब्द मिळाला. त्या विचाराने विष्णू गोविंद विजापूरकर (१८६३-१९२६) यांनी पाठपुरावा केला. बडोद्याच्या रावजी केशव सांबारे यांनी एप्रिल १८६८ मध्ये 'विद्याकल्पतरू'नावाने मासिक सुरू केले. त्याचे उपशीर्षक 'मराठी सायक्लोपीडिया'असेच होते. मार्च १८७१ पर्यंत या मासिकाचे अंक प्रकाशित होत राहिले. प्रकाशित अंकांमधून 'उन्माद' विषयापर्यंतच्या ५७६ पृष्ठांचा मजकूर प्रकाशित झाला होता. असाच प्रयत्न नंतर १८७८ मध्ये रत्नागिरीहून जनार्दन हरी आठल्ये यांनी 'विद्यामाला'मासिक प्रकाशित करून केला. 'विचार करून केलेले प्रत्येक वस्तूचे अन्योन्य पार्श्वस्थित स्पष्ट निरूपण'असे या मासिकाचे ब्रीद विश्वकोश चळवळीस बळ देणारे ठरले होते. 'अ' कारातच मासिकाचा अवतार आवरला. त्याला संपादकांनी 'ए मंथली पॅंप्लेट' संबोधिले होते. दत्तात्रय गोविंद सडेकरांनी 'प्रसंग रत्नावली किंवा बुद्धिवैभव' शीर्षक धारण करून छोटासा ज्ञानकोश प्रकाशित केला होता. त्यात वैद्यक, ज्योतिष, कला, कौशल्यविषयक नोंदी होत्या. १८९३ मध्ये मोरो विनायक शिंगणे यांनी 'माझे प्रिय पुस्तक अथवा व्यवहारदर्पण' प्रसिद्ध

केले ते छोट्या ज्ञानकोशाच्या धर्तीचे होते. अशा प्रयत्नांमधून मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीत विश्वकोश चळवळीची मुळे दिसून येतात. या सर्व प्रयत्नांत मराठी भाषा आणि साहित्य ज्ञानसमृद्ध झाले पाहिजे, अशी महत्त्वाकांक्षा दिसून येते.

पण रूढार्थाने ज्याला विश्वकोश म्हणता येईल, असा 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी १९२० ते १९२९ या कालखंडात त्याचे २३ खंड प्रसिद्ध केले. खऱ्या अर्थाने 'मराठी विश्वकोश वाङ्मयजनक'म्हणून जे श्रेय द्यावे लागेल. त्याचे हक्कदार ज्ञानकोशकार डॉ. केतकरच ठरतात. त्यांनी गुजराती, हिंदी, बंगाली विश्वकोशनिर्मितीस गती व साहाय्य केल्याचे दिसून येते. आता 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'ची मुद्रित प्रत प्रकाशित होत नाही. परंतु, तो जसा आंतरजालावर उपलब्ध आहे, तसाच डॉ. केतकर संपादित 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सौजन्याने आंतरजालावर उपलब्ध आहे. आंतरजालावर विश्वकोश उपलब्ध होणे हे मुक्तज्ञान चळवळीचे यश आहे. त्यामुळे सामान्य वाचकास विश्वकोश २४ X ७ असे सदासर्वकाळ मोफत उपलब्ध होतात. याला आता जगभर 'The Open Source Movement' म्हणून ओळखलं जातं.

मराठीत विश्वकोश निर्मितीचे प्रयत्न झाले. त्यात ग. रं. भिडे (१९०९-८१) संपादित 'सचित्र व्यावहारिक कोश'(१९३५-४०) (५ भाग), य. रा. दाते (१८९१-१९७३) व चिं. ग. कर्वे (१८९३-१९६०) यांच्या साहाय्याने तयार झालेला 'सचित्र सुलभ विश्वकोश'(६ भाग) (१९४९-५१) यांचा उल्लेख करावा लागेल. १९६३-१९७९ या काळात ग. रं. भिडे यांनी आपला 'सचित्र व्यावहारिक कोश' सुधारून त्याचे ५ भाग 'अभिनव मराठी ज्ञानकोश'रूपात प्रकाशित केले. ग. रं. भिडे यांनी बालकोशाचीसुद्धा योजना आखली होती. परंतु, १९४२ मध्ये ते त्याचा एकच भाग प्रसिद्ध करू शकले.

डॉ. केतकर यांच्या वरील ज्ञानकोशानंतर ३५ वर्षांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर १९ नोव्हेंबर, १९६२ रोजी नामदार यशवंतराव चव्हाण स्वतंत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी 'मराठी भाषा, साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई'ची स्थापना केली. तत्पूर्वी, त्यांनी 'मराठी भाषा संचालनालय' स्थापन केले. या सर्वांतून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती विकासास गती मिळाली.

## ४. मराठी विश्वकोशाची निर्मिती

### ४. १ पार्श्वभूमी

### विश्वकोशाचे सूतोवाच

एकीकडे राजकीय पटलावर भाषा ही अशा चळवळीचे साधन बनू पाहत होती, तर दुसरीकडे याच काळात मराठी साहित्यजगतास वैश्विक भान येऊ लागले होते. सन १९१७ मध्ये इंदूर इथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनातील अध्यक्षपदाच्या भाषणात साहित्यकार गणेश जनार्दन आगाशे यांनी 'देशी भाषेतून शिक्षण देण्याविषयी युनिव्हर्सिटीची व सरकारची संमती मिळविणे या कामास फारसे आयास पडतील असे वाटत नाही,'[७] असा आशावाद व्यक्त केला होता. या भाषणात त्यांनी 'डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी', 'ओल्ड ॲकॅडमी ऑफ सायन्सेस', 'फ्रेंच ॲकॅडमी'सारख्या देशी-विदेशी भाषा संस्थांचे दाखले देऊन मराठीत शास्त्रीय ग्रंथमाला, विश्वकोश रचण्याची सिद्धता होत आहे याबद्दल अभिनंदन केले होते.[८]

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील कायदेभंग चळवळीनंतर महाराष्ट्रात सन १९३८ आणि १९३९ साली अनुक्रमे स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर व महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषाणातून मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी अधिक प्रतिबद्धपणे प्रयत्न करण्याचे व त्यासाठी इंग्रजी मानसिकता व गुलामगिरीतून मुक्त होण्याची केलेली आव्हाने आणि सन १९४६ साली बेळगाव येथील साहित्य संमेलनात झालेला संयुक्त महाराष्ट्राचा ठराव यामुळे मराठी भाषेसाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मागणी जोर पकडत गेली व त्याची परिणती म्हणून संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेतृत्वाखालील आंदोलन अधिक तीव्र व उग्र बनले. याला राजकीय पटलावर काँग्रेसकडून सतत चालढकलीचे धोरणही कारणीभूत होते. सन १९४०ला यशवंतराव चव्हाण सातारा जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष झाल्यानंतर सन १९४२च्या 'चले जाव' चळवळीतून यशवंतरावांचे नेतृत्व महाराष्ट्र काँग्रेसमध्ये उदयाला आले. सततचे राज्य दौरे, संपर्क, भाषणे इत्यादींतून ते पुढे सन १९४८ला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे चिटणीस झाले. स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्माण व्हावे, असे महाराष्ट्रातील काँग्रेसजनांना वाटत असले, तरी काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वापुढे गुजरात आणि कर्नाटक ही राज्ये भाषावार प्रांतरचनेनंतरही आपली राहिली पाहिजेत, हा आग्रह होता.

त्यामुळे मुंबई स्वतंत्र ठेवणे, मुंबईसह महाराष्ट्र, मुंबईसह गुजरात, सीमाभागासह कर्नाटक की अन्य पर्याय यांची चाचपणी चालू होती. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी देश स्वतंत्र झाल्यावर भाषावार प्रांतरचनेचे धोरण अंगिकारूनही राज्य विभाजनाचा पेच सुटत नव्हता. यशवंतराव चव्हाण, भाऊसाहेब हिरे, मोरारजी देसाई हे काँग्रेसचे नेते या परिस्थितीत इच्छा असून समान वा एका निर्णयावर येणे (विशाल वा द्वैभाषिक, त्रैभाषिक महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर) अवघड होऊन बसले होते. विरोधी पक्षांपुढे विदर्भासह महाराष्ट्राचे आव्हान होते.

**४.२ भाषावार प्रांतरचना**

भारत स्वतंत्र झाल्यावर एकीकडे घटना परिषद स्थापून स्वतंत्र भारताच्या राज्यकारभाराची रचना ठरविण्यासाठी घटना परिषद अस्तित्वात आली. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली मा. राष्ट्रपती व घटना समितीचे डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी राज्य पुनर्रचना आयोगाची नेमणूक केली (१७ जून, १९४८). या आयोगाने सर्वंकष अभ्यास करून केंद्र सरकारला आपला अहवाल डिसेंबर १९४८ला सादर केला. या अहवालावर वादळ उठल्याने त्याचा अभ्यास करून निर्णय घेण्यासाठी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, गृहमंत्री वल्लभभाई पटेल, राष्ट्रीय काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष पट्टाभी सीतारामय्या यांची त्रिसदस्य समिती नेमण्यात आली. दार आयोगाचा अहवाल महाराष्ट्रावर अन्याय करणारा होता. कारण, त्यात महाराष्ट्र व विदर्भ अशी दोन राज्ये सुचविण्यात आली होती. महाराष्ट्राचे हे विभाजन बहुसंख्याकांना पसंत न पडल्याने त्याचा विरोध होणे स्वाभाविक होते.

उपरोक्त त्रिसदस्य समितीने दार आयोगाच्या अहवालाचा व त्यातील त्रुटींचा परामर्श घेऊन भाषावार प्रांतरचनेची चतुःसूत्री सुचविली. ती लक्षात घेऊन दार आयोगाने सुधारित अहवाल सादर केला (एप्रिल १९४९). त्यानुसार १) भौगोलिक सलगता २) आर्थिक स्वावलंबन ३) प्रशासनिक शक्यता ४) विकास क्षमता या चार तत्त्वांवर आधारित प्रांतरचना करण्याचे निश्चित करण्यात आले; पण सध्याची वेळ राज्य पुनर्रचनेस योग्य नसल्याचे निदर्शनास आणून देऊन अहवालावरील कार्यवाही स्थगित ठेवण्याचे धोरण अवलंबिण्यात आले.

दरम्यानच्या काळात देशभर राज्य पुनर्रचनेच्या अनुषंगाने अनेक राज्यांत छोटा-मोठ्या चळवळी, आंदोलने सुरूच राहिली. तत्कालीन मद्रास प्रांतात

कन्नड भाषिकांनी 'महाकर्नाटक'ची मागणी केली. महाराष्ट्रात महाराष्ट्र एकीकरण समिती, संयुक्त महाराष्ट्र समिती सक्रिय होती. मल्याळी भाषिकांना कोचीन, त्रावणकोर, मलबार असे एकत्रित राज्य हवे होते. गुजरातमध्ये के. एम. मुन्शी 'महागुजरात'साठी आग्रही व आक्रमक होते. तिकडे आसामींना बंगालच्या वर्चस्वातून मुक्ती हवी होती, तर बिहारीही बंगालपासून स्वतंत्र बिहार राज्य मागत होते. सन १९५३ मध्ये आंध्रात झालेल्या पोट्टी रामल्लच्या बलिदानामुळे स्वतंत्र आंध्र प्रदेश निर्माण करणे भाग पडले, तसेच नोव्हेंबर १९५५, जानेवारी १९५६ मध्ये मुंबई, बेळगाव इथे झालेल्या उग्र आंदोलनात गोळीबार झाला. त्यात १०५ जणांचे बलिदान झाले. परिस्थिती हाताबाहेर जाते हे पाहून केंद्र सरकारने सन १९५६ मध्ये गुजरात व महाराष्ट्राचे मिळून द्वैभाषिक राज्य स्थापन केले आणि त्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी १ नोव्हेंबर, १९५६ रोजी शपथ घेतली.

### ४.३ महाराष्ट्र राज्याची स्थापना

द्वैभाषिक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर केलेल्या एका भाषणात यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या जनतेस आश्वासन दिले की, 'चळवळ दडपण्याकरता हत्यार मी मुळीच वापरणार नाही.'[९]

द्वैभाषिक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून आपल्यावर असलेल्या जबाबदारीचे त्यांना भान होते. ते स्पष्ट करताना ते म्हणाले होते की, 'आता महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि गुसात असा सर्व प्रदेश राज्यात आला आहे, त्याच्या विकासाचे काम करणे ही खरी जबाबदारी आहे.[१०] द्वैभाषिक महाराष्ट्र सरकार कार्य करू लागले. चारच महिन्यांत विधानसभेची निवडणूक घोषित झाली. निकालात काँग्रेसला बहुमत मिळाल्याने यशवंतराव चव्हाण पुन्हा मुख्यमंत्री झाले. संयुक्त महाराष्ट्र १०२ जागांवर विजय मिळाला. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी प्रतिकूल परिस्थितीतही सामंजस्याचे धोरण अंगिकारल्याने लोकमत बदलून कटुता कमी झाली; पण जनतेस मराठी भाषिकांचा स्वतंत्र महाराष्ट्र हवा होता. आचार्य प्र. के. अत्रे, साथी एस. एम. जोशी प्रभृती मान्यवरांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्र समिती प्रयत्नशील होती. प्रतापगडावर छ. शिवाजी महाराजांचा आश्वारुढ पुतळा उभारण्यात आला होता. त्याचे अनावरण पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते संपन्न झाले. संयुक्त महाराष्ट्र समितीने पंतप्रधानांना काळे झेंडे

दाखवून लोकभावनांची जाणीव करून दिली. इकडे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण विविध विद्यापीठ स्थापना, शेती व उद्योगास गती असे निर्णय घेत होते, तर दुसरीकडे केंद्रीय नेतृत्वास लोकभावनांची जाणीव करून देत होते. परिणामी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा मार्ग मोकळा होऊन १ मे, १९६० रोजी मराठी भाषिक स्वतंत्र महाराष्ट्राची स्थापना करण्यात आली. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड करण्यात आली. नवीन राज्याच्या उद्घाटन सोहळ्यातील भाषणात नामदार यशवंतराव चव्हाण यांनी मराठी भाषा विकासासाठी स्वतंत्र संचालनालयाच्या स्थापनेची घोषणा करून नवे सरकार मराठी भाषा व साहित्य समृद्धीसाठी कटिबद्ध राहील, अशी ग्वाही दिली. दरम्यान, मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे ज्येष्ठ स्नेही व मार्गदर्शक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे रॅडिकल ह्युमॅनिस्ट पक्ष विसर्जित झाल्यापासून (१९४८) पुन्हा काँग्रेसच्या संपर्कात आले. निवडणूक प्रचारात भाषणे देऊन त्यांनी काँग्रेसमधील आपली सक्रियता अधोरेखित केली होती. उभयतांमध्ये नव्या महाराष्ट्र निर्मितीबाबत विचारविनिमय होऊ लागला होता. आता ती एक नित्याचीच बाब झाली होती.

### ४.४ मराठी भाषा संचालनालयाची निर्मिती

मराठी भाषिकांची स्वतंत्र मराठी राज्य म्हणून महाराष्ट्र निर्माण करण्याची चळवळ अंतिम टप्प्यावर येऊन पोहोचली होती. महाराष्ट्राचे नेते, मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण मराठी राज्याचे आपले स्वप्न वेगवेगळ्या प्रसंगीच्या भाषणांमधून व्यक्त करत होते. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या पूर्वसंध्येस ते छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी शिवनेरीस गेले होते. उपस्थितांना संबोधित करताना ते म्हणाले, ''नवमहाराष्ट्राच्या निर्मितीकरिता आपण आता प्रतिज्ञाबद्ध आहोत. या आनंदोत्सवाची स्मृती म्हणून या राज्याची जी मुद्रा आम्ही निश्चित केली आहे, तिच्यावर

**प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता**
**महाराष्ट्रस्य राज्यस्य मुद्रा भद्राय राज्यते**

ही शिवाजी महाराजांनी निवडलेली वाक्ये आम्ही घेतली आहेत. याचा अर्थच हा की, ही राज्यसत्ता लोककल्याणाकरिता राबविणार आहोत.''[११] महाराष्ट्र राज्याचा उद्‌घाटन समारंभ राजभवन, मुंबईत पार पडला. तेव्हा त्यांनी ग्वाही दिली की, ''महाराष्ट्राचे हे राज्य निर्माण झाले,

ते मराठी जनतेच्या कल्याणाचे काम करीलच; परंतु मराठी भाषिकांजवळ जे देण्यासारखे आहे, त्यांच्या जीवनामध्ये जे चांगले आहे, जे उदात्त आहे, त्याचा त्याग जर करायचा असेल तर तो आम्ही भारतासाठी प्रथम करू.''[१२] यापूर्वी सावरगाव डुकरे येथे विदर्भ साहित्य संमेलनाचा उद्‌घाटन सोहळा मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते संपन्न झालेला होता. तेव्हाही त्यांनी स्पष्ट केले होते की, ''भाषिक राज्याच्या मागणीच्या पाठीमागे एकभाषिक जनतेच्या सांस्कृतिक विकासाचा जसा हेतू आहे, तशीच त्या राज्याच्या भाषेला मानाच्या महत्पदी बसविण्याची ही कल्पना आहे. मराठी भाषिक राज्याचे माझ्या मनात चित्र काढण्याचा जेव्हा मी प्रयत्न करतो, तेव्हा मराठी जनता राज्यसिंहासनावर येऊन बसली आहे, असे चित्र उभे राहण्याऐवजी या सिंहासनावर मराठी भाषा विराजमान झाली आहे, असेच चित्र माझ्या मनात चितारले जाते.''[१३] या भावनेने नवमहाराष्ट्र सरकारने मंत्रिमंडळ शपथविधीदिनीच मराठी भाषेत राज्यकारभार करण्याच्या उद्देशाने 'मराठी भाषा संचालनालय' स्थापनेची घोषणा केली होती. ते करून शासन थांबले नाही. ज्ञान विज्ञानाच्या क्षेत्रांत होणाऱ्या मूलभूत संशोधनात मराठी भाषेच्या वापराबद्दल शासन आग्रही व जागरूक होते. औरंगाबाद, कोल्हापूर येथे मराठीतून उच्च शिक्षण देणारी विद्यापीठे स्थापण्याचा शासनाचा प्रयत्न होता. याचाच एक भाग म्हणून १९ नोव्हेंबर, १९६० रोजी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. त्याच्या अध्यक्षपदी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नियुक्ती करण्यात आली. यासाठी जे सल्लागार मंडळ निवडण्यात आले, त्यात सर्वश्री पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, डॉ. सरोजिनी बाबर, श्री. ए. ए. ए. फैजी, डॉ. ना. गो. कालेलकर, सेतुमाधवराव पागडी, बापूराव नाईक आदी प्रभृती मान्यवरांचा अंतर्भाव होता.

हे मंडळ अस्तित्वात येणे म्हणजे शासनाने संकल्पित व आश्वासित केलेल्या स्वप्नांची पूर्तताच होती. नवगठित महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेचे पहिले अधिवेशन संपन्न होत असताना केलेल्या पहिल्या अभिभाषणात तत्कालीन राज्यपाल श्रीप्रकाश म्हणाले होते की, ''सरकारने मराठी भाषेच्या विकासासाठी आणि समृद्धीसाठी महाराष्ट्राची भाषा, संस्कृती आणि इतिहास यांच्यासंबंधीच्या संशोधनाकडे तातडीने लक्ष देण्याचे ठरविले आहे. अशा प्रकारच्या संशोधनास उपयुक्त होईल असे साहित्य निरनिराळ्या भारतीय व

पाश्चात्य भाषांत भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. म्हणून या बाबतीतील संशोधनाचे काम हाती घेण्यासाठी व त्यावर देखरेख ठेवण्यासाठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व विद्वानांची एक उच्चाधिकार यंत्रणा लवकरच निर्माण करण्याचा महाराष्ट्र सरकारचा विचार आहे.''[१४] वरील मंडळाची स्थापना याचाच परिपाक होता. सदर मंडळाचे औपचारिक उद्घाटन २२ डिसेंबर, १९६० रोजी नागपूर येथे विधानसभेच्या पहिल्या हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने झाले.

सदर मंडळाकडून सरकारच्या अपेक्षा व्यक्त करताना मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यापुढे अखिल भारतीय पातळीवर भारतीय भाषा आणि साहित्य विकासार्थ तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी सन १९५४ मध्ये स्थापन केलेली 'साहित्य अकादमी' सारखी संस्था होती. ते मंडळाच्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले की, ''वेगवेगळ्या भाषेतील दुर्मीळ ग्रंथ प्रसिद्ध करणे, इतिहासाचे, वाङ्मयाचे आणि निरनिराळ्या संस्कृतींचे संशोधन करणे यांसारखे विविध स्वरूपाचे कार्य ही संस्था करीत असते. साहित्य अकादमीसारखेच व शक्य झाल्यास त्यापेक्षाही अधिक व्यापक स्वरूपाचे कार्य या मंडळाकडून व्हावे, या उद्देशाने हे मंडळ स्थापन करण्यात आले आहे.''[१५] या मंडळासंदर्भात महाराष्ट्र शासनाची भूमिका तटस्थ नि मंडळाची स्वायत्तता स्वीकारून ती जपण्याची राहील, हे स्पष्ट करत पुढे या भाषणात त्यांनी सांगितले की, ''या मंडळाच्या निर्मितीसंबंधी जो सरकारी आदेश प्रसिद्ध झाला आहे, त्यात या मंडळाच्या कार्याची व्याप्ती स्थूलमानाने दर्शविण्यात आली आहे; परंतु या मंडळाने कुठल्या प्रकारचे कार्य करावे, ते कोणत्या पद्धतीने करावे, यासंबंधी कुठलेही बंधन नाही. कुठल्याही मर्यादा शासन या मंडळावर घालू इच्छित नाही.''[१६] मंडळात कार्य करणाऱ्या व्यक्तींबद्दलचा आदर व्यक्त करत ते नम्रपणे स्पष्ट करतात की, ''देशातील विचारवंत, कलावंत, लेखक, शास्त्रज्ञ व संशोधक यांच्या प्रयत्नाने निर्माण होणारे विचारधन हेच समाजाचे फार मोठे धन आहे, असे मी आणि महाराष्ट्र शासन मानते. ते असले तरच देश ओळखला जातो. समाज ओळखला जातो. समाजाचे जीवन प्रवाही राहते. समाज जिवंत राहतो. तो त्याच्याजवळ असलेल्या भौतिक सामर्थ्याने नव्हे, तर त्याच्याजवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यांवर आणि विचारधनावर तो जिवंत राहतो आणि वाढतो. असाच इतिहासाचा दाखला आहे.''[१७]

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या उद्घाटनानंतर मुंबईस्थित तत्कालीन सचिवालयाच्या (आजचे मंत्रालय) पाचव्या मजल्यावर मंडळाच्या कार्यालयाची व्यवस्था करण्यात आली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी तिथून आपले कार्य सुरू केले. मराठी भाषेसाठी आधुनिक ज्ञान विज्ञानाच्या साधनांची पायाभूत जुळणी, मराठी भाषेस ज्ञानभाषा म्हणून समृद्ध करण्याच्या हेतूने श्रेष्ठ ग्रंथांचे भाषांतर, मूलभूत ग्रंथलेखनास अर्थसाहाय्य, कोश, परिभाषासंग्रहनिर्मिती इत्यादी कार्ये प्रथमतः हाती घेतली. त्यासाठी अर्थयोजना व मनुष्यसंग्रह अशा दोन्ही स्तरावर कार्य आरंभिले.

**४.५ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ : स्थापना**

महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर १९ नोव्हेंबर, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना करण्यात आली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले. या मंडळावर वर नमूद केल्यानुसार अनेक मान्यवर सल्लागार, सदस्य, सचिव इत्यादींची पाच वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली होती. सदस्यांत महामहोपाध्याय वा. वि. मिराशी, प्राचार्य दि. धों. कर्वे, प्रा. डॉ. अमृत माधव घाटगे, प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. न. र. फाटक, प्रा. वा. ल. कुलकर्णी, डॉ. पु. म. जोशी प्रभृतींचा समावेश होता. या मंडळाची खालील उद्दिष्टे ठरविण्यात आली होती-

*** उद्दिष्टे**[१८]

१. महाराष्ट्र राज्याच्या भाषा, संस्कृती आणि इतिहाससंबंधी प्रकल्प, योजना आणि संशोधनसंदर्भात चालना देणे, साहाय्य करणे वा त्या हाती घेऊन कार्यवाही करणे.
२. अशा प्रकारच्या मराठी संशोधन प्रकाशनास चालना देणे, साहाय्य करणे वा ते हाती घेऊन कार्यवाही करणे.
३. मराठीतील विविध ज्ञान विज्ञान शाखांतील स्वतंत्र, मौलिक लेखन, संशोधन निबंध, प्रबंध, नियतकालिके वा तत्सम साहित्य प्रकाशनास चालना देणे, साहाय्य करणे वा त्या हाती घेऊन त्यांची अंमलबजावणी करणे.
४. मराठीतील सूची, विश्वकोश, शब्दकोशसदृश संदर्भ साहित्य प्रकाशन प्रकल्प, योजनांची पूर्वतयारी करणे, चालना देणे, साहाय्य करणे अथवा त्या हाती घेऊन त्यांची अंमलबजावणी करणे.

५. साहित्य अकादमी वा तत्सम संस्थांनी न केलेल्या भारतीय व परदेशी भाषांतील अभिजात वा अन्य असामान्य साहित्याच्या मराठी भाषांतर व प्रकाशनास चालना देणे, साहाय्य करणे वा तसे प्रकल्प, योजना हाती घेऊन त्यांची पूर्तता करणे.

६. महाराष्ट्राच्या इतिहास आणि संस्कृतीवर प्रकाश वा प्रभाव टाकणाऱ्या पूर्वप्रकाशित (परंतु अप्राप्य) अथवा अप्रकाशित साहित्याच्या संपादन, भाषांतर आणि प्रकाशन प्रकल्प, योजनांना चालना, साहाय्य, प्रोत्साहन देणे वा त्या स्वत: हाती घेऊन त्यांची अंमलबजावणी करणे.

७. महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहाससंबंधी प्रकाशन, योजनांची पूर्वतयारी करणे, त्यांना चालना देणे, साहाय्य करणे वा हाती घेऊन त्यांची पूर्तता करणे.

८. मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीसंबंधी विकासाच्या विविध ज्ञान, विद्याशाखांतील नवनवीन विषय, क्षेत्र, दिशांचा शोध घेऊन त्यांचे संशोधन व मूल्यमापन करणे.

९. शासनास वेळोवेळी मंडळाच्या वा अन्य अनुदानित, विनाअनुदानित साहित्य, भाषा, संस्कृतीसंबंधी स्वयंसेवी संस्थांच्या योजना, प्रकल्प, उपक्रम, संशोधन, योगदान, उपलब्धी इत्यादींची माहिती देणे.

१०. ऐतिहासिक संशोधन व साहित्य विकाससंबंधी धोरणनिश्चितीसंदर्भात शासनास साहाय्य करणे.

**४.६ मराठी विश्वकोष : कार्ययोजना**[१९]

१. मराठीमध्ये 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'प्रमाणे सर्वसंग्राहक विश्वकोश संपादित करून प्रकाशित करणे. या विश्वकोशाचे ब्रिटानिका आकाराच्या प्रत्येकी १००० पृष्ठांचे १९ खंड संकल्पित केले आहेत.

२. अद्ययावत कागदपत्रांचा उपयोग करून अंदाजे प्रत्येकी ५०० पृष्ठांच्या ५ खंडांत महाराष्ट्राच्या इतिहासाचे संपादन व प्रकाशन करणे.

३. मराठी बोलीभाषांचा शास्त्रीय अभ्यास करून त्या बाबतीत माहिती प्रकाशित करणे.

४. अन्य भारतीय आणि प्रमुख परदेशी भाषांच्या अभ्यासाची साधने द्विभाषिक कोश, भाषाप्रवेश आणि वाचन पाठमाला या विविध स्वरूपांमध्ये मराठी भाषिकांना उपलब्ध करून देणे.

५. मराठीत अन्य भाषांतील उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित करून मराठी वाङ्मयाच्या समृद्धीस मदत करणे.

६. शास्त्रीय आणि तांत्रिक विषयांवर त्याचप्रमाणे समाजशास्त्रे आणि मानव्यविद्या या विषयांवर विचारपूर्ण अशा सुटसुटीत ग्रंथांची निर्मिती करणे.

७. विद्वान लेखक व प्रतिष्ठित संशोधन संस्था यांचे लेखन वा संशोधन प्रकाशित करण्यासाठी अनुदान देणे.

या उद्दिष्ट आणि कार्ययोजनेच्या अनुषंगाने मंडळाने आरंभीच्या दोन वर्षांमध्ये भरपूर विचारविनिमय करून हाती घ्यावयाच्या योजना, भाषांतरे, भाषांतरित केले जावयाचे ग्रंथ, प्रकाशित केले जावयाचे ग्रंथ, कोश, लेखक, भाषांतरकार, संशोधक, समीक्षक इत्यादींचा शोध घेऊन प्रत्यक्ष हाती घ्यावयाच्या ग्रंथ, कोश, भाषांतरे इ.ची सूची तयार करून प्रत्यक्ष कार्य सुरू केले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या कार्यकाळात (१९ नोव्हेंबर, १९६० ते ३० नोव्हेंबर, १९८०) सुमारे दीडशे ग्रंथ (?) प्रकाशित झाल्याचे आढळते. या ग्रंथांना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी छोट्या-मोठ्या प्रस्तावना, निवेदने, पुरस्कार स्वरूपाचे लेखन केले. हे ग्रंथ मूलभूत, भाषांतरित असून, त्यात भाषा, साहित्य, इतिहास, विविध ज्ञान-विज्ञाने, लिपी, बोली, धर्म, तत्त्वज्ञान, पत्रे, अभिजात साहित्यकृती इत्यादींचा समावेश आहे.

'धर्मकोश'आणि 'मीमांसा कोश'यांच्या संपादनाचा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना अनुभव होता. त्याआधारे 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका' धर्तीचा सर्वविषयसंग्राहक असा 'मराठी विश्वकोश' तयार करण्याची योजना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने आपल्या कार्याची दोन वर्षे पूर्ण होत असताना नोव्हेंबर १९६२[२०] मध्ये सुरू केली. या कोशाची विस्तृत माहिती देणारा ग्रंथ, 'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ' तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी २ एप्रिल, १९६५ (गुढीपाडवा) रोजी प्रकाशित केला आहे. सदर मराठी विश्वकोशाचे स्वरूप या ग्रंथात विशद करण्यात आले आहे.

### ४.७ मराठी विश्वकोशाचे स्वरूप

मराठीमध्ये संदर्भसंपन्न अशा विश्वकोशाची गरज होती. ती या कोश प्रकल्पाच्या अधिकांशाने पूर्तता झाली आहे. आजमितीस या कोशाचे एकूण २२ खंड प्रकाशित झाले आहेत. पैकी २० खंड हे मूळ नोंदी खंड (संहिता खंड) होत. त्यातील २०व्या खंडाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग प्रकाशित आहेत. प्रारंभीच्या काळात १८ वा खंड सन १९७३ मध्ये 'परिभाषासंग्रह' म्हणून स्वतंत्रपणे प्रकाशित करण्यात आला होता. हा खंड

मराठी विश्वकोशात वापरल्या जाणाऱ्या पारिभाषिक व इतर शब्दांचा अकारविल्हे रचलेला मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी असा दुहेरी संग्रह आहे. क्रमाने प्रकाशित झालेला २१वा खंड हा 'सूचिखंड'आहे. मराठी विश्वकोशाच्या सर्वविषयसंग्राहक अशा १ ते २० खंडांतील एकूण १८,२४४ नोंदींमधील तपशीलवार माहिती वाचकाला मिळवणे सुलभ होईल, अशी सूची खंडाची योजना व रचना आहे. हा खंड एकूण १,१२६ पृष्ठांचा असून, त्यामध्ये मराठी विश्वकोशाच्या २२,३५८ पृष्ठांतील सुमारे ३ लाख निर्देशनोंदींचा समावेश वर्णानुक्रमे तीन स्तंभांमध्ये अकारविल्हे केलेला आहे.[२१] योजनेनुरूप २२वा खंड हा 'नकाशाखंड' असून, तो अद्याप पूर्ण व्हावयाचा आहे. तो प्रकाशित झाला की, हा प्रकल्प पूर्ण होईल.

एकविसावे शतक हे ज्ञानाची कवाडे सर्वांसाठी सर्व अंगांनी खुले करणारे व अंतिम निरक्षरास साक्षर करण्याची मनीषा बाळगणारे शतक होय. भारतात ७४.४ टक्के साक्षरता झाली असताना हा विश्वकोश सामान्यांच्या हाती येणे याला विशेष असे सामाजिक महत्त्व आहे. ज्ञान ही कुणा एका जात, वर्ग, वर्णाची मक्तेदारी न राहता शिक्षण हा सर्वसामान्यांचा हक्क बनल्याच्या काळात अधिकांशाने पूर्ण होऊन हाती येणे याचे विशेष असे औचित्य आहे, त्यामुळे मराठी विश्वकोश सर्वसामान्यांचे ज्ञानसाधन व माध्यम बनला आहे. जागतिकीकरणाने दिलेल्या उदारतेमुळे माहिती व तंत्रज्ञान आणि माध्यम युगाच्या व्यापक प्रचार-प्रसारामुळे जी संगणकीय संपर्क क्रांती झाली, त्यामुळे महाजालीय ज्ञानसमाज निर्माण होणे शक्य झाले आहे. भ्रमण दूरध्वनी (मोबाईल), दूरपत्रे (ई-मेल), महाजाल (इंटरनेट), संगणक (कॉम्प्युटर) इत्यादींतून विकसित झालेल्या साठवण व संक्रमण इत्यादींची तबकडी (सीडी), संग्रहसाधक (पेनड्राईव्ह), भ्रमणध्वनीमध्ये आज आपण मराठी विश्वकोशांचे हजारो पृष्ठीय खंड वाचू, पाहू, ऐकू शकतो. या सहजतेमुळेही मराठी विश्वकोश सामान्यांच्या सहज उपलब्धतेचे (तेही मोफत!) ज्ञानसाधन बनले आहे. प्रतिलिपी, संग्रह, इ.मुळे तो खऱ्या अर्थाने 'ज्ञानगंगा घरोघरी' पोहोचवणारा 'ज्ञानदूत' बनला आहे.

आज इंग्रजी, जर्मन, स्पेन, रशियन, फ्रेंच इ. भाषांमध्ये इतके विश्वकोश तयार झालेत की, आता पुरे म्हणण्याची स्थिती येऊन ठेपली आहे. मराठीत मात्र हे चित्र उलटे असून, या क्षेत्रात प्रगतीस भरपूर वाव आहे. मराठी भाषिक राज्य निर्माण झाल्यापासून राज्यकारभार व शिक्षणाद्वारे मराठी सार्वत्रिक झाली असली, तरी जागतिकीकरणानंतर भाषिक वापराच्या

क्षेत्रात वैश्विक भाषा व संपर्क वा माध्यम भाषा म्हणून इंग्रजीचा झपाट्याने प्रचार, प्रसार, प्रभाव वाढतो आहे हे सत्य आहे, त्यामुळे जगभर आपली स्थानिक बोली वा मातृभाषा जपण्याकडेही कल वाढतो आहे. नुकत्याच झालेल्या जागतिक सर्वेक्षणात शेकडो भाषा मृत झाल्याचे लक्षात आल्यावरही जनमानसात आपली स्थानिक, प्रादेशिक भाषा जपण्याची अहमहमिका दिसून येते.

विश्वभाषा व स्वभाषा अशा समांतर महत्त्वाच्या भाषाकाळात मराठी विश्वकोश आवश्यकच नाही तर अनिवार्य ठरतो. महाराष्ट्रात साक्षरता व शिक्षण प्रसारानंतरही चांगले इंग्रजी प्रभुत्व विरळ. या पार्श्वभूमीवरही मराठी विश्वकोशाचे महत्त्व अधोरेखित होते. मराठी विश्वकोश हा सर्वविषयसंग्राहक ज्ञानकोश असल्याने जिज्ञासू मराठी वाचकास ज्ञान, विज्ञानाच्या सर्व अंगांची माहिती सहज मिळणे शक्य झाले आहे. विविध ज्ञान, विज्ञानांचा आज इतका विस्तार झाला आहे की, माहिती शोधणे व मिळविणे हे आव्हान होऊन बसले आहे. अशा काळात मराठी विश्वकोश सुलभ ज्ञानसाधन व संदर्भ बनून पुढे येतो, हे त्याचे खरे यश असून, सर्वसामान्यांसाठी तो ज्ञानमार्गाचा वाटाड्या बनून पुढे येतो.

**४.८ मराठी विश्वकोशाचा रचनाकल्प**

मराठी विश्वकोश हा सर्वविषयसंग्राहक ज्ञानकोश आहे. यात १०० पेक्षा अधिक महत्त्वाच्या मूलभूत ज्ञानशाखांतील माहिती आहे. हजारो पृष्ठांत सामावलेली ही माहिती तशी सारभूत असून, ती अद्ययावत आहे. ती आता अधिक अद्ययावत करण्याचे कार्य महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने हाती घेतले आहे. त्यासाठी विविध ज्ञानमंडळे स्थापली असून, ती कार्यरत आहेत. मराठी विश्वकोशात नैसर्गिक विज्ञाने, तंत्रविद्या (तंत्रज्ञान) आणि मानव्यविद्याशाखांच्या अंगोपांगांची वर्गवारी करून माहिती देण्यात आली आहे.

विज्ञान व तंत्रज्ञानांतर्गत १) अणुकेंद्रीय अभियांत्रिकी, २) नाविक अभियांत्रिकी, ३) यांत्रिक अभियांत्रिकी, ४) रासायनिक अभियांत्रिकी, ५) विद्युत अभियांत्रिकी, ६) वैमानिकी अभियांत्रिकी, ७) संदेशवहन अभियांत्रिकी, ८) स्थापत्य अभियांत्रिकी, ९) स्वयंचल अभियांत्रिकी, १०) अवकाश विज्ञान, ११) उद्योग व व्यापार, १२) कीटकविज्ञान, १३) प्राणिशास्त्र, १४) कृषीविज्ञान, १५) जीवरसायनशास्त्र, १६) ज्योतिषशास्त्र, १७ ) धातूविज्ञान, १८) भूविज्ञान, १९) गणितीशास्त्र,

२०) भौतिकशास्त्र, २१) मत्स्योद्योग, २२) रसायनशास्त्र, २३) वनस्पतीरोग विज्ञान, २४) वनस्पतीशास्त्र, २५) पर्यावरणविज्ञान, २६) वैद्यकशास्त्र : (अ) मानवी (ब) पशू, २७) वैज्ञानिक संस्था, २८) शरीरक्रियाविज्ञान, २९) शरीर, ३०) संकीर्ण विज्ञाने, ३१) संग्रहालये, ३२) सांख्यिकी, ३३) सूक्ष्मजीवशास्त्र इ. ज्ञान, विज्ञानांच्या घटकोपघटकांची सचित्र, सोदाहरण माहिती मराठी विश्वकोशात देण्यात आली आहे.

मानव्यविद्या शाखेंतर्गत १) अर्थशास्त्र २) वेश, अलंकरण इ. ३) आधुनिक भारतीय भाषा व साहित्य, ४) इतिहास, ५) कनिष्ठ कला व कारागिरी, ६) कला (सामान्य), ७) खेळ व मनोरंजन, ८) ग्रंथालयशास्त्र, ९) चलत्‌चित्रविद्या, १०) चित्रकला, ११) जगातील भाषा व साहित्ये, १२) तत्त्वज्ञान, १३) धर्म, १४) नृत्य, १५) पुरातत्त्वविद्या, १६) प्राचीन भारतीय भाषा व साहित्ये, १७) भाषाशास्त्र, १८) भूगोल, १९) मानवशास्त्र, २०) मानसशास्त्र, २१) मूर्तिकला, २२) युद्धशास्त्र, २३) रंगभूमी, २४) राज्यशास्त्र, २५) लिपिप्रकार, २६) वास्तुकला, २७) विधी, २८) वृत्तपत्रविद्या, २९) शिक्षणाशास्त्र, ३०) संगीत, ३१) समाजशास्त्र, ३२) साहित्य प्रकार व ३३) साहित्यसमीक्षा यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

**मराठी विश्वकोश**
**विषय आणि त्यांची पृष्ठसंख्या**
**(अ) पृष्ठांची कक्षवार विभागणी**[२२]

| | **पृष्ठे** | | **पृष्ठे** |
|---|---|---|---|
| १. मानव्यविद्या कक्षा | ८,५०० | २. विज्ञान व तंत्र कक्षा | ८,५०० |

**प्रत्येक कक्षेसाठी असलेल्या पृष्ठांची विभागणी**

| **मानव्यविद्या कक्षा** | | **विज्ञान व तंत्र कक्षा** | |
|---|---|---|---|
| **विभाग** | **पृष्ठे** | **विभाग** | **पृष्ठे** |
| १. सामाजिक विज्ञाने | ५,२५० | १. सैद्धांतिक विज्ञाने | ३,२८८ |
| २. भाषा व साहित्य | १,७५० | २. अनुप्रयुक्त विज्ञाने | ४,९४२ |
| ३. ललितकला | ९०० | ३. राखीव पृष्ठ | २७० |
| ४. खेळ व मनोरंजन | १०० | ५. राखीव पृष्ठे | ५०० |
| **एकूण** | **८,५००** | **एकूण** | **८,५००** |

## (ब) प्रत्येक विभागासाठी असलेल्या पृष्ठांची विषयवार विभागणी [२३]

**मानव्यविद्या कक्षा**

### १. सामाजिक विज्ञाने

| विभाग | पृष्ठे | विभाग | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १. अर्थशास्त्र | ८०० | ८. भूगोलविज्ञान | ६८० |
| २. इतिहास | ९०० | ९. मानवशास्त्र | ३५० |
| ३. कायदा | २६० | १०. युद्धशास्त्र | ६० |
| ४. तत्त्वज्ञान | ४०० | (+२०० विज्ञान व तंत्र कक्षेकडील) | |
| ५. धर्म | २५० | ११. राज्यशास्त्र | ५०० |
| ६. पुरातत्त्वविद्या | १०० | १२. शिक्षण | ३०० |
| ७. मानवशास्त्र | २०० | १३. समाजशास्त्र | ४५० |
| (+३५० विज्ञान व तंत्रकक्षेकडील) | | **एकूण** | **५,२५०** |

### २. भाषा व साहित्य

| विभाग | पृष्ठे | विभाग | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १. भाषाशास्त्र | १८० | ४. साहित्यसंबंधी सामान्य विषय | ११० |
| २. साहित्यसमीक्षा | ६० | ५. जगातील भाषा व साहित्य | १३०० |
| ३. साहित्यप्रकार | ७० | ६. लिपी प्रकार | ३० |
| | | **एकूण** | **१,७५०** |

### ३. ललितकला

| विभाग | पृष्ठे | विभाग | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १. कला (सामान्य) | ७० | ६. नृत्य | १०० |
| २. चित्रकला | १०० | ७. रंगभूमी | १०० |
| ३. वास्तुकला | १०० | ८. चित्रपट | ६० |
| ४. मूर्तिकला | १०० | ९. लघुकला व कारागिरी | १०० |
| ५. संगीत | १०० | १०. अलंकरण, वेश इ. | ७० |
| | | **एकूण** | **९००** |

**४. खेळ आणि मनोरंजन**

| विभाग | पृष्ठे | विभाग | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १. खेळ | ६५ | २. मनोरंजन | ३५ |
| | | **एकूण** | **१००** |

**विज्ञान व तंत्रकक्षा**

**१. सैद्धांतिक विज्ञाने**

| विभाग | पृष्ठे | विभाग | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १. अर्थशास्त्र | ८०० | ६. भूविज्ञान | २३८ |
| २. गणितशास्त्र | २५१ | ७. भौतिकी | ६२२ |
| ३. ज्योतिषशास्त्र | १५७ | ८. रसायनशास्त्र | ५२३ |
| ४. प्राणिविज्ञान | ५९२ | ९. वनस्पतिविज्ञान | ५५५ |
| ५. भूगोल, प्राकृतिक | ३५० | | |
| | | **एकूण** | **४,०८८** |

**२. अनुप्रयुक्त विज्ञाने**

| विभाग | पृष्ठे | विभाग | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १. अंतरिक्षविज्ञान | २७ | १५. खनिज-निक्षेप | ८७ |
| २. अभियांत्रिकी, अणुगर्भीय | २५ | १६. धातुविज्ञान | १०० |
| ३. अभियांत्रिकी, ऑटोमोबाईल | ४० | १७. पशुविज्ञान | १५७ |
| ४. अभियांत्रिकी, खनिकर्म | २६ | १८. भू-भौतिकीय समन्वेषण | १५ |
| ५. अभियांत्रिकी, नाविक व बंदर किनारीय | ८५ | १९. मत्स्योद्योग | ४३ |
| ६. अभियांत्रिकी, यांत्रिक | २३७ | २०. युद्धशास्त्र | २०० |
| ७. अभियांत्रिकी, रासायनिक | १२३ | २१. वनस्पतिरोगविज्ञान | २५ |
| ८. अभियांत्रिकी विद्युत | १४० | २२. वातावरणविज्ञान | १५७ |
| ९. अभियांत्रिकी, वैमानिकी | -- | २३. वैद्यक | ९०० |
| १०. अभियांत्रिकी, संदेशवहन | १२८ | २४. वैज्ञानिक संस्था | ३७ |
| ११. अभियांत्रिकी, स्थापत्य | ३५१ | २५. संकीर्ण विज्ञाने | ४४ |
| १२. उद्योगधंदे व व्यापार | १,२७१ | २६. संग्रहालये | ३० |
| १३. कीटकविज्ञान | ६६ | २७. सांख्यिकी | १०७ |
| १४. कृषिविज्ञान | ३६५ | २८. सूक्ष्मजीवशास्त्र | ८४ |
| | | **एकूण** | **४,८७०** |

**४.५ संपादन पद्धती** [२४]

**(अ) नोंदीची अकारविल्हे रचना**

१) मराठी विश्वकोशाच्या सर्व खंडांतील नोंदीचा क्रम अकारविल्हे ठेवला आहे, तो पुढीलप्रमाणे :

अ अॅ आ ऑ इ ई उ ऊ ऋ ऌ<br>
ए ऐ ओ औ ं (अनुस्वार) : (विसर्ग)<br>
क ख ग घ ङ; च छ ज झ ञ;<br>
ट ठ ड ढ ण; त थ द ध न; प फ ब भ म;<br>
य र ल व श ष स ह ळ क्ष ज्ञ

२) अनेकदा नोंदींच्या शीर्षकात अधिक शब्द, 'व', 'आणि' यांसारखी उभयान्वयी अव्यये, स्वल्पविरामचिन्हे तसेच क्वचित कंसही आहेत. याबाबतीत सर्व शब्द सलगपणे विचारात घेऊन नोंदींचा अंतर्भाव अकारविल्हे यथास्थळी केला आहे. विरामचिन्हे, कंस आदी विचारात घेतलेली नाहीत. उदा. अन्न, अन्न व शेती संघटना आणि अन्नपूर्णा या तीन नोंदींचा अंतर्भाव, प्रथम अन्न, नंतर अन्नपूर्णा आणि शेवटी अन्न व शेती संघटना अशा क्रमाने केला आहे.

३) एकाच शीर्षकाच्या पण भिन्न विषयांतील नोंदींची व्यवस्था अंकनिर्देशाने केली आहे. उदा. अनंत-१, अनंत-२ अशी क्रमव्यवस्था ठेवून, अनंत-१ मध्ये तत्त्वज्ञानातील व गणितातील अनंताची संकल्पना विशद केली आणि अनंत-२ मध्ये एका वनस्पतिविशेषाची माहिती दिली आहे. एकाच नावाच्या दोन प्रसिद्ध स्थळांवरील नोंदींची क्रमव्यवस्थाही याच प्रकारे केली आहे. उदा. अमरावती-१, अमरावती-२.

४) अकारविल्हे कोशरचनेत सामान्यतः वर्णमालेतील प्रत्येक वर्गावर नोंद दिलेली असते. मराठी विश्वकोशात मात्र हा संकेत पाळलेला नाही. मराठी वर्णमाला अशा शीर्षकाच्या नोंदीखाली सर्व मराठी वर्णांची थोडक्यात माहिती दिली आहे.

५) एखादा नोंदविषय दोन नावांनी रूढ असल्यास (उदा. झेकोस्लोव्हाकिया आणि चेकोस्लोव्हाकिया) त्यांपैकी एका नावाने पोकळ नोंद करून त्यापुढे दुसऱ्या नावाखाली केलेल्या भरीव नोंदीचा निर्देश केला आहे. उदा. झेकोस्लोव्हाकिया : पाहा चेकोस्लोव्हाकिया.

६) देशविषयक नोंदींत संबंधित देशांची अधिकृत नावे शक्यतो नोंदशीर्षकापुढे कंसात दिलेली आहेत. उदा. फिनलंड (सुऑमी), आइसलँड (लिद्वेल्दिद इस्लांत.)

**बाणचिन्हाचा उपयोग (बाणांकन)**

एखाद्या नोंदीतील विवेचनाच्या प्रवाहात आलेला शब्द हा विश्वकोशात अन्यत्र आलेल्या नोंदीचा निदर्शक असेल, तर तो शब्द→ अशा बाणचिन्हाच्या पुढे तिरपा दर्शविलेला आहे. त्याचप्रमाणे एखाद्या नोंदीतील विशिष्ट मजकुराशीच निगडित अशी नोंद विश्वकोशात अन्यत्र आलेली असते, अशा नोंदीचा निर्देश करताना त्या मजकुरापुढे चौकटी कंसात (→) बाणचिन्ह वापरून त्यापुढे संबंधित नोंदीचे नाव दिले आहे.

**आ) पूरक संदर्भ :**

१) शेवटी पाहा असा निर्देश करून संबंधित नोंदीत पूरक ठरणाऱ्या इतर नोंदींचा निर्देश केला आहे.

२) वर्णक्रमानुसार एकापाठोपाठ एक येणाऱ्या नोंदी क्वचितप्रसंगी परस्परांस पूरक असतात. अशा लगोलग येणाऱ्या नोंदींचा परस्परांस पूरक संदर्भ देण्याचे बहुधा टाळले आहे. उदा. अपभ्रंश भाषा व अपभ्रंश साहित्य किंवा अस्थि व अस्थिचिकित्सापद्धती या नोंदी एकापाठोपाठ एक आल्याने एकमेकींच्या पूरक संदर्भात त्यांचा निर्देश केला नाही.

३) पुष्कळदा एखाद्या दीर्घ नोंदीतील उपविषयच पूरक म्हणून निर्दिष्ट करावयाचा असतो. अशा वेळी त्या दीर्घ नोंदीचे शीर्षक देऊन त्यातील उपविषय त्यापुढेच कंसात दर्शविला आहे. उदा. उपयोजित कला या नोंदीस पूरक संदर्भ कला-२ (कनिष्ठ कला) असा दिला आहे.

**इ) संदर्भग्रंथांचा निर्देश :**

महत्त्वाच्या नोंदींना तसेच इतरही काही नोंदींना संदर्भग्रंथ दिलेले आहेत. जिज्ञासू वाचकांना ते पूरक वा अधिक वाचनासाठी मार्गदर्शक ठरतील.

संदर्भग्रंथ देताना लेखक निश्चित असल्यास प्रथम लेखकाचे आडनाव व नावाची आद्याक्षरे, त्यापुढे ग्रंथाचे नाव व नंतर त्याचे प्रकाशनस्थळ व प्रकाशनवर्ष असा सर्वसाधारण क्रम ठेवला आहे.

तथापि, कौटिल्यीय अर्थशास्त्र, महाभारत, रामायण, भगवद्‌गीता, मनुस्मृती इ. प्राचीन ग्रंथांच्या बाबतीत त्या त्या संहितांचे संपादक, प्रकाशक किंवा मुद्रक यांचा निर्देश करून ते ते संदर्भग्रंथ दिलेले आहेत.

**ई) व्यक्तिविषयक नोंदी :**

व्यक्तिविषयक नोंदी सर्वसाधारणपणे आडनावांनी केल्या आहेत. उदा. अत्रे, प्रल्हाद केशव; अँडरसन, हॅन्स क्रिश्चन. या सर्वसाधारण धोरणास काही अपवाद करावे लागले, ते पुढीलप्रमाणे आहेत :

१) जी व्यक्ती टोपणनावाने प्रसिद्ध आहे, तिची नोंद त्या टोपणनावानेच केली आहे. उदा. केशवसुत, लोकहितवादी, युकिओ मिशिमा वगैरे.

२) इतिहासकाळातील व्यक्तींच्या नोंदी सर्वसाधारणपणे त्यांच्या रूढ अशा नावांनी केलेल्या आहेत. उदा. अप्पय्यदीक्षित, अभिनवगुप्त, अशोक, शिवाजी, ज्ञानेश्वर वगैरे.

३) इतिहासकाळातील इस्लामधर्मीय व्यक्तींची नावे ज्या पद्धतीने मराठीत रूढ आहेत, त्या पद्धतीनेच स्वीकारून त्यावरील नोंदी यथास्थळी अंतर्भूत केल्या आहेत. उदा. अबुल फजल, अबुल फैजी, अबू हनीफा, अकबर वगैरे.

४) अरबी विशेषनामांतील अल् हे उपपद नगण्य मानून संबंधित नोंदींचा यथास्थळी अंतर्भाव केला आहे. उदा. अल्-फाराबी, अल्-गझाली यांसारख्या नोंदी फाराबी, अल्; गझाली, अल् अशा मानून त्यांचा यथास्थळी अकारविल्हे अंतर्भाव केला आहे.

**उ) नोंदीच्या मजकुरातील परकीय शब्द :**

१) नोंदीच्या मजकुरात येणाऱ्या इंग्रजी व इतर परकीय शब्दांचे उच्चार स्थूलमानाने प्रचलित व परिचित असतील, तर असे शब्द देवनागरी लिपीतच दिलेले आहेत. स्थलनामांचे उच्चार बहुतांशी वेब्स्टर्स जिऑग्राफिकल डिक्शनरीप्रमाणे दिले आहेत. आशियाई व भारतीय स्थलनामांचे मराठीतील रूढ उच्चार विचारात घेऊन त्यांची योग्य नावे निश्चित केली आहेत. परकीय विशेषतः युरोपीय व्यक्तिनामांचे उच्चार मराठीत रूढ नसल्यास बहुतांशी वेब्स्टर्स बायोग्राफिकल डिक्शनरीप्रमाणे दिले आहेत.

२) अनेक नोंदींची शीर्षके ही मूळ परकीय संज्ञांचे नव्यानेच बनविलेले मराठी पर्याय आहेत. त्यापैकी काही नोंदशीर्षकांपुढे कंसात वाचकांच्या सोयीसाठी मूळ परकीय संज्ञाही देवनागरीत दिलेल्या आहेत. उदा. अवगम सिद्धांत, अभिव्यक्तिवाद अशा मराठी नोंदशीर्षकापुढील कंसात अनुक्रमे 'इन्फर्मेशन थिअरी' व 'एक्स्प्रेशनिझम' अशा मूळ संज्ञा देवनागरी लिपीत दिलेल्या आहेत.

३) विश्वकोशातील गणितविषयक लेखातील बहुतेक समीकरणे देवनागरी लिपीत व अंकात दिलेली आहेत; परंतु भौतिकी, रसायनशास्त्र व इतर विज्ञानविषयांतर्गत समीकरणे सामान्यतः रोमन लिपीत व इंग्रजी अंकांत दिलेली आहेत.

**ऊ) परकीय भाषांतील निर्देश :**

१) परकीय भाषांतील ग्रंथ, कलाकृती, व्यक्ती, संस्था, वास्तू इत्यादींचे नामनिर्देश सामान्यतः देवनागरी आणि आवश्यक तेथे रोमन लिपीत केले आहेत. या दोन लिपींखेरीज इतर लेखनपद्धती आणि उच्चारचिन्हे यांचा वापर केलेला नाही.

२) इंग्रजीखेरीज अन्य युरोपीय भाषांतील ग्रंथांचा निर्देश करताना अनेकदा संबंधित भाषांतील ग्रंथनामे न देता त्यांची इंग्रजी ग्रंथनामे दिली आहेत. अशा स्थळी संबंधित ग्रंथनिर्देशाच्या बरोबरच कंसात 'इं. शी.' (इंग्रजी शीर्षकार्थ) असा संक्षेप वापरला आहे.

३) ललितकला विषयांतील पश्चिमी किंवा अन्य विदेशी कलाकृतींचे नामनिर्देश किंवा वाक्यखंडात्मक निर्देश इंग्रजीमध्येच; परंतु देवनागरी लिपीमध्ये चित्रपत्रांत दिले आहेत, तसेच नोंदीतील विवरणातसुद्धा त्यांचा असाच निर्देश केला आहे. उदा. लिओनार्दो द व्हिन्सीचे 'द लास्ट सफर', मायकेल अँजेलोचे 'क्रिएशन ऑफ आदम', पाब्लो पिकासोचे 'थ्री डान्सर्स', झॉर्झ ब्राकचे 'स्टील लाईफ ऑन रेड टेबलक्लॉथ' इत्यादी. स्वदेशी कलाकृतींचे नामनिर्देश स्वतः कलाकारांनी इंग्रजीमध्ये दिले असतील, तर तेही तसेच आम्ही दिले आहेत.

**ए) संख्यालेखन :**

विश्वकोशात मोठ्या संख्यांचे लेखन करताना विषयानुरूप पश्चिमी व भारतीय पद्धतींचा विकल्पाने उपयोग केला आहे. उदा. १) १०,०००,००० (पश्चिमी), २) १,००,००,००० (भारतीय)

**ऐ) लेखकनिर्देश :**

१) ज्या नोंदींच्या शेवटी एकाहून अधिक लेखकांचा निर्देश असेल, त्या नोंदी संबंधित लेखकांच्या परस्पर सहकार्याने लिहिलेल्या आहेत किंवा संबंधित लेखकांनी त्यामधील काही भागांचे लेखन केले आहे असे समजावे.

२) काही नोंदी प्रदीर्घ आहेत व त्यातील वेगवेगळ्या उपविषयांचे लेखन निरनिराळ्या लेखकांनी स्वतंत्रपणे केले आहे. अशा नोंदींत त्या त्या उपविषयांच्या शेवटी संबंधित लेखकाच्या नावाचा उल्लेख आहे.

३) मराठीखेरीज अन्य भाषेत लिहून आलेल्या नोंदीच्या शेवटी मूळ लेखकाचे व त्यानंतर तिच्या मराठी अनुवादकाचे नाव दिले आहे. मूळ नोंदीच्या भाषेचा निर्देश भाषावाचक संक्षेपाने लेखकाच्या नावापुढील कंसात

केला आहे व अनुवादकाच्या नावापुढे कंसात 'म.' हा मराठी भाषावाचक संदेश दिला आहे.

**ओ) कालनिर्देश :**

१) विश्वकोशातील कालनिर्देश ख्रिस्ती (इसवी) कालगणनेनुसार केलेले आहेत. आवश्यक तेथे इतरही कालगणनांचा उपयोग, त्यांचा उल्लेख करून केलेला आहे.

२) व्यक्ती, प्रसंग किंवा इतर काही गोष्टी यांचा काळ माहीत नसेल अथवा अनिश्चित असेल, तर अशा स्थळी प्रश्नचिन्ह घातले आहे.

३) एखादा कालनिर्देश स्थूलमानाने आहे असे दर्शविण्यासाठी त्यामागे 'सु.' (सुमारे) असा संक्षेप वापरला आहे.

४) जेथे काटेकोर कालनिर्देश देता येणे शक्य नव्हते, तेथे केवळ शतकनिर्देशक काल दिलेला आहे.

**औ) परिभाषा :**

या कोशात जे पारिभाषिक आणि तत्सम इतर शब्द वापरले आहेत, त्यातील बरेचसे शब्द नवे व मराठीत अजून रूढ न झालेले आहेत. ते बहुतेक शब्द इंग्लिशमध्ये रूढ असलेल्या शब्दांचे पर्याय शब्द आहेत. कोणत्या इंग्लिश शब्दाचा कोणता मराठी पर्याय आहे, याचा निश्चय करण्याकरिता उपयुक्त असा परिभाषासंग्रह (मराठी विश्वकोश, खंड १८) १९७३ मध्ये प्रकाशित झालेला आहे. परिभाषासंग्रह खंडाचा उपयोग बाकीचे खंड वाचत असताना वाचकांना करता यावा, म्हणून तो खंड अगोदरच प्रसिद्ध केला आहे. त्यावरून वाचकांना एखाद्या मराठी शब्दाचा इंग्लिश पर्याय वा इंग्लिश शब्दाचा मराठी पर्याय कोणता, यासंबंधी निश्चित माहिती मिळेल. मराठी विश्वकोश संपूर्ण प्रकाशित झाल्यानंतर प्रस्तुत परिभाषासंग्रहाची सुधारित आवृत्तीही प्रकाशित करण्याचा संकल्प या विश्वकोश प्रकल्पात अंतर्भूत आहे.

**अं) परिमाणवाचक निर्देश :**

विश्वकोशातील परिमाणवाचक निर्देश मेट्रिक पद्धतीने केले आहेत. आवश्यक तेथे इतर पद्धतींचाही तसा उल्लेख करून उपयोग केला आहे.

**अः) संक्षेप :**

विश्वकोशात वापरलेल्या मराठी व इंग्रजी संक्षेपांच्या स्वतंत्र याद्या प्रत्येक खंडात समाविष्ट केलेल्या आहेत.

**४.१० मराठी विश्वकोश : नोंद सूची**

| | प्रकाशित नोंदशीर्षक खंड संहिता खंड | मजकुराची पृष्ठे | चित्रपत्रांची पृष्ठे |
|---|---|---|---|
| १. | अंक ते आतुर चिकित्सा | ९४४ | ८४ |
| २. | आतुर निदान ते एप्स्टाइन जेकब | १,०४२ | ७८ |
| ३. | एबिंगहाऊस, हेरमान ते किसांगानी | ९६५ | ४८ |
| ४. | कीकट ते गाल्फिमिया ग्लॉका | ९९७ | ५४ |
| ५. | गाल्वा, एव्हारीस्त ते चेदि | १,०२२ | ७२ |
| ६. | चेन, सर एर्न्स्ट बोरिस ते डोळा | १,०८३ | ५४ |
| ७. | ड्यूइसबुर्क ते धरणगाव | १,०७८ | ५० |
| ८. | धरणे व बंधारे ते न्वाकशॉट | १,१११ | ५४ |
| ९. | पउमचरिउ ते पेहलवी साहित्य | १,१४३ | ५८ |
| १०. | पैकारा ते बंदरे | १,२५३ | ५२ |
| ११. | बंदा ते ब्वेनस एअरीझ | १,११२ | ६० |
| १२. | भंगुरतारा ते महाराष्ट्र राज्य | १,५८६ | ६० |
| १३. | महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रॉनिकी विकास महामंडळ ते म्हैसूर संस्थान | १,३२८ | ५८ |
| १४. | यंग, एडवर्ड ते रेयून्यों बेट | १,३०७ | ५८ |
| १५. | रेल्वे ते वाद्य व वाद्यवर्गीकरण | १,३९६ | ४८ |
| १६. | वाद्यवृंद ते विज्ञानशिक्षण | ९९९ | २० |
| १७. | विज्ञानाचे तत्त्वज्ञान ते शेक्सपिअर विल्यम | ८९३ | ४४ |
| १८. | शेख अमर ते सह्याद्री | ८७७ | ३० |
| १९. | सँगर, फ्रेडरिक ते सृष्टी व मानव | ८८६ | ५० |
| २०. | सेई शोनामुन ते हर्षचरित | ७५४ | ४८ |
| २१. | हर्षवर्धन, सम्राट ते ज्ञेयवाद | १३३६ | ६६ |
| २२. | सूचिखंड १ | ११२६ | (निरंक) |
| २३. | परिभाषासंग्रह | ३२८ | (निरंक) |

**४.११ मराठी विश्वकोश : प्रकाशन काल व संपादक सूची**

| खंड | प्रकाशन वर्ष | अध्यक्ष / प्रमुख संपादक |
|---|---|---|
| १. मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ | १९६५ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| २. परिभाषासंग्रह (खंड १८) | १९७३ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| ३. खंड १ | १९७६ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| ४. खंड २ | १९७६ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| ५. खंड ३ | १९७६ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| ६. खंड ४ | १९७६ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| ७. खंड ५ | १९७६ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| ८. खंड ६ | १९७७ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| ९. खंड ७ | १९७७ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| १०. खंड ८ | १९७९ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| ११. खंड ९ | १९८० | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| १२. खंड १० | १९८१ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| १३. खंड ११ | १९८२ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| १४. खंड १२ | १९८५ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| १५. खंड १३ | १९८७ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| १६. खंड १४ | १९८९ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| १७. खंड १५ | १९९५ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| १८. खंड १६ | १९९९ | प्रा. मे. पुं. रेगे |
| १९. खंड १७ | २००७ | डॉ. विजया वाड |
| २०. खंड १८ | २००८ | डॉ. विजया वाड |
| २१. खंड १९ | २०१२ | डॉ. विजया वाड |
| २२. खंड २० (पूर्वार्ध) | २०१५ | डॉ. विजया वाड |
| २३. खंड २० (उत्तरार्ध) | २०१५ | डॉ. विजया वाड |
| २४. सूचिखंड २१ | २०१९ | श्री. दिलीप करंबेळकर |

**४.१२ मराठी विश्वकोश निर्मिती व तर्कतीर्थांचे योगदान**

मराठी विश्वकोशाची रचना शास्त्रोक्त व्हावी म्हणून शास्त्रीजींनी त्याची जी आखणी केली होती, ती पाहता लक्षात येते की, त्यांना हा कोश वैश्विक

दर्जाचा करावयाचा होता. भारतात आजमितीस हिंदी, बंगाली, तमिळ इ. भाषांत असे विश्वकोश तयार झाले आहेत. ॲग्रोपीडिया (हिंदी), पंजाबीपीडिया, सहापीडिया, सर्व विज्ञानकोशम् (मल्याळी), तमिळ एन्सायक्लोपीडिया, गुजराती विश्वकोश, विश्वसाहित्यविज्ञानकोशम (मल्याळी), कलयमक्कलंजिअम (तमिळ विश्वकोश), विश्वकोश (बंगाली), हिंदी विश्वकोश, मुहजबुल लुघात (उर्दू) ही सहज लक्षात येणारी नावे. मराठीअगोदर बंगाली, तमिळमध्ये तसेच हिंदीतही विश्वकोश तयार झाले आहेत; पण मराठी विश्वकोशाइतकी शास्त्रोक्तता, व्यापकता, सर्वविषय स्पर्शता अन्य भाषांमध्ये अपवादाने पाहावयास मिळते.

मराठी विश्वकोशाची प्रस्तुतता एकाच गोष्टीतून स्पष्ट होते, ती म्हणजे तिचा रचनाकल्प (ब्लू प्रिंट) होय. यापूर्वी विवेचनात मराठी विश्वकोशात नमूद केलेली त्याची संपादनपद्धती उद्धृत केली आहे. (पृष्ठ २९ पाहा). ती किती आधुनिक होती, याचे एक उदाहरण देतो. सध्या आपण सर्व प्रसंगोपात विकिपीडिया, एन्सायक्लोपीडिया, विविध दुवे (लिंक्स), संकेतस्थळे (वेबसाईटस्) यांवरील माहिती वाचतो. हा सर्व सन १९९० नंतर निर्माण झालेला महाजालीय ज्ञानसंग्रह होय. तत्पूर्वीच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९६२ मध्ये मराठी विश्वकोशाचा आराखडा तयार केला होता. सन १९६५ मध्ये ‘मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ’ सिद्ध झाला. सन १९७७ मध्ये मराठी विश्वकोशाचे पहिले ५ खंड प्रकाशित झाले. सदर समारंभ २४ जुलै, १९७७ रोजी सकाळी १० वाजता पुणे मुक्कामी टिळक स्मारक मंदिर येथे संपन्न झाला. भारताचे पंतप्रधान मोरारजीभाई देसाई प्रमुख पाहुणे होते. त्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. समारंभाच्या अध्यक्षपदी तत्कालीन राज्यपाल सादिक अली होते. समारंभास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील व कोश संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी उपस्थित होते.

तबकडी (सीडी)/ ई बुक स्वरूपात मराठी विश्वकोशाची मृदू प्रत (सॉफ्ट कॉपी) सन २००८ मध्ये डॉ. विजया वाड यांच्या अध्यक्षीय कार्यकाळात अस्तित्वात आली. विशेष म्हणजे ही प्रत मूळ मुद्रित प्रतीवरून तयार झाली होती. मूळ लेखन वा मुद्रणरचना तर्कतीर्थ यांनी केली होती. ती भविष्यलक्ष्यी होती. नवतंत्रज्ञानातही मूळ प्रतीचे चपखल बसणे नि असणे, ती दुव्यांसह (Links) असणे, ‘वेद’ ते ‘वेब’ नोंदी असणे, ही तर्कतीर्थांच्या ज्ञानात्मक भविष्यवेधाची खूणगाठ म्हणावी लागेल.

भारताची ज्ञानपरंपरा ही वेद साहित्यावर विकसित झालेली आहे. तिची परंपरा श्रुती, स्मृतींची आहे. लिखित कालखंड सिंधू संस्कृतीचा मानला तरी तो इसवी सन पूर्व २६००-१८०० असा येतो. वैदिक काळातील ब्राह्मण ग्रंथात पाहून संपादन करण्याचे उल्लेख म्हणजे लेखन, वाचन पुरावा होय. असे असले तरी ज्ञानकोशसदृश लेखनात जी वस्तुनिष्ठता लागते, तिची परंपरा आपल्याकडे विकसित न झाल्याने विश्वकोशातील नोंदी वा संहिता लेखनाची शिस्त व शैली निर्माण करावयास संपादक म्हणून तर्कतीर्थांना मोठे कष्ट घ्यावे लागले. त्याचे विवेचन करताना प्रा. रा. ग. जाधव यांनी लिहून ठेवले आहे की, सर्व विषयांतील नोंदींच्या मुद्रण प्रतींचे वाचन शास्त्रीजी तासन्तास बैठक मारून पूर्ण करीत... अशी वाचनसत्रे म्हणजे संपादकवर्गाचे प्रशिक्षण शिबिरच होई. शास्त्रीजी मुद्रण प्रतीतील शब्द, परिभाषा, वाक्यरचना, परिच्छेद, आशय, बाणांकने, संदर्भग्रंथ, चित्रे/आकृत्या या सर्व घटकांवर मार्मिक अभिप्राय देत.[२५]

शास्त्रीजींनी विश्वकोशासाठी आवश्यक काटेकोर विवेकाची भाािषक मराठी शैली नुसती निर्माण केली नाही, तर विश्वकोश रचना करू शकतील, अशा मनुष्यबळाचा विकास केला. संपादक, लेखक, अभ्यागत संशोधक, अशी मोठी फळी तयार करून उभी केली. 'एकूणच मराठी व्यासंगाचा व विद्वत्तेचा कस व शिस्त समाधानकारक नाही, असे शास्त्रीजींचे साररूप मत होते.[२६] या प्रा. रा. ग. जाधव यांच्या विधानात मोठा गर्भितार्थ असून, तो मराठी ज्ञाननिधी विकासाच्या संदर्भात अंतर्मुख करणारा ठरतो. '१९६० ते १९८० ही विश्वकोशाची विशी म्हणजे एक मंतरलेले उद्योगपर्व होते.'[२७]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना युरोपात प्रबोधनकाळानंतर विशेषत: फ्रेंच भाषेत जशी एन्सायक्लोपीडिक चळवळ उभी राहिली, तशी ती मराठीत निर्माण करायची होती. म्हणूनच की काय 'धर्मकोश', 'मीमांसाकोश' यांच्या अनुभवांवर आधारित त्यांनी 'मराठी विश्वकोश'च्या रूपात महाराष्ट्रात लेखक, वाचक, संशोधक, अभ्यासक, जिज्ञासूंचा ज्ञानसमाज निर्माण केला, जो आज प्रत्येक शंकेसाठी विश्वासार्ह संदर्भग्रंथ म्हणून विश्वकोश पाहतो.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या कार्यकाळात (१९६० ते १९९४) मराठी विश्वकोशाचे १५ खंड प्रत्यक्ष प्रकाशित झालेले असले, तरी पुढील अनेक खंडांच्या अनेक नोंदी लिहून तयार होत्या. स्वत: तर्कतीर्थांनी मराठी विश्वकोशासाठी म्हणून ज्या सुमारे दीडशे नोंदी लिहिल्या आहेत, त्यांचा

समावेश शेवटच्या २० व्या खंडांपर्यंत झालेला आढळतो. अकारविल्हे बोलायचे झाले, तर या नोंदी 'अ' ते 'ज्ञ'पर्यंत विस्तारलेल्या आहेत. तर्कतीर्थांच्या कार्यकाळातच १९८० मध्ये 'कुमारकोश'ची योजना तयार करण्यात आली होती. मूळ योजनेनुसार या कोशाचे १२ खंड संकल्पित होते. आजअखेर जीवसृष्टी आणि पर्यावरण या पहिल्या खंडाचे चार भाग पूर्ण झाले असून, ते आंतरजालावरही उपलब्ध करून देण्यात आले आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मराठी विश्वकोशास खरे योगदान त्यांनी तयार केलेला विश्वकोशाचा रचनाकल्प (ब्लू प्रिंट) होय. शिवाय त्यांनी तयार केलेली नोंदींची शास्त्रोक्त पद्धती होय. त्यांनी केलेल्या नोंदीही एक मोठे योगदान आहे. त्यांच्या नोंदी वेद, वाद, व्यक्ती, चरित्र, ईश्वर, संत, श्रद्धा, संस्कार, संस्कृती, साहित्य, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, वेब अशा ज्ञान-विज्ञानाच्या विविध शाखा, उपशाखांना स्पर्श करणाऱ्या आहेत. त्या वस्तुनिष्ठ, मौलिक पारिभाषिक दृष्ट्या स्तरीय आहेत.

## ५. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

### ५.१ स्थापना आणि पार्श्वभूमी

१९ नोव्हेंबर, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना झाल्यानंतर मंडळाचे कार्य विधिवत सुरू झाले. मंडळाच्या कार्यास दोन वर्षे पूर्ण होण्याचे औचित्य लक्षात घेऊन नोव्हेंबर १९६२ मध्ये मराठी विश्वकोश तयार करण्याचा संकल्प केला. या प्रकल्पाची सविस्तर माहिती देणारा 'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ' १९६५ मध्ये प्रकाशित करण्यात आला. त्यातील योजनेनुसार १९८० पर्यंत 'मराठी विश्वकोश'चे ९ खंड मंडळाने प्रकाशित केले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित ग्रंथांची वाढत जाणारी संख्या, त्यांचे संपादन, मुद्रण कार्य शिवाय मंडळाच्या वाढत गेलेल्या योजनांमुळे ग्रंथ आणि विश्वकोश खंड प्रकाशनात दिरंगाई होऊ लागली. त्यातून मंडळाच्या कार्याचे विकेंद्रीकरण करण्याच्या हेतूने १ डिसेंबर, १९८० रोजी महाराष्ट्र शासनाने दोन स्वतंत्र मंडळे केली. - १) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, २) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ. दोन्ही मंडळांच्या अध्यक्षपदी अनुक्रमे डॉ. सुरेंद्र बारलिंगे आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे मराठी विश्वकोश निर्मिती व प्रकाशन कार्य गतिमान झाले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे निधन २७ मे,

१९९४ रोजी झाले. तोवर मराठी विश्वकोशाचे १४ खंड प्रकाशित झाले होते.

### ५.२. अध्यक्षीय कारकिर्द (१९६० ते २०२१)

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ स्थापन झाल्यापासून आजवर खालील अध्यक्षांची वेळोवेळी नियुक्ती केली. त्यांच्याबरोबर मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीशी संबंधित विविध ज्ञान-विज्ञान शाखांतील तज्ज्ञांची सभासद म्हणून नियुक्ती होत राहिली. प्रत्येक अध्यक्षीय कारकिर्दीत संबंधित अध्यक्ष व सदस्यांनी मराठी विश्वकोश प्रकल्प आणि अन्य उपक्रम यशस्वी करण्यासाठी मोठे योगदान दिल्यानेच संकल्पित प्रकल्प सिद्धीस जाऊ शकला.

| क्र. अध्यक्ष/प्रमुख संपादक | कार्यकाळ |
|---|---|
| १. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | १९ नोव्हेंबर १९६० ते २७ मे १९९४ |
| २. प्रा.डॉ. मेघश्याम पुंडलिक रेगे | ४ जून १९९४ ते २८ डिसेंबर २००० |
| ३. प्रा. रा. ग. जाधव | १६ जानेवारी २००१ ते १० फेब्रु. २००३ |
| ४. डॉ. श्रीकांत जिचकर | २१ जुलै २००३ ते २ जून २००४ |
| ५. डॉ. विजया वाड | ९ डिसेंबर २००५ ते ८ डिसेंबर २००८ व ९ जून २००९ ते १५ जून २०१५ |
| ६. श्री. दिलीप करंबेळकर | १० ऑगस्ट २०१५ ते ३० जुलै २०२० |
| ७. प्रा. डॉ. श्रीधर तथा राजा दीक्षित | २७ मे २०२१ पासून. |

**❋ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळांतर्गत मराठी विश्वकोशाची योजना १९६२ मध्ये आरंभली. या कोशाचा रचनाकल्प स्पष्ट करणारा 'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ' १९६५ मध्ये सिद्ध केला. तर्कतीर्थांना या विश्वकोशाचे कार्य करण्यास तीन दशकांहून अधिक कालावधी मिळाला. या कार्यकाळात त्यांनी परिभाषा खंड-१८ वा आणि १५ संहिताखंडांची निर्मिती केली. मराठी विश्वकोशासाठी कागद कारखाना, मुद्रणालय सुरू करून वाईसारख्या छोट्या गावात सर्व ज्ञान-विज्ञान क्षेत्रांतील विद्वानांना जमवून कोश लेखनशैलीचा व कार्यपद्धतीचा विकास केला. त्यांच्या कार्यकाळात अनेक नामवंतांनी मराठी विश्वकोश कार्यालयास भेट दिली. अभ्यागत व नोंद लेखकांसाठी ३६,००० संदर्भग्रंथ नि कोश वाङ्मयाचे अनोखे ग्रंथालय उभारले. मराठी विश्वकोशासाठी आवश्यक भवन निर्माण केले. कुमारकोशाच्या १२ खंडांची योजना तयार केली.

**❊ प्रा. मे. पुं. रेगे**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनानंतर सहा-साडेसहा वर्षे प्रा. मे. पुं. रेगे मराठी विश्वकोशाचे अध्यक्ष आणि प्रमुख संपादक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळात मराठी विश्वकोशाचा १५वा नि १६वा संहिता खंड प्रकाशित झाला तरी १५ व्या खंडाचे कार्य तर्कतीर्थांच्याच कार्यकाळात झाले होते. त्यातील संपादकीयनुसार ही २३ खंडांची योजना आहे. तर्कतीर्थनिर्मित विश्वकोश लेखनपरंपरा त्यांनी अनुसरली आणि विस्तारलीदेखील.

**❊ प्रा. रा. ग. जाधव**

मराठी विश्वकोशाच्या प्रारंभापासून त्याच्या निर्मितीशी निगडित असलेले, अनेक वर्षे अभ्यागत संपादक म्हणून कार्य केलेले ज्येष्ठ मराठी समीक्षक प्रा. रा. ग. जाधव २००१च्या प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष झाले ते प्रा. मे. पुं. रेगे यांचे उत्तराधिकारी म्हणून. त्यांच्या कार्यकाळात १७ व्या संहिताखंडाची निर्मिती झाली आणि १८ व्या खंडाचा कार्यारंभ झाला. कुमारकोश परिचय खंड मुद्रणप्रत तयार झाली; पण त्यांचे प्रकाशन मात्र नंतरच्या अध्यक्षीय कारकिर्दीत झाले. दोन वर्षांनंतर लगेचच ते अध्यक्षपदाच्या जबाबदारीतून स्वेच्छामुक्त झाले.

**❊ डॉ. श्रीकांत जिचकर**

डॉ. श्रीकांत जिचकर यांना त्यांच्या अकाली मृत्यूमुळे मराठी विश्वकोश अध्यक्ष आणि प्रमुख संपादक म्हणून कार्य करण्यास जेमतेम एक वर्षाचाच कालावधी लाभला. या अल्पकाळात त्यांनी पूर्वाध्यक्षांनी तयार केलेल्या 'मराठी कुमार विश्वकोश परिचय ग्रंथा'चे प्रकाशन बालकदिनाचे औचित्य साधून १४ नोव्हेंबर, २००३ रोजी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते नागपूर येथे केले. डॉ. जिचकर यांच्या कार्यकाळात 'विश्वकोश वार्षिक'ची कल्पना अमलात आली. त्यांनी २००३-०४ चे वार्षिक तयार करून २००५ मध्ये प्रकाशित केले. भारत आणि महाराष्ट्रासंदर्भातील उपरोक्त कालाचे हे वार्षिक अभिनव म्हणावे लागेल.

**❊ डॉ. विजया वाड**

सुमारे एक दशकाचा दीर्घ कालावधी लाभल्याने डॉ. विजया वाड यांनी मराठी विश्वकोश लोकाभिमुख करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यांच्या कार्यकाळात १७ ते २० (पूर्वार्ध व उत्तरार्ध) अशा पाच संहिता खंडांचे प्रकाशन झाले. डॉ. वाड यांनी संगणक व महाजालीय क्रांतीची नोंद

घेऊन प्रकाशित सर्व विश्वकोश खंड त्यांच्या मृदू प्रतीसह महाजालावर उपलब्ध करून देऊन सर्वसामान्य वाचकांना सर्व वेळ मराठी विश्वकोश 'मुक्त नि मुफ्त' उपलब्ध करून दिला. मोबाईल ॲपवर विश्वकोश वाचन आणि वापराची सुविधा प्रदान केली. मराठी विश्वकोश तबकडी (सीडी)वर उपलब्ध करून दिला. विद्यार्थ्यांमध्ये मराठी विश्वकोशाबद्दल जिज्ञासा आणि जागृती निर्माण करण्यासाठी विश्वकोश स्पर्धेचे आयोजन केले. अंधांसाठी २००८ मध्ये 'बोलका विश्वकोश' तबकडी (सीडी) रूपात प्रकाशित केला. कुमारकोश (खंड १, भाग १ व २)चे प्रकाशन झाले. मराठी विश्वकोश लघुपट निर्मिती झाली. बोलका कन्याकोश प्रकाशित केला. यांच्या कार्यकाळात मराठी विश्वकोश संकेतस्थळास महाराष्ट्र शासनाचा प्लॅटिनम पुरस्कार प्राप्त झाला.

**✻ दिलीप करंबेळकर**

दिलीप करंबेळकर यांना सुमारे पाच वर्षांचा कार्यकाळ लाभला. त्यांच्या कार्यकाळात मराठी विश्वकोशाचा २१वा खंड 'सूचिखंड' म्हणून प्रकाशित झाला आणि एका अर्थाने 'नकाशा खंडा'चा अपवाद वगळता मराठी विश्वकोश मूळ योजनेनुरूप पूर्णत्वास गेला. काळाचे आव्हान लक्षात घेऊन त्यांनी मराठी विश्वकोश निर्मिती, लेखनप्रक्रियेच्या विकेंद्रीकरणाचे धोरण अंगीकारून ६० ज्ञानमंडळांचे नियोजन केले. त्यापैकी निम्मी ज्ञानमंडळे त्यांच्या कार्यकाळात सक्रिय झाली. एवढेच नव्हे, तर विविध विद्यापीठे, संस्था, संशोधन केंद्रे इ.मध्ये कार्यरत तज्ज्ञ मनुष्यबळाचा द्रष्टा वापर केला. त्यांच्या कार्यकाळात मोबाईल ॲपचे लोकार्पण झाले. मराठी विश्वकोश पेन ड्राइव्हवर उपलब्ध झाला.

**✻ प्रा. डॉ. श्रीधर तथा राजा दीक्षित**

२७ मे, २०२१ रोजी महाराष्ट्र शासनाने जे नवे महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ नियुक्त केले. त्याच्या अध्यक्षपदाची धुरा ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ प्रा. डॉ. राजा दीक्षित यांच्या हाती सोपविली असून, ३० सदस्यांचे मंडळ कार्यरत झाले आहे. मराठी विश्वकोश परंपरा वृद्धिंगत करण्याचा त्यांचा मानस असून, त्यानुसार त्यांचे नियोजन व कार्य सुरू झाले आहे.

**५.३ मराठी विश्वकोश : संकल्प आणि सिद्धी**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने संकल्पित केलेला मराठी विश्वकोश प्रकल्प त्या मंडळाच्या अखत्यारित १९८० पर्यंत कार्यरत

होता. त्या काळात मराठी विश्वकोशाचे ११ खंड प्रकाशित झाले होते. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ विभाजनाने १ डिसेंबर, १९८० मध्ये अस्तित्वात आलेल्या वा स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाने उर्वरित सूचिखंडासह १२ खंडांचे कार्य पूर्णत्वास नेले. मधल्या काळात कुमारकोशाच्या परिचय ग्रंथ आणि दोन खंडांचे प्रकाशन झाले. मराठी विश्वकोशाचे संकेतस्थळ http://www.vishwakosh.org.in सुरू झाले. ८ मार्च, २००६ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते महाजालावर विश्वकोशाचे १ ते १७ खंड नोंदीसह अनेक छायाचित्रे, अध्यक्षांचा परिचय, इ. भरगच्च मजकूर प्रकाशित करण्यात आला. अंधांसाठी बोलका विश्वकोश तयार करण्यात आला. खंड १ ते १७ ची मृदू प्रत तबकडी (सीडी) रूपात सर्वसुलभ करण्यात आली. सूचिखंड व परिभाषा खंडासह २० संहिताखंड तयार होते. ते आंतरजालावर सर्वसामान्य वाचकास सर्ववेळ 'मुक्त नि मुफ्त' उपलब्ध होणे, यातच विश्वकोश संकल्पाची सिद्धी सामावलेली आहे.

मराठी विश्वकोश निर्मितीस गती यावी म्हणून महाराष्ट्र शासनाने वाई येथील रास्तेवाड्यात ९ एप्रिल, १९७२ रोजी शासकीय मुद्रणालय सुरू केले होते. १९७३ मध्ये परिभाषा खंडाचे प्रकाशन करण्यात आले. पहिल्या ५ खंडांचे प्रकाशन भारताचे पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांच्या हस्ते २४ जुलै, १९७७ रोजी पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात संपन्न झाले, तर खंड ६ आणि ७ चे प्रकाशन साहित्य अकादमीचे अध्यक्ष गुजरातचे प्रसिद्ध कवी उमाशंकर जोशी यांच्या हस्ते ९ मे, १९७९ रोजी पुणे येथे संपन्न झाले, तर विश्वकोशाच्या १७ व्या खंडाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते २१ फेब्रुवारी २००७ रोजी मुंबई येथे झाले. आजमितीस मराठी विश्वकोशाच्या नियोजित सर्व खंडांचे प्रकाशन पूर्ण झाले आहे. प्रस्तावित नकाशा खंड प्रलंबित आहे. आता प्रकाशित कोशाच्या सुधारित आवृत्तीचे कार्य हाती घेण्यात आले आहे.

### ५.४ मराठी कुमारकोश : योजना आणि सद्यःस्थिती

सर्वसाधारणपणे १४ ते १८ या वयोगटांतील विद्यार्थ्यांमधील जिज्ञासा लक्षात घेऊन इ. ९ वी ते इ. १२ वीसाठी उपयुक्त अशा 'मराठी कुमारकोश'च्या १२ खंडांची योजना प्रा. मे. पुं. रेगे यांच्या कार्यकाळात आखण्यात आली. प्रा. जाधव यांच्या कार्यकाळात 'मराठी कुमारकोश परिचय ग्रंथ' लिहून पूर्ण झाला. त्याचे प्रकाशन डॉ. श्रीकांत जिचकर यांच्या कार्यकाळात झाले.

प्रा. मे. पुं. रेगे यांनी यांनी होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. वि. गो. कुलकर्णी यांना घेऊन या प्रकल्पाचा विस्तृत आराखडा तयार केला. विषयवार नोंदींची योजना हे या विश्वकोशाचे वैशिष्ट्य होय. नियोजित बारा खंडांचे विषय विभाजन करण्यात आले ते असे : (१) जीवसृष्टी व पर्यावरण, (२) भौतिक विज्ञान व तंत्रज्ञान, (३) विश्व आणि पृथ्वी, (४) प्राचीन संस्कृती, (५) आधुनिक जग, (६) उद्योगधंदे आणि व्यापार, (७) शेती आणि शेतकी, (८) जागतिक साहित्य, (९) ललित कला, (१०) क्रीडा, खेळ, मनोरंजन, (११) थोरांची चरित्रे आणि (१२) महाराष्ट्र आणि भारत.

योजनेनुसार आजअखेर पहिल्या खंडाचे चार भाग सिद्ध झाले असून, दोन मुद्रित रूपात उपलब्ध आहेत, तर चारही भाग मराठी विश्वकोश संकेतस्थळ http://marathivishwakosh.org वर मृदू रूपात प्रकाशित असल्याने सर्वांना ते सर्व वेळ संदर्भासाठी 'मुक्त नि मुफ्त' उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पहिले दोन भाग अंध वाचकांसाठी ब्रेल लिपीत प्रकाशित करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे यातील २ भाग ध्वनिमुद्रित रूपात (बोलके) संकेतस्थळावर मृदू प्रतीसह एकत्र वाचता आणि ऐकता येतात. यातील काही नोंदी पूर्वाध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव व डॉ. विजया वाड यांच्या आवाजात आहेत. मराठी कुमारकोशातील नोंदी त्या त्या भागात वर्णमालेतील वर्णानुक्रमानुसार (अकारविल्हे) देण्यात आल्या असून, वाचक वयोगट आणि त्यांची आकलन क्षमता लक्षात घेऊन त्या लिहिल्या आणि संपादिल्या आहेत. असे असले तरी हे भाग 'प्रौढ' जिज्ञासू वाचकांसाठीही तितकेच उपयुक्त आहेत.

### ५.५ विविध ज्ञानमंडळे आणि त्यांचे कार्य

दिलीप करंबेळकर यांच्या कार्यकाळात 'सूचिखंड' हा मराठी विश्वकोशचा २१ वा खंड प्रकाशित होऊन मूळ योजना पूर्ण झाली. जगभर विश्वकोश निर्मिती व विकास ही निरंतर प्रक्रिया मानली जाते. ती लक्षात घेऊन २०१९-२० मध्ये मराठी विश्वकोश निर्मितीचे कार्य महाजालीय पद्धतीने आणि विकेंद्रित रूपात करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने घेतला. त्यानुसार विविध ज्ञान-विज्ञान शाखांसाठी ६० ज्ञानमंडळांची निर्मिती करण्याचे ठरवून त्यानुसार ४५ ज्ञानमंडळे विविध विद्यापीठे व विषय समर्पित संस्था, संघटनांच्या साहाय्याने विधिवत सामंजस्य करार करून कार्य सुरू करण्यात आले. आजमितीस (३१ डिसेंबर, २०२२)

मानव्यविद्या शाखेच्या ४,०५७ तर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या २,७९४ नोंदी लिहून पूर्ण असून, त्यापैकी अनुक्रमे ३,५२८ आणि २,३१८ इतक्या नोंदी संपादित करून त्या विश्वकोश संकेतस्थळावर प्रकाशितही करण्यात आल्या आहेत.

विविध ज्ञानमंडळांची निर्मिती केवळ विकेंद्रित प्रशासन यंत्रणा नसून, उपलब्ध यंत्रणा आणि तज्ज्ञ मनुष्यबळ व बौद्धिक संपदेच्या द्रष्ट्या वापर-व्यवहाराचे नीती-नियोजन ठरले आहे. आज जगातील प्रगती विश्वकोश निर्मिती संस्था ज्या तंत्र नि पद्धतीचा वापर करतात, त्याचा अंगीकार करून मराठी विश्वकोशाने आपली अद्ययावतता व आधुनिकता या दोन्हींची जपणूक आणि जोपासना केली आहे. मानव्यविद्या शाखेतील २७ आणि विज्ञान-तंत्रज्ञान विद्याशाखेतील १८ अशी एकूण ४५ ज्ञानमंडळे सक्रिय झाली असून, लवकरच अन्य ज्ञानमंडळे स्थापन होऊन सक्रिय केली जातील. मुद्रित समांतर मृदू विश्वकोशाचे महाजालीय प्रकाशनाचे मंडळाचे धोरण असून, जुन्या नोंदी अद्यतन करणे आणि कालसंगत नव्या नोंदी लिहून घेणे, असे द्विस्तरीय कार्य मंडळ सध्या करीत असल्याने मराठी विश्वकोशाचे आधुनिकीकरण गतिमान आहे.

### ५.६ भविष्यवेध

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मितीचे कार्य १९६२ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अखत्यारीत नियोजन करून कृतिप्रवण झाले. १९८० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ कार्यप्रवण झाले. गेल्या सुमारे सहा दशकांच्या हीरकमहोत्सवी प्रवासात महाराष्ट्र राज्याचा जसा विकास झाला, तसा तो मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, लिपी, तत्त्वज्ञान इत्यादींचाही झाला आहे. एकविसावे शतक हे ज्ञानशतक मानले गेले आहे. ते संगणकीय कार्यप्रणाली, तंत्रज्ञान व महाजालीय संपर्क, संग्रह साधनांचे विकास शतक आहे, हे लक्षात घेता मंडळापुढे खालील आव्हाने आहेत.-

१. मराठी विश्वकोश, मराठी कुमारकोश, मराठी वार्षिकी इ. योजनांची कालसंगत पुनर्रचना करणे.
२. उपरोक्त उद्दिष्टपूर्तीसाठी अद्ययावत व आधुनिक अशी यंत्रणा आणि कुशल, तज्ज्ञ मनुष्यबळाचे नियोजन व संघटन करणे.
३. महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे मूलभूत रूपात आधुनिकीकरण करताना मानव्यविद्या शाखा आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

यांचा बौद्धिक, व्यवहार्य व मानवलक्ष्यी मेळ घालत संतुलित, संयत आणि परंतु गतिमान विकास करणे.

४. त्यासाठी महाराष्ट्र शासन स्तरावर भाषा, साहित्य, लिपी, संस्कृती, प्रकाशन, शिक्षण, लोकशिक्षण, समाज सहभाग हे प्राधान्यक्रमाचे विषय ठरवून सर्वोच्च आर्थिक तरतूद व निधी संकलनाचे लक्ष्य निर्धारित करून त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करणे.

५. कार्यालय, प्रशासन, ग्रंथालय यांचे महाजालसंलग्न संगणकीकरण करून विश्वकोशाची कार्यपद्धती, निर्मिती, संपर्क यंत्रणा लोकसहभागी करणे.

असे करणे म्हणजे ज्ञानविकासाची निरंतरता, निरपेक्षता व पारदर्शिता जपणे होय.

## *संदर्भ सूची*


१. *Propaedia - The Encyclopedia Britanica - Ed. - Mortimer J. Adler, Page 475*

२. *Propedia - Page 475*

३. *नवभारत मासिक, जानेवारी, १९९८, पृ. २२*

४. *Encyclopedia Britanica - Preface (1943-93)*

५. *विश्वकोश (नोंद)*

६. *http://en.m.wikipedia.orgwiki*

७. *शतकाची विचारशैली खंड १, संपादक डॉ. रमेश धोंगडे, पृ. १२७*

८. *शतकाची विचारशैली खंड १, संपादक डॉ. रमेश धोंडगे, पृ. १३४*

९. *मराठी विश्वकोश (खंड १२) संपादक लक्ष्मणशास्त्री जोशी, पृ. १४९६*

१०. *यशवंतराव चव्हाण : व्यक्तित्व व कर्तृत्व-गोविंद तळवळकर, पृ. १०२*

११. *सह्याद्रीचे वारे : यशवंतराव चव्हाण, पृ. ५४, (दि. २७ एप्रिल, १९६०)*

१२. *तत्रैव पृ. ५८ (दि. १ मे, १९६०)*

१३. *तत्रैव, पृ. २७३ (दि. १३ फेब्रुवारी, १९६०)*

१४. *तत्रैव, पृ. २७९*

१५. *तत्रैव, पृ. २८०*

*१६. तत्रैव, पृ. २८०*
*१७. तत्रैव, पृ. २८०*
*१८. http/:sahitya.marathi gov.in मूळ इंग्रजी आदेशाचे मराठी भाषांतर*
*१९. मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रारंभिक पृष्ठ (क्रमांक नाही)*
*२०. महाराष्ट्राचे शिल्पकार : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी- डॉ. अरुंधती खंडकर, पृ. ४४*
*२१. मराठी विश्वकोश, खंड २१, (सूचिखंड), पृ. १५.*
*२२. मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पृष्ठ क्र. ५ वरून उद्‌धृत.*
*२३. तत्रैव, पृष्ठे ५, ६ उद्‌धृत*
*२४. तत्रैव, पृष्ठे- २०, २१, २२ उद्‌धृत.*
*२५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्ती, कार्य आणि विचार, संपादक : वसंत पळशीकर, पृ. ८८*
*२६. तत्रैव, पृ. ८९*
*२७. तत्रैव, पृ. ८९*

■

*(अप्रकाशित)*

# १५

## मराठी विश्वकोशातील तर्कतीर्थलिखित नोंदींची मीमांसा

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांनी विश्वकोशाचे जे २० संहिता खंड प्रकाशित केले आहेत, त्यापैकी प्रारंभिक १५ खंडांचे संपादन व प्रकाशन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या कार्यकाळात (१९६०-१९८०) झाले. असे असले, तरी पुढील खंडांतील नोंदी लेखन, संपादन कार्य निरंतर नि समांतरपणे सुरू होते. त्यामुळे मराठी विश्वकोश प्रकल्पातील एखाद्या खंडाचा अपवाद वगळता सर्व खंडांत तर्कतीर्थांनी लिहिलेल्या नोंदी आढळतात. सर्व खंडांमध्ये मिळून त्या १४३ नोंदी आहेत. त्यात विषयवैविध्य आढळते. वेद, पुराण, इतिहास, संस्कृती, तत्त्वज्ञान, धर्म, ईश्वर, संत, साहित्य, पूजाविधी, चरित्रे, जातिसंस्था, विविध वाद, ग्रंथ, राजकीय, सामाजिक, आर्थिक इ. विषयांना स्पर्श करणाऱ्या नोंदींचे वैविध्य पाहिले की, तर्कतीर्थांच्या अद्‌भुत प्रतिभेचे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही. या नोंदी छोट्या, मध्यम व विस्तृत अशा व्याप्तीलेखांच्या रूपांत आढळतात. त्यातून शास्त्रीजींची बहुश्रुतता आणि व्यासंग स्पष्ट होतो. प्रारंभीची 'अंत्यविधी व अंत्यसंस्कार'सारखी नोंद वाचली की, तर्कतीर्थांची लेखनशैली, आशयसंपन्नता, शब्दप्रभुत्व इ.ची प्रचिती आल्यावाचून राहत नाही. मृत्यू या एका घटनेभोवती समाज, संस्कृती, नातेसंबंध, रूढी-परंपरा, मृत्यूचे परिणाम, प्रेतविधी, त्यामागील भावना, परंपरा, मूल्ये यांचे संदर्भ वाचताना थक्क व्हायला होते. एखादी नोंद लिहीत असताना ती सर्वस्पर्शी होत आशयसंपन्न करण्याची तर्कतीर्थांची

लेखनशैली म्हणजे वस्तुनिष्ठ लेखनाचा वस्तुपाठच! मृत्यूच्या अनुषंगाने तर्कतीर्थ मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र इ.ना स्पर्श करतात, त्यामुळे अशा नोंदी एकाच वेळी प्रागैतिहासिक असतात, तर दुसरीकडे विज्ञानाच्या अंगाने आधुनिक बनतात. मृत्यूच्या भोवती भय, भावना, भूत, आत्मा, परलोक ते वर्णितात नि कर्मकांडही म्हणजे अग्निसंस्कार, मंत्रपाठ, स्नान, प्रेतवस्त्र, ताटी-तिरडी अशा सूक्ष्म गोष्टींचेही ते भान ठेवतात. मृत्यू केवळ भारतातीलच नाही तर विविध देश, धर्मांचे दाखले देत अंत्यसंस्कारासारखा विषय जीवनाचा समजून घेण्याचा अनिवार्य भाग कसा असतो, ते सदरची नोंद वाचताना लक्षात येते. माणूस कितीही आधुनिक झाला तरी प्रथा, परंपरा त्याची पाठ कशी सोडत नाहीत, याची मुळे श्रद्धेत कशी आहेत, ते सांगायला शास्त्रीजी विसरत नाहीत. मराठी विश्वकोश सर्वविषयसंग्राहक कोश बनला, याचे रहस्य नोंदीच्या विषयवैविध्यात सामावलेले दिसते.

**विषय वैविध्य**

तर्कतीर्थ नोंद वा संहितालेखक म्हणून अष्टावधानी व चतुरस्त्र व्यासंगाचे ज्ञानतपस्वी होत. वेद, वाद, व्यक्ती, चरित्र, ईश्वर, संत, श्रद्धा, संस्कार, संस्कृती, साहित्य, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र अशा ज्ञान, विज्ञानाच्या सर्व शाखा, उपशाखांना स्पर्श करणाऱ्या त्यांच्या नोंदी विषयविविधता घेऊन येतात.

**प्राचीन वाङ्मय**

वेद, उपनिषद, अरण्यके, ब्राह्मणग्रंथ, पुराण इ.चा अभ्यास तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपले गुरू नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली वाईतील प्राज्ञपाठशाळेत केला. न्याय वैदिक ही त्यांची अभ्यासाची विशेष शाखा असली, तरी प्राज्ञपाठशाळेतील अध्यापन व अध्ययन पद्धती अशी होती की, विद्यार्थी सर्वज्ञानी झाला पाहिजे. स्मृती, श्रुतीबरोबर खंडन-मंडन होत असे. त्यामुळे विद्यार्थी तावूनसुलाखून बाहेर पडायचा. 'तर्कतीर्थ' ही पदवी त्यांनी कलकत्त्याच्या शासकीय महाविद्यालयातून संस्कृत साहित्याचे अध्ययन करून १९२२ मध्ये संपादन केली. व्याकरण, न्यायवेदान्त इ.च्या व्यासंगातून त्यांचे पांडित प्रगल्भ झाले, त्यामुळे मराठी विश्वकोशात त्यांनी वेद, न्यायदर्शन, ऋग्वेद, अथर्ववेद, सामवेद, अरण्यके, उपनिषदे, कल्पसूत्रेसदृश नोंदी लिहिल्या आहेत. 'वेद व वेदांगे' नोंदी वेदसंहिता, ब्राह्मणे, आरण्यके,

उपनिषदे कल्प, निरुक्त, व्याकरण, ज्योतिष यांवर संक्षिप्त माहिती मिळते, तर विश्वकोशात याच उपशीर्षकांवर मुख्य नोंद वा व्याप्तीलेखही आढळतात. 'वैदिक संस्कृतीचा इतिहास' शीर्षक तर्कतीर्थांच्या भाषणाचा जो संग्रह आहे, तो इतिहाससंहिता म्हणून ओळखला जातो. भारतीय संस्कृती, हिंदू धर्म ही शास्त्रीजींच्या अध्ययन, अध्यापन, संशोधन, लेखनाची हुकमी क्षेत्रे होत. 'वेद' हा शब्दविद्येचा पर्यायवाची शब्द असून, आपणास आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, इतिहासवेद या शब्दांतून ते स्पष्ट होते. ही दृष्टी तर्कतीर्थांच्या लेखनपद्धतीतून लक्षात येते. ब्राह्मणग्रंथ गद्य वाङ्मयाचे नमुने म्हणून पुढे येतात, ते शास्त्रीजींच्या सूक्ष्म अध्ययनामुळे. उपनिषदे जीव, जगत्, आत्मा, परमात्मा संबंध विशद करतात. अशा सुबोध विवेचनातून वेदासारखा विषय ते सहज, बोधगम्य करतात.

**विविध वाद**

'वाद' शब्द विचारधारांचे प्रतीक असला तरी तो प्रत्ययाच्या रूपात वापरला जातो. वाद एक विशेष विचारधारा म्हणून उगम पावतो आणि प्रमाण, प्रमेय, प्रयोजन, सिद्धांत, तर्क, निर्णय इ. प्रक्रियांतून विशिष्ट विचार-विकास म्हणून प्रचलित होतो. वाद हा विशिष्ट विचार, पक्ष, दृष्टिकोणाचा आग्रही राहतो. इंग्रजीत 'इझम' म्हणून ओळखला जाणारा शब्द ज्ञान-विज्ञानाच्या अनेक शाखांमध्ये विविध विचारप्रवाहांचे प्रतिनिधित्व करतो. तर्कतीर्थांनी शास्त्रे, पुराणे, इतिहास, तत्त्वज्ञान, वाङ्मय इत्यादींचा सखोल अभ्यास केलेला असल्याने त्यांनी मराठी विश्वकोशात आधुनिकतावाद, उदारमतवाद, एकदेवतावाद, एकसत्तावाद केवलाद्वैतवाद, ख्यातिवाद, गांधीवाद, चिद्वाद, जडवाद, द्वैतवाद, द्वैताद्वैतवाद, नियतीवाद, निराशावाद, मानवतावाद, अहंमात्रवाद, ईश्वरवाद, कर्मवाद इ. नोंदी लिहिल्या आहेत. या नोंदींच्या नुसत्या शीर्षकांवर नजर फिरविली तरी आपल्या लक्षात येते की, या नोंदी धर्म, इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, अध्यात्मशास्त्र, तत्त्वज्ञानसारख्या परस्परपूरक आणि विरोधी विद्याशाखा, शास्त्रे यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. यातील 'ख्यातिवाद'सारखी नोंद विद्वत्जनांच्या चर्चेची गोष्ट बनली होती. केवलाद्वैतवाद, गांधीवादसारख्या नोंदी व्याप्तीलेख होत.

प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानात मिथ्या ज्ञान वा भ्रम उत्पत्तीबद्दल विस्ताराने चर्चा आढळते. त्यासंबंधी ऊहापोह या नोंदीत आढळतो. पातंजल योगसूत्रात याची चर्चा आहे. बौद्ध दर्शनात शून्यवाद येतो. त्याचे मूळ इथे दिसते.

भ्रमोत्पत्ती स्पष्ट झाली की, यथार्थज्ञान आपोआप उमजते. हे सर्व शास्त्रीजींनी या चर्चेत विस्ताराने विशद केले आहे. महात्मा गांधी आणि तर्कतीर्थ या उभयतांचे निकट साहचर्य होते; पण 'गांधीवाद' नोंदीत तुम्हास व्यक्तिसापेक्ष उल्लेख आढळणार नाहीत. विश्वकोश नोंद म्हणजे वस्तुनिष्ठता. त्याचा वस्तुपाठ म्हणून या नोंदीकडे पाहता येते. गांधीवादात मानवतावाद, नीतिशास्त्र, समाजशास्त्र, राजनीतिशास्त्र कसे सामावलेले आहे, याची विस्तृत चर्चा या नोंदीत आहे. गांधीवादात ईश्वर, प्रार्थना, अहिंसा, ब्रह्मचर्य इ. घटक मूल्ये म्हणून कशी येतात, याचे या नोंदीत विवेचन आढळते. गांधीवाद ही विचारधारा खरी; पण आचारधर्म म्हणूनही तिचे महत्त्व ही नोंद स्पष्ट करते.

द्वैतवाद, द्वैताद्वैतवाद, केवलाद्वैतवाद या सर्व नोंदी आत्मा-परमात्मा संबंधांवर आधारित आहेत. ईश्वर, जीव, जगत, सृष्टीसंबंधांची चर्चा म्हणजे दृष्य- अदृष्य, जाणीव यांचा संघर्ष. शंकराचार्यांचा केवलाद्वैतावाद, मध्वाचार्यांचा द्वैतवाद यातील अंतर आशा नोंदीतून आपणास लक्षात येते. गुंतागुंतीच्या संकल्पना वा विचार सुबोध करण्याची तर्कतीर्थांची हातोटी अशा नोंदींतून लक्षात येते.

जडवादावर तर तर्कतीर्थांनी स्वतंत्र ग्रंथच रचला आहे. अनिश्वरवाद, आस्तिकवाद यांच्या सीमारेषा स्पष्ट करीत श्रद्धा, अश्रद्धा, अंधश्रद्धा इ.वरील त्यांची भाष्ये, परिभाषा, संकल्पना वाचणे म्हणजे अज्ञानाचे ढग पांगणेच असते.

आधुनिकतावाद, उदारमतवाद, मानवतावाद, जडवाद या नोंदी प्रबोधनकालानंतर आलेल्या विचारधारांच्या आहेत. यांचा पाया भौतिक जीवन, विज्ञान आहे. तर्कतीर्थ यांची अशी मान्यता आहे की, समाजजीवन समजून घ्यायचे, तर विविध विचारप्रवाह माहीत हवेत. त्यातून जगण्याची एक व्यापक व उदार दृष्टी विकसित होत असते.

**व्यक्ती नोंदी**

कणाद, कपिल, कश्यप, कात्यायन आदी प्रागैतिहासिक लेखक. कणादनी वैशेषिक दर्शनाचे प्रतिपादन केले. कपिल हा सांख्यदर्शनाचा प्रणेता, तर कश्यप गोत्रप्रवर्तक. कात्यायन शुक्ल यजुर्वेदाच्या १५ शाखांपैकी एका शाखेचा प्रवर्तक. ही सर्व मंडळी इसवी सन पूर्व कालखंडातील. तर्कतीर्थ त्यांच्या विचार व कार्यावर भर देत नोंदी लिहितात. कारण, त्यांच्या रचना हाच त्यांच्या जीवनाचा आरसा ठरतो. तर्कतीर्थांनी त्यांचे

वेद, दर्शनातील स्थान अधोरेखित करीत पूर्वापार ज्ञान विकासातील या मान्यवरांचे योगदान शब्दबद्ध केले आहे.

मध्वाचार्य, रामानुजाचार्य ही मंडळी विविध संप्रदाय संस्थापक. त्यांच्या नोंदीतही चरित्रापेक्षा विचार, रचना व कार्यावर भर आहे. मनू, मनुस्मृती, मनुप्रणित राज्यशास्त्र या नोंदी सलग वाचताना लक्षात येते की, मनू हा पहिला मनुष्य म्हणून वेदान्त वर्णिला आहे. तो यज्ञसंस्थेचा प्रवर्तक मानण्यात येतो. त्याचा 'मनुस्मृती' हा धर्मशास्त्र प्रमाणग्रंथ. या ग्रंथात तत्कालीन मानवधर्मशास्त्र शब्दबद्ध आहे. इसवी सन पूर्व दुसऱ्या कालखंडातील समाजजीवन यातून स्पष्ट होते. बारा अध्यायांच्या या ग्रंथात विविध संस्कार, स्त्री-पुरुष स्थान, ज्ञानव्यवस्था, गृहस्थजीवन, आचारधर्म, विधी इ.चे जे वर्णन आहे, त्यातून माणसाच्या पूर्व समाजजीवनावर प्रकाश पडतो.

तथापि तुकाराम, रामदास यांसारख्या संतांच्या नोंदींमध्ये चरित्र, विचार, कार्य अंतर्भूत आहे. तीच गोष्ट महात्मा फुले, महात्मा गांधी, कार्ल मार्क्स यांच्या नोंदीत दिसून येते. इथे मात्र विचारावरील भर त्याच्या विस्तृत विवेचनातून लक्षात येतो. सेनापती बापट, विनोबा भावे या नोंदीही अशाच; पण फ्रेझर आणि मॅकियाव्हेली यांच्या नोंदी पाश्चात्त्य चरित्र म्हणून तितक्याच विस्ताराने लिहिलेल्या आढळतात. निक्कोला, मॅकिआव्हेली (१४६९-१५२७) हा प्रसिद्ध इटालियन राजकीय तत्त्वज्ञ, इतिहासकार, नाटककार, प्रबोधनयुगाचा प्रतिनिधी. फुले, गांधी, मार्क्सप्रमाणे यांनीही युरोपातील इटली, जर्मनी, स्पेन आदी देशांमध्ये नवे सामाजिक, राजकीय तत्त्वज्ञान रुजविले. सामान्य भारतीयांना तो अपरिचित. परंतु, जिज्ञासूंच्या प्रत्येक शंकेचे उत्तर देणारा म्हणून विश्वकोशाचे जे महत्त्व सिद्ध होते, त्याला अशा नोंदी कारणीभूत असतात. जेम्स जॉर्ज फ्रेझर (१८५४-१९४१) ब्रिटिश मानवशास्त्रज्ञ व साहित्यिक. त्याने जादू, धर्म व विज्ञान यांच्या आधारे मानवसमाज क्रमशः कसा विकसित होत गेला, ते नोंदीतून वाचत आपण विकासाचा नवा पटच समजून घेत राहतो.

**साहित्यकृती**

'रामायण', 'महाभारत', 'भगवद्गीता' हे असे ग्रंथ आहेत की, या सर्वांची भारतातील सर्वाधिक भाषा, बोलींमध्ये भाषांतरे सापडतात. ती लोकसाहित्यात आहेत, तशीच लिखित साहित्यात त्यांची भुरळ विदेशी भाषांतरकारांनाही पडलेली दिसते. अशा साहित्यकृती अभिजात बनतात.

त्या त्यांच्या मृत्युंजयी अस्तित्वामुळे 'रामायण' भारतीय समाजाचा आदर्श बनते, तर 'महाभारत' जीवन व्यवहाराची शिकवण देते. 'भगवद्गीता' जीवन तत्त्वज्ञान सांगते. भौतिक विकासानंतरही यांची मोहिनी भारतीय जनमानसावर अढळ नि अटळ कशी ते अलीकडच्या कोरोना संसर्गकाळातील एकांतवासात भारतीयांना स्मरण होते ते परत 'रामायण' नि 'महाभारता'चेच. 'भगवद्गीता' हिंदू धर्माचा सर्वमान्य स्वत:प्रमाण ग्रंथ कसा ते तर्कतीर्थ या नोंदीतून सप्रमाण स्पष्ट करतात. 'महाभारत' प्राचीन संस्कृत महाकाव्य असूनही ते समकालास आकर्षक ठरते, ते त्यातील चरित्र संघर्षामुळे. आदिपर्व, सभापर्व, वनपर्व, विराटपर्व, उद्योगपर्व, भीष्मपर्व, द्रोणपर्व, कर्णपर्व, शल्यपर्व इत्यादी सर्व नोंदी म्हणजे महाभारताचा सारसंक्षेप. 'गागर में सागर' अशी शैली तर्कतीर्थच निर्माण करू शकतात. संस्कृत भाषेचे त्यांचे प्रभुत्व व अभ्यास अशा नोंदी वाचकास प्रत्ययास आणून देतात.

**संस्कार आणि संस्कृती**

संस्कृती आणि संस्कार यांची अभिन्नता स्पष्ट आहे. हिंदू धर्मात विविध संस्कारांना असाधारण महत्त्व आहे. मनुष्याच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या प्रत्येक अवस्थेत नि वळणावर इतके संस्कार आहेत, तितके अन्य धर्म नि संस्कृतीत क्वचित आढळतील. इतकेच महत्त्व या धर्मात कर्मकांडासही आहे. देव आणि धर्म, संस्कार आणि संस्कृती अशा चक्रव्यूहात हिंदू धर्मानुरागी आयुष्यभर गुंतून राहतात. अशांपैकी तर्कतीर्थांनी अभिषेक, अमरत्व, आपदधर्म, उपनयन, केशवपन, उपासना, कार्यकारणभाव इ. नोंदी मराठी विश्वकोशात लिहिल्या आहेत. धर्मात 'अभिषेक' हा प्रतिष्ठापनाचा विधी होय. यात स्नान क्रियेद्वारे कल्याण वा पुण्यभावनेची स्थापना केली जाते. याचा संबंध निसर्गातून निर्मित संस्कृतीशी आहे. अभिषेक ईश्वराचा तद्वतच राजाचाही. राजा प्रतिईश्वरच म्हणून त्यास अभिषेक. राजाभिषेकाशिवाय व्यक्तीचे राजा हे नामाभिधान संभवत नाही. हा अभिषेक प्रसंगानुरूप जल, दूध, तूप, दही, मध, तेल इ. द्रव्यांनी.

कारण सृष्टी द्रव्यातून निर्माण झाली, अशीच एक अभ्यंजन शीर्षक नोंद शास्त्रीजींनी या कोशात लिहिली असून, तिचा नि अभिषेकाचा अभिन्न संबंध आहे. 'अमरत्व' नोंद वाचताना लक्षात येते की, ही कल्पना सर्व धर्मांत रूढ आहे. हिंदू, ख्रिस्त, बौद्ध, मुस्लीम, पारशी, यहुदी; सर्व धर्मांत 'अमरत्व' संकल्पना असली, तरी ती प्राप्त होण्याची कारणे, मार्ग, उपाय

भिन्न आहेत. त्याचा पाप-पुण्याशी असलेला संबंध मात्र समान दिसतो. यावरून लक्षात येते की, ऐहिकाकडून पारलौकिकाकडे धर्मानुराग्यांना नेण्याचे माध्यम व लक्ष्य अमरत्व होय. उपनयन हा हिंदू वा सदृश धर्मातील सवर्णात (ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय) प्रचलित संस्कार असून, याद्वारे बटूस वेद, विद्या अध्ययनाचा अधिकार दिला जातो. शूद्रास विद्येच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याच्या सामाजिक दुष्प्रथेची मुळे उपनयन संस्कारात दडल्याचे लक्षात येते. या संस्कारविधीची माहिती सदर नोंदीत आहे. 'उपासना' नोंदीचा संबंध भक्तिमार्गाशी आहे. हे एक कर्मकांड असून, ते ईश्वरप्राप्तीचे साधन होय. 'केशवपन' नोंद स्त्री-पुरुष उभयतांचे होत असले तरी त्याचे धार्मिक, सामाजिक संबंध भिन्न असून, ही रूढी स्त्री-पुरुषांसंदर्भात वेगवेगळे संकेत सूचित करते. पुरुषाचे मुंडन व विधवेचे केशवपन या शब्दछटा बरंच काही सांगून जातात. शास्त्रीजी ही सर्व माहिती शास्त्रप्रमाण संदर्भात विशद करतात. ही ज्ञानकोशीय शिस्त प्रशंसनीय व अनुकरणीय होय.

**ईश्वर**

राम, कृष्ण, गणपती, इंद्र, इ. देवांच्या मराठी विश्वकोशातील नोंदींचा आधार प्राचीन भारतीय साहित्य आहे. रामाची नोंद वाल्मीकी रामायणाधारे लिहिण्यात आल्याचे दिसून येते. रामाचा काळ इ.स. पूर्व २३५० ते १९५० नोंदला आहे. तो आपणापुढे रामायणाचे पात्र म्हणून पुढे येतो. प्रचलित रामकथेच्या आधारे वर्णित रामाची विविध रूपे नोंदीतून लक्षात येतात. रामासंबंधी हिंदू, बौद्ध, जैन धर्मांतील दाखले या तिन्ही धर्मांचे परस्पर संबंध अधोरेखित करतात. राम केवळ भारतात नाही तर तो तिबेट, मलाया, भूतान, जावा, सयाम, ब्रह्मदेश, कंबोडिया इ. देशांमध्ये असून, तेथील साहित्यात रामाचे संदर्भ तर आहेतच; शिवाय त्या देशात 'राम' ईश्वर असल्याने (समाजधारणेनुसार) त्याची मंदिरेही आढळतात. 'कृष्ण' नोंदीतील पहिलेच वाक्य, 'कृष्ण ही अतिप्राचीन भारतेतिहासातील इतिहासाला कलाटणी देणारी वास्तविक व्यक्ती होऊन गेली.' या वाक्यातून कृष्णचरित्राची ऐतिहासिकता तर्कतीर्थ अधोरेखित करतात. पुढे कृष्ण कथेतील अद्‌भुततेच्या आधारे लीला, चमत्कारांचे वर्णन येते. 'विष्णू पुराण', 'हरिश्चंद्र पुराण' आधारित कृष्ण रासक्रीडा करणारा भेटतो. राजा कृष्ण हे त्याचे आणखी एक रूप. मथुरा नि वृंदावनातला कृष्ण भिन्न. 'महाभारत'मधील कृष्ण आणखी वेगळा. कृष्ण मंदिरे व्यक्तीस प्राप्त झालेल्या

ईश्वरीय शक्तीचे प्रतीक. अशा नोंदीतून ते शिल्पकला, चित्रकला, युद्धकला, शृंगार, प्रेम, प्रणय इ. घटकांच्या नोंदी करण्यात विसरत नाही. कारण, त्याशिवाय कृष्णचरित्र अपूर्ण, याचे भान तर्कतीर्थांना असते. गणपतीचा उल्लेख आपणास ऋग्वेद, आरण्यक, उपनिषद आदी ग्रंथांत मिळतो. गणेश हे शिवरूप. तो विघ्नहर्ता म्हणून उपास्य. त्याच्या विविध कथांनी आपले प्राचीन वाङ्मय भरलेले आहे. गणेशवंदना, गणेश मंदिरे, गणेशोत्सव या साऱ्या गोष्टी संस्कृतीद्वारे धर्मास जोडल्या गेल्याचे या नोंदीतून लक्षात येते. इंद्र ही वैदिक देवता. इंद्र हा भारतीयांचा श्रेष्ठ देव. तो बलशाली. इंद्र कथाही अन्य देव-देवतांप्रमाणे प्रचलित आहे. त्यांची माहिती या नोंदींतून मिळते. पुराण ग्रंथ देवादिकांच्या कथांनी समृद्ध आहेत. तर्कतीर्थांचा या सर्व ग्रंथांवर अधिकार असल्याने ते तटस्थपणे व्यक्ती व ईश्वरमय रूपातील अंतर स्पष्ट करतात. सर्व धर्मग्रंथांमध्ये आपापल्या देव-देवता, आराध्य दैवतांचे अवतार, चमत्कार, लीला नोंदल्या असून, त्यातून त्या चरित्रास अलौकिकत्व येते, हे आपणास विसरून चालणार नाही.

**श्रद्धा, अंधश्रद्धा**

मानवी सभ्यतेचा विकास जादू, धर्म आणि विज्ञानाच्या माध्यमातून होत आल्याचे आपण यापूर्वी जेम्स जॉर्ज फ्रेझर यांच्या नोंदीतून समजून घेतले आहे. आदिम अवस्थेत मनुष्य हताश स्थितीत मंत्र, तंत्र, जादूटोणा, भानामती, करणी, कौल, दैवी चमत्कारांवर जगत होता. विश्वनिर्मितीचे गूढ त्याने भौतिक अभ्यासाने भेदले. तो बुद्धिवादी होऊनही अश्रद्ध होत नाही. याचा आपण जेव्हा शोध घेऊ लागतो तेव्हा लक्षात येते की, माणसाच्या जगण्याचे अनेक आधार असतात. भाव-भावना, कल्पना, मूर्त-अमूर्त संकल्पना इ. अनेकांपैकी आहे जादूटोणा, भूत-भुताटकी, भानामती, गंडे-दोरे, मंत्र-तंत्र इ. याचा मनुष्यावरील प्रभाव पूर्वापार विज्ञानाच्या वाढत्या प्रचार, प्रसाराने समाजमनावरील त्याची अंधश्रद्धा कमी झाली; पण निराश झाला असे नाही. ते वर्तमानापुढील आव्हान खरे! 'जादूटोणा' नोंद आपणास समजावते की, हा यातुविद्येचा भाग होय. प्राचीन व मध्ययुगात या विद्येने समाजमन संमोहित केले होते. आधुनिक काळात त्याची कारणमीमांसा सुरू झाल्याने ते गूढ निमाले. हे जरी खरे असले, तरी मानव संस्कृतीच्या मोठ्या काळावर त्याचा प्रभाव होता. आशावादी मनुष्य सश्रद्ध होतो. मग विवेकाऐवजी चमत्कार, सादृश्य, संसर्ग यांचे प्राबल्य वाढते. या सर्व गोष्टी अशा नोंदीतून तर्कतीर्थांनी स्पष्ट

केल्या आहेत. 'कौल' नोंद याच परंपरेतील होय. शकुन-अपशकुनाच्या कल्पनेवर 'कौल'प्रथा उभी आहे. या क्रियेचा उल्लेख यजुर्वेदात आढळतो. भारताबरोबर ही प्रथा अरब, रोम, इजिप्त इ. देशांत म्हणण्यापेक्षा संस्कृतीत आढळते म्हणणे योग्य ठरावे. जपानमध्ये मंदिराच्या प्रांगणात झाडाला चिठ्ठ्या अडकवणे व आपल्याकडे मंदिरात घंटा लावणे (अर्पण करणे) यात ईप्सित साध्याची भावना आढळते. या प्रथेचा संबंध मानसिक स्थितीशी जवळचा असतो. 'मंत्र'संबंधी जागोजागी विविध नोंदींत जे उल्लेख सापडतात, त्यातूनही हे स्पष्ट होते. 'मुहूर्त', 'ज्योतिष' या नोंदीही याच संदर्भात लक्षात घेतल्या पाहिजेत. तर्कतीर्थ अशा नोंदीत जे बारकावे स्पष्ट करतात, ते त्यांच्या निरीक्षण, परीक्षण, मीमांसा वृत्तीचे निदर्शक असते; पण नोंदीसंबंधीच्या ग्रंथप्रामाण्यास ते धक्का लागू देत नाहीत, त्यामुळे नोंदीची वस्तुनिष्ठता प्रखर सत्य म्हणून पुढे येते.

**प्राचीन शास्त्रे**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मुहूर्तशास्त्र, ज्योतिष्यशास्त्र, योगविज्ञानसंबंधी नोंदी लिहिल्या आहेत. दि. २५ ते २७ नोव्हेंबर, १९६१ या कालावधीत ते ज्योतिर्विद्या मंडळ, मुंबई यांच्या विद्यमाने संपन्न महाराष्ट्र राज्य ज्योतिष परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष होते. त्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात त्यांनी ज्योतिषशास्त्राचा संबंध गणिताशी कसा आहे, यावर प्रकाश पाडून दोन्हींतील अंतर कमी होण्यावर ज्योतिषाचे शास्त्रत्व अधिक निर्दोष होण्याचे प्रतिपादन केले होते. मुहूर्तशास्त्र नोंद ही कालमापनशास्त्र, खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र, इ.च्या संदर्भाने केल्याने मुहूर्ताचा संबंध शुभ-अशुभापेक्षा तारे, गृह इ. गतीवर असल्याने व त्याअनुषंगाने सृष्टीत होणारे बदल याच्याशी ते कसे जोडलेले आहेत, त्यावर तर्कतीर्थ प्रकाश टाकतात. शकुनशास्त्र, कौटिल्याचे अर्थशास्त्र यांचे या संदर्भातील दाखले वाचत असताना प्राचीन शास्त्रे काळाच्या संदर्भात नित्य बदलत गेल्याचेही लक्षात येते. 'योग' नोंदीत तर्कतीर्थांनी इंद्रिय संयम आणि मानसिक एकाग्रता यांचे महत्त्व स्पष्ट केले आहे. ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग, हठयोग, लययोग, मंत्रयोग अशी कितीतरी नवी योगाची अंगे या नोंदीतून उमगतात. त्याचबरोबर 'योगदर्शन' नोंदीअंतर्गत 'योगसूत्र'च्या आधारे समाधी इ. क्रिया अवस्थांचे वर्णन करतात. केवळ हिंदू धर्मच नव्हे, तर बौद्ध आणि जैन धर्मातही योग विवेचन कसे आलेले आहे, ते स्पष्ट करतात. या सर्व नोंदींमधून त्यांना प्राचीन विविध शास्त्रे, विज्ञान,

दर्शने यांची केवळ माहिती होती असे नाही, तर ती शास्त्रे ज्या ग्रंथसंपदेवर उभी आहेत, त्यांचे त्यांनी अनेकदा अनेक अंगांनी परिशीलन केल्याचेही ध्यानी येते. तर्कतीर्थांना अभ्यासासाठी कोणताही ग्रंथ वर्ज्य नसायचा. त्यांच्या मनात ज्ञान-विज्ञानाच्या सर्व क्षेत्र, घटक इत्यादींविषयी न आटणारी तहान होती, तशीच आपल्या जीवनात माहीत नसलेले ज्ञान असू नये, याचे जे विलक्षण आकर्षण होते, त्यातून त्यांचे अध्ययन, संशोधन चालायचे. ज्ञानाचा अथांग सागर पोहूनही पुढे त्यांना अज्ञानाचे अथांग आकाश खुणावत राहायचे. खऱ्या तपस्वीची तहान अगस्तीपेक्षा कमी नसते हेच खरे! या नोंदी म्हणजे वाचकांच्या अज्ञानसीमांचा निरास करायचे अखंड अभियानच.

**विविध समाज**

भारतातील धर्म आणि समाजसुधारणांच्या चळवळीत आर्य समाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, महाराष्ट्र समाज, सत्यशोधक समाज, थिऑसॉफिकल सोसायटी इ. संस्था, संघटना, चळवळींचा मोठा वाटा आहे. प्रबोधन काळाने युरोपात जे कार्य केले, तशाच प्रकारचे कार्य उपरोक्त विविध समाजांनी एकोणिसाव्या शतकात, तेही विशेषत: उत्तरार्धात गतीने केले. ब्राह्मो समाजाची स्थापना राजा राममोहन रॉय, महाराजा द्वारकानाथ टागोर, कालिनाथ रॉय, मथुरानाथ मलिक प्रभृतींनी हिंदू धर्मातील वाढलेले कर्मकांड नि मूर्तिपूजेचे स्तोम यांना छेद देऊन केवळ मानसिक, भावनिक उपासनेद्वारे ईश्वरप्राप्ती शक्य असल्याचे स्पष्ट केले. तीच गोष्ट प्रार्थना समाजाचीही. स्वामी दयानंद सरस्वती यांनी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आर्य समाजाची स्थापना करून ईश्वर सच्चिदानंद स्वरूप असून, भजन-पूजनाद्वारे त्याची प्राप्ती शक्य आहे, हे स्पष्ट केले. महात्मा फुले यांनी ईश्वरास निर्मिकाच्या रूपात मांडून सार्वजनिक सत्यधर्माची स्थापना केली. विशेष म्हणजे या सर्व समाजांनी धर्माचरण म्हणजे वंचित कल्याण मानून अनाथ, अनौरस बालके, विधवा, परित्यक्ता, इ. निराधारांच्या कल्याण संस्था स्थापून 'मानवसेवा हीच ईशसेवा' असा नवा कृतिपाठ देशभर रुजविला, त्यामुळे धर्माचरणास समाजाचरणाचा पर्याय उपलब्ध झाला. यातून मंदिर, मूर्ती, ब्राह्मण-पुरोहित, पापसंबंधी प्रायश्चिते, अनुष्ठाने यांना छेद मिळून सदाचार, सद्विचार म्हणजे खरा धर्म ही लोकभावना समाजात रुजणे व रूढ होणे शक्य झाले. या सर्व समाजाची तत्त्वे, कार्य, विचार इ. विवेचन तर्कतीर्थांनी आपल्या नोंदीत करून त्यांचे धर्म व समाजसुधारणांसंबंधी

योगदान रेखांकित केले आहे. आर्य समाज अस्पृश्यता व जातिभेद मानत नाही, हे सांगायला तर्कतीर्थ विसरत नाहीत. व्यक्तिश: तर्कतीर्थ सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज, ब्राह्मो समाज यांच्या कार्यात सहभागी असत. व्याख्याने देत, सर्वतोपरी सहकार्य करीत. एका प्रसंगी तरी त्यांनी आपला वाडा (द्रविड वाडा) ब्राह्मो समाजाच्या अनाथाश्रमासाठी देऊ केला होता. स्वत: तर्कतीर्थ अस्पृश्यता मानत नसत. हा व्यक्ती म्हणून त्यांच्यातील झालेला कायाकल्प म्हणजे या समाजाच्या कार्य, विचारांचा प्रभाव होय. तर्कतीर्थांनी मराठी विश्वकोशाचा मांडलेला प्रपंच केवळ ज्ञानयोग नव्हता, तर तो एक कर्मयोगही होता, हे अशा पुरोगामी नोंदीतून स्पष्ट होते.

**तत्त्वज्ञान**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मराठी विश्वकोशात तत्त्वज्ञानासंबंधी 'भारतीय तत्त्वज्ञान', 'ज्यू तत्त्वज्ञान', 'भारतीय विचार' इ. नोंदी लिहिल्या आहेत. तत्त्वज्ञान हा तर्कतीर्थांचा आवडीचा विषय आहे. जगातील सर्व तत्त्वज्ञाने त्यांनी जिज्ञासा म्हणून अभ्यासली असून, विविध लेख, भाषणे, मुलाखती व ग्रंथ यांमधून त्यांचा एक-दुसऱ्याशी असलेला संबंध, त्यातील साम्यस्थळे, विभेद इ.चे विवेचनही केले आहे. ते तत्त्वज्ञानास संकल्पनेची सुसंगत व तर्कशुद्ध मांडणी मानतात. तर्कतीर्थांच्या लेखी तत्त्वज्ञान ही ज्ञानव्यवस्था असून, तिचा संबंध व परिणाम मानवी व्यवहारावर होत असतो, असे त्यांचे निरीक्षण आहे. माणसाचे अनुभव म्हणजे तत्त्वज्ञानाची उदाहरणे होत. माणूस जे पाहतो, जाणतो, भोगतो, अपेक्षितो ते सर्व तत्त्वज्ञान सिद्धांतमूलक असते. त्यातून ज्यातून निर्माण होते ते एक 'विश्वस्थितीशास्त्र' (कॉस्मॉलॉजी) असते, अशी तर्कतीर्थांची मान्यता आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा उगम वैदिक धर्माच्या वातावरणात झाला असून, नंतरच्या काळात उपनिषदांमध्ये नमूद झाले आहे. भारतीय तत्त्वज्ञान आत्मा व आत्मजन्य अनुभवांचे फलित होय. भारतीय दर्शने दोन प्रकारची आहेत.- १) आस्तिक आणि २) नास्तिक. माध्वाचार्यांनी लिहिलेल्या 'सर्वदर्शनसंग्रह'मध्ये समग्र भारतीय तत्त्वज्ञाने वर्णिली आहेत. चार्वाक, बौद्ध, जैन, रामानुज, पूर्णप्रज्ञ, नकुलीश पाशुपत, शैव, प्रत्यभिज्ञा, रसेश्वर, वैशेषिक, नैयायिक, जैमिनी, पाणिनी, सांख्य, योग आणि शांकर ही ती होत. या सर्वांबद्दल तर्कतीर्थांनी मराठी विश्वकोशात जागोजागी संदर्भानुसार विवेचन केले आहे. चार्वाकाच्या भौतिक तत्त्वज्ञानाचा अपवाद वगळल्यास अन्य सर्व भारतीय तत्त्वज्ञाने मोक्ष संकल्पनेचे समर्थन करताना दिसून

येतात. 'ज्यू तत्त्वज्ञान' नोंदीचा संबंध मूलतः बायबल या धर्मग्रंथाशी आहे. ज्यू तत्त्वज्ञानाबाबत विद्वानांमध्ये मतभेद आहेत. ज्यू धर्मपीठ (सिनॅगॉग) जी १३ सूत्रे मांडते, ती या तत्त्वज्ञानाची आधारसूत्रे होत. काहींनी ती सहाच असल्याचे म्हटले आहे. ज्यू तत्त्वज्ञानाचा मूलाधार ग्रीक संस्कृती आहे, हे तर्कतीर्थांनी या नोंदीत नमूद केले आहे. याशिवाय 'तत्त्वज्ञान' ही मूळ नोंदही तर्कतीर्थांनी लिहिली आहे. तीपण भारतीय तत्त्वज्ञानाचा पाया म्हणून पाहता येते. या नोंदीतील शब्दांचे पारिभाषिक महत्त्व असाधारण आहे. उदा. सत्, असत्, षड्दर्शने, शून्य, सर्वज्ञ इ. त्यांचा संदर्भ विवेचित ग्रंथांच्या संदर्भात विशिष्ट मर्यादा नि अर्थाने घेणे अनिवार्य असते.

**इतिहास व राज्यशास्त्र**

'प्रज्ञावंताला क्षितिजही मर्यादा घालू शकत नसते'सारखे सुभाषित तर्कतीर्थांनाच शोभते. इतिहासशास्त्रातील 'आयुर्वेदाचा इतिहास, प्राचीन भारतीयांचे इतिहासाचे तत्त्व' या तर्कतीर्थलिखित नोंदी लक्षणीय आहेत, तर राज्यशास्त्रांतर्गत त्यांनी 'राजेशाही', 'एकसत्तावाद' व 'राज्यशास्त्र' या नोंदी लिहिल्या आहेत. प्राचीन साहित्याचा काळ ठरविणे हे इतिहासापुढचे खरे आव्हान असते. कारण, तो काळ नोंदलेला नसतो. बराच भर तर्क, तारतम्य व ग्रंथांतील तथ्य यांवर असतो. अशा प्रसंगी इतिहासकार काय करतात, काळ कसा ठरवितात हे समजून घेणे रोचक ठरते. त्याचेच उदाहरण म्हणून 'प्राचीन भारतीयांचे इतिहास तत्त्व' या नोंदीकडे पाहावे लागते. तर्कतीर्थांची ही नोंद इतिहासविषयक पण त्याला आलेलं ललितबंधाचं रूप मोहक खरं! क्लिष्ट विषय सुंदर करण्याचं तर्कतीर्थांचं कौशल्य वाखाणण्याजोगं आहे. ''मानवी इतिहास विश्वेतिहासाचा म्हणजे सर्व सृष्टीच्या इतिहासाचा एक भाग किंवा एक कल्प आहे. उत्पत्ती, स्थिती व लय ह्यांचे चक्र सारखे फिरत असते.''[४] सृष्टीचा इतिहास महायुग मानले तर त्यातील मानव विकास काळाचे चार कल्प मानण्यात आले आहेत. ते आहेत कृत युग, त्रेता युग, द्वापर युग आणि कली युग. याआधारे तर्कतीर्थ प्रस्तुत नोंदीत भारताचे प्राचीन साहित्य बसवितात. त्याआधारे भारतीय इतिहासाचा कालपट आपणापुढे मांडतात. 'आयुर्वेदाचा इतिहास'ही असाच प्राचीन. त्याचा प्रारंभ वेदकालात झाला. 'चरकसंहिता', 'सुश्रुतसंहिता', 'अष्टांग संग्रह' आणि 'अष्टांगहृदय' या चार ग्रंथांच्या आधारस्तंभावर भारतीय आयुर्वेद आधारलेला असल्याचे या नोंदीतून स्पष्ट होते. 'राज्यशास्त्र' ही

मराठी विश्वकोशातील प्रदीर्घ नोंदींपैकी एक होय. जगाच्या सर्व भूप्रदेशांवर कालौघात राज्ये निर्माण होऊन तिथे स्थानिक परिस्थितीनुसार राजेशाही, एकसत्तावाद, लोकशाही इ. राज्यपद्धती अस्तित्वात आल्या. त्यांचा इतिहास राज्यशास्त्राचा अभ्यास विषय. पाश्चिमात्य देश व पौर्वात्य देशांत वेगवेगळे राज्यशास्त्र आढळते. कारण, तिथल्या परंपरा, भूगोल, समाज भिन्न-भिन्न आहे. प्लेटोपासून आजपर्यंत अनेकांनी राज्यशास्त्रावर लिहिले आहे; पण कुणास अद्याप तिची गत (स्थिती) व गती (दिशा) ठरविता आली नाही. राज्यशास्त्रात गणितासारखे ठोकताळे नसतात. मदार असते स्थितीवर.

**तर्कतीर्थांच्या नोंदींची मीमांसा**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलेलं लेखन व कार्य यांबाबत मराठी साहित्यात अनेकांनी त्याची मीमांसा केली आहे. विशेषतः त्यांनी केलेल्या कोशकार्याबद्दल प्रा. रा. ग. जाधव आणि प्रा. श्रीनिवास दीक्षित यांनी लिहिले आहे. त्यांच्या साहित्याच्या विपुल समीक्षा आहेत आणि संशोधन उल्लेखही. शास्त्रीजींचं कोशकार्य ही त्यांची सांस्कृतिक धडपड होय. मराठीतील ज्ञानसंपदा शिस्तबद्ध हवी, शिवाय तिची मांडणी वस्तुनिष्ठ व्हायला हवी, असा त्यांचा कृतिशील आग्रह होता. मराठी विश्वकोशातील नोंदींचे संपादन कसे व्हायला हवे, याचे धडे त्यांनी घालून दिले होते. म्हणून मराठी विश्वकोश नोंदीत वस्तुनिष्ठता आढळते. ती शास्त्रीजींच्या नोंद लेखनशैली आग्रहाचा परिपाक होय. शब्दमर्यादा, रचना, संदर्भ उल्लेखाची पद्धत, चित्ररचना संबंधित उल्लेख यांमुळे नोंद परिपूर्ण होईल, याबाबत त्यांचा कटाक्ष असायचा. शुद्धलेखनाबाबत ते आग्रही होते. कारण, ज्ञानकोश नोंदींकडे समाज तो मजकूर प्रमाणभूत म्हणून पाहत, वाचत नि वापरत असतो. भाषा, पदक्रम, परिभाषा, शब्दांचे विशिष्ट प्रयोग, तुलना यांची त्यांनी मानांकने निश्चित केली होती. विश्वकोशाचा वाचक मुख्यतः शिक्षित, जिज्ञासू असतो हे खरे; पण सामान्य जिज्ञासूलाही या नोंदी उपयुक्त व्हाव्यात म्हणून ते नोंदीच्या सुलभ, सुबोध होण्याकडे लक्ष देत. तर्कतीर्थांच्या अनेक नोंदी तर ललितबंध वाटाव्यात अशा आहेत. परिभाषिकतेतही सौंदर्य, लालित्य, मोहकता, रोचकता, वाचनीयता जपता येते, याचा वस्तुपाठ म्हणून तर्कतीर्थांच्या नोंदींकडे पाहता येते. मराठी विश्वकोशाचे प्रयोजन मराठी भाषा सर्व ज्ञान-विज्ञानातील घटक, शब्द, परिभाषांनी समृद्ध करीत ती जगातील अन्य संपन्न ज्ञानभाषांच्या पंक्तीत बसवायचा त्यांचा आग्रह

'अमृताते पैजा जिंके' असाच होता. त्यांना अभिप्रेत 'महाराष्ट्र धर्म' जातिवाचक नसून वृत्तीवाचक होता, हे वेगळे सांगायची गरज नाही. आत्मनिरपेक्ष लेखन ही अशा नोंदीची पूर्वअट असते, ती तर्कतीर्थ जपताना दिसतात. स्वत:च्या नोंदी ते अन्यांकडून संपादित करून घेत. यातूनही आत्मनिरपेक्षता स्पष्ट व स्वयंसिद्ध होते. काटेकोरपणा, विवेक, तर्कशुद्ध, वादातीत विवेचन अशा कितीतरी वैशिष्ट्यांच्या नोंदी युक्त असल्या, तरी त्यांची वाचनीयता त्यांनी कधी हरवू दिली नाही. म्हणून त्यांच्या विविध नोंदींची मीमांसा वर्तमान चिकित्सा व भविष्य निर्देश म्हणून आवश्यक ठरते.

**नोंदीचा रचनाबंध**

विश्वकोशासाठी नोंदी लिहिण्याचे विश्वमान्य संकेत रूढ आहेत. त्यानुसार नोंदींच्या स्वरूपावरून शब्दमर्यादा निश्चित केलेली असते. छोट्या नोंदी ५००-७०० शब्दांपर्यंत तर व्याप्तीलेख (दीर्घ नोंदी) १२०० ते २००० शब्दांपर्यंत. तर्कतीर्थांनी लिहिलेल्या नोंदी छोट्या, मध्यम, दीर्घ अशा सर्व प्रकारच्या असून, त्यांनी शब्दमर्यादेचे रूढ संकेत पाळलेले आढळून येते. व्यक्ती नोंदीत जन्म, मृत्यू, काळ, कुटुंब, शिक्षण, वाचन, प्रभाव, कार्य, विचार, योगदान इत्यादींबद्दल माहितीपूर्ण लिहिणे अपेक्षित असते. त्याचे पालन प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक काळातील व्यक्तीनोंदीत केलेले आहे. काही नोंदी वैचारिक, शास्त्रीय असतात. त्यात परिभाषांचे महत्त्व असाधारण असते. तिथे तर्कतीर्थांनी त्या दिलेल्या दिसतात. व्यक्तिलेखात अलौकिकाला किती महत्त्व द्यायचे, चमत्कारांचे वर्णन किती मर्यादित करायचे, याचे तारतम्य बाळगायला लागते. तर्कतीर्थांनी ते राम, कृष्ण, तुकाराम, रामदास इ. नोंदीत कटाक्षाने जपलेले आहे. नोंदीत अनेकदा व्यापक आशयाचे वर्गीकरण, उपभेद करणे गरजेचे असते. एका गोष्टीची अनेक अंगे वा घटक असतात. विविध वाद, शास्त्रे, संकल्पना इ.विषयक नोंदीत या गोष्टींचे असाधारण महत्त्व असते. उदाहरणार्थ कर्मयोग नोंद घेऊ, तर कर्मयोग स्पष्ट करून गीतेत तो कसा सांगितला गेला आहे, हे स्पष्ट करण्यात आले आहे. 'क्रांती' नोंदीत क्रांती म्हणजे काय ते स्पष्ट करून क्रांतीची कारणे, परिणाम, जगभरच्या क्रांत्यांचे दाखले, तुलना इ.द्वारे ती नोंद सर्वग्राही व सर्वंकष होईल असे पाहिले गेले आहे. 'जातिसंस्था' नोंदीत जातीचा उगम, इतिहास, संस्कृतीसंबंध, अर्थ, उत्पत्ती इ. अंगांनी या व्यवस्थेचे मूळ, श्रमविभाजन, वर्णव्यवस्था, धर्मसंबंध, अस्पृश्यता, भेदाभेद, शोषण, अधिकार, सामाजिक न्याय, आरक्षण, मंडल आयोग

असा व्यापक फेर मराठी विश्वकोशात वाचावयाला मिळतो. भारतीय समाजातच जातव्यवस्था असल्याने भारतीय कोशात तिचे स्थान व महत्त्व लक्षात घेऊन लिहिले गेल्याने ही नोंद संदर्भमूल्याच्या अंगाने महत्त्वाची ठरते. अशी नोंद लिहिताना लेखकाचा दृष्टिकोण पूर्वग्रहमुक्त शिवाय व्यापक समावेशी (Comprehensive and Inclusive) असावा लागतो. त्याचे दर्शन या नोंदीत होते. नोंदीचा रचनाबंध तर्कतीर्थ पाळतात. त्याचे दर्शन या नोंदीत होते. कारण, या कोशाचा रचनाकल्पच (Blue Print) त्यांनी बनविलेला होता.

**वस्तुनिष्ठता**

वस्तुनिष्ठता म्हणजे एखाद्या बाबीकडे (वस्तू, व्यक्ती, विचार इ.) जाणीव, कल्पना, भावना यापलीकडे जाऊन तटस्थपणे विवेचन करणे. हे करत असताना सत्याचा अपलाप होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागत असते. ज्ञानाच्या क्षेत्रात अशी आत्मनिरपेक्षता सांभाळणे म्हणजे तितकी सोपी गोष्ट नसते. तर्कतीर्थांनी मात्र ती मराठी विश्वकोशातील नोंदी लिहिताना पुरेपूर पाळलेली लक्षात येते. ज्या नोंदी तर्कतीर्थांनी लिहिल्या, त्यांपैकी काही व्यक्ती, विचार, संस्था इ.मध्ये ते निकटकर्ती होते. उदाहरणच द्यायचे झाले तर महात्मा गांधी, इंडियन नॅशनल काँग्रेस, विनोबा भावे, सेनापती बापट यांसारख्या नोंदी सांगता येतील. महात्मा गांधींबरोबर त्यांनी अस्पृश्यता निवारण कार्यात विचारविनिमय केला आहे. महात्मा गांधींनी त्यांचा उल्लेख, 'who knew that a man of great learning and spotless character'[५] असा केला आहे आणि बरेच काही; पण तर्कतीर्थ या नोंदीत व्यक्तिसापेक्ष असे एकही विधान करीत नाहीत. नोंद गांधींचे एकांगी समर्थन करणारीही नाही. महात्मा गांधींच्या ब्रह्मचर्य सिद्धांतासंदर्भात तर्कतीर्थांचे विधान की 'गांधींचा याबद्दलचा (ब्रह्मचर्य) दृष्टिकोण मानवी जीवनविज्ञान दृष्ट्या नीट तपासला गेला नाही.' असे असहमतीचे मत व्यक्त करीत ते लेखकीय वस्तुनिष्ठता जपतात. 'इंडियन नॅशनल काँग्रेस'चे तर्कतीर्थ सक्रिय कार्यकर्ते होते. सार्वजनिक निवडणुकांमध्ये ते काँग्रेस उमेदवारांचा प्रचार करीत (यशवंतराव चव्हाण, किसनवीर इ.). नोंदीत १९५२च्या सार्वत्रिक निवडणुकीचा उल्लेख आहे. या निवडणुकीत ते सक्रिय होते; पण नोंदीत त्याचा लवलेश सापडत नाही. हे जरी खरे असले तरी सन २६ जून, १९७५च्या आणीबाणीचा अनुल्लेख खटकल्याशिवाय राहत नाही.

'Objectivity is one of the important quality dimention in different sources of knowledge : web2.0 portals, encyclopedias, wikipedia, and others.'[६] हे विसरता येणार नाही. अशा नोंदींमध्ये लेखकात एका व्यापक उदारतेची गरज असते. कारण, जिज्ञासू अशा नोंदींकडे वस्तुनिष्ठ इतिहास म्हणून पाहत असतो. अशा संदर्भात लेखकावर काळ जी जबाबदारी सोपवत असतो, ती पेलण्यासाठी उच्च कोटीची तटस्थता लागते.

**मौलिकता**

विश्वकोशातील नोंदी मौलिक वा मूलभूत माहिती देणाऱ्या असल्या पाहिजेत, हे सांगायची गरज नाही. कारण, जिज्ञासू मूलभूत माहिती मिळविण्याच्या गरजेतूनच विश्वकोशाचा आधार घेत असतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं लेखन नि वाचन बहुआयामी असल्याने मूलभूत विचार करण्याची उपजत वृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसते. मराठी विश्वकोशामध्ये संहिता लेखनाच्या विषयांवर नुसती नजर फिरविली तरी ते लक्षात येते. अशौच, उषा, कल्पसूत्रे, हेन्री थॉमस कोलबुक, गायत्री मंत्र, गोत्र, चिद्‌वाद, द्रव्य, न्यायदर्शन, बादरायण, पूर्वमीमांसा या नोंदी यासंदर्भात लक्षात घेण्यासारख्या आहेत. स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती, सर्जनशीलता, नवता, अपवाद, विचार ही कौशल्ये व गुण असल्याशिवाय कोणताही लेखक मौलिक लेखन करू शकत नाही. विश्वकोशीय लेखन म्हणजे वाङ्‌मयचौर्यास (Plagarism) फाटा हे गृहीतच असते. मौलिकतेसाठी धाडस, बुद्धिमत्ता, नवोक्रमशीलता असावी लागते. ती तर्कतीर्थांच्या लेखन, व्याख्यान, मुलाखती इत्यादींमधून लक्षात येते. 'ओम'सारखी छोटी नोंद असो वा 'केवलाद्वैतवाद'सारखी दीर्घ नोंद असो. दोन्हींमध्ये मौलिकतेची समान श्रेणी पाहायला मिळणे, हे तर्कतीर्थांच्या विद्वत्तेचे प्रमाण होय.' 'ओम' हा एकाक्षर मंत्र होय' यासारख्या छोट्या विधानात केवढा मोठा आशय व्यक्त होता. 'अ', 'उ' आणि 'म' या त्रिवर्णांनी हा शब्द बनला आहे. यातून ते शब्द व्युत्पत्ती समजावतात. यातील प्रत्येक वर्णाचा अभिप्रेत अर्थ स्पष्ट करतात. तो असतो त्यांचं या संकल्पनेचं आकलन. 'अ' म्हणजे विश्व, 'उ' म्हणजे तेज (उषा) आणि 'म' म्हणजे प्रज्ञा. ज्या मंत्राने विश्व तेजस्वी व प्रज्ञामय बनते, तो म्हणजे 'ओम'. यात तर्कतीर्थांचं स्वत:चं आकलन प्रतिबिंबित होतं. तीच असते त्यांची मौलिक प्रज्ञा नि प्रतिभा. पूर्वमीमांसा नोंद त्यांच्या प्रारंभिक अध्ययन, अध्यापनाचा पुरावा म्हणून पाहता येते. ऋग्वेदसारखी प्रदीर्घ नोंद विविध संदर्भांनी युक्त असल्याने

तिला शोधनिबंधाचे रूप नि महत्त्व प्राप्त झाले आहे. 'गोत्र' शब्द सर्वसामान्यांसाठी कुलाचे मूळ (उत्स, उगम) वाटते; पण नोंद सांगते की, या कल्पनेचा उगम प्राचीन भारतीय गणसंस्था (समाज)मधून झाला. अशा अनेक नव्या गोष्टींचा उलगडा तर्कतीर्थांच्या नोंदी वाचताना होतो. पारंपरिकतेस शह देऊन ते नित्य नवे संदर्भ देत राहतात. हीच त्यांच्या मौलिकतेची निजखूण असते. नोंदीखाली ग्रंथ, स्रोत इ. नमूद करत ते आपल्या नोंदीची प्रामाणिकता सप्रमाण सिद्ध करत राहतात.

**पारिभाषीकरण**

विश्वकोश किंवा ज्ञानकोश एखादा जिज्ञासू, अभ्यासक वा संशोधक केव्हा हाताळतो, तर जेव्हा एखादी संज्ञा, संकल्पना, व्याख्या, परिभाषा त्याला समजून घ्यायची असते तेव्हा. विश्वकोश एका अर्थाने परिभाषा संग्रहच असतो. यातील संहिता लिहिणारा वस्तुनिष्ठतेचा आधार म्हणून प्रथम परिभाषा, व्याख्या देतो आणि मग तिची उकल तो विस्तृत विवेचनातून करत राहतो. तर्कतीर्थांनी आपल्या अनेक नोंदींमध्ये परिभाषा उद्धृत केल्या आहेत. काही ठिकाणी तर स्वत:च्या आकलन निरीक्षणातून नव्याच परिभाषा निर्मिल्या आहेत. 'प्रमाणमीमांसा' नोंदीत 'ज्ञानाचे स्वरूप, ज्ञानाचे प्रकार, ज्ञानाची कारणे व साधने, ज्ञानाचे प्रामाण्य व अप्रामाण्य या विषयांची मीमांसा म्हणजे प्रमाणमीमांसा होय.'[७] म्हणत तिची ते पुढे मीमांसा करतात. 'सत्ताविषयक शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.'[८०] अशा परिभाषांनी हा नोंदीसंग्रह खंड तुम्हास भरलेला दिसेल. तर्कतीर्थांनी मराठी विश्वकोश निर्मितीतून लेखनाची विश्वकोशीय धाटणी (पद्धती) निर्माण केली, तीमध्ये या परिभाषाकरणाचा फार मोठा वाटा आहे. मराठी विश्वकोश निर्मितीच्या प्रारंभिक काळात कोशाचे खंड प्रकाशित करण्यापूर्वी 'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ' (१९६५) नंतर प्रथम मराठी विश्वकोशाचा १८ वा खंड सन १९७३ मध्ये प्रकाशित केला. तो मराठी, इंग्रजी असा द्वैभाषिक परिभाषा खंड होता. मूळ खंडांआधी हा 'परिभाषा खंड' प्रकाशित करून मराठी विश्वकोश प्रकल्पात परिभाषांचे असलेले असाधारण महत्त्वच एका परीने अधोरेखित केले होते. यात त्यांनी विशिष्ट शब्दांचे विशिष्ट अर्थ नोंदवून 'शब्द हे शस्त्र खरे; पण शास्त्रात त्यांचा वापर जपून व जबाबदारीने करायचा असतो,' हे बजावले आहे. हा खंड नोंदी लेखकांचा तर मार्गदर्शक होताच; पण सामान्य जिज्ञासूंना हा कोश म्हणजे शंकांची खाण भरून काढण्याचा उपाय व साधन ठरला. या खंडाची प्रस्तावना म्हणजे 'शब्द'

या भाषिक एककासंबंधी केलेले प्रदीर्घ चिंतन होय. ते सर्व जिज्ञासूंनी एकदा मुळातूनच वाचले पाहिजे. या परिभाषासंग्रह खंडांनी मराठीस ज्ञानभाषा बनविण्याचे महत्कार्य केले आहे. मराठी विश्वकोशांच्या सर्व खंडांत संपादकांनी या परिभाषांचा वापर होईल, याची दक्षता घेतलेली दिसते. या कोशामुळे मराठीतील एका संकल्पनेच्या विविध परिभाषा नि पारिभाषिक शब्दांचा संग्रह शक्य झाला आहे.

**ससंदर्भ विवेचन**

मराठी विश्वकोशातील नोंदींचा आढावा घेताना असे लक्षात येते की, अधिकांश नोंदी या विस्तृत विवेचन करून लिहिण्यात आल्या आहेत. मराठी विश्वकोश निर्मितीचा काळ (१९६०-२०१५) मराठी समाजासाठी जिज्ञासा कालखंड होता. तंत्रज्ञान विकासपूर्व काळात ग्रंथ हेच महत्त्वाचे ज्ञानसाधन होते. तर्कतीर्थांच्या अधिकांश नोंदी या विवेचनाच्या अंगाने पाहता विस्तृत राहिल्या आहेत. 'प्रबोधनकाल' नोंद यासंदर्भात व्यवच्छेदक आहे. प्रबोधनकाल शीर्षकातच काळ असल्यामुळे तर्कतीर्थ तो (पंधरावे, सोळावे शतक) नोंदविण्यास विसरत नाहीत. या काळाने केलेले बदल ते नोंदवितात. काळाचे जगावर झालेले परिणाम, प्रभाव सांगण्यास विसरत नाहीत. प्रबोधनकाळ म्हणजे केवळ बौद्धिक मन्वंतर नव्हे, तर कला, साहित्य, पर्यटन, विज्ञान, तत्त्वज्ञान, शिक्षण, वैद्यक आदी क्षेत्रांत घडवून आणलेले परिवर्तन आहे, असे नोंदवत प्रबोधनाची व्यापक कक्षा समजावतात. प्रबोधक म्हणून प्लेटो, ॲरिस्टॉटल, पित्रार्क, व्हाल्ला, विंची सर्वांचे नुसते उल्लेख नाहीत, तर तुलना व विवेचनाही आहे. विभिन्न संस्कृती, देशादिंवर झालेले परिणाम या नोंदीत वाचावयास मिळतात. सिसरो, सेनीका, व्हर्जिल, गॅलिलिओ, कोलंबस, टॉलेमी, टॉमस ॲक्वायन, मॅकिओव्हेली यांच्या उदाहरण, माहिती, योगदान इत्यादींनी ही नोंद स्वयंपूर्ण व संपूर्ण आहे. हे असते तर्कतीर्थांच्या विवेचक लेखनाचे बलस्थान, शिवाय शेवटी संदर्भग्रंथ म्हणून ज्या १० संदर्भांची सूची आपण वाचतो, त्यामुळे जिज्ञासूला नव्या वाचन, संदर्भाचे क्षितिज आपसूकच दिसू लागते. ही किमया तर्कतीर्थ लेखनशैलीची. एखाद्या घटकाचा ऐतिहासिक धांडोळा घ्यावा तर्कतीर्थांनीच. इटली, फ्रान्स, स्पेन, नेदरलँडस् (हॉलंड), इंग्लंड, जर्मनी साऱ्या देशांच्या संदर्भांनी ही विवेचक नोंद सर्वविषयसंग्राहक बनली आहे. अशा विवेचक नोंदी या मराठी विश्वकोशात विपुल आहेत. जातिसंस्था, महात्मा गांधी,

महाभारत, केवलाद्वैतवाद इ. सहज आठवलेल्या अशा नोंदी होत. नोंद घटकाची अंगे-उपांगे, परिभाषा, तुलना, उदाहरणे, इतिहास, योगदान, काळ, चरित्रे, वादविचार इ.नी प्रत्येक नोंद विवेचक कशी होईल, हे तर्कतीर्थ पाहताना दिसतात. आपल्या विवेचनास आधार, पुरावे, प्रमाण देण्याने, परिभाषा करण्याने या नोंदी वस्तुनिष्ठ, मौलिक झाल्या आहेत. दुसरीकडे रसाळ शब्दकळेने त्यात जे लालित्य येते, त्यामुळे २०-२५ पृष्ठांची नोंद असली तरी वाचक ती शेवटपर्यंत संयमाने, एकाग्रतेने वाचत राहतो. कारण, तर्कतीर्थांच्या विवेचनात कुतूहल निर्माण करण्याचे विलक्षण कौशल्य असल्यानेच ते शक्य होते.

**भाषाशैली**

दैनंदिन व्यवहारात आपण जी भाषा वापरतो, ती व्यक्तिनिष्ठ व व्यक्तिसापेक्ष असते. उलटपक्षी विश्वकोशांच्या नोंदींची भाषा वस्तुनिष्ठ असणे गरजेचे असते. इथे सारे पुरावे, निर्णय, उदाहरण, तुलना, इतिहास, तत्त्व, परिभाषा इत्यादींचा मेळ घालत लिहिणे आवश्यक असते. आत्मनिष्ठतेस तिलांजली दिल्याशिवाय नोंदीतील विवेचक आशय वस्तुनिष्ठ होत नसतो. विश्वकोशातील नोंदीत स्पष्टता, निश्चितता महत्त्वाची. या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थलिखित मराठी नोंदींची भाषा परिनिष्ठित, पारिभाषिक व संस्कृतनिष्ठ दिसते. तर्कतीर्थांची मातृभाषा जरी मराठी असली, तरी अभ्यास भाषा म्हणून उभारीच्या नि उमेदीच्या काळात संस्कृतच राहत आली आहे. वाचन, व्याख्यान, विवेचन यांचा नित्य आधार संस्कृत श्रुती व स्मृती राहिली आहे. त्यामुळे नोंदीत व्युत्पत्त्यर्थ, मूर्धाभिशिक्त, अहंप्रत्यय, अस्तेय, सुश्रुत, ब्रह्मयज्ञ, धनसंग्रहचतुर, व्रात्य, नाशार्थ, ऋषिकुल असे केवळ संस्कृतप्रचुर नव्हे, तर शुद्ध संस्कृत शब्द मोठ्या प्रमाणात येतात. एखाद्या संशोधकास 'तर्कतीर्थ साहित्यात संस्कृत' अशा विषयावर प्रबंध सादर करता येईल किंवा शब्दकोश तयार करता येईल. तर्कतीर्थांच्या भाषेवरच नाही, तर वाक्यरचनेवरही संस्कृत प्रभाव असल्याची टीका प्रा. श्रीनिवास दीक्षित यांनी सोदाहरण केली आहे.[९] नोंदीतील वाक्ये बहुधा लांब पल्ल्याची आढळतात. भाषा विवेचात्मक, विश्लेषणप्रचुर, ग्रांथिक अशी आहे. लेखनशैलीत बहुविधता आहे. ती कधी परिनिष्ठित तर कधी ललित बनते; पण सहसा नोंदींची शैली विवेचक राहिली आहे. ललितबंधापेक्षा ही शैली प्रबंध लेखनास जवळ असलेली, विश्लेषणाकडून निर्णयाकडे नेणारी म्हणून निर्णायक शैली ठरते. काही ठिकाणी वर्णनशैली, तर काही ठिकाणी

तुलनात्मक शैलीचा वापर दिसतो. द्वैतवाद, द्वैताद्वैतवाद, शुद्धाद्वैतवाद, केवलाद्वैतवाद इ. नोंदी वाचताना हे प्रत्ययाला येते. वाक्ये छोटी, मध्यम, दीर्घ पल्ल्याची आहेत. काही तर दमछाक करणारी परिच्छेदसदृश; पण तरी या नोंदी वाचनीय ठरतात, ते केवळ त्यात असलेल्या संदर्भमूल्यांमुळे.

विश्वकोश वा ज्ञानकोशांतील नोंदींची भाषा व शैली कशी असायला पाहिजे, याबाबत फिल डेव्हिस यांनी मत व्यक्त करताना म्हटले आहे की, Entries should be written in a formal, authoritative, register. Editorialization and personal opinion should be avoided. Entries should be precise and specific, the use of jargon minimized and technical concepts express in plain or previous defined language. Entries on technical topics themselves should include definafions of the technical term used.[१०]

या निकषांवर तर्कतीर्थलिखित मराठी विश्वकोशातील नोंदींची मीमांसा करताना लक्षात येते की, त्यांच्या विवेचक भाषेत एकप्रकारचा ठोसपणा दिसून येतो. तो त्यांच्या ज्ञानसाधनेतून आलेला आहे. अनुभवसिद्ध अध्ययनातून आलेली ती अधिकारसिद्धता विवेचनातील विधानांमधून स्पष्ट होते. पारिभाषिक वाक्ये वा व्याख्या त्याचे उदाहरण म्हणून सांगता येतील. 'एकच निर्गुण ब्रह्म हेच सत्य आहे.'[११] अशी वाक्ये त्यांच्या अधिकारसिद्धतेतून आपोआपच येतात. ती मोहरबंद असतात, शिवाय वादातीत विधाने म्हणून त्याकडे पाहता येते. तर्कतीर्थांच्या विवेचनात अधिकार असतो; पण अभिनिवेश नसतो हे विशेष. 'प्रवृत्तीविज्ञान म्हणजे दृश्यविश्वाचे ज्ञान होय.'[१२] अशी पारिभाषिक वाक्ये तर सर्व नोंदींमध्ये जागोजागी भेटतात. दृश्य, द्रष्टा व दर्शन किंवा ज्ञेय, ज्ञाता व ज्ञान ही त्रिपुटी म्हणजे वेगळी अस्तित्वे नसून ही तिन्ही मिळून एकच ज्ञान होय आणि हे प्रत्येक ज्ञान कोणत्या तरी विषयाचे असते व तो विषय उदा. घटपटादी विषय - ज्ञानाहून वेगळा नसतो.[१३] अशी सर्वसामान्यांना तर सोडाच अभ्यासक, संशोधकांच्या डोक्यावरून जातात. कारण, या सारगर्भित वाक्यात इतक्या संकल्पना ठासून भरलेल्या आहेत की, पहिल्यांदा त्या समजणे अवघड. समजल्या तर त्यांचा अन्वय लावणे म्हणजे शिवधनुष्य उचलणे असते. हे तर्कतीर्थच करू जाणे. हे त्यांच्या अचाट बुद्धिमत्तेचे प्रतीक खरे; पण सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरचे निश्चित. विश्वकोश रंजनासाठी वाचायचा नसल्याने वाचकाला अशा नोंदी एकाग्रचित्तानेच वाचणे भाग असते.

**मराठी विश्वकोशाची उपयुक्तता**

एक विषयसंग्राहक, विविध विषयकेंद्री, सर्वविषयसंग्राहक असे कोशांचे अनेक प्रकार दिसून येतात. मराठी विश्वकोशासारखे सर्वविषयसंग्राहक कोश असतात. त्यात संहिता अथवा नोंदी लेखन, क्रम, स्वरूप, मांडणी अशा अंगाने रचनेचे मान्य संकेत आहेत. त्यानुसार नोंदी संग्रहाच्या रूपात जे खंड तयार होतात, त्या खंडांमध्ये संदर्भग्रंथ सूची, अनुक्रम, नकाशे, चित्रे, आकृत्या, सांख्यिकी माहिती, तक्ते, कोष्टके, सूत्रे इत्यादी देऊन मूळ संहिता जिज्ञासूंना अधिक उपयुक्त होईल, असे पाहिले जाते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संपादन करताना या सर्व घटकांकडे लक्ष पुरविल्याने हा कोश वाचकानुवर्ती झाला आहे. संहिता खंड प्रकाशित करण्यापूर्वीच त्यांनी 'मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ' (१९६५) आणि 'परिभाषासंग्रह' (१९७३) पूरक व पुरवणी खंड प्रकाशित केल्याने ते दोन्ही ग्रंथ नोंदीलेखकांना मार्गदर्शक ठरल्याने प्रकाशित २० संहिता खंड प्रमाणभूत (Standerd) होण्यास मोठे साहाय्य झाले आहे. मराठी विश्वकोशातील नोंदीत पूरक निर्देश बाणांकन, तिरप्या अक्षरात दिले गेल्याने वाच्य नोंदीस पूरक व समृद्ध करणारी अन्य सामग्री वा संदर्भ अन्य खंडांतून मिळवून वाचन, संदर्भ, संशोधन सर्वांगी समृद्ध करणे शक्य झाले आहे.

मराठी विश्वकोशाचा २० खंडांचा मूळ प्रकल्प पूर्ण झाल्यावर (२०१५) २१वा खंड हा 'सूचिखंड' (२०१९) म्हणून प्रकाशित करण्यात आला. हा खंड म्हणजे पूर्वप्रकाशित २० खंडांतील नोंदींची सूची होय, त्यामुळे संपूर्ण २० खंडांमध्ये कोणकोणत्या नोंदी आल्या आहेत, ते पाहणे. त्याआधारे इप्सित वा इच्छित नोंद त्वरित शोधण्याची सुविधा हाती आली आहे. 'सूचिसंग्रह' असो वा 'परिभाषासंग्रह' असो तो एकापरीने शब्दकोशच असतो. मराठी विश्वकोशाने मराठी ज्ञानवारशात जशी नि तितकी मोलाची भर घातली, तितकीच ती या दोन संग्रह खंडांनीसुद्धा घातली आहे. अशा खंडांमुळे जिज्ञासा निर्मिती व पूर्ती अशी दोन्ही कार्ये एकाच वेळी पूर्ण होणे शक्य होत असते. जिज्ञासाजागृतीचे महत्त्वाचे कार्य सूचीच्या स्वतंत्रपणे केलेल्या परिशीलनातून घडू शकते. अंधुक जिज्ञासेला डोळस करण्याचे व तिला हवे ते दाखविण्याचे काम सूची करू शकते.[१४] हे प्रा. रा. ग. जाधव यांचे मत यासंदर्भात लक्षात आल्यावाचून राहत नाही.

सूचीसंग्रहामुळे द्विरुक्ती टाळणे, विसंगती दूर करणे, संदिग्धता नष्ट करणे, तपशीलातील चुका दुरुस्त करणे इ. शक्य होते, यामुळेच मराठी

विश्वकोश अधिक निर्दोष होऊ शकला. कारण, कोश निर्मितीपूर्व खबरदारी व निर्मिती काळात संपादकांनी घेतलेली काळजी यामुळे उभयपक्षी निर्दोषीकरण शक्य झालेले दिसते. कोशनिर्मितीच्या काळात समांतरपणे सूची संवर्धित व संशोधित (दुरुस्त, अद्ययावत) करत राहणे अशा बृहत् प्रकल्पात अत्यंतिक महत्त्वाचे असले, तरी जिकिरीचे काम असते. तर्कतीर्थ व नंतरच्या सर्व संपादकांनी ही खबरदारी घेतलेली आहे.

अशा बृहत् प्रकल्पात संदर्भग्रंथ सूची (Bibliography)चे असाधारण महत्त्व असते. नव्या संदर्भात तेच महत्त्व विकिपीडिया व तत्सम ज्ञानकेंद्री लेखन प्रकल्पात दुवे आणि संकेतस्थळ सूचीस (Wibliography) आले आहे. सन २०१२च्या दरम्यान मी 'हिंदी वेब साहित्य'[१५] प्रकल्प हातावेगळा केला. तो सारा प्रकल्प महाजालावर प्रकाशित साहित्याचा अभ्यास होता. सारी संदर्भसूची अग्रांथिक होती. ज्या दुवे व संकेतस्थळे (Links and Websites) यांच्या आधारे हे काम करण्यात आले होते, त्यांची संदर्भसूची 'विब्लिओग्राफी' होती. मराठी विश्वकोशाची ई-आवृत्ती प्रकाशित आहे. आता सुधारित, संवर्धित आवृत्तीच्या संपादनाचे कार्य विविध ज्ञानमंडळांद्वारे सुरू आहे. त्यांचे संदर्भ अद्ययावत व्हायचे, तर या नव्या ज्ञानसाधन व माध्यमांचा अद्ययावत वापर कालोचित ठरेल. जुन्या कोशरचनेत संदर्भ ग्रंथशीर्षक, लेखक नाम, प्रकाशक, स्थळ, काळ, पृष्ठ इ. देण्याचा प्रघात आहे. नव्या संदर्भात लेखशीर्ष, दुवे, संकेतस्थळ, वर्षे इ. दिले जाते, शिवाय संहितेत दुवे अंतर्भूत असतात. ते बाणांकन, तिरक्या नोंदींचे आधुनिक पर्याय होत. मराठी विश्वकोशाच्या ई-आवृत्तीत यांचा वापर मर्यादित स्वरूपात झालेला आहे. संदर्भग्रंथ वा संदर्भसूत्र सूची ही संहिता विषयसूचीइतकीच ज्ञान व जिज्ञासावर्धक असते. कोशवाचन अधिक आनंददायी व सर्जनात्मक होण्यासाठी हे पूरक संग्रह वा संदर्भ, मूळ संहिता खंडांइतकेच उपकारक असतात. त्यासाठी मात्र वाचकांत संयम, निग्रह असणे गरजेचे असते. हे मराठी विश्वकोश प्रकल्पाचा एकूण विस्तार व आवाका लक्षात घेताना जाणवते.

मराठी विश्वकोश खंडांमध्ये प्रत्येक नोंदीच्या शेवटी संदर्भग्रंथ सूची देण्यात आली आहे. शिवाय प्रत्येक संहिता खंडांच्या शेवटी चित्रपत्रे असून, त्यात चित्रे, नकाशे जोडण्यात आले आहेत. शिवाय नोंदीमध्ये आवश्यक तिथे चित्रे, रेखाचित्र, आकृती, तक्ते, कोष्टके, सूत्रे, संज्ञा इ. ने

नोंद परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. अशा चित्रबोध व पूरक संदर्भांमुळे हा विश्वकोशही परिपूर्ण बनला आहे. भूमिती, गणित, भूगोल, अवकाश विज्ञान इत्यादीतील तांत्रिक संकल्पनांच्या स्पष्टीकरण व आकलनासाठी ही पूरक सामग्री.

सर्व ज्ञान-विज्ञानात काळजीपूर्वक करावयाची जर कोणती गोष्ट असेल, तर ती असते परिभाषा. विश्वकोशातील नोंदीत आपणास जागोजागी परिभाषा मिळतात; पण त्या तयार करणे अवघड काम असते. प्रत्येक ज्ञान-विज्ञानाची स्वत:ची अशी भाषिक धाटणी असते, त्यामुळे प्रत्येक ज्ञान क्षेत्रातील परिभाषा विशिष्ट असते. यावर प्रकाश टाकताना प्रा. रा. ग. जाधव यांनी समुचित शब्दात परिभाषा सामर्थ्य आणि मर्यादांचे, ते तयार करण्याच्या प्रक्रियेचे यथार्थ विवेचन केले आहे. ते म्हणतात की, प्रत्येक ज्ञानशाखेची विवेचनाची भाषिक धाटणी वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण असते. देशाच्या अर्थसंकल्पाचे विवरण भूविज्ञानाच्या भाषिक मोडणीत करता येत नाही आणि कायद्यातील विषय साहित्य समीक्षेच्या भाषाशैलीत मांडता येत नाही.[१६] हे आव्हान स्वीकारून परिभाषाकरणाची गरज मराठी विश्वकोशात पूर्ण करण्यात आली आहे.

मराठी विश्वकोशातील नोंदीसदृश विषय अन्य ज्ञानकोशांनी हाताळलेले आहेत; पण मराठी विश्वकोशातील वस्तुनिष्ठता अन्य कोशांमध्ये अभावाने दिसून येते. प्रत्येक कोशरचनेचे विशिष्ट उद्देश असतात. त्यातून वेगळेपण येत असते.

सध्या मराठी विश्वकोश प्रकल्प मूळ कल्पनेनुसार पूर्ण झाला असून, त्याच्या सुधारित आवृत्तीचे कार्य महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने विविध ज्ञानमंडळांमार्फत हाती घेतले आहे. तर्कतीर्थांनी प्रथम खंडाच्या प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे विश्वकोश निर्मिती हा स्थायी प्रकल्प आहे, त्यामुळे दुरुस्ती, भर या निरंतर प्रक्रिया होत. तीनेक वर्षांपूर्वीची माहिती पुढे तीनेक वर्षे उपयोगी ठरते. त्यामुळे विश्वकोशांची नित्यनूतन निर्मिती ही मराठी ज्ञानसमाज अद्यतन राहण्यासाठी आवश्यकच नाही, तर अनिवार्य राहणार आहे, याची खूणगाठ शासन व समाजाने आपल्या मनात सदैव ठेवायला पाहिजे.

मराठी विश्वकोश अनेक नोंदी लेखक, संपादक, अन्य तंत्रज्ञ, कार्यालयीन संपादकीय विभाग, शासन, समाज इ. मुळे संपन्न, संपूर्ण समृद्ध झाला

आहे. वेळोवेळच्या अध्यक्ष, सचिव इ.नी मोलाची कामगिरी मराठी विश्वकोश निर्मितीत बजावली आहे. त्या सर्वांबद्दल कृतज्ञ स्मरण करणे व आभार मानणे, मी माझे कर्तव्य समजतो.

### *संदर्भ सूची*


१. *तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्ती, कार्य आणि विचार, संपादक : वसंत पळशीकर, मे. पुं. रेगे : पृ. ८८*

२. *तत्रैव पृ. ८९*

३. *तत्रैव पृ.८९*

४. *प्राचीन भारतीयांचे इतिहास तत्त्व, (मराठी विश्वकोश नोंदसंग्रह नोंद क्र. २९) पृष्ठ ५६*

५. *The collective works of Mahatma Gandhi-Vol-61-page 167*

६. *Objetivity philosophyen.m.wikipedia.org*

७. *प्रमाणमीमांसा (मराठी विश्वकोश नोंदसंग्रह नोंद क्र. ९७) पृष्ठ ५३२*

८. *राज्यशास्त्र नोंद क्र. १३२ पृष्ठ (मराठी विश्वकोश नोंदसंग्रह क्र. १३२) पृष्ठ - ७२०*

९. *तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्ती, कार्य, आणि विचार. संपादक : वसंत पळशीकर, मे. पुं. रेगे : पृष्ठ १४५.*

१०. *Writing an Encyclopaedia Entry - http:// writing together -banger.workpress.com /2016/03/10.*

११. *केवलाद्वैतवाद : (मराठी विश्वकोश नोंदसंग्रह नोंद क्र. ५५) पृष्ठ १२३.*

१२. *चिद्‌वाद, (मराठी विश्वकोश नोंदसंग्रह नोंद क्र. ५५) पृ. १२३.*

१३. *चिद्‌वाद, (मराठी विश्वकोश नोंदसंग्रह नोंद क्र. ५५) पृ. १२३.*

१४. *आधुनिक मराठी ज्ञानसंकलक कोशरचना : स्वरूप व उपयुक्तता: नवभारत, फेब्रुवारी १९९८. पृ. २१.*

१५. *हिंदी वेब साहित्य, www.drsunilkumarlawate.in.*

१६. *आधुनिक मराठी ज्ञानसंकलक कोशरचना : स्वरूप व आवश्यकता नवभारत, फेब्रुवारी १९९८. पृ. २४.*


■

*(अप्रकाशित)*

# भाग - ४

# तर्कतीर्थ : वैचारिक प्रवाह आणि फलश्रुती

१६

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : पुरोगामी प्रबोधक व वैचारिक प्रवासाची फलश्रुती

**- श्री. किशोर बेडकीहाळ**

थोर विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी महाराष्ट्राच्या विसाव्या शतकातील पहिल्या पूर्वाधापासून ते विसाव्या शतकाच्या अस्तापर्यंत आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये प्रचंड योगदान दिलं. इथल्या विचारवंतांना अभ्यासक्रीय दिशा दिली आणि कामाचा डोंगर विश्वकोशाच्या आधारे उभा केला. २०१९ साली त्यांना जाऊन २५ वर्षे झाली. १९९४ ला ते गेले. या २५ वर्षांच्या काळात त्यांच्या काही लेखांच्या पुनर्प्रकाशनाशिवाय त्यांच्याविषयी काही घडलं नाही. ते गेल्यानंतर प्रसिद्ध झालेले काही लेख सोडले तर या २५ वर्षांत त्या अर्थानं तर्कतीर्थांच्या वाङ्मयाची चिकित्सा म्हणा किंवा त्यांच्या ग्रंथांची चर्चा म्हणा असं काहीच बौद्धिक विश्वामध्ये घडलं नाही. याचा एक अर्थ असा की, आपण आपल्याला घडवलेल्या माणसांना किती पटकन विसरतो किंवा तसं नसेल समजा तर मग आपली बौद्धिक आस्था कमी झाली आहे असं तरी म्हणावं लागेल. वास्तव हे असं आहे हे खरं आहे. मध्यंतरी वाईला किसन वीर महाविद्यालय व प्रागतिक इतिहास संस्थेचया वतीने एक चर्चासत्र झाले, त्या चर्चासत्रात तर्कतीर्थांच्या लेखनाची एक सर्वांगीण चिकित्सा करण्याचा विविध अंगांनी प्रयत्न झाला. विविध अंगांनी प्रयत्न झाला असं म्हणायचं कारण की ज्या प्रकारचे वैचारिक दृष्टिकोण ८०-९० यापूर्वी वैचारिक चर्चेमध्ये नव्हते असे अभ्यासातील नवे प्रवाह घेऊन तर्कतीर्थांच्या लेखनाची

चिकित्सा करण्याचा प्रयत्न झाला. उदाहरणार्थ, त्यांच्या काही पुस्तकाचं स्त्रीवादाच्या आधारे कसं वाचन करता येतं. त्यांच्या सगळ्या भूमिकांचं आपल्याकडे आता प्रसिद्ध असणाऱ्या ज्या इतिहास मीमांसा आहेत त्या अब्राह्मणी इतिहास मीमांसेतून शास्त्रीजींच्या लेखनाकडे पाहिलं तर काय दिसतं? असे जे नव नवे ज्ञान शाखांचे प्रवाह आहेत त्यांच्यामधून त्यांच्या चिकित्सेचा एक चांगला प्रयत्न वाईमध्ये झाला (जानेवारी २०२०). तो सोडला तर मला वाटतं की मराठी विश्वामध्ये तर्कतीर्थांच्या मृत्यूनंतरही त्यांची चिकित्सा फारशी झाली नाही, ही वस्तुस्थिती शिल्लक उरतेच.

शास्त्रीजींचा वैचारिक वकुब खूप प्रचंड होता. जवळजवळ एक शतक शास्त्रीजींनी पाहिलं. अलीकडे अभ्यासक असं म्हणतात की एकोणिसावे शतक हे फार प्रदीर्घ शतक होतं. म्हणजे १८०१ ते १९१७ असं १९ वे शतक सामान्यतः अभ्यासकांमध्ये धरलं जातं. विशेषतः पुरोगामी अभ्यासकांमध्ये विसावे शतक फार छोटे शतक आहे. त्यामानाने १९१७ ते १९९० आणि एकविसावे शतक हे भारतासाठी १९१७ नंतर सुरू होतं. ते २०१९ ला संपेल. ही विभागणी त्या कारणाने केलेली आहे शतकांची. याच्यामध्ये गृहीत हे आहे की एकोणिसाव्या शतकामध्ये समाजवादाचा, राष्ट्रवादाचा, व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार, लोकशाहीचा विचार जोरकसपणे चर्चेमध्ये आला. त्याच्या आधारे काही राष्ट्राची जडण-घडण झाली. भारत हे राष्ट्र उभे राहिले. विसाव्या शतकात सोव्हिएत रशियात १९१७ साली झालेल्या क्रांतीमुळे साधारणतः तिसऱ्या जगातल्या देशांना एक मोठा दिलासा विश्वात मिळाला की अशा तऱ्हेची न्यायावर आधारलेली समाजरचना क्रांतीच्या मार्गाने निर्माण होऊ शकते. म्हणून जगभराच्या श्रमिकांचे एक आशास्थान म्हणून सोव्हिएत रशियाकडे आपल्याला बोट दाखवलं गेलं. १९९१ साली सोव्हिएत रशियाचे विघटन झालं. क्रांती फसली, असं म्हणण्यापेक्षा क्रांती संपली. आणि रशियात असणारी जेवढी संघराज्ये होती ती सगळी स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयाला आली. तिथे हे शतक संपतं. म्हणजे अभ्यासकांच्या दृष्टीने विसावे शतक १९१७ ते १९९० असं जर धरलं, तर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी बरोबर या काळामध्ये एक शतक जगले असे आपल्याला म्हणावे लागेल. त्यांचा जन्म १९०१ चा. १९१४ साली ते वाईच्या प्राज्ञपाठशाळेत दाखल झाले ते विद्यार्थी म्हणून. तो सगळा जाणिवा येण्याचा, घट्ट होण्याचा काळ. १९१७ पासून जर मानला तर १९१७ च्या सोव्हिएत क्रांतीपासून ते सोव्हिएत क्रांतीचा पाडाव होईपर्यंत

१९९० पर्यंत तर्कतीर्थांच्या जाणिवेतून समाज पाहण्याचं शतक ज्याला म्हणता येईल असं शतक आहे. त्यांनी सोव्हिएत क्रांती वार्तांकनातून पाहिली असणार. दोन महायुद्धे झाली, स्वातंत्र्यविषयक अनेक परिषदा झाल्या, काही परिषदांमध्ये तेही उपस्थित होते. स्वातंत्र्य मिळालं. स्वातंत्र्यासाठी चाललेल्या इतर चळवळी पाहायला मिळाल्या. फॅसिझमचा उदय व अस्त पाहायला मिळाला. त्यानंतरचं शीत युद्ध पाहायला मिळालं. सोव्हिएत रशियाचे विघटनही त्यांना पाहायला मिळालं. एवढे सगळे भरगच्च शतक पाहत असताना तर्कतीर्थांच्या एकूण विचारविश्वात अनेक प्रकारच्या घडामोडींचा आपल्याला एक मोठा पट दिसतो. परंपरेकडून आधुनिक होण्याच्या प्रक्रियेकडे जाणाऱ्या कालखंडाचे ते साक्षीदारही होते व प्रतिनिधी होते. या कालखंडात त्यांच्या विचारांची दिशा पुरोगामी राहिली. अभ्यासक, कृतिशील राजकीय कार्यकर्ते, विचारवंत व तत्त्वचिंतक ही सारी त्यांची रूपे होती. साहित्य-संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती मंडळ या संस्थांचे दीर्घकाळ नेतृत्व करून त्यांनी मराठी विचार विश्वाचे नेतृत्व केले.

एक थोर तत्त्वचिंतक, एक धर्मशास्त्राचा अभ्यासक पंडित या अंगाने आपल्याला त्यांची माहिती आहे. आणि ती खोटी आहे अशातला भाग नाही. पण त्याच्या पलीकडे तर्कतीर्थांची विविध रूपं या कालखंडात दिसतात. एका बाजूला धर्मशास्त्राचा अभ्यासक, दुसऱ्या बाजूला समाजसुधारणांचा प्रयत्न करणारा समाजसुधारक, तिसऱ्या बाजूला महान विचारांनी भरलेला एक कार्यकर्ता असेही एक रूप आहे, चौथ्या बाजूला रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाचा क्रियाशील कार्यकर्ता आणि मार्क्सवादाच्या पलीकडे जाण्याची भूमिका घेतलेला विचारवंत असंही एक रूप पाहायला मिळतं. नंतरच्या काळात काँग्रेस पक्षाशी संबंधित राहून काँग्रेस पक्षाला मार्गदर्शन करत आपली ज्ञानसाधना आणि लेखन चालू ठेवणारा असेही एक रूप आहे. आपण आता विचार करणार आहोत तर पुरोगामी प्रबोधक या भूमिकेचा.

प्रबोधकांची भूमिका काय असते तर त्याला प्रचलित समाज व्यवस्थेमधील या ज्या ज्या त्रुटी जाणवत आहेत आणि ज्या मूल्यांचा आधार घेऊन समाजरचना उभी राहिली पाहिजे असं त्याला वाटतं त्या मूल्यांचा सतत प्रचार करत राहणे, ती मूल्य लोकांसमोर मांडत राहणे, त्यांची तर्कशुद्ध मांडणी करणे आणि लोकांना पटवत राहणे. मग त्यासाठी

व्याख्याने असतील, लेखन असेल, मासिक काढणं असेल; जि जी वैचारिक साधन ज्याला आपण म्हणू जी उपलब्ध आहेत त्याचा काहीतरी वापर करावा अशी अपेक्षा असते. तर्कतीर्थांनी ती साधनं व्यवस्थित हाताळलेली दिसतात. विश्वकोशातील नोंदी असतील, साहित्य-संस्कृती मंडळाच्या द्वारे प्रकाशित पुस्तके असतील, साहित्य-संस्कृती मंडळाने निर्माण केलेली भाषांतरित पुस्तके असतील, नवेनवे उपक्रम असतील, साहित्यिक चर्चा असतील हे सर्व या साधनांचा एक भाग म्हणता येईल. त्यांनी स्वतः विश्वकोशात केलेले लेखन, स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतर केलेले लेखन, दिलेली व्याख्याने, त्याची झालेली पुस्तकं ही सगळी त्यांची प्रबोधनाची साधने आहेत असं मला वाटतं. या आधारे भक्कमपणे ते एक भूमिका समाजसुधारणेची, प्रबोधनाची आपल्या समाजात मांडत राहिले असं आपल्याला म्हणता येईल.

शास्त्रीजींच्या सामाजिकतेची सुरुवात प्राज्ञपाठशाळेत गेल्यानंतर झाली. पण १९२१ च्या दरम्यान आपल्याला असं दिसतं की ते सामाजिक विचार विश्वामध्ये एका सामाजिक प्रवाहाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. १९२१ ला एक पार्श्वभूमी आहे. वाईच्या प्राज्ञपाठशाळेत स्वामी केवलानंद सरस्वती यांचे ते शिष्य होते, विद्यार्थी होते. केवलानंदांनी १९२१ च्या आसपास एका धर्मनिर्णय मंडळाची स्थापना केली. (भारताच्या प्रबोधनाची सुरुवातसुद्धा धर्मचिकित्सेपासूनच झालेली आहे). महाराष्ट्रातील प्रबोधनावर जरी नजर टाकली आपण, फुले, आगरकर, रानडे आणि आंबेडकर घेतले तर चित्र हेच दिसतं की, धर्म हा इथल्या प्राधान्याने प्रबोधनाच्या चिकित्सेचा विषय एकोणिसाव्या व विसाव्या शतकातही झालेला आहे. ही चिकित्सा कशासाठी तर हिंदू धर्मामध्ये कालोचित बदल व्हायला हवेत अशी एक केवलानंदांची भूमिका होती. केवलानंद काही मार्क्सवादी, समाजवादी किंवा आजच्या भाषेत विद्रोही या गटातील नव्हते. ते पारंपरिक धर्मशास्त्र शिकलेले; तरीही त्यांना असं वाटत होतं की कालोचित बदल व्हायला पाहिजेत.

प्रबोधन म्हटलं की या बदलाच्या मागची वैचारिक भूमिका कोणती हा एक प्रश्न उपस्थित होतो. कुठल्या भूमिकेतून हे काम होतं? शास्त्रीजींच्या प्रबोधन विचार विश्वाचा धांडोळा घेतला तर त्यांच्यामध्ये आपल्याला साधारणतः १९३२ पूर्वीचे शास्त्रीजी आणि १९३२ नंतरचे शास्त्रीजी आणि साधारणतः १९४८ नंतरचे शास्त्रीजी असा फरक करावा लागेल. १९३०-३२ पूर्वीचे जे शास्त्रीजी आहेत ते त्यांनी स्वतःच असं म्हटलं

आहे की या कालखंडात मी भौतिकवादी झालेलो नव्हतो, पण समाजसुधारक होतो. म्हणजे सुधारणांचा विचार मी केला, पण मी काही भौतिकवादाच्या दृष्टीतून त्याचा विचार केला नाही. १९३२ मध्ये धुळ्याच्या जेलमध्ये असताना किंवा विनोबांबरोबर असताना आचार्य जावडेकर वगैरे अशा काही मंडळींबरोबर मार्क्सवादांचं अध्ययन करण्याची संधी त्यांना मिळाली. येथे मार्क्सच्या विचारांचा परिणाम त्यांच्या मनावर झाला. इथून पुढे ते भौतिकवादी झाले असं म्हणता येईल आणि मार्क्सची जी समाजपरिवर्तनाची कल्पना आहे किंवा समाजाकडे बघण्याची जी वर्गीय दृष्टी आहे, त्या वर्गीय दृष्टीचा त्यांनी स्वीकारही त्या काळात केलेला दिसतो. १९३७ साली ते मानवेंद्रनाथ रॉय यांच्या सहवासात आले. ती त्यांची पहिली भेट. रॉय त्या काळात मार्क्सवादाच्या विचाराने भारलेले आणि क्रांतिकारक घडामोडींमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांच्या हालचाली व धडपड चालू होती. भारतात आल्याबरोबर त्यांना अटक झाली कारण त्या वेळेला ते कम्युनिस्ट होते आणि नंतरच्या काळामध्ये शास्त्रीजींची आणि त्यांची ओळख झाल्यानंतर त्यांच्यामध्ये शास्त्रीजींच्याबद्दल एक कुतूहल निर्माण झालं. ते असे म्हणायचे की शास्त्रीजी हे पूर्व आणि पश्चिमेचं संगम असणारं एक आगळंवेगळं व्यक्तिमत्त्व आहे. पूर्व आणि पश्चिम या दोन्ही तत्त्वज्ञानाचा त्यांनी खोलवर जाऊन अभ्यास केलेला आहे. त्यांचं कुतूहल शेवटपर्यंत कायम राहील.

पुढे शास्त्रीजींच्या आयुष्याचा एक वैचारिक टप्पा असा दाखवता येतो की मार्क्सवादापासून ते दूर जायला लागले. १९४८ साली त्यांनी रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीचे जे शेवटचं अधिवेशन झालं त्याला (जो पक्ष रॉय यांनी काढलेला होता) आणि त्यांच्यामध्ये मार्क्सपासून फारकत घेऊन मार्क्सच्या पलीकडे जाऊन विचार केला पाहिजे अशी भूमिका रॉय यांनी मांडली होती ती शास्त्रीजींनाही मान्य होती. ती भूमिका त्यांनी घेतली. १९४८ साली जे शेवटचे अधिवेशन कलकत्त्याला झालं त्याचे अध्यक्ष तर्कतीर्थ होते. कलकत्ता अधिवेशनात त्यांनी ही भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. म्हणजे एकोणिसाव्या किंवा विसाव्या शतकात समाजवाद आम्हाला का हवा होता, मार्क्सवाद का हवा होता तर व्यक्तीला आम्हाला समाजाच्या बंधनातून मुक्त करायचं होतं. आता आम्हाला मार्क्सवाद, समाजवादाच्या पलीकडे का जायचं आहे तर आता आम्ही व्यक्ती पूर्णपणे स्वायत्त करू इच्छितो. व्यक्तीवर कुठल्याही विचारप्रणालीचंसुद्धा दडपण असता कामा

नये. या अर्थानं एक मुक्त, सर्जनशील आणि स्वायत्त अशा व्यक्तीची संकल्पना त्यांच्या वाङ्मयामध्ये शेवटच्या कालखंडात दिसते. नवमानवतावादाचं साहित्य निर्माण झालं त्याचाही त्यांच्यावर काही काळ प्रभाव पडला. शास्त्रीजींची वैचारिकता जी आहे ती भौतिकवादी नसण्यापासून भौतिकतावादी असण्यापर्यंत, भौतिकवादाकडून जडवादाकडे जाण्यापर्यंत, जडवादापलीकडे जाऊन नागार्जुनापर्यंत पोहोचल्यामध्ये आणि मार्क्सवाद याच्यापलीकडे जाऊन रॅडिकल ह्यूमॅनिटी म्हणजे मूलगामी मानवतावादी होण्यामध्ये, असे त्यांच्या वैचारिक प्रवासाचे टप्पे आपल्याला दाखवता येतात. हे एवढ्यासाठी लक्षात घ्यायला हवं की, त्यांचं जे समाजसुधारणेचे काम आहे (हिंदू धर्मातील सुधारणांचे) ते साधारणतः १९३० पूर्वीचे काम आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे त्यांच्यावर मार्क्सवादाचा, जडवादाचा पगडा नाही आणि धर्मसुधारणेची भूमिका घेत असल्यामुळे आस्तिक-नास्तिक या वादामध्ये ते फारसे दिसत नाहीत. जडवादावर त्यांचे पुस्तक त्यांनी १९४१ साली तीन व्याख्याने दिली होती त्यातून तयार झालं. त्या पुस्तकाचा खूप परिणाम महाराष्ट्रातील अभ्यासकांवर झाला. ते पुस्तक वादविवेचन मालेने प्रसिद्ध केलं. (नरहर कुरुंदकरांसारखा विचारवंत असं म्हणायचा की मी जडवादी झालो ते शास्त्रीजींच्या या पुस्तकाच्या वाचनामुळेच.)

शास्त्रीजी एक प्रबोधक म्हणून आपण ज्या वेळेला पाहतो त्यांच्या कालखंडात कोणत्या गोष्टी होऊन गेलेल्या होत्या पाहा. १९३० पूर्वी बघितलं तर आपल्याकडे धर्मामध्ये सुधारणेच्या अंगाने तीन प्रवाह निर्माण झालेले होते. एका बाजूला ब्राह्मोसमाजाचा बंगालमधील प्रवाह होता; जो आपल्याकडे प्रार्थनासमाजाच्या रूपाने अवतरला. आर्यसमाजाचा एक प्रभाव होता आणि फुलांच्या सत्यशोधक समाजाचा एक प्रभाव. म्हणजे हे तीन प्रवाह आपल्याला धर्मविषयक एक वेगळी भूमिका घेऊन उभं राहताना दिसतात. यातील फुल्यांची भूमिका जास्त क्रांतिकारक आणि मूलगामी, याउलट रानड्यांची, प्रार्थनासमाजाची भूमिका समन्वयाच्या अंगाने जाणारी आणि परंपरा व नवा विचार यांचा समन्वय कुठे होईल हे शोधणारी. पण समाजाचे अधिष्ठान आधुनिकतेच्या अंगानेच आहे, विचारांचं अधिष्ठान, समाजाची रचना पण तरीही परंपरा आणि समन्वय हे झालं तर अधिक टिकाऊ स्वरूपाचे परिवर्तन होईल अशी रानड्यांची श्रद्धा होती. फुल्यांना मूलगामी परिवर्तन हवं होतं आणि म्हणून त्यांनी आधीची परंपरा पूर्णपणे नाकारली आणि नव्या एका परंपरेचा आरंभ करण्याचा प्रयत्न केला.

आर्यसमाज हा हिंदूंचा वेदान्त अपौरुषत्व मान्य करणारा पण जातिभेद अमान्य करत असणारा शूद्रातिशूद्र यातील भेद अमान्य करणारा, संमिश्र विवाह करणारा, शूद्रांचा मौजीबंधन करणारा असा मोठा एक प्रवाह हिंदू धर्मात सुरू झालेला. या तीन प्रवाहांपैकी फुले यांचा सत्यशोधक समाज आणि रानड्यांचा प्रार्थनासमाज हे तुलनेने शास्त्रीजींच्या काळात प्रार्थना समाज थोडा दिसतो, पण सत्यशोधक समाज हा सत्यशोधक चळवळ राजकारणाच्या प्रवाहात गेल्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीत रूपांतरित झालेला दिसतो. आर्यसमाजाचे संघटन व कार्य एका बाजूला त्यांच्या पद्धतीने चालू होतं. आर्यसमाजाच्या कडवेपणातून धारदार हिंदुत्व प्रवाहाची निर्मिती झाली. तो प्रवाह हिंदू अंतर्गत सर्वसमावेशक होता. त्याकाळी प्रश्न हिंदू धर्मातील सुधारणेचा जर असेल तर सुधारकांनी किंवा प्रबोधकांनी आपण हिंदू असणं नाकारावं की स्वीकारावं हा मूलभूत प्रश्न होता. त्यांचे शास्त्रीजींनी दिलेले उत्तर असं आहे की, तो धर्म नाकारायचं तुम्हाला काही कारण नाही. तुम्ही ज्या धर्मात जन्माला आलेले आहात तो धर्म तुमचा आहे आणि तुम्हाला सुधारणा करण्याचा पूर्ण अधिकार आहे. तेव्हा तुम्ही हिंदू आहात, तर हिंदू असल्यामुळे तुम्हाला हिंदू धर्मातील सुधारणा सुचवता येतात, स्वीकारता येतात आणि हिंदू न राहूनही तुम्हाला हे काम करता येऊ शकतं पण त्या काळाची चौकट लक्षात घेता, शास्त्रीजींचा कालखंड लक्षात घेता ते हिंदू धर्माच्या चौकटीमध्ये शास्त्राचा सगळा विचार करताना दिसतात. त्यात त्यांची पोझिशन काय? १९३० पूर्वी शास्त्रीजी भौतिकवादी नाहीत आणि केवलानंदही स्वाभाविकपणे भौतिकवादी नाही. मग त्यांच्या सुधारणांच्या विचारांचे अधिष्ठान काय? कशासाठी धर्मसुधारणा? केवलानंदांचे उत्तर होतं तेच शास्त्रीजींचं एका अंगाने उत्तर तयार होतं. परंपरेच्या ओघामध्ये काळानुरूप जे बदल निर्माण होतात, पेच निर्माण होतात, त्या पेचांना उत्तरे त्या त्या कालखंडातल्या धुरिणांना शोधावी लागतात. ती उत्तरं शोधावी लागत असल्यामुळे नव्या प्रश्नांना भिडण्यासाठी जुन्या उत्तरांमध्ये काही बदल करावे लागतात. तेव्हा हा एका अर्थाने हा काळाचा महिमा आहे. काळाप्रमाणे बदलत जावं ही साधी सरळ भूमिका आहे. त्यात भौतिकवादी आहे नाही हा काही त्यांच्यासाठी महत्त्वाचा मुद्दा नव्हता. शास्त्रीजींच्या भूमिकेवरसुद्धा याचाच एका अर्थानं पगडा होता, पण तर्कतीर्थांनी ही भूमिका निरनिराळ्या पद्धतीने त्यांच्या प्रबोधनाच्या कार्यात वापरलेली आपल्याला दिसते. उदाहरणार्थ, धर्मनिर्णय मंडळ १९२१ साली

स्थापन झालं. त्या मंडळापुढे हिंदू धर्मातील कोणत्या सुधारणांचे प्रश्न होते तर बाल विवाह, सजातीय-विजातीय विवाह यांना मान्यता, पोटजातींचे आपापसात होणारे विवाह त्याला मान्यता द्यायची की नाही? स्त्रियांना असणारे अधिकार, हक्क, विविध जातींची असणारी सहभोजने, आंतरजातीय विवाह, विधवांचे पुनर्विवाह असे जे प्रश्न आहेत त्या काळात लोकांना भेडसावत होते त्या प्रश्नांबद्दल एक अनुकूल मत निर्माण करणं हे धर्मनिर्णय मंडळाने आपल्या समोरचे एक उद्दिष्ट ठरवलेलं त्याच्या कार्यातून दिसते. कारण या प्रश्नांमध्ये ही मंडळी भिडताना दिसतात. हे करायचं झालं तर त्यात मुख्य अडचण प्रचलित धर्मशास्त्र जे आहे ते पण त्याच्या आधारावर असणारी रूढी, पुराण जी काही आहेत याला पूर्णपणे अपौरुषेय मानणारा एक प्रवाह सनातन्यांमध्ये आपल्याला दिसतो. हे सगळं अपौरुषेय आहे आणि त्याच्यात काडीइतकाही बदल करण्याचा अधिकार आपल्याला नाही. त्यामुळे काळ कोणताही असो, तुम्ही ज्याच्या जातींमध्ये किंवा धर्मांमध्ये असाल त्या त्या धर्माचे आणि जातीचे पालन तुम्हाला करावे लागेल. पुराण आणि रूढींना ओलांडून तुम्हाला पुढे जाता येणार नाही. अशा तऱ्हेचे बदल करायला आम्ही मान्यता देणार नाही असं सनातनी पंडितांचं त्या वेळी म्हणणं होतं. शास्त्रीजी किंवा केवलानंद काय सांगत होते की काळानुसार बदल करायला हवेत. त्या दृष्टीने चर्चा कोणाशी करायची हा एक प्रश्न आहे. त्या कालखंडातील धर्मशास्त्रे आणि लोकांच्या धर्मश्रद्धा व धर्मपालन लक्षात घेतलं तर थेट लोकांशी बोलणं हा काही मुद्दा नव्हता. बोलता येईल पण शिक्षणाचं प्रमाण, धर्मशास्त्र माहीत असणाऱ्यांचे प्रमाण. मग वादविवादाचा एक आखाडा हा सरळसरळ धर्मशास्त्रामध्ये बदल अजिबात होता कामा नये असे मानणारे आणि बदल व्हायला पाहिजेत असं मानणारे ज्याला आपण प्रागतिक म्हणू शकतो अशा दोन प्रवाहांमध्ये ही सगळा चर्चेचा आखाडा त्या काळात तयार झालेला दिसतो. व तिथून पुढे शास्त्रीजींच्या प्रबोधन कार्याला खऱ्या अर्थानं सुरुवात झाली.

१९२३ ला एक दोन दिवसांची एक परिषद शास्त्रीजी आणि महादेवशास्त्री दिवेकर या प्राज्ञपाठशाळेच्या विद्यार्थ्यांनी वाईमध्ये भरवलेली आपल्याला दिसते. महाराष्ट्रात त्या वेळी त्यांनी अशी नोंद दिलेली आहे की १७ ब्राह्मणांचे गट-उपगट कार्यरत होते. एका अर्थानं सनातनी प्रवाह जो होता वाईमधला, महाराष्ट्रातील त्याचं नेतृत्व वाईचे प्रसिद्ध काशीनाथशास्त्री लेले

(हे गृहस्थ भाऊशास्त्री म्हणून प्रसिद्ध होते) यांच्याकडे होतं. त्यांचं म्हणणं असं होतं की, शास्त्रांमध्ये वा पुराणांमध्ये एका अक्षराचा जरी बदल केला तर आमची भूमिका त्याला विरोधाची राहील. आणि दुसरं म्हणजे त्यांचं असं मत होतं की परंपरेने वेदपठण चालत आलेलं आहे, पुराणं सांगितली जातात, प्रवचन होतात, रुढी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातात, स्मृतिग्रंथ सगळीकडे प्रसिद्ध झालेले असतात त्याच्या आधारावर जे काही लिहिलं गेलेलं आहे ते सगळं अपौरुषेय अशा स्वरूपात असल्यामुळे त्याच्यात बदल करणं अजिबात योग्य नाही. धर्मनिर्णय मंडळाच्या कामाचं अधिष्ठान झिडकारून टाकण्याची ही भूमिका होती. शास्त्रीजी आणि केवलानंद यांनी घेतलेल्या भूमिकेमध्ये त्यांनी युक्तिवाद असा केला. गंमत अशी आहे की हा युक्तिवाद करताना ते कुठल्याही इझमच्या आधारे करत नाहीत, ती त्यांची विचारप्रणाली नाही आहे. शास्त्रीजी काय सांगतात कालक्रमानुसार बदल केले गेले असतील ते तुम्हाला माहीत नाही हा एक भाग. कारण वेदांच्या ऋचा, वेदांचे पठण हे पुढच्या पिढीपर्यंत पोचले कसे तर ते पिढ्यान्‌पिढ्या त्याचं पठण करून त्यांना ऐकवण्यात आलं आणि ऐकणाऱ्यांनी ते लिहून घेतलं, त्यांनी पुढे सांगत नेलं अशी एक प्रक्रिया त्यात दिसते. त्यामुळे वेद लिहिले गेले नाहीत, फक्त ऐकवले जातात अशी परिस्थिती नव्हती. शास्त्रीजींच्या काळात वेद लिहिले गेलेले वेदांचे ग्रंथ होते. याचा अर्थ शास्त्रीजींनी असा लावला आहे की वेद पठण आणि वेद ऐकवणं या पिढ्यान्‌पिढ्यांच्या गोष्टींमधून प्रत्येक पिढीत सांगणारी जी मंडळी असतात ती आपापल्या दृष्टिकोणातून त्यात भर घालत असतात. त्यामुळे वेदातील मूळ ऋचा कोणती याचा निर्णय करणं कठीण असते त्यामुळे त्या आधारे निष्कर्ष काढणं हे आणखी कठीण. तुम्हाला मूळ ऋचा ज्या काळात निर्माण झाली त्या काळाची चौकट व संदर्भ पाहावा लागतो आणि असं किती काळ तुम्ही करणार? कारण निर्माण झालेलं धार्मिक वाङ्मय हे पिढ्यान्‌पिढ्या अशा पद्धतीने पुढे गेलेले असल्यामुळे ते जसेच्या तसे अशा स्वरूपात पुढे जाणं शक्य नाही. त्यामुळे त्या वेळचा संदर्भ आपल्याला माहिती नसतो आणि म्हणून आजच्या संदर्भात त्याच्याकडे पाहावं लागते. त्यामुळे बदल हे यासाठी करावे लागतात की हे सांगितलं एकाने लिहिले दुसऱ्याने तर यांच्या चुका कुठे शोधायच्या? त्यांनी चूकच केली नाही असं मानायचं, पण तसं म्हणता येत नाही म्हणून त्या चुका दुरुस्त करण्यासाठी तुम्हाला प्रत्येक कालखंडामध्ये, बदलत्या काळामध्ये याच्यात दुरुस्त्या

कराव्या लागतात. त्यात तुम्ही धर्माच्या चौकटीत आखू नका. येथे शास्त्रीजींची भूमिका आहे की जेव्हा सुधारणा आम्ही सुचवतो तेव्हा त्या सुधारणांमागे असणाऱ्या धर्मप्रेरणा तुम्ही लक्षात घ्या. धर्मवचनांचा अर्थ लावताना, धर्माची प्रेरणा काय आहे याच धर्तीवर आपल्याला गांधींच्या धर्मविचारांचा अभ्यास करू तेव्हा असं दिसतं की गांधींनीसुद्धा ही फारकत केलेली आहे. स्पिरिट ऑफ रिलिजन हे वेगळं आहे आणि टेक्स्ट ऑफ द रिलिजन वेगळं आहे. टेक्स्ट ऑफ रिलिजन हे माणसांकडून लिहिलेलं असल्यामुळे अपूर्ण आहे, सदोष आहे. ते काळानुसार बदलावे लागते, ते बदलण्याचे अधिष्ठान हे स्पिरीट ऑफ रिलिजनशी सुसंगत करावे लागते. म्हणजे धर्मप्रेरणेशी सुसंगत करण्यासाठी तुम्हाला बदल करावे लागतात. तसे बदल तुम्हाला धार्मिक चौकटीतही करता येतात. याच्यासाठी धर्म सोडण्याची भूमिका घेतली पाहिजे असं काही नाही असा त्यांचा दुसरा अर्थ. म्हणून 'रिलिजन ॲज अ रिलिजन' आणि 'रिलिजन ॲज ए कोड ऑफ कंडक्ट' अशी विभागणी करून शास्त्रीजींनी आपल्या धार्मिक प्रबोधनाच्या भूमिकेचा विचार केलेला आपल्याला दिसतो.

स्मृतीवर आधारित जे लिखाण आहे, पुराणं, परंपरेने चालत आलेले वेदपठण आहे. ते सतत बदलत गेले आहे. नुसते बदल झालेले नाहीत तर शतकानुशतकं धर्मग्रंथांचे लेखन भारतात चालत आलेलं आहे. महाभारताचं जरी उदाहरण घेतलं तरी आता जी भांडारकर प्रत महाभारताची अधिकृत म्हणून मानतो त्या प्रतीत आता भर पडलेली नाही. पण ती परत सिद्ध करण्यासाठी काय काय दिव्यं करावी लागली भांडारकर संस्थेला. कोणत्या कोणत्या शतकातील पोथ्या पाहाव्या लागल्या, कथा पाहाव्या लागल्या कारण महाभारताचं लेखन हे अनेक पिढ्या चालत आलेलं असलेलं लेखन आहे. अनेक ऋषी-मुनींनी त्यात योगदान दिलेली आहे. त्यामुळे त्या प्रत्येक ऋषी-मुनींनी त्याच्यामध्ये सहभाग घेताना आपला दृष्टिकोण काय आहे, आपलं म्हणणं काय आहे हे त्याच्यात ग्रथीत केलेलं आहे. म्हणजे मूळ कथा जर व्हॅल्यूच्या अंगाने 'अनलोडेड' आहे असं मांडलं तर पुढे ती नेत असताना प्रत्येक माणसाने त्याच्यामध्ये जी भर घातली त्याच्यामुळे 'नाऊ इट इज लोडेड'. तुमच्यासमोर जे महाभारत आज दिसतं ते अशा अनेक बदलांमधून पुढे आलेलं महाभारत आहे. हे बदल कसे होतात याचे एक उदाहरण शास्त्रीजींनी चांगलं दिलं आहे. भृगू नावाचे जे ऋषी होते ते आणि भारद्वाज यांचा महाभारतातला एक संवाद त्यांनी दिला आहे. त्या

समाजातील प्रश्न असा होता की ब्राह्मण कोणाला म्हणायचं? सगळी माणसं समान आहेत की नाही? त्या सगळ्या संवादात भारद्वाज सतत असे सांगतो की कालांतराने हे बदललं पाहिजे, हे सगळं बदलत आलेलं आहे त्याचे स्पष्टीकरण देता येतात आणि त्याच्यामुळे अपौरुषेय असं काही राहणार नाही, आहे ते पौरुषेयच आहे. म्हणून भृगूच्या आणि भारद्वाज यांच्या संवादात त्यांचा निष्कर्ष भारद्वाजच्या अंगाने जाणारा आहे. बदल हे अपरिहार्य असतात. तिथे एका रंगाची चर्चा त्या दोघांत झालेली आहे, म्हणजे माणसाच्या रंगावरून त्याचा वर्ण ठरवावा असा त्यांच्या संवादातील एक मुद्दा होता. त्याच्यात भारद्वाज यांनी भृगूच्या हे लक्षात आणून दिलं की एकाच जातीमध्ये जन्माला आलेल्या लोकांचे रंग वेगवेगळे असू शकतात. मग एकाच जातीत असणाऱ्या दोन लोकांचे वर्ण वेगळे ठेवायचे का? याचा अर्थ, हे जर दिसत असेल सगळ्यांना याचा अर्थ सगळ्या माणसांमध्ये काही ना काही साम्य असणार. त्याच्यामुळे ते एकच मानायला काय हरकत आहे? त्यांना कशासाठी वेगळ्या जातीचं व वर्णाचं लेबल लावायला हवं? अशा सगळ्या चर्चांचं उदाहरण त्यांनी त्यांच्यामध्ये दिलेलं आहे. त्यांच्या सागण्याचा मुद्दा असा होता की, कोणत्याही धर्मशास्त्रामध्ये एका बाजूला साधारण धर्म आणि दुसऱ्या बाजूला आपद्‌धर्म अशी विभागणी असते.

आज दुर्दैवाने भारताच्या धर्मकारणात आपण धर्मालाच मूळ धर्म समजण्याची चूक आजच्या उन्मादी धर्मकारणांनी केलेली आहे. त्याचे परिणाम आपण सर्व जण दंगे आणि दंगलींच्या रूपाने भोगतो. पण आपदधर्म हा बाहेर जाण्याचा एक मार्ग एखाद्या कसोटीच्या काळामध्ये नाइलाज म्हणून, जसं विश्वामित्राने कच्चा मांस खाल्लं वगैरे आपण सांगतो, हा धर्माचा भाग होता. साधारणधर्म वेगळाच आहे. म्हणून शास्त्रीजींचं म्हणणं असं की, साधारणधर्म जो आहे वे ऑफ लाइफ म्हणून लोक त्याच्याकडे पाहतात. धर्मामध्ये कालांतराने पेच उपस्थित होतात उदा. व्यक्ती मेल्यानंतर पंधरा दिवस पूर्ण शास्त्रशुद्धपद्धतीने त्याची क्रियाकर्मं केली पाहिजेत. असं करणारे काही लोक आधी आहेत पण त्या कालखंडात माणसांना स्वास्थ्य होते, शेतीप्रधान समाज होता त्या काळात या गोष्टी शक्य होत्या. आज आयटीप्रधान असणाऱ्या समाजात इथे मार्केट हा असा घटक तुमच्या जीवनावर प्रभाव गाजवणारा आहे. तिथं पंधरा दिवस देणे शक्य आहे का? जर शक्य नसेल तर दिवस ज्यांना करायचे त्यांना काहीतरी दुसरा

पर्याय उपलब्ध करून द्यायला पाहिजे हा एकूण साधण्याचा मथितार्थ असू शकतो. कारण त्या वेळी विवाह पाहिले तर ते पाच-सहा दिवस चालणारे विवाह होते. त्यापुढच्या पेचामधला एक पेच असा आला होता की, विवाहाचे दिवस कमी करता येतील का? नंतर पोटजाती आहेत त्यांच्यातील जे विवाह आहेत ते कायद्याने मान्य केले पाहिजेत असं एक बिल मुंबई प्रांतिक असेंब्लीमध्ये त्या कालखंडामध्ये आलेले होते. (आणि त्या बिलाला टिळकांनी विरोध केल्याचं आपल्याला माहिती आहे त्या वेळेला.) हा डिबेट त्या वेळी चाललेला होती. त्याच्यातून मार्ग काढायचा म्हणजे धर्मामध्ये कोणत्या ठिकाणी कशा पद्धतीने हस्तक्षेप करायचा असा त्याचा एक अर्थ सरळ सरळ होतो. शास्त्रीजी आणि केवलानंदांची जी परंपरा आहे ती धार्मिक चौकट न सोडणारी, कालानुरूप होणाऱ्या बदलांचा स्वीकार करणारी अशा उत्क्रांत होत जाणाऱ्या पद्धतीवर त्यांचा विश्वास आहे म्हणून शास्त्रीजींच्या काळातील प्रबोधन आणि मध्ये एक संवाद आणि वाद-विवाद यांचं चित्र दिसतं. पूर्वी शास्त्रार्थाचे वाद-विवाद होत असत. न्यायमूर्ती रानडे व शंकराचार्यांमध्ये नऊ दिवस वादविवाद झाला होता; विधवाविवाहाला धर्मशास्त्राचा पाठिंबा आहे की नाही यावर. तसेच अस्पृश्यतेच्या संदर्भात गांधीजींनी एक प्रयत्न करून पाहिला होता. शास्त्रार्थ करायचे आणि त्याच्यामधून जो आपलं म्हणणं पटवून देईल समोरच्याला, त्याप्रमाणे बदल करायचे अशी साधारणतः पद्धत आहे. म्हणून त्या काळामध्ये निर्णय करण्यासाठी निरनिराळे मुद्दे यायला हवेत आणि त्या मुद्यांमधून वाद-विवाद व्हायला पाहिजेत अशी ती भूमिका आहे. त्यामुळे विवाहाचे दिवस कमी करा, पोटजातीमधलं लग्न कायदेशीर माना, ती एकाच जातीतील लग्ने असं माना अशा प्रयत्नांचा एक घटक वादविवादात होता.

१९२३ नंतर आपल्याला असं दिसतं की अकोले, धुळे आणि सुरत या ठिकाणी ब्राह्मण परिषदा झालेल्या आहेत. या परिषदांना हजर कोण कोण आहेत? या परिषदा झाल्या म्हणजे नुसत्या या परिषदा झाल्या असं नाही. या परिषदांमध्ये वादविवाद झाले आणि याच्यात वल्लभपंतांचे त्या वेळचे आचार्य, शारदापीठाचे शंकराचार्य, अनंत कृष्णशास्त्री यांसारखे कलकत्त्यातील धर्माचा विद्वान, काशीहून आलेले राजेश्वरशास्त्री द्रविड आणि त्यांची जी परंपरा आहे, ही सगळी मंडळी त्या वादविवादामध्ये हजर असत आणि त्यांची एक पद्धत होती कशा पद्धतीने वाद-विवाद करायचा त्याचा समयबंध नावाचे 'ॲग्रीमेंट' असायचे. ते दोन्ही पक्षांना मान्य केले

की मग पूर्वपक्ष, उत्तरपक्ष या स्वरूपात वाद-विवाद चालू होताना दिसतात. तर्कतीर्थ यांचं म्हणणं असं होतं की, या सगळ्या परिषदांमध्ये सगळी सनातनी मंडळी येत असत आणि सुधारणांच्या बाजूने कोण असत तर तर्कतीर्थ, केवलानंद सरस्वती, पाठकशास्त्री आणि काही वेळेला तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे, दप्तरी, पां. वा. काणे इ. या वादविवादात सनातन्यांनी बाजू जुनीच होती, पण ते नव्या नव्या युक्तिवादाद्वारा आपला मुद्दा सतत मांडायचे. उदा.शास्त्रीजींनी असा एक प्रश्न उपस्थित केला होता की उपनिषद असं सांगतात की, सर्व माणसं एकच आहेत. शास्त्रीजी पुढे जाऊन असं म्हणाले की सर्व माणसं एक आहेत म्हणजे ते ब्राह्मण आहेत. सगळ्या माणसांना ब्राह्मण म्हणायचे की नाही हा धर्मशास्त्रातील वादविवादाचा प्रश्न आला. शास्त्रीजींचा याचा आधार काय होता? एक आधार सांगितला. भृगू आणि भारद्वाज यांच्या संवादाचा. तिथे शंकराचार्यांचा दाखला काय होता की ज्या गोष्टी अपौरुषेय आहेत त्यांची चर्चाच नाही 'तर्कोअप्रतिष्ठानम्' असं शंकराचार्यांचं वचन आहे. एका टप्प्यानंतर तर्काचा उपयोग करायचा नाही. मग कशाचा उपयोग करायचा? जे अपौरुषेय आहे त्याला मान्यता द्यायची त्याच्यात बदल करायचा नाही. आणि शंकराचार्यांचा मुद्दा हा या सगळ्या चर्चांमध्ये शेवटचा म्हणून सनातन्यांकडून वापरला जायचा. शंकराचार्यांच्या शब्दाला जे पावित्र्य आहे, जी मान्यता आहे ती कुठेही बाधित होता कामा नये अशी भूमिका सनातनी मंडळी त्या वेळी मांडत असत. एका चर्चेमध्ये अशाच पद्धतीची चर्चा सुरू झाल्यावर शास्त्रीजींनी पहिल्यांदा असं मांडलं की, शास्त्रांच्या रचना या दीर्घकाळ चालू असणाऱ्या रचना आहेत. कोणाही एका व्यक्तीने संपूर्ण धर्मशास्त्र लिहिलेलं नाही. अनेक शतकं धर्मशास्त्राचे काम चालत आले आहे. अनेक विद्वान पंडित, शास्त्री हे सगळे त्याच्यात सहभागी होते आणि आपापली भर घालत असताना त्यांनी त्यांचे दृष्टिकोण त्याच्यामध्ये आणलेले होते. म्हणून तुम्हाला सत्याच्या शोधासाठी तीन गोष्टींची गरज लागणार आहे. शास्त्रींचे शब्द असे होते की 'राईट व्हिजन', 'राईट नॉलेज' आणि 'राईट कण्डक्ट' हे तुम्हाला हवं असेल तर तुम्हाला चिकित्सा करूनच निर्णय घ्यावा लागेल. चिकित्सेचा आधार बदललेले कालमान नवे प्रश्न हाच असेल. सर्व माणसे ब्राह्मण आहे. त्यांनी ब्राह्मणांच्या प्रकारचे उदाहरण घेतलेले आहे. चार प्रकारचे ब्राह्मण आपण विचारार्थ घेऊ- सारस्वत, मैथिली, उत्कल ब्राह्मण, कोकणस्थ ब्राह्मण. ब्राह्मणांचे आणखी प्रकार आहे तो भाग वेगळा. पण

हे विचारासाठी घेतले. शास्त्रीजींचं म्हणणं काय होतं की यातील जे सारस्वत आहेत ते सरस्वती नदीच्या काठी राहणाऱ्या लोकांना सारस्वत म्हणतात. मिथिली नगरीच्या आसपास राहणारे म्हणून मैथिली, कोकण परिसरात राहणारे ते कोकणस्थ, उत्कल देशांमध्ये राहणारे ते उत्कल. पण ते ब्राह्मणच आहेत. त्यामुळे सगळे ब्राह्मण आहेत. दुसऱ्या बाजूने वर्ण आणि कर्म याची फारकत शास्त्रीजींनी सुचवली आहे. वर्ण आणि कर्म का वेगळे आहेत? तर शास्त्रीजींचे म्हणणं असं आहे की कर्माने वर्ण ठरतो. त्यांच्या सुधारणेमधला जो सगळा वाद-विवाद आहे तो याच्यावर जोडलेला आहे. तो गांधीजींशी केलेल्या अस्पृश्यता संदर्भात असो, राजगोपालाचारी आणि गांधीजी यांच्या मुलाच्या विवाहाच्या निमित्ताने केलेला विचार असो, इथे मुद्दा हा कर्म आणि वर्ण यांच्या फारकतीशी जोडलेला आहे. जेव्हा एका चर्चेत हे मांडल्यानंतर शास्त्रीजी असे म्हणाले की, शंकराचार्यांचा मुद्दा जरी शेवटचा काढलेला असला तरी शंकराचार्य हे तुमच्या आमच्यासारखेच मर्त्य गृहस्थ होते. शास्त्रीजींच्या एवढ्या एका विधानाने ती सभा प्रचंड तापली. शंकराचार्यांना मर्त्य मानव म्हणणारा हा कोण? अशा तऱ्हेचा एक पेच त्या सभेत निर्माण झाला. सभा उधळली जाणार की काय? सनातनी मंडळी बाहेर पडण्याच्या मूडमध्ये होती, पण केवलानंदांनी तिथे मध्यस्थी केली आणि असं सांगितलं तुम्ही तुमचं म्हणणं मांडा. लक्ष्मणशास्त्रींनी पूर्वपक्ष मांडला आहे. उत्तर पक्ष मांडण्याची तुम्हाला संधी आहे. पण ते काही त्या मंडळींना नीटपणे जमलं नाही. या सगळ्यांमध्ये जुने धर्मशास्त्री पंडित जुन्याच अपौरुषेय युक्तिवादावर म्हणणे मांडत होते तिथे शास्त्रीजींनी परिवर्तनवादाची नवी भूमिका या धर्मसुधारणांच्या चर्चेमध्ये त्यांच्या कालखंडात प्रविष्ट केली असं आपल्याला म्हणता येईल. शास्त्रीबुवा त्या अर्थानं परिवर्तनवादी आहेत.

परिवर्तनवादाची पद्धत काय होती? जुन्या धर्मशास्त्रपद्धतीने पाहणारे लोक घटनांची क्रमवारी पाहतात, त्या घटना अतिपवित्र मानतात, परिवर्तन पद्धतीत असा विचार केला जात नाही. ते घटना मानतात पण ती क्रमवारी पाहतीलच असं नाही. त्याऐवजी काय पाहिले जाईल? विविध कालखंडामध्ये होत असणाऱ्या बदलांचा अभ्यास हा त्यात प्रामुख्याने केला जातो. त्या प्रत्येक कालखंडामध्ये देवाची संकल्पना, विश्वाची संकल्पना, संस्कृतीची संकल्पना आणि विचार आणि व्यवहार याच्यातील बदल पाहिले जातात. म्हणजे प्रत्येक कालखंडात कदाचित देवाची संकल्पना बदलत चाललेली

आहे. का बदलती आहे, का बदलावी लागली हे जर पाहायचं असेल तर त्या काळातील बदलांचा अभ्यास करावा लागतो. म्हणून परिवर्तनवाद जो तर्कतीर्थांनी मांडला तो यासाठीच मांडला की, सर्व शास्त्र विविध काळामध्ये व विविध भागांमधून लिहिली गेली आहेत. आपल्या धर्मशास्त्राचे वैशिष्ट्य हे की भारताच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या स्मृती कार्यान्वित होत्या. मनुस्मृती, भृगुश्रुती, दायाभाग, मिताक्षरा इ. या सगळ्या ज्या स्मृती आहेत या निरनिराळ्या भागात पसरलेल्या होत्या आणि त्यांना अनुयायी होते. त्या पद्धतीने प्रत्यक्ष जगण्याचा व्यवहार करणारे सामाजिक गट अस्तित्वात होते. हे प्रादेशिक व वैविध्यातून या सगळ्या आचार-विचार, आहार-विहार यांच्या संकल्पना तुम्हाला वेगवेगळ्या दिसतात. तसंच वैविध्य तुम्हाला त्या धर्मशास्त्राच्या चर्चांमध्ये दिसतं. म्हणून शास्त्रीजींनी असं उदाहरण दिलं; एका परिषदेत की मुलीच्या लग्नाचं नेमकं वय किती? मनुस्मृती एक वय सांगते, दुसरी दुसरे वय सांगते, आणखी एक तिसरं वय सांगते, कोणी दोन सांगतं, कोणी चार सांगतं, कोणी आठ सांगतं. एखाद्या स्मृतीत असं दिसतं की मुलगी वयात आल्याशिवाय तिचं लग्न करू नये. वयात येण्याचं वय कोणतं असाही प्रश्न उपस्थित झाला. मग कोणतं वय मुलीचं लग्नासाठी प्रमाण मानावं असा प्रश्न शास्त्रीजींनी उपस्थित केला.

त्या सगळ्या चौकटीत बघितलं तर शास्त्रीजींच्या मताप्रमाणे आठव्या वर्षी मुलीचं लग्न करावं, पण त्यावर ते स्थिर राहिले अशातला भाग नाही. स्वातंत्र्योत्तर काळात ही भूमिका घेताच आली नसती आणि त्यांनी घेतलेलीही नाही. पण धर्मशास्त्राच्या चौकटीमध्ये धर्मशास्त्रांचा अन्वयार्थ लावायचा, तुमचीच वादविवादाची पद्धत वापरायची पूर्व पक्ष- उत्तर पक्ष आणि वैविध्य काय आहे याचे युक्तिवाद करणं हे एका अर्थाने बुद्धीची एक प्रचंड चमक आणि बौद्धिक विलास त्या काळात शास्त्रीजींना करता आला हे त्यांचं बौद्धिक कर्तृत्व मान्य केलं पाहिजे. म्हणजे रणांगण तुमचं, शास्त्र तुमचं, संवादाची पद्धत तुमची पण अन्वयार्थ काढण्याचं स्वातंत्र्य आमच्याकडे असलं पाहिजे. हा अन्वयार्थ काढण्याचे जे स्वातंत्र्य आहे हे खरं तर भारतातल्या सगळ्या धर्मस्वातंत्र्याचा आधार आहे हे आपल्याला लक्षात घेतलं पाहिजे. पुढे गांधीजींशी झालेल्या चर्चांमध्ये या गोष्टी पाहता येतात. म्हणून बदलांचा अभ्यास परिवर्तनवादी माणूस करतो आणि धर्मवचन यामागील प्रेरणा आणि संदर्भही तो पाहतो. जसं आज आपल्याला माहीत आहे की, राज्यघटनेचा अन्वयार्थ लावताना सुप्रीम कोर्टसुद्धा घटनेमागचं

मूळ प्रयोजन काय होतं, स्पिरिट काय होतं, हे पाहण्यासाठी घटना समितीतील सगळ्या चर्चेचे खंड हे आधाराला घेते. कारण तिथे जी भाषणे झालेली आहेत; प्रत्येक कलमावर त्याच्यामधून घटनेचं 'स्पिरिट' काय आहे, त्या कलमा मागचं प्रयोजन काय आहे आणि त्या प्रयोजनाच्या संदर्भात आलेली घटनादुरुस्ती योग्य आहे की नाही हे आजही पाहिलं जातं. एका अर्थानं तीच पद्धत शास्त्रीजींनी आरंभापासून वापरली आहे. म्हणून धर्माची प्रेरणा, प्रयोजन आणि धर्माचा व्यवहार याच्यामध्ये आपल्याला फरक करता यायला हवा, असं त्यांचं दुसऱ्या बाजूला म्हणणं आहे.

अशा परिषदा करत करत तर्कतीर्थांनी एक सात दिवसांची अखिल भारतीय ब्राह्मण परिषद भरवली बनारसला. त्या परिषदेला ते गेले होते आणि सातशे ब्राह्मण पंडित त्या सभेला आले होते. बहुतांश सगळे अव्वल सनातनी ज्याला म्हणता येईल असे होते. सर्व धर्मवाङ्मय अपौरुषेय आहे. कोणताही बदल आम्ही स्वीकारणार नाही अशा तऱ्हेची भूमिका घेणारे सगळे लोक. त्या परिषदेमध्ये रिफॉर्मची भूमिका मांडणारे चौघेच जण होते- तर्कतीर्थ, धर्मरहस्यकार के. एल. दप्तरी, पाठकशास्त्री. ही परिषद सुरू होण्यापूर्वी या विषयावर वादविवाद चर्चा घडायच्या. त्याच्यासाठी त्या काळात समयबंध नावाची एक पद्धत अवलंबण्यात यायची आणि त्या समयबंधाचा मसुदा दोन्ही पक्षांनी एकमेकांना द्यायचा आणि त्याच्यावर एकमत झाले तर तो वाद-विवाद पुढे जाणार. हे समयबंध काही ठिकाणी जमले नाहीत. सनातन्यांनी त्याच्यात मुद्दाम खोडे घातले आणि काही ठिकाणी वेगळ्या भूमिका घेतल्या. त्यामुळे नाशिकच्या परिषदेत समयबंधामध्ये दुरुस्ती सुचवल्यामुळे तर्कतीर्थांबरोबर जे तीन सहकारी होते त्या तीनही सहकाऱ्यांना सभेतून हद्दपार केलं. शास्त्रीबुवा एकटे किल्ला लढले. त्यांना केवढे प्रयास पडले असतील याची कल्पना करता येईल. धर्मशास्त्राचं सगळं अवगाहन करून त्यांना सगळं मांडावे लागले. तिथे त्यांनी हे प्रश्न उपस्थित केले होते. सर्व ब्राह्मण आहेत असं का नाही म्हणू, कर्माचा आणि वर्णाचा संबंध काय असा प्रश्न शास्त्रीजींनी प्रबोधक या नात्याने विचारलेला दिसतो. भौतिकवादी नसतानाही धर्मसुधारणा कशा प्रकारे करता येईल हे जे आव्हान होते ते शास्त्रीजींनी या पद्धतीने पेलले असं आपल्याला म्हणता येईल.

शास्त्रीजींच्या कार्याचा दुसरा भाग आहे शास्त्रार्थ तो अस्पृश्यतेच्या शास्त्रार्थाच्या संदर्भात आहे. गांधीजी येरवड्याच्या तुरुंगात असताना उपवास

करत असताना अस्पृश्यतेला धर्मशास्त्राचा पाठिंबा आहे का हे त्यांना तपासायचं होतं. त्यासाठी त्यांनी वाईला केवलानंदकडे निरोप पाठवला. केवलानंद, लक्ष्मणशास्त्री जोशी, दप्तरी, पाठकशास्त्री, भगवानदास ही मंडळी येरवड्यात जमली. तिथे आधी सनातनी गोटातली मंडळी भेटली. त्यांनी गांधींना ताकीद दिली की, तुम्ही कोणाच्यातरी नादाला लागून धर्मशास्त्रात बदल कराल आणि अस्पृश्यतेच्या संदर्भातील भूमिका मांडाल तर हे आम्ही खपवून घेणार नाही. ते आम्हाला मान्य होणार नाही. ही मंडळी गेल्यानंतर यांनी त्या धर्मपंडितांशी चर्चा करायची अशी गांधीजींची कल्पना. याच्यातून काय निर्णय येतो तो बघायचा. तेथेही समयबंधाचा प्रश्न आला आणि समयबंध करण्यासाठी जो मसुदा दिला त्याच्यात त्यांनी एका ओळीचा बदल केला. अस्पृश्यतेला मान्यता आहे की नाही असं म्हणत असताना कुठले अस्पृश्य असा या शास्त्रीजी व इतर मंडळींच्या मनात प्रश्न होता. म्हणून त्यांनी एक वाक्य त्याच्यात असं घातलं की 'आज' ज्यांना अस्पृश्य म्हणतात त्या जाती'. 'आज' हा शब्द आहे तो त्या सनातन्यांना खटकला आणि त्यांनी समयबंध उधळून लावला. ते चर्चेतून निघून गेले. मग गांधीजींशी चर्चा करत असताना तर्कतीर्थांनी शास्त्राच्या आधारे दाखवून दिले की आज अस्पृश्य हा वर्गच नाही. शास्त्रीजींचं म्हणणं असं की ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण ती वर्णव्यवस्था. पंचम वर्ण जो आहे त्याच्या पुढचा तो अस्पृश्यांचा तो चांडाळांचा आहे. पण चांडाळ कोणाला म्हणायचं? धर्मशास्त्रात तर प्रतिलोम विवाहातून जी संतती निर्माण होते ती चांडाळ. पण प्रतिलोम विवाह कोणाचे? तर उच्च वर्णातील स्त्री व शूद्र वर्णातील पुरुष यांच्या संबंधातून निर्माण होईल तिला दर्जा चांडाळ आहे ती आता होतच नाही. त्यामुळे तो वर्ग अस्तित्वात नाही. तुम्ही ज्याला महार-मांग, ढोर, चांभार म्हणता त्यांना नेमून दिलेली कामं आहेत. त्यामुळे ती क्षुद्र वर्णाचा भागच आहेत. त्यामुळे महार-मांग, ढोर, चांभार हे जे आहेत ते अस्पृश्य नाहीत. त्यामुळे या सगळ्यांना वर्ण व्यवस्थेनुसार सगळे अधिकार प्राप्त होतात असं शास्त्रीजींनी आपलं म्हणणं मांडलं आणि हे सिद्ध केल्यानंतरसुद्धा काहींच्या मनात थोड्या शंका होत्या. त्यांनी असं म्हटलं की ते अस्वच्छ राहतात. अस्वच्छ व्यवसाय करतात. त्याला शास्त्रीजींनी असं उत्तर दिलं की, व्यवसाय समाजाची गरज आहे. भंगीकाम असेल, झाडूकाम असेल या गोष्टी जर केल्या नाहीत तर समाजाचं आरोग्य नीट राहणार नाही. कुणी तरी हे व्यवसाय केल्याशिवाय

समाजाचं आरोग्य चांगलं राहणार नसेल तर हे व्यवसाय करणं ही समाजाची गरज आहे. नंतर ती भूमिका सगळ्यांना पटली. त्यावर सह्या झाल्या. त्याचा एक मसुदा तयार करण्यात आला. धर्मशास्त्राचा आधार अस्पृश्यतेला नाही अशी भूमिका घ्यायला गांधी मोकळे झाले. गांधीजी असं म्हणाले की, उद्या धर्मशास्त्र जरी अनुकूल आहे अस्पृश्यतेला असं सांगितलं आणि सिद्ध केलं तर मी धर्मशास्त्र ओलांडूनही पुढे जायला तयार आहे. त्यां तर्कतीर्थांचा प्रबोधक म्हणून असणारा सगळा खटाटोप आहे स्वातंत्र्यपूर्व काळातला. हिंदू धर्माच्या चौकटीत राहून कालोचित पद्धतीने बदलासाठी वापरलेली पद्धती जुनीच आहे, त्या काळातीलच आहे आणि युक्तिवाद करताना धर्मशास्त्राचा अन्वयार्थ कसा लावायचा याचं विपुल स्वातंत्र्य शास्त्रीजींनी घेतलं आहे. राजगोपालचारी व गांधीजी यांच्या मुलांचा विवाह करायचा प्रस्ताव गांधीजींकडे आला, तो गांधीजींचे सेक्रेटरी महादेवभाई देसाईनी यांच्यामार्फत. गांधीजींचा मुलगा आणि राजगोपालाचारी यांची मुलगी असा तो विवाह होणार होता. दोघांनी एकमेकांना पसंती दिलेली होती पण विवाह व्हावा की बौद्धिक होऊ नये यासाठी गांधीजींनीसुद्धा मान्यता द्यायला तीन वर्षे घेतली. त्यांना त्याचे परिणाम तपासायचे होते होणारे आणि काशीच्या पंडितांनी त्यांना सांगितले होते की हा प्रतिलोम विवाह आहे. याच्यातून निर्माण होणारी संतती चांडाळ असणार त्यामुळे यात पडू नका. धर्मशास्त्राचा अवमान करता कामा नये. या सगळ्या गोंधळात गांधी असताना शेवटचा भाग म्हणून त्यांनी तर्कतीर्थांचा सल्ला घेतला. तर्कतीर्थ असे म्हणाले की, यात काहीच अडचण नाही.

या बाबतीत तर्कतीर्थ यांचा युक्तिवाद असा होता -

The social system based on the consideration of varna has been undergoing a continual evolution over many centuries since that time of Shankaracharya. Both Rajgopalchari and you are well educated. In fact, both of you are lawyers by training and have cultivated similar values with respect to religion and social development. Both of you also hold similar political views with an unwavering commitment to the freedom of our nation. By all consideration, you practically belong to the same varna. I therefore donot consider this marriage as a pratiloma vivah. It is a marriage between families of similar varnas in perfect accordance with the Shastras (Swimming Upstreams Laxman

Shastri Joshi and the evolution of modern India by Arundhati and Ashok C. Khandekar, Oxford Publication 2019- page 74)

तर्कतीर्थांच्या या सल्ल्यानंतर हा विवाह १६ जून १९२३ साली झाला. हे लग्न लावायला काशीचे पंडित तयार नव्हते म्हणून या लग्नाचं पौरोहित्य शास्त्रीजींनी केलं. त्यानंतर प्रश्न आला सोरटी सोमनाथ मंदिराच्या संदर्भातला. हा प्रश्न स्वातंत्र्यानंतर आला. सोरटी सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करायचा होता सरदार पटेलांना. (शासनाच्या सहभागविना हा व्हावा ही गांधी, नेहरूंची भूमिका होती) या वेळेस शास्त्रीजी रॉयवादाच्याही पलीकडे जाऊन एका स्वायत्त व्यक्तीच्या भूमिकेच्या दृष्टीने समाजाचा विचार करत होते. मार्क्सची विचारपद्धती त्यांना पटली होती तरी संकल्पनांची स्वायत्तता त्यांनी मान्य केली होती. म्हणूनच मार्क्सवाद सगळाच्या सगळा पटलेला नव्हता. म्हणजे त्यांची जी त्या वेळची बौद्धिक अवस्था आहे ती स्वातंत्र्यपूर्व काळातील बौद्धिक अवस्थेपेक्षा वेगळी अवस्था आहे. तिथे प्रश्न असा निर्माण झाला की, १९५० साली मृत्यूच्या अगोदर १९४८ पासूनच के. एम. मुन्शी आणि सरदार पटेल यांच्या मनात या मंदिराचं पुनर्निर्माण व्हावं. तो राष्ट्रीय अस्मितेचा भाग आहे. पण या मंदिराचं पुनर्निर्माण करावं, मूर्तीची मोडतोड झालेली आहे तिथे तिची प्रतिष्ठापना केली पाहिजे. याच्यासाठी एक बिगर शासकीय ट्रस्ट निर्माण झाला होता. त्या मार्फत पैसे मिळवण्याचेही काम चालू होते. मंदिर पुनर्निर्माणाला गांधीजींचाही विरोध नव्हता. गांधींनी त्यांना एवढेच सांगितले की, शासनाकडून एक नवा पैशाचा निधी तुम्ही घ्यायचा नाही, कारण हे धर्माचं काम आहे त्याचा शासनाशी काही संबंध नाही. पण हे जे नवं मंदिर होईल ते सर्वांना खुले असणार. पूर्वास्पृश्यांना खुलं असणार होतं आणि इतर धर्मीय लोकांनासुद्धा. हे जाहीर झाल्याबरोबर या मंदिराला गुजरातमधील सनातन्यांकडून विरोधाला सुरुवात झाली. सगळं ठरल्यानंतर त्या सबंध प्रतिष्ठापनेचं पौरोहित्य कोणी करायचं हा प्रश्न उपस्थित झाला. सर्व मंदिर तुम्ही इतर धर्मियांना, पूर्वास्पृश्यांना, म्लेच्छांना, चांडाळांना, शूद्रांना खुलं करणार त्यामुळे या मंदिराची पायाभरणी किंवा प्रतिष्ठापना आम्ही करणार नाही. मग त्या कामासाठी पुन्हा तर्कतीर्थांची आठवण झाली. १९५१ साली या मंदिराच्या पुनर्निर्माणाचा कार्यक्रम तर्कतीर्थ व केवलानंद यांच्या पौरोहित्याखाली पाच दिवसांचा समारंभ पार पडला. त्या पाच दिवसांच्या सगळ्या विधीचा परिणाम म्हणून शास्त्रीजींना प्रचंड पैसा दक्षिणेच्या रूपाने देऊ केला. त्यांनी त्यातला एकही पैसा घेतला

नाही. एक रुपया मानधन घेतले आणि बाकीचे पैसे संस्कृत महाविद्यालय उभारण्यासाठी त्यांनी परत केले.

सोमनाथचा प्रश्न एका बाजूने सुटला, पण दुसऱ्या बाजूला मी मघाशी म्हणालो शास्त्रीजींची त्या वेळी बौद्धिक अवस्था कुठल्याही वादाशी संबंधित नव्हती अशातला भाग नाही, मार्क्सवाद, रॉयवाद याच्या पलीकडे. त्यांचे रॉयवादी पक्षातील सहकारी होते गोवर्धनदास पारिख आणि इतर त्यांनी शास्त्रीजींना प्रश्न विचारायला सुरुवात केली की, तुमचा 'सेक्युलॅरिझम/जडवाद' कुठे गेला? तुम्ही या मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कार्यक्रमाला कसे गेलात? ते असं म्हणाले की, ज्या देवळाचा जीर्णोद्धार झाला ते देऊळ सगळ्या जाती-धर्मासाठी खुलं होणार आहे ही गोष्ट मुळात सेक्युलर आहे. आपल्या सेक्युलर राज्यघटनेच्या नियमानुसार अशा मंदिरांचा जीर्णोद्धार करणं गैर नाही. खरा युक्तिवाद असा होता की, या प्रकारच्या गोष्टीमुळे जर दबल्या गेलेल्या समाजावरची काही दडपणं दूर होऊन त्यांना इतरांच्यात मिसळण्याची संधी मिळत असेल तर त्यासाठी आपद्धर्म म्हणून या कामात पडण्यात काहीच हरकत नाही. तसं होणार असेल तर ते काम करावं नाहीतर करू नये. याचा अर्थ असा की प्रॅगमॅटिक किती राहायचं, वैचारिक जडत्व किती बाळगायचं याचा एक विवेक शास्त्रीजींच्या एक प्रबोधक या रूपांमध्ये आपल्याला त्यानिमित्ताने दिसतो. त्याची त्याची मांडणी पण अशीच दिसते की जर दलितांना आणि इतरांना मंदिरप्रवेश मिळणार असेल तर हे करायला काहीच हरकत नाही. कारण धर्मशास्त्राचा अर्थ आपण या पद्धतीने लावण्याची समाजाला सवय लावायला हवी.

हा जो पेच आहे शास्त्रीजींच्या पुढे निर्माण झालेला. हा पेच स्वातंत्र्योत्तर काळात सत्तरीच्या दशकातसुद्धा परिवर्तनवादी चळवळी पुढे निर्माण झालेला होता. मंदिरप्रवेशाची आंदोलनं करावी की करू नयेत? 'एक गाव एक पाणवठा, एक गाव मसणवटा' ही आंदोलनं जशी झाली सत्तरीच्या दशकामध्ये, तशी मंदिरप्रवेशाची पण आंदोलनं झाली. कशाला मंदिरात त्यांना जायला लावायचं, पुन्हा जुन्या परंपरेत अडकायला लावायचं असं मानणारा एक प्रवाह होता. पण तिथे दलितांची इच्छा-आकांक्षा, त्यांचा हक्क याचा संबंध जर लक्षात घेतला तर त्यांच्यासाठी मंदिरप्रवेश हा त्यांना जर सन्मान वाटत असेल तर त्या सन्मानासाठी तुम्ही त्यात सहभागी व्हायला पाहिजे अशी भूमिका समाजपरिवर्तनाच्या चळवळीमध्येसुद्धा घेतली गेलेली आहे. महिलांनी शनिशिंगणापूर मंदिरात जावं? त्या वेळीही काही

लोक असं म्हणाले की, त्या व्रतांमध्ये पुन्हा कशाला महिलांना अडकवता? तिथे भूमिका त्या व्रतात अडकायचं की नाही हा प्रश्न त्या महिलेचा असतो मुळात. तिचा सन्मान काय तर तिला जर ते वाटत असेल तर ते करण्याचा तिचा घटनात्मक अधिकार आहे. तो जर कोणी नाकारत असेल त्यासाठी तुम्ही सत्याग्रह करणार की नाही, करणार असा तो प्रश्न आहे. तो शास्त्रीजींच्या काळात होता तो आपल्याही काळामध्ये आलेला आहे.

त्यामुळे शास्त्रीजींच्या प्रबोधनाच्या भूमिकेबद्दल विशेषतः स्वातंत्र्यपूर्व काळातल्या भूमिकेमध्ये दोन गोष्टी ठळकपणे दिसतात. एक कर्म आणि वर्ण याची सांगड तोडत आहेत ती पुढे गांधींच्याही कार्यकाळात दिसते. वर्णव्यवस्थेतील उच्च-नीचता नष्ट करण्याचा प्रयत्न करत होते. त्याचं एक बीज पाहायला मिळते. कर्म आणि वर्णाचा संबंध लावला पाहिजे असं नाही. दुसरं तुम्ही विशिष्ट विचारप्रणाली घेऊनच सुधारणा करता येते असं नाही. काळाच्या ओघात निर्माण होणारे प्रश्न आणि त्यांना उत्तरं शोधताना जे बदल होतील ते बदलही तुम्हाला स्वीकारता यायला पाहिजेत. कारण त्याचं असं म्हणणं की धर्म हा समाजात राहणारा घटक आहे. तो नाहीसा होणारा घटक नाही. जोपर्यंत धर्म आहे, धार्मिक माणसं आहेत तोपर्यंत या विषयीचे प्रश्न उपस्थित होणार. त्या प्रश्नांनासुद्धा याच प्रकारे आपल्याला तोंड दिले पाहिजे. त्यामुळे हे सगळं जे प्रबोधन आहे त्यात त्यांनी हिंदू धर्माचे रणांगण सोडलं नाही. त्याच्यासाठी त्यांना धर्मांतर करावं असंही वाटलं नाही. जडवाद स्वीकारून ज्या वेळेला ते एका अर्थानं पूर्णपणे नास्तिक झालेले होते, तेव्हा त्यांच्या घरामध्ये असणारे देव यांची पूजाअर्चा कोण करणार? आपण तर करणार नाही म्हणताना त्यांनी आणि त्यांच्या पत्नीने ठरवून एके दिवशी त्या सर्व देवांना कृष्णेच्या पाण्यामध्ये यथासांग विधी करून कृष्णेत सोडून दिलं. इथपर्यंत त्यांनी धारिष्ट केलेलं आहे. असा माणूस त्या वेळी जडवादी असणारा, नंतर ते म्हणाले, ''मी आता जडवादी राहिलो नाही. नंतरच्या काळात त्यांच्यात वैचारिकतेचा टप्पा हा नागार्जुनाकडे जाणारा आहे. पण त्याच्या पलीकडे काय आहे हे आपल्याला माहीत नाही. त्यामुळे असं म्हणता येतं आपल्याला की तुम्ही आस्तिक असा, पुरोगामी असा, सेक्युलर असा, धर्माच्या संबंधांमध्ये तुम्हाला भूमिका घेताना तारतम्य बाळगायला पाहिजे. अनुचित काय आहे हेही पाहता यायला पाहिजे. आणि समाजाची गरज काय आहे हेही पाहता यायला पाहिजे. या सगळ्याची सांगड शास्त्रीजींच्या पुरोगामी प्रबोधक

भूमिकेत दिसते. म्हणून त्यांना पुरोगामी प्रबोधक असं म्हणता येतं.''

**वैचारिक प्रवास व फलश्रुती**

भौतिक दृष्टिकोण त्यांचा जवळपास स्वीकारायचा कालखंड हा १९३० पर्यंत दिसत नाही. त्यांच्या स्वतः रेग्यांनी ज्या मुलाखती घेतल्या त्यात म्हटलं आहे की, जेलमध्ये गेल्यानंतर त्यांचं मार्क्सवादाचं वाचन सुरू झालं. भुस्कुटे वगैरे मंडळी तिथे होती आणि त्यातून काही ग्रंथ त्यांच्या हाती लागले. मॅनिफेस्टो असेल किंवा अन्य काही. पण या सगळ्यांमुळे नवा दृष्टिकोण आणि नवा विचार त्यांच्या डोक्यात शिरलेला आपल्याला दिसतो आणि भौतिकवादाकडे ते वळलेले दिसतात. या भौतिकवादाशी जोडलं जात असताना त्यांना मार्क्सवादाची जाणीव झाल्यानंतर की मार्क्सवादाचा विचार आल्यानंतर त्यांच्यापुढे दोन-तीन पर्याय उपलब्ध होते. त्यांना असा प्रश्न विचारला होता की पूर्व आणि पश्चिमेच्या विचारपद्धतीमध्ये तुम्हाला फरक काय दिसतो? त्या वेळी त्यातून पर्याय पुढे आलेले दिसतात. एक तर पश्चिमेकडे ज्ञान-विज्ञानाचं अनुसंधान नवीन सिद्धांताशी लगेचच जोडलं जातं. मागचं सगळं सिद्धांतन त्या प्रकाशात पटकन पाहिलं जातं आणि ते टाकाऊ ठरत असेल तर ते लोक टाकाऊ ठरवून मोकळे होतात. दुसऱ्या बाजूला पूर्व पारंपरिक निकष बाजूला सारायचे आणि नवीन विज्ञान आणि ज्ञानाच्या संदर्भातले सिद्धांत फक्त चालू ठेवायचं अशी पर्यायाची परंपरा त्यांनी सांगितली होती. आणि तिसरा भाग असा होता की परंपरेला विरोध तर करायचा, पण परंपरा पूर्ण टाकायची नाही आणि त्या चौकटीमध्ये नव्या गोष्टींकडे नव्या दृष्टीने बघायचं आणि शेवटचा पर्याय त्यांना उपलब्ध होता त्याच्यामध्ये परंपरेशी जुळवून घेणं आणि तिला आधुनिकतेला सन्मुख करणं म्हणजे पुन्हा रानड्यांच्या संबंधातला मुद्दा येतो तर तो त्यांना जास्त भावलेला आहे असं मला वाटतं. आणि पुढे त्यांनी असंही म्हटलं आहे की एका ठिकाणी की भारतीयांना हा पर्याय जास्त भावतो. परंपरा न सोडता तिच्याशी संवाद करणं आणि आधुनिकतेकडे तिला वळवणं या मार्गानं जाणं भारतीयांना जास्त महत्त्वाचं वाटतं असं म्हणून त्यांनी स्वतःलाही या क्षेत्रांमध्ये बसवलं आहे. मग या सगळ्या समाजपरिवर्तनाचा काहीतरी उद्देश असला पाहिजे तर तो कोणता तर त्यांनी असं म्हटलं की, मला प्रबोधनाचं मध्यवर्ती सूत्र सापडलं ते सगळ्या मानवजातीची एकता या प्रकाराचं ते सूत्र आहे आणि

ते साध्य करण्यासाठी मग मार्क्सवाद आणि भौतिकवाद या विचारप्रणालीचा एक हत्यार आपल्याला उपलब्ध झालं असं दिसतं.

त्याचवेळेला त्यांना असं दिसलं की, युरोपातील आक्रमक राष्ट्रवाद युरोपात निर्माण होणारा, भारतातील आक्रमक हिंदुत्ववाद आणि आक्रमक इस्लाम या सगळ्यांच्या मर्यादा आणि धोके हे जाणवल्यामुळे त्यांना या उद्देशाकडे जाणं अवघड आहे याची जाणीव झाली, पण जावं लागणार हे तर नक्की आहे आणि तिकडे जायचं असेल तर हळूहळू तुम्हाला परंपरा आणि आधुनिकतेचा जो प्रवास आहे तो टप्प्याटप्प्याने करावा लागेल, ही एक मध्यममार्गी इव्होल्यूशनरी भूमिका घ्यावी लागली.

१९८३ साली शास्त्रीजींनी 'भारत राष्ट्राच्या उभारणीची प्रक्रिया' या विषयांवर दोन व्याख्याने मुंबईत दिली. त्यातही भारतीय राष्ट्रवाद हा युरोपियन राष्ट्रवादापेक्षा कसा वेगळा आहे हे त्यांनी दाखवून दिले आहे. स्वातंत्र्यचळवळीतून व संविधानातून निष्पन्न झालेल्या राष्ट्रवादाची त्यांनी भलावण केली आहे, हे लक्षात ठेवायला हवे. एका मुलाखतीत त्यांनी असं म्हटलं आहे की मी अध्यात्मवादीही नाही, भौतिकवादीही नाही त्याच्या पलीकडे मी गेलो आहे. पलीकडे जाण्याचा संदर्भ त्यांनी नागार्जुनाचा दिलेला बुद्धाचा, पण मला तो धूसर वाटतो कारण त्याच्या पलीकडे काय आहे हा प्रश्न पुन्हा अपुराच राहतो. शास्त्रीबुवांच्या लेखनातही तो तसा अपुराच राहिला आहे असं मला वाटतं. दुसरं त्यांनी त्या प्रश्नाला उत्तर देताना असं म्हणत होते की, वैराग्यदृष्टी स्वीकारायची असेल तर अमुकच विचार कशाला हवा. विवेकवादावर आधारलेली कोणतीही विचारप्रणाली घेऊन तुम्हाला वैराग्याकडे जाता येतं आणि नास्तिक माणसालाही मोक्ष धर्माचा अधिकार असू शकतो. म्हणजे मोक्षाच्या कल्पनेबद्दलसुद्धा काय म्हणायचं, मोक्ष म्हणजे नेमकं काय तिथे कुठेतरी अपुरेपण जाणवलं. विठ्ठल रामजी शिंद्यांनी मोक्षाबद्दल स्वच्छ भूमिका घेतलेली होती की, मनाची प्रसन्न अवस्था ज्या ज्या कारणाने ज्या ज्या गोष्टीतून होते अशा सगळ्या गोष्टी मोक्षात समाविष्ट करतो. तसे मला यात दिसत नाही. हे परंपरेचा अभ्यासक असणाऱ्या माणसाला मोक्ष म्हणजे काय? कर्मबंधन, संसारबंधन यातून सुटका हवी असेल तर वैराग्याकडे तुम्हाला वळावं लागतं. मग वैराग्याकडे न वळतासुद्धा त्यातून सुटका करता येते का की वैराग्याकडे वळला की मग जी बंधनं तुमच्यावर माणूस म्हणून आलेली आहेत. त्याचा तुम्ही त्याग करणार का? केला पाहिजे का? त्याची आवश्यकता काय?

हे जे सगळे प्रश्न उपस्थित होतात याला कुठेही त्यांच्या जडवादाच्या विवेचनामध्ये फारसं उत्तर आहे असं मला वाटत नाही.

मार्क्सचा प्रभाव पडला असं आपण म्हणतो आणि त्यांनीही म्हटलेलं आहे भौतिकवादाचा. पण तिथेसुद्धा ज्याला आपण हातचं राखून म्हणतो तशी मला त्यांची पोझिशन दिसते. हातचं राखणं याचा अर्थ ते असं म्हणतात की भौतिकवाद स्वीकारताना त्याची मीमांसा ब्रॉडली पटली. मला म्हणजे मी मीमांसेची पद्धत म्हणून पण सगळ्याच गोष्टी जशाच्या तशा मला मार्क्सवादातील स्वीकारता आल्या नाहीत आणि येत नाहीत. कारण, संकल्पना आणि विचारांचा व्यवहार या ज्या गोष्टी रॉयच्या संदर्भात आल्यानंतर आणि आधीपासून जे दिसतंय त्यामध्ये ते असं म्हणाले की, त्यांची स्वायत्तता मी नाकारू शकत नव्हतो. त्यामुळे प्राचीन ग्रीसमधली कला असेल किंवा आदिम अवस्थेतील माणसांच्या कला असतील, संगीत असेल याचा कुठेच भौतिकवादाच्या दृष्टीने उलगडा आपल्याला करता येत नाही किंवा न्यूटनच्या संशोधनाचा उलगडासुद्धा भौतिकवादाच्या चौकटीत बसत नाही. कुठेतरी त्यांच्या डोक्यामध्ये मार्क्सची जी विचारमीमांसा आहे त्याच्याबद्दल काही शंका त्यांनी उपस्थित केलेल्या आहेत. त्यामुळे ते मार्क्स हा सापेक्ष पद्धतीने मूल्यांचा विचार करतो आणि मूल्यांचा काही भाग शाश्वत असतो असं शास्त्रीबुवा मानतात. सगळीच मूल्यं सापेक्ष पद्धतीने आपल्याला पाहता येत नाहीत. अशा प्रकारची एक मीमांसा त्यांनी त्यात फार मांडलेली आहे. मार्क्सवाद नाकारण्याचे एक भारतीय संदर्भातील कारण त्यांनी एक असं दिलं होतं की, भारतात कामगारवर्गाची संख्याच पुरेशी नाही तर तो प्रश्न इथे प्रस्तुत असूच शकणार नाही. त्या दृष्टीने कदाचित माओच्या शेतकरी संबंधीची सहानुभूती मला त्यांच्या मार्क्सवादांमध्ये जास्त दिसते.

तुम्ही रॉयकडे का वळलात असा प्रश्न जेव्हा त्यांना केला तेव्हा त्यांनी त्यांची ध्येयनिष्ठा, भक्कम बौद्धिक मांडणी वगैरे सांगितलं, पण दुसऱ्या बाजूला रॉयच्या विचारामधून भौतिकवादाची एक घट्ट बांधणी त्यांना जाणवली. त्याचं आकर्षण त्यांना जास्त आहे असं त्याच्यामध्ये दिसतं. रॉय याचं हे आकर्षण का जास्त तर रॉयमध्ये आणि मी मघाशी म्हणालो तसं शास्त्रीबुवांच्या डोक्यात असणारा जो मुद्दा होता की संकल्पना आणि विचार यांची कार्यकारी असण्याची जी गोष्ट आहे ही स्वायत्त आहे. त्याला या चौकटीमध्ये बांधता येत नाही. या प्रकारच्या भूमिकेत असल्यामुळे रॉय

आणि त्यांचं एका अंगाने तिथे एकरूपता झालेली दिसते. तसं बघितलं तर ते पुढे मार्क्सवादाच्याही पलीकडे गेले आहेत. बियाँड मार्क्सिझम हा जो भाग आहे. रॉयच्या ह्यांच्यामध्ये तो शास्त्रीबुवांनी स्वीकारलेला आहे. एका अर्थाने मार्क्सचा प्रभाव काही अंशी दाखवूनसुद्धा बियाँड मार्क्सिझम जायला हवं, जाता येतं आणि हे करताना मग दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी आपल्याला असे दिसत की  पूर्णपणे रॉयवादी पोझिशन त्यांनी स्वीकारलेली आहे. म्हणजे काँग्रेसने राजीनामे द्यावेत की देऊ नयेत, युद्धाला मदत करू नये. फॅसिझम विरुद्ध लोकशाही असं हे युद्ध आहे. याचं सगळं विश्लेषण जे शास्त्रीजींनी केलं आहे. त्याच्यामध्ये ते असं म्हणतात की, युद्ध ही कितीही वाईट गोष्ट असली तरीसुद्धा काहीवेळेला ती अपरिहार्य ठरते आणि लोकशाहीचा विजय व्हायचा असेल तर तो युद्धानेच होणार असल्याने फॅसिझमचा पराभव होणं अत्यावश्यक आहे, ही भूमिका रॉय यांची होती तशी त्यांचीही होती. त्याच्यानंतर ते त्या पक्षाकडे वळलेले आपल्याला दिसतात. १९३७ साली रॉय त्यांना पहिल्यादा भेटले त्यानंतर क्रमाक्रमाने १९४८ पर्यंत जवळपास पक्ष विसर्जित होईपर्यंत त्या पक्षाचे त्यांनी पूर्णपणे काम केलेले आहे. हा त्यांच्या प्रवासातला महत्त्वाचा भाग आहे असं मला वाटतं.

मार्क्सचा विचार हा २०० वर्षांपूर्वीच्या युरोपीय समाजाला लागू पडणारा आहे. तो भारतीय किंवा आशियाई समाजांना लागू पडत नाही अशी एक सेंट्रल पोझिशन तर्कतीर्थांनी त्याचं शेवटचं जे अध्यक्षीय भाषण झालं कलकत्त्याला त्यात घेतलेला आहे आणि तिथे एक वेगळा बदल त्यांच्या भूमिकेमध्ये झालेला आपल्याला दिसतो. म्हणजे मार्क्सचा भौतिकवाद मान्य केला तरी त्याच्यामध्ये समूह नावाची गोष्ट आहे, समुदाय आहे, त्याचं महत्त्व आहे आणि व्यक्तीपेक्षा काहीवेळेला ते समुदाय आणि त्यातून घडणाऱ्या गोष्टी याला महत्त्व त्या विचारांमध्ये आहे. मग तो समाजवादाचा असेल, मार्क्सवादाचा असेल, साम्यवादाचा असेल. शास्त्रीबुवांनी १९४८ च्या भाषणामध्ये पहिल्यांदा असं केलंय की, आम्हाला आता मार्क्सवादाच्या पलीकडे जायचं आहे आणि पलीकडे जाताना पहिला जर भाग समाजाबद्दलचं जे म्हणणं आहे, मार्क्सवादी, समाजवादी यांच्या व्हिजनमधून त्यातून व्यक्ती मुक्त करायची आहे. एका अर्थानं लिब्रेशन हा शब्द त्यांच्या विचारात आहे. प्रबोधन काळामध्ये व्यक्ती आणि तिच्यावर असणारी बंधनं धर्मापासून मुक्त करण्याची भूमिका होती. व्यक्ती ही मुक्त होईल धर्मापासून आणि

मुक्तपणे व्यवहार करेल. उदारमतवादामध्ये ती मुक्तता, करार स्वातंत्र्य, खाजगी मालकी यांच्याशी मानण्यात आली असली आणि समाजवादामध्ये पुन्हा समूह आणि याचं महत्त्व आहे म्हणून ते असं म्हणतात की आम्हाला जसं त्या काळातील धर्मापासून मुक्त होऊन व्यक्ती, व्यक्ती झाली. तसं आतासुद्धा आम्हाला ही व्यक्ती समूहापासून मुक्त करायची आहे. म्हणून शब्द जे त्यांचे असे होते की व्हिजन ऑफ सोसायटी लिबरेटेड फ्रॉम कलेक्टिव्ह ओव्हर इंडिव्हिज्युअल. म्हणजे समुदायाच्या ऐवजी आता व्यक्ती स्वायत्त असेल. समाजवादाचं युग आहे, साम्यवाद आक्रमक आहे. युरोपमध्ये शीतयुद्धाच्या या काळामध्ये आणि साम्राज्याचा लय झालेला आहे. अशा वेळेला मार्क्सवादाच्या मूलभूत भूमिकेला छेद देणारं विधान म्हणजे भाषणच त्यांनी केलेलं आहे. व्यक्ती आम्हाला मुक्त करून तिची स्वायत्तता प्रस्थापित करायची आहे. या अंगाने त्यांनी आपली संबंध राजकीय मांडणी केली. राजकीय दृष्ट्या ते कोठे स्थिर झाले, तर नवमानवतावादाच्याही थोडं पुढे जाऊन सुद्धा त्यांचे रॉयशी मतभेद झालेले आहेत हे ज्ञात आहे. व्यक्ती पूर्ण होणं, स्वतंत्र होणं आणि तिच्याच हातात राज्यकारभाराची सूत्रं असणं, मग पक्षपद्धती वगैरे हा सगळा भाग त्यांच्या विवेचनात आहे. तिथे मग व्यक्तीचं सार्वभौमत्व, व्यक्तीची स्वायत्तता, व्यक्ती हीच सगळ्या गोष्टींचं मानदंड, व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा विस्तार असणारी रचना आणि सतत विस्तार करणारी रचना हीच प्रगती या प्रकारची भूमिका राजकीय क्षेत्रात त्यांनी घेतलेली आहे आणि ती जवळपास पुढे कायम राहिलेली आहे.

नंतरच्या एका लेखामध्ये लोकशाहीची मीमांसा त्यांनी वेगळी मांडणी आहे. त्याच्यात ते असं म्हणतात. पहिल्या भूमिकेतील काही भाग त्यांनी ठेवला की पक्ष हे शक्यतो नकोत आणि पक्षामधून जे होतं ते पक्षाचे बॉसेस निर्माण होतात, केंद्रीकृत यंत्रणा निर्माण होते, सामान्य कार्यकर्ता आणि पक्षश्रेष्ठी यांच्यात नेहमीच अंतर पडतं. पुन्हा नागरिकांना राज्यकारभारात या लोकशाहीमध्ये काही वाव मिळत नाही. या प्रकारची एक भूमिका त्यांनी नंतरच्या काळातही मांडलेली आहे. त्यासाठी मग कोणत्या प्रकारचं मॉडेल स्वीकारावं हे पुन्हा तिथे संदिग्ध राहिलेलं आहे. म्हणजे जे. पीं. नी लोकसमित्या आणि त्यांचा आग्रह धरण्याचा काळ हा १९७४ ते ८० च्या दरम्यानचा आहे आणि त्या काळामध्ये शास्त्रीबुवा व्यवस्थित सक्रिय आणि विचार करण्याच्या पूर्ण क्षमतेचा अवस्थेत होते. पण याची दखल

त्यांच्या लेखनात कुठे काही दिसत नाही. लोकसमित्यांचं काय करता येईल किंवा आपण ज्याला व्यक्तीच्या हातामध्ये राज्ययंत्रणा द्यायची म्हणतो ती राज्ययंत्रणा नियंत्रणात कोणत्या पद्धतीने देता येईल याचं काही विश्लेषण आणि विचार त्यांच्या विवेचनात आढळत नाही.

भारताच्या प्राचीन ग्रामसंस्थांमध्ये जसं टागोरांनी म्हटलं होतं एके काळी की लोकांच्या हातात सगळा कारभार होता. म्हणजे शाळा असेल, शिक्षण असेल, व्यवस्था असेल आणि हे सगळं राज्याच्या ताब्यामध्ये गेलं. ब्रिटिश आल्यानंतर वसाहतवादाच्या काळामध्ये आणि राज्य आणि लोक असं अंतर निर्माण झालं आणि एक टागोरांची मांडणी या संदर्भात होती. त्याचीपण दखल याच्यात घेतली नाही. स्वदेशी समाजाचे निबंध वगैरे आहेत टागोरांचं ते शास्त्रीबुवांना मार्क्सवाद स्वीकारल्यानंतरच्या काळामध्ये उपलब्ध झालेले असणार. अनेक गोष्टी त्या काळात उपलब्ध होत्या, पण त्यांच्याकडून त्या पाहिल्या गेल्या नाहीत की काय अशी शंका यावी. अशीच शंका टागोरांच्या बाबतीत आपल्याला घेता येते.

चिकित्सा त्यांनी केली आहे परंपरेची आणि त्याच्यात धर्मसुधारणेचं आंदोलन, जातीसंस्था, जातिसंस्थेचा निमित्ताने निर्माण झालेले प्रश्न या सगळ्या गोष्टी त्यांनी आणलेल्या आहेत. एरवी ऋजू वाटणारे शास्त्रीजी चिकित्सेच्या बाबतीत परखड आणि थोडेसे आक्रमक (आक्रमकतेला मर्यादा आहेत.) पण ते आक्रमक केव्हा होतात, तर ब्राह्मणेतर चळवळीची मीमांसा करताना. 'ज्योती-निबंधा'मध्ये त्यांची जी भूमिका आलेली आहे ती फुल्यांना सपोर्ट करण्याचीच. फुल्यांची भूमिकाच ते योग्य ठरतात कालांतराने, पण ब्राह्मणेतर चळवळीचा मृत्यू किंवा ती कशामुळे लयाला गेली त्याच्यात एक कारण त्यांनी असे दिलं आहे की जातिनिष्ठा, सत्ताकांक्षा आणि सरकारी पदं या गोष्टींनी ब्राह्मणेतर चळवळीचे पुढारी सगळे बहकलेले होते आणि त्यांना काँग्रेस पक्षाने, राष्ट्रीय चळवळीने त्या वेळच्या, गिळलेलं आहे आणि दुसरं विधान त्यांनी असं केलं की राष्ट्रीय चळवळीने ब्राह्मणेतर पुढारी सगळे गिळले.

भांडवलदार आणि जमीनदार यांना संरक्षण देणारी ही राष्ट्रीय चळवळ असल्यामुळे या चळवळीने खोटा भ्रम निर्माण केला. याचा एक संदर्भ फुल्यांनी १८८५ ला ज्या पद्धतीने एक विवेचन केलं होतं की, काँग्रेसचा आणि सामान्य शेतकरी पूर्वी क्षुद्र माणसाचा या अर्थानं काही संबंध नाही. ते कदाचित त्यांच्या डोळ्यांसमोर आहे आणि तेच विधान जवळपास

ज्योती-निबंध १९३५-३६ च्या दरम्यानचे आहेत त्यात ते करतात. यामुळे राष्ट्रीय चळवळ म्हणजे सत्तासंक्रमणाची चळवळ आहे आणि ब्राह्मणेतर हे त्याच्यामध्ये सामील झाल्यामुळे त्या चळवळीचा नाश झालेला आहे आणि ब्राह्मणेतरांना आपल्या अनुयायांमध्ये मानवी हक्क, मानवी समता, स्त्री-पुरुष स्वातंत्र्य, समता यातील कुठलाही मुद्दा खोलवर पोहोचवता आला नाही अशी त्यांची तक्रार आहे. आता या तक्रारीशी सहमत व्हायला काहीच हरकत नाही. पण इथे दुर्लक्ष शास्त्रीजींचे झाले. त्यामुळे ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ आणि ब्राह्मणेतर हा शब्द वापरत असताना काळामधला एक संदर्भ कलियुगाचा आहे. त्यामुळे ब्राह्मण सोडून उरलेले सगळे शूद्रातिशूद्र आहेत म्हणून ते ब्राह्मणेतर या पद्धतीने पाहिले गेले जरी असले तरी ब्राह्मणेतरांमध्ये असणारे हे वर्गीय अंतर्विरोध आहेत, उतरंड त्याच्याकडे शास्त्रीजींचे दुर्लक्ष झालेले आहे असे मला स्वतःला वाटतं. काँग्रेसमध्ये ही मंडळी गेली नसती तर काय झालं असतं?

ब्राह्मणेतर पक्ष अस्तित्वात आलेला होता. १९१९ साली मॉन्टेग्यू चेम्सफर्डच्या सुधारणांनी ब्राह्मणेतरांना राखीव जागा मिळालेल्या होत्या, त्या जागेवर मराठ्यांनी निवडणूक लढवावी. वि. रा. शिंदेंनाही आग्रह झालेला होता की राखीव जागेवर तुम्ही उभे राहा. शिंदे म्हणाले की, मी राखीव जागेवर उभा राहणार नाही कारण मराठ्यांना राखीव जागा देऊ नयेत ही माझी भूमिका आहे. त्यामुळे मी मराठा नसलेला मराठा आहे असं म्हणून ते खुल्या जागेवरून निवडणुकीला उभे राहिले आणि पराभव त्यांच्या पदरात पडला. पण ब्राह्मणेतरांना राखीव जागा मिळालेल्या असल्यामुळे शिंदे काही म्हणाले काय किंवा राष्ट्रीय चळवळीत ही मंडळी गेली नसती तरी ब्राह्मणेतर पक्षाचं राजकारण सुरू झालेलं होतंच. या राजकारणाची मर्यादा केव्हा दिसली असती ज्या वेळेला १९३५ च्या पुढे ४६च्या त्या काळामध्ये काँग्रेस हाच पक्ष म्हणजे काँग्रेसची चळवळ त्या काळातील हीच सत्ताधारी होणार होती हे सगळ्यांना माहिती होतं. म्हणून केशवराव जेधे यांना वि. रा. शिंदे सतत हे आग्रह करत आहेत. तर्कतीर्थ म्हणाले तसं काँग्रेस ही केवळ शेतकरी माणसांची चळवळ नाही ती शेतकरी कामकऱ्यांची चळवळ होऊ शकत नाही हे जरी खरं असलं, तरी काँग्रेसमध्ये ते पोटेन्शियल असल्यामुळे शेतकरीसमाजाने काँग्रेसमध्ये जाऊन काँग्रेसचा ताबा आपल्याकडे घ्यायला पाहिजे ही शिंद्यांची पोझिशन होती आणि त्या सल्ल्यानुसार जेधे आणि ही मंडळी राष्ट्रीय चळवळीत गेलेली

आहेत. म्हणजे एका अंगाने ही रणनीती आहे. सरसकट या पुढाऱ्यांना गिळलं असं म्हणणं हे मला थोडं अतिरंजीत वाटतं. त्या विश्लेषणाशी मी त्या अर्थानं सहमत नाही आहे. पुढे ब्राह्मणेतर चळवळीतील प्रबोधनाचं पर्व बंद पडलं. सत्तेत एकदा गेल्यानंतर हे होणार. हे त्यांचंच बंद पडलं असं नाही तर स्वातंत्र्योत्तर काळात समाजप्रबोधनाकडे सगळ्याच राजकीय पक्षांनी दुर्लक्ष केलेलं आहे ही गोष्ट नाकारता येत नाही.

त्यामुळे सत्ताकारण समोर दिसत असताना आणि ब्राह्मणेतरांच्या अंतर्गत वर्गीय आणि समाजाच्या जातीच्यासुद्धा दरी स्पष्ट असताना ब्राह्मणेतर हा एकसंध असा गट आहे आणि तो समतेचं राजकारण करेल, हे गृहीत धरायचं, त्याही काळामध्ये काही कारण नव्हतं. त्यातल्या वरिष्ठांना काँग्रेसमध्ये जाणं सोयीचं असल्यामुळे, जाणं आवश्यक असल्यामुळे ते आज ना उद्या घडणार होतं. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीच्या काळात जे घडलं ते निदान राष्ट्रीय चळवळीचा विस्तार आणि व्याप हा निदान शेतकरीसमाजापर्यंत आणि खालच्या समाजापर्यंत गेलेला तरी दिसतो. म्हणजे या चळवळीच्यामध्ये त्यांच्या जाण्याने काही घडलं नाही असं काही म्हणता येत नाही. एका अर्थानं राष्ट्रसभेचे एकेरी विश्लेषण त्यांच्या लेखनात दिसतं. हे करताना त्यांच्यावरचा मार्क्सचा प्रभाव थोडाफार शिल्लक आहे असं मला वाटतं, कारण १९३७ ला रॉय भेटले आणि त्याच्यानंतर मार्क्सवादाबद्दलचं त्यांचे वेगळे म्हणणं चालू झालेलं आहे.

दुसरं एक त्याचं गृहीत त्यांच्यामध्ये असा आहे की, राष्ट्रीय चळवळ ही चालू समाजरचनेला कायम ठेवण्याच्या भावनेवर चालू होती हे विधानसुद्धा मला अतिव्याप्त वाटतं. कारण, तर्कतीर्थांनी स्वतः गांधीजींना अस्पृश्यता निर्मूलनाच्या संदर्भामध्ये काय सल्ला दिला हे सर्व जण जाणतात. पण त्यांची एकंदर भूमिका जी आहे सबंध ती लक्षात घेता आणि त्यांनी गांधींचा काळ सक्रिय दृष्ट्या पाहिलेला आहे गांधींबरोबर राहून. गांधीजींनी जेव्हा काँग्रेसचा ताबा घेतला तेव्हा त्याच्यानंतर काही महाराष्ट्रातील द्वंद्वं होती त्याचं थोडंसं विरेचन का होईना गांधीजींच्या नेतृत्वाच्या खाली झालेलं आहे. म्हणजे जहाल-मवाळ असेल, सामाजिक की राजकीय असेल या प्रकारचे अंतर्विरोध गांधीजींच्या नेतृत्वाखालच्या राजकारणामध्ये बाजूला पडलेले दिसतात. सामाजिक प्रश्न हा राजकारणाच्या पटलावर येणे ही गांधीयुगात सुरुवात झालेली गोष्ट आहे. स्वतः वि. रा. शिंद्यांनी १९१८ ला अस्पृश्यतेबद्दलचा ठराव मांडला आणि काँग्रेसच्या पटलावर

तो ठराव पहिल्यांदा आला. ही गोष्ट खरी आहे की काँग्रेसने हे सगळं स्वीकारले असलं तरी प्रत्यक्ष काँग्रेसचे कार्यकर्ते बाबासाहेब म्हणाले तसं त्या कार्यकर्त्यांची सगळी घडण, त्यांचं समाजातील स्थान, त्यांच्या समाजामध्ये त्यांना असणारी किंमत यामुळे याचा वेग अतिशय मंदच राहणार होता याबद्दल काही वाद आहे असं मला वाटत नाही. पण राष्ट्रवादाचं जे प्रतिमान तर्कतीर्थांच्या काळात गांधीजींच्या नेतृत्वाखाली जे प्रचलित होतं ज्याचा उल्लेख की मघाशी झाला ते प्रतिमान काही काँग्रेसपेक्षा वेगळे नव्हतं आणि काँग्रेसचं प्रतिमान हे साम्राज्यवादाला विरोध, तत्त्वतः शोषणाला विरोध, त्याचबरोबर व्यक्तीचे मूलभूत हक्क, स्वातंत्र्य म्हणजे आपण १९१९ नंतरच्या सुधारणांच्या हप्त्याकडे वळलो, १९२८ नेहरू रिपोर्ट, १९३१ कराची काँग्रेसचा, १९३५चा गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचा कायदा इथपर्यंत आपण जर पाहिलं तर जवळपास आता जी राष्ट्रवादाची भूमिका मांडतो. भारतीय राष्ट्रवादाची म्हणून तीच भूमिका राष्ट्रीय चळवळीने त्या काळात घेतली होती. आणि ती भावनेवर आधारलेली होती असं मला वाटत नाही. ती जाणीवपूर्वक घेतलेली होती आणि ती एकोणिसाव्या शतकापासून घेतली गेलेली आहे. उदाहरणार्थ, भारतीय कोण? असा जर प्रश्न या काळात केला गेला असता; आता पाकिस्तान व बांगला देश वेगळे झालेले आहेत ही गोष्ट वेगळी. पण त्या काळात भारतीय कोण असा प्रश्न केला गेला असता तर त्याचे उत्तर राष्ट्रसभेने काय ठरवलं होतं तर भारताच्या सर्व हद्दीत राहणारे सगळे भारतीय आहेत. भारतीय नावाची एक आयडेंटिटी धर्म, जातीच्या व भाषेच्या पलीकडे जाऊन उभी केली होती. प्रांत आणि भाषेच्याही वर जाऊन उभी केली होती. त्याच्यामुळे आम्ही भारतीय असल्यानंतर हिंदू असेल, बंगाली असेल, महाराष्ट्रीय असेल या प्रकारच्या दुय्यम आयडेंटिटी खाली आणि प्रधान आयडेंटिटी म्हणून भारतीयत्वाची ठेवली होती. चालू समाजरचना जशीच्या तशीच चालू ठेवायची हा जर राष्ट्रीय चळवळीचा उद्देश असता तर त्या चळवळीतून पुढे संविधान निर्माण झालेलं आहे, हे विसरता येत नाही. संविधानाच्या वेळेलासुद्धा संविधान करायला जेव्हा लोक बसले त्या वेळेला लोकशाही की हुकूमशाही याची चर्चाच झालेली नाही. संसदीय लोकशाही की अध्यक्षीय लोकशाही येथून चर्चेला सुरुवात झाली. म्हणजे भारतीय राष्ट्रबांधणीची दिशा, भारतीय राष्ट्रवादाची दिशा एकाच वेळेला भारतीयत्व

सेक्युलर असणं आणि भारतीय राष्ट्र लोकशाहीच्या पायावर उभं करणं या दोन्ही गोष्टी अभिन्नपणे त्याच्याशी जोडल्या गेलेल्या आहेत. हे जर अभिन्नपणे जोडलं गेलं असेल, तशा पद्धतीने राष्ट्रीय चळवळ चालत असेल तर आहे ती समाजरचना तशीच ठेवून याच्यामध्ये काँग्रेसमधल्या काही गटांचा, वरिष्ठांचा हितसंबंध असू शकतो पण उद्दिष्ट म्हणून, भूमिका म्हणून ज्या संविधानामध्ये तिचं रूपांतरण झालं त्याला भावनेच्या आधारे ही गोष्ट चाललेली आहे हे म्हणता येईल की नाही याबद्दल मला शंका आहे. शास्त्रीजींशी तिथे आपण सहमत होऊ शकत नाही.

त्यांनी जी मूलगामी लोकशाहीची कल्पना मांडलेली आहे त्या कल्पनेचा तपशील आणि विस्तार त्यांनी पुढे कुठे केलेला नाही. उलट माझी आठवण थोडीशी पुसट आहे. एस. एम. जोशींना ६० वर्षे झाली. एक गौरव ग्रंथ निघाला होता. त्यात संसदीय लोकशाहीमध्ये सत्याग्रहाला स्थान नाही अशा आशयाचं त्यांचं विवेचन मला पुसटसं आठवतं. साल १९६४-६५ च्या दरम्यानचं आहे. म्हणजे नंतरसुद्धा लोकशाहीचे मॉडेल त्यांच्यासमोर आहे ते संविधानावर बेतलेलं मॉडेल आहे. मग आता मूलगामी लोकशाही जर म्हणायचं असेल तर मूलगामी आणि लोकशाहीचा विस्तार कसा करायचा, नागरिकांना राज्ययंत्रणेत हक्क मिळतील याचा रचना काय करायच्या याबद्दल त्यांच्या विवेचनात याबाबत त्यांच्या विवेचनात पूर्णतः संदिग्धता आपल्याला दिसते.

शास्त्रीबुवांच्या सबंध वैचारिक, राजकीय प्रवासामध्ये पंडित असणं, आधुनिक विचारवंत असणं, राजकीय कार्यकर्ता असणं, राजकीय कार्यकर्तेपण संपल्यानंतर प्रबोधनकार म्हणून उरलेला आयुष्य जगणं हे चार टप्पे आपल्याला सरळ सरळ दिसतात. कुठल्याही सामाजिक काम करणाऱ्यांना रोष हा पत्करावा लागतो. तसाच शास्त्रीजींना पत्करावा लागला. धर्मसुधारणांच्या वादविवादामध्ये सनातनी लोक त्यांच्यावर रुष्ट झालेले होते. १९४६ साली त्यांनी रॅडिकल डेमोक्रॅटिक निवडणुकीत विठ्ठलराव जगताप वाईचे गृहस्थ होते. ते रॉयवादी होते आणि ते निवडणुकीला उभे होते आणि त्यांचा प्रचार स्वतः शास्त्रीजी करायला पाचवड जवळील आनेवाडी गावात आल्यावर तिथे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या सभेवर हल्ला केला. शास्त्रीजींना जबरदस्त मारहाण झाली. हाही एक त्यांना सहन करावा लागलेला भाग आहे. मंडल आयोगाचा उल्लेख त्यांच्या कन्येने जे चरित्र

लिहिलेले आहे त्यात मंडल आयोगाबद्दल त्यांचे मतभेद नोंदले होते. त्याही वेळेला पुरोगाम्यांची नाराजी त्यांना पत्करावी लागली होती. 'रिडल्स'च्या वेळेलासुद्धा त्यांची जी मुलाखत लोकसत्ताने छापलेली होती. त्याच्यात त्यांचा आंबेडकरांवरही आक्षेप असा होता की आंबेडकरांनी मूळ संस्कृत ग्रंथ वाचले नसल्यामुळे 'रिडल्स'मधले त्यांचे जे आक्षेप आहेत ते त्या त्या ग्रंथात कुठे व कसे आहेत आणि त्याचं निराकरण करणं कसं करता येतं हे आंबेडकरांकडून झालेलं नाही. त्याच्याबद्दलची नाराजी त्या काळात प्रकट झाली आणि पुन्हा अरुण कांबळेंनी जेव्हा 'रामायणातील संस्कृती-संघर्ष' नावाचं एक पुस्तक लिहिलं आणि शास्त्रीजींशी वादविवाद त्या वेळेला केलेला आहे.

शास्त्रीजींचं प्रबोधक भूमिकेचं मूल्यांकन करायचं झालं तर काय सांगता येईल? तर मला असं दिसतं की, परिवर्तनाच्या चळवळीला पूरक असणारे धर्मशास्त्राचे संदर्भ पुरवणे हा एक मोठा त्यांच्या अस्तित्वाचा लाभ, मार्गदर्शन सामाजिक चळवळींना झालेला आहे. त्यामुळे परंपरेची चिकित्सा एखादी पद्धत, प्रथा कशी धर्मशास्त्रात आली हे समजावून घ्यायचं असेल कार्यकर्त्यांना तर त्यांच्या शिबिरांचा उपयोग झालेला आहे. अनेकदा पूर्वी विषमता निर्मूलनाची शिबिरं सुरू झाली. बाबा आढावांच्या प्रेरणेतून त्याच्यामधेसुद्धा काही शिबिरांमध्ये शास्त्रज्ञांचं मार्गदर्शन प्रबोधनाच्या इथल्या या चळवळीला उपयोगी पडलेलं दिसतं.

शास्त्रीजींची विचारपद्धती बघायची झाली तर ती कुठेही द्विध्रुव केंद्री किंवा बायनरीज ज्याला म्हणतो आपण या पद्धतीनं शास्त्रीजी विचार करत नाहीत. हिंदू शब्द आपण वापरला समजा तर हिंदू या शब्दाची अधिक चिकित्सा आणि वैदिक आहे का वैदिकेतर आहे, या पद्धतीची चिकित्सा शास्त्रीजी करत नाहीत. ती त्यांची पद्धत नाही. खरंतर धर्मशास्त्राच्या सगळ्या त्यांच्या अध्ययनामध्ये पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष या पद्धतीच्या मांडणीमधून आणि खंडन-मंडनातून ते गेलेले आहेत. पण पुढच्या लेखनामध्ये काही या पद्धतीची मांडणी आढळत नाही. दुसरं म्हणजे त्यांचं महत्त्वाचं लेखन हे १९७० सालच्या आतील आहे. १९७० सालानंतर फारसं मूलभूत असं लेखन विश्वकोशातील, धर्मकोशातील नोंदी वगळता फारसं आपल्याला दिसत नाही. त्यांनी मार्क्सवादावर आक्षेप घेताना असं म्हटलं होतं की, नवीन येणारं विज्ञान सामाजिक शास्त्र आणि विशेषतः निसर्गविज्ञान याच्या संबंधांमध्ये माणसाविषयाचं जे आकलन आहे ते आपण अद्ययावत करून

घ्यायला पाहिजे. आणि ते मार्क्सच्या विचारात कसं दिसत नाही मग डार्विनचं आणि त्याच्याबद्दलचं काही म्हणणे त्यांनी मांडलेलं होतं. पण तीच गोष्ट त्यांच्याकडून सत्तरीच्या कालखंडानंतर घडली नाही. विशेषतः मानववंशशास्त्र, ह्यूमन बायोलॉजी असेल अशा अनेक गोष्टी आलेल्या नव्या संशोधनाचा भाग आहे तो काही त्यांच्या लेखनातून आला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक विषमतेच्या संघर्षात कुठेही त्यांची सक्रिय उपस्थिती दिसत नाही. जसं पंढरपूरला यज्ञ झाला होता तेव्हा काहींनी त्यांना विनंती केली होती. गं. बा. सरदार वगैरे त्यात होते किंवा आणीबाणीत आमच्याशी संवाद करीत असताना त्यांना तुमच्यासारख्यांनी पुढाकार घेतला आणीबाणीत सत्याग्रहाला, तर त्यांना एक नैतिक बळ मिळेल असे विचारल्यावर त्यालाही त्यांनी काही पॉझिटिव्ह उत्तर दिलं नाही. त्यांनी त्यांचं म्हणणं फक्त सांगितलं ते असं की भारतातील एका प्रचंड मोठ्या वर्गाला आज भाकरीची गरज आहे आणि तो ब्रेड आणि बटरसाठी इंदिराजींच्या मागे आहे तेव्हा तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी तो लढाईमध्ये तुमच्या बाजूने असणार नाही. हे सांगण्याचा मथितार्थ सत्याग्रहाचा उपयोग होणार नाही किंवा दुसरा भाग असा असेल की हे जे काही आणीबाणीचं संकट आहे हे कमी कालावधीची असू शकेल. हे आज आहे उद्या नसेल अशा पद्धतीचे उत्तर आम्हाला त्यांच्याकडून मिळालं.

दुसरं मला दिसतं की मार्क्सिझम असेल, सोशॅलिझम असेल, रॉयिझम असेल, गांधीवाद असेल या सगळ्या विचारधारा त्यांनी खूप तपशिलाने अभ्यासल्या होत्या. धर्मशास्त्र अभ्यासलेलं होतं, परंतु तत्त्वज्ञ होण्याची क्षमता असूनही एका नव्या दर्शनाची निर्मिती काही लोक त्यांच्याकडून होऊ शकली नाही. त्यांच्याच काळामध्ये जावडेकरांनी एक प्रयत्न केला मार्क्सवाद आणि गांधीवादाच्या समन्वयाचा. त्यांच्याच कालखंडात शरद पाटलांनी मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवादाचं नव दर्शन मांडण्याचा प्रयत्न केला. अशा कुठल्याही दर्शनाची निर्मिती त्यांच्याकडून झालेली नाही. आता वैशिष्ट्य काय राहतं तर परंपरेचा खूप अभ्यास करून, परंपरेवर चिकित्सा करून ते परंपरावादी झाले नाहीत, मार्क्सचा प्रभाव पडूनही मार्क्सवादी झाले नाही, गांधींचा बौद्धिक आणि नैतिक प्रभाव माझ्यावर आजही आहे असे म्हणून ते गांधीवादी झाले नाहीत. रॉय यांचा प्रभाव पडूनही ते पूर्ण रॉयवादी झाले नाहीत. ही प्रतिमा राहिली महाराष्ट्रामध्ये पण

रॉय यांच्याशीही त्यांचे मतभेद झाले होते. परंतु या सगळ्यांमध्ये त्यांनी आपलं बौद्धिक स्वातंत्र्य व्यक्ती म्हणून अबाधित राखल्याचं दिसतं.

दुसरं म्हणजे महाराष्ट्रात शास्त्रीजींची चिकित्सा झालेली नाही. याचं एक कारण महाराष्ट्राच्या भौतिक परंपरेमध्ये आहे असं माझं मत आहे. हे कदाचित खोटं असेल, चुकीचं असेल पण मला गेल्या ३० -४० वर्षांच्या अनुभवावरून असं दिसतं की ज्यांचा बौद्धिक विश्वामध्ये दरारा आहे त्यांची चिकित्सा करायची नाही असा काही नियम आहे की काय कोणास ठाऊक. शास्त्रीबुवांची झाली नाही, मे. पुं. रेग्यांची झाली नाही, कुरुंदकरांची आता आता होऊ लागलीय.  ही दरारा असणारी मंडळी आहेत त्या अर्थानं पण यात यांची चिकित्सा झाली नाही. शास्त्रीबुवांच्या काळात किमान-पक्षी के. एल. दप्तरी असतील, भगवानदास असतील, आनंद शंकर ध्रुव असतील, पां. वा. काणे असतील; सिद्धेश्वरशास्त्री चित्राव असतील, तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे असतील अशी संस्कृतमध्ये मुरलेली आणि धर्मशास्त्र कोळून प्यायलेली मंडळी त्यांच्याबरोबर असल्यामुळे त्यांच्या त्यांच्यामध्येच चिकित्सा व संवाद झालेले आहेत. नंतरच्या काळात एका बाजूने विद्यापीठीय क्षेत्रात स्पेशलायझेशनचे युग आलं. त्यामुळे मराठी विचारविश्व समग्रतेपासून एका अंगाने बाजूला गेलं. छोटे विषय घेणं, त्याचा तपशील मांडणं, त्याचे अभ्यास मांडणे याच्यामध्ये आपण जास्त गुंतलो आणि सामान्यतः संस्कृत विषय दुर्लक्षित राहिल्यामुळे संस्कृत आणि पाली या भाषांमध्ये तज्ज्ञता मिळवून सबंध परंपरेचं पुनर्मूल्यांकन करण्याचं आव्हान देणारं असंही कुणी फार्स निर्माण झाल्याने झालं नाही. ते होण्यासाठी आपल्याला शरद पाटील आणि आ. ह. साळुंखे यांची वाट पाहावी लागली इतकी मधल्या काळात गॅप आहे. गॅप आहे म्हणजे लोक नसतील असं नाही. माझा मुद्दा हा की, जी गॅप आहे ती चळवळीशी जोडलेल्या अशा प्रकारच्या विद्वानांची. आणि म्हणून मग त्यांची चिकित्साच झाली नाही आणि चिकित्सा न झाल्यामुळे त्यातले काय ग्राह्य काय नाही याचीपण चिकित्सा झालेली नाही.

पूर्व आणि पश्चिमेच्या वैचारिक विश्वाचं सूक्ष्म (व प्रचंड व्यासंगी) आकलन, अफाट बौद्धिक कुवत व मान्यता असूनही शास्त्रीजी दार्शनिक होऊ शकले नाहीत. नवदर्शन त्यांनी उभं केलं नाही. ते महाराष्ट्राच्या दृष्टीने पंडितच राहिले.

**संदर्भित पुस्तके**

१ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी-लेखसंग्रह (खंड-एक) श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८२.

२ भारत : राष्ट्राच्या उभारणीची प्रक्रिया - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी केशव गोरे स्मारक ट्रस्टतर्फे झालेली दोन व्याख्याने १-२ फेब्रुवारी १९८३.

३ Swimming Upstream : Lak*shman Shastri Joshi and the evolution of modern India* - Arundhati C. Khandkar, Ashok C. Khandkar, Oxford Publication, 2019.

४ मे. पुं. रेगे - तर्कतीर्थांची दीर्घ मुलाखत.

■

*तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ऑनलाईन व्याख्यानमालेतील भाषण, शुक्रवार, दि. २८ जानेवारी, २०२२.*

# परिशिष्टे

## परिशिष्ट क्र. १

## पद्मविभूषण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट

| | | |
|---|---|---|
| • संपूर्ण नाव | - | लक्ष्मण बाळाजी जोशी (आबा) |
| • वडिलांचे नाव | - | बाळाजी कृष्ण जोशी तथा बाळंभट |
| • आईचे नाव | - | चंद्रभागाबाई |
| • वडिलांचा व्यवसाय | - | वेदाध्यायन व याज्ञिकी, भिक्षुकी |
| • मूळगांव | - | पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे |

| | |
|---|---|
| १९०१ जन्म | : २७ जानेवारी १९०१, शुक्ल यजुर्वेदांतर्गत माध्यंदिन शाखा. |
| १९०७-१० | : द्विजसंस्कार व प्राथमिक शिक्षण १ ते ३ इयत्ता जि. प. प्राथमिक शाळा, पिंपळनेर. |
| १९१४ | : पंडित व शास्त्री होणे ही महत्त्वाकांक्षा उराशी बाळगून ०२-०२-१९१४ रोजी संस्कृत अध्ययनास वाईत आगमन. आचार्य श्री. नारायणशास्त्री मराठे यांच्या 'प्राज्ञमठ' या संस्कृत पाठशाळेत (गंगापुरी, वाई) व गुरुकुल परंपरेत अध्ययनास सुरुवात. |
| १९१४ | : १७ व्याकरण, न्याय पूर्वमीमांसा वेदान्त अभ्यासपूर्ण. १९१७ मध्ये लोकमान्य टिळकांची प्राज्ञपाठशाळेस भेट. प्राज्ञपाठशाळेत 'शांकरभाष्य' शिकण्यास आलेले श्री. विनोबा भावे यांचेकडे बडोदे येथे पळून जाऊन इंग्रजी भाषेचा प्राथमिक अभ्यास. |
| १९१८ | : १९२१ प्रथम टिळक, चिपळूणकर यांचा प्रभाव फार होता. केसरीचे नियमित वाचन. पुढे आगरकरांचे निबंध वाचल्यानंतर आधुनिक शिक्षण घेणे विनोबांच्या सल्ल्यामुळे आवश्यक वाटले. न्यायशास्त्राच्या विशेष अभ्यासासाठी काशी (वाराणसी) येथे गमन. म. गांधी यांची पाठशाळेस भेट (१९२०). |
| १९२२ | : कलकत्त्याच्या शासकीय महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही संस्कृत ज्ञानशाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण. |

१९२५ : १५.५.१९२५ रोजी कै. रा. ब. कृ. चितळे यांच्या अध्यक्षतेखाली कर्मवीर वि. रा. शिंदे यांचे 'ब्राह्मण तर ब्राह्मणेर ऐक्य' या विषयावर वाईत वसंत व्याख्यानमालेत परिणामकारक भाषण.

१९२० ते १९३० : १) प्राज्ञपाठशाळेतील अध्यापनाची वर्षे (पगार रु. चाळीस) न्याय, मीमांसा, वेदान्त, अलंकारशास्त्र या विषयाचे अध्यापक.

२) याच काळात आधुनिक मराठी साहित्याचे वाचन व अभ्यास.

३) १९२६ मुल्हेर येथील वासुदेवबुवा पंड्तित यांची कन्या कावेरी हिजबरोबर विवाह. लग्नानंतरचे नांव सौ. सत्यवती.

४) १९२५ - 'धर्मकोशाचे' कामकाज स्वामी नारायणशास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली सुरू.

५) १९२७ - ''तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी'' परिषदेची स्वामींच्या अध्यक्षतेखाली स्थापना.

६) १९१६ पासून राष्ट्रीय शिक्षणाची प्राज्ञपाठशाळेत सोय केल्यामुळे त्यातून तयार झालेले विद्यार्थी पुढे १९३० मध्ये स्वराज्यासाठी म. गांधीप्रणीत चालू झालेल्या कायदेभंगाच्या चळवळीत कार्यकर्ते म्हणून बिनीचे शिपाई सामील झाले. तर्कतीर्थांना कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्यामुळे अटक (१९३०). तुरुंगात असतानाच वडील बाळंभट यांचे निधन. द्वा. भ. कर्णिक यांची तुरुंगात ओळख. तेथे 'मार्क्स'चे तत्त्वज्ञान वाचनास प्रारंभ.

१९३१ : १) पाश्चात्त्य वैचारिक इंग्रजी साहित्यातील बकल, स्पेन्सर, मिल, तॅन, लोट्स, सिग्व्हार्ट या लेखकांच्या पुस्तकांचा खोलवर अभ्यास व वाचन.

२) रत्नागिरीस स्वातंत्र्यवीर सावरकरांची स्थानबद्धतेत असताना भेट. क्रांतिकारकांच्या आत्मसमर्पण भावनेमुळे प्रभावित.

१९३१ : गु. श्री. नारायणशास्त्री मराठे यांनी मतभेदामुळे संन्यासाश्रम स्वीकारून स्वामी केवलानंद सरस्वती असे नामाभिधान

स्वीकारले. (स्वामींच्या मते, माध्यमिक शिक्षणाची शाखा उच्च संस्कृत शिक्षणाला बाधक ठरत आहे. ती बंद करावी असे होते.) तर्कतीर्थांच्यावर प्राज्ञपाठशाळेची सर्वार्थाने जबाबदारी. शास्त्रीजी प्राज्ञपाठशाळेचे मुख्य कार्यवाह बनले.

१९३२ : कायदेभंगाच्या चळवळीतील सहभागामुळे पुनरपि अटक व सुटका (धुळे). तुरुंगात सेठ जमनालाल बजाज, गुलजारीलाल नंदा, विनोबा भावे, साने गुरुजी, अण्णासाहेब दास्ताने, भय्यासाहेब मुधोळकर यांचा सहवास.

१९३३ : १) अस्पृश्यतानिवारणा समर्थनार्थ शास्त्रार्थ करण्यासाठी येरवडा जेलमध्ये म. गांधींचे बोलावणे. शास्त्रार्थासाठी गुरु केवलानंद, डॉ. भाऊजी दप्तरी, म. म. पाठक यांच्यासह उपस्थित.

२) गुरुवर्य स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या नेतृत्वाखाली 'धर्मनिर्णय मंडळाची' स्थापना.

३) म. गांधीचा मुलगा देवदास व राजगोपालाचार्यांची कन्या लक्ष्मी या प्रतिलोम विवाहाचे पौरोहित्य केले.

४) पौरोहित्य केल्याबद्दल वाईत सनातनी (अपरिवर्तनीय) मंडळीकडून विरोध व निषेध सभा.

५) बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांच्या साठाव्या वर्षानिमित्त नारायणराव चव्हाण यांच्या पुढाकाराने वाईत गौरव व सत्कार सभा. तर्कतीर्थांचे स्वागतपर भाषण.

६) सयाजीराव महाराजांची ''धर्मकोश'' कार्यास मोठी देणगी.

१९३४ : १) तर्कतीर्थांच्या सहकार्याने वाई ब्राह्मसमाज (प्रार्थना संघ) यांचा पहिला वार्षिक उत्सव महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी प्राज्ञ पाठशाळेत प्रीतीभोजनात हरिजनांसह सहभोजन झाले.

२) वाई येथील टिळक स्मारक मंदिरात तर्कतीर्थांचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली 'धर्म' या विषयावर भाषण.

३) पत्नी सत्यवतीसह म. गांधींची पुणे येथे भेट. सौ. सत्यवतींनी हातातील एक तोळ्याची सोन्याची अंगठी अर्पण केली.

४) अस्पृश्यतानिवारणासाठी तर्कतीर्थांच्या अनेक ठिकाणी दौरा पंडित मदनमोहन मालवीय यांचा सनातन धर्मपरिषदेमध्ये शास्त्रार्थ.

१९३५ : कार्ल मार्क्सचे सखोल वाचन, एंजल्स, स्टेट, लेलिन वगैरे

१९३६-४० : १) १९२५ पासून सुरू असलेले धर्मकोशाचे कामकाजास संस्थात्मक स्वरूप देऊन धर्मकोश मंडळ स्थापन. तर्कतीर्थ प्रमुख संपादक झाले. धर्मकोशाच्या कामकाजासाठी पुण्यात स्थित्यंतर. ''व्यवहार कांडाचा'' पहिला भाग प्रसिद्ध झाला.

२) पुण्यात वास्तव्य असताना विविध राजकीय पक्ष, सामाजिक व शैक्षणिक संस्था यांच्याशी घनिष्ठ संबंध.

३) तर्कतीर्थांनी शास्त्री पंडिताचा असलेली वेषभूषा दिली (१९३८) ४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट.

१९४० : १) धर्मकोशाच्या छपाईसाठी 'प्राज्ञ प्रेस' ची वाईत निर्मिती. १९४० ते १९८० पर्यंत धर्मकोशाच्या सतरा भागांची बारा हजार पृष्ठांची व गु. स्वामी केवलानंद संपादित मीमांसा कोशाच्या सात भागांची, पाच हजार पृष्ठांची निर्मिती हे या प्रेसचे फार मोठे श्रेय आहे. (धर्मकोशाचे कामकाज अद्याप चालू आहे.)

२) पुणे मुक्कामात तर्कतीर्थांचा सशस्त्र क्रांतिकारक गटाशी संबंध असल्याचा वहीम येऊन पोलिसांची निवासस्थानावर धाड.

३) वाईत पुनरपि स्थलांतर.

४) दुसऱ्या महायुद्धाच्या काळी म. गांधींची असहकार चळवळ व चलेजाव सुरू झाली व युद्धात ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध म. गांधी उभे राहिले. शास्त्रीजींच्या मते, भारताने फॅसिस्ट राजवटीविरुद्ध आणि दोस्त राष्ट्राच्या बाजूने उभे राहिजे पाहिजे.

५) तर्कतीर्थ रॉयवादी झाले. प्रखर बुद्धिवादी मित्रांचा सहवास. म. गांधींच्या व काँग्रेस चळवळींपासून अलिप्त

१९४१ : १) तर्कतीर्थांचे ‘हिंदू धर्मसमीक्षा’ हे मार्क्सवादी दृष्टिकोणातून लिहिलेले पुस्तक प्रसिद्ध झाले.

१९४२ : प्राज्ञपाठशाळेत सर्व जातीचे व वर्गाचे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची प्रथमच प्रथा चालू झाली.

१९४६ : निवडणुकीत रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीतर्फे उभ्या राहिलेल्या उमेदवारांचा काँग्रेसविरुद्ध वादळी प्रचार. त्यांच्या अनेक सभा उधळल्या. खंबीरपणे तोंड दिले.

१९४७ : जोतिराव फुले यांच्या ‘गुलामगिरी’, ‘इषारा’ व ‘सार्वजनिक सत्यधर्म’ या तीन पुस्तकांचा परामर्श घेऊन सार सांगणारा ‘‘ज्योतिनिबंध’’ पुस्तक रा. ना. चव्हाण यांच्या साहाय्याने जेधे मोरे यांच्या उपस्थितीत प्रकाशित झाले. या कृतीने विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी जोतिबावर केलेल्या उपहासात्मक टीकेस चोख उत्तर दिले गेले. सदर पुस्तक म. वि. रा. शिंदे यांच्या स्मृतीस अर्पण केले आहे.

१९४८ : तर्कतीर्थांच्या अध्यक्षतेखाली रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्ष कलकत्ता अधिवेशनांत विसर्जित झाला.

१९५० : विविध वैचारिक उपक्रमात व्याख्याता म्हणून अधिक सहभाग.

१९५१ : सोरटी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या, सनातनी शास्त्री मंडळींच्या विरोधास न जुमानता पौरोहित्य केले. त्या वेळी राष्ट्रपती श्री. राजेंद्र प्रसाद यांनी कलशारोहण केले. गु. स्वामी केवलानंद उपस्थित.

१९५१ : ‘‘वैदिक संस्कृतीचा विकास’’ पुस्तक प्रकाशित.

१९५१ : काँग्रेसने भारतास उत्तम लोकशाही घटना (संविधान) प्राप्त करून दिले म्हणून काँग्रेसबद्दल आपुलकी वाटू लागली. त्यामुळे त्यांचे मित्र यशवंतराव चव्हाण यांच्या निवडणुक प्रचारात त्यांच्या बाजूने प्रचार कार्यात भाग घेतला. काँग्रेसला वैचारिक पाठबळ देण्यास सुरुवात.

१९५३-५४ : १) रा. ना. चव्हाण यांच्या साहाय्याने तयार केलेले ‘‘बहुजन समाजाचा इतिहास’’ ३०० पानांचे लिखाण गहाळ. यास प्रकाशनाचे स्वरूप आले नाही.

२) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्लीचे अध्यक्षपद.

३) गु. स्वामी केवलानंद सरस्वती यांचे बरोबर राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांची भेट.

१९५५ : १) 'नवभारत' मासिक चालविण्यास (१.०३.१९५५) घेतले.

२) गु. स्वामी केवलानंद सरस्वती समाधिस्थ.

१९५६ : १) द्रविडांच्या वाड्यात रविवार पेठेत मागासवर्गीयांसाठी एकलव्य वसतिगृह स्थापन केले.

१९५७ : ''महर्षी शिंदे विद्यामंदिर'' स्थापनेस विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक श्री. बापूजी साळुंखे यांना साहाय्य.

१९५९ : अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा इंदिरा गांधी यांच्या हस्ते केवलानंद सरस्वती मंदिराची कोनशिला. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या काळात काँग्रेसबरोबर राहून द्विभाषिक राज्याचे समर्थन. संयुक्त महाराष्ट्राच्या कार्यकर्त्यांकडून छळ, निंदा व विरोध

१९६० : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबईचे अध्यक्षपद प्राप्त.

१९६२ : केवलानंद स्मारक मंदिर उद्घाटन व मराठी विश्वकोशाच्या कार्यालयाची स्थापना. उद्घाटक राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद. धर्मकोशाचे कार्यालय केवलानंद सरस्वती मंदिरात स्थलांतर. वाईत उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून प्रयत्न करत असलेल्या श्री. बापूजी साळुंखे (स्वामी केवलानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर) यांना यश न मिळाल्यामुळे 'प्राज्ञपाठशाळा मंडळाने' इंग्रजी माध्यमातून उच्च शिक्षण देण्यासाठी कला व वाणिज्य महाविद्यालय सुरू करून गुणवत्तापूर्वक उच्च शिक्षणाचा पाया घातला.

*परदेश दौरे :*

१९६० रशिया

१९६९ सोव्हिएट रशियातील मॉस्को येथे जागतिक धर्मपरिषदेस उपस्थित.

१९७३ पॅरिस येथील 'ओरिएन्टलिस्ट' काँग्रेसला उपस्थित.
१९७७,१९८३,१९९० अमेरिकेचा दौरा.

*देशांतर्गत दौरे :*

१९५० नंतर शेवटपर्यंत अनेक चर्चासत्रे, व्याख्याने, परिसंवाद, सभा, संमेलनांतून परिषद यांच्या माध्यमातून समस्त प्रबोधनाचे समाजशिक्षणाचे कार्य केले. त्यासाठी प्रचंड प्रवास केला. लोकसंग्रह, मोठा मित्र परिवार निर्माण केला.

१९७३ : भारत सरकारचा ''राष्ट्रीय संस्कृत पंडित'' ही पदवी.

१९७५ : अमृत महोत्सव साजरा. मुंबई विद्यापीठाची एल्. एल्. डी. सन्माननीय पदवी प्राप्त.

१९७६ : राष्ट्रपतींच्या हस्ते 'पद्मभूषण' हा किताब.

१९७८ : पत्नी 'सत्यवती' यांचे निधन.

१९८० : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद संपुष्टात व विश्वकोशाचे अध्यक्षपद शेवटपर्यंत त्यांचेकडेच सांभाळले.

१९८९ : १) दिल्ली येथे साहित्य अकादमीची फेलोशिप
२) म. फुले समता प्रतिष्ठानच्या वतीने पुणे येथे सत्कार.

१९९० : १) इचलकरंजी फाय फाऊंडेशनचा राष्ट्रभूषण हा मानाचा किताब, एक लाख रुपये आणि मानपत्र अर्पण
२) राजस्थानचे मुख्यमंत्री ना. भैरवसिंह शेखावत यांच्या हस्ते १ लाख रुपये व मानपत्रे देऊन सत्कार.
३) रा. शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टचा (कोल्हापूर) राजर्षि शाहू पुरस्कार.
४) महाराष्ट्र शासनातर्फे 'महाराष्ट्र गौरव' पुरस्कार एक लाख रुपये व मानपत्र अर्पण.

१९९२ : भारत सरकारद्वारा 'पद्मविभूषण'ने सन्मानित.

१९९४ : २७ मे रोजी क्षेत्र महाबळेश्वर येथे निधन.

(**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : परंपरा, प्रबोधन व परिवर्तन** - रा.ना.चव्हाण/संपा. रमेश चव्हाण या ग्रंथामधून साभार उद्धृत. आधारित परंतु संवर्धित)

# परिशिष्ट - २

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी :
## साहित्य संपदा व संदर्भ ग्रंथ सूची

**• साहित्य संपदा**

**१) आनंदमीमांसा**

मराठी प्रबंध

प्रकाशक : प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई/पुस्तकमाला, पुष्प ६वे

मुद्रक : आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.

प्रथमावृत्ती - १९२८ (शके - १८५०) मूल्य - ६ आणे/पृष्ठे - ७०

**२) शुद्धिसर्वस्वम्**

संस्कृत प्रबंध

प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.

मुद्रक - आर्यसंस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.

प्रथमावृत्ती - १९२८ (शके - १८५०), मूल्य ८ आणे/पृष्ठे - ३७

**३) भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्**

संस्कृत निबंध

प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.

मुद्रक - कर्नाटक प्रेस, ३/८, ए, ठाकुरद्वार, मुंबई.

प्रथमावृत्ती - १९३३/पृष्ठे - १६

**४) जडवाद अर्थात् अनीश्वरवाद**

मराठी प्रबंध

प्रकाशक - य. गो. जोशी प्रकाशन, ६२३/१५, सदाशिव पेठ, पुणे.

वादविवेचन माला, संपादक, श्री. पां. वा. गाडगीळ.

मुद्रक - दि प्राज्ञप्रेस, ३१५, गंगापुरी, वाई (जि. सातारा.)

प्रथमावृत्ती - २० ऑक्टोबर,१९४१/किं.सव्वा रुपया/पृष्ठे - १०३

**५) हिंदुधर्माची समीक्षा**

भाषणसंग्रह

श्री. श्रीधर गणेश परांजपे स्मारक व्याख्यानमाला, नागपूर विद्यापीठ, नागपूर (१९४०), प्रकाशन प्रथम आवृत्ती, ऑक्टोबर,१९४१

प्रकाशक - प्राज्ञशाळामंडळ, वाई/
द्वितीय आवृत्ती, १ मे, १९४२/मूल्य २ रुपये/पृष्ठे - १४०

**६) ज्योति - निबंध**
भाषणसंग्रह
प्रस्तावना - रा. ना. चव्हाण.
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.

**७) वैदिक संस्कृतीचा विकास**
भाषणसंग्रह
श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी व्याख्यानमाला (१९४९)
पुणे विद्यापीठ, पुणे.
प्राज्ञपाठशाळामंडळ ग्रंथमाला.
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.
मुद्रक - दि प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा
प्रथमावृत्ती - आश्विन शुद्ध ६, शके - १८७३(१९५१), पृष्ठे - २८६/
मूल्य - ६ रुपये.

**८) भारतस्य संविधानम**
भारतीय राज्यघटना (१९५२)
संस्कृत भाषांतर.
प्रकाशक - प्रकाशन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली.
मुद्रक - दि प्राज्ञ प्रेस, वाई.
प्रथमावृत्ती - १९५२/मूल्य - २ रुपये किंवा ३ शिलिंग. पृष्ठे-२९५

**९) राजवाडे - लेखसंग्रह**
लेखसंग्रह
प्रकाशक - साहित्य अकादमीतर्फे पॉप्युलर प्रकाशक, मुंबई.
मुद्रक - संगम प्रेस प्रा. लि.,३८३, नारायण पेठ, पुणे-२.
प्रथमावृत्ती - १९५८/मूल्य - १२ रुपये/पृष्ठे - २९४.

**१०) लोकमान्य टिळक लेखसंग्रह**
लेखसंग्रह
प्रकाशक - साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

मुद्रक - दि प्राज्ञ प्रेस, वाई.
प्रथमावृत्ती - १ ऑगस्ट,१९६९/मूल्य-१२ रुपये/पृष्ठे - ४५९.

**11) Descriptive Catalogue of Sanskrit Manuscripts, Part II**
(Prajna Pathashala Mandal Collection)
Catalogue of Sanskrit Manuscripts.
Edited by - Laxmanshastri Joshi
Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.
First Edition - 1 st June, 1970, Pages - 717/Price - 50/-

**12) Descriptive Catalogue of Sanskrit, Manuscripts - (Part II)**
(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part I)
Catalogue of Sanskrit Manuscripts.
Edited by - Laxmanshastri Joshi
Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.
First Edition - 1 st June, 1970, Pages - 720-1361/Price - 50/-

**१३) आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत**
भाषणसंग्रह
व्हीनस प्रकाशन, रौप्यमहोत्सव व्याख्यानमाला पुष्प ८ वे, १९७२.
प्रकाशन - व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या', ३८१ - क, शनिवार पेठ, पुणे-३०.
मुद्रक - किर्लोस्कर प्रेस, वीर सावरकर नगर, पुणे - ९.
पहिली आवृत्ती - सप्टेंबर, १९७२/मूल्य - ६ रुपये/पृष्ठे-११.

**१४) सर्वधर्मसमीक्षा**
भाषणसंग्रह
सेनापती बापट व्याख्यानमाला, मुंबई विद्यापीठ, मुंबई - (१९७६-७७)
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.
मुद्रक - गजानन प्रिंटिंग सर्व्हिसेस, कसबा पेठ, पुणे - १.
प्रथमावृत्ती - १९४८/रु.९५/-/पृष्ठे-८८.

**१५) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड-१)**
लेखकसंग्रह (संकीर्ण)
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे-३.

मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी.आंबेकर मार्ग, मुंबई - ३१.
प्रथमावृत्ती - २० ऑगस्ट, १९८२/मूल्य-५५५/-/पृष्ठे-५.

**१६) शिखांचा पंथ व इतिहास**
भाषणसंग्रह
कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला - १९८४.
प्रकाशक - गोपाळ मोकाशी, १७६, सदाशिव पेठ, पुणे - ३०
मुद्रक - दि प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि.सातारा
प्रथमावृत्ती - ५ डिसेंबर, १९८४/किंमत- ७ रुपये/पृष्ठे - ६.

**१७) ज्योतिचरित्र**
चरित्र.
प्रकाशक - नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-५, ग्रीन पार्क, नवी दिल्ली-१.
मुद्रक
प्रथमावृत्ती - शके-१९१४ (१९९२)/किं.३० रु./पृष्ठे-?

**• तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : संपादित ग्रंथ**

**१८) धर्मकोश (खंड १ ते ५) (१९३७ ते १९८८)**
व्यवहारकाण्डम् (भाग १ ते ३)
उपनिषदकाण्डम् (भाग १ ते ४)
संस्कारकाण्डम् (भाग १ ते ६)
राजनीतिकाण्डम् (भाग १ ते ६)
वर्णाश्रमधर्मकाण्डम् (भाग - १)

**१९) मराठी विश्वकोश (खंड १ ते १५) (१९६० ते १९९४)**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९६०-१९८०)
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई. (१९८०-१९९४)

**२०) श्री स्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ (१९५२) (अमृतमहोत्सव)**
प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई (श्री गुरू स्वामी केवलानंद सत्कार समिती
प्रकाशन - मार्गशीर्ष शुद्ध. ४ शके-१८७४/पृष्ठे-२७२.

**२१) श्री ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती स्मारक मंदिर समारोह पुण्यस्मरण पुस्तिका.**
प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.
प्रकाशन - १३ डिसेंबर, १९६०/मूल्य १ रु./पृष्ठे-२५

**२२) श्री यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ**
प्रकाशक - श्री यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती महाल, नागपूर
(अठ्ठेचाळिसावा जन्मदिन सोहळा सत्कार समारंभ ग्रंथ)
मुद्रक - मौज प्रिंटिंग ब्युरो, खटाववाडी, मुंबई-४
प्रकाशन - २१ फाल्गुन, १८८२/१२ मार्च,१९६१/पृष्ठ-१००.

**२३) मराठी विश्वकोश : परिचय ग्रंथ**
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
मुद्रक - मौज प्रकाशन ब्युरो, खटाववाडी, मुंबई-४
प्रकाशन - २ एप्रिल, १९६५(गुढीपाडवा)/पृष्ठे-१२.

**२४) मराठी कुमार विश्वकोश : परिचय ग्रंथ**
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई
मुद्रक - शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे-१
प्रथमावृत्ती - २००३/मूल्य-रु.१५०/-/पृष्ठे-२५८.

**• तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची भाषांतरे**

**25) A critique of Hinduism**
By tarkteerth Laxmanshastri Joshi.
Translated by G. D. Parikh.
Publisher - Modern Age Publication Navasari Chembers, Outram Road, Fort,
Bombay -1.
Printer - N. E. Chinwalla, Manager, British India Press, Mazagaon, Bombay.
First Edition - Market, 1948/Price.Rs.5/-/ Pages-131.

**२६) हिंदू धर्म की समीक्षा**
मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - नथूराम प्रेमी

प्रकाशक - नथूराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय, हिराबाग, गिरगाँव, बम्बई -४
पहली बार - दिसंबर, १९४८, पृष्ट संख्या - १७२

**२७) जडवाद और अनीश्वरवाद**
मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - सत्यदेव विद्यालंकार
प्रकाशक - नथुराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय, हिराबाग, गिरगॉव, बम्बई-४
मुद्रक - न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, ६, केलेवाडी, बम्बई - ४
पहली बार - मार्च, १९५० - पृष्ठ संख्या - ११२.

**२८) वैदिक संस्कृति का विकास**
मूल लेखक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - मोरेश्वर दिनकर पराडकर
प्रकाशक - साहित्य अकादमी, नई दिल्ली-११०००१
प्रथम संस्करण - १९५७. पृष्ठ संख्या - ३६०.
मूल्य - २०० रु.

**२९) राजवाडे लेख संग्रह**
मूल संपादक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.
अनुवादक - वसंत देव
प्रकाशक - साहित्य अकादमी की ओर से शिवलाल अग्रवाल एण्ड कंपनी (प्रा.) लि. आगरा.
मुद्रक - युनिव्हर्सल आर्ट प्रेस, आगरा.
प्रथम संस्करण-१९६४/मूल्य-१२ रु. ५० पै./पृष्ठ संख्या-२२४.

**30) Jotirao Phule**
Tarkteerth Laxmanshastri Joshi.
Traslator - Daya Agrawal.
Publisher - National Book Trust, India
First Edition - 1996/ Price - Rs.75/-/ Pages - 9

**31) Critique of Hinduism And Other Religions**
Tarkteerth Laxmanshastri Joshi.
Translated by Suman Oak.

Publisher - Popular Prakashan,35,c, Pandit Madan Mohan Marviya Marg, Popular Press Building, Tardeo, Bombay - 400 034
First Published - 1996/pages - 205

**32) Development of Indian Culture : Vedas to Gandhi**
Tarkteerth Laxmanshatri Joshi
Translated by - S. R. Nene
Published by - LokVangmay Griha, Bupesh Gupta Bhuwan, 85, Sayani Road, Prabhadevi, Mumbai - 400 025
Printed by - New Age Printing Press, Mumbai - 2
First Edition - 2001/ Price - 200 Rs./Pages -55

**33) Spiritual Materialism**
Tarkteerth Laxmanshastri Joshi
Translated by - Arundhati Khandkar.
Publisher - Lokvangmay Griha, Mumbai - 2
Printer - New Age Printing Press, Mumbai -
First Edition - November, 2004/ Price - 250 Rs.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याचे संपादित ग्रंथ**

**३४) विचारशिल्प**
निबंधसंग्रह
संपादक - प्रा. रा. ग. जाधव
प्रकाशक - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे - ३
मुद्रक - महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०
प्रथमावृत्ती - १९७५/किंमत ५० रु./पृष्ठे - १४८

**३५) आद्य शंकराचार्य - जीवन आणि विचार**
भाषणसंग्रह
संपादक - डॉ. अरुंधती खंडकर.
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे -
मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेडकर मार्ग, मुंबई - ३१
प्रथमावृत्ती - २७ मे,१९९७/किं. ८० रु./पृ.९५

**३६) साहित्याचे तर्कशास्त्र**
साहित्यिक भाषणांचा संग्रह
संपादक - सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे.
प्रकाशन - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.
प्रथमावृत्ती - २०१२/मूल्य-७५० रु./पृष्ठे-४३७

■

## • संदर्भ सूची


**१. श्री. सोमनाथ तीर्थ**
लेखक - त्र्यंबक रघुनाथ (गौतमबुवा) पाठक.
प्रकाशक - श्री यशवंतराव महाराज मंदिर, पिंपळनेर (धुळे)
मुद्रक - श्री गजानन छापखाना, कराड, उत्तर सातारा.
प्रथमावृत्ती - जुलै,१९५९/किंमत-५ रु./पृष्ठे - १७२

**२. नवभारत मासिक/तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक**
फेब्रुवारी-मार्च, १९८१
प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई/किं. ५ रु./पृष्ठे-९५

**३. प्राज्ञांजली (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी गौरव ग्रंथ)**
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३
मुद्रक - कल्पना मुद्रणालय, शिव-पार्वती, टिळक रोड, पुणे-
प्रथमावृत्ती - २० जानेवारी,१९८५/किं.१२५ रु./पृष्ठे -३४

**४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**
लेखिका सौ. मालती देशपांडे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.
मुद्रक - दि प्राज्ञ प्रेस, वाई.
प्रथमावृत्ती - जानेवारी,१९९२/किं. ५० रु./पृष्ठे-

**५. प्रज्ञानंद : अमृतमहोत्सव स्मरणिका**
संपादक मंडळ - वसंतराव बोराटे (निमंत्रक) व अन्य
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
मुद्रक - दि प्राज्ञ प्रेस, वाई.
प्रकाशन - २५ जानेवारी,१९९४/पृष्ठे-९८

**६. शास्त्रीजी (चरित्र)**
लेखक - रा. ग. जाधव
प्रकाशक - प्रतिमा प्रकाशन, १३५९, सदाशिव पेठ, पुणे -
मुद्रक - सुहास मुद्रणालय, २२, बुधवार पेठ, पुणे-२
प्रथमावृत्ती - २४ ऑगस्ट,१९९४/किं.७० रु./पृष्ठे - १५

**७. तर्कतीर्थ : एक प्रज्ञाप्रवाह (चरित्र)**
लेखिका - अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे-
मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई-
प्रथमावृत्ती - २७ मार्च,१९९५/किंमत-२७० रु./पृष्ठे - २६

**८. तर्कतीर्थायन (गीत चरित्र)**
कवी - गोविंद नरहर कुलकर्णी
प्रकाशक - गो. न. कुलकर्णी, 'दवबिंदू', वाई.
मुद्रक - प्रतिमा प्रिंटर्स, १९१०, रविवार पेठ, वाई
प्रकाशन - १ एप्रिल,१९९५/ पृष्ठे - ५०

**९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार**
संपादन - वसंत पळशीकर
प्रकाशन - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
मुद्रण - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-४११ ०३०
प्रथमावृत्ती - फेब्रुवारी,१९९६/ किं. २०० रु./ पृष्ठे - १६

**१०. प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा**
संपादक - लक्ष्मणशास्त्री जोशी, के. ल. दप्तरी, मे.पु.रेगे व
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-४११ ०३०
प्रथमावृत्ती - ऑगस्ट, १९९६/किं.२५ रु./पृष्ठे-२३८

**११. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या बृहत्चरित्राची साधने**
लेखक - अशोक भट
प्रकाशक - लोकमान्य टिळक स्मारक संस्था, मधली आळी,
मुद्रक - विजय मुद्रणालय, धर्मपुरी, वाई.
प्रकाशन - १३ ऑक्टोबर,१९९९/विनामूल्य/पृष्ठे - ४२

**१२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक**
कार्यकारी संपादक - यशवंत कळमकर
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, ३१५, गंगापुरी, वाई
मुद्रक - मुद्रा, ८३, नारायण पेठ, पुणे-४११०३०
प्रथमावृत्ती - २७ जानेवारी,२००१/मूल्य - २०० रु.

**१३. संवाद : तर्कतीर्थांशी (मुलाखत संग्रह)**
लेखक - अनिल जोशी
प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, कृष्णा, पत्रकारनगर, पुणे -
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे - ४११०३०
प्रथमावृत्ती - २६ मे,२००१/किं-१५० रु./पृष्ठे - १५८

**१४. महाराष्ट्राचे शिल्पकार : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**
लेखिका - डॉ. अरुंधती खंडकर.
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई -
मुद्रक - स्नेहेश प्रिंटर्स, धनराज मिल आवार, लोजर परळ, मुंबई -
प्रथमावृत्ती - एप्रिल,२००३/किं.४० रु./पृष्ठे - ८४

**१५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : परंपरा, प्रबोधन व परिवर्तन**
रा. ना. चव्हाण/संपादन - रमेश चव्हाण
प्रकाशक - रमेश चव्हाण, ७ अ/६, पश्चिमा नगरी, कोथरूड, पुणे -
मुद्रक - एस. जयकुमार ऑफसेट प्रा. लि., संगम प्रेस समोर, कोथरूड, पुणे -
प्रथमावृत्ती - नोव्हेंबर, २०१०/किं.१८० रु./पृष्ठे - १७८

**१६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र) (महाराष्ट्र चरित्र - ग्रंथमाला)**
अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्री. गंधर्व-वेद प्रकाशन, १२८६, सदाशिव पेठ, पुणे -
मुद्रक - एक्सेल प्रिंटिंग अँड पॅकेजिंग, १३१/५, एरंडवणे, पुणे -
प्रथमावृत्ती - नोव्हेंबर, २०१०/किं.-१८० रु./पृष्ठे - १७८

**१७. प्राज्ञप्रबोध (प्राज्ञपाठशाळामंडळ शताब्दी ग्रंथ)**
संपादक - श्री. मा. भावे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.
मुद्रक - सन प्रिंटर्स, गणपती आळी, वाई.
प्रथमावृत्ती - डिसेंबर,२०१६/ किं.-२५० रु./पृष्ठे - २४७



व्यक्तीला आपण समजून घेणं हिमनगाप्रमाणे असतं. माणूस जो नि जसा असतो, त्याचं सर्वंकष आकलन कर्मकठीण. त्यातही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींसारख्या महापंडितास समजून घेणे अशक्यप्रायच. कारण असे की बहुप्रज्ञ माणसाचे आपण कितीही अंगांनी अवगाहन केले तरी तो पूर्णपणे हाती येणे असंभव. मग उपाय राहातो तो अनेकांनी अनेक प्रकारे आकलन करून समजून घेणे. सामुहिकतेतून व्यक्ती शोध नि बोध हा एकाकी प्रयत्नांपेक्षा शक्यता, संभावनेच्या अधिक जवळ जाणारा ठरतो. या दृष्टीने 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन' ग्रंथाकडे पाहावे लागते. यातील सर्वंकष शब्द पूर्णत्वसूचक नसून प्रयत्नसाध्यता सूचक आहे. आकलन शब्द समीक्षा, मीमांसेपेक्षा विवेचनाकडे जाणारा आहे. हे लक्षात घेता प्रस्तुत ग्रंथ तर्कतीर्थांना समजून घ्यायचे साहाय्यक साधन बनतो. विविध लेखांचा नि भाषणांचा हा संग्रह असला तरी या ग्रंथाची लेखक, संपादकांनी केलेली रचना व लेखकांची मांडणी यामुळे ग्रंथास सर्वग्राही, सर्वस्पर्शी समग्रतेचे रूपडे आले आहे. म्हणूनही प्रस्तुत ग्रंथ त्याच्या शीर्ष नामाभिधानास सार्थ नि समर्पक बनवतो.

ISBN 978-81-957702-6-7